

# भेटेन पुन्हा!

रघुवीर सामंत

## नव्या कादंबऱ्या

- मधु मंगेश कर्णिक
  - तक्षक
  - सनद
  - जुईली
  - कातळ
- गो. नी. दाण्डेकर
  - त्या तिथें रुखातळीं
  - कृष्णवेध
- अच्युत बर्वे
  - सुखदा
- जयवंत दळवी
  - कहाणी
  - ऋणानुबंध
- सुभाष भेंडे
  - बॉनसाय
  - पैलतीर
- ह. मो. मराठे
  - मार्केट
  - कलियुग
  - सॉफ्टवेअर
- अरुण साधू
  - शोधयात्रा
  - विप्लवा
- आशा बगे
  - झुंबर
- उत्तम बंडू तुपे
  - झुलवा
  - खाई
- रघुवीर सामंत
  - भेटेन पुन्हा !
- म. गो. पाठक
  - राजपुत्र

कथासंग्रह

जयवन्त दळवी

निर्मळा

उपहास-कथा

विक्षिप्त-कथा

गमतीच्या गोष्टी

रुक्मिणी

स्पर्श

अच्युत बर्वे

हँगओव्हर

विद्याधर पुंडलिक

माळ

ह. मो. मराठे

ज्वालामुख

युद्ध

सापेक्ष

अंबिका सरकार

प्रतीक्षा

चारुता सागर

मामाचा वाडा

नागीण

अरुण साधू

बिनपावसाचा दिवस

शरच्चंद्र चिरमुले

कॉग्ज

एका जन्मातल्या गाठी

भारत सासणे

चिरदाह

रत्नाकर मतकरी

दहाजणी


मालती जोशी

पाषाण

अण्णाभाऊ साठे

कृष्णाकाठच्या कथा

खुळंवाडी



श्रीम. सोहळ सावंत.

# भेटेन पुन्हा!


रघुवीर सामंत



मॅजेस्टिक प्रकाशन

प्रथमावृत्ती : २४ डिसेंबर १९८७

*

© स्नेहल सामंत

*

वेष्टन : दत्ता पाडेकर
(डॉ. सौ. शालिनी पटवर्धन,
वुल रिसर्च असोसिएशन, यांच्या सौजन्याने)

*

प्रकाशक
अशोक केशव कोठावळे
मॅजेस्टिक प्रकाशन
३१६, प्रसाद चेंबर्स
गिरगाव, मुंबई ४०० ००४

*

मुद्रक
सौ. कमल रामचंद्र बळसासी
संजीव मुद्रणालय
४६९ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

*

मूल्य : ७५ रुपये

कित्येक वर्षे
मनातल्या मनात व प्रत्यक्षपणेही
मला अतीव आनंद देत राहिलेली
माझी ही भावपूर्ण अल्प कलाकृती

**वा. म., य. गो. जोशी**
**व माधव ज्यूलियन**

या सात्त्विकभावे कलापूर्ण ज्येष्ठत्रयीच्या
सहवास-स्मृतींस समर्पण.

# निवेदन

कै. रघुवीर सामंत ऊर्फ 'कुमार रघुवीर' (जन्म २४ डिसें. १९०९, वाई) यांच्या वाङ्मयीन सृजनशीलतेचा काल ठळकपणे १९३० ते ६५-६६ असा आहे. मात्र त्यानंतरच्या काळात (बदलत्या सामाजिक स्थितीतून येणारे नैराश्य व मानसिक अस्थिरता, मरीला वयोमानपरत्वे येणारे प्रकृति-अस्वास्थ्य यांमुळे) त्यांनी स्वतःवर सक्तीची निवृत्ती लादली. आजच्या काळात एक साहित्यिक म्हणून कै. सामंतांचे नाव काहीसे विस्मृतीच्या पड्द्याआड गेले आहे.

कै. सामंतांचे विपुल लेखन शब्दचित्रे, कथा, कादंबऱ्या अशा प्रकारांत आहे. त्या काळात ते प्रगल्भ वाचक, अभ्यासक आणि समीक्षक यांच्या पसंतीला उतरले. या-व्यतिरिक्त काव्य, नाट्य, मानसशास्त्रीय लेखन, लघुनिबंध, बालवाङ्मय, अपुरा राहिलेला बाल-ज्ञानकोश (फक्त दोन खंड) व नावाजलेल्या परकीय कलाकृतींची भाषांतरे-रूपांतरे इ. प्रकारांनी कै. सामंतांनी मराठी साहित्याची सेवा केली. 'पारिजात' या त्या काळच्या प्रमुख मासिकात त्यांचे लेखन विशेषकरून प्रसिद्ध होत असे.

प्रस्तुतची 'मेटेन पुन्हा' ही प्रदीर्घ कादंबरी कै. सामंतांची (१७ सप्टें. १९८५ च्या त्यांच्या मृत्यूनंतरही अद्यापपर्यंत) अप्रकाशित राहिलेली कलाकृती आहे. कथानक जुळणी सुमारे पंचेचाळीस वर्षांपूर्वीची व लेखनकाल साधारण पस्तीस वर्षांपूर्वीचा आहे. कै. सामंतांनी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार हस्तलिखितामध्ये कोणतेही फेरफार वा संपादन न करता 'मेटेन पुन्हा' जशीच्या तशी रसिकांपुढे सादर केली आहे.

'मेटेन पुन्हा' वाचकांपुढे सादर करण्यात मॅजेस्टिकचे श्री. अशोक कोठावळे व प्रथितयश साहित्यिक श्री. जयवंत दळवी यांचे मोलाचे साह्य झाले. त्याखालोखाल माझे दोन मुलगे व दोन मुली यांचीही मदत झाली. प्रदीर्घ काळानंतर कै. सामंतांची ही अप्रकाशित कलाकृती वाचकांसमोर येत असल्याने मला समाधान वाटते.

स्नेहल र. सामंत

१४ बी, हरजीवनदास एस्टेट,
दादर टी. टी., मुंबई ४०० ०१४.
दि. २४ डिसेंबर १९८७

अनुक्रम

पूर्वार्ध : परंपरा


१ : वर्तमान व भूत १

२ : मृतांच्या गाठीभेटी २६

३ : हरपलेली श्रेये ७५


उत्तरार्ध : प्रेरणा


४ : लक्ष्मीचे राज्य १६५

५ : मुखवटे नि डोलारे २००

६ : अद्भुत पुनर्भेटी ३०१

# पूर्वार्ध

□

# परंपरा

# एक

## दिवाळीचा आनंद

सांज काळवंडल्याचा सुमार झाला तसा तो एकदम घरी जायला निघाला. अगदी न्याऱ्याच आनंदात होता आज तो.

गेला पंधरवडा रात्रंदिवस खच्चून कामात गेला. छापखान्याचं नेहमीचं काम नि पुन्हा घरच्या दोन्ही साप्ताहिकांच्या पहिल्याच सचित्र दीड-दीडशे पानी खास दिवाळी अंकांची आणली भर! इतरांच्या अंकांआधी, ऐन मोक्याच्या वेळी ते दोन्ही प्रसिद्ध व्हायलाच हवे होते. म्हणूनच साऱ्यांच्याच जीवाचा अगदी आटापिटा झालेला. 'ऑटोमॅटिक हिडलबर्ग'वर प्रौढांचा कौटुंबिक 'सदानंद' वायुवेगाने रस्ता काटीत आला होता, तर ऑफसेट-लिथो मशीनवर 'बालानंदा'ची चित्रविचित्र रंगीत कार्टून्स आकर्षक सहा रंगांत रंगत होती.

'सदानंद'-'बालानंदा'ची क्षेत्रं निरनिराळी. वाचक, लेखक, जाहिरातदार, एजंट—सर्वच साफ भिन्न. तरीदेखील योग असा की दोन्ही प्रकारच्या मजकुर-चित्रांचा नुसता पाऊस पडला होता. दर्जाचं तेवढंच आलेल्यातून सर्व निवडायचं, खास पत्रं पाठवून प्रथितयशांचे लेख मागवायचे, अंकांच्या डम्या करून त्यांत सारी मनपसंत जुळवाजुळव करून घ्यायची!... मग चित्रं, लिथोस्टोन, प्लेट, ब्लॉक, विविध टाइपातलं कंपोजिंग—सारं सारं भराभर उरकायचं, म्हणजे त्या नवख्या जोडसंपादकाच्या अगदी नाकी नव येण्याचाच नव्हता का तो प्रसंग?

खरी कमाल होती ती कल्पक माधवची! दोन्ही अंकांसाठी जाहिराती धूर्तपणे त्याने तर भरपूर ओरबाडल्या! शंभुनंदनांच्या चिठ्ठ्या घेतल्या नि साऱ्या व्यापारी जमाला नि सिनेमासृष्टीलाच पान-अर्धं पान-पावपान अशी जणू अगदी जाड-मध्यम-बारीक पिठाची चाळणच लावली होती त्याने! स्वाभाविक कामसू पद्धतीने, छापखान्यातील सर्व खात्यांवरील देखरेख गोपूमामांनीदेखील आपल्या कमालीच्या कसोशीने पार पाडली होती...

अखेर परवा परवाच कुठं दोन्ही अंकांचं घोडामैदान जवळ दिसू लागलं होतं.

छपाईमुळे फुगून भरपूर जाडजूड झालेला ‘ सदानंद ’ नि त्याच्याच शेजारी पहुडलेला ‘ बालानंद ’ ! दोघेही वेळेवरच–दिवाळीच्या अगदी ऐन तोंडावर–साक्षात साकार होऊन अवनीतलावर प्रथमच ते तसे अवतीर्ण झाले होते.

वॉर्निश केलेल्या तुकतुकीत ‘ तय्यार ’ अंकांच्या त्या उंचच उंच थप्प्या! त्याच्या सभोवार एक प्रकारचा विचित्रच वास दरवळत असायचा. ऑफिसरूमच्या दाराशी आज संध्याकाळी, आपापल्या माना उंचावून त्या राशी उभ्या राहिल्या होत्या. तत्काळ तिथल्या सर्वांचेच चेहरे आनंद–समाधानाने प्रफुल्लित झाले. आगाऊ नोंदणी झालेल्या नावा-पत्त्यांच्या याद्या तत्काल बाहेर निघाल्या. आधी दूरदूरची पार्सलं पाठवायला गोपूमामांनी प्रारंभ देखील केला. आपल्याइतकंच इतरांच्या व्यवहार-भावनांनाही जीवाभावाच्या दक्षतेने जपणारा प्राणी होता तो!

आपल्या साऱ्या आयुष्यात डोळ्यांचं पहिलंच पारणं असं एकदाचं फिटल्यासारखं सदानंदालाही वाटलं होतं. अभिमान-समाधानाने त्याची छाती नुसती फुगून आली होती. तो त्या थप्प्यांकडे नि छापखान्यातील साऱ्या कामसू हस्तकांकडे कौतुकाने अधूनमधून पाहत होता.

*

जिथं आपलं सारं बालपण गेलं तेच हे आबा-आजोबांचं तीन पिढ्यांचं जुनं घर! आजचं त्याचंच हे भव्य छापखान्याचं स्वरूप! ट्यूबलाइटांच्या झगमगाटातलं हे न्यारं रूपांतर, तिथलीच चालू घडीची ही कधी नव्हती ती अखंड गजबज-बडबड!

सदानंदाला ते सारं अत्यंत नयनरम्य, अगदी अद्भुत वाटावं यात कसलं नवल नव्हतं!

तसं पाहता, तीनचार वर्षांपूर्वीही त्याचा छापखाना तिथंच होता. पण मग त्या वेळी तो छोटा छापा होता. त्याचा खानाही तिथंच, त्या छापखान्याला जोडलेल्या मागल्या दोन छोट्या खोल्यांमध्येच व्हायचा. त्या वेळी ती त्याची टुटुखुट्टू प्रतिकूल संसारी परिस्थिती होती. अगदी आमूलाग्र पालटलेलं आजचं हे अफाट स्वरूप चितारणं त्या काळी तर केवळ कल्पनेत देखील शक्य झालं नसतं.

याची जाणीव सदानंदाला होत होती. आज मनात आलं– “ एकेका स्थानाचं, वास्तूचं, वस्तूचं, बहिरंग नि अंतरंग कसं पण अगदी बेमालूमपणे नि अकल्पितच पालटून जातं नाही ? ते खरेच योगायोग अद्भुतच असतात. या एकूणच घटना, काही डाव्या बाजूला होतात तर काही उजव्या! पण त्यामुळेच एखादी व्यक्ती ‘सामान्य’, ‘ कल्पक ’, ‘ लायक ’, ‘ नालायक ’ ठरते. तर दुसऱ्या वेळी तीच व्यक्ती...अगदी ‘ असामान्य ’, ‘ कल्पक ’, ‘ लायक ’ असं साऱ्यांनाच वाटू लागतं, पटूही लागतं! खरंच, जगाच्या या न्याऱ्या व्यवहारात सारं सारं काही अंतिम फळावर, अंतिम यशा-वरच अधिक अवलंबून असतं! नाही तरी पूर्वीपासून म्हणतातच ना सगळे—

‘ फलानुमेयाः प्रारंभः ! ’ खरंच आहे ते. ज्या त्या माणसाच्या त्या त्या कार्याच्या प्रारंभाची किंमत त्याचा मोठेपणा, हेतू नि धोरण, यांचंही अखेर कौतुक होत असतं, ते नेहमी याच पद्धतीने ! ”

हातातला अंक चाळता चाळता तो फटकन् मिटून बाजूला ठेवीत तो मनात म्हणाला, एखादं नाणं आपण हाती घ्यायचो नि लहानपणी छोट्या निर्मलाबरोबर ‘ छाप का काटा ? ’ म्हणत खेळायचो. आपण आधी म्हटलेलं तेच प्रत्यक्षात बरोबर आलं, की त्या वेळी त्या पोरीला आपलं उगीचच वाटायचं– ‘ आपला सदाभय्या म्हणजे केवढा मोठा जादूगार ! ’ बहिणीचं खोटं आदरस्थान ठरण्याचा त्या क्षणचा आपला पोरकट तोरा तरी काय कमी का असायचा ? पण मग, आजचं हेही अगदी त्यातलंच नव्हे का सारं, एका अर्थी ?—पाच वर्षांत — किंबहुना गेल्या पंचवीस वर्षांत— आपण व्यक्तिशः तसे काय विशेष बदललो आहो ? हे घर, ही वाडी, सारं सारं काही आहे तेच, आहे तिथंच !—पण मग चमत्कारिक घटना–परंपरेने, केवळ योगायोगाने, सारंच असं पार पालटलंय. परिस्थितीच आता साफ बदललीय ! पण तेच कशाला ? आपण स्वतःही आता अगदी निराळेच बनलो आहो. जणू निराळ्याच, नव्याच जगात वावरतो आहो, आपलं आपल्याला देखील क्षणोक्षणी सारखं वाटू लागलंय अलीकडे !

*

असल्या प्रत्यक्षातून अंतर्वेध घेत भरकटत जाणाऱ्या सदानंदाने मध्येच मनातल्या मनात हळूच एक टपली मारली नि तो पटकन् खुर्चीवरून उठला.

समोरच्या दोन्ही उंच थप्प्यांमधून त्याने एक एक नवी प्रत उचलून घेतली. त्या दोन्ही डाव्या काखोटीला मारल्या नि तो गोपूमामांकडे वळून हळूच म्हणाला,

“ हं, आता निघतो रे मी ! घुपणी–बांधणीचं उरलेलं सारं काम उद्या सकाळपर्यंत पुरं उरकून घ्या. मगच कामगारांना सुटी द्या. प्रत्येकाची दिवाळी–बक्षिसी ठरवली आहे ना आपण ? कालच्या त्या यादीप्रमाणेच देऊन टाका साऱ्यांना ती, उद्याच्या पगाराबरोबर ! परवा तर आंघोळ ! म्हणजे संपूर्ण सुटीच ! हो, पण लक्ष्मीपूजनाच्या दिवशी मात्र बोलव बरं का साऱ्यांना ! — म्हणजे कसल्या कामाला नव्हे, म्हणावं, पान–सुपारी, अत्तर–गुलाब, पेढे–दुग्धपान, यांसाठीच यायचं. निमंत्रित पाहुणे येतील ना कोणी ? त्यांची व्यवस्थाही व्हायला हवी नीट म्हणावं. समजलं ? बरं तर, आता जाऊ ना मी ? हो, बरी आठवण झाली वेळेवर ! काय रे, दोन दिवस फिरकलोच नाही मी इकडे तर ? चालेल ना ? काय ? ”

“ अगदी खुश्शाल ! . ” गोपूमामाही स्नेहाळ स्मित करीत त्यावर म्हणाले, “ बाकी तुला खूपच काम पडलं अंकांचं बरं का, भय्या. गेला पंधरवडा— तीन वार !— त्यातच पुन्हा मध्ये आणखी तो थिएटरचा ओपनिंग सेरिमनी झाला ! झालंच तर ही ऑफ-सेटची नि ऑटोमॅटिकची प्रचंड धुडं आपण ठिकठिकाणी बसवली, त्यांची ट्रायल घेतली

ते सारं ललित सारखं चाललंच होतं, त्यापूर्वी... खरी उसंत कशी ती महिना-दीड महिना मिळालीच नाही रे तुला!"

"हं, अरे चाललंय! आपण सार्‍यांनीच ना ते केलं! हे बघ गोपूमामा, अशी कामाची अगदी गर्दी गर्दी झाल्याशिवायच का गंमत येते जीवनाला? मला तर बुवा जीव गुदमरविणारं असंच काही असलं ना, म्हणजे तर उलट अंगात जादाच जोर येतो!"

मग अंगाला आळोखेपिळोखे देत सदानंदाने दाराकडे पाऊल टाकलं. नि हळूच प्रसन्न स्मित करीत जाता जाता तो म्हणाला, "आज मात्र खरा खरा कंटाळलोय हो मी! अगदी एक प्रकारचा 'सॅच्युरेशन पॉइंट' आलाय! केव्हा घरी पोचेनसं झालंय! छे, हा निघालोच आता! अच्छा! गेलो रे—"

*

दिव्यांचा अगदी चौफेर लखलखाट होता. आपल्याच एका तंद्रीत, आपल्या घराकडे, जणू नाकासमोरच तो चालला होता. पण वीस-पंचवीस पावलं चालल्यावर थिएटरमधून घुमून येणारं, शेवटच्या शोमधलं दुसरं गाणं त्याच्या कानावर एकदम आदळलं नि त्याने चमकून बाजूला वळून पाहिलं---

मनोर्‍याप्रमाणे टप्प्याटप्प्याने चिंचोळं होत होत वर चढत गेलेल्या त्या पसरट थिएटरचे संगमरवरी तुकतुकीत करडे दगड विविधरंगी दिव्यांच्या झगमगाटात अधूनमधून चकाकत होते. अगदी शिरोभागी पोपटी रंगाच्या तिरप्या धावत्या अक्षरांची 'निऑन साइन' प्रकाशत होती. ती वळणदार, धावती इंग्रजी हस्ताक्षरं जणू कोणा अदृश्य हाताने काळोखाच्या पाटीवर लिहिल्यासारखी पुनःपुन्हा क्रमवार लिहिली जात, पेटत होती नि विझत होती...

Sadanand Theatres Ltd.

सदानंद खिडकीत दिसताच तिथल्या ऑफिसमधे बसलेला माधव चटकन् पुढे होऊन हसत हसत म्हणाला, "वा! सदाभय्या, काय झालं रे? आटोपला का खास अंकांचा सारा डोलाऽ? आता घरी का?"

"हं ऽ वे ऽ! खास तुझ्यासाठीच तुझे हे दोन्ही खास अंक! बरं... पण काय रे ऽ इकडे तुझ्याकडलं काही नवल विशेष? सांगण्यासारखं?"

"विशेष?— अरे, खूप खूप!" हातातल्या दुमडलेल्या अंकांनी, बंद बुकिंग विंडोच्या तोंडावर लावलेल्या 'हाऊस फुल'च्या मोठ्या मोठ्या पाट्या दाखवत माधव स्मित करीत म्हणाला, "ते बघ. आज तर अक्षरशः हजारो परतले. आणि आता, आज सुरू झालेला हा म्हणजे तर दिवाळीचाच आठवडा! मला वाटतं, असाच जाणार प्रत्येक आठवडा, प्रत्येक दिवस नि प्रत्येक खेळ!.. का नसावं? अरे, आपलं हे नवंच ओपनिंग! नि पुन्हा शंभुनंदनांचंच नि तेही नवंच पिक्चर हे! मग काय? पुढल्या

पंचवीस दिवसांचे बहुतेक सारे खेळ आगाऊच विकून गेले आहेत काल-आजच्याच दोन दिवसांत ! ”

ऐकता ऐकता, आनंदाने माधवच्या पाठीवर स्नेहाची थाप ठोकून सदानंद देखील दिलखुलास हसला, “ शाब्बास !— बक् अप् यंग मॅन !— विश् अस् ऑल सक्सेस. ”

मग मात्र अधिक काही एक न बोलताच आपल्या घराकडे वळून सदानंद चालू लागला. कारण मधे असं क्षणकाळ रेंगाळत राहिलेल्या त्याच्या मनाने क्षणार्धात पुन्हा एकदा घराची जोरकस ओढ घेतली होती. सारखं कामात गढलेलं माणसाचं मन एखाद्या निकडीचा मधला लकडा एकदम संपला की असंच क्षणापळाच्या विलंबानेही अकारणच बेचैन होत असतं ! पुन्हा अनावर होत असतं ! त्या क्षणीचा सदानंदाचा आनंदाचा-हुरहुरीचा प्रकार तसलाच होता !

*

केवळ दोनच वर्षं झाली. तो भाग म्हणजे एक किर्र रान होतं ! तो साराच परिसर म्हणजे नुसता काट्याकुट्यांनीच भरलेला, पार उघडाबोडका नि निर्जन होता. पण तेथेच आज मोठ्या दिमाखाने झगमगत असलेलं ते ‘ सदानंद थिएटर ’— त्याच्याच जवळच्या छोट्या पण पक्क्या रस्त्याने तो त्या क्षणी चालला होता ! त्यामुळेच चालता चालता मनातल्या मनात त्याला एक प्रकारच्या अननुभूत आनंदाच्या गुदगुल्या होत होत्या.

एस्. टी. साठी झालेल्या नव्या ऐसपैस अॅस्फाल्ट ‘ हायवे ’लाच लाऊन मिळालेल्या त्या खाजगी रस्त्याच्या पलीकडल्या टोकाशी ‘ सदानंद थिएटर ’चं मोठंथोरलं प्रवेशद्वार होतं. त्या फाटकाशेजारीच एका बाजूला एक एकमजली पोपटी टुमदार बंगली होती. लहानशी, नवी कोरी, वळणदार अक्षरांतली पाटी त्या जिन्याजवळच प्रखर प्रकाशात भगभगत होती– ‘ Manager ’s Residence. ’ त्याने तिला झपझप वळसा घातला नि त्या बंगलीभोवताली नव्या हौसेने स्वतःच केलेल्या छोट्या बागेत तो शिरला.

प्रवेशद्वाराशी गुरखा पहारा करीत उभा होता. सदानंदाला पाहताच तो चार पावलं पुढे झाला. त्याचा आदबशीर सलाम त्याने सस्मित चेहऱ्याने परतवला. तरी पण आपल्याच तंद्रीत जिन्याच्या पायऱ्या पटपट चढून सदानंद वरच्या मजल्यावर पोचला.

दार नुसतं किलकिलं लोटूनच ठेवलेलं होतं. त्याने ते हळूच ढकललं नि पाऊल आत टाकलं. आज जवळ जवळ दोनतीन दिवसांनी तो तसा आपल्या घरात शिरत होता. त्यामुळेच त्या वेळी त्याचं मन अगदी कमळासारखं उत्फुल्ल झालं होतं.

*

घरात तसं सारं सामसूमच होतं– कठडे असलेल्या आपापल्या कॉटवर पुष्पा-पद्मा गाढ झोपी गेल्या होत्या. मोठ्या ऐसपैस शिसवी पलंगाच्या कठड्याशी भिंतीवरचा निळसर बेडलँप मंद प्रकाशत होता. पलंगाच्या उशाल्गतच असलेल्या अनंताच्या पाळण्यात

अगदी चिपचाप सामसूम होतं !—

उशीवर डोकं टेकून, पडल्या वाचत असताना, नकळतच मंगलेचा डोळा लागला असावा. कारण 'सदानंद'च्या नव्या खास अंकाची एक उघडी प्रत वाचता वाचता हातची गळून तिच्या वक्षस्थळावर पडली होती. दिव्याच्या शेडमुळे तिचा निद्रिस्त प्रशांत चेहरा तेवढाच उजेडाने अर्धवट प्रकाशित झालेला दिसत होता. किंचित उघड्या ओठांच्या जिवणीमधून तिचे शुभ्र दात अस्पष्ट चकाकत होते.

पटकन जागच्या जागीच थबकून, अगदी मोहरल्या मनाने, आपल्या गृहिणीच्या ऐसपैस पसरलेल्या त्या हृद्य दृश्याकडे सदानंद क्षणभर पाहतच राहिला अगदी—

त्याला त्या वेळी वाटलं— हळूच चोरपावलांनी पुढं व्हावं, पलंगाजवळ जावं. आपल्या मंगलेच्या केसांवरून, गालांवरून हळुवार हात फिरवावा, फुंकर घालून तिला हळूहळू जाग आणावी. ती जागी होताच एकदम आपणच सन्निध असल्याचं पाहून तिला आपलं स्मित वदन नि खोल खोल दडलेले आपले सारे हृद्‌भाव जाणवावेत,— आणि— मग— एकदम —

ते केवळ आपलं एक कल्पनाचित्रच ! मनाला उल्हसित करीत त्याच्या डोळ्यांपुढून ते क्षणभर तरळून गेलं खरं, पण— आपल्या मनच्या त्या क्षणिक स्वैरतेला त्याने तसंच तत्काळ काढून आणलं, नि मांजरासारखी वरच्यावर गुपचूप पावलं टाकीत, हॉलच्या दुसऱ्या टोकाकडील आपल्या टेबलापाशी तो गेला.

मग हळूच तो तिथल्या खुर्चीवर बसला— अंगचं बटन हलकेच कटकन दाबून त्याने तिथला टेबललँप उजळवला, नि जराही आवाज न होईल अशा बेताने आपल्या टेबलाचा उजवा ड्रॉवर त्याने अलगद आपल्या अंगावर ओढला. वरच्या काही अवांतर कागदां-खाली हिरव्या कापडी बाइंडिंगची त्याची एक डायरी होती, तीच त्याने अधीरपणे प्रथम बाहेर काढली.

मग काही क्षण तो आपल्याच तंद्रीत खुर्चीला रेलून बसला. नि शर्टला लटकलेलं आपलं 'पार्कर' किटकन् ओढून संथपणे त्याचं टोपण त्याने काढलं, यांत्रिकपणेच ती डायरी उघडून, भरभर तिची पानं पुढेमागे परतत, अखेर शेवटी लिहिलेल्या पानापाशी येऊन तो थबकला.

क्षणकाळच, आपल्या समोरील कोऱ्या पानावर दृष्टी रोखून, तिथे तो एकटक पाहत राहिला, नि मग सस्मित चेहऱ्याने व काहीशा अधीरतेने मनात येईल ते ते तो तिथे भरभर लिहूच लागला—

## डायरी-नोंद

कुणी म्हणे, 'मानवी संसार— असार!'

म्हणणारे म्हणोत बापडे—

या क्षणी मला तरी तो 'अपार'च दिसतोय.

होय! आपल्याला आवडणारं, पटणारं, पेलणारं तेवढंच सारं, नेहमीच नि हमखास आपल्या जीवनात आपल्या वाट्याला येत नाही, हे खरं. म्हणूनच बहुधा, त्याला कोणी 'असार' म्हणत असतील का!

पण मला तरी आता एकच खास वाटतंय—

अनेकदा, दिनानुदिन, माणसाला खिन्नमनस्क नि कुलीन दृष्टिकोनाचा करण्याचा सदैव आटोकाट प्रयत्न करणारी त्याची दुःखं नि अपयशंच-त्यातून पदोपदी मिळणारे छोटेमोठे रोमहर्षंच-त्याला उत्तरोत्तर, तो असेल त्याहून मोठा करीत असतात: तसं मोठं होण्याचाच त्याला पदोपदी संदेश देत असतात.

—मात्र अशा वेळी आपल्यापाशी एक दुर्मिळ धैर्य असायला हवं, नि ते म्हणजे—भोवतालच्या इतर साऱ्यांच्या—किंबहुना, स्वतःच स्वतःच्यादेखील— आयुष्याकडे, अगदी त्रयस्थ निर्विकारपणे पाहण्याचं न्यारं खेळकर धैर्य!

हो! मानवी आयुष्यात एक अतिमानव-दिव्यत्व आहे! या असल्याच गोष्टीत ते भरलेलं आहे नि तशा दृष्टीने, जीवित असार तर नव्हेच, उलट ते अतिसुरत, सुगम असंच आहे. अशा वेळी तर ते-चमत्कारिक नव्हे-चमत्कारपूर्णच दिसतं! अगम्य? छेः छेः! ते अद्भुतच भासतं-असतं! अरबी सुरसतेलाही लाजवील, फिकं पाडील असं अगदी न्यारंच असतं ते एकूण—

माझ्यासारख्या एखाद्या सामान्याला, आपल्या सामान्य जीवनातही जेव्हा ते असं येऊन भेटतं, तेव्हा तो आपला आपणच गोंधळतो, अगदी पुरा मंत्रमुग्ध होतो. एखाद्या निराळ्याच जगाची त्याला क्षणिक शांती उत्पन्न होते. त्यामुळे भूतभविष्य, जड देह, पार्थिव वस्तू, सर्वा-सर्वांभोवती एका नवीनच अगम्य, रम्य धुक्याची वलयं दाटून उभी राहतात. ती अद्भुत धूसरता त्याच्या जीवाला भरून, भारून नि व्यापूनच टाकते! स्वतः आपण, आपलं जीवित, आपलं जग, सारं सारं क्षणार्धात विरळ होत जातं. ते अफाट अफाट विस्तारलंय, असंच वाटू लागतं...

आणि मग—अशा वेळी, मनाला सतत झाकळणारी, नामोहरम करणारी निराशा-खिन्नताही क्षणार्धात धुक्यासारखीच विरघळते. त्याच्या मनात एकदम नवीनच प्रचंड कार्यशक्ती संचरते. नेहमीची कटुता कुठल्या कुठं नाहीशी होते. तिथं नवा जोम, नवा आत्मविश्वास, नव्या आशा, यांची एक प्रचंडच भरती येते. तशा स्थितीत, आपल्या कर्तृत्वाचे किनारे त्याला मोठेमोठे वाटत जातात. ते दंतुर होऊन नवनवीन क्षेत्रांत घरे करीत शिरत जातात! नवनवीन क्षितिजं आपल्यासमोर आपण होऊनच उभी राहतात!

हे सारं मला इथं असं का बरं सुचतंय आज ?

मला वाटतं... याचं कारण एवढंच की, गेलं वर्षभर मला पदोपदी हाच अनुभव येत राहिला आहे.

*

नुकत्याच लिहिलेल्या त्या पानाकडे पाहत, लिहिता लिहिता सदानंद एकदम थबकला. मग, त्या मागल्याच दोनतीन पानांकडे त्याचं सहज एकदम लक्ष गेलं. हळूच ती पानं त्याने उलटली. पुढले काही लिहिण्याऐवजी ती मागलीच नोंद वाचायला, स्वतःला नकळत त्याने सुरुवात केली.

## डायरी-वाचन

जुन्या घरात आवश्यक ती दुरुस्ती–फेरफार होऊन, ऑटोमॅटिक नि ऑफसेट मशीन्स आम्ही अलीकडेच बसवली, तेव्हापासून छापखान्याच्या कामाला चौफेर जोर आला आहे. सध्या तर खास अंकांची ऐन गर्दी उडाली आहे. मध्ये 'थिएटर ओपनिंग' साजरं होऊन गेलं. ती एक प्रचंडच धमाल... धावपळ होती.

असं हे एकेक पाहिलं की माझा मीच थक्क होऊन जातो एकेकदा हल्ली.

तो गेल्या वर्षीचा आनांचा श्राद्धदिन! संध्याकाळी घरी परतायला निघताना सदू-काकांनी माझ्या हाती चार हजारांचा एक चेक दिला नि ते मला म्हणाले– "अरे सदा, तुझे हे नवं तारू. तू नव्यानेच एका अफाट समुद्रात ढकलतोयस!—तेव्हा त्यात हे माझंही एक छोटंसं आशीर्वादपूर्ण श्रीफळ टाक! तसं तुझ्या त्या सिनेमा नि छपाई–प्रकाशन–व्यापातलं काही एक कळत नाही हो मला, तरीपण तुझ्यावर मात्र पुरा विश्वास आहे माझा! वे...या रूपाने तरी हा माझा शुभाशीर्वाद राहू दे तुझ्याकडे!"

पुढल्या या साऱ्याच परंपरेला तिथून, त्या दिवशीच तशी सुरुवात झालीय. काकांच्या त्या विश्वास–दिलाशाच्या सहानुभूतिपूर्ण उद्‌गारांनी केवढी तरतरी आली होती माझ्या मनाला त्या क्षणी! कोणाचेही सहृदय आशीर्वाद न् अनाहूत सहानुभूती एकूण अमृत-तुल्य नि उत्तेजकच!

तसे अकस्मात हाती आलेले सदूकाकांचे ते चार हजार, रावजींच्या चार मुलांतर्फे मीच गुंतवायचे ठरवलेले आठ हजार, असे एकूण बारा हजाराचे 'ॲप्लिकेशन–ॲड-व्हान्स'चे चेक! दुसऱ्याच दिवशी मी शंभुनंदनांच्या हाती ते ठेवले नि त्यांना मोठ्या उत्साहाने म्हणालो–

"हं...डायरेक्टर साहेब! ठरल्याप्रमाणे, हा माझ्यामार्फतच्या तीस हजार शेअर-

विक्रीचा ४० टक्के ॲडव्हान्स मनी घ्या. आता आधी तुमच्यातर्फेची तितकीच रकम त्यात जमा करून दोघांचं जॉईंट खातं उघडू या. आजच्या आज बँकेत चला! महिन्याभरात आपली लिमिटेड कंपनी फ्लोट होईल, थिएटर प्लॅन तयार होईल, मग उरेल काय तो एक सरकारी परवाना! ते सारं तुम्ही झटपट जमवालच– नि पुढल्या वर्षी दिवाळीच्या आत– ‘ओपनिंग!’ आमच्या आबाआजोबांची ती रिकामी जागा– हां हां म्हणता ऐटदार नव्या थिएटरने व्यापली पाहिजे. माणसांनी चिक्कार गजबजली पाहिजे... गाण्यांनी चौफेर दुमदुमली पाहिजे!...चला! आता आजचं उद्या करून मुळीच भागायचं नाही आपल्याला. उठा!...पुढे व्हा! शुभस्य शीघ्रम्!”

त्या वेळच्या माझ्या त्या उतावळ्या उत्साही बडबडीने, के. शंभुनंदनही खूप खूप खूष झाले होते. आमच्या नव्या जॉईंट अकाउंटमधे त्यांच्याही त्याच दिवशी रकमा पडल्या होत्या. पुढे ते प्लॅन, लटपटी-खटपटी,...अखेर लायसेन्स, नि मग तर प्रत्यक्ष बांधकामाचीही तयारी झाली. इमारतबांधणीच्या कामाची व्यवस्था, ‘आना-सदाशिव’ नि ‘रावजी सन्स’ अशा दोन नवीन फर्म्समध्ये आम्ही वाटून दिली. माधवला थिएटर-मॅनेजमेंटकडे घेतला. गोपूमामा माझ्या छापखान्याकडे पाहू लागला.

*

त्याच्याही पूर्वीच्या त्या घटना नि या मधल्याही साऱ्या घटना! त्या आता अशा आठवल्या की, जीव आलटून-पालटून झाकळतो नि फिरफिरून प्रकाशूनही येतो. मनाला एक प्रकारची संमिश्र मौजच वाटते!– उभारी येते! वाटतं, मानवी जीवन मोठं रोमहर्षक, अद्भुतच आहे वेडं!

कारण, आजोबांची ही जागा तशी आमच्या थिएटर कंपनीला मी विकली, त्यापूर्वी तिच्यात घुसलेल्या श्रीधरच्या मालकीच्या चिंचोळ्या जमीनपट्टीचा आधी मी आपसातला खरेदी-सौदा केला.

तो कागद रजिस्टर झाला त्या वेळी आमचं भावाभावांचं अधिक कसलंच बोलणं झालं नव्हतं. मात्र श्रीधर थोडा बेचैन दिसत होता. वास्तविक तीन वर्षांपूर्वी अडवणुकीच्या हेतूने नानींनीच मुकर केलेली रक्कम तंतोतंत मान्य करून— नि शिवाय त्यांच्या जादा आग्रहास्तव पाचशे वाढवूनच — ती रक्कम चुकती झाली होती. त्यामुळे त्यांचंही तोंड साफ बंद झालं होतं. निदान मी तरी समजत होतो की ते प्रकरण आता तिथंच कायमचं संपलं!

पण त्यानंतर पंधरवड्याने श्रीधरच पुन्हा आपणहून माझ्याकडे आला होता! आमच्या नव्या कंपनी-व्यापाबद्दल नानींच्या कानांवर दरम्यान बहुधा बऱ्याच गोष्टी गेलेल्या असाव्यात. विशेषतः आमच्या बांधकामांची कॉन्ट्रॅक्टं सदूकाकांप्रमाणेच, माझ्या सल्ल्यानुसार शंभुनंदनांनी ‘रावजी सन्स’नाही दिली होती. त्याची कुणकुण नानींच्याही कानी गेली असावी. नानींच्या त्या चौवा भावांनी आमच्या कंपनीचे बारा हजाराचे

शेअर्स खरेदी केले असल्याचंही त्यांना खासच समजलं असणार. कदाचित त्यामुळे त्या अगदी अस्वस्थही झालेल्या असणार.

कारण, येताना श्रीधरने नानींचा मला एक निरोप आणला होता.

"भय्या, हे ४० टक्के 'ॲडव्हान्स मनी 'चे पैसे तुझ्याकडे द्यायला दिले आहेत आईने, माझ्याकडे! – घे— हे चार चार हजाराचे दोन चेक. दहा दहा हजारांच्या शेअर्सच्या आईच्या नि माझ्या नावाच्या कंपनीच्या दोन निरनिराळ्या पक्क्या पावत्या करून मागितल्या आहेत तुझ्याकडे तिने."

ते दोन्ही चेक मी हाती घेतले. त्यांतला एक तर मीच नानींना जमीन–रकमेबाबत पूर्वी दिलेला, माझ्या सहीचा होता. आमच्या कंपनीच्या नावाने नानींनी तो 'एन्डॉर्स' करून पाठवला होता. दुसरा त्यांनी आपल्या व्यक्तिगत खात्यातून नवीनच लिहून दिला होता.

श्रीधरला त्या शेअर पावत्या करून देता देता माझ्या डोक्यात एकदम लख्ख प्रकाश पडला.

मी पुरं जाणलं, या शेअर्सखरेदीच्या निर्णयावेळी, नानींच्या मनात हजार कल्पना तरळून गेल्या असाव्यात. त्यांना तेव्हा खासच वाटलं असावं— "आपल्या चौघा भावांपेक्षा कोणत्याही बाबतीत आपण कमी लेखल्या जाता कामा नये! सदानंदच्या या नवीन धंद्याच्या जमान्यात श्रीधरला कसला प्रत्यक्षाप्रत्यक्ष व्यावहारिक भावी फायदा होणारच असला, तर आपण आपल्या गाफील तटस्थपणाने त्याची ती तसली संधी हकनाक गमावून बसणं योग्य नाही. सदानंदने एका शब्दानेही तसं काही आपल्याला सांगितलेलं नसेल कदाचित, पण आपण खोट्या मानापानाच्या कल्पनेने हे धोरण नि संधी डुकरू नये या वेळी! आपल्या वडिलकीच्या अधिकारात हक्कानेच भागीदार व्हावे आपणही— सदानंदच्या नव्या उपद्व्यापात ती आंधळी उडी ठरली तरी हरकत नाही!"

नानींनी पंधरवडाभर मी दिलेला तो चेक कॅश न करता सेफमध्ये पाडून ठेवला नि तोच अखेर माझ्याकडे असा आज पाठवून दिला. तेच ध्यानी येऊन, मला त्या वेळी खूपखूपच गंमत वाटत होती. मधल्या त्या साऱ्या काळात, नानींच्या मनाच्या किती विविध व्यावहारिक कोलहांटउड्या उलटसुलट पडल्या असतील याचं मला कल्पनेने पुरं पुरं चित्र डोळ्यांपुढे उभं करता येत होतं. त्या साडेचार हजाराच्या घरगुती जमीन-सौद्याबद्दल, त्या वेळी झालेल्या त्या आमच्या परस्पर–खेळण्याबद्दल नि स्वतःच्या स्वार्थी संकुचित वागणुकीबद्दल, नानींना मागाहून नक्कीच तळमळ–चुटपूट लागली असणार. कदाचित थोड्या पश्चात्तापाच्या इंगळ्याही त्यांच्या मनाला डसून गेल्या असणार!

त्या वेळी मला तरी ती एकूण बाब नानींच्या व माझ्या पराजया-जयाचीच वाटली होती. नि त्यामुळेच हृदय एका न्याऱ्या समाधानाने कोंदलं होतं, चौफेर उजळून आलं होतं!

म्हणूनच मला त्या क्षणी वाटत होतं, जगातले व्यवहार हवे तेवढे गुंतागुंतीचे का असेनात— ते भले नग्न स्वार्थाने पछाडलेले, मरलेले, मारलेले का असेनात— चिकाटी ठेवून, त्यांनाही प्रेमानेच अखेर अशी वेसण घालता येते, अनुकूल कलाटणी देता येते, हे निश्चित !

*

' शंभुनंदन-करारा 'नुसार, थिएटर धंद्यातर्फे मला आता राहायला मिळणारा नवीन बंगला तीनचार महिन्यांत पुरा बांधूनही तयार होणार, ही खात्री वाटताच आजवर जुन्याच घरात कसाबसा खुडखुट्ट चालत असलेला माझा छापखाना नीट वाढवा-वयाचं मी निश्चित करून टाकलं.

दोन मशीन्समधे जवळजवळ वीस-बावीस हजार एवढी नवीन रक्कम गुंतवावी लागणार होती. पण माधव, गोपूमामा यांनी कामाच्या सहकार्याबाबत मला आस्था-आपुलकीचा धीर देताच ते मी तत्काळ मुक्ररच करून टाकलं. मी माझ्या जुन्या घराच्या आवश्यक त्या फेरफारामागे आधी लागलो.

शंभुनंदनांनी देखील मला त्या कामी जोरात उत्तेजन दिलं. आपल्या व आपल्या स्नेह्यांच्या छपाईकामाच्या पाठिंब्याचं निर्भेळ आश्वासनही दिलं. चांगल्या चांगल्या जाहिरातीही ते मला मिळवून देऊ शकतील, अशी खात्री होताच मी आणखी एक नवं धाडस करण्याचं ठरवलं -— वाढत्या प्रेसला ' फीडिंग ' हवंच होतं. तेव्हा दोन आदर्श साप्ताहिकं सुरू करण्याचा इतकी वर्षं बाजूस पडलेला माझा बेत मी नव्याने कार्यान्वित केला. मशीनखरेदीनंतर, मी गोपूमामांनाच छापखान्याच्या कामाकडे संपूर्ण वेळासाठी अडकवून नेमून टाकलं... नि माझ्या आटोक्याबाहेरही थोडं जाऊन क्रेडिट-पैसा दोन्ही ओतून मी नवा इंग्रजी-मराठी-गुजराथी टाइपही छापखान्यात भरला.

त्यावेळचा, आम्हा सर्वांचाच तसला तो प्रचंड उत्साह ! ते परस्पर उत्तेजन-सहकार्य ! त्यामुळेच अनुकूल असं एक एक नवं नवं आमच्या हातून नकळतच नुसतं घडून येत होतं, नि क्षणोक्षणी माझं हृदय तराऊन, मोहरून येत होतं !

वर्षानुवर्षं ओकीओकीच पाहावयाची सवय झालेली ती आजोबांची मोकळी जागा ! तीच, अगदी पाचसहा महिन्यांतच, आमचं नवं डुमदार थिएटर मोठ्या तोऱ्यात मिरवताना दिसू लागली ! किती किती सुंदर दृश्य होतं ते ! एका फलश्रुतीच्या न्याऱ्या आनंदाचा मूर्त आविष्कारच मला त्यातून अनुभवता येत होता.

*

के. शंभुनंदन !— मला प्रथम वाटलं होतं त्या मानाने ते खूपच धार्मिक वृत्तीचे निघाले. ' शुभ शकुन ', ' शुभ नाव ', ' शुभ मुहूर्त ' असल्याही अनेक गोष्टींची पैशा-बरोबरच त्यांची नेहमी प्रत्येक कामामधे आकडेमोड-गोळाबेरीज चालत असे, ते पाहून

मी तर फार स्तिमितच व्हायचो.

अखेर थिएटरच्या पायाचा दगड बसवायचा शुभमुहूर्त समारंभ झाला. आमच्या सिनेकंपनीचं नाव अखेर ऐन वेळी त्यांनी ‘ सदानंद थिएटर्स लि. ’ असंच अचानक जाहीर केलं, त्यामुळे मी तर अक्षरशः गोंधळलो– सुन्न झालो. कारण बांधकाम पुरं होण्यापूर्वी आपल्याच कल्पनेने शंभुनंदनांनी गुपचूप तयार करून ती पाटी आणली होती. पाटीच प्रत्यक्ष समोर झळकलेली पाहून मी तर साफ गारच पडलो.

थिएटरची सारी रंगरंगोटी पुरी झाल्यावर एके दिवशी तर आमच्या शंभुनंदनांनी आणखीच एक कमाल केली. माझ्या घरी माझ्या आईच्या वेळेपासूनचा एक मोठा सदानंद स्वामींचा फोटो होता. त्यांनी कधीतरी तो पाहिला होता. त्यांनी तोच उचलून आणला नि थिएटरमधे तो हारांनी शृंगारून अग्रभागी नेऊन लटकावला. त्या वेळी तर मी अगदी त्यांच्याकडे आश्चर्याने काही काळ टकमका पाहतच राहिलो.

तेव्हा शंभुनंदन हसत म्हणाले, “ अरे भय्या, तुमच्या आईची श्रद्धा होती ना या स्वामींवर ? तीच तुम्हांला– अर्थात मलाही– निश्चित अमाप यश देत राहील ! बरकत देईल ! !– सदा आनंद, जीते रहो पठ्ठे ! ”

आता नुकतंच एका सुमुहूर्तावर, आमच्या थिएटरचं ओपनिंग झालं. स्वतः निर्मिलेला सामाजिक नवा चित्रपट शंभुनंदनांनी सदानंद थिएटरला लावला आहे. त्यांच्या खास मैत्रीतले नि संबंधातले अनेक मोठमोठे लोक, पत्रकार, व्यापारी, सिने नटनटी, तंत्रज्ञ, निर्माते त्या प्रसंगी हजर होते. निरनिराळ्या वर्तमानपत्रांच्या जाहिरातवाल्यांनी त्या सान्या आठवडाभर त्याबद्दलच्याच छोट्यामोठ्या रिपोर्टांची नि सचित्र ‘ राइट-अप ’ची एकच धमाल उडवून दिली होती. ‘ सदानंद थिएटर्स ’चा तर त्या दिवसांत खूपच गाजावाजा झाला. जाहिरातकुशल शंभुनंदनांनी– आपल्या शेजारी उभ्या असलेल्या माझ्यासकट– आपले चोहीकडे डझनांनी फोटो छापवून आणले होते. अशा प्रकारे मी केवळ एका रात्रीत एक प्रकाशातली व्यक्ती झालो होतो.

त्या वेळी अशी अगदी चारी बाजूंनी अकल्पित गजबज उडाली. अगदी एकामागून एक अनेक स्वप्नंच जणू प्रत्यक्षातच अवतरत आहेत, असं मला क्षणोक्षणी वाटत राहिलं—

तसल्या त्या अतीव आनंदातच मी त्या वेळी अगदी आकंठ बुडालो होतो !

*

हे आज तसं सारं लिहीत असताना तर मी अगदी एका न्याऱ्याच, मनस्वी नि कमालीच्या आनंदात आहे. हो !– माझ्यासाठी आम्ही प्रारंभी योजिलेल्या नि आता बांधून पुऱ्या झालेल्या एका खास टुमदार बंगल्यातच मी आज असा आरामात बसलेलो आहे नि हे सारं लिहीत आहे. कारण आजच – दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर— इथं आम्ही राहायला आलो आहो – माझा चिमणा संसार आता इथं या नव्या वास्तूत पसरला आहे !

आबा-आजोबांच्या जुन्या घरी माझा संसार चाललेला असताना, तीन महिन्यांपूर्वी माझ्या चिमण्या संसारात एका नव्या चिमण्या जीवाची आनंददायक भर पडली आहे. पुष्पा-पद्मांना भाऊ मिळाला आहे. वृद्ध भागाआत्या त्याच्या बारशाला आली होती. तिनेच मोठ्या आग्रहाने त्याचं नाव अनंत ठेवलं आहे. रुद्ध स्वरात गद्‌गदत म्हणाली– " अनाबापूच आलाय बरं हा, पुन्हा ! "

नुकताच, केवळ चार तासांपूर्वीच, त्याला रंगीबेरंगी गोधडीत गुरफटवून, मंगलेने –माझ्या गृहलक्ष्मीने–आमच्या या नव्या घरात पदार्पण केलंय ! तेव्हा मला वाटलं, " जुन्यानव्या संसारांचा–घरांचा–ह्यापांचा, तोच एक अद्‌भुत संगम-बिंदू आहे ! "

विद्युत्‌वेगाने घडत गेलेल्या असल्या या साऱ्याच प्रसंगपरंपरेने माझं मन या वेळी पुन्हा एकदा कोंदाटून–भरून–भारून आलंय ! अगदी कल्पनातीतपणे माझ्या वाट्याला यशांमागून आलेल्या या यशांच्या मालिकेने, त्या प्रत्यक्ष प्राप्तीच्या जाणिवेने, माझं हृदय या क्षणी फुलासारखं फुलतंय ! आमूलाग्र रोमहर्षाने गदगदून निथालंय, हलकं हलकं होऊन वर वर उडतंय !

म्हणूनच मला मघा एकदम वाटलं– मनात जे जे वाहून येतंय, भरून राहतंय, ते ते सारं भरकटून लिहून टाकावं ! आजची ही रात्र अर्धी संपलीय तरी, नि म्हणूनच, हा माझा गोड खटाटोप अजून चालूच आहे...आज हा आबा–अनाबापूंचा सदानंद अगदी ब्रह्मानंदातच लीन झाला आहे– लीन झाला आहे !

*

मंगला मघा पाळण्याजवळ बसली होती. बाळाबरोबर ती हसत–खेळत–बोलत होती. त्या वेळी मी प्रेमभराने तिच्या खांद्यावर हात टाकला व त्या दोघांकडे निःशब्दपणे हसून पाहिलं.

मग मंगलच्या खांद्यावरूनच मी पाळण्यात डोकावलो– अनंत स्वैरपणेच हातपाय हलवीत होता. त्याच्या पायांतल्या घागऱ्या खुळखुळत होत्या. काजळ माखलेले त्याचे चमचमते डोळे चौफेर भिरभिरत होते नि चेहऱ्यावरल्या हास्याबरोबरच, त्याच्या लालसर बोळक्यातून लाळ बाहेर ओघळत होती.

तसं त्याच्याकडे वत्सलपणे मी पाहत असताना, आपल्या हातापायांची तो बेटा जोर-जोराने सायकल फिरवीत होता. तोंडाने निरनिराळे चित्रविचित्र आवाज काढीत होता– जणू काय, आपल्याही आणखी काही हजारो नवनवीन कल्पना-योजना आपल्याच दृष्टीने, मला तो तशा अज्ञात भाषेत विशद करून सांगत होता.

तेवढ्यातच, कसं नि काय न कळे, माझ्याकडे टक लावून पाहत तो एकदम निश्चल झाला. मग, का कोण जाणे– खुद्‌कन् हसला. आम्ही दोघे बापलेक क्षणकाळ परस्परा-कडे डोळे भरून पाहत होतो...

नि मग, तेही का कोण जाणे, माझ्या अंगांगातून त्या क्षणी एक अद्‌भुत–अगम्य

लाट सरकन् शहारून गेली— मी अतिशयच बेचैन, बेभान झालो.

त्यातून पुन्हा भानावर येऊन, अनंताच्या फुगीर गालांवर मी हळूच एकदोन टिचक्या मारल्या नि हसलो खरा! पण त्या वेळी माझ्या मनात कशा कोण जाणे, आनंदाच्याच साऱ्या स्मृती झरझर तरळून जात होत्या...नि कसं ते काय की, माझ्या हृदयाच्या खोल खोल कप्प्यात, मुग्धपणेच अव्यक्त शब्द उमटत राहिले– "आना...आना!...आता तर मला नक्की—अगदी खासच वाटतंय- की तुमच्या सदाकडे...या तुमच्या वेड्या भाबड्या मुलाकडे, जणू काय सांगून-सवरुनच, तुम्हीच असे परतून आलाहात!— अगदी त्याच्या प्रकारानेच तुम्ही असं मला...भेटलात पुन्हा!"

## जीवन–मरण

आजदेखील, आपल्या टेबलाजवळ तसं वाचत बसल्या बसल्याच, एका अद्भुत भावनेने सदानंदाने अनंताच्या पाळण्याकडे वळून पाहिलं.

मंगला दुसऱ्या कुशीवर वळली होती. पण अजून गाढ झोपेतच होती. पुष्पा-पद्मांची तर कसलीच हालचाल- अगदी सूक्ष्मपणेही- ऐकू येत नव्हती.

भोवती सारं सारं कसं अगदी शांत शांत होतं, त्यातून दूरचं थिएटर-संगीत तेवढंच अस्पष्ट अस्पष्टच, चुटपुटतं कानी पडत होतं.

आपल्या त्या भरल्या घरात, सुखी संसारात, भरल्या मनाने सदानंद आपल्याशीच हळूच एकदा हसला. तो आपल्या मनातील विविध भाव-विचारांच्या आनंदात अगदी आकंठ डुंबत बसला होता जणू!

त्याच मनःस्थितीत, नुकत्याच वाचलेल्या मजकुरामागे डायरीत लिहिलेली पाचसहा पानं त्याने स्वैरपणे सर्रकन चाळली. नि मग, त्यातल्या सुरवातीच्या पानाशी क्षणभर थबकून, तिथून लिहिलेलं वाचण्यात तो पुन्हा क्षणार्धातच गर्क झाला...

त्या क्षणी, आपल्या भोवतालच्या प्रत्यक्ष जगाची त्याला तरी पुरेपूर विस्मृती झाली होती. तसं एकटंच खुर्चीवर बसल्या बसल्या, त्याचा मनोवारू त्याच्याच अंतर्जगात स्वैर घोडदौड करीत होता–

## वर्षापूर्वीचा वणवा

जवळ जवळ वर्षभराने, डायरीतल्या या कोऱ्या पानांमधे, माझं भरलेलं हृदय ओतून ठेवावंसं वाटतंय मला आज!

ते गेले दोन दिवस!- क्षणाक्षणाला, स्वतःला नकळतच, माझं मन मला भरभरत सतत वर वर नेत होतं.

आज सारा दिवसभर मी माझ्या सर्व नव्या-जुन्या संबंधितांमधे अनपेक्षितपणे, अकल्पितपणे वावरलो. घरी परतल्यावर देखील त्या एकाच एका उदात्त भावनेने मन भारून गेल्यासारखं मला वाटत होतं. अगम्य अशा अनुभवपरंपरेने क्षणकाळ भांबावून अखेर अतीव आनंदानेच माझा अंतरात्मा त्या क्षणी अस्वस्थ झाला होता!

पुष्पा, पद्मा या माझ्या चिमण्या पाखरांना जवळ ओढून, त्यांच्याशी हसण्या-खिदळण्यात मी काही वेळ उत्साहाने रमलो खरा, पण ती झोपी गेल्यावर देखील माझ्या मनात नव्यानेच खळखळणारा तो प्रभावी भावनिर्झर काही केल्या ओसरेचना. विविध विचार-प्रणालींचं मनात एकच एक अद्‌भुत संमेलन भरलं होतं. एकामागून एक माझ्या मनाचं व्यासपीठ व्यापून माझ्या हृदयस्थ प्रचंड भावना धुमाकूळ माजवीत होत्या.

ध्येयं आपल्याला समजतात-पेलतात, सत्प्रवृत्ती तर माझ्या सरावातली नि आकलनीयच बाब — जणू ती पाचवीलाच पुजलेली! इच्छा असो नसो, व्यवहार तर मला जीवनात हरघडी संभाळावा लागला- लागतो. पण आयुष्यातल्या खऱ्या व्यवहाराची नाडी जाणणं, त्यातली मख्खी उमगणं, म्हणजे मला तरी केवळ अशक्यप्राय! इतकं असूनही गेले तीनचार दिवस माझ्या अंगात एकाएकी, अकल्पितपणे, एक प्रकारची व्यवहारकठोरताच वेळोवेळी संचरली. सोज्ज्वळ कर्तव्यतत्परतेनेही न कळतच भारावून जाऊन, त्या साऱ्या असामान्य हालचाली माझ्या हातून भरभर घडत गेल्या, घडल्यानंतरही माझ्या ध्यानी यथार्थतेने आल्या.

' के. शंभुनंदन ', ' नानी-श्रीधर ', ' माधव ', ' माधव नि त्याचे बंधू ',...असली अगदी विविध, विभिन्न वृत्तीचीच ती सारी माणसं! पण त्यांच्यातल्या प्रत्येकाशी ज्या ज्या वेळी, ज्या ज्या पद्धतीने, मी वागणं योग्य ठरलं असतं, तेच, तसलंच एकूण औचित्यपूर्ण वर्तन माझ्या हातून आपोआप घडत गेलं. मी बोलायचं तेच त्या त्या वेळी बोललो, निर्णय घ्यायचे तेच नि योग्य त्या वेळीच मी घेतले! कशाने नि कसा काय की, मी झपाटल्यागत झालो होतो!

हे असं सारं आपल्या हातून घडलं तरी कसं? हा एक मोठा प्रश्न पडला आहे मला या क्षणी!

म्हणूनच, आज मला आत आत फिरफिरून वाटतंय- खरं म्हणजे आज मी स्वतःच्या ताब्यातच नव्हतो मुळी! दुसरंच कोणी तरी, स्वतःला हवं तसं, सारं सारं माझ्या करवी करवून तर घेत नव्हतं ना? किंबहुना मला वाटतं, एकाच नव्हे, अनेक इच्छाशक्तींच्या प्रभावी प्रेरणांनीच त्या तसल्या साऱ्या हालचाली मला न कळतच माझ्या हातून घडत जात होत्या! अगदी हव्या त्याच प्रकारे त्या जमून आल्या होत्या— कोणीतरी जणू जमवूनच आणल्या होत्या! मी केवळ निमित्तमात्र होतो.

*

घर सारं शांत झाल्यावर मी बिछान्यावर पडलो. पण माझं मन प्रचंड भावपुराने अजूनही तसंच तुडुंबलं होतं. अखेर न राहवून मी शेजारी झोपलेल्या मंगलेला हळूच विचारलं— " झोपलीस का ग ? "

किंचित माझ्या बाजूस सरकत तिने विचारले— " नाही अजून ! का हो ? "

भावभराने तिला जवळ ओढीत मी म्हणालो— " का काय, मंगल ? मला तर मुळी झोपच नाही येत आहे आज ! आतून आतून कसले तरी प्रचंड उमाळेच, कढच येताहेत ! त्याबरोबरच फार फार आनंदही होतोय...! "

" अय्या ! हो ? इतका कसला बाई आनंद ?— मला तरी सांगा सारं सारं सदानंद—"

" तुला काय नि कसं सांगू ? तरी पण, हवं तर...ऐक बापडी ! समजेल तेवढं तरी पदरात घे !

" हे बघ, असं समज, आपल्याला ध्येयभूत, ध्यासभूत असं, योग्य नि करणीय असं— जे जे वाटतं, पटतं, ते ते आपण करीत असावं. पण...तरीही, अपयशांच्या मालिकां-मधेच आपण सदा गुरफटून पडावं .. केवळ संकटपरंपराच तेवढ्या आपल्याला सामोऱ्या याव्यात, आपल्या प्रिय माणसांची आपल्याबद्दल नेहमी गैरसमजूतच व्हावी, ती कायमची ठरावी ! अशा वेळी जीव गुदमरतो, एकाकी वाटतं— कायमचं खिन्नत्व, जीवनाबद्दलचा कायमचा कुत्सित भाव मनाला सदैव दाटतो !... मग... अशा वेळी हृदयाला वणवा लागतो... आपलं हे सारं मनापासून केलेलं कार्य जातं तरी कुठं ?— खरं ना ? "

मंगल काहीच बोलली नाही. ती गुपचूप माझे केस कुरवाळीत होती. ती शांतता अखेर असह्य होऊन मीच पुन्हा पुढे म्हणालो— " पण मग, फिरून एकदम, असंही काही आपल्या जीवनात घडत गेल्यासारखं भासतं, प्रत्यक्ष होतच जातं, मंगल... की त्यातूनच, जणू आधी ठरवूनच, आपल्या वाट्याला केवळ यशांमागून यशंच तेवढी भेटायला येऊ लागतात ! समाधानामागून समाधानच मिळतं ! आपल्या नि इतरांच्या भावना अनपेक्षितपणे विविध प्रकारे पुलकित करण्यातच आपण पदापदाला समर्थ होत जातो ! आणि मग मनाला दुसराच एक प्रश्न पडतो— ' हे तरी सारं येतं म्हणजे कुठून ? हे आपलंच आयुष्य— की त्याच्या ऐवजी आपण दुसऱ्याच कोणाचं तरी जीवन त्रयस्थपणे जवळून पाहत आहो ? की, त्याचंच कोणाचं आयुष्य त्याच्या ऐवजी आपणच एकदम भुलचुकीने जगायला लागलो आहो ?— हे ते आपण वागतो, बोलतो, करतो आहो, ते आपणच का ? की ते दुसरंच कोणी ? ते सारं करीत असताना उंचा-वरून, दुरून कुठून तरी, आपण ते नुसतं सारं पाहतच आहो ?— मोठाच चम-त्कारिक गोंधळ उडतो आपल्या मनाचा अशा वेळी !— तुला नाही होत असं काही कधी तरी, मंगल ? "

माझ्या कपाळावरून आपला मऊ उबदार हात हळुवारपणे फिरवीत मंगल पुटपुटली—

" आज हे कसले एकेक विचार येत-जात आहेत तुमच्या मनात, बाई ? "

केवळ हसायचं म्हणूनच मी हळूच हसलो नि माझ्याच मनाच्या गोंधळातून पुन्हा नीट वाट काढीत मी तिला म्हणालो— " का न कळे! आज दिवसभर माझ्या मनात हेच, असंच सारखं चाललंय! एकेकदा तीव्रतेने वाटे, मीच माझ्या हालचालींकडे पाहत आहे. एकदा वाटे, आपले आना-आताच दुरून माझ्याकडे पाहात आहेत. मग फिरूनच वाटे— आपणच आना-आबांकडे पाहत आहो! सारंच कसं अगदी नवीन, अननुभूत! सारंच अद्भुत! प्रत्येक वेळी जे होणारं ते हातून होऊन गेल्यावरच मी स्वतःशी मनात चमकायचो, भांबावयाचो!"

मंगल काळोखात गप्प गप्पच, पुढल्या शब्दावर ध्यान ठेवून सारं ऐकत असावी.

किंचित काळाने मी तिला पुन्हा पुढे सांगितले– " आणि मंगल, एकदा तर असा विचार आला— प्रत्यक्ष भासच झाला मला— मागली एक आठवण झाली— कानांवर शब्द पडले— हो, आमचे आबा-आजोबा निधून गेले, तेव्हा आनाबापू-सदूकाकांना— आपल्या मुलांना— ते अखेरचे म्हणाले होते, तेच ते शब्द!- चेहरा नाहीसा झाला, हा माझा देह हवेत विरून गेला, तरी देखील— मी भेटेन पुन्हा... भेटेन पुन्हा...

" त्या दोघांना त्यांच्या आयुष्यात आबा-आजोबा भेटले की काय, कोण जाणे! पण मला मात्र आज दिवसभर, जिथं जिथं मी गेलो तिथं तिथं, सारखा मधून मधून तोच एक भास होत होता! वाटे, आबा-आजोबाच माझ्या मागून येताहेत, माझ्या मागे सतत उभे आहेत! नि त्यांच्याबरोबर आपले आनाबापूदेखील आहेत— "

गप्प गप्पच, अंधुक प्रकाशात, मंगल माझ्याकडे आश्चर्यचकितपणे पाहत होती. मीही माझं मन आवरून, त्याला गवसणी घालण्यासाठी क्षणभर गप्प झालो होतो. तिच्या डोळ्यांत पाहत होतो.

तोच माझ्या मनाला पुन्हा शब्द सुचले, " दुःखं, संकटं, मानखंडना, हेच सारं आपण अव्याहतपणे धीराने सोसत जातो, आपण जसं जमेल तसं जगत जातो— आपलं जीवन असंच न कळत घडत जातं! पण मग एकाएकी आपल्या हातून, खरोखरच यशस्वी, चांगलं, असं काहीतरी घडल्याची अखेर आपल्याला जाणीव होते नि मग आपलं मन समाधान पावतं. तथापि ते सुख देखील काही वेळाने एकदम ओसरू लागतं. वाटतं, अगदी प्रखरपणे वाटतं, 'साऱ्या साऱ्यांशी एकदा आपण पूर्वी झगडलो,... आपल्या भावना-विचारांच्या, इच्छा-आकांक्षांच्या एकेक ढाली आपण समोर धरल्या, नि वेळोवेळी त्यांच्याशी आपण तुंबळ संग्राम केले! पण— तरी पण—त्यांच्याबद्दलचा, त्यांच्या थोर जीवनाबद्दलचा नि त्यांच्या अंगच्या अव्वल गुणांबद्दलचा, आपल्या मनात सदैव नितांत आदरच होता, त्यांच्या पश्चातसुद्धा तो तसाच उरला होता, उरला आहे!— तर मग, आपल्या या एकूण प्रामाणिक हालचाली, त्यामागली श्रेष्ठ ध्येयं नि त्यांतलीच ही अंतिम यशं!— अखेर तरी त्यांच्या ठिकाणी ती

रुजू होतात की नाही ? त्या गत आत्म्यांच्या जाणिवेचा, समाधानाचा शिक्कामोर्तब त्यावर होतो की नाही ? कसा ? आपल्याला अखेर तरी पावती मिळते की नाही त्याची ? "

अधूनमधून सुस्कारा सोडीत मंगल गप्प गप्पच ऐकत होती, नि ती माझं ते सारं ऐकत आहे यातच मला माझं सारं एकतर्फी समाधान मिळत होतं ! माझ्या मनात कोंदाटून उरणाऱ्या भावना अर्ध्यामुर्ध्या तरी शब्दात धरून तिच्यापुढे यथार्थतेने टाकण्यासाठी मीही अधूनमधून सारखी उसंत घेत होतो. एरवी माझ्या मनाचा नि शब्दांचा ओघ सारखा चालूच होता— मला कोणीतरी झपाटल्यासारखं झालं होतं त्या दिवशी, त्या क्षणी...

*

मी पुढे हळूहळू बोलू लागलो–

" मला तर आता वाटतंय मंगल, प्रत्येक मनुष्य आपल्या जिवंतपणी, एकाच वेळी, निरनिराळे ' मुखवटे ' घालूनच फिरतो. त्यांतलाच एखादा, अधिकात अधिक सोयिस्कर वाटणारा मुखवटा तो अखेरीस कायमचा धारण करीत जातो नि तोच सदैव दाखवीत नेहमी तो फिरतो, बोलतो, वागतो ! नि मग अर्थात हेच आपलं खरंखुरं स्वरूप, असंच तो अखेरपर्यंत इतरांना भासवत असतो.

" त्याच्या त्या अहंगंडाच्याच प्रभावावर मोठमोठाले डोलारे सभोवार उभे राहतात, हे खरं ! पण मग, मला वाटतं, त्याच्या अखेरच्या क्षणी त्याच्या मनात एक प्रचंड झगडा झाल्यावाचून राहत नसावा. अशा वेळी त्याचा तो नेहमीचा परिचित नि इतरही सारेच मुखवटे एकदम वितळून–गळून पडतात...नि त्याचं नैसर्गिक ' नग्न–स्वरूप ' त्याचं त्यालाच एकदम साकल्याने दिसू लागत असावं...

" भूतकाळ व भावी काळ यांच्या त्या अगम्य वेशीवर...नि मृत्यूपूर्वीच्या त्या चार अखेरच्या क्षणी—त्याची उरलीसुरली धारणाशक्ती, सदसद्विवेक बुद्धी, न्यायदेवता, अकस्मात अक्राळविक्राळ स्वरूपात उभी ठाकते.

" नि त्या जीवाला तिचाच निक्षून संदेश मिळतो– ' अरे ! हे रे काय ? आपले आडाखे सारेच चुकले की ! आजवर आपण झगडलो ते केवळ अहंपणाने—Vanity ego. अनेकदा आपल्या विरुद्ध बाजूची तत्त्वंच बरोबर होती की ! पण मग आपल्या त्या त्या क्षणच्या यशस्वी मुखवट्याला जे जे त्या त्या वेळी शोभण्यासारखं नि अनुकूल वाटलं, ते तेच तेवढं, आपण त्या ' मी 'पणाने उचलून धरलं, इतर सारं डोळे बंद करून, साफ चूकच ठरवलं !—हाय हाय !—तेच तर आपलं चुकलंय सारं आयुष्यभर !...खरंच ! पण—पण...त्याचं आता काय ?...ही तर केवळ वन–वे एन्ट्री !—परत फिरायला मार्गच नाही उरलेला ! हातून झालंय ते तर आता पार वज्रलेपच ! ते झालं...भूतकाळात होऊनही गेलं ! त्याचे होतील ते परिणाम मात्र आता भविष्यकाळासाठी उरलेत !

हा क्षण...हा...जीवन-मरणाचा अंतिम सीमाप्रांत! तो क्षणच आपल्याला ही अव्यक्त जाणीव तरी देतोय! ही जाणीव आता केवळ आपल्या स्वतःलाच फक्त!...पण ती जाणीव देखील आता आपल्याइतकीच दुबळी, निर्जीव, अगतिक झाली आहे!

"आणि या मनस्वी गोंधळाबरोबरच, त्याचा तो चिरपरिचित मुखवटा परत एकदम येऊन त्याला पुन्हा चिकटतो. आजवर त्याने वरवर चढवत नेलेले डोलारे! ते तसेच उभे ठेवण्यासाठी एका अबोल शून्यत्वाची, अखेरची नि निर्वाणीची अशी एक धडपड होते त्याच्या मनाची!—"

कसं कोण जाणे, आतून आतूनच, मला एक शब्दांचा ओघ त्या क्षणी सापडत होता. त्याच्या प्रवाही जोरावरच मी आपला भरभर बडबडत जात होतो. मंगलने ते सारं ऐकावं ही इच्छा होती खरी. पण तिने बोलावं, विचारावं, अशी माझी त्या क्षणी अपेक्षाच नव्हती.

*

म्हणूनच, मी क्षणभर थांबताच ती जेव्हा तुटकपणे मधेच काही बोलू लागली तेव्हा मी पटकन् तिच्या तोंडावर हात ठेवला नि तिला म्हणालो- "थांबा बाईसाहेब! आता माझी ही शृंखला अशी मधेच तोडू नका! — माझ्या मनचे हे जे शब्द उमटता-हेत तेवढेच ऐका!"

*

"मला तर आता निश्चित वाटतंय मंगल, त्या निरोप घेणाऱ्या जात्या जीवाची ही असलीच काही तरी धडपड होत असावी!...त्या स्थितीत, त्या क्षणी तो जात्या जीवदेखील आपल्या अहंपणालाच, आपल्या 'इगो'लाच पुन्हा एकदा पुरापुरा शरण जात असावा. आपली ती डळमळती मनःस्थिती, आपला आतून आतूनच बाहेर पडणारा तो मनोमन कबुलीजबाब...त्याचीच एकदम बेचैन करणारी जाणीव होताच, तो थरथरत असावा! हे आपले विचार, या भावना, इतरांच्या कानी पडतील नि आपल्या जीवनातला एक भयंकर चौफेर धरणीकंपच त्यामुळे अकस्मात अवतीर्ण होईल, या भीषण भीतीने अखेर तीच त्याची 'व्हॅनिटी', तोच त्याचा अहंपणा, पुन्हा पुढे सरसावत असावा. त्याचा पुन्हा पुरा कबजा घेतल्याशिवाय तो राहत नसावा. मध्ये निर्माण झालेल्या त्याच्या त्या नैसर्गिक भावकल्लोळाला नि तीव्र इच्छांना तत्काळ, फिरून एक दडपण पडत असावं!

"होय! मग, त्याचा तो अहंपणा- अहंगंडच त्याला दरडावून म्हणत असावा, 'चूप!... बंद... बंद कर तुझं तोंड आता... केवळ माझ्याच जोरावर आयुष्यभर तू स्वतःची सारी समर्थनं करीत आलास! नि खास स्वतःची म्हणून काही तत्त्वं इतरांना सुनावीत राहिलास! स्वतःची एक वागणुकीची पद्धती ठरवून त्याप्रमाणे तू उद्धटपणे वागतही गेलास! नि काय रे, हा तुझ्या जीवनाचा भलाबुरा अजस्र, गगनस्पर्शी डोलारा

तू उभा केलास, तो केवळ माझ्याच ना साहाने ? तुझ्या भोवतालच्या या जड जगात, जीवनात चौफेर बघ जरा !—तुझ्या दृश्य हालचाली, तुझी बोली भाषा, तुझे कागदी लेख, तुझे व्यवहार, तुझे निकाल, निर्णय—तीच—तीच—तुझी कायमची अशी, विविध आकलनीय प्रतिबिंबं होती !—माझ्याच, माझ्याच अखंड चेतनेने ती ठिकठिकाणी उमटून गेली आहेत !...तर मग, आता इतक्या उशिरा कायमचं निघून जाता जाता, नवेच ही असली पलटी का खाणार आहेस तू !—छे छे !—ऐक, माझं ऐक, आधी तुझं ते तोंड बंद कर !

" जाता जीव तसाच मनस्वी गोंधळलेला असताना, त्याचा अहंपणाही मग पुन्हा त्याला नव्याने दरडावीत असावा नि ओरडून म्हणत असावा, हा... हा... तुझा असला अखेरचा आकांत !...पण अजूनही नवनवे अनुभव तुला येतच आहेत. दृष्टी पुन्हा तल्लख होऊन तुला अधिकाधिक जाणीव होत आहे ! त्यामुळे, तू ठरवून जात असलेले आजवरचे काही निश्चित आडाखे तुला कदाचित पार चुकल्यासारखेही वाटत असतील, तू मागे ठेवून जात असलेले कित्येक डोलारे मुळामध्येच कोसळल्यासारखे तुला वाटत असतील या क्षणी !—तरी देखील, जरा विचार कर !—तुझ्या या नवनव्या निर्णयांना अशी एकाएकी, इतरांना अनपेक्षित, वाचा फोडून, तसला एकच एक नवा हाःहाःकार उडविण्याचा आता रे तुला काय अधिकार ? केवळ माझ्यामुळे तू आजवर हे शरीर धारण केलंस, डौलाने मिरवलंस ! तुझ्या प्रत्येक उक्तीला, कृतीला, माझंच एक पारदर्शक असं आवरण, एक अदृश्य लेप चढलेला होता ! तुझ्या उदात्त जीवाला, त्याच्या विश्वव्यापी श्रेष्ठ ध्येयध्यासांचा जो साक्षात्कार झाला तो देखील केवळ माझ्यामुळेच !—हा माझा पारदर्शक झिरझिरता पडदा ! या अंतिम क्षणी सुद्धा तुला तो फाडून टाकणं, आता कदापि शक्य नाही !

*

" या अननुभूत अंतिम झगड्यात तो जीव तसा घुटमळतो, आतबाहेर कासावीस होतो, तेवढ्यात त्याला समजावणीचे शब्द आतून, अगदी आतून ऐकू येत असावेत— "अरे, तुझ्या असल्या दुबळ्या अर्धवट प्रयत्नांतून या क्षणी सापेक्षपणे स्थिर-स्थित झालेलं आहे, त्यात कसला फेरफार— तुला हवा तो नवा बदल घडून येणं हे तर आता अशक्यच !— पण उलट, त्यामुळे तुझ्या मृत देहाभोवती नि तिथं जमलेल्या व्यक्तींमध्ये भयंकर धरणीकंपाचे हादरे तेवढे उद्भवतील ! त्यांचा परिणाम ? काय सांगू ?— कप्पाळ ! तू जगलास ते नि इतरांचंही जीवन, त्यामध्ये साफ कोलमडून ठिकऱ्या ठिकऱ्या होऊन पडेल ! अरे अहंमन्य न्यायाधीशा !...तुझ्या एका विशिष्ट मुखवट्यानेच तुझ्या जगाकडे तू सदैव पाहत आलास जे करायचं त्याच दृष्टिकोणाने तू आजवर केलंस ! जे ' न्यायदान ' तुला द्यायचं होतं ते तू दिलंस नि आता टाकही मोडला आहेस ! तुझ्या हातांनीच, तुझ्या कक्षेतल्या साऱ्या ऐहिक सुखदुःखांची सारी वाटणी तू करून टाकलीच आहेस. एकदा

जे केलंस ते कव्हंशी पहूनही गेलंय! तेव्हा— जगावर, इतरांवर, स्वतःवर, कोणावरही कसले नवे संस्कार करण्याची तुझी कार्यक्षमता, आता या जन्मापुरती तरी खलास झाली! तर मग, आता रे हा फेरविचार कसला? नि कशाला?... कसली ही नसती यातायात, हळहळ?... कशाला हा वृथा आकांत? तुझ्या अहंपणावरच आजवरची तुझी नि इतरांची सुखदुःखं तू निर्मिलीस! त्या जोरावरच त्यांची आपल्या माणसांत तू वाटणी केलीस!— मग?... आता?... बस्स... फिर मागे— घे जगाची धीराने रजा—

“तो जाता जीव, त्या तीव्र भावभावनांच्या, मतमतांच्या, निर्णय-संदेहांच्या रस्सीखेचीत सापडतो, अधिकाधिकच तळमळत-धडपडत असतो, तेव्हा त्याचा तो एकमेव अहंपणाच त्याला अखेरचं म्हणून समजावीत असावा—‘अरे वेड्या! जगातली सुख दुःखं सुख-दुःखं म्हणतात, ती अखेर केवळ सापेक्षच ना?... सुख हे सुख म्हणून किंवा दुःख हे दुःख म्हणून कधीच कायम टिकणं शक्य नाही!— तू कितीही म्हटलंस तरी जगात एकाच्या सुखातच दुसऱ्याचं दुःख नि दुसऱ्याच्या दुःखातच पहिल्याचं सुख असतं! जड वस्तू नि जड जीवन यांचं सारं हे असंच आहे. ‘चुकलं?—तर अजून बदलतो!’— असं म्हणणं नि करणं, ही केवळ ईश्वरी कर्तुमकर्तुम् शक्ती! तिचा उद्दाट अभिनिवेश दाखवण्याची ही नसती तिरमिरी या अखेरच्या क्षणी तुला रे कशाला हवी आणखी! माझं ऐक— फिर मागे! आता घे विश्रांती स्वतःपुरती तरी! तुझा एकट्याचा एक अवतार आता संपला असेल, पण त्या दुसऱ्यांचे अजून आहेत. आता स्वतःसाठी व्यर्थ चुटपुटू नकोस! तू जे जे करू शकला नाहीस, ते ते दुसरा कोणी तरी तुझ्यामागे निश्चित पुरं करील!— जे जे तू आता बदलू शकला नाहीस, शकत नाहीस, ते ते दुसरा कोणी तरी खासच बदलून दाखवील! नि तुझी ती अफाट ध्येयं— अर्धस्फुट तत्त्वं, अप्राप्त आकांक्षा, तुझ्या हातून त्या तडीस गेल्या नसतील, तर तुझ्यामागून, दुसऱ्या कोणाच्या तरी हाताने, ते सारं सारं नक्की पार पडेल!— हा आता तू जाशील! खुशाल जा ना का बापडा! तुझ्यामुळे जग— हे अफाट जग, अडून राहणार आहे थोडंच? ते कोणामुळे अडलंय आजवर!— ते तसंच पुढे पुढे चालत जाणार! पण एक! तुझ्या ध्येयरूपाने, तत्त्वरूपाने, कांक्षारूपाने, तू पुन्हा तुझ्या जगाला कधी ना कधी भेटल्याशिवाय मात्र खासच राहणार नाहीस! तेव्हा सोड, हा उरलासुरला अहंपणाही सोड आता! आता तरी मला सोड!— या क्षणी तरी, अगदी निरपेक्षपणे, तुला पटणाऱ्या तुझ्या साऱ्या साऱ्या श्रेष्ठ ध्येय-तत्त्वांचा पुरा विश्वास बाळग नि तोच तेवढा उराशी बाळगून, जाता जाता, एका ठाम निष्ठेने म्हण बघू- बस्स! संपलं माझं आतापुरतं काम! जगा, माझ्या जगा! मी हा निघालो— तरी पण— कुठे तरी, कुठून तरी,— कसा तरी, तुला मी भेटेन पुन्हा. निश्चित भेटेन पुन्हा.”

*

तसं वेड्यासारखं भरभर बोलता बोलता, मी कंठ दाटून येऊन एकदम थांबलो, तेव्हा झालेल्या शांततेत संथ-गंभीर स्वरात मंगल मला हळूच म्हणाली– "आपल्या आनांवरूनच का सुचले हे विचार तुम्हाला ?"

"होय ! —" मला ते सारं पुन्हा आठवून मी म्हणालो– "तेच ! त्यांचेच ते शेवटचे क्षण, त्यांचीच ती अखेरची दृष्टी, सारं सारं मला या क्षणीही दिसतंय ! त्या वेळच्या त्यांच्या डोळ्यांच्या दारातूनच मी त्यांच्या मनाच्या गाभाऱ्यात खोल खोल शिरलो होतो. आमच्या दोघांच्या प्रत्यक्ष आयुष्यात कधी जमलं नाही मला, तरी पण त्यांच्या कित्येक ध्येय-आदर्शांचा झेंडा, त्यांच्या पश्चातही, पश्चात तरी, मी प्रत्यक्षातच वर फडकत ठेवला आहे, मंगल ! आज मला मनोमन त्याबद्दलचंच समाधान वाटतंय् ! पण मग मंगल, हे माझं सारं जीवन आनांना, त्यांच्या आत्म्याला आता तरी पटलंय्, रुजू झालंय का ? हे मला ग कसं समजावं ? कसं पटावं ? तीच, तीच... एक भयंकर रुखरुख माझ्या मनाला सारखी सारखी भंडावून सोडते आहे आज !— त्यानेच मी आज काहीसा बेचैन झालोय मंगल !"

*

मंगलने प्रेमभराने माझं कपाळ थोपटलं नि एक निःश्वास टाकला.

"झोप आता तू — मला नाही येणार अजूनही थोडा वेळ झोप —" असं म्हणून मी इथं टेबलापाशी येऊन बसलोय नि हा असा इथं हे लिहीत बसलोय... पुढे पुढे... पानामागून पान—

माझ्या समोरच टेबलावर आबा-आनांचा, चांदीच्या फ्रेममध्ये बसवलेला नेहमीचा परिचित एकत्र फोटो आहे. हे लिहिण्यापूर्वी कितीतरी वेळ मी त्या दोघांकडेच पाहत होतो.

तोच माझ्या खांद्याला मंगलेच्या हाताचा पुन्हा हळूच हळुवार स्पर्श झाला नि तिचे गोड शब्द कानी पडले– "असल्या या क्षुल्लक, जड वस्तूंत देखील आपण माणसं आपला जीव किती किती गुंतवून ठेवीत असतो नेहमी, नाही ? मला आठवतंय्, तुम्हीच कधीसं सांगितलेलं— निमावन्संबरोबर आनांना तुम्ही अखेरचं भेटलात, त्या वेळी त्यांनीच स्वतःच्या हाताने तुमच्या हाती दिलेला हा जोड फोटो ! जणू देव्हाऱ्यातल्या देवाप्रमाणे त्याला तुम्ही नेहमी जपता, हे मला ठाऊक का नाही ?— पण त्याचं मला मनातल्या मनात नेहमी हसूच यायचं !— आज मात्र त्या वस्तूंमागल्या तुमच्या एकूण प्रचंड भावनांची खरी खरी, पुरी पुरी ओळख पटली मला !— त्यांचा किंचित तरी साक्षात्कार माझ्याही मनाला आज झाला !— सदानंद— माझे सदानंद !"

डावा हात पटकन मागे करून, माझ्या उजव्या खांद्यावर असलेला मंगलचा हात मी हळूच थोपटला नि तिला म्हणालो— "पण अजूनही का ग जागी तू !— दिवसभरचा चालतोच की तुझा रगाडा— नि तरी हे काय ?— चल— जा ! झोप जा— आधी !"

गोड स्मित करीत, माझं डोकं कुरवाळून, मंगल पलंगाकडे झोपायला निघून गेली, पण साऱ्या साऱ्यांबद्दलच्या साऱ्या मंगल भावनाच माझ्या मनात जाग्या करून ती गेली.

म्हणूनच इतका वेळ मी हे सारं लिहीत बसलो होतो. मनाला अगदी आनंद— आनंद वाटला!— नवा नवा हुरूप आला –

आता मात्र खूप बरं वाटतंय— झोपलंच पाहिजे — दोन नव्हे, अडीचही होऊन गेले आता—

## मरण – अमरपण

केल्या चारपाच दिवसांच्या इतक्या श्रमानंतर देखील, सदानंदाला आज मात्र काही केल्या झोपच येत नव्हती.

नुकतीच वाचलेली वर्षा–सव्वा वर्षांपूर्वीची ती त्याच्या डायरीतली नोंद,...त्या वेळी तो आपल्या जुन्याच घरात राहत होता. पण आज या आपल्या नव्या कोऱ्या हक्काच्या बंगल्यात, नव्या पॉलिश्ड फर्निचरमधे, नव्या तैलरंगी खोलीत, नव्या कार्यव्यग्र प्रतिष्ठेत, नव्या आनंदोत्साहात नि नवनव्या ध्येया–कांक्षांमधे गुंगून–गुंतून तो राहत होता. त्याला त्याची जाणीव सदैव होत असे.

"होय! परिस्थिती, देखावा, वातावरण...सारं–सारंच बदललं!...पण मग, आपण? आपली मंगल? आपली पुष्पा–पद्मा–सोन्यासारखी ती गोड मुलं? यांतलं कोणीच बदललेलं नाही!" असा एक विचार त्याच्या मनात तरळतो न तरळतो तोच त्याला एकदम एका तरी बदलाची जाणीव झालीच, त्यापाठोपाठच— आपला अनंत नाही का नवीन आला आहे आपल्या घरात? खरंच, त्याच्या आगमनाने आपलं अंतरंगही किती बदललंय? पुन्हा, नव्या नव्या जबाबदाऱ्या नाही का आपल्यावर येऊन पडल्या आहेत? दैनंदिन चाकोरी–कार्यक्रम तर पार पार पालटून गेले, नि आपल्याकडे पाहण्याची इतरांची दृष्टी? तीही पार पार बदललीय—

पण मग तेही त्याच्या मनाला पुरं पटेना. त्याने आपल्याशीच नापसंतीची मान हलवली.

अनंतामुळे आपलीही दृष्टी बदललीय, स्वतः आपणच नि आपलं बाळपणच आपल्याला कित्येक दिवसांनी फिरून नव्याने भेटायला आल्यासारखं वाटतंय, किंवा, आपण कोणाला तरी नव्याने भेटायला निघालो आहो, किंबहुना, आपला मधला काही काळ धुक्यामधे विरघळून, आपणच फिरून त्यातून बाहेर पडत, आपल्या या जगात नव्याने अवतरत आहो, असंच काहीसं आपल्याला वाटायला लागलंय! असल्या मनःस्थितीत, अगदी काल–परवा घडलेल्या घटनांचंही आपल्याला विस्मरण होतंय, तर उलट दूरदूरचं, पार

भूतकाळातलं काही तरी अगदी आजच, याच घटकेला आपण जगत आहो,—असं वाटतंय! असं हे गौडबंगाल! खरंच, सारं आहे तरी काय हे? जणू जादूमंतरच!

मनाचा हा गोंधळ काही केल्या नाहीसा होतच नव्हता. म्हणून विमनस्कपणे भिंतीकडे डोळे लावून सदानंद जेव्हा अगदी साफ स्वस्थ बसून राहिला, तेव्हा त्या क्षणी त्याच्या मनाला अगदी ओझरतंच, नवंच काही स्पर्शून गेलं. "हा कसला वेडाचाच प्रकार नसेल ना, आज आपल्या मनाला झालेला? सारखा व्यापून उरणारा!"

पण त्या कल्पनेचंही मग त्याला तितक्याच एकदम हसू आलं--- तो पुटपुटला— "मी?! वेडा?! म्हणजे संपलंच म्हणायचं!"

*

तेवढ्यातच पुन्हा समोर पाहता पाहता, दोन भुरकट भुरकट चेहरे आपल्या जवळ जवळ येत असल्यासारखं त्याला भासलं!--- नि एकदम चमकून, तो फिरून भानावर आला---

फ्रेममधील ते आबा-आनांचे चेहरे! होय! तो फोटोच त्या अंधुक, अस्पष्ट प्रकाशात त्याला तसा अद्भुत दिसला होता. जिवंत दिसला होता. त्या हाडामांसाच्या मूर्तीच वाटल्या होत्या त्याला!

ज्या आजच्या नवनव्या यशाच्या, आकांक्षांच्या, सुखांच्या क्षितिजापाशी त्या क्षणी उभे राहून सदानंद आपल्या जगात वावरत होता...त्या साऱ्यांचीच बैठक...त्याखालची ती जड भूमी...ती आना-बापूंची होती. त्यातच आबा-आजोबांची सारी पुण्याई दडलेली होती. आज नवा पोषाख घालून सजलेलं ते त्याच्या छापखान्याचं जुनं घर...आबा-आजोबांच्या पश्चात् आनाबापूंनीच ते कर्जातून सोडवलं होतं.

नि ते थिएटर?...तो बंगला?..ते तरी त्याच्या व्यक्तिगत कर्तृत्वाचं, यशाचं चिन्ह होतं? छेः छेः! तो स्वतः तरी तसंही पटकन म्हणायला खासच तयार नव्हता.

त्याला वाटत होतं, पन्नास-पंचावन्न वर्षांपूर्वी त्याच्या आबा-आजोबांनी, जणू निःस्पृह मनाने, एका अद्भुत प्रेरणेने भविष्यकाळच्या घोरणांसाठीच, तसं कशाला, जणू केवळ त्याच्यासाठीच, ती भूमी हस्तगत करून ठेवली होती. तिला आनांच्याही आस्थेचा हळुवार भावपूर्ण हात लागलेला होता. अशा पूर्वीपासूनच्या तयार क्षेत्रात पण तोही वावरला होता. त्यांची ती यशं याच्या हातात अशी पडली होती.

असे ते दोन चेहरे...त्या दोन मागल्या पिढ्या! त्या त्याच्याकडे कौतुकाने पाहत नव्हत्या, तर तोच जणू काय त्यांच्याकडे आदरयुक्त कुतूहलाने पाहत होता! स्तिमित, कृतज्ञ, कृतकृत्य, भावनांनी हृदय ओसंडून जात पाहत होता!

तसल्याच चमत्कारिक मनःस्थितीत सदानंदला मग वाटलं, "सदूकाका, भागीआत्या, गंगाअक्का, निर्मला, ही हाडामांसाची जिवंत माणसं जशी आपल्या नैसर्गिक, निश्चित गुणदोषांसह आपल्याला वारंवार अजूनही भेटू शकतात, तसंच आहे हे! हे

आना, हे आबा! आता दूर दूर गेलेले ते जीवसुद्धा असल्या चमत्कारिक अनुभवावेळच्या आपल्या हळुवार मनःस्थितीत, आपल्याला स्वतःच पुनःपुन्हा येऊन आस्था-आपुलकीने भेटतात!"

*

आदराने हातात घेतलेला तो आबा-आनांचा फोटो खाली ठेवताना सदानंदच्या मनात अशाच अनेक विविध आठवणी जाग्या झाल्या होत्या, चमकून गेल्या होत्या! त्यामुळेच अत्यंत भारावून जाऊन, भावनांनी तुडुंब भरून उचंबळलेल्या मनःस्थितीत त्याने पटकन आपल्या टेबलाचा खालचा मोठा ड्रॉवर उघडला नि त्यातल्या मखमली कापडात गुंडाळलेल्या दोन वह्या बाहेर काढल्या.

फार फार वर्षांपूर्वी, सदानंद एकदा आजारी पडला होता. त्या वेळी त्याच्या बिछान्याशी बसून त्याच्या मनोविनोदनासाठी सदूकाकांनी त्याला व निर्मलला आपल्या पित्याबद्दलही—आबा-आजोबांबद्दल—खूप खूप काही सांगितलं होतं.

आबांच्या त्या आयुःपटामधल्या हृद्य प्रसंगांमधे ती दोघं भाऊबहीण अगदी रंगून गेली होती. ऐकलेलं तेच सारं, उत्साही निर्मलेनेच, मागून केव्हा तरी सदूकाकांच्या शब्दांतच लिहून काढलं होतं. त्यानंतर कित्येक वर्षं साफ बाजूस पडून असलेल्या त्या वह्या! आजच्या या मनःस्थितीत सदानंदला त्यांचीच आठवण व्हावी यात काही नवल नव्हतं.

एवढ्या दगदगीच्या धंधरवड्यानंतर आज तो केवळ विश्रांतीसाठी घरी पोचला होता खरा, पण मग मनाला समाधान देणारं तसलं काही तन्मयतेने वाचत जागं राहणं, हीही त्याला तरी त्या क्षणी एक खरीखुरी विश्रांतीच वाटत होती!

आणि म्हणूनच, दिवा जरा पुढे सरकवून, त्याने त्या पहिल्या वहीचं पान नव्या कुतूहलाने नि मोठ्या आस्थेवाईकपणेच उघडलं...

तिथलं वाचायला त्याने उत्साहाने सुरवात केली—

# दोन

## आमचे आबा

पांढरपेशा परंपरेचं असलं, तरी मूळचं केवळ शेतीबागायती करणारंच आमचं कुटुंब. मला आठवतात ते माझे आजोबा... अगदी दूर दूर, एका खेडपट्टीच्या पोटात त्यांचं केवळ अर्धापाऊण एकरभराचं जेमतेम शेत. आपल्या बायकोसह् नि दोन गड्यांसह् अगदी चिखलातसुद्धा ते अहोरात्र राबायचे. खऱ्याखुऱ्या अर्थानं ते शेतकरी होते, आयतोबा सावकार नव्हते.

सत्तावनच्या बंडावेळी आजोबा तरुण होते. त्यांचं रक्त साहजिकच त्या वातावरणात सळसळलं, त्या चौफेर धामधुमीतली त्यांच्या हाती आलेली एक रोटी त्यांनी चाखली नि तत्काळ त्यांनी त्यात स्वतःच आत्मीय भाग घेतला. ते त्या वेळी जे एकदा घराबाहेर पडले, ते अखेर कायमचे परागंदाच झाले. त्यांच्या पाठोपाठ चारदोन वर्षांतच आमची आजी निवर्तली. आमचे वडील नि अगदी लहानपणीच त्यांच्या उपरण्याला गाठ मारून घरात शिरलेली त्यांची पोरसवदा गृहिणी (आमची आई) ही दोघंच काय ती मागे उरली होती.

आपल्या वडिलांच्या व घरच्या सुसंस्कृत वळणामुळे नि वाचन वगैरेच्या स्वतःच्या व्यक्तिगत अभ्यासू आवडीमुळे, तशा गरीब स्थितीतही आबा चांगले शिकले होते. आमच्या अशिक्षित आईची अक्कल मात्र पतीच्या हाताला हात लावण्यापुरतीच तुटपुंजी, मर्यादित होती.

आमच्या मूळ गावाजवळच तीनचार मैलांवर शे-दीडशे उंबरठ्यांचं 'वाघदरी' म्हणून गाव होतं. तिथंच अखेर आमचे आबा पोचले नि त्यात चंचुप्रवेश होताच त्या गावचे पंतोजीही बनले. राहायला जागा, तांदूळ-शिधा, भाजी, कोथिंबीर-मिरची, दूध-ताक, असं कोणा ना कोणाकडून, काही ना काही, त्या जोडप्याला आपण होऊनच मिळे नि त्यांचं कसंबसं ठीक चाले.

वाचनाची, गप्पागोष्टी करण्याची तर आबांना नैसर्गिक नि खूप आवड, त्यामुळे त्यांच्याभोवती चारचौघांचं नेहमीच एक कोंडाळं जमे, घरी अड्डा पडे. अर्थात कोणाचे

हिशेब जमव, कोणाची चिठी लिहून पाठव, कोणाचं खरेदीविक्रीचं खत-कागदपत्र तयार करून दे, कोणाला पोथीपुराण वाचून दाखव, कोणाला कायद्याचा फुकट सल्ला दे, हे त्यांचं नेहमीच चाले. तालुक्याच्या गावी कोर्टकचेऱ्याकडे कोणाला नेऊन त्या कामी त्याला मदत कर, त्या काळची मेंढीखालची वकिली कर, अशा प्रकारची कसली ना कसली लटपट तर ते नेहमीच करीत. अर्थात त्यातून, अगदी सहजासहजी, कोणी ना कोणी त्यांच्या असल्या श्रमांचं आपणहूनच जे प्रेमाने कमीजास्त कुवतीचं चीज करीत, ते अवांतर उत्पन्नही आबांच्या मास्तरकीच्या नि शेतजमिनीच्या उत्पन्नात चांगलीच भर टाकी... असा त्यांचा बिनलाचारीचा, गरिबीचा, पण प्रतिष्ठित संसार चालला होता. असे होते आमचे वडील — तरुण आबाजी मास्तर. ऐन उमेदीमध्ये त्या बावदरीसारख्या एका मोठ्या खेडेगावात, असल्या अनेक प्रकारच्या उंटावरच्या शेळ्या हाकीतच ते तिथं राहत असत. अर्थात स्वतःच्या शेतवाडीचं खेड्यातलं काम म्हणजे केवळ त्यांच्या या हजार मानगडींमधलंच एक. ओघानेच, आमच्या आईला— त्यांच्या गृहलक्ष्मी अन्नपूर्णेलाच — आठवड्यातून चारदोनदा चार-पाच मैलांच्या फेऱ्यांची ती पायपीट करून, तो सारा शेतीचा कारभार पाहावा-सांभाळावा लागे, आपल्या वाढत्या संसाराला तशातच पुरं पडावं लागे. तशी पुरी अशिक्षित असली तरी एकूण आमची आई चांगली धीट होती. आमच्या वडिलोपार्जित छोट्या शेताशेजारच्याच जमिनीचा, धाकल्या नावाचा एक साधारण तरुणसाच मालक शेतकरी होता. भागेली म्हणून आमच्या शेतीमध्ये तर आईला त्याची फार मदत होई. तरी देखील बहुतेक सर्व ती स्वतःच अधिक करी. त्यामुळे तिच्या पायावर जणू काय नक्षत्रच पडलेलं असे. मात्र आपल्या नावाप्रमाणे, असेल ते सारं साऱ्यांना पुरवून ती संतुष्टपणे आबांचा संसार करी.

एकूण असले आबामास्तर नि असली अन्नपूर्णाकाकी ज्याला ठाऊक नाही असा एकही मनुष्य बावदरीच्या त्या पंचक्रोशीत त्या वेळी सापडला नसता. धनाने दरिद्री पण मनाने श्रीमंत, म्हणूनच त्यांचा सर्वांशीच कसा ना कसा संबंध हा घडायचाच.

*

त्या बावदरी गावातलं सर्वात सधन कुटुंब म्हणजे कुलकर्ण्यांचं. देवराव, अप्पाजी नि रावजी असे ते तिघे भाऊ होते. एकत्रच एका जुन्या वडिलोपार्जित मोठ्या थोरल्या वाड्यामधे ते राहत. आणि त्यांच्याच घराशेजारी एका देवळाजवळ कोणाचंसं एक जुनंसं पडकं घर होतं त्याचं वर्षाला दोन रुपये भाडं देऊन, त्यातच आमच्या आबांनी आपला छोटा संसार थाटला होता.

त्या कुलकर्ण्यांचं खटलं तर खूपच मोठं. चालू भरभराटीचे एकाहून अनेक धंदे. ते मोठे जमीनदार शेतकरी तर होतेच, पण गावचे पहिल्या दर्जाचे सावकारही होते. शिवाय जंगलांची मोठमोठी कुपं टेंडर भरून मक्त्याने तोडायची सरकारकडून ते कंत्राटं घेत. त्यांच्यातला सर्वात वडील ' देवराव-दाजी '—त्यांच्या आग्रहानेच अखेर कुलकर्ण्यांच्या

घरचा हिशेब लिहिण्याचं काम आमच्या आबांकडे आलं होतं. त्या बाबदरीत खोत-कुलकर्ण्यांचा अगदी पहिला संबंध आला तो हा असा.

ते तिघे भाऊ मात्र अगदी तीन प्रकारचे होते—

मोठा देवराव दाजी, त्यांच्यातला तो मुख्य. त्याच्या व्यवहारात भरपूर काटेकोर-कठोरपणा नि थोड्याफार ओल्या-सुक्या लटपटी असत. तरीही एकंदरीत दाजी थंड, मनमिळाऊ नि जमतं घेणाराच होता. मधला अप्पाजी. दाजी जितका नाकासमोर चाल-णारा तितकाच हा मोठा कारस्थानी, नागमोडी वळणाचा, पाजी वृत्तीचा होता. तिसरा रावजी, तो अगदी खूप लहान — म्हणजे देवराव दाजीलाही मुलगा शोभण्याइतक्या लहान वयाचा होता. शिकत होता.

घरात संपत्तीचं चांगलं चौफेर पाठबळ, तेव्हा आपल्याला जे जमलं नाही ते खेड्या-तलं नि आसपासच्या ठिकाणी शक्य होतं तेवढं मराठी शिक्षण दाजीने रावजीला देत आणलं आणि अखेर तसल्याच मोठ्या हौसेने पुढलं इंग्रजी शिकायला त्याला त्यांनी जिल्ह्याच्या मोठ्या शहरगावीही पाठवलं होतं. आपल्याला चरायला इथलं रान चांगलं मोकळं असावं, रावजीची ही जादा शिकलेली घरची ब्याद आपल्या आणखी पाठी नको, या धूर्त विचारानेच अप्पाजीनेही रावजीच्या त्या दूर जाण्याला मोठ्या तोंडाने तत्काळ संमती दिली होती. अर्थात त्यानंतर पाचसहा वर्षं रावजी घराबाहेरच असत, त्यामुळे त्यांचं लक्ष घरच्या व्यवहारात कधीच नसे. तो कधी घरी आला तरी केवळ चार-आठ दिवसांचा पाहुणाच असायचा.

साहजिकच, घरी अप्पाजीच्या तर ते चांगलंच पथ्यावर पडलं होतं. खरं म्हणजे दाजीची घरातली वडिलकीची चालू करडी हुकमत, प्रतिष्ठा नि प्रत्येक बाबतीतलं निर्णायक वर्चस्व, आपल्या स्वभावामुळे अप्पाला अगदी असह्य होत चाललं होतं. चौफेर व्यवहाराची कोणती ना कोणती अंगं तरी त्याच्यावरती ओघानेच येऊन पडत असत. नि मधून मधून, दाजीबरोबरच्या आपल्या विरोधाचं आत्यंतिक बळ अजमावण्याची अप्पाला संधी मिळेही. पण त्यात तो खरा यशस्वी होत नसे नि खरा संतुष्टही नव्हता.

त्यावरून त्या दोघा भावांमध्ये अनेकदा लहानसहान कुरबुरी होत. त्यांनाच पुढे पुढे थोडं उग्र स्वरूप येऊ लागलं होतं. त्यातच अप्पाजी खुनशी वृत्तीचा नि आतल्या गाठीचा होता. त्यामुळे तर अखेर, त्याच्या मनात दाजीच्या सत्तेचा काटा कसा ना कसा एकदा काढून त्याला उडवायचे बेत अलीकडे शिजू लागले होते. कुलकर्ण्यांच्या धन-धान्यसंपन्न घरात नकळतच असा एक कलहाग्नी कोंदाटून धुमसू लागला होता.

कुलकर्णी मंडळींचे सारे हिशेब आबाच ठेवीत. ते सारं काही चोख नि वक्तशीर लिहीत. तशी चांगली पाच वर्षं गेली होती आणि दाजीच्या खास मेहेरबानीनेच त्या काळची उत्तम– म्हणजे वर्षाला अडीचशे रुपये इतकी– बिदागीही आबांना त्या कामा-बद्दल देवरावाकडून प्रसन्न मनाने आता मिळत असे. त्याशिवाय प्रेमळ दाजींकडून धान्य, लाकूडफाटा, दूध-तूप इत्यादी कित्येक अवांतर फायदेही त्यांना आपुलकीने लाभत

असतच. असं त्यांचं सगळं काही अगदी छान होतं, तरी पण भावाभावांच्या त्या आपापसातील धुमसत्या कुरबुरी-कटकटीने नि अप्पांच्या सुस तिढ्या चालीने कुलकर्ण्यांकडलं ते आबांचं काम म्हणजे एकूण गोंधळाचं नि जणू मुळावरच्या पोळीसारखं होत चाललं होतं. दिवसेंदिवस निदान तसं आबांना तरी मनातून सारखं वाटू लागलं होतं खास.

त्यात पुन्हा आबांचा स्वभाव जात्याच थोडा जादा फटकळ नि स्पष्टवक्ता. त्याच्या परिणामी अप्पाजींच्या व्यावहारिक गुपित चालमेलींच्या तंगड्याही आबांमुळे वारंवार त्याच्या गळयात आल्यासारखं होई. तिथं त्याची कुठंच डाळ शिजत नसे. त्यामुळे तर तो खूप संतापे. हिशेबी खोट्या कारवाया करून डल्ला मारण्याच्या ज्या सान्या लटपटी अप्पाजी करी, त्या आबा रोखठोकपणे हाणून पाडीत. कारण बाहेर लांड्यालबाड्या, वाकडे पेच नि तिकडे कारभार करो न करो, कुलकर्णी भावाभावांच्या आपापसातल्या फायद्यातोट्यामध्ये तरी दाजींचं वर्तन अत्यंत काटेकोर नि प्रामाणिकपणाचं असे. देवराव दाजी हा त्या कुटुंबाचा खराखुरा कर्ता पुरुष नि पोशिंदा होता.

एवढंच नव्हे तर वेळप्रसंगी अप्पाजीवर दाजी पटकन कितीही रागावला-ओरडला, तरी त्याच्यावर तो फार विश्वासही टाकी. हजारो रुपयांच्या सामायिक रकमा अप्पाजीकडे असल्या तरी त्यांची दाजी कधीच चिंता करत नसे. तो स्वतः तर निपुत्रिकच, त्याला स्वतःला स्वभावतः पैशाचा एवढा सोसही नसे, गरजही वाटत नसे, कारण ना कसला खास नाद ना छंद, पण मग तिघा भावांचा एकत्र व्यवहार मात्र नेहमी चोख असावा म्हणूनच केवळ इतक्या करडेपणे व दक्ष काटेकोर दृष्टीने तो वागे. त्यासाठीच हिशेबाच्या बारीकसारीक तपशिलात तो नेहमी शिरे, अप्पाजीबरोबर वागताना फारच कडक राही— असलाच कोणता तर हाच एक दाजीचा दोष. खरे म्हणजे त्याच्या तीव्र वात्सल्यामुळेच त्याच्यात ती कठोरता आली होती. दाजीच्या एकूण असल्या भोळ्या विश्वासाचा घात करून त्याच्या पाठीत खोट्या व्यवहाराच्या खंजीर खुपसण्याचे अप्पाचे सारे बेत मात्र आबांनी तरी आजवरते पद्धतशीरपणे हाणून पाडले होते. पण त्यातही आश्चर्य असं काही नव्हतं. आमचे आबा म्हणजे जन्मतःच सत्प्रवृत्त, सद्वर्तनी. हजार दोन हजारांच्या लाचुचीने आपल्याला अप्पाजीच्या हातचं बाहुलं करून घेण्याइतके ते कचखाऊ नव्हते की दरिद्री मनाचेही नव्हते. अप्पाने पुढे केलेली ती लालूच तर आबांनी त्या वेळी धिक्कारलीच, पण त्यापुढे प्रत्येक लहानसान रकमांच्या तपशिलाबाबत, आबांनी देवराव दाजीसमोरच अप्पाजींना रोखठोक जाब विचारण्याची नि व्यवहार-तपशिलाबाबत जिथल्या तिथं उलटसुलट छेडण्याची सदैव दक्षताही बाळगली. अप्पाजींच्या तसल्या व्यवहारांमधल्या नाना लांड्यालबाड्या, काळ्या कारवाया यांच्याबाबत आबांनी दाजींकडे दंभस्फोट मात्र मुद्दाम म्हणून कधीच केला नाही, कारण तसल्या गुपिताच्या झाकल्या मुठीवरच तर त्यांनी त्यापुढल्या काळात अप्पाजीला चाणाक्षपणे, सदैव दमात ठेवलं होतं, चांगलंच धारेवर धरलं होतं. त्याची चाल जखाडल्यासारखी झाली होती. अखेर त्यामुळेच प्रामाणिक आबामास्तर म्हणजे अप्पाजीला अखेर एखाद्या गव्हाणीतल्या कुत्र्यासारखाच

वाटायचा. धड स्वतः खाणार नाही की दुसऱ्याला खाऊ देणार नाही! अखेर आमचे आबा म्हणजे असं सारलं अप्पाच्या डोळयात सलत राहणारं एखादं कुसळच होतं जणू काय.

*

शेवटी या बाबतीत एकदाच काय तो सोक्षमोक्ष लावून घेतलाच पाहिजे असं एक कृष्णकारस्थान रचण्याइतकीही अप्पाजींची मजल गेली. त्या वर्षाच्या दिवाळीनंतर तसला तो प्रसंग अप्पाने मुद्दाम उकरूनच काढला म्हटलं तरी चालेल.

हिशेबाची सारी टिपणं, वार्षिक व्यवहाराचे कागदपत्र नि चोपडया-किर्दी-खतावण्या आबांच्या हवाली करून, पक्के हिशेब तयार करायला दाजीने त्यांना सांगितलं, आणि नवीनच घेतलेल्या एका मोठ्या जंगलकुपाच्या कामासाठी तो तिकडे मुक्कामाच्या मांडवा-वर निघून गेला.

तशी दाजीची पाठ फिरते न फिरते तोच अप्पाजीने एका नव्या नंग्या नाटकाचा प्रवेश सुरू केला. हिशेबाबाबतच काही सूचना देता देता " अमुक कर ", " अमुक करू नको ", " या रकमांचा तपशील लिही, ती बाब तशी दाखव " असल्या प्रकारची आबांकडे अप्पाजीने सारखी मल्लिनाथी सुरू केली, भुणभुणच चालवली.

" सर्व काही तुम्ही तुमचं कच्चं लिहून ठेवलं आहे ना, अप्पा? झालं तर. मी हिशेबाच्या जनरीतीप्रमाणंच करीन पुढलं सारं नि सर्व पक्के हिशेब करीन, त्याची काळजी नको... पक्के हिशेब लिहायला हवे. या कामात पक्का आहे तसा मी. तुम्हीही जाणता हे आता मनातल्या मनात. काय अप्पा!" जरा द्व्यर्थी टोमण्याचेच उद्‌गार तत्क्षणी आबांच्या तोंडून निघाले. अप्पांच्या मनातल्या आधीच्याच धुमसत्या आगीत तत्काळ तेल पडल्यासारखंच झालं.

म्हणूनच एकदम खूप खूप चवताळून तो जागचा उठला. याला खाऊ का गिळू असं होऊन मोठ्यानं ओरडला— " तोंड तर बघा— उलट्या अंबारीचेच मालक तुम्ही... साक्षात 'अठरा विश्वं' कुबेर... त्यातही पुन्हा तुला हे नसते डोहाळे अं, आब्या! अरं या असल्या तुझ्या नष्ट गुणांनी, रोजचा तुझा आहे तो रोरही गमावून बसशील बघ... अशाच दशा येईल बघबघता! तडफडणाऱ्या बायकोपोरांचे हाल कुत्रा देखील खाणार नाही! मला हा असला शहाणपणा शिकवायला स्वतः मोठा बृहस्पतीचा अव-तारच लागून गेलायस की नाही तू? नि माझ्यापुढे प्रामाणिकपणाच्या असल्या भाषा करायला-शिकवायला स्वतः तू काय साक्षात पांडव, साक्षात धर्मराजाचा बापच समज-तोस की काय रे आब्या!"

आकाशात जणू काय वीज कडकडावी तसा अप्पा नुसता कडाडत-गडगडत होता. बेफाम रागाने त्या वेळी त्याचा नीट शब्दही फुटत नव्हता. तरीही आबा थंड शब्दातच म्हणाले,

" अप्पा, मी माझं नियुक्त काम माझ्या नेकीने करतोय, तुम्ही तुमचं करा; तुम्हाला हवं तसं करा. ज्याच्या त्याच्या स्वभावाला औषध नसतं. "

तेव्हा मात्र अप्पा अधिकच संतावून ओरडला– " अरे लेका, अस्सं काय? कर तर... दिसेल दिसेल! आठवडयाच्या आतच तुला तुझ्या भोवतालचं सारंच्या सारं जग एकदम फिरलेलं दिसेल. अहोरात्र ते गरागरा फिरूच लागेल... नि तुझ्या डोळ्यांपुढे काजवे चमकतील, काजवे! काय अरे समजलास काय, तू आब्या?!"

" मग चमकले तर बघेन की ते मी– " बेडर मिस्किलपणे हसत आबा उलट पटकन म्हणाले, " पण अप्पा, माझी आपली आहे बाजू सत्याची. साक्षात सूर्याची...सूर्यापुढे कितीही काजवे, कितीही चमकले, तरी ते साफ फिक्केच. त्या तुमच्या काळोखाच्या राजांची या सूर्यराजाला हो कसली भीती?"

एवढं बोलले नि जसं काही काही झालंच नाही, अशा प्रकारे पुन्हा वह्यांत डोकं खुपसून आबांनी हिशेब लिहायला सुरवात केली. ते आबांचं बेदरकार वर्तन पाहून तर अप्पाचं पित्त भयंकरच खवळलं. तो मोठमोठ्याने तणतणला— " पाजी, केवळ एका तीन दमडीचा साधा नोकर तू आमचा... मोठ्या तोंडाने बोलतोयस होय रे माझ्यापुढे? तुझ्या मालकापुढे? चल ऊठ, हो चालता आधी. हात लावू नकोस आमच्या हिशेबाच्या वह्यांना! जा, जा म्हणतोय ना?"

तरीही जागचं तसूभर देखील न हलता एकदाच किंचित आवाज चढवून काम करता करताच, आबा संयमाने अप्पाला म्हणाले– " हे पहा, केवळ दाजींच्या हुकमानेच मी या घरात शिरलोय्, त्यांच्याच हुकमाने आजवर हे काम करीत आलोय मी, पुढेही तसंच त्यांच्याच इच्छेने करीत राहणार आहे. आता तुम्ही जे मला म्हणाला, ते त्यांनाच वाटलं तर सांगता येईल मला. फार काय अप्पा, माझ्या बाबतीत तसं म्हणायला दाजींनाही जागा नाही कसली."

अप्पा अगतिकपणे अधिकच चिडून ओरडला— " त्या दाजीचा धाक! मला? या अप्पाला? असं गप्प करणार तू मला? पण मी काही रावजीसारखा कुकुलं बाळ नव्हे, आब्या. दाजी झालाय आता पार म्हातारा... त्याच्या गोवऱ्या गेल्या आहेत केव्हाच स्मशानात. नाही तरी आमच्या घरामध्ये त्यानेच ना तुला एवढा चढवून ठेवलाय... पण लक्षात ठेव तू आब्या, माडावरचा सुरक्षित दिसणारा गोजिरवाणा नारळ त्या माडाबरोबरच खाली येईल, तो जमीनदोस्त होईल क्षणार्धात! अर्थात त्याचाही कपाळमोक्ष होईल..."

" पोसवलेला तजेलदार माड असा सहजासहजी लुंग्यासुंग्याच्या हातून खाली नाही येऊ शकत, बरं का अप्पासाहेब!" हेटाळणीने हसत आबा म्हणाले, " नि मोठ्या तोऱ्याने आपला शेंडा हलवीत तो माड जोवर उभा आहे तोवर, त्याच्यावरच्या नारळातलंही पाणी सुरक्षितच राहील. ते पवित्र 'श्री-फळ' आहे. बिशाद काय कोणाची त्याला हात लावायची, अप्पा?"

*

अखेर तसल्या शब्दाशब्दीमुळे, रागारागाने थयथयत अप्पा तिथून झटक्याने निघून गेला. मग मात्र आबा भानावर आले. एका अंधुक संशयाने ते भयंकर बैचेनही झाले. अप्पा बोलला त्याचा अर्थ काय ?...त्याचा पाताळयंत्रीपणा कसल्यातरी काळ्या कारवाई-साठी धुमसत तर नाही आहे ना ?

आपल्या दोनतीन विश्वासू हस्तकांसह पहाटेच उठून अप्पा घाईघाईने जंगलाकडे निघून गेल्याची बातमी दुसऱ्याच दिवशी आबांच्या कानी आली नि ते अधिकच बैचेन झाले. त्यांना वाटलं, भावाभावात भांडण नको म्हणून आपण आतापर्यंत काही काही गोष्टी दाजींपासून लपवल्या; पण आता दाजी परत येताच आधी अप्पाबाबत त्याला सावध करणं हे आपलं कर्तव्यच आहे. एकूण अप्पा महाघातकी आहे.

सुरक्षिततेसाठी दाजींच्या साऱ्या वह्या, कागदपत्रांची बोचकी आबांनी आधी आपल्या घरी नेऊन टाकली नि दाजींच्या परत येण्याची ते वाट पाहत बसले. ते पुढले दोन दिवस त्या सर्व बाबतीत काय करावं नि काय नको याबद्दल विचार नि तर्कवितर्क करीत त्यांनी अगदी बेचैनीत नि गोंधळातच कसेबसे ढकलले. पण तिसरा दिवस उजाडला तरी दाजी किंवा अप्पा कोणीच परतेना हे पाहिल्यावर मात्र आबा अगदी हवालदिल झाले. अखेर स्वतःच स्वतःचं सारं सारं ठरवून घरातून उठून ते थेट जंगलाच्या रस्त्याला लागले. उसंतही न घेता, ते भरभर मैलांमागून मैल चालत होते. तसा जवळजवळ निम्मा पल्ला त्यांनी कापलाही होता.

तेवढ्यात, मधल्या एका खेड्यामधे, बाघदरीकडे परत निघालेला दाजींच्या जंगल-खटल्यावरचा शेतकरी त्यांना भेटला. त्याचा चेहरा खूप गोंधळला होता.

आबांना पाहताच, त्याने त्यांना घाबऱ्या घाबऱ्या रडत रडत माहिती सांगितली, " आबा मास्तर, रात्री एक मोठा दरोडा पडला जंगलात...कुणी चुरखेवाले नि ठासणीच्या बंदुका घेतलेले दहाबारा जण आले होते. दाजीशेटच्या नव्या कुपातल्या मांडवावर त्यांनी झडप घातली. मारहाण झाली...गोळ्या झाडल्या...चारपाच हजारांची रोकड घेऊन ते बाहेर पडले...त्या झटापटीत दाजीशेटही आपली बंदूक घेऊन पुढे आले होते पण... दरोडेखोरांतल्या एकाच्या बंदुकीतली गोळी त्यांच्या छाताडात शिरली नि धाडदिशी जमिनीवर पडले. मांडवात अप्पाशेट बी होते, तेही आपली बंदूक सरसावून त्या दरोडे-खोरांपाठी धावत होते...त्यांनी दोन गोळ्या झाडल्या, त्यांतली एक एकाच्या पायाला लागलीही. पण ...ते सारे जीव घेऊन काळोखात पसार झाले."

" नि मग आपले दाजीशेट रे ? " भयभीत चेहऱ्याने नि धडधडत्या छातीने आबांनी प्रश्न केला.

" दोन तांब्ये भरून रक्त गेलं...बेशुद्धच आहेत अजून तरी. तसेच खांद्यावर टाकून, सारे त्यांना घेऊन इकडे येत आहेत. इथून बैलगाडीतून घराकडे नेणार आहेत... बिचारे अप्पाशेट- धाय मोकलून रडताहेत...दाजींच्या नावाने टाहो फोडताहेत...काय हा परसंग मास्तर..."

आबांनी हे सारं ऐकलं मात्र, त्यांच्या सर्वांगाला एकदम दरदरून घामच फुटला. उभ्या जागीच त्यांचे पाय पार गळून गेले...त्यांनी मटकन जमिनीवर बसकण घेतली.

*

पण मग क्षणार्धात फिरून भानावर येऊन आबांनी मनाशी नीट विचार केला. एकूण सारी परिस्थिती झटकन ध्यानी घेऊन पुढे जाण्याऐवजी, त्या ऐकलेल्या बातमीबरोबरच आबा लगबगीने वावदरीकडे परत फिरले.

तसे गावात शिरताच आबा तडक आपल्या घरी गेले. तेवढ्या रात्री त्यांनी दिवा लावला. हिशेबाच्या वह्यांचे नि कागदपत्रांचे रुमाल सोडले. सरावाचा हात बसलेली अनेक कागदपत्रं त्यांनी घाईघाईने चाळली नि त्यांतले काही कागद काढून फाडून टाकले नि मगच ते झोपी गेले.

सकाळी सारे रुमाल पुन्हा दाजीच्या घरी, नेहमीच्या ठिकाणी आबांनी नेऊन ठेवले नि मामुली चौकशी करून ते घरी परत फिरले. जंगलात घडलेल्या त्या भयंकर घटनेची नि कुलकर्णी कुटुंबातल्या हाःहाःकाराची दाजीकडील कोणालाही अजून कसली वार्ता नव्हती.

मग दुपारी एक–दीडपर्यंत सारी मंडळी आक्रोश करीत वाड्यापर्यंत पोचली होती. दाजीचं वाटेतच प्राणोत्क्रमण झालं होतं नि अप्पा तर एखाद्या अजाण पोरासारखा मोठमोठ्याने हंबरडा फोडीत होता—

“दाजी, दाजी...अरे, काय झालं रे हे?...आता मी एकटाच काय करू?... तुझा पसारा तर हा असला अफाट...तुझ्याऐवजी मीच का नाही पडलो त्या वेळी त्या दरोडेखोरांच्या गोळीला?”

ते सारं स्वतःच्या डोळ्यांनी पाहून नि कानांनी ऐकून आबा तर मनातल्या मनात आश्चर्याने हतबुद्धच झाले होते. त्यातलं ते सारं सारं इंगित आबांना समजत होतं, तरी पण पुढे होऊन बोलायची त्यांनाच चोरी झाली होती त्या क्षणी.

मग दाजींची प्रेतयात्रा पार पडली. दुसऱ्या दिवशी तालुक्याहून पोलीस पार्टी आली. दरोड्याच्या जागी जाऊन, झाल्या घटनेबाबतचा तलास झाला. मांडवावर हजर असलेल्या साऱ्यांच्या साग्रसंगीत जबान्या झाल्या. चारदोन गड्यांना रक्त फुटेपर्यंत पोलिसी मारहाणही झाली.

नि अखेर, अर्थातच, दाजीचा तो “अपघाताने मृत्यू” ठरला. फरारी असलेला तो अज्ञात खुनी दरोडेखोर! जमेल तेव्हा त्याला आणि त्या साऱ्या टोळीलाच शोधून काढण्याचा पोलीस लोक आटोकाट प्रयत्न करीत होते. त्याला शोधणाऱ्याला अप्पाने हजार रुपयांचं इनाम जाहीर करून ते पोलीसखात्याच्या स्वाधीन केलं होतं.

*

दाजींच्या तेराव्यानंतरही आठदहा दिवस गेले, आणि मग... अप्पाजीने एक दिवस आबांना गड्याकरवी बोलावणं पाठवलं. कारण ती भयंकर बातमी ऐकून रावजीही घरी परतलेला होता.

आबा तिथं पोचले नि बैठकीवर बसले. तरी क्षणभर कोणीच काही बोललं नाही.

मग रावजीसमोरच अप्पा शहाजोगपणाने म्हणाला, "आबा, आमची सारी टिपणं, कागदपत्रं, सारं ठिकाणावर आहे ना ? आता हा आमचा रावजी घरी आलेलाच आहे. तोच आमच्यातला हुशार नि शिकलेला. आम्ही दोघं मिळून हिशेब वगैरे सर्व नीट ठेवत जाऊ यापुढे, तुझ्या अर्ध्या लिहिलेल्या वह्याही बसल्या बसल्या पुऱ्या करू आमच्या आम्हीच. कसं ?...तुला रे कशाला उगीच तो नसता त्रास नि व्याप यापुढे ?...काय, बरोबर आहे ना ?...हं, हे वे आजवरच्या चोख कामाचं इनाम-" अप्पाने दोन हजारांच्या नोटा आबांच्या पुढे केल्या होत्या. पण त्यांना हातही न लावता ते स्तब्ध राहिले. तसल्या एकूण घटनेची आबांनी तर आधीच अपेक्षा, कल्पना केलेली होती. आपण नियमित वार्षिक प्राप्तीची नोकरी कायमची गमावतोय या जाणिवेपेक्षा, दाजींचा तो प्रतिष्ठितपणे झालेला भयंकर खूनच त्यांच्या मनाला अहोरात्र मनस्वी जाचणी करीत आला होता. त्यानेच त्यांच्या जिवाचा एकच एक कोंडमारा झाला होता. त्यातच त्या क्षणी अप्पा जे सांगत होता नि निर्लज्जपणे करीत होता, त्यामुळे त्यांचा जीव कळवळत होता.

हताश सुन्न होऊन, अप्पाच्या त्या लाचेकडे ढुंकूनही न पाहता, त्याबाबतची अधिक कसली वाच्यताही न करता, आबा काही काळ तर वाचा गेल्यासारखे मुखस्तंभ बनूनच राहिले. अखेर स्वतःला सावरून घेत नि थोड्या मिस्किलपणे आबा अप्पाला म्हणाले, "नोकरी काय, संपवायचीच असते केव्हा ना केव्हा, पण ही काय इनाम घेण्याची का वेळ आहे अप्पा ?...छे छे. पण अप्पा, त्या दिवशी मला तुम्ही म्हणालात तसंच पुढलं सारं एकेक घडत गेलं की ! एकूण तुमच्या मनासारखं सगळं पार पडलं, नाही ? तुमच्या त्या गोष्टीतला तो नारळ फुटला...पण मग उभ्या माडावरला एक यःकश्चित नारळ जमीनदोस्त करण्यासाठी हा हो कसला अघोरी मार्ग अवलंबिलात तुम्ही ? तुमच्या हिशोबाने तर तो एक तीन दमडीचा कुजका नारळ. केवळ वर चढूनही तो फेकून देता आला असता की गटारात. बरं काय असेल ते असो. तुमचं पाप-पुण्य तुमच्यापाशी. त्यात काय तुम्हांला सांगणार-शिकविणार ? मी हो कोण ? समर्थ आहा तुमचे तुम्ही आता अप्पा. बरं तर, येतो मी आता...आता या रावजींना मात्र संभाळा बरं का नीट. पोरवय आहे त्यांचं. अजून अजाणच आहेत ते. भोवतालच्या जगाची खरीखुरी ओळख नाहीय त्यांना, म्हणून म्हटलं. बरं, जातो मी... आता देव तुमचं दोघा भावांचं भलं करो. ज्याचं त्याचं वैभव ज्याला त्याला !!...येतो रजा, अं ? ऽ..."

अप्पाची दातखिळी बसल्यासारखी झाली होती क्षणभर. अधिक काही न बोलताच आबा तसे कुलकर्ण्यांचं घर सोडून आपल्या घरी परतले, म्हणूनच केवळ त्या वेळी

अप्पाचा जीव भांड्यात पडला होता.

*

त्याच संध्याकाळी रावजी सहज म्हणून देवदर्शनाला गेला होता. योगायोगाने देवासमोरच त्याची आबांशी भेट झाली. बाहेर पडल्यावर त्यानेच आबांना थोडं आणखीही पुढे फिरायला येण्याचा आग्रह केला नि मग वाटेत चालता चालता रावजीने आबांना धोरणाने मोघमच प्रश्न केला,

" त्या माडावरच्या नारळाचं काय म्हणालात अप्पांना तुम्ही दुपारी, आबा ! "

आबा एकदम चपापले. त्यांच्या पोटात आत आत कालवून आल्यागत झालं. त्यांना एकदम एक जोराचा हुंदकाही आला. दाजीला आपण वेळेवर कळवून सावध करू शकलो नाही, याचंच भयंकर शल्य त्यांच्या मनात अहोरात्र सलत होतं. त्या दुःखालाच आसवांच्या रूपाने तशी मोकळी वाट मिळाली होती.

म्हणूनच नि त्यावरूनच आबांच्या मनात एकदम आलं, यांना, या रावजीला तरी, या समक्ष भेटीत वेळेवरच, अगदी याच क्षणी, सारं सारं आजच कळवून टाकणं, त्याला भावी संकटाबाबत जागरूक करणं हे आपल्याला अजून शक्य आहे. किंबहुना आपलं ते कर्तव्यच नव्हे का प्राप्त परिस्थितीत ?

तेव्हा तसल्याच विचारांनी, आबांनी रावजीला ते सारं सारं कर्तव्यबुद्धीने त्याच वेळी प्रथमपासून सांगून टाकलं. डोळ्यांत तेल घालून सावध राहण्याबाबत रावजीला हळूच इशाराही दिला, त्याचा निरोप घेण्यापूर्वी.

रावजी म्हणजे त्या वेळी एक पंचविशी-अठ्ठाविशीकडचा तरुण होता. तोवर तो मॅट्रिकपर्यंत शिकला होता, त्याने स्वतंत्रपणेही आपलं आयुष्य घालवलं होतं स्वतःच्या हिंमतीवर, चार गावचं पाणी प्यालेला होता. सगळ्या लोकांशी त्याचा संबंध आलेला होता, बैठक झालेली होती. तेव्हा, तसा मोठा जात्याच हुशार नि धूर्त होता तो. उथळ पाणी, खोल पाणी यांतला फरक पटकन अंदाजण्याइतकी त्याला अक्कल आली होती.

नाहीतरी पहिली बायको एकाएकी मरून, अगदी त्याच वेळी रावजी पुन्हा एकाकी, सडाफटिंग विधुर झाला होता. म्हणूनच त्याच्या मनात विचार आला असावा... आता अशा स्थितीत, यापुढे इथलं आपलं, आपल्या घरचं कुटुंबीय वास्तव्य म्हणजे... सुरुंग दारूने सदैव भरलेलं ते एखादं कोठारच ठरेल... कदाचित उडला- घडला तर पुन्हा असाच एखादा अवसानघातकी, विश्वासघातकी आपलाही व्यक्तिशः नायनाट करून टाकणारा, प्राणघातकी भडकाच उडायचा.

तर मग, त्यापेक्षा आपले शिर सलामत तो पगडी पचास... सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजती पंडितः... बस्स. राहीना का अप्पाला इथंच बापदरीतलं हे रान मोकळं चरून... त्याच्या कारस्थानाला आपण आणखी नव्याने नवा बळी पडायला नको. आज जे काय करायचं ते तो स्वतःच्या मनाने करील, वडिलार्जिताचं पुढे योग्य वेळ येईल

तेव्हा पाहून घेता येईल... सध्या तरी आपल्या मनगटातच काय सापडतंय ते तर आपण आधी शोधू या...

आणि म्हणूनच अखेर त्याच दिवशी रातोरात निर्णय घेऊन, सर्वांना नकळतच आपलं घर सोडून, वावदरीतूनच रावजी नाहीसाच झाला. साऱ्यांनी खूप शोधाशोध केली, पण कोणाला कोठेच पत्ता लागेना. मात्र पंधरवड्याने, दादर-मुंबईचा शिक्का पोस्टछाप मारलेलं त्याचं स्वतःच्या हस्ताक्षरातलं एक पत्र आलं, त्याची एक प्रत रावजीने धूर्तपणे आबांनाही पाठवली होती. त्यात त्याने लिहिलं होतं— "पितृतुल्य देवरावदाजींच्या ओढवलेल्या अकस्मात मृत्यूने मला तरी इस्टेटीचा या क्षणी एक प्रकारे वीटच आला आहे. आपलं ते घर मला नुसतं खायलाच उठतं, उठेल. दृष्टीसमोरच नको ते असं वाटतंय. तेव्हा तुम्ही –अप्पांनी—माझ्याहीतर्फे घराचा काय तो व्यवहार–कारभार हवा तसा संभाळावा, माझी असेल ती जिंदगी-इस्टेटही त्यांनीच संभाळावी. जे जे हिशेबाने माझं असं ठरेल ते ते माझ्यातर्फे माझ्यासाठी वेळोवेळी काळजीपूर्वक राखून ठेवावं. मला काही हवं तेव्हा कळवीनच... सध्या तरी पार गोंधळून गेलेला दुर्दैवी बालक–रावजीभाऊ."

रावजीच्या त्या अनपेक्षित जाण्याचा या त्याच्या खिन्नमनस्क बोलक्या पत्राचा अप्पाने मनातून एक प्रकारचा मनस्वी धसकाच घेतला. आपलं बिंग फुटलं तर केवढा घात होईल, अशी त्याच्या खाणाऱ्या मनाला सदैव भीतीच वाटू लागली. या सगळ्यामागे "आबांचा पुरता हात असावा" असाही एक दाट संशय त्याला सारखा भेडावू लागला, म्हणून अप्पाने आपणहूनच काही हजारांची रक्कम चालू खर्चासाठी म्हणून रावजीच्या ठिकाणावर एका विश्वासू माणसाबरोबर पाठवून दिली. पण मुंबईच्या ठिकाणाचा खूप खूप चौकशी करूनही पत्ताच लागेना, त्यामुळे तो हात हलवतच परतला.

रावजी असा बेपत्ता झाल्यामुळे अप्पाच्या शिरावर अकारणच एक प्रकारची लटकती तरवार अहोरात्र टांगली गेली होती. त्यामुळे मात्र अप्पाजीचा आबांवरला राग दिनानुदिन शतपटीने वाढला होता.

*

आता दिवसेंदिवस कुलकर्ण्यांच्या घरचा सारा कारभार म्हणजे, एकटा अप्पा करील ती पूर्वदिशा. पूर्वीसारखा दाजींचा विचारी वृत्तीचा ब्रेक तुटून पडलेला, तेव्हा अप्पाजीने हळूहळू व्यवहार–दप्तरातली जुनी गहाण वेचेन खतं वगैरे प्रत्यक्षच हरेला घातली नि रकमांच्या वेछूट वसुलीला सुरवातही केली. धाकदपटशा, मारहाण, कोर्ट–फिर्यादी, लिलाव, या साऱ्याच प्रकारांना त्या कालखंडात अप्पाच्या घरात हां हां म्हणता दैनंदिन ऊत येऊ लागला. कित्येक गरीब बापडे तर साफ नागवले जाऊ लागले. त्यांची झोपड्या-घरं जप्त झाली, त्यावरून नांगर फिरू लागले. काही घरकुलं उभ्या उभ्या बेचिराख होऊन गेली.

दाजीपश्चात, एकदम साफ बदललेला तो कुळकर्ण्यांकडला नवा जमाना, ते सारं पाहून आबांना मात्र मनात फारच हळहळ वाटे. पण नेहमी त्यांना विश्वासाने विचारून-सवरून सर्व करणारा दाजीच त्या घरातून निघून गेल्यानंतर, त्यातल्या कसल्याही बाबतीत बोलण्या-सुचवण्याचा आता आबांकडे कसला प्रश्नच मुळी उरलेला नव्हता.

तरी, अखेर असं काही विशेषच एक कारण घडलं. केवळ नाइलाज म्हणून, स्वतःच उठून, आबांना अप्पाकडे जाणं भागच पडलं.

त्यांचा पूर्वापार भागेली कुळ धाकल्या याची केवळ आबांच्या शब्दाला मान द्यायचा म्हणूनच, शेतीची जमीन-वाडी गहाण घेऊन देवरावदाजींनी त्याला मागे कर्ज दिलं होतं. धाकल्याने वेळोवेळचं व्याज नि दाजीची शरीचशी मुद्दल रकमही, सवडीसवडीने आबांकरवीच परतफेड करत आणली होती. फेड-पावत्या देण्या-घेण्याची प्रथा नसली तरी आता दाजींचं थोडंसंच देणं धाकल्याच्या शिरावर उरलं होतं. आबांच्या शब्दासाठीच बाकी रकमेची धाकल्याला सूट द्यायचंही दाजीने कबूल केलं होतं. त्या दिवाळीनंतरचे हिशेब पुरे व्हायचे त्या वेळी तशी नोंद करून तो स्टँप कागदही फाडला जाणार होता. पण मग दाजीच तसे एकाएकी निघून गेल्यावर बिचाऱ्या धाकल्याचं ते सारंच कर्ज-पारडं पार फिरलं होतं.

पुढे एके दिवशी तर धाकल्याला घरी बोलावून नेऊन त्याला अप्पा दमात घेत म्हणाला, “ तू आजवर व्याज-मुद्दल काहीच भरलेलं नाहीस, तेव्हा खऱ्या बोलाने आठवड्यात सगळी व्यवस्था कर, नाहीतर खरेदी-गहाण-खत पक्कं करावं लागेल, जमीन-घर माझ्या नावे चढवून द्यायला लागेल तुला ! तशी व्यवस्था कर नि तुझा अंगठा करून दे. ”

तो बिचारा घाबरला नि थरथर कापतच आबांकडे धावला.

खरं म्हणजे, धाकल्या हा आबांचा मनुष्य, म्हणून त्यांनाच शह देण्याचा अप्पाजीचा तो डाव होता. ते ओळखून आबाही तत्काळ तिकडे गेले.

“ उरलेले पाचपन्नास असतील तर ते आता धाकल्याला सूट देणंच योग्य, ” असा आबांनी अभिप्राय दिला. तेव्हा रागारागाने, अप्पाजीने आजवरच्या पावत्या पाहायला धाकल्याकडे मागितल्या, पण “ तशी पद्धत तुमच्या सावकारीत नाही, अप्पा ! ” अशी आबांनी आठवण करून दिली. तेव्हा अप्पा रागारागाने ओरडला, “ आले मोठे शेकाजीराव ! ”

मग मात्र आबाही आवाज चढवीत म्हणाले– “ हे बघा अप्पाजीराव, या धाकल्याचं तुमच्याने काहीसुद्धा वाकडं होऊ शकणार नाही— जा ! दाजीशी त्याचा खरा व्यवहार. त्यांच्याकडेच रकमा सव्याज परत दिलेल्या आहेत– त्यांच्याच हयातीत तो व्यवहार पुराही झालेला आहे. आता तो तुमचं तर काहीएक देणं लागत नाही. दाजींचा वर्षा-नुवर्ष हिशेब ठेवणारा मीच त्याला साक्ष आहे—”

त्याने तर अप्पा अधिकच भडकला नि अखेर आबांवरच ओरडला— " हे बघ, तुझी ही मेंडीखालची फुकटी वकिली माझ्याकडे तरी नाही चालणार बरं का आबा!- तुम्ही दोघे दीडशहाणे खूप म्हणाल 'व्यवहार संपला' म्हणून,... पण खरेदी गहाणाच्या कागदाची शेंडी तर माझ्या हातात आहे ना ? तुझ्या धाकल्याचा अंगठा आहे केव्हाचा पडलेला माझ्या दप्तरात— नि त्याच्या शेजारी तुझीच आहे साक्ष—सही. त्या जज्जाचे तर डोळे काही फुटलेले नसतील ना तुझ्यासारखे ? "

एवढं म्हणून अप्पाजीने ते कागदाचं पुडकं सोडलं. अगदी गपचूप बसून अप्पाची ती लटपट-खटपट आबा मिस्कीलपणे पाहत होते. खूप खूप हुडकूनही हवा तो धाकल्याचा गहाण-कागद दस्तऐवजांच्या रुमालामध्ये अप्पाला सापडेना.

त्यातच शेवटी थोडं खवचट हसत आबाच म्हणाले, " अप्पा, अहो दाजीच्या कारकिर्दीतल्या त्या गोष्टी, त्यांनीच तो कागद रद्द करून धाकल्याला परत दिला नि त्याच वेळी, माझ्या समक्षच, त्या कागदाच्या नि त्या सावकारी व्यवहाराच्या चिंधड्या उडाल्या. तुम्ही खरे शहाणे असाल, तर आता असली मेली मढी उगीच उकरत बसू नका, नाहीतर वेळप्रसंगी ती भुतासारखी तुमच्याच छाताडावर बसतील बरं ! "

पुढल्या साऱ्या गोष्टींचं धोरण ध्यानी घेऊनच दाजीच्या मृत्यूनंतरच्या आपल्या झटपट हालचालींत आबांनी तो कागद पूर्वीच उचलला होता. तो केव्हाच फाडूनही टाकला होता ! तर मग अप्पाजीला आता तो तिथं कोठून सापडणार होता ?

" ती सारी काही तरी आबांचीच कारवाई आहे," अशी आता अप्पालाही क्षणार्धात जाणीव झाली होती. पण त्याला तसं उघड बोलता मात्र येत नव्हतं. तेवढ्यातच आबांचे पुन्हा ते खोचक शब्द— तापलेल्या शिशाप्रमाणेच ते त्याच्या कानात पडले नि रागाने भयंकर भडका उडून, ताडकन जागचा उठत, अप्पा ओरडला, " आगंतुकासारखा इथं घुसलास तसाच आधी पायरी उतर पाहू, आत्ताच्या आत्ता, माझ्या या घराची ! मी मेली मढी उकरत बसणारा काय !— अरे मूर्खा, मला वाटलं तर तयार करतो मी ती नवीन- समजलास ? नि एकदा ठरवलं, तर मी स्वतः देखील निवांतपणीच भुतासारखा एखाद्याच्या पाठीस लागतो, त्याला पार पछाडतो ! समंधासारखाच त्याच्या अगदी छाताडावरही बसतो — याद राख तू आब्या ! माझ्या घरी आयती चालून येत असलेली या धाकल्याची ती घरदार-शेतवाडी- अस्सल कागदपत्रंच तशी ठिकाणची नाहीशी झाली, म्हणून—ते सारं असं हातोहात जातंय—पण त्याचा बदला मी खासच घेईन ! अरे, तो एक आज हातचा सुटला—पण मग, त्याचा पाठिराखा वाली—तो तरी आपल्या शेतवाडीला-घरादाराला नक्कीच पारखा होईल, केव्हातरी— तसं करून दाखवीन, तरच मी नावाचा अप्पाजी ! "

" बराय तर अप्पाजी —बघू या तरी खरी तुमची करामत ! " थोड्या मिस्किल बेफिकीरीने त्याला हसत हसतच आव्हान देऊन आबा मास्तर शेवटी धाकल्यासह अप्पाच्या घरातून बाहेर पडले —त्याच्या डोळ्यादेखत, राजरोस !

*

त्यानंतर दोनतीन महिने काही एक न घडता गेले. पण मग एके दिवशी हासभासही नसता स्वतः अप्पाच आला, आबांच्या ओटीवर आपल्या एकदोन मित्रांसह, "आबा-मास्तर आहे का?" असं म्हणत प्रतिष्ठितपणे शिरला.

तसे ते दोघेतिघे आपल्याकडे एकदम आलेले पाहून, आबा तर क्षणभर अगदी आश्चर्यचकितच झाले. तरीही बेदरकारपणे पुढे होऊन सर्वांना "या" म्हणत त्यांनी बैठकीवर बसायला सांगितलं. पण आपल्या घरी आज असं स्वतः उठून येण्यामागला अप्पाचा हेतू... कोणता खास हेतू असावा, याचा मात्र खूप विचार करकरूनही आबांना सुगावा लागत नव्हता. अप्पाची तसली ती पायधूळ म्हणजे कोणाच्या तरी तोंडातच धूळ, हे समीकरण तर आबा पुरं पुरं जाणून होते.

तोच अप्पानेच सुरवात केली– "पुष्कळ दिवस तू येऊन भेटशील म्हणून वाट पाहिली मी, आबा—शेवटी मलाच असं स्वतःहून येणं भाग झालं आज! नाइलाजच झाला माझा—"

"मी?— तुम्हांला भेटायला? म्हणजे? कशाला येणार होतो मी तुमच्याकडे?" आबा रागाच्या फणकाऱ्यानेच म्हणाले, "तुमचा–माझा संबंध! कुटुंबीय होता, पण तो देवरावदाजीचाच हात धरून केव्हाच निजधामाला गेला. तुमच्याकडे येण्यासारखं ठरलंय काय तिथं?"

"ऐक, ऐक. असं नामानिराळं बोलणं बरं नव्हे. अरे आबा, तीन वर्षं संपत आली बाबा." त्या आपल्याबरोबरच्या मंडळींकडे हळूच पाहत, अगदी साळसूदपणे, थंड शब्दांत अप्पा बोलत राहिला, "एकदाच काय ते सहा महिन्यांचं व्याज दिलंस, मग पुढे व्याज नाही, मुद्दल नाही! कसलीच बात नाही! हे रे कसं चालायचं? आपल्या म्हटलं तरी तशा व्यवहारालाही अखेर मर्यादा या असतातच."

"काय? म्हणजे??" आबा विस्मितपणे म्हणाले, "म्हणताहा काय?"

"अरे दुसरं काय?—दाजीच्या मर्जीतला, एकेवेळचा विश्वासू हिशेबनीस तू आमच्या घराण्याचा—ते संबंध लक्षात घेऊनच तर आजवर जरा गय केली मी, तर तू आता हे आपलं साफच कानांवर हात ठेवल्यासारखंच करतोयस?— म्हणजे कमाल झाली! ती बाब मुदतीबाहेरही जाईल आता–तेव्हा आबा, त्यापूर्वीच चारचौघांसमक्ष काय तो सोक्षमोक्ष झालाच पाहिजे आजच्या आज—" अप्पा बरोबरीच्याकडे पाहत म्हणाला.

"व्याज?— मुद्दल??—रकम?— कसली??— कोणी कोणाला दिली? तुम्ही? कोणी घेतली??— मी??"—आश्चर्यानं सुन्न होऊन आबा तुटक तुटक बोलत होते. अखेर अप्पाकडे पाहत ते रागातच म्हणाले, "आज नशापाणी तर नाही ना केलेलं तुम्ही, अप्पा?"

"वा! नाटक तर छानच साधतं रे तुला...ऐकणारे–पाहणारे खरंच मानतील! पण खाल्ल्याघरचे असे वासे मोजणं शोभत नाही बघ तुला, आबा—" शहाजोगपणाचा

अधिकच आव आणून, अप्पा पूर्वीइतक्याच शांतपणे पुढे म्हणाला, " सव्वा तीन हजारांची रक्कम आता व्याजासकट हजारभर जास्त होईल– नि तीही तू साफ विसरल्या-सारखं करतोस! बरं तर बरं, शेतवाडी-घराचं तू दाजींकडे खरेदी– गहाण लिहून दिलं आहेस, नाहीतर आज मी साफच बुडालो असतो की! ते काही नाही. तुझ्याने आता चारदोन दिवसांत सगळ्या रकमेची भरती करण्याची व्यवस्था होत नसली, तर मुदतीत दस्तैवज कोर्टात हजर करून, न्यायदरबारी फैसला करून घेतलाच पाहिजेय मला–"

प्रत्यक्ष आपल्याच कानांवर आबांचा विश्वास बसत नव्हता, इतकं त्या तिऱ्हाइतां-समोर अप्पाने ते हुबेहूब नाटक केलं होतं. तेव्हा मात्र आपल्या सहनशक्तीची पुरी हद्द झाली असं आबांना वाटलं.

तरीही, प्रयासाने मन आवरून पण चिडक्या–चढ्या आवाजात आबा अप्पावर ओरडले, " हे पहा अप्पा, दाजीकडून मी रक्कम कसली घेतलेली नाही नि त्यांना कसला कागदही लिहून दिलेला नाही. असल्या थापांत बनावटगिरीवर तुम्ही इतरांना खुशाल झुलवा– पण अप्पा, असल्या फुसक्या धमक्या या आबापुढे तरी नाहीत चालणार तुमच्या! तुमचे ते सारे लंडे कारभार अशिक्षित गोरगरिबांसाठी नि पोरासोरांसाठी राखून ठेवा. हा आबाजी मास्तर आहे म्हटलं, आबाजी मास्तर! पक्क्या गुरूचा चेला."

" अस्सं! इतका का माजोरा झाला आहेस तू, आबा? हे–हे सारं ऐकून घ्या बरं, मंडळी?" जणू आपणच थंड राहण्याचा प्रयासाने प्रयत्न करीत असल्यासारखे कांगावखोरपणे दाखवीत अप्पा म्हणाला, " तर मग आबा, आता तयार हो तू कोर्ट-दरबाराला—नि होईल त्या साऱ्या पुढल्या परिणामाला. ऐकून घे नीट!"

" चूप! खूप ऐकलं रे…असले छपन्न अप्पा—असल्या कोर्टाच्या गप्पा मारायला आकाशातून खाली उतरायला हवेत!" रागाने थरथरत, चटकन पुढे होऊन, अप्पाला हाताने धरून उठवीत नि पायऱ्यांकडे ढकलीत, आबा ओरडले– " बस्स् झाला हा पाजीपणा, अप्पा– आधी माझ्या घराची पायरी उतरा– चला, चला…"

आबा भयंकरच तिरमिरून अप्पाला पुढेपुढे ढकलत होते. बरोबरची सारी मंडळी काही तरी पुटपुटत केव्हाच खाली उतरली होती.

" मी सिधेपणे बोलायला आलो, तर मलाच पाजी म्हणतोस? धनको असून मी अदबीने बोलतोय तर माझ्यावरच उलट तू कफल्लक, कर्जबाजारी हात टाकतोयस? मलाच अशी धक्काबुक्की नि मारहाण करतोयस?— आब्या, आता मात्र तुझी शंभर वर्षे भरलीच! तुला फौजदारीतच आधी खेचला पाहिजे!"—अप्पाने आता हळूहळू आपला आवाज चढवला होता. त्या त्रयस्थांकडे वळत तो पुढे म्हणाला, " हे–हे सारं बघून घ्या बरं मंडळी…मी तुमची साक्ष काढीन, तेव्हा हे घडलेलं सारं शपथेवर तुम्हांलाही सांगावं लागेल हो…आणि बरं का, आबा, सोद्या— आता तुला उद्याच्या उद्याच दिवाणीतही खेचतो मी. तू आता बघतच राहा माझी करामत!"

" अरे जा रे जा, काय करायचं असेल ते करून घे. उगीच माझ्या पोराबाळांच्या

घराच्या पायरीवर ही पापी बडबड नकोय तुझी--" अप्पाच्या मागून दोन पायऱ्या उतरत आबा त्याच्यावर खेकसले, "बेडूक फुगला म्हणून तो कधी बैल होत नाही काही— हो चालता इथून!"

*

प्रथम "शिवीगाळ"–"मारहाणी"ची फौजदारी आबांवर गुदरली गेली, पण ती काही चालली नाही. धरून आणलेले साक्षीदारच पळाले.

पण त्याबरोबरच अप्पाने दिवाणी दावाही मांडला होता, तो मात्र चालू झाला.

कधी एक खोटा पैसाही अप्पाकडून किंवा देवरावदाजीकडून आबांनी कर्जाऊ उचलला नव्हता. कागद तर कसलाच लिहून दिल्याचा अगर अप्पाच्या दप्तरात तसा असल्याचा संभव नव्हता. खरेदी–गहाण वगैरे कागदाच्या अप्पाच्या त्या गप्पा म्हणजे खरोखरच नुसता फुसफुशीत दमच होता. आबांना तर त्याची पुरेपूर, मनोमन खात्रीच होती. त्यांची सद्‌विवेक बुद्धीही त्यांना अहोरात्र तशीच साक्ष देत होती.

तसल्या मनोमन, पूर्ण खात्रीने व आत्मविश्वासानेच आबा ठरल्या तारखेला कोर्टात हजर झाले. विरुद्ध बाजूला प्रसिद्ध वकील होता, तरी स्वतःची खरीखुरी केस स्वतःच चालवण्याचं आबांनी ठरवलं होतं.

पण मग - ऐन वेळी—घडवा पडलेला एक जुन्या तारखेचा स्टँप पेपर अप्पाजीने कोर्टात मुख्य दस्तऐवज म्हणून दाखल केला, ते पाहून आबा चमकले. त्या प्रकाराकडे पाहतच राहिले.

कोर्टाने तो कागद निरखून पाहिला. आबांना गंभीर चेहऱ्याने प्राथमिक असे काही प्रश्न विचारले. पण आपण कसलाच कागद केला– लिहिला नव्हता, त्यावर आपली सहीही नाही, असंच आबांनी उत्तरादाखल शपथेवर सांगितलं.

तेव्हा मग एक कोरा कागद आबांकडे देऊन कोर्टाने त्यांना त्यावर आपल्या तीन-चार सह्या करायला सांगितलं. मग ह्या सह्यांची स्वतः पुन्हा पाहणी केली. अखेर, अप्पाचा तो अस्सल दस्तऐवजाचा कागद नि आबांनी केलेल्या सह्यांचा कागद असे दोन्हीही शिरस्तेदाराच्या मार्फत आबांकडे पाहावयास देऊन, जज्ज म्हणाले– "या मूळ कागदावरची ही सही...नि त्या आताच्या कागदावरच्या सह्या, नीट पाहा पाहू बरा— दोन्ही एकच... मग? तुमचीच ना ती दस्तैवजावरली सही?? खरं काय ते सांगा मास्तर–"

*

ते आबांनी पाहिलं नि आबा भयंकरच गोंधळले—बराच वेळ पुनःपुन्हा पाहून, अखेर घुटमळत ते म्हणाले, "हा कागद मला ठाऊक नाही–नि ही इथली सहीही मी केलेली नाही."

" आताच्या सह्या नि ती सही सगळ्याच सारख्या सारख्या आहेत ना ? याचं फक्त उत्तर द्या, तुमची ती बाकी बडबड बंद करा. "

" होय—त्या दिसतात तरी खऱ्या एकसारख्याच एक–" पण मग आबा पुन्हा घुटमळले– गडबडले नि अखेर, गप्पच, दातखिळी बसल्यासारखे राहिले. त्यांचं त्यांनाच समजत नव्हतं— हे असं हे सारं घडलंय तरी कसं नि केव्हा ?

थोडा वेळ वाट पाहून, कोर्टानं पुन्हा करड्या स्वरातच आबांना विचारलं– " का ? बोलत का नाही तुम्ही, आबाजी मास्तर ? "

आबांचं तोंड तेवढं उघडंच होतं. एक मोठा थोरला आवंढा गिळून अखेर ते कोर्टा-कडे भेदरल्या नजरेने पाहत म्हणाले, " सरकार, यात काहीतरी गडबड-सडबड आहे हे खास. त्या कागदावरली ही सही अगदी हुबेहूब माझीच आहे, पण—पण ती मी मात्र केलेली नाही..."

" सही हुबेहूब तुमचीच–थेट नुकतीच तुम्ही केली' आहे तशीच— पण तुम्ही केलेली नाही—ती लबाडी आहे— कोणी तरी केलेली आहे, पण ती तुमची मात्र नाही— असंच ना म्हणायचंय आबाजी मास्तर तुम्हाला ? " जज्ज किंचित आवाज चढवीत म्हणाले, " तर मग, कोणी केली ही लबाडी ? मृत देवरावदाजी शेठजींनी— ? या अप्पाजीरावांनी ?—का कोणा भूतपिशाचानेच गुपचूप येऊन तिथं केली ती ? सरळ सरळ उत्तर द्या याचं कोर्टाला– "

" ते मी तरी काय सांगू ? " हतबलपणे पण तरीही तिथून आबा पुढे म्हणाले, " सरकार, भूतपिशाच्च, जादूटोणा ह्या गोष्टी काही मी जाणत नाही, मी फक्त एकटा देव जाणतो नि त्यालाच स्मरून पुन्हा एकदा सांगतो, की त्या कागदावरली ती सही— जणू माझीच सही दिसली तरी ती मी केलेली नाही, हे खास— "

" नीट विचार करा. न्यायाच्या गादीवर— शपथेवर तुम्ही खोटं बोलताहा आबाजी मास्तर, त्याऐवजी खरं ते सांगून आपले मोकळे व्हा कसे. देण्यामधे तुम्हांला कसली सवलत हवी असली तर ती तुम्ही सरळपणे कोर्टाकडून मागून घ्या— " जरा अधिकच करड्या स्वरात कोर्टानं आबांना बजावलं.

आता मात्र त्यावर आपण काय बोलावं ते आबांना मुळी समजेचना. ते गप्पच एखाद्या खांबासारखे उभे राहिले.

*

तेव्हा क्षणभराने जरा रागातच कोर्ट म्हणालं, " तुम्हांला आता ही अखेरची सूचना दिली जात आहे, आबाजी मास्तर—मास्तरासारखा पवित्र पेशा आहे तुमचा. पुन्हा शपथेवर खोटं बोलू नका, याद राखा— "

" कोर्टानं मला आणखी पन्नास सूचना दिल्या, तरी पूर्वेला पश्चिम कसं बरं म्हणू मी महाराज ? मीही पुन्हा सांगतो, सरकार—ही दस्तैवजावरची सही हुबेहूब माझीच दिसत

असेल, पण ती मी मात्र केलेली नाही. मी एक देवभीरु, पापभीरु माणूस आहे. भूत पिशाचांना, पापाला मी ओळखत नाही, त्यांचा नि अप्पाजींचा काही संबंध आहे की काय, शपथेवर सांगण्याइतकं त्यातलं मला नक्की माहीत नाही—"

आबांच्या त्या उत्तराने मात्र कोर्ट खूपच चिडलं. पुढच्याच क्षणी उंचीवरून गर्जना झाली, "चूप! ही वायफळ बडबड इथं कशाला? हे लोकांवर उगीच शिंतोडे हवेत कशाला? आपल्या पायाखाली काय जळतंय तेवढंच पाहा. आता आम्ही तुम्हांला अखेरचं विचारतो आहो मास्तर—ही या कागदावरची तुमची सही तुम्हीच केली आहे की नाही?"

करड्या आवाजातच मोठ्या आत्मविश्वासाने आबा म्हणाले—

"नाही!"

आवाज अधिकच चढवून, आबांना दटावत कोर्टाने पुन्हा विचारलं, "नाही?"

आता मात्र आपल्या डोक्यावर घणाचे घाव पडत असल्यासारखंच आबांना वाटलं. त्या होत असलेल्या आपल्या एकूण छळणुकीतून स्वतःची झटकन सोडवणूक करून घेण्यासाठी तिरमिरल्या स्वरात आपलाही आवाज चढवून आबा ओरडले, "नाही!—नाही!—नाही! त्रिवार नाही. अगदी ती सही मी केलेली नाही. हजारदा तेच विचारून शब्दांचे अर्थ कधी बदलत नाहीत. आपल्या हातून पूर्वी जे झालंच नसेल, ते होऊही शकत नाही!"

"खामोश—एकदम खामोश!" बेफाम चिडून, खुर्चीवरून झटकन उभे राहात कोर्टही ओरडलं, "उघडउघड कोर्टाचा असा अपमान! असली बेछूट बेअदबी? पुन्हा न्यायमंदिरात एक मास्तर नि शपथेवर इतकं धादांत खोटं बोलतोय?? बस—या खोट्या जबानीबद्दल हे कोर्ट रुकार देत आहे. त्याबाबत, या प्रतिवादीच्या खोट्या जबानीबद्दल त्याच्यावर कोर्ट स्वतःच काम चालवू इच्छित आहे."

आणि मग खरोखरच, अखेर बघता बघता सारंच पारडं साफ उलटलं. त्या दिवाणी दाव्याचा निकाल, त्याच एकमेव पुराव्यावरून आबांच्या विरुद्ध तर झालाच, जप्ती होऊन, शेतीवाडी गेलीच—

पण शिवाय, कोर्टातर्फे काम चालवलं जाऊन, अकल्पितपणे आबा दहा महिन्यांच्या तुरुंगवासाला गेले.

*

शेतवाडी गेली, आबांचं उत्पन्न गेलं. आमच्या कुटुंबाचे अशा प्रकारे सर्वच बाजूंनी उरफाटे दिवस आले.

आबांची अन्नपूर्णा—आमची आई—बिचारी पार हवालदिल झाली. ती सारखी रडत दिवस काढीत होती. आम्ही तर लहान लहानच मुलं तिची—सर्वांत मोठा आनाबापू, मग मी—सदाशिवराव नि दीड वर्षाची चंद्रभागा—आम्हांला कसबसं खाऊ घालण्या-

साठी आईनं आपल्या अंगावरचं किडूकमिडूक, होतं नव्हतं ते मोडलं, विकून काढलं.

त्या साऱ्या प्रसंग-परंपरेचं सारं खापर, चिडखोरपणे चिमुकल्या मालेवरच ढकलून ती संतापाने बेभान व्हायची नि अनेकदा म्हणायची, “ पांढऱ्या पायाची कपाळकरंटी अवदसा मेली ! जन्माला आल्यापासून बापाच्या जिवावरच, मुळावरच उठलीय दळभद्री नतद्रष्ट— ”

आपले पती तुरुंगात गेले, गरीब असलो तरी आपल्या प्रतिष्ठेची अगदी नामुष्की झाली, असलंही एक शल्य आईला अहोरात्र बोचत होतंच. स्वप्नातही खरं वाटणार नाही, असं ते सर्व प्रत्यक्ष आपल्या आयुष्यातच कसं घडून आलं, याच रुखरुखीने दिवसेंदिवस ती अगदी झुरणीला लागली होती. चांगल्यांच्याच पाठी ईश्वर इतका कसा हात धुऊन लागतो, हेच तिला बापडीला काही केल्या समजत नव्हतं.

*

सहासात महिने असेच दुःख-संकटात कंठल्यावर एके दिवशी आनाबापू नि मी कुठं तरी बाहेर गेलो असताना अकस्मात अप्पाच स्वतः आमच्या घरी अवतीर्ण झाला.

आबा तुरुंगात गेले याबद्दल त्याने आईकडे खूप नक्राश्रू ढाळले नि अखेर तिला तो म्हणाला, “ वहिनी, माझ्यावर मात्र रागावू नका. तुम्हा बायकांना पुरुषांचे हे वाकडेतिकडे व्यवहार समजत नसतात. आपली कर्जं नि आपले अपमान कोणी कधी आपल्या बायकोला सांगत असतो का ?– तो आबाजींनी आम्हांला करून दिलेला कागद खराच होता. त्यातून सामोपचाराने सोडवणूक होईना म्हणूनच मला कोर्टाची पायरी चढावी लागली. मी नाहकच दुष्ट ठरलो. ”

मग क्षणभराने सहानुभुती दाखवीत अप्पा बेरकेपणे म्हणाला, “ देणं-घेणं असेल ते व्यवहाराचं काहीही असो. पण त्यातूनच आबा असा तुरुंगात जाऊन पडावा असं मात्र माझ्या स्वप्नातही नव्हतं हो, वहिनी. पण कोर्टात झालं एकेक ते सारंच विपरीत. त्याच्या रागारागाच्या अद्वातद्वा साक्षीतूनच ते तुरुंगाचं लफडं निर्माण झालं. कोर्टानेच त्याला तशी कठोर शिक्षा केली. पण वहिनी, मी नुकतीच सर्व चौकशी करून आलोय— आबांच्या वतीने माफीचा अर्ज तुम्ही जरी कोर्टाला पाठवलात ना, तरी चालेल—आबा लागलीच सुटेल बघा—तशी खात्रीच दिलीय शिरस्तेदार वगैरे तिथल्या जाणत्या लोकांनी. मी ऐकतो, तो तुरुंगात खूप खंगलाय. अशा वेळी मानापमानाच्या इतक्या इरेला पडून कसं चालेल कच्च्याबच्च्यांच्या धन्यांना ! आपण संसारी माणसं. हा पाहिलात, कोर्टातल्या लोकांनीच तयार करून दिलाय माफीचा अर्ज ! ! त्यावर अंगठा करून द्या तुमचा, मी मग करतो पुढलं सारं. ”

असं सर्व सांगून, अप्पाने आईला एक साळसूद अर्ज वाचून दाखवला. आतून तिला शाईची दौत आणायला सांगितलं नि तिच्या अंगठ्याला शाई लावून ठसा घेतला दुसऱ्याच एका तयार कागदावर. “ आता आठवड्याभरात येईल सुटून आबा. ” असं

म्हणून, घराकडे आम्ही दुसरे कोणी परतण्यापूर्वीच, अप्पा तिथून सटकलाही...

आमच्या बिचाऱ्या प्रेमळ आईला कल्पनाही नव्हती, की तिने त्या दिवशी आपल्या साध्याभोळ्या, माणुसकीवरील उरल्यासुरल्या विश्वासाने नि भाबड्या अज्ञानाने केवढा मोठा भयंकर प्रसंग आपल्यावरच, आपल्या कुटुंबावर ओढवून आणला होता ते—

त्याच वेळी असा पुन्हा एक बुडत्याचा पाय खोलात पडला होता.

*

आम्हा कोणा मुलांना न कळत, आबांच्या सुटकेची आई अशी गुपचूप उत्कंठेने वाट पाहत होती. आबा अकस्मात घरी परतलेले पाहून आम्ही मुलांनी आश्चर्यचकित व्हावं असं तिला वाटत होतं.

अखेर घडलं मात्र भलतंच! एके दिवशी आईच्या नावाचं अकस्मात दिवाणी कोर्टाचं समन्सच आलं. त्याचा एकुण अर्थ ऐकून तर ती भयंकरच घाबरली—क्षणभर गरगरल्यासारखं होऊन तिने जमिनीवर मटकन बसकणच घेतली.

त्या समन्सामध्ये दावा असा होता, की, "नवऱ्याच्या गैरहजेरीत भात-दाण्या-गोट्याच्या रूपाने व रोख रकमेत घेतलेले हातउसने रु. ४५०/- होतात. अन्नपूर्णा खोत हिने त्यांच्या पूर्वीच्या आश्रयदात्या कुलकर्णी कुटुंबाच्या कर्त्याकडून– अप्पाजीकडून– ते घेतले असून आता ते कोर्टाने तिच्याकडून अप्पा कुलकर्णीला देववावेत."

माफी अर्जावर म्हणून मूर्खासारखं आपण दिलेल्या त्या अंगठ्याची आईला तत्काळ आठवण झाली नि तिच्या सर्वांगाला कापरंच भरलं, दरदरून घाम सुटला.

आपणच आपल्या पायावर तशी कुऱ्हाड मारून घेतली, अशिक्षितपणा नि अप्पाची मोहक भाषा यांनीच आपली ती घातकी फसवणूक झाली, या भयंकर जाणिवेने आईने आपल्या कपाळावर थडाथडा हात मारले. आपल्या तोंडात फडाफडा मारून घेतलं.

अप्पा इतक्या उलट्या काळजाचा असेल याची तिला तरी बिचारीला कशी कल्पना असणार?

*

पण त्या धक्क्याचा पहिला जोर कमी झाल्यावर मात्र तिने चटकन् मन घट्ट केलं. चंग बांधला, नि आल्या परिस्थितीला धीराने तोंड देण्यासाठी ती आम्हा सर्व मुलां-सकट घरातून बाहेर पडली. मजल दरमजल चालतच कोर्टाच्या गावाला आम्ही पोचलो.

तारखेला अजून एक दिवस होता. आईकडे वकिलाला द्यायला पैसे कुठले? तेव्हा वेळेवर स्वतःला जमलं तसं—खरं खरं तेच सांगायचं, असं ठरवूनच ती तिकडे पोचली होती. मग चार ठिकाणी चौकशी करून, दुपारच्या वेळी आई आम्हा मुलांसह सरळ त्या जजाच्या घरीच जाऊन पोचली. निःशंकपणे त्याच्या घरातही शिरली. त्याच्या बायकोला "एक अनाथ दुर्दैवी स्त्री" म्हणून भेटली. भडभडून येत होतं, तरी रडत

रडत तिने त्या बाईला आपली ती सगळी सगळी इत्थंभूत हकिगत सांगितली.

योगायोगाने जज्ज पूर्वीचाच होता. त्याला बायकोकडून रात्री सारं समजलं. तो मनात पार चरकलाच. तो आतल्या आत बेचैन झाला.

अशा पार्श्वभूमीवरच दुसऱ्या दिवशी कोर्टामध्ये आईविरुद्ध गुदरलेली अप्पाची फिर्याद सुनावणीला उभी राहिली होती.

आपला सत्याचाच जय होईल असा आईला मोठा विश्वास वाटत होता. आम्ही सगळे आपले अर्धवट गोंधळून, आईच्या तोंडाकडे पाहात, त्या रात्री धर्मशाळेत झोपलो.

*

पण कर्मधर्मसंयोग तरी असा की अगदी याच सुमाराला चांगल्या वागणुकीमुळे आबांना तुरुंगातून दीड-पावणेदोन महिने अगोदरच सोडून देण्यात आलं होतं. मोठ्या लगबगीने आबा घरी पोचले होते. तिथं त्यांना धाकल्याकडून सारं अर्धवट समजताच, ते जेमतेम तारखेला कोर्टापाशी पोचले होते.

कोर्टाच्या दारातच, आबांना तसं साक्षात समोर पाहून तर आई क्षणभर आनंदाने मूर्च्छित झाल्यासारखीच झाली. मग मन आवरून तिने घाईघाईने सर्व त्यांना सांगितलं.

ते ऐकून आबा शांतपणे तिला म्हणाले, " अग, खरं तेच सांग. मी आज आलेलोच नाही असं समजून वाग, धीटपणे बोल, पुढचं पाहतो मी सारं. 'होणारे न चुके—' पण मनाचा धीर मुळीच सोडू नको. "

*

अखेर कोर्टात आईच्या नावाचा पुकार झाला. आबांच्या सांगण्याप्रमाणे तीच आम्हा मुलांसह पुढे झाली होती.

अप्पाजी व त्याचा पाजी वकील खुर्च्यांवर बसले होते. तिला एकटीलाच कोर्टात शिरलेलं पाहताच, " ही फिर्यादही आता आपणच जिंकू! आपला शब्द खरा ठरणार! आबाजी मास्तरांचं कुटुंब आता नक्कीच धुळीला मिळणार!" असे अप्पा आपल्या मनात मांडे खात असावा.

पण अप्पाजीची जबानी सुरू होत आहे-नाही एवढ्यात प्रत्यक्ष आबाच कोर्टात शिरले एकदम!

त्यांना तसे अकस्मात समोर पाहून मात्र बसल्या जागी अप्पाजी दचकला, त्याचा चेहरा खाडकन पडला. कावराबावरा होऊन तो खूप गोंधळून चौफेर पाहू लागला.

तोच थेट कोर्टापुढे जाऊन, हात जोडून उभे राहत आबा म्हणाले, " महाराज, आजच्या आपल्यापुढील या फिर्यादीमधील प्रतिवादी अन्नपूर्णा ही माझी बायको आहे. आम्ही फार गरीब आहो. आमच्याकडे पैसे नाहीत—सत्य हाच आमचा वकील. तेव्हा तिच्यातर्फे वादीची उलटतपासणी करायला कोर्टाने मला दयावंत होऊन परवानगी

द्यावी, असा माझा नम्र अर्ज आहे. माझ्या गैरहजेरीतच हे सारं घडलं आहे. याच कोर्टानं मजवर काम चालवल्यामुळे, मी तुरुंगात गेलो होतो. तेथील चांगल्या वर्तणुकीमुळे जेलरने मला आधीच सोडल्यावर घरी पोचलो, तो हे प्रकरण मला समजलं. नि मी तसाच तडक इथं येऊन आपल्यापुढे उभा आहे. मला क्षणभरही उसंत मिळालेली नाही!"

न्यायकोर्ट झालं तरी अखेर मनुष्यच — त्या उंच खुर्चीवरचे दोन डोळे पाण्याने एकदम डबडबून आले होते त्या क्षणी—

क्षणभरच थांबून, न्यायाधीश रुद्ध कंठाने म्हणाले, "तो तुमचा हक्कच आहे आबाजी मास्तर. अरे शिपाई, बसव पाहू यांना त्या अप्पाजीरावांच्या नि खोटे वकीलसाहेबांच्या खुर्च्यांच्या रांगेत."

*

आणि मग त्या क्षणापासून हां हां म्हणता त्या कज्जाचं सारंच गाडं उलटं फिरलं गेलं.

उलटतपासणीत, दोन वर्षांच्या इतिहासातील जरूर तेवढे जुने-नवे प्रश्न आबांनी अप्पांना थंड मनाने विचारले. इतरांनी लबाडी केल्यामुळेच केवळ, आपल्याला व आपल्या कुटुंबियांना दारिद्र्य-बेअब्रूची एवढी मोठी किंमत कशी द्यावी लागली, खोट्या दस्तैवजाने अप्पाने आपल्यावर सूड उगवण्याचा कसा घाट घातला, विश्वासानेच आपण व आपलं कुटुंब त्या कारस्थानाला दुर्दैवाने कसं बळी पडलो, आपल्या निरक्षर अशिक्षित बायकोकडून तर केवळ लबाडीने फसवून घेतलेल्या अंगठ्याच्याच जोरावरील ही नवी फिर्याद...ती म्हणजे तर आपल्याला साफ धुळीला मिळवण्याच्या त्या पूर्वनियोजित कारस्थानाचा अखेरचाच दुवा—हे सर्व कसं, ती सारी पार्श्वभूमी आबांनी कोर्टाला पटवून दिली.

आणि अखेर आबांनी कोर्टाला रोखठोक प्रश्न टाकला, "महाराज, आपणच कल्पना करा— हजारांनी आपला फायदा होत असता, तोही सत्यासाठी व न्यायासाठी प्रतिवादीच्या नवऱ्याने लाथाडला, त्यानंतर खरं खरं बोलत असताही खोटेपणाचे शिंतोडे त्याच्यावर नाहक उडाले, नि पुन्हा तो तुरुंगात निमूटपणे गेला— त्याच माणसाची ही स्वाभिमानी बायको— कितीही कठीण प्रसंगात पडली, तरी अशा अनुभवाच्या आपल्या पूर्वीच्या आश्रयदात्याकडे पोटगी धान्यासाठी कधी भिक्षा मागेल काय? माणसाचं मन आपण सांगता ना? मग, हे करण्याऐवजी, शेवटच्या चार पैशांची अफू घेऊन, ती खाऊन, आपल्या पोराबाळांसकट ती मरूनच नसती का गेली? माणसाच्या मनाचा मोठेपणा, त्याचं धैर्य, संकटाच्या पावसाळ्यातच कसाला लागतं, हे पटतं ना आपल्याला?"

*

त्या साध्यासुध्या माणसाची ती आवेशपूर्ण वकिली व ते जोरदार समर्थन... न्यायाधीशाच्या ते इतकं जिव्हारी जाऊन बसलं, की ती अप्पाची फिर्याद खोटी म्हणून तत्काळ खर्चासह काढून टाकण्यात तर आलीच, पण फसवणूक, खोटे दस्तऐवज इत्यादींबद्दलच्या अप्पांच्या गुन्ह्यांची शाबिती व खात्री पटून कोर्टाने अप्पांविरुद्ध तत्काळ रुकार दिला. अब्रूनुकसानी, नुकसानभरपाईबाबत कायदेशीर पुढील तजवीज करण्याचा आबांना सल्ला व परवानगी दिली.

तेव्हा मात्र बसल्या ठिकाणी तटकन् उभं राहून आबांनी कोर्टाला हात जोडून विनवलं– " नाही महाराज, मला तरी वाटतं, सूड हा एकूण वाईटच... माझा तो मार्गच नाही महाशय. जगात पाप खूप खूप आहे— तिचेच काही शिंतोडे नाहक माझ्यावर उडाले. माझ्या नशिबी नको ते भोग आले, तेव्हा मला केव्हा ना केव्हा न्याय मिळावा हीच— एवढीच— एक माझी तीव्र इच्छा होती. पण आतापर्यंत मजवर झालेल्या अन्यायांचं संपूर्ण परिमार्जन करायला तो एकटा जगन्नियंताच केवळ समर्थ आहे. ते मज गरिबाचं पामराचं काम नव्हे. त्यासाठी क्षणभर कायदा नि कोर्ट माझ्या पाठीशी कितीही अभेद्य तटासमान उभी राहिली, तरी मला तो माझ्या अधःपाताचा मार्ग वाटेल. तो मला नको आहे. एकाने गाय मारली म्हणून दुसऱ्याने वासरू मारून, ईश्वराच्या राज्यातील एकूण दोन हत्या करण्याच्या कृष्णकृत्यात भागीदार कशाला व्हायचं? अप्पांवर काम चालवायचा माझा हा हक्क बजावून मला काय मिळणार? आमचं काय कल्याण होणार? तो मीच सर्वांसमक्ष इथं ईश्वरार्पण करतो. कोर्टालाही माझी मनापासून विनंती आहे की, त्यांनीही दयावंत होऊन, अप्पांना या कृतकर्माची क्षमाच करावी–"

आबांच्या या सर्वच धीरोदात्त वागणुकीमुळे तर कोर्ट फारच प्रसन्न झालं होतं. इतके कज्जे तोपर्यंत त्या कोर्टापुढे चालले होते, पण त्या दोन कज्जांमध्ये भरपूर गाजलेला नि गांजलेला तो न्यारा सहिष्णू, क्षमाशील आबामास्तर मात्र त्यांच्या कायमचा लक्षात राहण्यासारखाच होता.

*

नि खरोखर तसंच घडलं.

दिवसाअखेर, त्या न्यायाधीशांनीच आबांना आपल्या चेंबरमध्ये बोलावलं, त्यांची आस्थेनं चौकशी केली नि विचारलं, " आता पुढे काय करणार तुम्ही, आबाजी मास्तर? विसकटलेल्या संसाराचं काय तुमच्या?— उद्याचा विचार?"

खरोखरच, तो मोठाच प्रश्न होता आबांपुढे. त्या क्षणी, त्या साऱ्या प्रसंगपरंपरेनंतर जीवनाची आबांना एक प्रकारची किळसच आली होती. " वाघदरी गाव, तो समाज–नकोच तो—" असंच त्यांना मनात झालं होतं. शेतवाडी, मास्तरकी, इतर प्रामाणिक प्राप्तीची साधनंही त्यांच्या हातची नाहीशी झालीच होती ऐवीतेवी, तेव्हा यापुढे एका नव्याच वातावरणात तरी निघून जावं, कसला तरी साफ निराळाच उद्योग आरंभावा,

त्यातच नव्याने बस्तान बसवाव, असंच आबांना वाटू लागलं होतं.

या कोर्टाच्या निमित्ताने त्या जिल्ह्याच्या गावाचा त्यांचा योगायोगाने संबंध आलाच होता. तेव्हा आता तिथंच राहावं, काही करावं, असंच त्यांचं मन त्यांना ग्वाही देऊ लागलं होतं.

हे सर्वच ऐकून न्यायाधीशांनी त्यांना सहज पुढे विचारलं, " इमारतींची डागडुजी करणं, रंगरंगोटी करणं, अशा कामांचे मक्ते घेता का ? आमच्या इथल्या सारा तरी इमारतींचं काम, अगदी उद्या हवं तर तुम्हांला घ्यायला लावतो. बघा, ठरवा विचार. शुभस्य शीघ्रम्. "

केवढ्या कृतज्ञतेने आबांनी त्यांच्याकडे त्या क्षणी पाहिलं. इतक्या संकटांनंतर, समोर आपोआप येऊन उभ्या राहिलेल्या एखाद्या देवदूतासारखेच ते आबांना भासले. जज्जांच्या त्या योजनेला आबांनी तत्काळ होकार देऊन त्यांचे आभार मानले.

नि तिथंच आबांच्या नव्या आयुष्याला सुरुवात झाली.

दुसऱ्याच दिवशी होता-नव्हता तो आपला सारा छोटा संसार मोडून, आबांनी आपलं वाघदरीतलं विंचवाचं बिऱ्हाड पाठीवर घेतलं व त्या शहराकडं नव्या आशेने धाव ठोकली.

नव्या कामाला नि त्यांच्या नव्या जीवनाला अशी सुरवात झाली.

*

लहानसहान सरकारी कॉन्ट्रॅक्ट कामांमधून व अनुभवाने नि प्रतिष्ठितांच्या ओळखी-देखींनी, आबांची भरभर प्रगती होत गेली. रस्तेबांधणी, मोठ्या दुरुस्त्या, सरकारी आऊट हाऊस, लहानसहान इमारती, करता करता तीनचार वर्षांत त्यांचं उत्तमच बस्तान बसलं. गावातले लोक आबांना ओळखू लागले होते. त्यांची पत वाढली. व्यवहाराला जोर येत गेला. पुढल्या आठ-दहा वर्षांत त्यांनी त्या धंद्यात बरा पैसा कमावला.

अखेर, गावाच्या थेट दुसऱ्या टोकाला दीड-दोन मैलांवर एक जुनीशी वाडी नि खूपशी मोकळी जागा सवलतीच्या किंमतीने मिळताच आबांनी ती विकत घेतली, तेव्हा कुठं त्यांच्या मनाचं खरं समाधान झालं.

मात्र या नव्या खरेदीमुळेच त्यांची कर्जे मागे मागेच उरत राहिली. तरी पण, आबांच्या लटपटी जोरात चालूच असायच्या. ज्याची त्याची व्याजं वेळच्या वेळी चुकती व्हायची, मुद्दलातले हप्ते घरपोच चुकते व्हायचे, तोवर आबांना काही कधी हटकण्याची धनकोंपैकी कोणाची प्राज्ञाच होत नव्हती.

घरात आम्ही तीन मुलं वाढत होतो. अनाबापू सारखा शिकत होता. तो मॅट्रिक होताच आबांनी त्याचं लग्न उरकून घेतलं. त्याच्या पाठोपाठच भागेचंही लग्न होऊन गेलं.

भागाचं लग्न मात्र आम्हांला लाभलं नाही. चारसहा महिन्यांच्या आतच कुंकू पुसून ती परत माहेरी आली. त्या वेळीच एकदा मी आबांना भयंकर दुःखाने हंबरडा फोडताना पाहिलं. नाही तर आबांच्या प्रेमळ चेहऱ्यावरलं मंद स्मित कधीच ओसरलेलं दिसत नसे आम्हा कोणाला.

आबांना माझ्या शिक्षणाची फारशी प्रगती दिसेना. मीही कंटाळलो, तेव्हा लौकरच मला त्यांनी आपल्या धंद्यात हाताखाली घेतलं. असा मी माझ्या आयुष्यात लौकरच धंद्याला लागलो नि आबांचा हरकाम्या हस्तक झालो.

आबांचा खरा जीव मात्र अनाबापूवरच. त्याला ते नेहमी खूप खूप उत्तेजन देत नि म्हणत, "आना, बेटा, आमचा हा धंदा आपला आम्हालाच. सध्या तिकडे तू बघू सुद्धा नकोस. खूप खूप शिकून मोठा हो तू आधी. आपल्याकडे तसं काही गडगंज नसेल, पण मी असेतो तरी खर्चाला काही एक कमी पडू देणार नाही तुला मी—"

आमचा अनाबापू इंटर होताच आबांनी माझंही लग्न करून दिलं. त्या वेळी ते अगदी सर्व दृष्टींनी आनंदी-समाधानी होते. आमचा धंदा तर वाढतच होता. माझ्यावर ते लहान लहान कामांच्या स्वतंत्र जबाबदाऱ्याही टाकू लागले. आई-भागासह ते एक-दोन यात्राही करून आले.

*

पण वर्षभर असंच केलं असेल-नसेल, इतक्यातच काही चमत्कारिक योगायोग आमच्या घरात चोरपावलांनी शिरले. एकामागून एक त्या भयंकरच गोष्टी घडत गेल्या. कित्येक वर्षांनी आमचा वाघदरीचा भागेली धाकल्या आमच्याकडे आला नि आबांना आग्रहाने म्हणाला, "आबादादा, वागदरीला या वेळी यायलाच हवं. आबंदाला माझ्या मुलाचं मी लगीन काढलंय—तुमच्या कुरपेने मात्र समदं ठीक हाय आता. तुमी नाय तं माजा मांडव सुना व्हाईल-- "

मधल्या तपाभरात आबा वाघदरीला कधी चुकूनसुद्धा गेले नव्हते. स्वतः धाकल्याच तेवढा वर्षातून दोनदा त्यांना, आईला भेटून जायचा. आजही धाकल्याच्या बेताला आबांनी प्रथम नकारच दिला, तरी अखेर त्याचा फारच आग्रह झाला तेव्हा ते जायला निघाले.

योगायोग तरी कसा! त्याच वेळी, त्याच दिवशी, आबांचा एक जुना दोस्त फोटोग्राफी शिकून गावात आला होता. त्याच्या आग्रहाने आबांनी दोन फोटो काढून घेतले. एक आनाचा नि त्यांचा, आणि दुसरा धाकल्याचा नि त्यांचा. लग्नाहून परतेपर्यंत ते फोटो तयार होऊन येणार होते.

दुसऱ्या दिवशी धाकल्याबरोबर लग्नासाठी म्हणून आबा एकटेच निघाले त्या वेळी, पुढे काही तरी भयंकर नि चमत्कारिक घडेल, अशी पुसटशीही आम्हा कोणाला कल्पनाही नव्हती मनात.

*

लग्नसमारंभ मोठ्या थाटात उरकला, नि धाकल्याच्या आग्रहाने आबा तिथं एक दिवस जास्तच राहिले.

पण मग, तिकडून अखेर घरी परतले ते टांग्यातून— भयंकर जखमी अवस्थेत! त्यांच्या डोक्याला जिथं तिथं पट्ट्या नि बँडेज न बांधलेली दिसत होती. ते सारं दृश्य पाहून आम्ही सारे हादरलोच—

आईने मोठ्याने किंकाळी फोडली. ते एकूण घडलं होतं तरी काय हे प्रथम आम्हांला समजेना. घाईघाईने त्यांना आम्ही कसंबसं आत नेऊन झोपवलं—

आबांबरोबर धाकल्या होत्या. त्याचे कपडे तर सगळे रक्ताने माखलेले–मळलेले, ठिकठिकाणी फाटले-तुटलेले होते. आल्यापासून तो रडत होता. आपलं कपाळ बडवीत होता; अधूनमधून ओरडत तो म्हणत होता, " समदी आगळीक माजीच, मीच पापी, मीच आबा शेटला वागदरीत नेऊन माज्या हातांनी मारलं! देव माजं कदीच बरं नाय करनार— "

इतका वेळ होत राहिलेल्या रक्तस्रावाने आबा तर अगदी क्षीण झाले होते, तरी मंद स्मित करीत ते धाकल्याला उलट समजावून सांगत होते--

" ऐक रे ऐक, अगदी वेडाच आहेस तू धाकल्या. छे...छे-अरे कोणी कशाला कारण होत नसतो. व्हायचं असतं तेच व्हायचं तेव्हा, नि व्हायचं असतं तिथंच सारं सारं होत असतं. गप्प—गप्प—तू आधी गप्प हो. तुला मीच सांगतोय ना, म्हणूनच हो गप्प. स्वतःवरून एकसुद्धा वाकडा शब्द काढू नकोस तोंडातून— "

काही केल्या धाकल्याला मात्र आवरतच नव्हतं. तो कसाबसा घरात गेला नि अस्पष्ट अडखळत सांगू लागला. प्रथम बराच वेळ बोधच होईना. त्याच्या बोलण्यात आबांच्याही संथ अडखळत्या उद्गारांची भर घातल्यावरच एकंदर सारा प्रकाश पडला.

*

लग्नसमारंभ वगैरे संपल्यावर धाकल्या नि आबा दोघे वाघदरीला देवदर्शनासाठी गेले होते. त्या जुन्या परिचित वातावरणात फिरताना आबा खूप हरखले होते, धाकल्याबरोबर खूप खूप बोलत होते. देवळातून बाहेर पडल्यावर अनेक जुन्या आठवणी काढीत ते दोघे पुढे पुढे फिरायला गेले होते.

नादात परतायला तिन्हीसांजाही झाल्या होत्या. योग काय आश्चर्याचा. ते परत येताना अकस्मात अप्पाच समोरून येत असलेला दिसला.

तो समोर तसा दिसताच, मागलं सारं एकदम विसरून, आबांनी हात वर केले नि उमद्या मनाने त्याला नमस्कार केला.

पण सुंभ जळला तरी पीळ जात नाही म्हणतात, तसंच अप्पाचं झालं होतं.

एवढ्या लांबूनही इतक्या आग्रहाने आबांना बोलावून नेणाऱ्या धाकल्याने अप्पाला मात्र, तिथल्या तिथं साधंसुधं छापील आमंत्रणही धाडलं नव्हतं. धाकल्याचाच हाता-

तोंडाशी आलेला घास आबांनी मागे अप्पाच्या तोंडात पडू दिला नव्हता.

तेव्हा मनात धुमसणाऱ्या तसल्याच संमिश्र रागाने आबांचा नमस्कार परतही न करताच; अप्पा उलट उपहासाने म्हणाला, "ओ हो! धाकल्याचा देवच फिरतोय वाटतं या आपल्या वाघदरीच्या देवळाजवळपास, बऱ्याच वर्षांनी?"— डोळे फाडफाडून धाकल्याने अप्पाकडे एकदा गपचूप पाहिलं.

त्याला वाटलं, कुत्र्याचं शेपूट वाकडं ते वाकडंच!

पण आबा मात्र तरीही, तितक्याच थंड मनाने नि शांत स्वरात अप्पाला म्हणाले, "अहो, कोण देव नि कोण दानव या जगात अप्पा?-आपण तर सारी माणसं... स्खलनशील माणसं. माणसाच्याच चष्म्याने मात्र पाहायला हवं, की सारीच माणसं दिसतात आपल्याला— "

वास्तविक आबांनी तसा अप्पासाठी पुन्हा स्नेहाचा हातच पुढे केला होता. तरीदेखील अप्पा त्याच मोठ्या कुर्ऱ्यात नि हेटाळून पुन्हा उद्गारला, "मोठा आलास तत्त्वज्ञानी! अरे पण मूर्खा, माणसं देव होऊन मागे परत आली, तरी त्यांचा भूतकाळ नि त्यातला तुरुंगाचा इतिहास कधी पुसून नाही जात!"

आणि इतकं म्हणून, त्यावर अप्पा अतिशय विषारी कुत्सितपणे खदखदून हसला.

*

त्यामुळे मात्र धाकल्याचं पित्त एकाएकी भयंकर खवळलं. हातातला दंडुका उगारून तो अप्पाच्या अंगावर धावून जात ओरडला, "चूप रे सावकरा—आबादादांना...त्या देवमानसाला असं बोलणारं त्ये त्वांड, व्हतं की नव्हतं असं करून टाकीन बग, मटा! तो तुजा अजून बी सडून न्हायलेला मेंदू आदी भाईर काडीन, आन् मंगाच काय त्ये त्याला इच्यारीन...देवाचं नि दानवाचं— "

"अरे जा! हा आबा आला म्हणून शेफारून जाऊ नकोस—हरामखोर!" तरी देखील अप्पा पुन्हा बोललाच कुर्ऱ्यात.

"मी? की तू??" अतिशय संतापून-चवताळून, धाकल्याने हातातली काठी हवेत एकदा भिरकावून झर्रकन खाली आणली—

पण, होता तिथंच बसकण मारून अप्पाने बाजूला मोठ्या चपळाईने उडी झोकली नि स्वतःला बचावत उलटून म्हटलं- "बेइमानाची अवलाद!"

काळोख बराच दाटला होता. धाकल्याने त्या धुमसत्या रागाच्या झपाट्यात, "असा आता पळशील कुठं? तंगडंच मोडतो-" असं म्हणत पुन्हा अधिकच जोरात आपला सोटा वर केला, गर्रकन फिरवला नि पळत्या अप्पाकडे एक झेप घेऊन त्याच्यावरच तो झुकवला..

इतक्यात—"अरेऽ अरेऽ असं काय? थांब थांब, धाकल्या-" असं तोंडाने म्हणत आबा एकदम पाऊलभर पुढली उडी मारीतच त्या दोघांच्या मध्ये शिरले.

वर चढलेला धाकल्याचा सोटा मात्र आधीच मिळालेल्या गतीने जोरात खाली आला नि थेट त्याच क्षणी त्याच कक्षेत आबांचं डोकं मधे आलं. खाट्कन् जोराचा आवाज झाला नि आबा अकल्पित एकदम कोसळले. तिथल्या मैलाच्या दगडावर, त्यांच्या डोक्याची आणखी मागली बाजूही, पडता पडता खट्कन जोराने आपटली. त्या वेळी आबांच्या तोंडून, “ आऽऽ इऽऽ ” असा कळवळल्याचा दीर्घ स्वर एकदाच काय तो मोठ्याने बाहेर पडला.

ते कानी पडताच धाकल्याचा पेटलेला राग एकदम ओसरला. तो भानावर आल्यासारखा होऊन आबांकडे धावत जात ओरडला, “ आबा, आबादा,— हे हो काय केलंत तुम्ही ?... अ र्र् र र... काय काय केलं मी हो ?— म्याच, म्याच मारलं तुमाला ! ”

त्या एकूण गडबडीत अप्पा मात्र शीरसलामत बचावला गेला होता. समोरचा तो एकूण वाकडा प्रसंग नि भयंकर दृश्य दिसताच त्या मेसूर परिस्थितीतून झटकन् काढता पाय घेऊन, धूम ठोकीत तो काळोखात दिसेनासा सुद्धा झाला होता.

आबांनी मात्र आपलं डोकं मध्ये देऊन, त्याची तंगडी मोडणारा वार वरच्यावर झेलला होता.

*

धाकल्याने आबांचं डोकं अलगद धरून त्यांना बसतं केलं. त्या वेळी त्याच्या हाताला डोक्याच्या मागल्या बाजूतून घळघळणारं त्यांचं गरम रक्त लागलं नि तो प्रथम चपापला.

दुःखाने स्फुंदत स्फुंदत धाकल्या हळहळत म्हणाला, “ आबा, आबा, किती किती लागलंय हो हे तुमाला ?— अथाई बापा माझ्या...काय क्येलं म्यां हो.. तुमी माजे जिवाचे धनी— तुमी माजे उपकारकर्ते...आन म्याच— म्याच तुमचं डोसकं फोडलं— करंटा— करंटा— मी.. आता काय नि कसं— करू मी ? !— ”

त्याने झटपट आपलं अर्धेअधिक धोतर फाडलं नि आबांचं रक्त घळघळणारं डोकं आधी घट्ट लपेटून बांधलं.

मग जागचं उठून धाकल्याच्या खांद्यावर हात टाकून हळूहळू पावलं टाकीत चालता चालता आबा त्याला म्हणाले, “ हिंसेचं हे असंच असतं बरं, धाकल्या— दुसऱ्यासाठी मोठ्या उत्साहाने आपण खड्डा खणतो— नि अखेर आपणच पडतो रे त्यात हे असे. वेड्या, त्या स्वाभाविकच वाकड्यात झुकणाऱ्या अप्पासारख्या माणसावरच का प्रहार करून तू आपले हात विटाळून घेणार होतास ? छे छे— वरून ईश्वर हे सर्व काही पाहतो बरं— त्याचे खेळ नि त्याच्या इच्छा अगदी अगदी अगम्य असतात— म्हणून लोकांची मनं बदलूनच, आपण त्यांना बदलू पाहायचं असतं— या काठ्या नि त्या बंदुका ही खऱ्या यशाची साधनंच नव्हेत— हं ! हाः ! अशोऽ योगायोग हा ! तुझ्या हाताने– पण मग, खरं म्हणजे ईश्वराच्या इच्छेने— माझं कपाळ फुटलंय हे आज असं !

त्याची मर्जी !"

"आबा, आबा—कुठं फेडू हे, कसं फेडू आता मी हे पाप ?" धाकल्या सारखा स्फुंदत स्फुंदतच आबांना घेऊन चालला होता.

अखेर, फार क्षीण येऊन आबांना पाऊल टाकवेना, तेव्हा धाकल्याने त्यांना शेवटी पाठुंगळीला घेतलं —त्याला सुचेल तसं एकेक करत जाऊन, अखेर त्यांना त्याने टांग्यातून इकडं घरी आणलं होतं.

*

मग आम्हीही खूप औषधोपचार केले, ऑपरेशन झालं, टाके मारले, पण गाडं एकदम ढासळलं ते ढासळलंच. त्यांच्या मेंदूलाच प्रत्यक्ष मार बसला होता, भयंकर— त्या वेळी आतल्या आत रक्तस्रावही फार झाला होता. चारपाच दिवसांत ते मधून मधून भ्रमिष्टासारखेही बोलू लागले– करू लागले.

आबा म्हणत होते तसा खरोखरच तो एक योगायोग, भयंकर योगायोगच होता. धाकल्या केवळ कारण झाला होता. इतके दिवस, इतकी वर्षं, जणू आबांचा मृत्यू तिकडे वाघदरीतच त्यांच्यासाठी घुटमळत राहिला होता. नि मग जणू एका पूर्वसंकेतानुसार, धाकल्याच्या निमंत्रणाचं निमित्त होऊन, आबा आपल्या पायानेच तिकडे चालत गेले होते, नि अखेर आपल्या मरणाला सोबत घेऊनच असे घरी परतले होते.

त्यांच्या त्या शेवटच्या बडबडीत आम्ही सारे सारखे त्यांच्या जवळच बसत होतो. प्रेमाने साऱ्यांना हाका मारून ते जवळ बोलावत, नि मग आनाबापूला ते सारखं सारखं म्हणत, "अना, पूर्णा, सदू, धाकल्या, भागे— अरे, आपला सर्वांचा होता तेवढा ऋणानुबंध आता संपत आलाय बरं... तरी पण, आजवर जो मिळाला त्याचाच आता आनंद माना. ईश्वराचं हे जग बघा कसं अगदी अफाट अफाट आहे, अनंत आहे. त्यात विष आहे, अमृतही आहे. प्रकाश आहे, अंधारही आहे. माणसाच्या वाट्याला जीवनात दोन्ही येतात. त्यातलं ते दुःख मात्र कोणाला नको असतं. अरे पण, सगळंच आपल्या मनासारखं तेवढं कसं रे व्हावं नेहमी ? मात्र एक—काही झालं तरी मनाचा तोल कोणी कधीच सोडू नये हो. तेवढं तरी खात्रीने आपल्या हाती असतं. सन्मार्ग हाच सदैव आपला मार्ग. मग,—चांगल्या माणसांना, चांगल्यांच्या भेटी— केव्हा ना केव्हा—आणि पुन्हा पुन्हा— कुठं ना कुठं— नक्कीच होत राहतात. तसा—तसा मनात सतत विश्वास बाळगा. होय—मी—मी—हा आबाजी मास्तर—मी तुम्हांला या क्षणी, तळमळीने, हृदयापासून हे सांगतोय—मी आता चाललो —हा—हा— माझा चेहरा तुम्हांला फिरून कधी दिसणार नाही—तरी पण तुम्हांला फिरून फिरून हजारदा—मनातल्या मनात, एक अगम्य ओळख नक्कीच पटेल. बरं का आना—मी —मी भेटेन पुन्हा—"

*

अखेरपर्यंत असं काही बोलत बोलतच आबा तिसऱ्या दिवशी आम्हांला सोडून निघून गेले, तेव्हा आम्ही सारेच त्या स्वप्नवत घटनांनी भयंकर दुःखमग्न झालो.

पण त्या वेळी धाकल्याने फोडलेला तो हंबरडा— तो मात्र मी कधी कधीच विसरणार नाही... " आपणच त्यांना वाघदरीला आपल्या हातांनी मारलं " असंच त्याचं सारलं पालुपद चाललं होतं. आम्हाला वाटलं, तोही आता वेडा होणार—

पण तो अखेर आमच्या आईकडे धावला, अत्यंत भावनावेगाने त्याने तिच्या पायावर डोकं ठेकलं, नि नाक घासून, ओक्साबोक्शी रडत रडत तो तिला म्हणाला, " वयनी, वयनी—मी तुमचा भाऊ, दीर, मोठा मुलगा, वाटल त्ये म्हणा...पन् मी आता जिता हाय तंवर, तुमाला, अनुंताला, सदूला— तुमच्या या घराला कवा बी अंतर देनार नाय्. आबा दादांचा धंदा पुडं चालवला— त्यात मी हवं त् गुलामासारखा राबन्. तुमचा समद्याचा रक्षेक व्हईन—तुमच्यासाठी माजा जीव देईन...मला दूर लोट्ट नका ! निगालं त् त्यातनंच माजं हे पाप कदी ना कदी धुऊन निगल बगा— "

आणि खरोखरच, आपली शेतवाडी, घर सारं आपल्या नवीन लग्न झालेल्या मुलाच्या हवाली करून गेल्या पावलीच धाकल्या फकिरासारखा आमच्या घरी परतला. त्या वेळी आमच्याकडे एका बोचक्यासह तो जो येऊन राहिला, तो त्यापुढे अगदी कायमचाच.

आबांच्या पश्चात धाकल्याच्याच जोरावर आईने नि मी, आबांनी शिरावर घेतलेली नि सुरू केलेली, अर्धवट उरलेली कॉन्ट्रॅक्टची कामं नीट पार पाडली. नि त्यानंतरही वर्षानुवर्षे आमच्या हाताखाली, आमच्या बरोबरीने, अगदी घरच्या माणसासारखा आस्थेने रात्रंदिवस काम करीत धाकल्या राहिला.

*

पण मग योगायोग तरी किती विलक्षण पाहा. आमचे आबा एखाद्या तत्त्वनिष्ठ, सत्यनिष्ठ हुतात्म्यासारखे, जणू हसत-खेळत अचानक गेले. त्यांच्या यात्रेला शेकडो प्रतिष्ठित लोक हजर होते. त्यांना आसवे नि हुंदके आले—

पण त्याच वर्षी, चार महिन्यांनी, सत्याण्णवचा प्लेग आला आणि— आपल्या उमद्या भावाचा व सर्वांच्याच उमद्या भावभावनांचा क्षणोक्षण पाषाणहृदयी खून करून ते जिवंतपणे पचवणारा तो घातकी आप्पा कुलकर्णी— उद्धटपणाच्या नि नीचपणाच्या यशोशिखरावरच तसा विराजमान असताना, अकस्मात प्लेग होऊन एखाद्या प्लेगच्या उंदरासारखाच तडफडून तडफडून मेला. अखेर वाघदरी गावातलं कोणीसुद्धा त्याला शिवायलासुद्धा गेलं नाही.

# मरणात खरोखर जग जगते

तसे आबा गेले नि त्यानंतर जवळजवळ पंचेचाळीस वर्षांनी सदानंदचे वडील— आना— गेले.

त्या घटनेलाही आता सहा वर्षं होत आली होती... पण... त्या वेळच्या सदानंदच्या जीवाचा तो आकांत... तो भावनावेग! असले प्रसंग जीवनात एकदाच अनुभवायचे असतात. म्हणूनच, अजूनही तो प्रसंग काल घडल्यासारखा त्याच्या मनात ताजा होता.

त्या वेळी तर सदानंदच्या हातून वेड्यासारख्याच कित्येक गोष्टी भावविवशतेने झाल्या होत्या. आनाबापूंना स्मशानात पोचवून तो घरी परतला नि त्याने केलंन काय? तर आनांनाच पत्र लिहिलंन. अगदी मनापासूनच. कुठल्या पोस्टात पडून ते कुठं जाऊन पोचणार का होतं?— पण खरं म्हणजे, ते त्याचं सारं त्याच्यासाठीच होतं. अजूनपर्यंत ते त्याच्याकडेच पडून होतं.

सदूकाकांच्या तोंडून पूर्वी ऐकलेला तो आबाआजोबांचा जीवनवृत्तान्त नुकताच फिरून वाचला असल्यामुळे, आपल्या पित्याच्या मृत्यूची व त्या वेळच्या आपल्या त्या भावकल्लोळाची सदानंदला फिरून आठवण झाली होती.

तेवढ्यातच त्याच्या मनाने एकदम दुसऱ्या बाजूला एक पलटी खाल्ली. त्याच्या चिमुकल्या परागचा मृत्यू त्याच्यापुढे उभा राहिला. त्या वेळी त्याने भावोत्कटतेने आनांना लिहिलेल्या पत्राचीही स्मृती जागृत झाली.

एका मृत्यूवरून सारेच मृत्यू आठवतात, पण मृत्यूतच साऱ्या मानवी जीवनाचं खरं नवनीत असतं.

आबा गेले तेव्हा आनांना काय वाटलं असेल, आना गेले तेव्हा आपल्याला काय वाटलं, आपण आनांना अचानक सोडून गेलो असतो तर आपल्या आनांना काय वाटलं असतं, आपला पराग आपल्याला अचानक सोडून गेला तेव्हा आपल्याला काय वाटलं... याबद्दलचे नवनवे कल्लोळ त्याच्या मनात त्या क्षणी उठून जात होते.

तो–सदानंद व्यक्ती एकच. पण तोच जणू काय तसा निरनिराळ्या प्रकारे, निरनिराळ्या वेशाने त्याला पुन्हा पुन्हा भेटायला येतोय, असंही त्याला क्षणभर वाटलं.

म्हणूनच काहीशा उतावीळपणे त्याने ती दोन्ही पत्रं आपल्या खणातून शोधून काढली. त्यांतलं पहिलं त्याच्याकडेच पडून असलेलं नि दुसरं... आपल्या मृत्यूपूर्वी आनाबापूंनीच त्याच्या हाती जे कागदपत्रांचं पुडकं दिलं होतं, त्यातून त्याच्याकडे परत राहायला आलेल्या त्याच्या स्वतःच्याच अनेक पत्रांमधलं एक होतं....

तीच आज फिरून समोर हाती दिसताच, त्याची उत्कंठा–उत्सुकता एकदम शिगेला पोचली.

तो ती नव्या उत्सुकतेने वाचू लागला...

## मृतास पत्र

१६ सप्टेंबर १९४३ (रात्री)

प्रिय आना,

मी आजवर तुम्हांला अनेक पत्रं लिहिली. हे आजचं मात्र अगदी न्यारंच... ते तुम्ही वाचणार नाही, तुमच्या ते हातीही पडणार नाही. मग हेतू? पूर्णपणे एकच—स्वसमाधान. कसल्याच भौतिक गोष्टीची कांक्षा-अपेक्षा-अभिलाषा नाही यात.

आजपर्यंतची माझी पत्रं—मनापासूनची, पण त्यात छोट्यामोठ्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष अपेक्षा होत्या. निदान, आपला स्वभाव, वागणूक, आपले-माझे संबंध, इत्यादींवरच माझं मतप्रदर्शन, टीका, माझे निर्णय, असंच काही असायचं.

त्यावेळचा हेतू एकच असे—मला न्याय मिळावा, तुमच्यामधे काही रास्त बदल व्हावा, आपला परस्परसंबंध पालटावा, तुम्हांला बदलावं किंवा माझंच चुकत असल्यास आपल्याकडून मला तरी बदलवून घ्यावं.

पण ते अर्धवटच यशस्वी झालं— म्हणजे एवढंच की तुम्ही चिडलात, रागाने उत्तरं पाठवलीत. तर्कवादाने माझी बाजू चुकीची असं मात्र मला यथार्थतेने कधीच दाखवू शकला नाहीत. आपण दोघेही त्यात खूप रक्तबंबाळ झालो, पण खराखुरा विजय दोघांनाही लाभला नाही.

या आजच्या लिहिण्याने तुमच्या हृदयाला जरा देखील घरं पडण्याचा संभव नाही. आपलं शरीर, हृदय, बुद्धी, आपले पूर्वग्रह, आग्रही मतं, सर्व सर्व भोवतालच्या अदृश्य हवेत, पंचमहाभूतात विलीन झाल्याचं मी माझ्या डोळ्यांनी मघा प्रत्यक्ष पाहिलं. देह सोडलात नि मग तुमच्याच रक्तमांसाचा मुलगा या नात्याने ते निश्चल कलेवर स्वहस्तानेच मी चितेवर ठेवलं. त्याला सर्वदाहक क्रूर अग्नीच्या घनदाट ज्वाळांचं पांघरूण घालण्याचं प्राप्त कर्तव्य या क्षणी— हे सारं इथं लिहीत असलेल्याचयाच माझ्या हातांना नाइलाजाने करावं लागलं.

*

घरी परतलो, पण आपली मूर्ती डोळ्यांपुढे सारखी उभी. मलाच उद्देशून काही बोलत असल्याचा सारखा भास. माझ्याच मनाच्या कल्पना तुमच्या शब्दरूपाने माझ्या कानावर आदळत होत्या... जणू तुम्ही म्हणत होता...

"अरे, माझ्यातच कशाला, प्रत्येकात चांगलं-वाईट असतं. पण मग देहाबरोबर वाईट ते खाक होतं, चांगलंच मागे उरतं. बघ सदानंद, माझं वाईट ते ते सारं जळून जळून आता माझ्याबरोबरच गेलंय. पिता या नात्याने माझ्यातलं जे जे चांगलं, तेवढंच मागे ठेवून जातोय मी. देहाचा कोळसा-राख झाली, त्यातूनही माझ्यातला काही हिणकस कोळसा मागे उरला असेल, तर तो मात्र आता तू उगाळू नकोस.

तुझ्यातलं हिणकस उगाळण्याची आता माझ्यातही ताकद उरली नाही. त्या कक्षेपलीकडेच गेलोय मी. पण मग, सदानंद, तुझ्यात जे जे चांगलं आहे, ते ते वाढीस लाव. कोणाची कसली भीड-मुर्वत ठेवू नकोस. स्वतःचं नि भोवतालच्या साऱ्यांचं सदैव कल्याण कर— तुझ्यातल्या हजारो सत्प्रवृत्तींच्या वाढीनेच तुझं, तुझ्या कुटुंबीयांसंबंधीचं, तुझ्या समाजाचं, राष्ट्राचं खरं खरं हित होणार आहे. आशीर्वाद घे माझा मनापासूनचा नि आता हा निरोप देशील मला, तो तुझ्या निर्मळ मनानेच—"

अखेर त्या सतत भासानेच मी उठलो, दिवा लावला, नि हे असं लिहायला बसलोय... वाटलं, आपल्या आनांना आणखी एकच, अगदी एकच शेवटचं पत्र लिहावं— बस्स... लिहायचा तो मोह आवरेनाच मुळी...

*

माझ्या आईच्या प्रभावी धार्मिक भावनेने, आपल्या घरात आठवड्यातल्या गुरुवारला एक परंपरा लाभली आहे. त्या वाराभोवती पावित्र्याची वलये नकळत पडली आहेत. तुमचाही तो उपासाचा दिवस. अशा एखाद्या दिवशी योगायोगाने आपल्या पंगतीला बसून तुमच्या फराळाच्या ताटाशेजारी मी भात-आमटी जरी जेवत बसलो, तरी मला पंचपक्वान्नांचं समाधान लाभायचं.

आजही गुरुवार. त्याच दिवशी तुम्ही गेलात. हाही योगायोगच का ? साऱ्यांची जेवणं, दुपारचा चहा, सारं झाल्यावरच अंतिम प्रस्थान ठेवलंत. कसला आटापिटा नाही, गजबज-गाजावाजा नाही. अगदी शांत मनाने आपला श्रांत-क्षीण देह हळू हळू निश्चल केलात, वासांसि जीर्णानि म्हणून बाजूला सारलात, त्याची पुढली हवी तशी वासलात लावायला तो आमच्या हाती दिलात.

आपले कित्येक आप्तस्वकीय अखेर जवळपास होते. काही आधी येऊन गेले होते. अशा भरल्या घरात, अशा शांत मनाने, मनाशी एक निर्णय घेऊनच तुम्ही म्हणालात जणू काय, " बस्स. पुरे झाला हा व्याप. " पुढल्याच क्षणी तुमच्या जिवाचं पाऊल तुम्ही मागे घेतलंत, जगात आम्हीच तुमच्या शरीरापाशी सदेह तेवढे उरलो.

तुमची पहाटेपासूनची चाललेली ' चर्पटपंजरिका ' अजून माझ्या या कानात दुमदुमते आहे. काल इथं होता, आज... सकाळपासून संध्याकाळी पाचापर्यंत अधूनमधून बोलत असणारे तुम्ही... आता केवळ पाच-सहा तासांतच हवेत... चौफेरच्या वातावरणात विलीन झालात... कायमचे अदृश्य झालात...

एका प्रचंड आयुःपटावर शेवटचा पडदा टाकण्याची ही पद्धती अगदी दिव्य, भव्य, योग्य, साजेशीच. तुमचा तो अंतिम विक्रमच. म्हणूनच तुमच्या अखेरचा चेहरा प्रशांत, प्रसन्न, सस्मित दिसत होता.

*

सर्वांनी तुमचा तो अखेरचा निरोप संमिश्र भावनांनी शांतपणे घेतला. नानी दुःखाने रडल्या. श्रीधर सुन्न बसून अधूनमधून हुंदके देत राहिला. मी कठोर, बेडर समजतो स्वतःला, पण माझ्याही उरी भरभरलं— क्षणकाळ ते फुटल्यासारखं वाटलं. एकदोनदा अस्फुट हुंदकेही आले.

विशेषतः आपल्या पराक्रमावर उभ्या केलेल्या 'श्रीधर'मधील आमच्यासह तुम्ही अखेरचे बाहेर पडलात तेव्हा, 'अन्नपूर्णा कॉलनी', 'यशोदा कॉलनी', 'आबा पार्क'... सर्व सर्व, ज्या मस्तकातील कल्पनाजाळातून अवतार घेऊन संपूर्ण झालं, तेच ज्वाळांनी ग्रासलं, घेरलं... त्याचा एक अखेरचा सूक्ष्म आवाज झाला तेव्हा, जे चरण शिरसावंद्य होते, पण दिखाऊ दांभिकतेच्या नावडीमुळे नि उत्तरोत्तर पडत गेलेल्या परस्पर अंतरामुळे जे मला कधीच वंदिता आले नाहीत... त्यांना मी चितेवर हळूच अखेरचं वंदन केलं तेव्हा.

पाऊणशे वर्षे आपल्या छोट्याशा जगावर ज्या बुद्धीने आपला प्रत्यक्षाप्रत्यक्ष, स्पष्टास्पष्ट, छोटामोठा परिणाम केला होता, जे डोळे पूर्वी अनेकदा राग, अनुराग, अश्रू यांनी तुडुंब भरलेले मी स्वतः माझ्या डोळ्यांनी पाहिले होते, जे हृदय अव्याहत धडधडत होतं म्हणूनच 'अनाबापू' हे असामान्य संमिश्र व्यक्तित्व आम्हांला पाहायला मिळालं होतं, ते ते तुमच्या देहाचे सर्व उत्तम-मध्यम गडद नारिंगी अनल ज्वालांनी कायमचे पांघरून टाकले... तेव्हा.

आपल्या सभोवती अखेरच्या तीन प्रदक्षिणा करून, आपल्या उत्तम भागापाशी मी हातातलं मडकं सोडून फोडलं, तेव्हा— तेव्हाच मला खरीखरी प्रत्यक्ष जाणीव झाली— 'एका अत्यंत सच्छिल, सरळ, वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तीचं आयुष्य इथं संपलं—' त्या वेळी मात्र माझं हृदय भारावलं, अश्रूंच्या सरीवर सरी येऊन मी ओक्साबोक्शी रडलो, देहभान पार विसरलो, क्षणकाळ तुमच्यामधेच विलीन झाल्यासारखा झालो. तुमच्या देहाभोवतालच्या जळजळत्या ज्वाला त्या क्षणी मलाही होरपळवीत होत्या.

*

तेव्हा वाटलं, 'प्रेम होतं म्हणूनच आपण भांडत आलो. पण यापुढे, आता भांडायलाही माझे आना मला उरले नाहीत... तरी कृतज्ञ मनाला पुन्हा चटकन वाटलं, 'आनासारख्यांचा मी मुलगा, हे तरी केवढं भाग्य माझं. केवढं समाधान—' तुम्हांला एकट्यालाच, अगदी एकट्यालाच सांगतोय मी हे... त्या वेळी मला आणखीही एक वाटलं, 'हा आनांचा हाडामांसाचा मुलगा अजून जिवंत आहे. त्याच्यामधे हवी तेवढी कर्तृत्वशक्ती आहे. हजारो सत्प्रवृत्ती रसरसताहेत. अजूनही त्याला हवा तेवढा जीवन-काळ आहे, वाव आहे. त्यांच्या हयातीत जमलं नसलं, तर आनापश्चात तरी त्याला खराखरा चांगुलपणा दाखवायला भरपूर अवसर आहे. तेव्हा आनांच्या साऱ्या साऱ्या सत्प्रवृत्तींचा नंदादीप पुढेही सतत तेवत ठेवण्याचं आता कर्तव्य आहे—"

सारं आटोपून घरी परतल्यावरही बेचैन झालो. बर्फाच्या पाण्यातून हात काढून तो एकदम उकळत्या बादलीत घालावा, तसंच काहीसं अवेळी आंबोळ करून गरम पिठलं-भाताचे चार घास घशाखाली उतरवताना मला वाटत होतं.
मग घरात सारी हळूहळू सामसूम झाली. त्या ओक्याबोक्या वाटणाऱ्या ' श्री–घर 'मधे मला झोपच येईना.
म्हणूनच अखेर उठलो, नि खास तुम्हांला म्हणूनच हे लिहायला घेतलंय —

*

आजचं हे पत्र न्यारं तर खरंच... जिवंत माणसांबरोबर पत्राने भांडणं, युक्तिवाद करणं, तर्काच्या पायावर इमारती बांधणं नि एक प्रकारचा दिपवणारा परिणाम त्यांच्यावर करण्याचा प्रयत्न करणं, हा तर प्रत्येक व्यक्तीचा एक जन्मसिद्ध हक्कच आहे. मी तसलीच " भांडणं केली ", समोर पुरावे दिसताच प्रतिपक्षाला चीत करण्याचा कठोरपणा माझ्यात अभावितपणेच शिरला. पण त्या वेळी बैठक मात्र नितांत आदराचीच होती.
आपला–माझा प्रत्यक्ष दैनंदिन सहवास नव्हता. माझ्या आचरणातून योग्य धागेदोरे जमवून घ्यायला तुम्हांला संधी नव्हती. आपला सहवास मुद्दाम वाढवण्याचा दांभिक प्रयत्न करणं स्वभावतःच अशक्य होतं मला.
अशा त्या विशिष्ट परिस्थितीत, माझी ' कडवट ' पत्रं तेवढी आपल्या वाट्याला आली. माझी केवळ एकच बाजू दाखवणारा माझा परिचय तेवढाच तुम्हांला अखंड लाभत गेला — तुमचा ' कर्तृत्वथोर ' अहंपणा तेवढाच त्यामुळे दुखावला गेला. वर्षानुवर्षं, दीड तपाहूनही अधिक काळ, असे एकमेकांपासून आपण दुरावतच गेलो, उत्तरोत्तर—
आपल्या पत्नीने पित्याच्या वृद्धापकाळी सून म्हणून त्याची शुश्रूषा करावी, आपल्या मुलांनी आजोबांवर नातवंडाचा नैसर्गिक प्रेमळ हक्क नेहमी गाजवावा, लहानपण जिथं घालवलं तिथं, त्याच वातावरणात– आपल्या छोट्यामोठ्या भावंडांसह मोठेपणीही वावरावं— या माणसाच्या मनाच्या नैसर्गिक इच्छा... पण आमच्या आईच्या पश्चात आपल्या घरातली, तुमच्या उरातली सारी परिस्थितीच पार उलटली.
निर्मल, मी... आम्ही उत्तरोत्तर तेथूनच दूरदूर ढकलले गेलो. जिथं आम्हांला, आमच्या वेड्या-भाबड्या भावनांना स्थानच नाही, अशाच एका परिस्थितीशी तुम्ही अधिकाधिक एकरूप होत गेला. अशा आमच्या दुबळ्या सौजन्याने नि आपल्या सर्वसमर्थ अहंगंडाने, आपला व आमचा सर्व बाजूंनीच दावा साधला, घात केला.
ही गंमत कशी असते पाहा. मुलापेक्षा बाप अधिक यशस्वी, अधिक कर्तृत्ववान्, व्यवहारी, सधन असला... की, कोणाचीही इच्छा असो अगर नसो, तिथं अहंगंड हा निर्माण होतोच. ओशाळेपणा येण्याला व आणण्याला, हरघडी नि उत्तरोत्तर अधिकाधिकच भरती येते. अभिमान–स्वाभिमानाच्या झगड्यांना पूर येतो. पुढे पुढे

वैभव–समानता कधी आली, तरच त्यातून दोघांची कदाचित सुटका...
मला तर धनाची ईर्षा कमी, मनाला ध्येयरंजनाचं वळण पडलेलं. सापेक्ष अयशस्वितेने, निर्धनतेने माझे हात बांधत गेलेले. तरी आत्मविश्वास नि स्वाभिमान यांच्या मनातील सदैव जागरूक वास्तव्याने, वैभव–संपन्नता यांच्याकडे ताठरतेने पाहायचीच माझी दृष्टी झाली. मात्र, माझ्या भावी यशांनीही आपल्या आशीर्वादाच्या खतातच मुळं धरावीत, आपला अधूनमधूनचा न्याय–आसरा मला मिळावा, या अपेक्षा मनात रेंगाळल्या. पण त्या वेळी आपल्या अहंगंडाचा अजस्र रणगाडा त्यावरून वेगाने नि बेदरकारपणे पुढे निघून जाई. आकांक्षा–भावना मरगळून, जमीनदोस्त होऊन, धरणीवर पडत. त्यांना आपल्यासमोर डोकं वर करून उभं राहायला जागा नसे, वाव नसे, त्राणच नसे. आपल्या कल्पनांनीच तयार होणाऱ्या जगाची चित्रं तेवढीच खरी धरून, त्या निरुंद चौकटीत तुम्ही आम्हांला हटयोगाने बसवावं, नि ते जमलं नाही, आम्ही त्या वेळी बंड केलं, की आमच्यावर फिरून उलट भावशून्यतेचं, स्वार्थांधतेचं आपल्या हाताने तुम्हीच शिक्कामोर्तब करावं...
तुमच्या अप्रत्यक्ष छायेखाली असंच सारं आमचं आयुष्य निघून गेलं.
पण इतकं असूनही, जे जे झालं त्याबद्दल मला आज कसलंच दुःख नाही.
तुमच्याबद्दलची होती–नव्हती ती खळखळ–मळमळ त्या त्या वेळीच तुमच्यापर्यंत पोचवून, आता तिला तुमच्या बरोबरच कायमची मूठमाती मिळाल्यासारखं झालं आहे.
आना, आता जे आपल्याबद्दलचं माझ्या मनात उरलंय ते एकच — केवळ निर्मळ प्रेम, नितांत आदरच.
त्या शुद्ध भावानेच आज आपल्याला... एकट्या आपल्यालाच हे लिहावंसं मला वाटलं नि हे लिहीत बसलोय—

*

एक जीव दुसऱ्या जीवाच्या घरी जन्माला येतो हा केवळ एक योगायोग...तिथल्या परिस्थितीत, मनःस्थितीत, स्वभाव, ध्येय–दृष्टी इत्यादी अन्नपाण्यावरच त्याचं मन वाढतं, तो जीव वाढतो. संगोपन, शिक्षण, पदव्या इत्यादी संस्कारांची भर पडते. त्याला व्यक्तित्व प्राप्त होतं.
आपल्या घरी मला माझं व्यक्तित्व प्राप्त झालं याचा मला अभिमानच वाटतो. आना, पण पुढे मात्र आपल्या व माझ्या न्याऱ्या व्यक्तित्वांचा वर्षानुवर्षं प्रचंड संघर्ष झाला. आपल्याकडूनच लाभलेल्या माझ्या चिवट मनोभूमिकेमुळेच तो अखेरपर्यंत टिकला. मिळमिळीत नव्हे, स्वतःहून वरचढ व्यक्तित्वाशीच दोन हात करण्याची कोणालाही इच्छा असते. न्याय, प्रामाणिकपणा, युक्तिवाद, ध्येयासक्ती, इत्यादींबाबतच्या प्रखर तीव्र भावनांच्या जोराने, विश्वासानेच आपल्याशी मी झगडलो.
मात्र आयुष्यभर मी जाणत होतो की, आनांचं व्यक्तित्व माझ्याहून काकणभर अधिकच

श्रेष्ठ, प्रभावी आहे. त्यामुळेच त्या झगड्यांमधे मला राम वाटे, राम भेटे. खरं म्हणजे मला धर्मयुद्ध हवं होतं, आपल्याकडून मिळणाऱ्या खऱ्याखुऱ्या पराजयाचा शिरसामान्य स्वीकार करायला अगर सरळ मार्गांनी आपल्यावर तरी विजय मिळवायला मी सदैव उत्सुक होतो. त्याच जोमाने मी झगडत-धडपडत होतो.

पण दुर्दैव माझं- दोन्ही बाबतींत मी सारखाच अयशस्वी झालो! माझ्या वाट्याला सततचं माझं अपयश नि आपला यशस्वी अहंपणाच तेवढा आला. मात्र या प्रयत्नांनी माझ्या व्यक्तित्व-स्वभावाला एक न्यारी धार मी मिळवली, हेच माझं भाग्य नि समाधान. तसल्या त्या ईर्षेनेच मी अनेकदा आपल्या बाबतीत लहान तोंडी मोठे घास घेतले. न्यायान्याय, तरतम, यांचा युक्तिवाद—कठोर—अगदी कठोर युक्तिवाद करून, काय नि कसं योग्य, कसं करावं, याबाबत माझी मतं नि माझ्या सूचना तुम्हांला मी करीत गेलो. पण ते आता सरलं, कारण ते सारं सारं आपल्या जिवंतपणापुरतंच...

आपल्यापुरतंच होतं...

म्हणूनच, आपल्या अखेर-निर्णयांनी, आपण केलेल्या योजनांनी ज्यांचं हित होईल, अधिक आर्थिक फायदा होईल, आपल्या आयुष्यातल्या पुण्याईने अधिक संपन्न व सुखी होण्याचा माझ्या भोवतालच्या ज्यांना ज्यांना मान मिळेल त्यांच्याशी, आपल्या-माझ्या त्या झगड्यांचा काडीचाही संबंध उरलेला नाही. त्यांच्याबद्दल माझ्या मनात किंचितमात्र हेवा-दावा-मत्सर नाही. न्यायान्यायाचं ते तात्त्विक भूमिकेचं माझं भांडण केव्हाच संपलं. आपले निर्णय तेव्हा कायम होऊन मागे उरले असतील. ते आता मला पूर्ण शिरसावंद्यच आहेत, होतील.

कारण, मला वाटतं, कोणाच्याही वैभवाने मनुष्य 'श्रीमंत' होऊच शकत नाही. ते सारं त्याच्या मनावर, कर्तृत्वावरच अवलंबून असतं. तेव्हा, स्वतः काही कसला स्वार्थी आग्रह न करता-धरता आपल्याकडून मला आता जे स्वयंनिर्णयाने मिळणार असेल त्यातच मला माझं यश दिसतं...आपला खराखुरा मनापासूनचा आशीर्वाद दिसतो—तो सर्वच मजवर होणारा एक 'अनपेक्षित पाऊस'च होय...

*

हे आपल्याला लिहायला घेताच खूप खूप मनात आलं—खूप आलं तसं खूप पळालं, तरीही हे खूपच लिहिलंय—

नुकताच पहाटेचा कोंबडा आरवला—घड्याळाचे चार ठोके पडले. मी एखाद्या वेड्यासारखा लिहीत होतो. खरोखरच...आता जिवंत नसलेल्या, जिव्हाळ्याच्या अशा एका व्यक्तीलाच हे सारं मनापासून, आस्थेच्या वेडेपणाने भरभर लिहीत होतो... कशाला? कोण जाणे कशाला ते. या क्षणी... या क्षणी आपण कुठं असाल, आना?... या भौतिकतेच्या जमान्यात असला हा माझा प्रश्न काहीसा हास्यास्पदच!... पण मग-मागे अनेकदा आपल्या परस्पर-वादविवाद-प्रसंगी व्यक्ती-व्यक्ती-ठायीच्या

अंतरात्म्याचा आपण अनेकदा माझ्याकडे उल्लेख केला आहे ना ? तर मग...मी हे सारं लिहिलं आहे, लिहीत आहे, ते ते सारं...आपण नेहमी म्हणत असा, त्या प्रत्येक व्यक्तीच्या—हो, आपल्या—माझ्या आनांच्या अंतरात्म्याला उद्देशूनच मी—

*

बापरे...खरोखरच, भयंकर आश्चर्याचीच गोष्ट घडली ! आना, हा तुमच्या अंतरात्म्याचाच तर खेळ नव्हे ना—मला जाग आणण्यासाठी झालेला ?...

आपल्या ' श्री–घर 'मधल्या तुमच्या जिन्याच्या खोलीपाशी पॅसेजमधे बसूनच मी रात्रभर असं लिहीत आहे. पण काय आश्चर्य घडलं हे नुकतंच...तुमच्या आत्म्याचा मी याच पत्रात वर उल्लेख करायला, नि त्याच वेळी माझ्या डोक्यावरचा विजेचा दिवा एकाएकी विझून काळोख पडायला एकच गाठ पडली...

प्रथम केवढ्याने तरी दचकलो मी. अंगांगावर झरंकन शहारे येऊन गेले.

तो अनुभव साराच अगदी गूढ, अद्‌भुत वाटला मला. नुसतंच जागचं उठून, दोनदा बटन वरखाली केलं. पण तो दिवा काही पेटेना. भोवती अकस्मात झालेला काळोखच काळोख...

' मेन–फ्यूज तर गेला नसेल ? ' म्हणून मी काळोखातून चाचपत चाचपतच हॉलकडे गेलो. खात्री करायला, तिथली बटनं एकामागून एक पटपटपट दाबली आणि काय, पटापट सारेच दिवे रांगेने लागले. मी अधिकच गोंधळून गेलो...

हॉलमधे झोपलेली तुमची जावई वगैरे पाहुणी मंडळी–एकदम चौफेर पडलेल्या त्या अनपेक्षित उजेडाने दिपली, जागी झाली, नि त्रासिकपणे म्हणाली– " काय रे, सदानंद ? काय हवंय तुला ?...हे काय करतोयस वेड्यासारखा ?...हे दिवे कशाला पेटवलेस सगळे ? "

एकदम वरमून मी ते दिवे पटपट पुन्हा विझवून टाकले.

मग पलीकडल्या पुस्तकांच्या खोलीत जाऊन तिथला दिवा लावला नि तिथं जमिनीवरच थपकल मारून हा पुढला मजकूर मी आता या क्षणी पुरा लिहीत आहे.

*

आना...मला हा आपल्या अंतरात्म्याचा साक्षात्कार खासच झाला. आपल्या मनोमन विश्वासाप्रमाणे, आपला अंतरात्मा आता पुढील प्रगतीचा मार्ग आक्रमू लागला असेल. जाता जाता, मागे वळून पाहणाऱ्या त्याला उद्देशूनच मी हे सारं लिहिलं, त्याने मला निश्चित " ओ "ही दिली.

काल रात्रीच आपण मला म्हणाला होता, " माझं शरीर थोडं धडपडतं, पण माझा अंतरात्मा बराच संतुष्ट आहे. "

आणि आनांचाच, मी लिहिता लिहिता तिथलाच तेवढा एक दिवा विझून झालेला तो

अकस्मात काळोख...आपलं माझ्याकडे लक्ष आहे तर ?...निश्चित आहे.
तर मग, आना, तेव्हा या प्रत्यक्ष चालू घडीला आपल्या अंतरात्म्यापर्यंत मला माझं एकच मनोगत पोचवायचं आहे.
माझे निदान हेतू तरी अव्याहत चांगलेच होते, आजही ते चांगलेच आहेत, उद्याची पण तीच अपेक्षा आहे...आना, माझ्यामुळे आपल्या अंतरात्म्याला आयुष्यभर प्रत्यक्षाप्रत्यक्ष दुःख पोहोचलं त्याची या क्षणी, जाता जाता तरी, मला उदारपणे अखेरची क्षमा करा—
आना, आपल्याबद्दल आता केवळ पुरेपूर आदर तेवढाच माझ्या हृदयात स्थिर आहे!
हेच—हेच आपल्यापर्यंत या क्षणी पोहोचावं, आपला मला सदैव आशीर्वाद असो, अशी अत्यंत प्रबळ भावना-इच्छा या क्षणी मनात बाळगून असणारा—

आपला निष्पाप मुलगा
सदानंद

## 'मृता'चे पत्र

३० नोव्हेंबर १९४०

प्रिय आना—
महिन्यापूर्वी पराग गेला. तो धक्का किती निष्ठुर, अकल्पित...असह्य!...सौ. मंगल तर दुःखाने वेडावलीच होती. तिचं किंचित सांत्वन केलं, पण स्वतःचं ? तो प्रयत्न फोल ठरला. मनात खिन्नत्व दाट भरलं, आनंद-उत्साहाचा मागमूसही उरला नाही.
पण पहिल्याच दिवशी हातात पडलेल्या आपल्या आस्थेवाईक सांत्वन-पत्राने मनाला फिरून एक क्षणिक दिलासा दिला. 'नियती', 'दैव', 'ईश्वरेच्छा' हीच आपली सहानुभूतिपूर्वक समजावणी! त्यातून क्षणिक विरंगुळा वाटला खरा. पण मागाहून प्रतिकूल प्रतिक्रियाच हजारपट जास्त झाल्या!
मन कधी नव्हतं इतकं एकदम उसळलं, बंड करूनच उलटलं. माझ्या प्राप्त परिस्थितीवर उलटलं, किंबहुना, आपल्यावरही ते रागाने उसळलं. तो कल्लोळ काही केल्या दडपलाच जाईना...
तेव्हाच नि म्हणूनच आज हे तुम्हांला लिहायला घेतलंय. अखेर पराग गेला तो एकाएकी, अचानक. त्याचं तुम्हांलाही वृद्धपणी नैसर्गिकच दुःख झालं...त्या क्षणी पित्याची सहानुभूती तशी वायुवेगाने माझ्याकडे सांत्वनार्थ धावत आली. माझं मन क्षणकाळ शांत झालं, उसासलं...मला दिलासा दिलात...
तरी आता मात्र ते मला फिरफिरून म्हणू लागले आहे, " आनांना माझ्या दारुण

दुःखातच तेवढी चटकन् सहानुभूती वाटली. पण मग, त्यांची सहानुभूती अशी एकतर्फीच का?...माझ्या सुखा समाधानाच्या प्रसंगी, माझ्या ध्येयाकांक्षांच्या हालचालीत, माझ्या यशापयशात...आनांची नैसर्गिक वत्सल सहानुभूती होते तरी कुठे गुप्त? त्यांच्या सहानुभूतीच्या मखमलच्या वर्षावासाठी, त्याआधी माझ्यावर दुःखाचा, अगम्य क्रूर घटनांचा एक कडेलोटच झाला पाहिजे का?...

एखाद्या प्रिय व्यक्तीचं मन आपल्या दुःखात तेवढंच चटकन सहानुभूती दाखवतं, भागीदार होतं, याचा अर्थ?...त्याची नाडी? ही विशेष समाधानाची गोष्ट तरी खास नव्हे...इतर वेळी ते मन पूर्वग्रहांच्या, कृत्रिमतेच्या पांघरुणाखाली लपलं जात असावं. निदान लपवलं जात असावं...त्याला अहंगंडाचं हे अनैसर्गिक ग्रहण का? का?

प्रथम असा परागसाठी दबकत दबकत भरल्या घरात घुसलेला मृत्यू!...नकळतच तो माझ्या मनातच ऐसपैस पसरला. एक भयानक थैमान चालू लागला. माझं...माझ्या मनाचं...प्रत्यक्ष मरणच बघता बघता मी अनुभवू लागलो! मी त्या क्षणी पार सुन्न, गलितगात्र झालो!...

*

मग, तशा घुमसणाऱ्या मनाला मोकळी वाट देण्यासाठीच वाटलं, आपण लिहावं, आपलं या क्षणाचं सारं मनोगत शब्दांत नीट प्रतिबिंबित करावं— हो, आपलं 'अखेरचं' असं काही लिहावं, मनाचं हे कोंदलेलं वेड टाळण्यासाठीच केवळ लिहावं, स्वतःसाठी लिहावं, स्वतःला...हो, स्वतःलाच लिहावं!

पुन्हा मग वाटलं, स्वतःनंतर आनाच आपल्याला अधिक निकटचे! हे जे 'अखेरचं' ते आपण त्यांनाच उद्देशून लिहावं. हे जे मी आता लिहीत आहे, लिहिणार आहे, ते...माझ्याबद्दलचा, माझ्या भोवतालच्या वातावरणाबद्दलचा, माझ्या निकट संबंधीय व्यक्तींबद्दलचा, माझ्या मनात घुमसणारा सात्त्विक संताप व्यक्त करायला! खरं... आनांना नव्हे,...केवळ स्वसमाधानासाठी!...मात्र, आनांनीही ते यथावकाश वाचावं, याही इच्छेने लिहावं...

तेव्हा, एकदा वाटतंय, लिहून ते आपल्यापाशीच ठेवावं. पण पुन्हा वाटतंय, असल्या दुःखाने कोंदाटण्याचा काही आपणच एकट्याने खास मक्ता घेतलेला नाही!...जी विशिष्ट परिस्थिती आहे, ती मी तरी निर्माण केलेली नाही. माझ्याभोवती ती निर्माण झाली आहे. ती आनांनीच निर्माण केली असेल असं ठामपणे म्हणायला मन धजावत नाही. तरी पण एक मात्र निश्चित...ती परिस्थिती आनांची-माझी, आम्हा दोघांची... दोघांच्याही आयुष्यांना व्यापणारी—व्यापून उरलेली...मग मीच एकटा तिचे प्रहार सहन करणारा कोण?

ढालीच्या दोन बाजू असतात ना?...आपली आपल्याला परिचित वाटते, शांत असते. आपली बाजू हीच एकमेव, अशी आपली समजूत असते. आनांचीही हीच,

अशीच एक समजूत–गैरसमजूत असणार! पण मग दुसरी बाजू?...माझी बाजू??...
तीही सर्वांशाने—बव्हंशाने—नको का एकदा कळायला– कळवायला, आनांना ?
...हे लिहायला घेण्याचा, लिहिण्यातला, माझ्या तरी हाच हेतू आहे.
आना, हे सारं आपल्याला पटेल की नाही, सांगवत नाही मला. तुम्हांला ते आवडेल असं मात्र म्हणता येत नाही... पण माझा इलाज नाही.
आपल्याला न पटण्यासारखं, न आवडणारं, ऐकता-वाचताना, अगदी साहजिकच माणसाच्या संतापाचा पारा चढत चढत जातो. पण मग आपणच मला लहानपणी शिकवलं आहे, की "अशा वेळी आधी दहा अंक मोज," तेव्हा या वेळीच आपण ते तत्त्व विसरणार नाही ना ?

*

किती भयंकर आहे... खरी माणुसकीची तत्त्वं सोडून, मूळ मुद्दा सोडून अप्रस्तुत, असंबद्ध अशा नीच साधनांचा उपयोग करणारा पाशवी संगर राष्ट्राराष्ट्रांमध्ये दर पिढीला होत असलेला दिसतो. अगदी याच क्षणी, तो तसा चालू आहे!– तो तसा चालू असतानाही प्रत्येक बाजू सूर्यप्रकाशाची–सत्याची, अशा समर्थनाच्या वक्तव्याची आकाशवाणी करताना आढळते.
तर मग इथं तर प्रत्यक्ष, प्रामाणिक, जिवंत, निष्ठापूर्ण, अशा प्रखर भावनांनी, स्वतःलाच साधन बनवलंय नि त्यांना समोरच्या भावनांशी लढाई करायची आहे!
तेव्हा स्वतःच्या भावनांशी सुसंबद्ध अशा सत्याच्या सर्वव्यापी भावनेचा अभिनिवेश या समर्थनात्मक आविष्कारात ठायी ठायी आल्यावाचून कसा राहणार?...
स्वसमर्थनात जोष व परखंडनात निष्ठुरता, हे अगदी नैसर्गिकच!– आजपर्यंत तुमच्या हातूनही माझ्या बाबतीत हेच अनेकदा घडलं आहे. तसं तुमच्या प्रत्यक्ष आचरणातही दिसलं आहे.
तेव्हा, या वेळी प्रथमच नि एकदाच मला वाटू लागलं आहे की, या जगात... जीवनात, परस्पर–प्रामाणिक भावनांचंही एक तुंबळ युद्ध करायचा माणसाला निश्चय हवाच!– त्या प्रकारचा सोज्वळ संगर प्राणपणाने लढण्यासाठीच आपला हा मानवी जन्म आहे... प्रामाणिक उत्कट भावनांचं मला झालेलं हे आजचं विराट विश्वरूप दर्शनच होय...
पुन्हा मला या क्षणी असं वाटत आहे की... स्वतःला नि इतरांना गाफील ठेवणाऱ्या, हळू हळू पिचवणाऱ्या... धुमसत्या आगीपेक्षा,... तत्काळ काय तो एकच आकांत उभा करून, भोवतालच्या साऱ्यांना जागरूक करणाऱ्या, क्षणभर उंच उफाळून लळलळत राहणाऱ्या आगीच्या जिवंत ज्वाळाच अधिक निरुपद्रवी, अधिक उपकारक असतात.
हृदयातल्या साऱ्या प्रखर भावना भीतीने कोंडून ठेवल्यामुळे, मुळात स्वतःला हृदयच आहे की नाही असा स्वतःबद्दल स्वतःलाच संशय निर्माण करून माणूस वागतो,

त्यापेक्षा त्या असतील तशा यथार्थतेने, योग्य ठिकाणी प्रकटपणे मोकळ्या करून टाकणं नि त्यामुळे अखेर भावनाशून्य, पाषाणहृदयी ठरलेलं देखील एक वेळ बरं! कारण जिथं जिथं निःस्वार्थी नि खरा अनुराग असेल, तिथं तिथंच तीव्र नि विवेकी (क्वचित अविवेकी देखील) राग हा उत्पन्न व्हायचाच! हा उद्रेक कितीही उफाळला तरी अंती, परिणामी, स्निग्ध असाच असायचा!— भीषण पाशवी संगरापेक्षा तो निश्चितच अधिक श्रेष्ठ, अधिक बरा!

आना, याच तीव्र इच्छेने, हेतूने या क्षणी माझा आपल्याशी तसला एक असामान्य भाव-संघर्ष होऊ पाहात आहे! ते आता अगदी अटळ नि माझ्या आटोक्याबाहेरचंच आहे...

*

सारं सारं सुख नि सारे सारे सुखी, असला नाहक दांभिकतेच्या देखाव्यांचा एक डोलारा... तोच आयुष्यभर दाखवीत राहणं मला तरी आता शक्य वाटत नाही. धरणीकंप कधीही वाईटच!... पण मग, धरणीकंप होतच असला तर त्या परिसरामुळे सारेच जमीनदोस्त होईनात का!... एकाच घराचे कानेकोपरे एकात एक गुंतलेले असणारच— मग एक भाग कोसळून पडत असताना, त्या कोसळून पडणाऱ्याची इच्छाही नसता, त्याच्यामध्ये एकजीव झालेला दुसरा भागही कोसळून पडणारच! आपलेच डोळे मिटून, ते घडणारं का थांबणार असतं? टळणार का असतं?... त्याबद्दलचं दुःख साहजिकच व तीव्र असलं, तरी ते तितकंच अपरिहार्यही असतं! म्हणूनच मी हे आज लिहायचं ठरवलं आहे—

आजवर कठोरपणे दडपलेल्या प्रखर भावनांना जाणूनबुजून वाव द्यायचा, त्याचं रेचन, त्याचं शुद्धीकरण, नि अंती त्याचं दैवीकरण करायचं, तसं होत असलं तर पाहायचं! आपल्याला हे पटो न पटो, हाच माझा एकमेव हेतू आहे—

*

आना! स्वतःवरचा दावा स्वतःपुढेच चालला असताना, संयमी सहानुभूतीने सारं नीट ऐकून, त्यावर साकल्याने विचार करणारा नि अखेर निर्विकार निष्ठुरतेने न्यायी निर्णयही देणारा एखादा न्यायाधीश तुम्ही कधी जगात पाहिला आहे का?... पाहिला असला तर, तशीच काहीशी भूमिका नि दृष्टी हे सारं वाचताना तुमच्या हृदयात नि डोळ्यांत स्थिर राहायला हवी आहे!

जिवंत माणसांच्यापेक्षा मेलेल्यांची पत्रंच आपण अधिक सहानुभूतीने नि समजूतदारपणाने वाचतो, नाही का? तर मग क्षणभर तसंच कल्पून, माझ्या पश्चातच हे सर्व आपल्या हाती येत आहे असं समजून, तुम्ही हे वाचायला हवं आहे.

तसं सारं यशस्वीपणे घडलं, तर असल्या भावनात्मक संगराने दोन्ही बाजूंनाच अजूनही

सुयश येईल !– तशा स्थितीत, अशा पत्राला उत्तर…खरं नि एकमेव उत्तर…म्हणजे एकच !… हेच की, या पुढील आयुष्यात प्रत्यक्ष परस्पर–वागणुकीतच घडेल तो बदल— त्यातून दिसून येतील त्या हितावह विधायक सुधारणाच !— ते प्रत्यक्षात घडलं तर— आनंदच…

पण…पण…हे सारं लिहीत असताना, मी तीही वेडी आशा-अपेक्षा उरात ठेवीत नाही… मी हे एक माझं कर्तव्य तेवढंच करीत आहे—

*

जगातली रीतच न्यारी—गंमतच आहे पाहा

‘ ब्रह्म हेच सत्य, बाकी जग– दृश्य जग– ते मिथ्या ’ असं ठरवणारे विचारी वेदान्ती ! त्यांच्याही डोक्यावर आपलं बॉम्बचं ओझं मनसोक्त टाकायला अगदी या क्षणी एखादं विमान आकाशात घिरट्या घालतंय. नंग्या स्वार्थासाठी चाललेली, रक्ताने रंगलेली— माखलेली, शास्त्रशुद्ध विध्वंसनाची ही राख ओकणारी रणधुमाळी…त्या वेदान्त्यांनाही नित्य मरावं लागत आहे. लहानमोठी सुखस्वप्नं, आशा मागे ठेवून, केवळ नाइलाजानेच मिथ्या जगाला सोडून जावं लागत आहे.

मोठ्या खटाटोपानेच निवडून काढलेल्या, समाजातल्या लाखो आदर्श तरुणांचे स्वतः मानवच इथं मिनिटामिनिटाला हसत खदखदत क्रूर बळी घेत आहे. त्याच भेसूर, गढूळ शोणित–नद्यांचेच आपल्या सभोवती चौफेर वळसे घडलेले आहेत. माणूस नावाचं बेट रक्ताच्या महापुरामधे पार ठार बुडून जाण्याच्या बेतातच आहे—

अशा या आजच्या धुमश्चक्रीच्या जगातच, केवळ एका चिमण्या बाळाच्या अकस्मात वियोगाने व्यथित झालेला, गरिबाऊ मध्यम जीवन कसंबसं जगत असलेला एखादा सामान्य मानव !– नि त्याच्या त्या उत्कट हृद्भावना !…

आपल्यालाच काय, कोणालाही त्या कस्पटासमान, हास्यास्पद वाटाव्यात, भासाव्यात, यात नवल नाही—मुळीच !

*

पण यावरून, या क्षणी, दुसरेही विचार माझ्या मनात गर्दी गर्दी करतात !

अधिकाधिक जड सुखाच्या, क्षणभंगूर, मोहजालात्मक, दुर्दम्य आशा–आकांक्षाच आज मानवी मनाला पार पार ग्रासून टाकीत आहेत !– मर्यादित पण प्रत्यक्ष नि आवश्यक जड सुखांकडे त्याची सदैव डोळेझाक होऊन तो त्यांना पाठमोरा होत आहे. नि हावरा होऊन अज्ञात जड सुखाच्या प्राप्तीमागे लागला आहे. त्यामुळेच, स्वतःच निर्माण केलेल्या दुःखाच्या आसवांबरोबर तो प्रयासाने कसाबसा घास ढकलत आहे. स्वतः प्रकाशाला पाठमोरा होऊन अंधारात चाचपडत आहे. आपल्याच काळ्याकभिन्न सावलीमधे ठेचकाळत आहे. आपले हातपाय स्वतःच निर्मिलेल्या खाचखळग्यांमधे

मोडून घेत आहे. आपलं नि आपल्याबरोबरच आपल्या भोवतालच्याही इतरांचं जिणं तो कसंबसं ढकलत पुढे नेत चालला आहे. किंबहुना, आपल्याच हातांनी तो ते नष्टही करून टाकीत आहे!

असली ही त्याची अगतिक शोणित-प्रवाह-पतितता...त्यातच एखाद्या दिवशी, स्वतःची इच्छाही नसताना त्याच्या दारी, अकस्मात, साक्षात मृत्यू...दत्त म्हणून उभा राहतो. मग मात्र तो भांबावतो; अधिकच हतबल, गलितगात्र होऊन जातो.

दलित गरिबाची झोपडी, पांढरपेशाचं दोन खणी खुराडेवजा घरकुल, लाख्या सावकाराची ऐषआरामी हवेली, राजा-महाराजांचे नि हिटलरी मुत्सद्द्यांचे वावरायचे-राहायचे महाल-राजवाडे, प्रत्येक ठिकाणी मानवी मनात, मानवी संसारात एकच एक करुण-सूत्र या क्षणी आज अनुस्यूत दिसतं!- मृत्यू! रासरांगोळी!

*

तरी पण, जीवन चालू असेपर्यंत, आपला व आपल्या परिसरातील अनुभवसृष्टीतला मृत्यू...विसरणं, नि उलट आपल्या बोलण्या-चालण्या वागण्यातून इतरांसाठी लहानमोठ्या मृत्युयातना निर्माण करणं, हेही मानवाचं कार्य अव्याहत चालूच आहे. त्यात खंड नाही; त्यात गरीब-श्रीमंत, तरुण-वृद्ध, सुशिक्षित-अशिक्षित, सत्ताधीश-अंकित, हा कसलाच भेद नाही!

असं एवढं हे आहे, तरी...आपला किंवा आपल्या परिसरातल्या कोणाचा प्रत्यक्ष मृत्यू...त्याची दाट छाया— ती एकच एक भयाण कल्पना मात्र माणसाला क्षणार्धात विचारीही बनवते. आपल्या आयुष्याचं त्याला सिंहावलोकन करायलाच लावते! अशा वेळी आपल्या जीवनाचा, आपल्या सर्व जीवित हेतूंचा सर्वांगीण व त्रयस्थ-तटस्थ आढावा तो मोठ्या धीराने घेऊ शकतो, घेत बसतो.

स्वतःच्या मृत्यूच्या अशुभ, असह्य वाटणाऱ्या कल्पनेतूनच हे सारं शुभ घडू लागतं, घडू शकतं, खरंच! खऱ्या मानवी जीवनमंदिराचा मृत्यू हाच एक चकाकणारा अमोल सुवर्णकळस आहे!!

एवढ्याचसाठी मला तरी वाटतं, अव्याहत विविध गडबड-घाईने नि तीव्र कलहाने भरलेल्या या आपल्या आयुष्यात — एकदा नव्हे, दोनदा नव्हे, अनेकदा—स्वतः आपल्याच मृत्यूची अशुभ वाटणारी ती कल्पना, प्रत्येकाने केली पाहिजे!...त्या वेळी, आपल्या तोपर्यंतच्या आयुष्याचा, 'अखेरचा' म्हणून त्यानेच निःस्पृह आढावा घेणं; भावी आयुष्यासाठी, पुढल्या वाटचालीसाठी नवा धडा मिळवणं; आपल्या एकाच आयुष्यात असे आपले अनेक मृत्यू नि अनेक नवे जन्म जगणं, हे त्याला नि त्याच्यासकट साऱ्या समाजालाच हितावह ठरेल. साऱ्या मानवजातीलाच ते प्रगतिपथाला नेईल. शाब्दिक "मिथ्या जग" आपोआप विरून जाईल! नि सारंच खरंखुरं समूर्त, साकार 'ब्रह्मसत्य'च होऊन जाईल!!

*

हो, पराग गेला! जसा तो अदृश्य पावलांनी आत शिरला अशाच अगम्य पावलांनी आमच्या आयुष्याबाहेर उडून गेला. मधली ती साडेतीन वर्षं आमची जागरूक दक्षता, सहिष्णू सहानुभूती, हळुवार वात्सल्य, सारं सारं त्याच्या जोपासनेतच मग्न होतं. त्याचं व्यक्तित्व आमच्या छायेत भरदार वाढावं, ही आमची कांक्षा–इच्छा–खात्रीच होती... पण, निष्ठुर योगायोग!...ते सारंच त्याच्यासकट धुळीला मिळालं...

त्या अजस्र धक्क्याने माझ्याही साऱ्या आयुष्याचं मी गंभीर सिंहावलोकन करू लागलो. पराग चिमणा तर मी प्रौढ. तो प्रौढ झाला असता तेव्हा मी?—त्या वेळी तो माझ्याशी कसा वागला असता? मी त्याच्याशी कसा वागलो असतो? व्यर्थ, निरर्थक कल्पनाचित्रंच! पण मनात ती कल्पना डोकावून गेलीच. नि मग एकदम जाणीव झाली– माझा परागसारखा अकालमृत्यू झाला नाही... म्हणूनच मी प्रौढ झालो आहे... माझ्या बाळपणी, माझ्या पित्याने माझ्याबद्दलची केलेली कल्पनाचित्रं कितपत समूर्त झाली आहेत, असं आजच्या सत्तरीच्या आनांना वाटत असेल?

मला दुःखद जाणीव झाली... माझ्या व्यक्तित्वामुळे आनांना नि आनांच्या व्यक्तित्वामुळे मला, सतत असं खरंखुरं सुख आजवर कधीच लाभलं नाही! परागचंही कशावरून तसंच झालं नसतं?

केवळ या योगायोगानेच वाटतेय ही हुरहूर!— प्रत्यक्ष नियती फार कठोर,... ती व्यक्तिव्यक्तींवर आपली अनिर्बंध अधिसत्ताच अधिक गाजवते नेहमी. मला सारखं वाटू लागलं— आपण मानव म्हणजे अगम्य परिस्थितीच्या हातची दुबळी बाहुली तर नव्हेत?

*

माझ्याच आयुष्यातील 'पिता'–'पुत्र' या दोन्ही भूमिकांचा एक समन्वय करून, मी तसं सिंहावलोकन करीत असतानाच, तो मनाचा खेळ मधेच उधळून गेला. नवीनच विचारमालिका तरळली, तीच घोडदौड करू लागली—

सत्तरीचे आना निरवानिरवीसाठी मृत्युपत्रात्मक टिपणं करताहेत— अपुऱ्या कर्तृत्वाकडे नि भावी यशाकडे आशेने पाहणं माझ्या प्रौढत्वाचं चालूच आहे— मृत्यूपूर्वी केवळ छत्तीस तास, केवळ खाणं–पिणं–खेळणं यात पराग गुंग होता...! का? हे सारं असं का?

साहजिकच होतं ते!...आनांच्या आयुर्मर्यादेला उतार लागला, माझा पुरा चढ मी चढलेलो नाही, अजूनही कर्तृत्वाला नवी दूरची क्षितिजं दिसताहेत. परागचं मुळात शरीरातही वाढायचं संपलेलं नव्हतं. तरी पण, प्रत्येकाच्या बाबतीतल्या या नैसर्गिक अपेक्षांना परागच्या अकस्मात मृत्यूने एक चमत्कारिकच, भयंकरच ठोकर दिली का? आधी आना—आनांमागून मी— माझ्यानंतर पराग—या पिढ्यांचा नैसर्गिक क्रम! पण शक्तिमान मृत्यूला त्याची काय कदर?...केवळ लहर म्हणून, त्याने उलट्या क्रमानेच

तर आम्हांला ग्रासायचं ठरवलेलं नसेल ना ? !
---आणि मग---आनांच्या आधीच मी परागसारखा एकाएकी निघून जाणार नसेन कशावरून ? तसं झालं तर आनांचं ते दुःख केवढं भयंकर असेल, मला परागमुळे झालं त्या मानाने !
नि मग विचार आला, मृत्यूची थोडी जरी आगाऊ सूचना, कल्पना असेल, तर प्रत्येक जण आपलं अखेरचं असं काही तरी खासच सांगेल-करील !...वैभवसंपन्न आनांना आपल्या मृत्यूच्या समीपतेची नैसर्गिक आशंका आहे. म्हणूनच ते मृत्युपत्र लिहिताहेत. पण मी ? आज तरी अकिंचन, अधर्कर्तृत्वात घुटमळणारा, ठेचकळणारा---मी काय सांगणार, करणार, देणार ?
मग त्या वैफल्याचंही मनात हसून येऊन मला वाटलं...का ? का म्हणून ?...जडवैभव तेवढंच देण्यासारखं असतं ?...ते का म्हणून ? माझ्यापाशी कोंदाटून पडलेलं जे भावनावैभव आहे, ते तरी 'अखेरचं' म्हणून का देऊन टाकू नये या क्षणी ?
ती कल्पना मला पटली, कारण सर्व भाव अभिव्यक्त करण्याची ताकदही अजून न आलेल्या परागला देखील 'अखेरचं' असं काही तरी सांगायचं होतं. त्याच्या जीवनातले ते अखेरचे एक-दोन बोलके प्रसंग मला फिरफिरून भंडावून सोडू लागले---

*

पराग रविवार ते मंगळवार तापाने फणफणला. परीक्षक डॉक्टरांना प्रथम कसली चिंता नव्हती. पण सोमवारी रात्री त्याने मला आर्त स्वराने हाक मारली, माझ्या नाकावर नाक घासलं, नि अखेर आपल्या परीने मला त्याने सांगितलं, "भय्या, इथ्थं...इथ्थं माझं डोकं दुखतंय ! आवळा ना जोराने, बरं वाटेल मला. कसं बरं होईल हो ते आता ?"
जणू आपल्या तुटपुंज्या भाषा-भांडवलावर पराग मला इषारा देत होता--"संभाळा हं, भय्या ! या डॉक्टर लोकांचा काही भरवसा नाही बघा...त्यांना काही कळत नाही. ते नुसते हे खेळ करताहेत. तुम्ही आपले उठा ! कसं समजत नाही हो तुम्हांला अगदीच !...माझ्या मेंदूला ना, भयंकर रोग झालाय...आत्ताच्या आत्ता मला आपले मुंबईला घेऊन चला पाहू !...नाही तर पाहा हो, परवा आपण...दोघांनी पाणेऱ्यापाशी पाहिली ना, त्या चिमणीसारखाच उद्यापरवा मी आपला..."
तसला जणू इषारा देऊनही, आणखी एक दिवसभर चाललेल्या आमच्या नि डॉक्टरांच्या गाफील खेळखंडोबाला तो अखेर कंटाळला, अगतिक झाला, नि त्यानंतर पंधरावीस तासांतच त्याने "भय्याऽ" म्हणून पुन्हा एक किंकाळी फोडली. आपल्या अत्यंत गोड, बोलक्या, भावपूर्ण डोळ्यांची अखेरच्या आकांताची चाळवाचाळव केली, नि "यांना कोणाला नीट काही कळत नाही, तर आपण बोलाच कशाला उगीच---" अशा रुसव्यानेच जणू तोंड कायमचं बंद केलं. त्याची दातखिळी बसली. तो बेशुद्धच झाला.

मग त्यानंतरची ती सारी धावाधाव नि मुंबईचे डॉक्टर! त्यांचे ते लंफर-पुंफरं नि इन्जक्शनं यांचे विविध धावते प्रयोग!...पुढल्या अवघ्या दहाबारा तासांत पराग अबोलपणाच्या रुसव्यानेच अखेर आम्हांला कायमचा सोडून गेला. आपल्या असामान्य मेंदूनेच आम्हांला मोहवून टाकणारा तो चिमुरडा!...त्याला मेंदू होता. म्हणूनच "ब्रेन इन्फ्लेमेशन"- "सेरेब्रल मलेरिआ" अशा मोठ्याथोरल्या डॉक्टरी नावांचं- मृत्युपश्चातचं सर्टिफिकेट घेऊन, त्या निरर्थक लेबलासहच आम्हांला तो सोडून गेला!

*

परागसारख्या चिमुकल्या चिमण्यानेदेखील, त्याला थोडा अवसर मिळाला असता तर जाण्यापूर्वी मृत्युपत्रात्मक काहीतरी 'अखेरचं' मला खासच सांगितलं असतं. पण ना त्याच्याकडे धन, ना ज्ञान, ना विविध अनुभवांचं भांडार!—त्यामुळेच त्याचं अंतिम वक्तव्य मुग्ध-अप्रकटच राहिलं...

माझ्याकडे मात्र त्यातल्या कित्येक गोष्टी आज आहेत. मी त्याच्यासारखाच सापेक्ष अकिंचन असेन. पण मी अजून जिवंत आहे. मला अवसर आहे. मी काही न सांगताच आनांना सोडून जाऊन उपयोगी नाही. माझ्यासारखी आनांना चुटपुट लावून उपयोगी नाही. तसाच गेलो तर आनांना होईल ते दुःख भयंकर असह्यच असेल. माझं मन मला ओरडून सांगू लागलं— "आता उद्याची वाट पाहू नकोस. बोलावंसं वाटतंय ते आज, अगदी या क्षणीच बोलून घे!... बोलता येत असूनही, आयुष्यभर धुमसत राहू नकोस—"

म्हणूनच आता मला वाटतंय, जिवंत माणसांनी उघड्या हृदयाने वागताना इतर जिवंत माणसांना, त्यांच्या भावनांना एक वेळ दुखावलेलंही अधिक बरं... जिवंत व्यक्तित्वं जिवंत व्यक्तित्वांना क्रिया-प्रतिक्रियांनी दुखावणारच. आना खूप वैभवसंपन्न असतील, मी पुरा अकिंचन असेनही. तरी पण, माझ्या विशिष्ट व्यक्तित्व-धनाचा नि माझ्या प्रांजल उत्कट भावना-वैभवाचा, त्यांच्यासमोर जाण्यापूर्वी, मला खासच एक हिशेब करता येईल. असलं हे 'अखेरचं' वक्तव्य! ते आनांच्या हाती आजच सुपूर्त करूनही, पुढे स्वतः जगण्याची इच्छा ठेवणं, नव्या खुल्या दिलाने, नवआयुष्य नव्या उत्साहाने पुढेही जगत राहणं, हेदेखील मला शक्य, अगदी पूर्ण शक्य आहे! आनांसाठी केवळ भावना-धन ठेवल्याने मी त्यांच्यापेक्षा कोणत्याही दृष्टीने खासच कमी दर्जाचा ठरणार नाही—

याच एका दृष्टीने, मनोभूमिकेने, तसल्याच एकमेव हेतूने, पुढचे तीनचार दिवस, रोज एकेक पत्र लिहायला घ्यायचं मी आज ठरवलेलं आहे.

आशीर्वाद असावा—

तुमचा पुत्रशोकात बुडालेला
**सदानंद**

# मंगल जागृती

"हे काय बाई?...केव्हा आलात घरी? नि तिथं करताहा काय टेबलाजवळ अजून? वाजले किती?"

दोन्ही पत्रं वाचून, सदानंद आपल्याच क्षणिक तंद्रीत बसला होता.

काही न बोलताच, दचकून त्याने मागे वळून पाहिलं.

एकाएकी जाग आल्यामुळे, पटकन पलंगावरुन खाली पाय टाकून मंगला उभी राहिली होती. पदर झटकन सावरुन, प्रथम तिने उशाजवळच्या पाळण्यात डोकावून पाहिलं. चिमणा अनंत स्वस्थ झोपलेला होता.

पदराने आपला झोपाळलेला चेहरा संथपणे पुसत पुसत, ती सदानंदच्या खुर्चीपाठी येऊन उभी राहिली. नि त्याच्या खांद्यावर हळुवारपणे हात ठेवून, तिने त्याला सस्मितपणे विचारले, "गेला आठवडा छापखान्यात जाग्रणं करीत बसला नि आज हे इथं घरीही असंच! विश्रांती नव्हती का घ्यायची?"

"मग?...अग, ही मी विश्रांतीच घेतोय की मंगल!" सदानंद गंभीर हसून तिचा हात थोपटत म्हणाला– "ये, बस इथं जवळ. आज कित्येक महाभागांना मी भेटतोय पुन्हा! गोड जीवही मला भेटताहेत पुनःपुन्हा!... सर्वांना जोडणारा मधला दुवा–मी! आमचे आबा–आना पराग—"

✲

परागचं नाव निघताच मंगल एकदम चमकल्यासारखी झाली. काही न बोलताच आपला दुसरा हात पुढे करुन तिने त्याच्या मानेभोवती ओढला. हाती असलेला त्याचा हात आपल्या रसरशीत हाताने हळूच दाबला—

सदानंदने तिला आपल्या खुर्चीच्या हातावर बसवलं नि मुकाट्यानेच तिच्याकडे तो पाहत राहिला. त्याच्याकडे लागलेल्या तिच्या डोळ्यांमधे लाख भावना तरळून–तरंगून जात होत्या.

आपल्या हाती असलेला मंगलचा तो मृदू हात तसाच घट्ट दाबून धरीत मग सदानंद हळूच म्हणाला, "आज माझा आनंदाचा दिवस आहे, मंगल. माझं मन खूप खूप खूप सुखावलं आहे. त्या साऱ्या साऱ्यांना माझ्या सुखात भागीदारी करायला नि माझ्या कामात फिरुन एकदा त्यांचा आशीर्वाद मागून घ्यायला म्हणून, त्यांना मी आवाहन केलंय! ते आले आहेत... मंगल, ते सारे सारे इथं आले आहेत!— आणि त्यांच्याच संगतीत मी हा इतका वेळ आनंदात बसलो आहे. आता जागी झालीच आहेस तू, तर ये– तूही या संमेलनात सामील हो..."

✲

मंगल न बोलताच, गंभीर सौम्य-सोज्वल हसली.

" तुला आठवतं, मंगल– " तेवढ्यात स्नेहपूर्ण दृष्टीने मंगलकडे पाहात सदानंद म्हणाला, " परागनंतर मी आनांना रोज एक एक पत्र वेड्यासारखं लिहीत बसलो होतो. मग ती सारी कठोर मनाने एकाच वेळी मी पाठवलीही होती. त्यांचं लांबलचक आलेलं ते उत्तर— गुळमुळीत, एकतर्फी, अहंगंडीच वाटलं ते मला... "

" त्याबरोबर त्यांनी आपला एक जीवनवृत्तांत—" मंगलला आठवलं.

तो पुढे म्हणाला, " हो, तेच ते त्यांचं ते आपल्या आयुष्यातलं अमृत !- आपल्याच हाताने गोळा करून, त्यांनी माझ्याकडे पाठवलं होतं त्या वेळी ! हे पाहिलंस ? तेच आता वाचणार होतो मी– " सदानंदाने तांबड्या पुठ्याच्या दोन वह्यांतली एक उचलून म्हटलं, " वाचू मोठ्याने ! ऐक— ऐक--- ! आनांच्या जीवनातलं ते अमृत तुझ्या-माझ्याही हृदयात थोडा वेळ भरू दे— ते सुख जोडीने भोगू या आपण— "

आपल्या शेजारीच खुर्चीवर मंगल बसलेली दिसताच, सदानंदने वाचायला सुरवात केली—

# तीन

## यशाची घोडदौड

माझे वडील वारले, तेव्हा मी बी. ए. च्या वर्गात होतो. त्या अकस्मात घटनेने प्रथम आम्ही सारीच सुन्न झालो. आई तर महिनाभर वेडीपिशीच झाली.

आबांचा संसार-व्याप म्हणजे एक एकखांबी तंबू!... तेच एकटे घरचे कर्ते पुरुष! आता तो खांबच असा कोलमडून पडताच, आमचं सारं छत्रच क्षणार्धात सपाट झाल्यासारखं झालं! नि उलट, त्या विस्तारा-भारानेच आम्ही आतल्याआत अगदी गुद-मरून गेलो.

समोर रंगभूमी सजलेली आहे, नट रंगून-सजून कलासाधना करीत आहेत, तोच अकस्मात विजेचा फ्यूज उडावा नि सभोवार सर्वत्र रंगाचा बेरंग करणारा काळोख व्हावा!— तसंच एकूण ते झालं होतं. कारण एकट्या आबांच्या विद्युत् झपाट्यानेच केवळ— आमच्या घरी आजवर सारा प्रकाश पडत होता.

त्यांनी करारानं हाती घेतलेली कित्येक कामं अर्धीअधिक पुरी झाली होती. कित्ये-कांना नुकतीच सुरुवात झाली होती. तर कित्येक नुसते व्यवहारच ठरले होते. त्यामुळे मी तर खूपच गांगरलो. आई हवालदिल झाली. सदू केवळ आम्हां वडील मंडळीच्या निर्णयाकडे पाहत होता. असे आमच्यासमोर अक्षरशः काजवेच चमकत होते त्या वेळी. धंदा बंद व्हायला वेळ लागला नसता.

तथापि आबांनी आपले कामगार, कारागीर, केवळ पैशानेच नव्हे, प्रेमाने, दिल-जमाईने जोडले होते. म्हणूनच, ते स्वतःच सगळे एके दिवशी आईकडे नि माझ्याकडे येऊन म्हणाले, "आईसाहेब! अशी आता मधेच हिंमत नाही सोडायची! आम्ही आहोत की सारे पाठीशी! काळजी कशाची? आबाजी शेटनी आम्हांला एक पक्की 'लाईन' ठरवून दिली. तुमी सवता धीर धरा, बास्! संग आमी बी, सवता शेट असल्यागतच सारं काही पार पाडून दावतो, बगत र्‍हा!"

आमचा सदाशिव थोडा मंद, कमी शिकलेला, एकूण संथ वृत्तीचा! तरी फार आस्थे-वाईक नि कामसू. आबांच्या बरोबरच कामं उरकायला आधीपासून तो शिकत आला

होता. त्यातच आता धाकल्याही आला होता. नव्यानेच, अगदी घरचा म्हणून लागला होता.

अखेर, अशा साऱ्या नव्या बनावाने नि साऱ्यांनीच मोकळेपणे दिलेल्या धीराने आईही सद्गदित झाली नि म्हणाली, "ठीक तर! गेले त्यांनीही आपल्याला हेच शिकवलंय— कधी डगमगायचं म्हणून नाही. चला— लागा कामाला. तसं यातलं मला बाबांनो काही कळत नाही हो. तरीही मी कामाच्या जागी कधीमधी येईन! हा आना आता इथंच असेल, तेव्हा तोही कामामधलं समजून घेत जाईल — तुमच्याचकडून. सदू तर आहेच तुमच्यात आधीपासून! मधेच हातपाय गाळून आपलं निभणार आहे कसं? तसल्या कच खाण्याचाही नाही का राग येणार त्यांना? एवढं सारं ते करूनसवरून गेलेले असल्यावर?"

आणि मग सदाशिव, धाकल्या, आमचे दोघे मुकादम, गवंडी-सुतार-कामगार— साऱ्यांनीच योजनांची नि श्रमांची दैनंदिन कमाल चालवली. आठवड्याच्या आत सारं काही जिथल्या तिथं, पूर्ववत सुरळीत सुरू झालं. कामाची एकसंध घडी बसत गेली. तेव्हा मात्र आई अतिशय आनंदली, मलाही खूपच धीर आला.

*

इतकं असूनही माझ्या मनात मात्र त्या वेळी एक निराळीच रस्सीखेच सुरू झाली होती. जात्याच मला शिक्षण-वाचनाची आवड, त्या वेळी तर मी अगदी बी. ए.मध्ये... परीक्षाच तेवढी व्हायची उरलेली! तेव्हा दगड-माती, विटा-चुना, सिमेंट-लोखंड, लाकूड-फरशी या ढिगाऱ्यामध्ये, मोजणी-मापणीत नि आकडेमोडीत माझं मन एकदम कसं लागावं-रुजावं? थेट येथवरपर्यंत नेटाने शिकत आल्यावर हातची पदवी गमावणं म्हणजे मला तरी केवळ अशक्य, आत्मघातकी, अविचारी वेडेपण वाटत होतं.

मी खूप शिकावं असं आबांनाही नव्हतं का वाटत? ते असते तर त्याबाबतचा कसलाच प्रश्न नव्हता. पण आता? ते सारंच रम्य चित्र क्षणार्धात पार पालटलं होतं! मात्र मनातलं हे सारं आईकडे नुसतं उघड बोलणंही मला अवघड वाटत होतं, कारण सारी नोकर मंडळी, घरातली सारी दुय्यम माणसं चंग बांधून कामाला लागलेली. अशा वेळी मी — आबांपश्चात्‌चा कुटुंबप्रमुख, आधारस्तंभ!— स्वतः त्यानेच असं आपल्या-पुरतं स्वार्थी विचाराने वागावं?

पण ऐन वेळी माझ्या यशोदेने— माझ्या पत्नीने— माझी त्यातून परस्परच सोडवणूक केली. आईच्या तर ती फार मर्जीतली. एक वेळ माझा नाही, पण यशोदेचा शब्द आई वरच्यावर झेलणार, हे ठरल्यासारखंच होतं.

तसली सारी माझ्या मनातली तळमळ-मळमळ ओळखून, तिनेच अखेर एके दिवशी आईकडे माझी वकिली केली— "सासूबाई, आता थोडक्यासाठी परीक्षा सोडणं नि यांनी हातची पदवी घालवणं योग्य का? घरच्या अडचणी काय, आता नेहमीच

असायच्या. आले दिवस कसेही निघून जातात. आपले सदूभावजी, धाकल्या दादा आहेत, दोघेतिघे ते अनुभवी मुकादमही आहेत! मग यांना ह्या परीक्षेची द्यावी की तेवढी मोकळीक, मी म्हणते—"

नि तत्काळ यक्षिणीची कांडी फिरल्यासारखं झालं. प्रथम स्वतः आईने नि तिच्या पाठून मग साऱ्यांनीच माझ्या त्या बेताला मोठ्या आनंदाने परवानगी दिली. त्या वेळी, त्या आनंदामुळे, आत आत- मनात मला वाटत होतं, "मी पदवी मिळवेन. हा धंदा हे सारे संभाळून धरतील. तो कारभार सर्व माझ्याशिवाय नीट चालत राहिला तर माझा पुढला अभ्यास, माझा विद्याव्यासंगही, तसाच पुढे चालत राहील. हाच, हाच माझ्या आयुष्यातला खरा परिवर्तनबिंदू आहे! तो मला सुलभपणे प्राप्त करून देण्याचं हे नाजूक काम माझी यशोदाच करीत आहे!"

कोणालाही न दुखवता ते सारं सहजगत्या घडवून आणायला कारण झालेल्या माझ्या पत्नीचा मला त्या वेळी फार फार अभिमान वाटला. मुंबईला परीक्षेला निघून जाताना किती प्रेमाने मी तिचा निरोप घेतला!

योगायोग तरी असा, की मुंबईला जायच्या दिवशीच, मागे घेतलेल्या आमच्या फोटोंच्या प्रती आबांच्या फोटोग्राफर स्नेह्याने माझ्या हाती आणून दिल्या. तेव्हा वाटलं, त्या फोटोच्या रूपाने प्रत्यक्ष आबाच माझ्या ऐन परीक्षेच्या वेळी मला आशीर्वाद द्यायला समक्ष आले आहेत. त्यामुळेच, अतिशय उत्साहित अंतःकरणानेच 'आबां'ना माझ्याबरोबर घेऊनच मी मुंबईला परीक्षेसाठी निघून गेलो.

*

अभ्यास चांगला झाला, ते परीक्षेमधले माझे पेपरही फार उत्तम गेले. असं सगळं ठीक झाल्यानंतरही काही दिवस, माझ्या मित्रांबरोबर गप्पागोष्टींत रेंगाळत मी मुंबईतच होतो.

इतक्यात आईचा निरोप घेऊन सदूच स्वतः घाईघाईने आला. जणू माझ्यावर तिचं पकडवॉरंटच सुटलं होतं!

तसाच घरी परतलो. दुपारी आईने आबांची व्यवहाराची सारी कागदपत्रं माझ्यापुढे टाकली, नि ती म्हणाली, "बघ हे आबी सारं! कोण कोण तर पुन्हा पुन्हा येताहेत नि तुला समक्षच भेटायला बघताहेत!"

दिवसभर चंग बांधूनच मी ती सारी टिपणं नि कागदपत्रं नीट पाहिली. अखेर मला नकळतच, माझा चेहरा खर्रकन उतरला!

आमचं राहतं घर लहानसंच होतं. आबांनीच वेळोवेळी कॉंट्रॅक्ट कामांमधून उरलेल्या मालमसाल्यातून ते चार वर्षांपूर्वी बांधलं होतं. त्याभोवती तीन लहान लहान जुनाट चाळी होत्या. त्यांनाच जोडून दीडदोन एकर भरेल इतकी मोकळी शेत-बागाईत जमीन पसरली होती. हीच आमची सारी कुटुंबीय इस्टेट! गावाच्या ऐन

मध्यापासून ती चांगली दीड-दोन मैल दूर होती. दुसऱ्या एका व्यवहारावेळी केवळ सवलतीने सातआठ हजारांत मिळाली, म्हणून आबांनी ती घेऊन टाकली होती. लहान-सहान भाड्यांच्या त्या चाळींमधून थोडेफार मासिक उत्पन्नही आमच्या कुटुंब-खर्चाला आता मिळू लागलं होतं...

दिसायला तर ते सारं बाहेरून अगदी ठीकठाक होतं. आपल्या त्या नव्या कॉंट्रॅक्ट-धंद्याच्या केवळ तपाभराच्याच काळात, आबांऐवजी दुसरा कोणी असता, तरी याहून अधिक ते काय करू शकणार होता ? किंबहुना, आबांनी आपला सारा गेलेला व्यवहार-तोल फिरून सावरूनच हे सारं केलं होतं, तेच फार फार मोठं होतं !

*

पण मग, त्या इस्टेटीबरोबरच्याच, आबांच्या त्या देण्या-घेण्याच्या हिशेबटिपणांनी मात्र मला खरीखुरी घेरी आली— मी अतिशयच अस्वस्थ झालो.

आबांबद्दल खूप विश्वास वाटणारी अनेक माणसं याच काळात हळूहळू गावात तयार झाली होती नि आबांनीही जरुरीप्रमाणे त्यातल्या अनेकांकडून सढळ हाताने रकमांची उचल केली होती. लहानमोठी मुदतीची कर्जं उभी केली होती. त्या साऱ्या रकमेची बेरीज जवळजवळ पंधरा हजारांच्या घरात जात असल्याचं पाहताच, माझं तर हृदय अक्षरशः थरारलं. चुटपूट लागली, रागही आला. ' काय करून ठेवलंत हे तुम्ही, आबा ! '

पण त्याबरोबरच मला एक जाणीवही झाली— आबा गेले, त्या वेळी अचानक जायला ते तयार नव्हते. त्यांच्या आयुष्याचा एकदम नवेच तुकडा पडला म्हणून, नाही तर आपले सारे व्यवहार तसे अर्धवटच राहिले नसते त्यांच्या हातून.

पण आता ? ते पुरे झाले नाहीत तर साराच नाश ! आपल्या आयुष्यभर कामसू धडपड करीतच, प्रगतीची पावलं टाकीत गेलेल्या त्या प्रेमळ, उमद्या, संसारी गृहस्थाची— आबांची— बेअब्रू होणार ! तर मग मी, सदू— आम्ही त्यांचे मुलगे मागे कशाला उरलो आहो ? या वेळी आम्ही काय करणार ? नुसतं त्यांच्या श्रमांचं लोणी तेवढंच खाणार ? छे ! हवं असो की नको असो, आयत्या पिठावर रेघोट्या ओढण्याचं सुस्त समाधान आता आपल्याला मिळणं अशक्य, हे ठरलेलंच ! अर्थात, आबांचं अर्धवट पडलेलं ते कर्ज नि कार्य पुरं करायची मर्दुमकी, न गांगरता, प्रवाहपतित न होता, आता आपण केलीच पाहिजे !

मोठ्या उत्साहाने त्याच झटक्यात मी आईला एकदम हाक मारून बोलावलं नि म्हणालो, " आता माझं पुढलं शिक्षण नि मनातले इतर सारे बेत इथंच संपले, आई ! उद्यापासूनच आपल्या धंद्याचा सारा चार्ज मी घेतोय ! आपल्याला खूप खूप पैसा कमावलाच पाहिजे आई ! आम्हांला तरणोपायच नाहीय आता दुसरा ! असं बघ आई, आपल्याकडून कर्जरकमाही परत मागायला येणारे हे लोक किती ओशाळेपणे विचारताहेत ? किती समजूतदारपणे नि हळूच सुचवताहेत ? केवढा हा आब होता नि आहे

आपल्या आबांचा! म्हणूनच, लोकांची पै न् पै चुकती केलीच पाहिजे आपल्याला! नि ते सुद्धा शक्य तितक्या लौकर! अगदी अविश्रांत श्रम करून..."

त्या वेळी आईच्या चेहऱ्यावर कारुण्य, खिन्नत्व, अभिमान— सारे सारे भाव चमकत होते. तिच्या पांढऱ्या कपाळावर आबांचा हसतमुख चेहराच दिसला मला.

*

महिन्याभराने मला ऑनर्ससह पदवी मिळाली. तेव्हा कॉलेजमध्ये मला फेलो नेमण्याची भाषा चालली होती. तरी पण ते सारे सोडून, नि एका नव्याच निर्धाराने आबांच्या त्या चालू कॉंट्रॅक्ट-धंद्यात पडलो नि आमच्या प्रिन्सिपॉलना तसं कळवूनही टाकलं.

वास्तविक तेव्हाचा बी. ए. ऑनर्स मी! "या कसल्या रुक्ष धंद्यात जाणूनबुजून पडतोय हा?" असं एक गूढ कोडं प्रिन्सिपॉल-प्रोफेसर्स सर्वांनाच पडावं, यात नवल नव्हतं. निदान सहज हस्तगत होणारी एखादी मोठ्या पगाराची नोकरी तरी मी स्वीकारायला हवी होती, असं माझ्या सर्व कॉलेजमित्रांना वाटलं. पण आपला बूट कुठे चावतो ते आपलं आपल्यालाच नक्की ठाऊक असतं! माझ्या त्या क्षणच्या मनाची ती दुहेरी रस्सीखेच मी त्यांच्यापैकी कोणालाही कशी विशद करून सांगणार होतो?

त्या वेळचे माझे सारे खरे खरे विचार आज मला अगदी स्वप्नवत वाटतात. पण खरं पाहिलं तर उलट त्यानंतर आजपर्यंत जे आयुष्य मी प्रत्यक्षात जगत आलोय तेच प्रत्यक्ष मलाही एखाद्या अफाट, अशक्यप्राय, भेसूर स्वप्नासारखं त्या वेळी वाटलं असतं! खरंच! माणसाच्या आयुष्याला कशी, कधी, कशामधून अकल्पनीय कलाटणी मिळेल, ते कोणाला सांगताच येणार नाही कधी!

कर्ज ही काय चीज असते याची तोपर्यंत मला तरी जरा देखील जाणीव नव्हती. ती परिस्थिती मला कल्पनेतही अगदी लज्जास्पद वाटायची...पण, समोर वाढून आलं होतं ते सारं मी स्वतः केलेलं नसलं, तरी आबांचे दोनतीन धनको त्यांच्या पश्चात हळूहळू फारच कठोर बनत गेले होते. माझ्यासारख्या अननुभवी तरुणाला एकदम नामोहरम करून, त्याची होती ती लहानशी इस्टेट आपल्या रकमेच्या बदल्यात पैसा-पासरीने गिळंकृत करण्याचे त्यांच्यामधल्या त्या धोरणी लोकांचे आडून आडून चौफेर डाव पडू लागले होते. त्यामुळे टेकीला येऊन, सुरवातीला काही दिवस तरी मी गांगरलो— हवालदिलच झालो...

पण अखेर, मनाचा एक मोठा हिय्या केलाच नि त्यांच्यामधल्या प्रत्येक जणाला मी धीर करून समक्षच भेटलो. त्यांना अक्षरशः हात जोडले नि कळवळून सांगितले, "तुमच्या असल्या हातघाईने साराच नाश होईल! जरा सबुरीने घ्या. तुमची सुरक्षितता जरूर पाहा तुम्ही; त्यासाठी आबांऐवजी आता नव्याने आम्हा दोघा भावांच्या बाकी रकमांबाबतच्या नव्या प्रॉमिसरी नोटा लिहून घ्या सध्या. पण कोणत्याही परिस्थितीत तुम्हांला आणखी तीन वर्षे तरी थांबायला हे हवंच! आमच्यावरही थोडा विश्वास ठेवा.

इलाज नाही दुसरा. माझे पाठीराखे व्हा! मला माझा धंदा नीट करायला आधी थोडी उसंत द्या. मग मी तुमची पै न् पै अगदी नऊ टक्के व्याजासह पुरी करतो की नाही हे पाहालच! – मी आबांचा मुलगा आहे."

तेव्हा मग मात्र बहुतेकांनी कसा ना कसा माझ्या शब्दाला मान दिला. नवी कागदपत्रं झाली. मलाही धीर आला. निदान आजचं मरण उद्यावर ढकललं गेलं!

आणि मग सरकारी-बिनसरकारी कामांचा बघबघता मी ढीगच उभा करीत गेलो.

*

खरं पाहता माझ्या मूळ ध्येयांविरुद्ध, मनाविरुद्ध, स्वतःच्या नि माझ्या बायकोच्या इच्छेविरुद्ध, त्या कॉन्ट्रॅक्ट–धंद्यात तसा मी प्रथमच पडलो होतो. तरी हां हां म्हणता त्या घोरणी धंद्यात नि आकडेमोडीत मीही पुढेपुढे पुरा वाकबगार झालो. तज्ञता अनुभवाने येते. थोडी चिकाटी नि बुद्धी असली की जात्यावर बसताच माणसाला हळूहळू योग्य ओव्या सुचल्यावाचून राहत नाहीत! बरी बुद्धी असलेला तरुण कोणत्याही धंद्यात पडला, तरी तो त्यातल्या सगळ्या आवश्यक ज्ञानाची लौकरच हमखास उचल करीत जातो. त्याचं मन, त्याची नेकी, त्याची नीती, त्याला मारता येत नाही. असत्याचा एक नैसर्गिक स्वभाव असतो, तो त्याला अनेकदा मागेही ओढू पाहतो, तरी पण तो लक्षाधीश होणार नसला तरी निदान भिक्षाधीश होण्याचं सुद्धा त्याला कधीच कारण नसतं!

माझंही तेच झालं. लहानसान सरकारी कॉंट्रॅक्टं, रिपेअरी, आऊट हाऊसं, लहान बंगले, पोट-कॉंट्रॅक्टं, रस्ते-दुरुस्ती, असा मजल-दरमजल प्रवास करीत केवळ दोन–अडीच वर्षांत मला तीनचार मोठ्या घरांचीही कॉंट्रॅक्टं मिळाली. घरचे व धंद्याचे सारे खर्च अतिशय काटकसरीने चालवून जी काही जादा शिल्लक हाती राही, त्यातून मी प्रत्येक धनकोचं थोडं ना थोडं मुद्दल नि सारंच्या सारं व्याज हप्त्याने फेडत राहिलो होतो. त्यामुळे त्यांनाही माझ्या व्यवहारांचा नि वर्तनाचा विश्वास वाटू लागला होता.

तथापि, आपली प्रतिष्ठा संभाळून, सारा खर्चवेच खरेदी करून, भेसळ–लबाडी-शिवाय चाललेल्या त्या धंद्यातून मला याहून अधिक काही मिळणं शक्यच नव्हतं. तशातूनही वाटचाल करताना मनाला लाभणारं समाधान म्हणजे डळमळीत, केवळ अपुरं, अर्धवटच असे. कारण अजूनही मागे उरलेली नऊ–दहा हजार रुपयांची कर्जे होती! ती मी एकट्या हाताने कशी फेडणार? ही एकच एक रुखरुख मनाला कुरतडत होतीच!

अशा एकूण संमिश्र मनःस्थितीत मी असतानाच, त्या चालू प्रवाही परिस्थितीमध्ये पुन्हा एक जोरदार परिवर्तन घडून येईल असे काही योगायोग माझ्या आयुष्यात एकदम चालून आले!

*

आमचा गाव दिवसेंदिवस वाढत होता. त्यातल्या नव्या, वाढत्या, मोक्याच्या एका भागात केव्हापासून एक मोठा प्लॉट रिकामा पडलेला मला दिसे.

पण एके दिवशी एक नवीनच गुजराथी पाटी त्या जागेच्या कुंपणावर लटकलेली मला दिसली– ' बे माळानो एक बंगलो अने एक लांबी चाळ बांधवामाटे मुक्रर करेली जग्या. मळो—के. रावजी भाई अने सन्स, शेअर ब्रोकर्स, पेल्लो माळो, धन मॅन्शन, हमाम स्ट्रीट, मुंबई. '

एकदम माझं कुतूहल जागृत झालं– " एवढी मोठी जागा घेणाऱ्या या शेअर ब्रोकरला तिथं उठवायच्या त्या इमारतीही चांगल्या मोठ्याच असल्या पाहिजेत. म्हणजे काही नाही तरी ही सत्तर–ऐंशी हजारांपर्यंतची त्याची सहजच गुंतवण होणार. आपल्या गावातला चालून आलेला हा मोका आपण गमावून मुळीच उपयोगी नाही ! ह्या नव्या बांधकामाचं कॉन्ट्रॅक्ट आपल्यालाच मिळवलं पाहिजे !

मी तसाच उठून, तडक मुंबईला हमाम स्ट्रीटमधे गेलो. धन मॅन्शनमधलं ऑफिस शोधून काढलं नि आत शिरलो.

तिथं एक गुजराथी पागोटेवाला कारकून होता. चौकशी करताच त्याने ' ब्ल्यू प्रिंट्स ' नि योजलेल्या बांधकामाचा सविस्तर तपशील मला जवळ बसून दाखवला. मी अधिक उत्सुकता दाखवताच, त्यामधून एक एक प्रत काढली व पाकिटातून ते माझ्या हाती दिलं. त्यावरहुकूम सर्व हिशेब करून माझं टेंडर भरायचं मला आमंत्रणही दिलं.

त्या साऱ्याच गोष्टी अगदी पद्धतशीर झाल्या होत्या, तसा तो शकुन तर मला एकूण चांगलाच झालासं वाटलं. त्या साऱ्याच घटनांचा माझ्यावर फारच अनुकूल परिणाम झाला होता. घरी परतल्यावर एका नव्या ईर्षेने नि अगदी काटेकोर कसोशीने मी ते सारं एस्टिमेट काढलं. किमान फायदा नि वाजवी दर धरूनच आकडेमोड केली. साडे-अठ्ठावन्न हजारांचा आकडा भरला नि ते टेंडर मी रजिस्टरने तिकडे पाठवलं. केवळ तात्पुरत्या नि तात्कालिक फायद्याच्या धोरणापेक्षा आपल्या कामाची आपल्या गावाबाहेर होत जाणारी जाहिरातच ठरावी, मुंबईतील गुजराथी नि इतर वाणी या गिऱ्हाइकांमध्ये नव्याने आपलं धंदेवाईक पदार्पण व्हावं, हेच त्या क्षणी माझ्या मनचं मुख्य दूरचं धोरण होतं !

केवळ चारच दिवसांनी पोस्टाने मला एक रजिस्टर आलं. आत असलेल्या मजकुराने मी आनंदलो. ते कॉंट्रॅक्ट मला जवळ जवळ मिळाल्यासारखंच होतं. मात्र अधिक विचार-विनिमय करून, सुरवातीची मुहूर्ताची तारीख ठरवायलाच स्वतः मालकाकडून मला समक्ष भेटायचं आमंत्रण होतं. केवढा अनपेक्षित आनंद वाटला माझ्या मनाला !

अर्थात ठरल्या वेळी मी पुन्हा उत्कंठित मनाने हमाम स्ट्रीटला गेलो. त्या गुजराथी कारकुनाने या वेळी मला थेट केबिनमध्येच नेलं. मीही शेठजींना भेटायला मनातून अत्यंत उत्सुक झालेलोच होतो.

एखादा ढेरपोट्या गुजराथी शेठिया समोर दिसणार हीच माझी त्या वेळी नैसर्गिक

अपेक्षा होती. पण उलट थोडंसं टकल पडलेला, एक तरतरीत डोळ्यांचा पंचेचाळिशी-कडला मनुष्यच तिथं मोठ्या खुर्चीवर बसलेला मला दिसला.

स्मित करून त्याने माझं मराठीतच स्वागत केलं. मोठ्या आस्थेने मला गादीच्या खुर्चीवर बसून चहा-बिस्किटं दिली. नि मग प्लॅन, खर्चाची कलमं याबाबत माझ्याबरोबर खूपच तपशीलवार बोलणं केलं. त्यातून त्याची व्यावहारिक जाणकारी चांगलीच दिसून येत होती. तो गृहस्थ दक्षिणीच होता, हे समजून मी आश्चर्यचकितच झालो होतो.

मग त्याच भेटीमध्ये आम्ही त्यांच्या जागेवरही पोचलो. बांधकामाबाबतच्या आपल्या उरल्यासुरल्या शंका-अपेक्षांचं समाधान ठिकाणावर प्रत्यक्ष फिरून त्याने करून घेतलं. मग बरोबर तयार करून आणलेल्या ' के. रावजीभाई सन्स 'च्या करारकागदावर स्टेशन-वरल्या वेटिंगरूममध्ये बसूनच परस्परसंमतीबाबतच्या आमच्या दोघांच्या दस्तुरखुद्द सह्याही झाल्या.

हे सारं होताच, आपल्याबरोबर आधीच लिहून आणलेला खिशातला के. रावजीभाई सन्सचा दहा हजारांचा एक क्रॉस चेकही त्याने माझ्या हाती ठेवला व म्हटलं- " हं, हा तुम्हांला ॲडव्हान्स. "

अतिशय आश्चर्यचकित मुद्रेने क्षणकाळ त्यांच्याकडे मी नुसता पाहतच राहिलो नि गोंधळल्या-गांगरल्या मनानेच, थरथरता हात पुढे करून, तो चेक मी स्वीकारला.

*

बोलायला एकंदरीत कमी, तरी अंगात पुरेपूर भरलेली-मुरलेली त्याची ती एकूण व्यावहारिक धोरणी चलाखी, तडफ नि काटेकोर वृत्ती! त्या सगळ्याचं मला प्रथमपासून फार कौतुक वाटत होतं. तथापि माझ्यासारख्या एका अनोळखी माणसाच्या हाती पहिल्याच दिवशी ती एवढी मोठी रकम तो ॲडव्हान्स म्हणून उचलून देतो, या काहीशा व्यावहारिक विसंगतीचं मात्र, मला तरी मनात खूप आश्चर्यच वाटल्यावाचून राहिलं नाही...

त्याचं स्पष्टीकरण त्यालाच तडकाफडकी विचारण्यात धोका होता. म्हणूनच बोलावं काय, समजत नव्हतं. तरी थोडं आडून आडूनच मी त्याला म्हणालो, " खरं म्हणजे... आपली-माझी पूर्वीची तशी काही ओळख नाहीच! पण मग — "

" ते हो कसं? चुकताहा तुम्ही मुळात, अनंतराव— " माझ्या मनातली ती चल-बिचल त्याने पूर्वीच ओळखली असावी. कारण एकदम माझ्याकडे वळून नि सलगीने माझ्या खांद्यावर हात टाकून, पूर्वीसारखं हसत तो पुढे म्हणाला, " अहो, मी तर चांगलाच ओळखतो की तुम्हांला! तुम्ही वाघदरीच्या प्रसिद्ध आबाजी मास्तरांचे मोठे चिरंजीव! खरं ना? मग? यात काय चुकलं माझं? काही अडलं-पडलं तर आणखीही मागून घ्या! बांधाल तो बंगला मात्र छान झाला पाहिजे हं! "

तसा अगदी अनपेक्षितपणे आबांच्या नावाचा उल्लेख शेटजींच्या तोंडून झालेला

ऐकताच, मी अधिकच मोठ्यानं दचकलो. भांबावल्या, स्तिमित नजरेने काही क्षण मी त्यांच्याकडे नुसता पाहतच राहिलो. मनात आलं, ' हा माझा नव्हे– आबांच्या नावाचाच विजय आहे ! '

तेवढ्यातच शेठजी पुढे म्हणाले, " शिवाय अर्स– करायच्या कामांची तपशीलवार कलमं मुळाप्रमाणे कायम ठेवून, पुन्हा इतरांपेक्षा बारा-तेरा हजार कमी रकमेचं टेंडर भरणारा कॉंट्रॅक्टर— तसा मला साफ अनोळखी असता, तरी थोडक्या परिचयात, पहिल्याच भेटीत प्रामाणिक म्हणूनच त्याला ओळखला असता मी ! चारपाच हजार त्याच्या हाती टाकायला कसलाच प्रत्यवाय नव्हता माझ्या दृष्टीने ! "

शेठजींच्या त्या एकूण व्यावहारिक धूर्तपणामुळे गुदमरून जात मी फिरून क्षणभर गप्पच झालो. आबांच्या नावाचा त्यांच्या तोंडचा तो उल्लेख ! अगदी अनपेक्षित नि अत्यंत आदरपूर्ण उल्लेख ! तो तर मला अगदी भयंकर आश्चर्यमूढ करणाराच होता.

अखेर, त्यांच्याकडे टकमका पाहतच मी त्यांना विचारलं, " आबांना, मला तुम्ही ओळखता ? पण मग आपण कोण ? ते नाही सांगितलंत ? मी तर अजूनही ओळखलेलं नाही आपल्याला. "

तोच गाडीची घंटा झाली. चटकन सेकंडक्लासच्या डब्यात चढता चढता, शेठजी हसत हसत मला म्हणाले, " समजेल, समजेल ! पटेल बरं ओळख आता हळूहळू, घरबांधणी संपेपर्यंत ! अशी आजच घाई कशाला ? "

त्यानंतर त्या घरांच्या बांधणीत मी माझा सारा जीव ओतला होता. अत्यंत कसोशीने ठरवलेल्या रकमेतून, खर्चवेच वजा जाता, मला जेमतेम सहा हजारसुद्धा फायद्याचे उरले नव्हते. अर्थात त्याहून अधिक कशाची माझी त्यातून मुळापासूनच अपेक्षाही नव्हती ! पण मग मी बांधून दिलेल्या या सुंदर घरांच्या संपूर्ण संतुष्ट झालेल्या मालकाची मला जी अखेर ओळख पटली, त्यात माझी उरलीसुरली सारी भरपाई झाल्यासारखंच मला वाटलं !

कारण के. रावजीभाई ही व्यक्ती म्हणजे दुसरीतिसरी कोणी नवीन नव्हती. वाघदरीच्या कुळकर्णी कुटुंबातील, देवराव दाजींच्या पश्चात घरातून नाहीसे झाल्याचं ऐकलं होतं, ते खुद्द रावजी कुळकर्णीच होते ते !

*

घरबांधणीच्या त्या मुदतीत रावजींबरोबर पाचपन्नास वेळा तरी त्यांच्या ऑफिसमधे व घरी जाण्याचे मला योग आले होते. अनेकदा त्यांच्याशी अगदी दिलखुलास बोलायलाही मिळाल्यामुळे परिचयही खूप वाढला होता.

कमी पण अर्थवाही नि मुद्द्याचं बोलणं हा तर रावजींचा अगदी हुकमाचा एक्का ! त्यांची राहणी–वागणूक साधी, पण मोठी सफाईची, कोणावरही छाप पडावी अशी ! म्हणूनच यशस्वी, व्यवहारज्ञ, पण तितकाच बेरका नि धूर्त प्राणी, असा त्यांचा त्यांच्या

भोवतालच्या साऱ्या लोकांत मोठा लौकिक होता. इतरांना दरारा वाटावा पण तितकीच सहजतः आपुलकीही वाटावी, अशीच त्यांची ती बोलण्या-चालण्याची एकूण ढब, वागण्याची सारी पद्धती होती.

सुरवातीस लहानसान धंदे, मग थोडी दलाली, व्याजबट्ट्याचा व्यवहार, असे करीत करीत रावजी अखेर शेअर बाजारात शिरले होते. पाचसहा वर्षांत तिथं रावजींनी चांगलं नाव नि स्वतःच्या हिंमतीवर पंचवीस-तीस हजार तरी कमवले होते. दोन-अडीच वर्षांपूर्वीच्या प्लेगात अप्पाजी मेल्यावर, त्यांच्या मुलांमध्ये नि रावजीमधे इस्टेटीची वाटणी झाली होती. इतकी वर्षे चालू उत्पन्नात रावजींना अप्पाने साफ बनवलं होतं. ते नुकसान रावजींनी कधीच मनाला लावून घेतलं नव्हतं. निदान अखेर का होईना, निम्मी इस्टेट तरी त्यांच्या हाती हक्काने लागली होती. अशा प्रकारे आपल्या वाट्याला राजरोसपणे आलेल्या जमिनी, पाचामुखी ठरणाऱ्या भावाने भाऊबंदांतच चारचौघांसमक्ष तत्काळ विकूनही टाकल्या होत्या. नि मग फक्त रोकड कनवटीला लावूनच ते मुंबईला कायमचे म्हणून निघून आले होते.

त्यानंतरच्याच गुंतवणीत त्यांनी सहज खरेदी केलेला तो नवा मोठा प्लॉट, त्यावरचा माझ्या हातून बांधून घेतला गेलेला त्यांचा तो बंगला नि ती लांबलचक चाळ, अर्थात त्या घडामोडींमधूनच आबाजी मास्तरांच्या या अनंताशी रावजी कुळकर्ण्यांचा तो फिरून योगायोगाने आलेला, वाढत वाढत चांगलाच घनिष्ठ झालेला तो संबंध! ते सारंच काही मला तरी एकेकदा अद्‌भुतच वाटायचं.

स्वतः रावजी म्हणजे खरोखरच एक न्यारा प्राणी! बरेचसे देवरावदादांच्या वळणावर गेले होते ते. देवरावदादांनंतर वाघदरीतून रावजी पळाले, त्यापूर्वीची आबां-बरोबरची रावजींची अखेरची भेट! आपल्या बोलण्यात, आपल्या आयुष्यातल्या त्या घटनेला रावजी फार मानीत. कधी बोलण्याच्या ओघात आलं तर ते पटकन् म्हणत, " आबांमुळेच त्या वेळी मी जिवंत राहिलो! नाहीतर दादांमागून अप्पाच्या हाताने माझाही कदाचित त्याच वेळी वैभवासाठी काटा निघाला असता... माझा मुडदा पडला असता! आमच्या अप्पाजीने केलेल्या तसल्या पाजीपणाने, चांगलं वर आलेलं आमचं कुळकर्ण्यांचं कुटुंब बघता बघता साफ बसलं— अगदी शतधा उडालं! प्रतिष्ठेने नि वैभवानेही उत्तरोत्तर खाली उतरलं! तुमच्या आबाजी मास्तरांना तर अत्यंत नीच नीच कारवाया करून, अप्पानेच पार देशोधडीला लावलं, अनंतराव! "

त्या सगळ्याच अमानुष प्रसंगपरंपरेचं भयंकर वैषम्य वाटून, एकेकदा रावजी फारच चुकचुकायचे, पण मग एका नैसर्गिक आदरवृत्तीने ते असे म्हणायचे, " तुमचे आबा— एक लाख माणूस!— त्यांनी आपला एक सन्मार्ग कधीच सोडला नाही. उलट, पुन्हा खड्कातूनही एक नवाच मार्ग काढला. अनंतराव, तुम्हांला आयुष्यभर खूप खूप अभिमान वाटत राहावा असेच तुमचे वडील होते! "

खरोखरच रावजी एक औरच व्यक्ती, यात मुळीच संशय नाही. आमच्या कुटुंबा-

बाबतची अप्पाजी कुळकर्ण्यांची ती मागली सारी सारी पापं, रावजींच्या संगतीत मी तरी साफ साफ विसरून गेलो. हिणकस मानवी मनाच्या त्या पराकोटीच्या दुष्टाव्याचासुद्धा माझ्या मनात मागमूस देखील उरला नाही!

एका बाबतीत मात्र राहून राहून मला फार मोठं आश्चर्य वाटे... आईच्या उदरी अशी उत्तर-दक्षिण ध्रुवासारखी परस्पर दोन टोकांची विभिन्न माणसं निपजली तरी कशी?

*

रावजींचा नवा दाट स्नेह झाला, मुंबईत ओळखी झाल्या, माझ्या धंद्याला गिऱ्हाइकं मिळण्याची सुचिन्हं दिसू लागली — हे सारं काही ठीक होतं. पण, माझं अजून कर्ज-देणं अगदी सहा-सात हजारांच्या व्याजासह उरलंच होतं. सुरवातीस मागून घेतलेली मुदत संपायला आली होती. तेव्हा धंद्याचे पुढले बेत-व्यवहार सांभाळून टिकाव धरता यावा म्हणून आपल्या पूर्वापार धनकोंना सध्या तरी चारपाच हजारांवरच थोपवून धरावं नि उरलेल्या रकमांसाठी त्यांच्यापाशी पुन्हा थोडी मुदत मागावी, हेच प्राप्त परिस्थितीत मला भाग वाटू लागलं...

तरी पण, प्रत्येकाकडे जाऊन, नव्या मुदतीसाठी पुन्हा तसं तोंड वेंगाडणं माझ्या मात्र अगदी जीवावरच येत होतं. शिवाय, दूर धोरणाच्या दृष्टीने, मिळण्यासारख्या आसपासच्या जमिनी खरेदी कराव्यात, असले काही फायदेशीर योजनेचे विचारही मनाला अधूनमधून भंडावीत होतेच.

या साऱ्या गरजेसाठी आणखी किमान दहा-पंधरा हजार तरी लागणार होते. ते आता तत्काळ आणायचे कोठून, याचा मात्र स्पष्ट मार्ग मला काही दिसू शकत नव्हता. आबांना कर्ज का झाली असतील, याची त्याच वेळी मला खरीखुरी पहिली चुणूक मिळाली! मनाला पुरेपूर पटू लागलं, "अमणारा धोरणी मनुष्य ऐनवेळच्या कर्जानेच मोठा व वैभवसंपन्न होऊ शकतो, होऊ शकेल!"

असल्याच अधिक विचाराने मला अखेर वाटलं, "सगळ्या धर्णांची किरकोळ कर्जे तत्काळ भागवता आली नि एखाद्याशीच कर्जाचा मोठा संबंध ठेवून, सोयीस्कर मुदतीच्या आसऱ्यामध्ये धडाडीने-नेकीने काम करता आलं, तर किती बहार होईल!"

माझ्या चालू परिस्थितीचा चौफेरचा विचार करता करता एके दिवशी अखेर मनाशी मी एकदम ठरवून टाकलं, "रावजी हे योग्य माणूस आहेत! त्यांच्याकडेच याबाबत शब्द टाकावा! जमेल ते! नि ते तसं जमलं तर आपले सारेच प्रश्न एकदम, एकाच फटक्यात सुटून जातील!"

*

आपल्या नव्या घरी सर्व मंडळींसह रावजी राहायला आल्यानंतर मी माझ्या मनाचा तो अखेरचा निश्चय केला.

एके दिवशी सकाळीच उठलो नि त्यांच्याकडे गेलो. नेहमीप्रमाणे अवांतर गप्पा-गोष्टी झाल्यावर, त्यांना माझ्या मनातली ती सारी खबखब, मोठा धीर करून, मी उघड-उघड सांगून टाकली.

रावजींनी ते सारं शांतपणे नीट ऐकून घेतलं. तरी पण, ते मोठे धूर्त! बोलण्या-वागण्यात तसे मोठे मिष्ठास खरे, पण प्रत्यक्ष व्यवहारात एकदम स्पष्टवक्ते नि खंबीर!

माझ्याकडे किंचित टवकारून पाहत, क्षणभराने त्यांनी मला हळूच विचारलं, "असं माझ्याकडून कर्ज घेऊन काय होईल, अनाबापू?"

"आधी दहा जणांची दहा तोंडे तर बंद पडतील ना?" मी कापऱ्या आवाजात पुढे म्हणालो, "थोडी उसंत मिळेल नव्या नव्या कामाला मला! एकाच प्रतिष्ठिताशी काय तो संबंध उरेल तो बरा."

क्षणभर गप्प होऊन मग रावजी मला म्हणाले, "तुम्ही हुशार आहा, होतकरू तरुण आहा! पण आता जरा स्पष्टच बोलतो, अनाबापू! राग नसावा. काय हो! कशाच्या जोरावर माझे पैसे तुमच्या हाती द्यायचे मी, म्हणता? अनोळखी अनाबापूंशी बांधणी-खर्चाची एकूण रक्कम नक्की करून, त्यांच्या हाती मी आगाऊ दहा हजारांचा एकरकमी चेक काढून देईन. कारण तो एक व्यवहार आहे! कबूल! पण ओळखीच्या अनाबापूंच्या हाती, केवळ त्यांच्या व्यवहारासाठी, माझे दहा हजार देताना मात्र मला एक मोठाच प्रश्न पडेल! मला त्यात हमी हो काय...शाश्वती काय त्या दिल्या रकमेची माझ्या व्यवहाराच्या बाजूने...?"

"आमची सगळी इस्टेट हवी तर...तात्पुरती गहाण..."

"छे छे! तसलं काही बोलू नका, अनाबापू...आमच्या कुलकर्णी कुटुंबाचा गहाण-कर्ज-सावकारी व्यवहार आता बाघदरीतच बुडून गेला! गेला आता तो जुना जमाना! आधी हे ध्यानी घ्या...केवळ रोकड किंमतीच्या कल्पनेचा एक सर्वसामान्य माणूस आहे मी! म्हणजे असं, अनाबापू—रोकड घ्यावी, रोकड द्यावी! ठरल्यावेळी ठरल्या वायद्याच्या ठेक्याला द्यावी— हेच आपलं एक तत्त्व, आमचं!—आणि दुसरंही एक असं, की, माझ्या साऱ्या रोजच्या घालमेलीसाठी मला तर स्वतःलाच माझ्याजवळची रोकड नेहमी लागत असते. तर मग अशा स्थितीत काय म्हणून नि काय पाहून, इतकी रक्कम तुमच्या हाती देऊ बरं मी? मला तर हवी अगदी रात्रीच्या पोटात—ते एक सोडा म्हणा—पण...महिन्याभरात तरी हमखास एकरकमी परत मिळतील का मला ते तुमच्याकडून? बोला."

"काय? महिन्याभरामधे? छे छे!—नाही अं, नाहीच!"

"मग? तुम्हीच पाहा—आता—"

"पण...दीडएक वर्षात— सगळं व्याज नि बरंचसं मुद्दल मी नक्कीच परत करीन! थोडा विश्वास ठेवा की माझ्यावर, रावजीसाहेब. तुमच्या आबाजी मास्तरांचाच मुलगा आहे मी, म्हटलं."

रावजींचा आता निकाल... अर्थात नकार...नक्कीच ठरलेला, या भीतीने मी त्या वेळी मनात खूपच गडबडलो होतो.

" आबांबद्दल फार फार आदर आहे मला ! " स्मित करीत रावजी गंभीरपणे हळूहळू म्हणाले, " त्यांनी तर मला एक प्रकारे पुनर्जन्मच दिल्यासारखा आहे, एकदा! तुमच्याबद्दल देखील मला भरपूर विश्वास आहे, आनाबापू !—पण मग—परस्पर-विश्वासाच्या गोष्टी बोलणं तेवढं नेहमी सोपं असतं— अखेर माणसाला परिस्थितीच अगतिक, हतबल करून टाकत असते. पैसा फार फार महाग आहे हो बाजारात, आनाबापू ! "

रावजींच्या त्या बोलण्यात चौफेर विचार नि सखोल अर्थ भरलेला होता खराच. तरी पण माझ्या साऱ्या त्या क्षणी हमखास वाटणाऱ्या त्या क्षणच्या सुखस्वप्न-अपेक्षांचा मात्र पार चक्काचूरच झालेला दिसत होता ! म्हणूनच मनामध्ये अत्यंत विकल-बेचैन झालो होतो मी त्या क्षणी...

*

तोच, किंचित काळाने, पुन्हा माझ्याकडे सस्मित पाहून, मधली शांतता मोडीत, रावजी मला म्हणाले, " सहज म्हणूनच मी आता हे विचारतोय बरं का, आनाबापू. घरवाडी सोडून, आजच्या घटकेला तुमच्याकडे रोकड किती शिल्लक असेल ? द्यायचं नसलं तर देऊ नका उत्तर ! आग्रह नाही माझा—"

" ते का बरं ? माझ्या चालू व्यवहाराला लागणारी रक्कम सोडून, कर्ज फेडायला जेमतेम सहा-सात हजारच आहेत—"

" समजलं ! नि मी तुमच्यावर विश्वास ठेवावा नि तसा विश्वास ठेवून आता माझे दहा हजार मी तुमच्या हाती ठेवावेत, हे सर्व तुमच्या विश्वासावरच ठेवावेत, असंच—असंच म्हणता ना, आना ? "

रावजींचा चेहरा गंभीर होता. मी नुसते नाना आडाखे बांधीत होतो...

अखेर थोडंसं अस्वस्थ होऊनच मी म्हणालो, " हो ! मला फार फार उपयोगी पडतील ते. एक पैही बुडणार नाही तुमची, असा भरवसा आहे मला. तुम्हीही विश्वास ठेवा माझ्यावर तेवढा..."

पुन्हा थोडा वेळ शांतता राहिली. मग रावजींनी एकदम प्रश्न टाकला, " पण तुमचा आहे का हो माझ्यावर विश्वास, आनाबापू ? "

" अलबत ! "

त्यांच्या त्या प्रतिप्रश्नाचा मला तरी मनात अर्थच लागत नव्हता !

" तर मग तुमचे ते सहा हजार एकरकमी मीच तुमच्याकडे मागितले, तर तुम्ही द्याल मला आजच्या आज ? "- खाडकन् रावजींचा उलटा प्रश्न माझ्या कानावर आदळला !

" तुम्हाला ?—माझे सहा हजार घ्यायचे ? थट्टा करताहा झालं तुम्ही माझी. "

खरं म्हणजे त्या अनपेक्षित प्रकाराने मीच मनात पार सर्द झालो होतो!

" अहो, थट्टा नव्हे ही आनाबापू!" रावजी तितक्याच गांभीर्याने पुढे म्हणाले, " अगदी खरं खरं विचारतोय मी! देता का ते माझ्या हाती? एक पैही जाणार नाही तुमची त्यामधली! असा मलाही भरवसा वाटतोय. पण—मग ते कोणी सांगावं? पैशाचाच तर खेळ आहे एकूण हा!"

हा माणूस आहे तरी कोण? या क्षणी या करतोय तरी काय? रावजींच्या त्या क्षणच्या वर्तनाचा मला मात्र कसलाच काही अंदाज बांधता येत नव्हता!

*

गपचूप-गपचूपच, भांबावल्या मनाने, रावजींच्या चेहऱ्याकडे मी पुनःपुन्हा शोधकपणे पाहिलं. त्यांच्या गंभीर चेहऱ्यावर झळकणाऱ्या मंद स्मितावरुन तर काही एक थांगपत्ता लागला नव्हता. बेरक्या मिस्कील डोळ्यांनी तेच उलट माझ्याकडे टवकारुन पाहत आहेत, एवढंच मला दिसत होतं.

अखेर मी झटकन एक विचार ठरवला, अस्पष्ट—अडखळत्या मंद स्वरातच मी त्यांना म्हणालो— " सहा सात हजारांचं बाबांचं कर्ज अजून माझ्या डोक्यावर लटकतंच आहे! तसल्या डळमळीत पायावर उभ्या असलेल्या एका तरुण माणसाहातचीच ही उरली-सुरली तुटपुंजी शिल्लक आहे, रावजी! तुम्ही जाणताच आहा हे! तरी देखील—मोठ्या विश्वासाने तुमच्या हाती आजच्या आज ती देऊन टाकायला तयार आहे मी! ठरलं?"

" हो! अगदी पक्कं!!" आपलीही निग्रही मान रावजींनी हलवली.

" तर मग, आता तरी सांगा ना मला, रावजी साहेब?" माझं कुतूहल अधिकाधिक वाढतच जाऊन मी विचारलं, " तुमच्यासारख्याला माझ्यासारख्याच्या या चिमूटभर क्षुल्लक रकमेचा उपयोग काय? काय—करणार काय आहा त्या पैशाचं तुम्ही??"

" असं पाहा— " रावजी गंभीर हसले, नि कोड्याच्या गूढ भाषेतच मला म्हणाले, " अहो माझ्या मानाने तुम्ही तर खूप शिकलेले आहा, पदवीधर आहा, हुशार आहा! पण जगाच्या मोठ्याथोरल्या विस्तृत कॉलेजामधे खूपसं शिकत मीही माझ्यापरीने आजवर थोड्याफार परीक्षा पास झालो आहे! मलाजुरा मीही विविध अनुभव घेतलाय, नि तुम्हांला तोच थोडासा कमी आहे!— म्हणूनच, आता यापुढे मी जे तुम्हांला काही सांगणार आहे, ते थोडं नीटपणे ध्यानी घ्या— "

" बोला." अशा अर्थाने नुसतं प्रश्नार्थक टकमका त्यांच्याकडे पाहत, मुखस्तंभ बसण्यावाचून मला दुसरं गत्यंतरच नव्हतं!

" कर्जाची फेड करणं, मनात त्याबद्दल ओशाळं वाटणं— त्याने अब्रू जाणं नि कमावणं, असलं खूप खूप बोलताहात तुम्ही मघापासनं," सस्मितपणे नि संथ शब्दात रावजी मला म्हणाले, " तरी पण, आता असं एक बघा, आनाबापू— या जगात स्थैर्य

नि सुरक्षितता म्हणून असतेच कुठे मुळी ? व्यवहार म्हणजे व्यापार— म्हणजे वापर! तुमचं किंवा दुसऱ्याचं, जे जे काही तुमच्याकडे हाती असेल ते ते तुम्ही सतत वापरलंच पाहिजे! तसं न करून चालणंच कधी शक्य नाही! अहो आनाबापू, जे जे आपल्या हाती असेल ते ते धोक्यात हे टाकलंच पाहिजे! आपल्या या मनगटातला जोर, बुद्धिमत्तेचा जोर— अनुभवाचा नि पैशाचा जोर— सारा सारा सदैव वापरतच राहायला पाहिजे! कारण— तोच तर या जगाचा हरघडीचा नि स्वयंसिद्ध नियम— एकमेव नियम आहे! हे बघा, आनाबापू, एक तर लोकांना तरी दमवा नाही तर तुम्हीच आपलं तरी सारं काही गमवा! स्वतः दमून जा! किंवा आपण असं म्हणू या, आयदर यू यूझ ऑर लूझ!— पण हा साधा नियम तुम्हांला ठाऊक नाही नि मला मात्र तो पुरा माहीत आहे! आय ऑल्वेज यूझ ऑल, ऑर लूझ ऑल!"

गालातल्या गालात हसून, बेरकेपणाने माझ्याकडे पाहत, रावजी बोलायचे एकदम थांबले.

*

माझा त्या क्षणी तर पुरताच धुव्वा उडाला होता!

पुढली कित्येक मिनिटं, माझ्या मनात झालेल्या गोंधळामुळे, अबोलपणेच, आतल्याआत धुमसता विचार करीत, मी गप्प बसून राहिलो होतो.

तथापि रावजी पुढे बोलायचे साफच थांबलेले पाहून मीच अखेर त्यांना पुन्हा विचारलं, "पण माझ्या रकमेचं तुम्ही काय करणार ते नाही अजून तुम्ही मला सांगितलंत, रावजी साहेब!"

तत्काळ, रावजी एकदा तोंडभर हसले व मग माझ्याकडे आपली दृष्टी रोखून म्हणाले, "ते पैसे, आनाबापू, मी तुमच्याकडून तुमच्यासाठीच मागून घेतलेले आहेत!"

त्यांच्या त्या गूढ उत्तराने मी पुन्हा भयंकर चमकलो, नि अगदी शोधकपणेच त्यांच्याकडे पाहत राहिलो.

तेवढ्यात रावजींनी मला विचारलं, "काय हो, मी दिलेले दहा हजार, एक-दीड वर्षांनी, नऊ टक्क्यांनी मला परत देणार म्हणता तुम्ही! परत देणार ते तुमच्या धंद्यातच मिळवणार ना? म्हणजे—ती केवळ आशा. हो, आशाच की नुसती! आता तुमचा तो धंदा-तो केवळ फार तर वीस टक्क्यांचा असेल, तरी देखील तुम्हांला ती आशा आहे! आता, विश्वास आहे, होय ना? पण मग— आता समजा, तुमचा धंदा येत्या अगदी वर्षभर फायद्याचा झालाच नाही—पदरी उलट खोटच येत गेली तुमच्या... तर ??"

"अं! शक्य आहे! पण फायदा गेला तसा—म्हणून माझा प्रामाणिकपणा तरी एकदम कुठे जाणार आहे थोडाच?" केवळ समर्थनार्थ बेचैनपणेच बोललो मी.

"हो! त्या स्थितीतही तुमचा प्रामाणिकपणा जाणार नाही, याची तर खात्रीच आहे मला!" रावजी पटकन म्हणाले, "पण माझे रोकड पैसे मात्र त्याच वेळी एका क्षणात

जातील, याचीही त्याबरोबरच एक खात्री आहे मला! तसं झालं तर—आज दहा वर्षांच्या आहा त्याऐवजी, त्या वेळी — एकट्या माझ्याच कर्जात पडलेले असणार तुम्ही! त्यात तुम्हांला तसं काही नवीनही नाही. पण उघड उघड नि वरवर पाहिलं तरी, मी मात्र माझे दहा हजार, अकारणच, हातोहात साफ गमावलेले असणार! म्हणजे बघा हं—तुमचं दुःख आज आहे तेच! ते कमी होणार नाही—जास्तही होणार नाही! पण माझं दुःख मात्र आजच्या दहा हजारपट वाढलेलं असणार! किंबहुना, याच वर्षभरात, माझ्या हातातील त्या माझ्या दहा हजाराचे मी किमान वीस हजार तरी करीन, ही माझ्या मनाची जर पुरी खात्रीच असली तर—ते माझं दुःख वीस हजार पट वाढणार! तेच दुःख माझ्या मानगुटीवर अहोरात्र बसलेलं असणार! तेव्हा, दुःखाची चक्रवाढ ही अशी अगदी अनंत असते, बरं का, अनंतराव! माझ्या दृष्टीने म्हणाल, तर ती स्थिती म्हणजे धड गाढवही नाही नि ब्रह्मचारीही नाही! डोळे उघडे ठेवून, ते तसलं अफाट दुःख मिळवायची मला मुळीच इच्छा नाही! सवयही नाही!"

ते सारं स्पष्टीकरणाचं विराट स्वरूप पाहून माझी तर अक्षरशः दातखिळीच बसून गेली होती. तोंडून श्वासही बाहेर पडेना.

तेवढ्यात रावजींनी गुपित सांगितल्यासारख्या आवाजात हसत हसत, मला पुढे विचारलं, "आता मला आपली एक असं सांगा तुम्ही आनाबापू, शंभरावर शंभर व्याज देणारा कोणता एखादा धंदा तुम्हाला माहीत आहे का हो?"

"शंभरावर शंभर! काही तरीच!"

"नसणारच माहीत! पण मला मात्र आहे माहीत तो—"

"म्हणजे!!!" मी अतिशय गोंधळून जाऊन एकदम उद्गारलो.

"म्हणजे, दुसरं काही नाही!" रावजी स्मित करून मला म्हणाले- "एकवेळ तुमच्यावर असला, तरी तुमच्या धंद्यावर माझा विश्वास नाही! मी माझ्यावर नि माझ्या धंद्यावर जेवढा विश्वास ठेवीन तितका तो तुमच्या धंद्यावर किंवा तुमच्यावर का बरं ठेवावा? तेव्हा एवढ्याचसाठी, शंभर-दोनशेचा धर्म मी जाणतो, हजार-पाचशेची मैत्री मला पेलते, पण मग माझ्या दहा हजारांचा प्रश्न उभा असेल, तेव्हा मी अगदी दहा हजार वेळा, किंबहुना वीस हजार वेळा आगाऊ विचार करणारा मनुष्य आहे! काय? हे कुठं काही चुकतंय का हो माझं? सांगा! नि मी तुमच्यापेक्षा माझ्यावर, तुमच्या धंद्यापेक्षा माझ्या धंद्यावरच अधिक विश्वास ठेवणं हे तरी माझ्या दृष्टीने काय चुकीचं आहे का? सांगा आता, आनाबापू!— पण तुम्ही तरी त्या धोरणाला कोणत्या तोंडाने चूक म्हणणार?"

रावजींच्या त्या रोखठोक, अस्खलित नि मुद्देसूद अशा बोलण्याने मी तर मुग्ध होऊन, जणू चक्रव्यूहात अडकल्यासारखा झालो होतो. माझ्या तोंडून काही काळ शब्दच बाहेर फुटेना.

*

पुन्हा रावजीच पुढे बोलू लागतील, अशी थोडा वेळ वाट पाहून मी अखेर म्हणालो, "तुमच्या बोलण्याची खरी नाडी माझ्या हाताला नीट लागतच नाही अजूनही, रावजीसाहेब!"

तेव्हा रावजी एकदम खदखदून हसले. त्यांनी आपल्या विशाल कपाळावरून नि टकलावरून हळूच एकदोनदा हात फिरवला नि आपले चकाकणारे घेरके डोळे मजवर सरळ सरळ रोखून ते म्हणाले, "त्याचं असं आहे आनाबापू, व्यवहार म्हणजे व्यवहार! फारच कठोर असतो तो! — खरं म्हणजे या व्यवहारी जगात कोणी कोणाला कधीच काहीही देत नाही! प्रत्येक जण आपला आपणच दुसऱ्याकडून मिळवून तेवढं घेत असतो. तेवढ्यासाठीच तो आधी आपल्याकडलं सगळं बाहेर भिरकावून देत असतो. अहो, जिथे धोका तिथंच मोका! मोका तिथं धोका! हं, आधी धोका!!"

मी गोंधळून रावजींकडे पाहातच राहिलो होतो.

"पण आपला धोका आपल्या बुद्धीला पटणारा, आपल्या धीराला नि धोरणाला पेलणारा, पटणारा... आपल्या जन्मजात छातीलाही सहज सावरून धरता येणारा, असाच नेहमी असायला हवा! अहो आनाबापू, स्वतः आपल्या इतका आपला दुसरा कोणताच मोठा हितकर्ता कोणीच नसेल! कोणीच नसतो! स्वतः आपल्या इतका विश्वासालाही दुसरा कोणीच पात्र नसतो नि तितका दुसऱ्या कोणावर आपण जगात विश्वास ठेवीतही नाही कधी! पण मग, जर का आपण घेतलेली उडी, आपलं धोरण चुकलं, तर आपल्याला बनवणारा-नागवणारा अट्टल बदमाशही आपल्याइतका दुसरा जगात कोणीच सापडत नाही आपल्याला! असे आपणच आपले मोठ्यात मोठे हितकर्ते नि दुष्टात दुष्ट शत्रू असतो!!"

त्यांचा प्रत्येक शब्द मी मनात घोळवून समजून घेण्याचा प्रयत्न करीत होतो!

"एवढ्याचसाठी म्हणतो मी आनाबापू, आपले आपले धोके नि आपले आपले मोके आपणच साधायचे-सोसायचे-भोगायचे असतात! तुम्ही तुमची दुःखं नि तुमचे धंदे याबद्दल मला काही सांगू नये, मीही माझी दुःखं, माझे धोके नि माझे धंदे, याबद्दल तुम्हाला काही सांगू नये. एकमेकांवर आपण अगदी खूप विश्वास ठेवायचं ठरवलं नि तसा अगदी खरोखर ठेवलाही, तरी देखील, माफ करा आनाबापू, माझे दहा हजार, मी व तुम्हीही मलाच प्रथम वापरू दिले पाहिजेत!— खरं ना हे? की चुकतंय काही!!"

त्या गृहस्थाच्या बोलण्यातला सफाईदार तर्कवाद तर अगदी स्फटिकवत होता. त्यामुळेच मी अगदी भारलो-भारावलो होतो. ते सारं ऐकता ऐकता जगातल्या व्यवहारांचा एक अगदी नवाच, न्याराच पैलू त्या दिवशी मला दिसू लागला होता!

*

तरी देखील, रावजी त्या क्षणी प्रत्यक्षात काय काय करू पाहत आहेत, हे मात्र मला काही केल्या अजूनही समजत नव्हतं!

त्यामुळेच गोंधळून, एक प्रकारचं दुबळं स्मित करीत, त्यांना मी अखेर म्हणालो—
" पण मग, रावजीसाहेब, अहो पाचच मिनिटांपूर्वी माझेही सहा हजार तुम्ही मागितले बोलता बोलता, मीही ते मोठ्या विश्वासाने तुमच्या हाती सोपवले, तसं आजच्या आज द्यायचं तुम्हांला मी वचनही दिलं! त्यांचं तुम्ही काय करणार आहा?! होणार आहे काय एकूण? ते तर तसंच राहिलंय की अजून— "

" थँक्स, थँक्स! माझ्या या रोखठोक बोलण्याच्या पट्ट्याझपाट्यामध्ये अडकून देखील, त्या आपल्या वचनाची आठवण ठेवली आहेत तर तुम्ही!" हळूच सोचक हसून रावजी पुढे म्हणाले, " तर मग आता मात्र सांगतोच—विश्वास ठेवा अगर नका ठेवू— ते तुमचे सहा हजारही आता माझेच झाले आहेत, असं समजून मी आजच्या आज ते माझ्याच धंद्यात वापरणार आहे! माझ्या स्वतःच्या बारा हजारांबरोबरच मी ते वापरणार आहे. अगदी सहा काही नाही, पण नऊ महिन्यांनी तरी माझ्या बारा हजाराचे चोवीस हजार होतील, असा माझा मलाच फार विश्वास आहे. तशी पुरी आशा नव्हे, खात्रीच आहे म्हणा ना. तो माझा मोका, म्हणून—माझी रकम बाहेर फेकण्याचा, ती कदाचित कायमची नाहीशी होण्याचा धोकाच पत्करणार आहे मी! तेव्हा, त्या माझ्या बारा हजारांबरोबरच तुमच्या त्या सहा हजारांनाही एक मोका निर्माण झाला आहे आता! पण मग तो मोका जसा तुमचा असेल तसाच मग—माझ्याबरोबरच ते तुमचेही गेले, तर तो धोकादेखील सर्वस्वी तुमचाच आहे आता! मी त्यातल्या एका पैलाही जबाबदार नाही! समजलं? यू हॅव टु च्यूज! आयदर वी बोथ यूझ ऑर लूज! आता आणखी कुठला मधला मार्ग नाही उरलेला! समजलं?!"

आपला दृष्टिकोण नि निर्णय समजवण्या-पटवण्याची रावजींची ती पद्धती तर अगदी न्यारीच होती. का, कसा कोण जाणे, मी तर भांबावलो होतो, तितकाच आनंदलोही होतो त्या क्षणी!

तोच रावजी आपले डोळे किलकिले करीत, मिस्किल हसून मला पुढे म्हणाले, " असल्या या गोष्टी, आनाबापू, उगीच गवगव्याच्या नि नसत्या वादविवादाच्या मुळीच नसतात! म्हणजे, प्रत्येकाच्या आत्मविश्वासाची, खात्रीची एक गुपित बाबच असते ती! माझी दोन घरं ठरल्या रकमेत बांधून तुम्ही त्या धंद्यात किती नि कसा फायदा कमावला, हे मला सांगाल का कधी?—तरी पण मी मात्र, माझे हे बारा हजार वापरून, ते उघड उघड असे धोक्यातच टाकून, त्यांची नऊ महिन्यांत दामदुप्पट कशी करणार आहे किंवा कशी सर्वच्या सर्व गमावून बसणार आहे, त्या एका महान गुपिताचा तुमच्याकडे आज परिस्फोट करीत आहे, त्यात तुम्हांला भागीदारही करीत आहे! माझ्या धोरणावर नि माझ्या महान आत्मविश्वासावर भिस्त ठेवून, माझा हा मोका तुम्हांलाही साधायची— क्वचीच कोणाला मिळणार नाही असली—असामान्य अद्भुत संधी देत आहे ही मी

आज! नि सर्वांत मोठी गोष्ट तर अशी आहे आनाबापू, तुम्हांला कदाचित येणाऱ्या त्या तुमच्या मोठ्या धोक्याला, माझ्या दुप्पट मोठ्या धोक्याची संगतही आपोआप लाभणार आहे तुम्हांला! माणसाला आपल्या दुःखात तो विरंगुळा तर फार मोठा असतो!"

*

एक नवाच आनंद, एक नवीच ईर्षा माझ्या मनात सरसरली, संचारून मरून कोंदाटू लागली होती. रावजींचं ते सारं ऐकल्यावर, मी त्यावर जसजसा अधिक विचार करीत होतो, तसतसा एका नव्याच उत्साहाचा मला जोरदार साक्षात्कार होऊ लागला होता.

झपाटल्यासारखं होऊन मी एकदम उद्गारलो, "ठरलं! रावसाहेब, पक्कं ठरलं! तुमच्या असेल त्या उत्स्फूर्त धोरणावर माझा पुरा विश्वास आहे. कदाचित, पदरी दुर्दैवाने येऊन पडणारा धोकाही सर्वस्वी माझाच आहे! बोला, केव्हा आणू पैसे? काय करणार तुम्ही त्यांचं?"

"पैसे? अगदी आत्ताच्या आत्ताच आणा, आनाबापू!" रावजींचे डोळेही एकदम चमकून, नव्या उत्साहाने जागचे उठत, ते मला म्हणाले, "आणि मी नाही काही करायचंय बरं!— काय करायचंय ते तुम्हीच! फक्त तुमच्या रकमेचंच नव्हे, माझ्या बारा हजारांचंही! ती रक्कम मी आताच तुमच्या हाती देतोय. हं— उठा उठा! आजच्या आज, दुपारी, आपण मुंबईला जायचंय त्यासाठी!"

मिनिटभर आपल्याशी विचार करीत, हॉलभर अस्वस्थ येरझारा घालीत, रावजी गप्प होते. शेवटी फिरताफिरता एकदम ते माझ्यासमोर येऊन थबकले. "आता मी काय सांगतोय ते आधी नीट ध्यानी घ्या, बरं का आनाबापू! कलकत्त्याच्या 'डमडम कॉरोनेशन मिल'च्या दहा दहा रुपयांच्या शेअर्सचा भाव आज बाजार उघडताना प्रत्येकी ४ रुपये आहे. पाच रुपये एक आण्याने, मी दोन महिन्यांपूर्वी खरीदलेले ३७०० शेअर्स माझ्याकडे आहेत. बरोबर पाहिलं तर या व्यवहारात आजमितीला मी ३६०० रुपये गमावूनच बसलो आहे, नाही का?

"पण आता पुढे ऐका! इतकं असूनही, तुम्हीही आज तेच विकत घ्यायचे आहेत. म्हणजे बरोबर पाहिलं तर— मी गमावलेले असले, तरी, तुम्ही मात्र निदान गमावणार नाही— पण मी तर म्हणतोय की, खरं म्हणजे — शेवटी मीही गमावणार नाहीच! याची मला खात्रीच आहे. म्हणूनच, तेच शेअर्स माझ्यासाठीही खरेदी करायला मी तुम्हांला आज सांगणार आहे. तेच तुम्हीही निर्धास्तपणे खरेदी करा. एक मात्र, आपण फक्त सारं मार्केट तत्काळ आजच्या आज हलवलं पाहिजेय!"

एखादा मोठ्यात मोठा दगड इमारतीसाठी हलवणं मला ठाऊक होतं, ते मला जमलं देखील असतं, पण हे सारं मार्केट हलवणं? त्याचा मला अर्थ समजत नव्हता. म्हणून त्या गोंधळानेच मी रावजींकडे नुसता पाहतच राहिलो.

*

तेवढ्यात येरझारांची एक नवी फेरी पुरी करून, पुन्हा थेट माझ्यासमोर येऊन उभे राहत रावजी म्हणाले, "आता तुम्ही जे बाजारात जाल ना, ते खरेदीलाच सुरवात करा एकदम! प्रथम अडीचशे, मग पाचशे नि पुन्हा अडीचशे! एक वाजेपर्यंत हजार शेअर्स घ्या. इकडे मी माझे विकत जातो. माझ्या पडत्या विक्रीने दुपारी दोनच्या आत भाव पावणेचाराला येऊन नक्की भिडेल असा माझा तरी होरा आहे. त्या वेळी मात्र तुम्ही एकदम थांबा. कोणी विकायला आलाच तर त्याला तीन रुपयांपर्यंत खाली ओढून मागा. मी आपला थोडेथोडे आणखी विकत राहतो. भाव एकदा पावणेचार, तीन दहा आण्यांपर्यंत जाऊन भिडला, की मग मात्र तुम्ही हळूहळू पाचशेपाचशे आणखी खरीदा. असे आजच्या दिवसात मी माझ्यातले जवळजवळ अडीच हजार शेअर्स विकलेले असतील, तर तुम्ही आपल्या नवीन व्यवहारामधले दोन-सव्वादोन हजार शेअर्स, सरसकट पावणेचार-चार रुपये भावाने खरीदलेले असतील! समजलं?"

त्यांच्या त्या बोलण्यातून मला अस्पष्टशी काहीशी कल्पना होत होती, तरी बऱ्याचशा अनभिज्ञ नजरेनेच त्यांच्याकडे विस्मित मनाने पाहत होतो व सारे ऐकत होतो.

तोच रावजी पुन्हा म्हणाले, "अहो, त्याचं असं आहे सारं, आनाबापू, की बाजारात डमडम कॉरोनेशनबाबत कालपासून आधीचाच एक घबराट निर्माण झालेला आहे नि आज संध्याकाळपर्यंत यातूनच तो खूप वाढलेलाही असेल. अर्थात मग उद्या सकाळी बाजार उघडल्यावर तासाभरातच आपल्याला सव्वातीनचा भाव मिळेल, असा माझा धोरणी अंदाज आहे. प्रत्यक्ष तिथं काही झालं तरी अधिक वाट मात्र आपण मुळीच पाहायची नाही. आजच्या माझ्या शेअर विक्री भरपाईचे अडीच हजार नि आपल्या दोघांच्या या आज नव्याने ठरलेल्या भावी व्यवहारातले ठरलेले अडीच हजार असे एकूण पाच हजार शेअर्स तुम्ही उद्या सकाळी बाजारात जाताक्षणीच असलेल्या हजर भावाने विकत घेऊन टाका. हा डमडमचा बाजार-घबराट उद्या दुपारपर्यंतपेक्षा अधिक काळ निश्चित टिकणार नाही. अहो आनाबापू, त्या बेट्या गब्बर बनियांच्या हातांतले सारे डमडम आपल्या दाक्षिण्यांकडे आले पाहिजेत! म्हणून माझे पूर्वीचे पाच रुपये भावाचे उरलेले हजार शेअर्सही मी माझ्या हातात तग धरूनच बसणार आहे! ते मी कोणाच्या काकालाही सोडणार नाही आहे! आलं तुमच्या ध्यानात?"

*

अर्थशास्त्र घेऊनच मी पदवीधर झालो होतो, पण रावजींचं हे सारं प्रत्यक्ष घबराटतंत्र, आडाखे नि एकूण विद्युत्झपाटा मला तरी साफ साफ नवीनच!...ते सारंच मला अगदी स्वप्नवत नि अशक्यप्रायच वाटत होतं.

रावजींनी सांगितलेला प्रत्येक शब्द नि शब्द मनात घोळवीत काही वेळ मी गप्पच राहिलो. अखेर न राहवून मी त्यांना विचारलं, "पण मग रावजीसाहेब, हे सारं काही तुम्हीच एकटे जाऊन का करीत नाही? यातलं सारं धोरण तुमचं, सारे अंदाज तुमचे,

अधिकांश रक्कमही तुमचीच! मग माझ्यासारखा त्यातला पुरा अनभिज्ञ माणूसही आणली कशाला हवाय तिथं जायला? ठरल्याप्रमाणे तुमच्याकडे मी तेवढी रक्कम आत्ताच आणून देतो. मग तर झालं की नाही!"

"छ छ छ!" अतिशय उतावीळपणे रावजी मला एकदम म्हणाले, "अहो हीच तर सारी मखली आहे आनाबापू या व्यवहारामधली! तिकडे मी विकणार ना, म्हणूनच तुम्हांला—म्हणजे आपल्याला—कमी भाव मिळणार उद्या! माझ्या व्यवहारात आज मी गमावणार किती, नि उद्याच्या तुमच्या मार्फत होणाऱ्या त्या आपल्या नव्या व्यवहारात आपण—मी—कमावणार एकुण किती, याचा जरा संथपणे हिशेब तरी मांडा आधी! म्हणजे तुम्हांला नीट समजेल, की, या केवळ एकाच दिवसात मी हजारांवर कमावलेलेच असतील! अहो ते सारंच 'बैलोबा नि अस्वल' यांचं राजकारण आहे! त्याच दोहोंची ही गपचुप गपचुप चालणारी चुरशीची कुस्ती तुम्हांला एकदम नाही नीट समजायची! मला तर आमच्या बाजारात सारेच लोक ओळखतात, मग मीच हो आता कसा एका हाताने विकू?...नि पुन्हा तसे दुसऱ्या हाताने खरीदू तरी कसा? आपल्याला तर उद्याच्या उद्या पुरी रक्कम भरून, सगळे शेअर्स सेफमध्ये टाकायचे आहेत!"

नाटकी पद्धतीने तसं बोलता बोलता– क्षणकाळ थांबून नि स्वप्नाळू चेहऱ्याने कुठं तरी शून्यात दृष्टी रोखून पाहत अखेर रावजी आनंदाने गदगदून म्हणाले, "नि पुरा पुरा विश्वास ठेवा माझ्यावर तुम्ही आनाबापू! येत्या एक तारखेपर्यंत आपला हा 'डमडम कॉरोनेशन' पुन्हा एका उंच सिंहासनावर चढून बसेल!—थेट साडेपाच-पावणेसहा-पर्यंत चढेल! पण हे तर काहीच नाही, दोस्त! दोन महिन्यांनी तर 'डमडम'ची आपली दुदुंभी पुन्हा एकदा मोठ्याने गर्जायला लागेल— तेव्हा तर तो थेट सातपर्यंत चढत जाईल. आण्या दोन आण्यांचा फरक सोडला तर माझे हे धोरण, माझा हा अंदाज, अगदी सोळा आणे बरोबर ठरल्याशिवाय मुळीच राहणार नाही. त्याहूनही थोडा अधिक भाव घेतलात त्या वेळी तुम्ही आनाबापू, तर मग काय, शिकंदर नशिबाचेच म्हणायचे तुम्ही!"

"असं?" त्यांच्या त्या कल्पनासृष्टीत आता मी पुरताच रंगून जाऊन उद्गारलो.

तोच रावजी चुटचुट टिचक्या वाजवीत म्हणाले, "बरं तर, उठा! झटपट चला! आपल्याला आता लागलीच निघालंच पाहिजे. नऊ-वीसची डबल फास्ट गाडी आहे! ती पकडून जायला हवंय आपल्याला! तेव्हा गेल्या पावलीच घरून परता तुम्ही, बरं का? आपलं जेवण आत्ताच तयार आहे! येता क्षणीच इथंच जेवू नि नि तडक निघू! गाडीत आणखी उरल्यासुरल्या सूचना देईन मी तुम्हांला. घेलाभाईला कुठं भेटायचं, काय करायचं—सारं सारं सांगतो! अं? पण मग एक बरं का, आनाबापू! घाटकोपर गेलं की वेध लागतील... व्ही. टी. वर उतरलो की आपण ओळखतसुद्धा नाही एक-मेकांना! तुमचा मार्ग तुम्ही, माझा मी! संध्याकाळी घरी आल्यावर मगच काय ते बोलायचं आपण! हे बनिये लेकाचे 'ता'वरून ताकभात समजतातच. नव्हे, जेवून-

देखील टाकतात. वाण्याच्या पुडीच्या कच्च्या सुतावरून थेट स्वर्गातल्या इंद्रासनावरच उडी मारतात! तेव्हा सावध! चला! उठा! पळा! आधीच उशीर झालाय!"

*

प्रत्येक मनुष्य नेहमी किती एकांगी आयुष्य जगत असतो, हे ज्याचं त्यालाही कधीच समजत नसतं, हेच खरं!

आपण भोगतो तीच सुखं, तीच दुःखं, आपण करतो तोच धंदा, आपण नेहमी जेवढ्या जेवढ्या टापूंना रिंगण घालतो, तेच तेवढं आपलं जग! नि आपण ओळखतो तीच माणसं, तीच काय ती चांगली! ज्याला जग म्हणतात ते तेच सर्व काही! असंच नेहमी त्याला वाटत असतं. तो जे जगतो, नि ज्यात जगतो, तेच फक्त जग व ते तेवढ्याच गोष्टींनी भरलेलं असतं, असंच तो सदैव समजतो!

पण मग असले काही प्रसंग घडले, तो क्षणभर आपल्या नेहमीच्या जगापासून निराळा झाला, त्याच्याकडे परिस्थितीनुरूप एकदम एका त्रयस्थपणे तो पाहू लागला, की त्याला एका निराळ्याच, नव्याच, भव्य–अफाट विश्वाचं दर्शन घडतं!

अशा वेळीच आपल्याला पटतं— "आपण म्हणत होतो त्या जगाहून किती तरी विविध, विचित्र असं हे प्रत्यक्ष जग आहे. त्या एकाच जगात, अगदी डब्यात डब्या-प्रमाणे हजारो लहान लहान जगंच लपलेली आहेत! ते प्रत्येक लहान लहान जग! त्यात राहणारे, सुखदुःखं भोगणारे, ईर्षा बाळगून, महत्त्वाकांक्षा कवटाळून, अहोरात्र त्यातच धडपडत जगणारे प्राणी! आपल्याप्रमाणेच, केवळ त्या त्या जगालाच मिठी मारून, तेवढंच एकूण जग असं समजून, ते वागत असतात, नि त्या कल्पनेतच ते अखेरपर्यंत जगून— मरतात, मरून जातात!"

*

'डमडम कॉरोनेशन'साठी रावजींबरोबर, त्यांच्या स्फूर्तीने नि माझ्या पायांनी मी तसल्याच एका— मला पूर्णपणे अपरिचित अशा—नव्या जगात जगात शिरलो!

तसं प्रथम आत शिरतानाच एकदा काय तो मी भांबावलो, त्यातलं सारं कळेपर्यंत काही काळ विचलित मनाने, बिचकत बिचकतच मी बावरलो. पण तेवढंच काय ते! त्यानंतर अखेर अखेर ते नवं जगच मला उलट, बहुतांशी माझंच नित्य जीवन वाटू लागलं. त्यातून बाहेर पडायलाच उलट माझे पाय घुटमळू–लटपटू लागले!

त्या दिवशी रावजींनी दिलेल्या साऱ्या सूचना तंतोतंत ध्यानी ठेवून मोठ्या अक्कल-हुशारीने मी बाजारातली प्रत्येक लहानसान हालचाल केली, आणि आश्चर्य असे की, त्यांच्या गुरुमंत्रानुसार, मला स्वतःला समजला नाही इतका मोठा गोंधळ मी तेथे माजवून सोडला.

रावजींच्या आगाऊ ठरलेल्या साऱ्या आडाख्यांप्रमाणेच डमडमच्या बाजारामध्ये

चढउतार झाला. दुसऱ्या दिवशीच्या पाच हजार शेअर्सच्या खरेदीवेळी, अगदी सव्वा-तीनच नाही पण '३ रु. ६'चा भाव आम्हांला मिळाला. सारी रक्कम आधी ठरल्या-प्रमाणे रोख भरून मी डिलिव्हरी घेतली नि तसा तडक रावजींच्या घरी गेलो नि त्यांची तिथं वाट पाहत बसलो.

पाठोपाठच्या गाडीलाच रावजी परतले. आले ते अगदी मनापासून तोंडभर हसत गद्गदतच— "कसं काय, आनाबापू? द्या टाळी! सोळा आणे काम फत्ते! शुभलक्षणी पायगुण तुमचा! मात्र, दोन महिने फिरकूही नका आता या बाजूला, बाजारात तर डुंकूनदेखील पाहू नका. रोजच्या रोज टाइम्समधे तेवढी 'डमडम'ची न विसरता भेट घ्या, बरं का? हो, आणखी दुसरं एक—काहीही वाचलंत, तरी कसलाही विचार मनात आणू नका. घोडामैदान जवळच आहे—दृष्टिपथातच आहे! पण मग, तुमचे सहा हजार मलाच देऊन टाकले आहात तुम्ही, हेही ध्यानी ठेवा! चला तर, आता रोजच्या उद्योगाला लागा आपल्या!"

तिथला चहा-फराळ झाल्यावर मी घराकडे निघालो—नव्याच एका उत्साहाने मी माझ्या घरात प्रवेश केला त्या दिवशी!

*

आता मात्र खरोखरच माझी दोन जगं झाली होती. जीव दोन ठिकाणी विभागल्यागत मला वाटू लागलं होतं. तथापि प्रत्यक्ष देहाने मात्र मला अजूनही नव्या नव्या कॉन्ट्रॅक्ट कामांच्या व्यापातच दिवसचे दिवस घालवावे लागत होते. लोकांची देणी द्यावी म्हणून, चालू व्यवहार अधिक सुरळीत करता यावेत म्हणून, मोठ्या काटकसरीने जी कशीबशी हाती जमा झाली होती ती सारीच्या सारी रक्कम, त्या क्षणी तरी, मी पुन्हा एकदा तशी वाऱ्यावरच उधळली होती नि तिच्या पाठीच माझा जीव, गटंगळ्या खात, हवेवर भरारत होता...

वास्तविक रावजींचे नि त्यांच्यासारख्या हजारो इतरांचे लाखो रुपये तसे त्या वेळी वाऱ्यावर पडले असतील, पण माझी मात्र प्रयासाने गोळा झालेली ती छोटीशी रक्कमही त्या वेळी तरी मला कोटिमोलाचीच होती! ती मला स्वस्थ झोप कशी बरं पडू देणार? काही झालं नि रावजींनी कितीही धीर-विश्वास दिलेला असला, तरी माझे डोळे तिच्या भवितव्यावरून हलूही शकत नव्हते! त्या प्रांतातला केवळ एक नवखा, नवशिका मुसा-फिरच होतो मी!

आमच्या खरेदीच्या वेळी बाजाराला लागलेला तो उतार आणखीही दोनतीन दिवस तरी चालू होता. तासभरच का होईना, 'डमडम' तिसऱ्या दिवशी, एकदा '२-१' झाल्याचंही वाचताच, माझ्या जीवाची तर काही काळ कालवाकालवच झाली— 'थांबलो असतो तर?' हा एक विचार, नि 'आता आणखी काय होणार?' हा दुसरा विचार! पण आठ दिवसांनी भावाचा काटा पुन्हा वर वर चढू लागला—पुन्हा एकदा ४, ४-४,

४-६, ४-१०, ४-१५ असं करीत वीस-पंचवीस दिवसांनी तो सव्वापाचपर्यंत वर वर पोचला, नि पंधरवडाभर तो तसा तिथेच स्थिरावला.

त्या प्रत्येक दिवशी माझ्या मनात हजार विचार येऊन जात. मी पुन्हा पुन्हा हिशेब, आकडेमोड करून पाही. इतक्यात भाव पुन्हा घसरत ५-१, ५ कडे झुकला. त्याला पुन्हा लागलेला तो उतार पाहून मात्र माझी छाती धडकली. वाटलं, लागलीच धावत जाऊन सारे विकावेत. गुंतलेली, धोक्यात पडलेली रकम नि वर अडीच-तीन हजार तरी या वेळी हाती येतील!

वरकरणी हसत हसत, दुसरंच एक मामुली काम काढून मी रावजींच्या बंगल्याच्या पायऱ्या चढलो. मनात मात्र भरपूर चलबिचल होती.

ते आपल्या दुसऱ्याच कसल्या तरी व्यवहाराच्या गडबडीत होते. तरीदेखील मला समोर पाहताच मिस्कीलपणे ते हसले नि मला म्हणाले, "हं—बोला! का आलात इकडे, आनाबापू? पण मी सारं समजलोय ते! तरी पण, गुपित सांगू? ३-१ झाला, तेव्हा मी तर उलट आणखी दीड हजार शेअर्स घेऊन ठेवले आहेत स्वतःसाठी! अहो, तो आपल्या खरेदीवेळचा माझा खड्डा भरून काढायला पाहिजे होता ना मला! तुम्ही विचारण्या-सांगण्यापूर्वीच सांगतो मी, विक्रीमधे तुमचा आज थोडा फायदा दिसत असला, तरी मी म्हणतोय तो पैशाचा पाऊस पुढे आहे! जा, आधी घरी जा गपचूप! तुमच्या इतर कामाला लागा! आता तर 'डमडम'वर घट्ट बसूनच राहा. माहीत नाही तुम्हांला, अहो त्या कंपनीचा डायरेक्टर बोर्ड बदललाय गेल्या आठवड्यात...नि त्यांचं प्रॉडक्शनही वाढलंय! त्यांच्या मालाला बाहेरूनही मागणी आहे...मशिनरीही नवी घेऊन आता बंदरावर पडलीय नुकतीच! अहो, केवळ त्यांच्या मागल्या डायरेक्टरांच्या आपापसातल्या भांडणा-बखेड्यांमुळे नि लाथाळ्यांमुळेच मधला तो चार-आठ आण्यांचा भाव गडगडला होता, एवढंच! तसल्या तात्पुरत्या चढउतारावर काय जाता, बापू? पण मग, आता... शेवटचं तुम्हांला आठवणीदाखल एक सांगायला हवं अनाबापू— अहो ती सारी रकम तुम्ही विश्वासाने मला देऊनच टाकलेली आहे ना, व्यवहाराप्रारंभीच? मग आता आपल्या मनाचा मध्येच हा गोंधळ करून घ्यायचा तुम्हांला हो कुठला नि कोणी दिला अधिकार?"

मी एका नव्या धीरानेच पुन्हा घरी परतलो. एका हुशार डॉक्टराचंच बेमालूम इंजेक्शन होतं ते!

*

आणि खरोखरच दीड-दोन महिन्यांत ते सारं पुन्हा अद्भुतपणेच पालटत गेलं. त्या महिन्याभरातच ४-१२, ४-१५, ५-३, ५-८, ५-२, ५, ५-१४, ६-१, ६-५, ६-१२, ७-४, ६-१०, ७-१३, अशी विविध हालचाल करीत अखेर 'डमडम' ७-१५ वर स्थिर होऊनच राहिला.

माझ्या अंगावर आता मूठभर मांस चढल्यासारखं झालं होतं. रावजी म्हणाले होते, "दहाचा शेअर! तो दहापर्यंत जाणारच!" त्या शब्दांची आठवण नि ते प्रत्यक्ष-दृश्य! कसं न कळे, 'अगदी बिनधोक धंदा' या नव्या दृष्टीनेच मी माझ्या त्या एकूण गुंतवणीकडे त्या क्षणी तरी पाहू लागलो होतो. 'डमडम'च्या त्यापुढील भाववाढीकडेही अगदी डोळे लावून बसलो होतो. तो एकाच ठिकाणी बैठक मारून बसल्याचा मला संतापही येत होता मनातल्या मनात. कारण खरेदीला सहा महिने होत आले होते.

या सगळ्या काळात मी रावजींकडे फिरकलोही नव्हतो. माझी बांधणीची एकापाठोपाठ एक कामं चालूच होती. शिवाय, ते सारं सुरळीत-सुरक्षित दिसतच होतं एकूण! मग रावजींकडे जाण्याचं काय कारण, असं वाटे मनाला त्या वेळी...

काय पण गुंतागुंतीचं नि गमतीदार मन असतं माणसाचं!

पण अखेर, उलटं आश्चर्य घडलं! 'समक्ष भेटीला या' असा मला रावजींकडूनच निरोप आला. मी गुपचूप तिकडे जाऊन पोहोचलो.

तिथं मी पोचलो, तेव्हा रावजी फारच खुषीत होते. मला पाहून ते हसत हसत म्हणाले, "या आनाबापू!...काय म्हणतोय तुमचा 'डमडम'? बोला! काय करायचं आता? अगदी भेटीला देखील आला नाही तुम्ही बरेच दिवस! म्हटलं विचारून घ्यावं—"

माझा तर आशावाद त्या वेळी पराकोटीला पोचला होता. जशी काय साहजिक गोष्ट, अशा प्रकारे मी त्यांना चटकन् म्हणालो, "नऊ-सव्वानऊ रुपये होईपर्यंत आता जरा पंधरवडा तीन वार तरी वाट पाहू या की!"

त्यावर रावजी खो खो हसले नि म्हणाले, "वाः वाः! तीन महिन्यांपूर्वी माझ्याकडे जीव मुठीत घेऊन आलेलेच का हे आनाबापू? पक्के दर्दी सटोडिया झालात की इतक्यात! पण संभाळा बरं! जपून टाका पाऊल पुढलं—कडेकपारीमधला तोल!"

मी चपापलो, ओशाळत हसलो, पण तेवढ्यात बोलताबोलता एकदम थांबून, काहीसं गंभीर होत रावजी माझ्या खांद्यावर हात टाकीत म्हणाले, "तसं नाही बरं, आनाबापू! आता मी सांगतो तेच ऐका. ऊस गोड लागला म्हणून मुळापासून खाण्यात नि तोंडात माती घालून घेण्यात मुळीच अर्थ नसतो! वेळेवर जागा होतो तोच जगातला शहाणा! थोडक्यात गोडी! तुम्हाला नऊ महिन्यांत शंभर टक्के व्याज मिळवून द्यायचं कबूल केलं होतं मी!— हे तर सहा महिन्यांतच तेवढं आलंय! म्हणजे... हे आपलं दोनशे टक्के सुद्धा जमलंच! असं आहे बापू, कलकत्ता बाजारवाले चलाख आहेत. त्यांचा दुसराही काही डाव असण्याचा देखील संभव असेल! तेव्हा म्हणतो, जपून!"

एखादा मनुष्य एखाद्या कल्पनेने एकदा भारलेला असला की, तो सर्व बाजूंनी आपल्या सभोवार पाहूच शकत नाही. माझं तसंच झालं होतं. त्यामुळेच, मला उलट रावजींची त्या वेळची ती चलबिचलच अनपेक्षित वाटू लागली होती. मी गप्पगप्पच त्यांच्याकडे पाहात राहिलो होतो.

क्षणभराने रावजी थंडपणे म्हणाले, "आता अगदी आठाच्या भावाची देखील वाट पाहायची नाही, बरं का आनाबापू! म्हणजे, माझ्यामधले निम्मे नि तुमच्यातले फक्त अडीचशेच शेअर्स मागे ठेवा. बाकी साऱ्यांची आजच्या आज, असेल त्या भावाने आधी रोकड करून टाका. माझी सारी रक्कम नि तुम्ही मला दिलेले सहा हजारही संध्याकाळी पुन्हा माझ्याकडे आणून द्या. तुमच्या फायद्याची रक्कम तुमची बहुतेक कर्जे भागवायला पुरेल, मला वाटतं. ती देणी उद्याच्या उद्या ज्यांना त्यांना देऊन टाका नि त्यांच्या पक्क्या पावत्या मला आणून दाखवा! यातलं एक अक्षरही नाही विसरायचं! माझ्याकडल्या सहा हजारांचा व्यवहार पुरा नाही झालेला अजून, आनाबापू—"

ते ऐकत त्या क्षणी मी रावजींकडे टकमका पाहतच राहिलो.

त्या अद्भुत यशाने जिथं आणखी थोडं थांबण्याचा एक अनावर मोह होत होता. तिथं, त्याच परिस्थितीत नेहमी बेछूटपणे वागणारा तो प्राणी— ऐन वेळी आपल्या नि माझ्या मनाला ब्रेक तरी कसा घालू शकतो एकदम? त्याचंच मला मनात नवल वाटत होतं राहून राहून.

खरं म्हणजे रावजींच्या त्या जबाबदार वृत्तीचं मनात अतिशय कौतुकच वाटत होतं. त्यांच्याबद्दलचा एक प्रकारचा अद्भुत आदरच वाटत होता.

म्हणूनच त्यांच्या त्या साऱ्या सूचना मला अगदी आदेशसमानच वाटल्या. तंतोतंत त्याबरहुकूम सारं करून मी त्यांची सारी रक्कम व माझे मूळ सहा हजार रुपये त्यांच्याकडे नेऊन दिले. बहुतेक कर्जमुक्ततेच्या पक्क्या पावत्यादेखील दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत ठरल्याप्रमाणे मी रावजींना नेऊन दाखवल्या.

*

ते सारं काही नीट पार पडल्यावर, चहा पिता पिता, माझ्याकडे हळूच हसून पाहत रावजी म्हणाले, "कालच्या माझ्या थोड्या कठोर वागणुकीबद्दल वाईट मात्र वाटून घेऊ नका, बरं का आनाबापू! मला गत्यंतरच नव्हतं दुसरं! तुमचा मी एकप्रकारे या व्यवहारातला रक्षक आहे, असंच वाटलं मला त्या वेळी. अहो आपल्याबरोबर दुसऱ्यांचीही डोकी भडकवायला मी काही एखादा मूर्ख मनुष्य नव्हे, की अजून एखादी सोनेरी टोळीही नाही काढलेली मी! मग तसं— अधिक मोहजालातून तुमचं रक्षण करणं हे माझं आद्य कर्तव्यच नव्हतं का?"

ते सारंच तसं एकदा होऊन गेल्यावर, रावजींबद्दल माझ्या मनात खरीखुरी नितांत कृतज्ञताच उरली होती!

नि तसंच मी काही शब्दांत बोलणार, इतक्यात रावजी आपल्याशीच एकदा मोठ्याने खुदखुदले.

एकदम चमकून मी त्यांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहू लागलो. तेव्हा ते म्हणाले, "पण मग आता एक अगदी गुपित, ग्यानबाची मेख सांगतो हं तुम्हांला मी! आता

हरकत नाही सारं काही सांगायला."

"कसली बुवा?" मी अधिकच आश्चर्यचकित झालो.

"अहो आनाबापू! मुळचे हजार नि ३-१ ने घेतलेले दोन हजार, असे तुम्हांला माहीत नसलेले एकूण ३००० 'डमडम' माझ्याकडे माझ्या मालकीचे आहेतच अजूनही सुरक्षित शिल्लक! दहापर्यंत भाव नक्की होणार दोनतीन महिन्यांत, असा अजूनही पुरता भरवसा आहे मला!" आपले डोळे मिचकवीत, मोठ्याने दिलखुलास हसत रावजी मला म्हणाले.

"का ऽ ऽय ??" मी तर साश्चर्य ओरडलोच.

"होय! साक्षात खरी गोष्ट ही! पण माझं वेगळं, आनाबापू! मी सांगून-सवरून सटोडिया आहे!" रावजी स्मित करीत संथपणे मला पुढे म्हणाले, "मात्र अजूनही सहा महिने हे तुमचे सहा हजार तरी माझ्या हातात आहेतच, आपल्या पूर्वी ठरलेल्या योजनेप्रमाणे, बापूसाहेब! त्यातनं आता काय काय होऊ शकतं तेही पाहू. पण आता मात्र शॉर्ट टर्म धंदा करायचा, बरं का आना! डोळ्यांत अगदी तेल घालून राहा. कारण हा वायद्याचा धंदा म्हणजे, थोड्या फरकाच्या जास्त हालचाली करूनच हाताळायचा असतो. दिले-घेतले, दिले-घेतले! नुसती बेरीज-वजाबाकी! तसंच सारखं अव्याहत चक्र चालवायचं रोजच्या रोज, नि हिशेबाच्या वेळी मात्र बाजारात आपली पत राखायला रोख रकम जय्यत ठेवायची आपल्यापाशी! याला जास्त रोकड गुंतवायला नको आनाबापू, तेव्हा तुमच्या रकमेचे आपण तीन भाग करून टाकू या- गव्हर्मेंट पेपर, सोनंचांदी नि इतर परचुटण शेअर्स— काय समजलेत? रोज तुम्हांला माझ्याबरोबर यावं लागेल मात्र आमच्या बाजारात, न चुकता, दोन दोन तास तरी—"

आणि मग दुसऱ्या दिवसापासून त्यांच्याबरोबर बाजारात जाऊन चार-आठ आण्यांच्या फरकाने मी सोनं-चांदी खरेदी-विक्री केली. रुपया-दीड रुपयाच्या चढ-उताराने निरनिराळ्या कंपन्यांचे शेअर्स वायद्याने दिले-घेतले. आण्या-दोन आण्यासाठी ग. प्रॉ. नोटी हलवल्या. असा व्याप वाढवला व त्या व्यवहारातूनही मला चांगलीच आवक होत गेली.

पण त्यातलं खरोखरीचं आश्चर्य असं होतं, की बाजाराच्या दैनंदिन भेटीतून, पाहणीतून, माझंही लक्ष त्यात अधिकाधिक गुंगू लागलं. मी त्यात जसजसं लक्ष घालू लागलो, तसतसं मला त्यातलं एकेक जास्तच समजू लागलं, दिसू लागलं...नवी नवी क्षितिजं माझ्या डोळ्यांपुढे उभी राहू लागली. रात्रंदिवस तेच धोरणी हिशेब, आकडे-मोडीचे व्याप माझ्या मनाला भारून टाकू लागले. असली धोरणं बांधताना, माझ्या अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा नि अवांतर वाचनाचा मला अगदी हरघडी उपयोग होऊ लागला. कधीकधी वायद्यांच्या धोरणाबाबत रावजींशीही माझा प्रामाणिक पण तीव्र मतभेद होऊ लागला. जणू काय, अगदी जन्मापासूनच ते जग माझंच होतं, असंच आता माझ्या नकळतच मला वाटू लागलं...

आणि असल्याच गोड मनःस्थितीत नि धुंदीत माझं मन गुंग असताना, एके दिवशी सकाळी रावजींनी मला पुन्हा एकदम एक प्रचंड धक्का दिला!

*

नेहमीप्रमाणेच आम्ही बाजाराकडे जायला गाडीत बसलो होतो.

तोच, आमचं चालू हिशेबी बोलणं मधेच एकदम तोडून अत्यंत गंभीरपणे रावजी मला म्हणाले, "हं आनाबापू, आज बरोबर एक वर्ष पुरं होतं— आपलं आधी ठरल्याप्रमाणे! तुम्हांला मी विश्वास ही चीज दाखवली, धोरणं नि आडाखे बांधायच्या या रोमहर्षक राज्यात माझ्या संगतीने माझा हात धरून तुम्ही शिरला, शिरसलामत फिरला! त्या एका नव्या अपरिचित जगात देखील, आपल्या पदराला कसला खार न लागता, किंबहुना, भरपूर यश नि फायदा उठवूनच तुम्ही एवढा वेळ वावरला! तुमच्याही नशिबाची मोठी खैर! कर्जमुक्त होण्याची तुमची तीव्र मनीषाही केवळ सात-आठ महिन्यांत पुरी झालीय! हे सारं सारं खरं! तरी पण, आनाबापू! हे काही तुमचं जग नव्हे, हा तुमचा खरा धंदा नव्हे! तो जसा अमाप यशाचा आहे तसाच नि तितकाच भरमसाट धोक्याचाही आहे! केवळ योगायोग जरी नाही, तरी थोड्या आश्चर्यकारकच घटना होत्या या सान्या! म्हणजे असं, बापू, प्रथमपासून आतापर्यंत आपण फक्त यशातच खरली भागीदारी केली! आणि म्हणूनच, तशा यशस्वी स्थितीतच, आपलं वर्षापूर्वी ठरल्याप्रमाणे, आपण ती आजच्या आज, संध्याकाळीच संपवणार आहो. तशी संपवलीच पाहिजे आपल्याला ती! फक्त यशाचाच तेवढा मार्ग नेहमी दाखवणारा मी कोणी जादूगार नव्हे की ब्रह्मदेवही नव्हे!— तर मग आनाबापू, हे सारं असं इथंच नि या क्षणीच ठरलं, बरं? टुडे अँड नॉट टुमॉरो! दस फार!...ॲन्ड नो फर्दर! ऐकून घ्या आनाबापू! उद्यापासून तुमचा हा शेअरबाजार साफ बंद! समजलं नीट? आपलं तसं पूर्वीपासूनच पक्कं ठरलंय."

कित्येक नव्या नव्या आशा, आडाखे नि धोरणं माझ्या मनात तर स्वैरपणे धिरट्या घालीत होती, अशाच अगदी ऐनवेळी रावजींनी एकाएकी तसं म्हटलं, ठरवलं, सांगितलं! अगदी कठोरपणे एका घावात दोन तुकडेही केले होते! म्हणूनच त्या वेळी मला, आपण हजारो योजनं घरंगळून खाली पडल्यासारखंच वाटलं!

*

वास्तविक भरारूनच गेलेल्या त्या वर्षभरात रावजींनीच मला नवा विश्वास, नवा धीर, दूरधोरण, सारं सारं दिलं होतं, केवळ त्यांची उत्स्फूर्त इच्छा म्हणूनच त्यांनी स्वतः-बरोबर मलाही हजारो रुपये कमावून दिले होते. आणि सुरवातीसच स्वतःला घालून घेतलेल्या काटेकोर मर्यादांप्रमाणे रावजी आज मला तसं मागे ओढीत होते नि माझ्या पूर्वीच्या परिचित जगाकडे पुन्हा वळायचा मला ते आग्रह करीत होते, उघड उघड तसं

भागच पाडीत होते.

पण मग त्या धंद्याची ती चटकच अशी काही लोकविलक्षण की, त्या क्षणी मला उलट वाटत होतं, " काय करावं बुवा या रावजींना ! ही तर माझी नुसती सुरवातच झालीय आता कुठं ! "

माझा तो कैफ काही केल्या उतरतच नव्हता. कारण वर्षापूर्वी रावजींना जसा ' डमडम 'चा पुरा विश्वास वाटत होता, त्याचप्रमाणे एकदोन कंपन्यांच्या व्यवहाराचा, फार दूरधोरणाने, मलाही त्या क्षणी एक भयंकर आत्मविश्वास वाटू लागला होता ! म्हणूनच आता काही केल्या त्या कल्पनांवर घिरट्या घालायचं सोडून, माझं मन दूर होऊच शकत नव्हतं.

विशेषतः ' हिंदमाता शुगर ', ' भारत आयर्न ' नि ' गॉडसेन्ट सीमेंट ' या नव्याने चमकू लागलेल्या तीन कंपन्यांचे शेअर्स तर माझ्या मनात अगदी खोल खोल घर करूनच बसले होते. रोख रक्कम भरून ते ' डमडम 'सारखेच ताब्यात घेण्यात व दीड वर्ष वाट पाहण्यात मला तरी आता एक अगदी खात्रीचं सोनेरी स्वप्नच दिसत होतं ! त्यातले बहुतेक निम्म्या डिस्काउंटनेच त्या वेळी विकले जात होते, हे तर त्यातलं एक विशेषच आकर्षण होतं.

ते सारं काही मी रावजींना तपशीलवार सांगून पाहिलं. पण तितके दूरधोरणाचे अर्थशास्त्र-समाजशास्त्राचे बारकावे रावजींना माझ्यासारखे व माझ्याइतके पेलत नव्हते, पेलण्यासारखे नव्हते. त्याबाबत त्यांनी नकारात्मक निर्णयाचीच मान हलवली.

वास्तविक, त्यापुढे बांधकामात उत्तरोत्तर सीमेंट अधिकाधिक प्रमाणातच उपयोगात येईल, लोखंड-पोलादाला नव्या बदलत्या परिस्थितीचा परीस लागून त्याचंही सोनं होईल, नि स्वदेशी चळवळीच्या प्रचंड भावनात्मक उद्रेकामधून नि त्या नव्या सामाजिक स्वाभिमानाच्या लोंढ्यातून साखरेचं खाणाऱ्याला, अर्थात तसेच ते शेअर्स घेणाऱ्याला, देवच साक्षात अवतरून, सहस्र करांनी आणून देईल असा माझा तरी निश्चित धोरणी होरा होता. रावजींचं नि माझं तोंड या तीन शेअर्स व्यापातून पोळण्याऐवजी, अखेर गोडच होणार, याची मला तरी पुरी खात्रीच होती.

*

पण रावजींनी एकदा तसा नकार भरल्यावर, मी त्यांना ते सारं कसं पटवणार नि त्यांना तरी कसं पटणार ? तो उघड उघडच परस्पर तीव्र मतभेदाचाच प्रश्न ठरला होता.

अखेर त्यांनी आपला स्पष्ट निर्णयच मला देऊन टाकला– " मला आपलं वाटतं, आनाबापू, या तुमच्या व्यवहारामधे मोका कमी, धोकाच जास्त ! माझ्या मते, या फंदात तुम्ही न पडणंच बरं ! बस्स झालं येथवर जे झालं तेवढंच ! "

पण मग त्या वेळी माझीच उलट अधिकारवाणीने बोलण्याची पाळी आली होती. मी तितक्याच आत्मविश्वासाने रावजींना म्हणालो, " रावजीसाहेब, आपल्याच विश्वासावर,

या वर्षात मुख्यतः आपल्याच धोरणाने, नाही नाही तरी बारा–पंधरा हजार नुसते फायद्याचे कमावले मी ! तेच सगळे मी यात टाकत असतो या वेळी, माझ्या आत्म-विश्वासावर, तर तुमचा निदान निम्मा फायदा तरी माझ्या विश्वासावर, माझ्याबरोबरच नाही का गुंतवणार तुम्ही ?– फक्त दीड वर्षासाठी ? ? माझ्या शब्दाखातर ? ”

क्षणकाळच रावजींचे डोळे चमकले नि मग शेवटी ते म्हणाले, “ बरं तर ! आनाबापू, केवळ तुमच्या विश्वासाला, तुमच्या शब्दाला मान देण्यासाठीच अगदी दीड वर्ष, दोन वर्षे मी माझ्या त्या मिळालेल्या फायद्याच्या रकमेची मागणी तुमच्याकडे करीत नाही. झालं ? मात्र एक—मला तुमचा तो फायदा नको नि तो तोटाही नको धंद्यातला ! बरोबर दोन वर्षांनी, तुम्ही मला माझी ती सारी रोख रक्कम तेवढी परत आणून द्यायची ! किंवा एक घर तरी बांधून द्यायचं ! आहे कबूल ? ही आजची तारीख लक्षात ठेवा हं बरोबर ! ”

“ एकदम कबूल ! रावजीसाहेब, हे घ्या, दिलं वचन ! ” मोठ्या आनंदाने व ईर्षेने त्यांच्या हातावर हात ठेवून मी पटकन म्हणालो, “ नि तारीखही ठेवली लक्षात— ”

“ हो, पण — एका अटीवर आणखी—” रावजी उठता उठता म्हणाले, “ अगदी या क्षणापासून तुमचं तुमच्या मूळ धंद्यावर एक क्षणभरही दुर्लक्ष होता उपयोगी नाही ! मीच एकदा सांगितलं होतं ना ? तर मग मीच आता हे पुन्हा तुम्हाला सांगतोय—हा तुम्ही म्हणताहा तो शेअरखरेदीचा व्यवहार पुरा झाला, तुम्ही ती डिलिव्हरी घेतलीत, की यापुढे तुमचा रोजचा शेअरबाजार नि तो धंदा आता साफ बंद ! कबूल ? तेही वचन मला आताच्या आताच देऊन टाका पाहू, आनाबापू ! ”

काहीशा विचलित अंतःकरणाने नि काहीशा नाराजीनेच—पण अखेर आधी ठरवलेलंच असल्यामुळे, नाइलाज होऊनच, मी रावजींना चाचरत चाचरत म्हणालो— “ कबूल, रावजीसाहेब ! तेही दिलं वचन—हे घ्या ! यापुढे रोजचा शेअरबाजार बंद ! ”

*

मग दुसऱ्या दिवशी, ठरल्याप्रमाणे, रावजींचे माझ्याकडे अजून बोलत असलेले फायद्याचे अठरा हजार व माझे नऊ हजार, असे एकूण सारे–‘ हिंदमाता शुगर ’, ‘ गॉडसेंट सीमेंट ’ व ‘ भारत आयर्न ’ या तिघांमध्ये विभागून मी गुंतवले नि तडक घरी परतलो.

असा माझा शेअर बाजार ! जसा रावजींमुळे तो सुरू झाला होता, तसाच रावजींना दिलेल्या वचनाप्रमाणेच त्या दिवशी तो कायमचा संपला !

वाचता वाचता सदानंद थांबला. त्याने हसून साभिप्राय मंगलेकडे पाहिलं.

"केव्हापासून मला राहून राहून वाटतंय मनात–" मंगल हळूच म्हणाली, "आनांच्या आयुष्यातल्यासारखे प्रसंगच गेल्या दीडदोन वर्षांत तुम्हांला पुन्हा भेटायला येत गेले आहेत, अजून येताहेत."

"होय, मंगल..." सदानंद गंभीर होऊन म्हणाला, "माझ्या जन्मापूर्वीच्या, आनांच्या आयुष्यातल्या या गोष्टी ! नि तू म्हणते आहेस त्या, आपल्या अनंताच्या जन्मापूर्वीच्या, माझ्या आयुष्यातल्या—"

सदानंदच्या त्या उद्गारांनी मंगला किंचित चपापल्यासारखी झाली. बऱ्याच वेळाने आठवण होऊन ती जागची उठली नि अनंताच्या पाळण्यापाशी गेली. तिने बाळाचं अंथरूण–पांघरूण चाचपून पाहिलं, नि पुन्हा त्याला गुडूप पांघरूण घालून ती सदानंदा-जवळ टेबलापासच्या खुर्चीवर बसली.

तोवर सदानंद उठून, जवळच्या आरामखुर्चीवर विसावत पसरला होता.

मंगला जवळ येताच तो गंभीर हसला नि म्हणाला, "अनंताची आई त्याला नुकतीच भेटून त्याच्यावर वात्सल्याचा हळुवार हात फिरवून आली. आता यापुढे, मंगल, माझी आई मला भेटायला येणार आहे. ती गेली त्याच सुमाराला आनांनी लिहून ठेवलेलं हे सारं ! आनांची ती यशोदा—त्यांची मातोश्री अन्नपूर्णा...आनांचं ते एक हरपलेलं श्रेय...यात ओथंबून भरलेलं आहे. माझ्यावरून नि आमच्या घरावरून माझ्या आईचा हळुवार हात रोजच्या रोज फिरत असे, त्या काळच्या या आमच्या नि आनांच्या गोष्टी ! तूच वाच आता पुढलं, मंगल ! तुझ्या मंजुळ शब्दांचा आधार घेऊनच माझी आई मला भेटू दे ! इथं पडल्या पडल्या मिटल्या डोळ्यांसमोर मला ती सारी दृश्यं, ते प्रसंग प्रत्यक्ष घडत असल्यासारखे बघू दे !"

सदानंदाची मंगला त्या क्षणी आईच्याच दृष्टीने जणू पाहत होती. तो डोळे मिटून आरामखुर्चीवर पसरला होता.

त्याच्या जवळच्याच खुर्चीवर, दिव्याजवळ बसलेली मंगल, आपल्या सकंप भावमधुर शब्दांमधे समोरच्या वहीतलं वाचू लागली.

## अन्नपूर्णा यशोदा

आगंतुकपणे एकदम प्रवेश करून, केवळ वर्षभरातच, हां हां म्हणता, माझ्या मनाचा पुरा हुकमी ताबा घेणारा, तो माझ्या आयुष्यातला शेअरबाजारचा धंदा तसा एकदाचा

बंद झाला.

या घटनेचा सर्वांत जास्त आनंद झाला तो माझ्या पत्नीला—यशोदेला!

घरी आल्यावर त्या दिवशी मी तिला ते सांगताच, अगदी तोंडभर हसून ती म्हणाली, "छान! म्हणजे, आज तुम्ही पुन्हा एकदा आमच्यात आल्यासारखं... माझ्या अधिक निकट आल्यासारखंच वाटतंय!"

ते गेलं वर्ष-सव्वा वर्ष म्हणजे — मूर्त स्वरूप धारण करून अवतीर्ण झालेलं एक माझ्या आयुष्यातलं अफाट स्वप्नच होतं! आपल्या हातून स्वप्नात हालचाली तर होतात, पण त्या अमुक प्रकारे व्हाव्यात, होऊ नयेत, यावर तर आपला ताबा नसतो! तशाच प्रकारे त्या काळात मी अगदी विविध प्रसंगपरंपरेतून, मला नकळत, ढलत–चालत–झपाटत पुढे पुढे गेलो होतो.

एखाद्या मुंबईच्या माणसाच्या घराचं कॉंट्रॅक्ट मिळणं जितकं आश्चर्यकारक, तितकंच, त्यातून रावजींची भेट होणंही भयंकर आश्चर्यकारक! तो परिचय, ती दिलजमाई, माझी ती वेडर कर्जमागणी नि त्यातून रावजींसह झालेल्या माझ्या अफाट धंदेवाईक संयुक्त हालचाली! सारंच कसं स्वप्नात! सर्वात विस्मयकारक—त्या लांबच लांब स्वप्नांचा कळसच जणू—म्हणजे माझी परस्पर झालेली संपूर्ण कर्जमुक्ती! त्या स्वप्नातली माझी ती चौखूर घोडदौड तशी पुढेही गेली असती कदाचित—पण रावजींपासून सुरवात झालेल्या त्या मालिकेला रावजींनीच पोलिसी आडवा हात करून एकदम अडता घातला.

त्याबद्दल विचार करताच दहा वर्षांचं आयुष्य आपण दोन वर्षांतच जगल्यासारखं वाटत होतं मला, आणि संसारातही एकाच उद्योगातून, एका तपाभरातही, जे मला शक्य झालं नसतं तेच प्रत्यक्षात झटपट हस्तगत करून मोकळा झालो असल्याची मला सुखी जाणीव होत होती.

केवळ योगायोगाने समोर कर्जाचा डोंगर उभा राहिला नि मग तसाच, केवळ योगायोगानेच तो अकल्पितपणे बघबघता वितळूनही गेला! स्वतःची नि आपल्या कुटुंबाची मान फिरून एकदा ताठ झाली! हे काय कमी समाधान होतं? म्हणूनच मी एका परम सुखात डुंबत होतो.

अप्पा कुलकर्णी आबांच्या आयुष्यात घुसला, त्यांचं जीवन उद्ध्वस्त करून गेला, त्यांचं जीवनच संपवून गेला! उलट, अप्पाचाच सहोदर रावजी, तो माझ्या जीवनात शिरला, नि माझं आयुष्य स्थिरस्थावर करू शकला, मला एक नवजीवन प्राप्त करून देऊ शकला. मोठमोठ्यांच्या ओळखीदेखी, धंद्याचे नवीन मोके, दृष्टीचा विस्तार, सारं सारं मला तो देऊ शकला!

त्या विलक्षण घटनांची एका व्यापक विचारांच्या पार्श्वभूमीवर, मला अनेकदा मोठी गंमतच वाटत आली आहे. एकाच कुटुंबातील दोन व्यक्तींच्या हालचालींची ती सुख-दुःखांची बेरीज–वजाबाकी होती. दोन कुटुंबांमधल्या चार व्यक्तींच्या आयुष्यात बाकी शून्य उरली होती! पण मग त्या शून्य बाकीमध्येच, योग्य वेळी, योग्य स्थळी, एकटे

रावजी उपस्थित राहिल्यामुळे मला माझ्या जीवनात सुखा-समाधानाचे, अनेकवार, अकस्मात दशसहस्र दिसले होते, नि प्रत्यक्षात लाभले होते!

असं एकूण रावजींनीच कुळकर्ण्यांचं सारं पाप जणू हेतुपुरस्सरच धुऊन, आपलं नि आपल्या कुळाचं नाक पुन्हा उंच केलं होतं! नि त्यामुळेच त्यातून माझं, माझ्यामुळे आबांचं, अर्थात आमच्या कुटुंबियांचंही नाक पुन्हा कायमचं वर झालं होतं!

*

त्या मधल्या वर्ष–दीड वर्षात, माझ्या एकूण दुहेरी धडपडीमुळे माझी प्रकृती मात्र बरीच ढासळली होती. पण मी तसंच झेलत-पेलत गेलो होतो. ज्या गोष्टी आपल्याला नैसर्गिकपणे पेलत नसतात, त्याच ईर्षेने करीत राहण्यात एकेकदा आपले दिवसांमागून दिवसही जातात, त्या वेळी आपल्याला कल्पनाही नसते की आपण आपलं शरीर-मन त्या त्या वेळी, जरूर तसं, हजार बाजूंनी आपल्याला नकळतच रबरासारखं कमालीचं ताणून नेत असतो!

पण अखेरीस, मनावरचं ते अपरिहार्यतेचं दडपण निघून गेलं, की इतका वेळ अगदी अव्याहतपणे, जागरूकपणे, तल्लखपणे, न चुकता यंत्रासारखे हजारो खेळ सुरळीतपणे, करीत राहिलेलं तेच आपलं मन नि तेच आपलं शरीर––एकदम असेल तेथे बसकणच घेतं! मग मात्र, आपल्यावर एखाद्या कडव्या शत्रूच्या सूडबुद्धीनेच, ते अखेर उठाव करतं! नि आपला संपूर्ण विश्वासघात करू पाहतं! अर्थात मग एखाद्या क्षुल्लक प्रसंगातूनही आपला मोठा आजार उफाळतो!

माझं अगदी तसंच झालं!

माझ्या दमल्या–भागलेल्या–ताणलेल्या शरीराने एकदम बंड पुकारलं! मी खूप आजारी पडलो!

*

अखेरची शेअर-खरेदी करून आल्यावर, अगदी दुसऱ्याच दिवसापासून, पुन्हा नव्या नव्या बांधकामात मी स्वतःला नव्या दमाने गुंतवून घ्यायचं ठरवलं होतं, पण तसं समक्ष हजर राहायला मी सुरुवात केली असेल–नसेल, तोच मी एकदम कोलमडून पडलो. सडकून ताप असा पाचसहाच दिवस आला. डोक्यावर रात्ररात्र ठेवाव्या लागलेल्या बर्फाच्या वाटोळ्या पिशव्या दोनतीन दिवसांतच पुन्हा कपाटात जाऊन पडल्या, पण घामाच्या नद्यांच्या पुरामधून अखेर निघून गेलेल्या तापाने मला कमालीचंच अशक्तपण आणलं! मला एकदम बिछान्यालाच खिळवून टाकलं.

आणि माझ्या माणसांची खरी किंमत मला समजून आली ती त्याच वेळी.

मधल्या दोन-अडीच वर्षांत मी माझ्याच मनात इतका गर्क होऊन गेलो होतो, की घरांच्या बांधणी–कॉन्ट्रॅक्ट–कामात त्या भेटी, पैसा, हिशेब, खरेदी, सारं सारं मी बरंचसं

सदूवर ढकलत आणलं होतं. क्वचित एखादं महत्त्वाचं काही खोळलं, तर माझं त्या धंद्याकडे क्वचित क्वचित तासाभराचंच लक्ष असे.

तरी देखील, सदाशिव नि धाकल्या हे माझे उजवे-डावे हात सारं काम चोखचोखपणे पार पाडीत होते. त्यांच्या जोडीला मला लाभलेले दुसरे चार मुकादम नि सारे कारागीर कामगार गडीसुद्धा, अतिशय कामसू नि आपापल्या कामात हुशार होते.

खरं म्हणजे हीच सारी माणसं, सारं काही पद्धतशीरपणे योजून वेळच्या वेळात उरकणारी खरीखुरी कॉंट्रॅक्टर मंडळी होती! मी आपला त्यांचा नाममात्र प्रमुख होतो. जे काही सुरळीत पार पडत होतं, चाललं होतं, ते सारं त्यांच्या जिवावर. त्यातल्या यशाचं श्रेय तेवढं मला मिळत होतं!

अशी--केवळ लोकांनी वारंवार पाहायची, आमच्या त्या धंद्याची केवळ घड्याळाची तबकडी होतो मी! डोळ्यांत तेल घालून सदैव सुसंगत हालचाली करणारी ती असंख्य यंत्रं, माझ्या पाठीशी अज्ञात राहूनच अहोरात्र हलत होती! स्वतः माझ्याच दृष्टीला नसत येत, तर मग इतर कोणाच्या दृष्टिपथात तरी कशी येणार होती ती?

ते सारं तसं होतं म्हणूनच, माझ्या आजारीपणातही डागडुजी, रंगसफेदी, रस्तादुरुस्ती, घरबांधणी, वगैरे हाती घेतलेली सर्व धंदेवाईक कामं अगदी सुरळीत चालली होती, तरी पण माझ्या त्या आजारानेच मनातून सारी गांगरल्यासारखी झाली होती. त्यांच्या नेहमीच्या धकाधकीच्या धडपडीत, माझ्या शुश्रूषेच्या डयूटीची आणखी एक नवी भर पडली होती. नाममात्र का होईना, मी त्यांच्यात कामाच्या वेळी हिंडताफिरताना सर्वांना दिसायला हवा होतो. जणू काय, त्यांची एकूण सारी कामाची तडफ नि मनाचा धीर त्यातच सामावलेला होता.

*

काही महिन्यांपूर्वी, सर्वांच्या कर्जरकमा परतवून मुक्त झाल्याचं मी जेव्हा प्रथमच आईच्या नि घरातल्या इतर सर्वांच्या कानी घातलं, तेव्हा आईचे डोळे पाण्याने डबडबले होते. सदाशिवचा चेहरा एकदम फुलून आला होता.

धाकल्या तर आपल्या डोळ्यांच्या ओल्या कडा पुसत आईला म्हणाला होता, "आजवरीक खरोखर माजा जीव निवला, वयनी! आनाबापू, आबादादांचं नाक तुमी आज वर क्येलंत् बगा! बापाला सोबनारे ल्येकच हांत तुमी!"

यशोदा मात्र त्या वेळी काही बोलली नाही. त्या साऱ्या घटनेचा तिला आनंद झाला नव्हता असं नव्हे, पण ती तशी जात्या गंभीर. त्यात पुन्हा अलीअलीकडे तर ती अधिकच कुढेपणे वागायची! का ते मला समजत नसे.

तेव्हा शेवटी मीच तिला त्या रात्री छेडलं, "कर्जमुक्त होण्याचा आनंद काही न्याराच असतो, यशोदा! आज कसं अगदी हायसं वाटतंय."

मोकळंच हसून, किंचित खिन्न स्वरातच ती म्हणाली, "झालं ते एकूण खरंच बरंच

झालं! पण आता तरी आणखी नाही ना कसली जबाबदारी उरलेली बाकी?"

"म्हणजे?" त्यातून डोकावणारी, यशोदेच्या मनातली खोल दडलेली हुरहूर व नापसंती जाणवून मी म्हणालो, "अग पुरुषाचं आयुष्य, नेहमी एकामागून एक पेलायच्या जबाबदाऱ्यांनीच भरलेलं असायचं! जबाबदाऱ्या कधी संपतात का आपल्या नशिबाच्या, वेडे?"

आपलं मन दडवून-दडपूनच, जसं नेहमी हसे, तसंच, बळेच खुदखुद हसत ती म्हणाली, "खरंच की! अगदी वेडी हो मी! मी कसली? एक दुबळी स्त्री! पुरुषांचं हो कसं कळायचं मला? मग, तुम्हीच सांगा तर आता,—आणखी कसल्या कसल्या जबाबदाऱ्या तुमच्या आयुष्यात यापुढे राहिल्या आहेत? निदान आपल्या बायकोला तरी वेळीच कळलेल्या बऱ्या त्या साऱ्या! नाही? म्हणजे मन आधीच घट्ट होतं."

त्या वातावरणातला नि बोलण्यातला काहीसा कडवटपणा कमी करण्यासाठी मीही बळेच वेड पांघरून, हसत हसत तिला म्हणालो, "सांगतो हं, ऐक! आपला नि सदाशिवचा संसार वाढतोय– दोन संसारांना आता पुरत नाही ग हे घर, तेव्हा आईला नवं मोठं घर हवं आहे. अर्थात, त्यासाठी गावच्या नव्या वाढत्या वस्तीमधे जागा मिळवायची, प्लॅन करायचा, घर बांधायचं! मुख्य म्हणजे त्यासाठी जमेल तेवढा पैसा आता आधी भरभर जमवायचा! दुसरं सांगू? आपली बिचारी भागा दुर्दैवाने कुंकू पुसून माहेरी परतलीय. तिची काही शिक्षण वगैरे भवितव्याची व्यवस्था करता आली तर ती पाहायला हवी आहे..."

काही एक न बोलताच, यशोदा मख्खपणे माझ्याकडे पाहत होती, तेव्हा हसतच मी पुढे म्हणालो, "हो, आणखी सांगू? आबांच्याच हयातीत आपल्या आईने आपलं घर उभं करायला म्हणून, एक चांगली शोधून-निवडून सून आणली घरात. त्यापाठोपाठ दुसरीही सून आली, सदाशिवचा हात धरून. सहा वर्षं, आठ वर्षं झाली. आता आपल्या पदरी गंगा–यमुना नि सदाशिवदेखील फक्त मुलींचाच धनी! पण, आईला तर हवाय एक नातू! तो नाही अजून—"

आता मात्र यशोदा खुदकन हसली नि म्हणाली, "इश्श! काहीतरीच काय? ती पण जबाबदारीच वाटतं आपली? या गोष्टी काय आपल्या हातच्या असतात??"

*

यशोदा लाजेनं चूर झाली होती. तिचा मघाचा रागीट मख्ख नूर पालटला होता. काही वेळ तसाच जाऊ देऊन, अखेर ती समजूतदार शब्दांत संथपणे म्हणाली, "माझं आपलं म्हणणं इतकंच हो, की आतापर्यंत एखाद्या पिसाटासारखी धडपड धडपड केलीत अहोरात्र, ती खूप झाली. पैसा-पैसा! शरीराची तेवढी चारी बाजूंनी नासाडी! हाडाची काडं झालेली. हे भोवतालच्या आम्हा साऱ्यांना दिसतंय! तुम्हांला कसं दिसणार ते? पण, ओढूनताणून हे चंद्रबळ हवंयच कशाला मुळी, मी म्हणते? पैसा

आपल्यासाठी असतो, आपण नसतो पैशासाठी!—आता आणखी रावजीअप्पांबरोबरची हल्ली सुरू असलेली ती नवी वणवण–धडपड! पाहावं तेव्हा आपली धावाधाव! घरात लक्षच कसं ते नसतं. जेवण कसं तरी–कुठे तरी! दोन घास खाल्ले खाल्ले, नाही नाही! तारू आपलं जिकडे जाईल तिकडे वाहतंच आहे वाऱ्यावर! आम्ही कुणी तुमची म्हणून आहो, नाही, याची कसली शुद्ध तरी असते का कधी तुमच्या जिवाला? खरं ना हे! पण मग, असल्या या पैशात तो कसला हो आला राम?"

यशोदेने एकदमच तशी सरबत्ती सुरू केल्यावर, आता गप्प बसायची पाळी माझी आली होती.

तेवढ्यात तिने चिकाटी न सोडता माझ्यावर पुन्हा नवा हल्ला चढवला, "तुम्ही आकडेमोडी करता रात्री रात्री, तेव्हा मला सांगता एकेकदा, कोणी तरी गमावतं—तेव्हा कोणीतरी कमावतं! पण मग हवाय कशाला असला पैसा? हे बघा–स्वतः तुम्हीही शरीर गमावताय तेव्हाच ना असा हा पैसा कमावताय? खरंच सांगते, तसला पैसा तुम्हांला कधी कधी लाभायचा नाही, सुख द्यायचा नाही! आणि माझ्यासाठी म्हणून म्हणत असाल ना तर आपलं आत्ताच सांगून ठेवते हो मी—मला मिळतेय ती सुखासमाधानाची ही मीठभाकर नि हे आहे लहानसं झोपडं तेच पुरे! वैभवासाठी देखील तुमच्या जिवाचं असलं रान व्हायला नकोय मला मुळीच!"

यशोदेची ती त्या क्षणची मनोभूमिका मला बरीचशी समजतही होती. किंबहुना ती मुळची स्वतः आपलीच भूमिका आहे असंही मला आतून मधूनच भासत होतं. तरी पण, त्या वेळी तरी, माझ्या मनाची स्थिती नवाच चारा प्यालेल्या एखाद्या वासरासारखीच झाली होती. नव्या जगात, एकदम उठून, ते उत्साहाने चौखूर उड्या मारीत होते! केवळ यशोदेसाठी त्याला तत्काळ दवकावणी–दावणी घालायला मी मुळीच तयार नव्हतो. कर्जमुक्तीने, अनपेक्षित समाधान–निश्चिंती लाभलेल्या माझ्या मनाने एक घडाच केला होता. रावजींबरोबर प्रवेश केलेल्या त्या नव्या जगात आणखी काही अद्भुत झेपा तरी टाकायचं त्याने निश्चितच केलं होतं त्या वेळी.

तसले विचारच मनात गर्दी करीत असल्यामुळे, मी त्या वेळी यशोदेला म्हणालो होतो, "खरंही असेल तुझं, यशोदा! पण थांब, फक्त आणखी दोन वर्षंच थांब! तारुण्य आहे, तोपर्यंतच मला हे सारे धोके पत्करले पाहिजेत. तुझं भोळंभाबडं बोलणं असं अवेळी जवळ करून कसं चालेल? त्यापेक्षा तूच माझ्या अधिक जवळ ये—मला जास्त समजून घेण्याचा प्रयत्न कर! जग फार कठोर आहे!"

ते ऐकून, यशोदा खरोखरच माझ्या अगदी निकट होऊन, माझ्या खांद्यावर मान टाकीत म्हणाली होती, "नाही तरी तुम्ही काय कराल तेच खरं! माझं कधी ऐकणार आहात थोडंच? मी काय, एक अशिक्षित, अननुभवी स्त्रीच तुमच्यापुढे. माझं जग हे! ते तुमचं दुसरं! हे कठोर नाही!"

खरोखर!—जेव्हा जेव्हा असल्या प्रखर मतभेदाचे, संसाराला तडे जाण्याचे प्रसंग

घेतात, तेव्हा तेव्हा नेहमी बायकाच त्या तड्याऐवजी तडजोड निर्माण करीत असतात. त्यामुळेच लक्षावधी संसार वाऱ्यावर उधळण्याऐवजी आजही सुरळीत चालताना जगात दिसतात! माझा अनुभव तरी मला हेच पुनःपुन्हा सांगतो—

*

तेव्हा या प्रसंगानंतर केवळ पाचसात महिन्यांच्या आतच मी एकाएकी शेअरबाजाराच्या व्यापातून माझं अंग काढून घेताच यशोदा आनंदाने जणू नाचू लागली, यात आश्चर्य ते कसलं?

त्यापाठोपाठच्या माझ्या अकस्मात आजाराने मात्र ती गांगरली. तरी त्या घटनेचा तिला एक विचित्र आनंदही वाटला असावा. आजवर मिळाला नव्हता तो माझा भरपूर सहवास त्यामुळेच वर्षांनी यशोदेला आपोआप लाभला होता. माझी सेवाचाकरी करण्याची एक अपूर्व संधी तिला आयतीच चालून आली होती. मी तिच्यावर अवलंबून असल्याचं एक न्यारंच समाधान तिला लाभलं होतं. एकूण या ना त्या निमित्ताने माझ्याशी मोकळं अघळपघळ बोलण्याचा, आपले विचार माझ्या मनावर ठसवण्याचा तो एक आगळाच मोका तिच्या आयुष्यात कधी नव्हता तो चालून आला होता.

आजारातून मला बरं वाटत गेल्यावरही तेच! उठण्याची किंवा जरा बाहेर जाण्याची मी थोडी जरी चुळबुळ करू लागलो तरी, विनय न सोडताही, ती मला एकप्रकारे लाडीक दमातच घेऊन म्हणे, "नाही ऐकणार मी! आणखी चांगलं आठ दिवस इथनं हलायचं नाही अगदी! खबरदार मला सांगितल्या-सवरल्याशिवाय काही हालचाल कराल तर—"

माझ्यावरील तिच्या त्या मालकी हक्काचं मला हसू येई. ते औषध लागू पडे! तीही हसू लागे. मग आम्ही दोघंही हसू लागू! ते आजारपण म्हणजे एक गंमतच होती.

आजारानंतरच्या त्या सक्तीच्या विश्रांतीमधे, पडल्या पडल्या, बऱ्याच वर्षांनी मी खूप वाचन केलं. आयुष्याचं बरंच सिंहावलोकन केलं. बरंचसं मननही केलं.

हजार पुस्तकं वाचूनही जे आपल्याला मिळत नाही, ते आपल्याच मनात तळमळीने डोकावून, केव्हा केव्हा आपल्याला पटकन सापडतं!

तसं पाहता वाचन-व्यासंग हा माझा आयुष्याचा मूळ आधारस्तंभच होता, विरंगुळा होता. शिक्षणदान हे त्या वेळी मला माझं एकमेव क्षेत्र वाटत होतं. आबांचा अकस्मात अंत झाला, म्हणूनच केवळ मी त्यांच्या त्या चालू धंद्यात पडलो होतो. त्यामुळेच दगड-माती-विटा-चुना यांचे ढीग नि कर्जाचे मोठे थोरले डोंगर समोर येऊन उभे राहिले होते. ते निर्लज्जपणे डावलणं माझ्या रक्तातलं नव्हतं. त्याऐवजी श्रमांच्या नव्या वाहिल्या तरी चिंता नाही अशा निर्धाराने, त्या एकाच ध्यासाने मला न आवडणारंही मी स्वीकृत केलं होतं. ते शिकलो होतो—त्याला चिकाटीने चिटकून राहून, येथवर तरी पक्षा गाठीत आलो होतो.

धडपडी! बेतावाताची प्राप्ती! तेव्हा, कर्जफेडीला वर्षानुवर्षे जाणार, ही चिंता! पण त्यातूनच, 'तिळा दार उघड 'सारखं रावजींनी बोट दाखवलं, त्या डोंगराला धडक मारायला मला झटपट समर्थ करून, अखेर मोकळंही केलं होतं. आता तोही जमाना आला तसाच मागे पडला होता.

या साऱ्या काळातील माझ्या मनाची व शरीराची रस्सीखेच मात्र, मला नकळतच, मर्यादेबाहेर वाढत गेली होती. या आजारात मला एकाच गोष्टीची प्रचंड जाणीव होत गेली होती, की– "परिस्थितीनुसार मी झपाट्याने पालटत चाललो आहे. केवळ पैशाच्या पायावरच माझी अफाट हालचाल होत आली आहे. कधी नव्हे तो पैसाच केवळ माझ्या सर्व आयुष्याचा पाया झाला आहे!"

*

याउलट माझी पत्नी यशोदा! ती मूळची होती तशीच साधीसुधी होती! मी मात्र माझ्या जीवनात ती आली तेव्हा होतो तसाच आता मनाने उरलेला नव्हतो. असे माझे दैनंदिन ध्यास तेच उरले नसले, त्यात माझा दोषही नसला, तरी आपला पती तसाच राहावा, त्याची ध्येयं, त्याच्या आवडी–निवडी, त्याच प्रकारच्या असाव्यात, असंच यशोदेला तीव्रपणे वाटत राहावं, ते तसं नसल्यामुळे तिला सारखी हुरहूर वाटावी, हा तिचाही कसला दोष नव्हता!

गणूकाका म्हणून आबांचे एक निकटचे स्नेही, आदर्श शिक्षक, हेडमास्तर होते. त्यांचीच यशोदा मुलगी. स्नेह्यास्नेह्यांत अगदी सहजासहजी आमचं ते लग्न जमून आलेलं. भरल्या घरात नांदणारी कामसू पोर, घरातच शिक्षण–वाचन–पठणाचं वळण, तेच पाहून माझ्या आईने तत्काळ होकार दिला होता. यशोदेचा हास्यमुख चेहरा नि तरतरीत डोळे पाहिल्यावर मी आणखी आबा–आईपुढे काय बोलणार होतो? लग्नानंतर यशोदेने आम्हांला सर्वांनाच खरंखुरं सुख दिलं होतं. तिचा हात धरूनच घरात समाधान शिरलं होतं!

यशोदेला नैसर्गिकच एक प्रकारची विद्यासक्ती होती. माझ्याशी तिचं लग्न झालं त्या वेळचे माझे विचार, माझी ध्येयं, सारंसारंच तिला उत्तेजित करणारं होतं. आपला नवरा लौकरच प्रोफेसर होईल, त्याच्या घरी विद्वानांची उठबस होईल, आपला छोटासा संसार नेहमी काव्य–हास्य–विनोदाने गजबजून जाईल, असलीच काहीशी तिची त्या वेळची सुखस्वप्नं! आमच्या घरात प्रवेश केल्यावर यशोदेने तीच भरपूर रंगविली होती होती नि मला अप्रत्यक्षपणे ते पक्कं ठाऊकही होतं.

पण, त्यानंतरच्या माझ्या आयुष्यातल्या त्या साऱ्या घटना! सारंच एकदम भरभर पार पालटत गेलं होतं! यशोदा आपली होती तशीच, होती तिथंच होती— आणि मी! मी मात्र झपाट्याने तिच्यापासून दूरदूर, तिला अज्ञात अशा प्रांतांत खोलखोल शिरत, किंबहुना रुजत गेलो होतो. माझ्या हजारो कामांच्या नि बेतांच्या रगाड्यात, तिचा माझा

सहवास फारच बेताबाताचा होत गेला होता. ती माता झाली होती. गंगा, यमुना तिच्यावर अवलंबून होत्या. मधल्या दोघा जीवांनी तिला फक्त तात्कालिक प्रसववेदना नि आजार तेवढे निर्माण केले होते. पण मग, त्याही बाबतीत अद्याप तिच्या मनासारखं काही नव्हतं. तिला मुलगा लाभला नव्हता.

आमच्या कुटुंबाच्या घरकामात काबाडकष्ट करीतच तिचं दैनंदिन आयुष्य जात होतं. मनातल्या असल्या अनेक झगड्यांना ती बापडी सोशिकपणे तोंड देई, खळखळींना कधीच तोंड फोडीत नसे, हे खरं. तरी पण, त्या सर्व विचारांमुळेच, त्या दिवशी त्या सान्थाच विदारक सत्याचं आकलन मला सुलभपणे करता आलं होतं.

*

त्या वेळी मनावर पडलेल्या अजस्र ताणाची जाणीव होऊन मलाही वाटत होतं— पंधरवड्यापूर्वीपर्यंतच पैसा भरभर मिळण्याची ईर्षा, तिची परिसीमाच आपण गाठली होती. पण ते आयुष्य काही खरं आपलं नव्हेच! तो भयानक दैनंदिन भार आपल्यालाही नेहमीच पेलण्यासारखा नाही. त्या मानाने हा जम बसलेला, स्थिर होत चाललेला, अधिक जड वस्तूंशी संबंध आणणारा, जमिनीवर पाय ठेवणारा आपला घरबांधणी-कॉंट्रॅक्टचा व्यापच अधिक बरा! तोही पूर्वी एकदा आपल्याला आपल्या मनाच्या नैसर्गिक कलाविरुद्ध वाटला होता. पण मग, आता तो नीट झेपू शकतोय! तेव्हा, धोरणाने तोच अधिक वाढवत नेता येईल!"

असल्या मननामुळे, या आजारानंतर माझ्या विचारांना आता एक नवीच कलाटणी मिळत गेली.

आबा आले तेव्हापासूनच आमचा गाव हळूहळू वाढीला लागला होता. पश्चिमेकडे दीड मैलावर एक शंकराचं देऊळ होतं. ती बाजू चांगली उंचावर होती. प्रथम प्रथम गावात प्लेग वगैरे साथी आल्या की लोक देवावर हवाला टाकून त्या बाजूला झोपड्या, तंबू ठोकून राहात. मग चारदोन सुखवस्तूंनी तिथे कायमचेच बंगले उठवले. हळूहळू इतरांच्या मनाचाही तिकडे कल वळला. बघता बघता तिकडे पांढरपेशी वस्ती वाढत गेली. शंकराच्या देवळाच्या दुतर्फा कित्येक छोटे बंगले उठत गेले. पुढे 'शंकर कॉलनी'ची एक ग्रामपंचायतही स्थापन झाली. त्या भागाकडे रहदारी वाढली. मात्र मधे मधे खूप मोठमोठे भाग भातशेतांनी व्यापलेले तसेच उरले होते.

पूर्वी गावाकडल्या बाजूचं गावाचं टोक म्हणजे जुनाटसा 'चिमाजीचा किल्ला' समजला जाई. पण आता त्याच्याही पलीकडे एक नवी वस्ती वाढत जाऊन अर्धा मैल पुढे गेलेली होती. तेव्हा या व 'शंकर कॉलनी'च्या वस्तीसाठी म्युनिसिपालिटीने नवी पक्की सडक बांधली होती.

माझ्या त्या आजारात, घरी निरुद्योगी पडल्या पडल्या, माझ्या मनःचक्षूंपुढे तेच सारं चित्र पसरलं होतं. नवी नवी असंख्य कल्पनाचित्रंही दिसू लागली होती. तसले नाना

विचार मनाला भंडावून सोडू लागले होते. " आपला कॉन्ट्रॅक्टचा धंदा, म्हणजे केवळ दुसऱ्यांच्या हुकुमाप्रमाणे त्यांना घरं बांधून देणं एवढाच असावा का ? छे! त्याला दूर-धोरणाचंच एक कलम केलं पाहिजे! रावजी जसे 'कागदा'च्या पुडक्यामधे पैसे फेकतात, तसा आपणही आता तो मातीत फेकत गेलं पाहिजे! रावजी आठवडा-पंधरवडा-महिन्याचे— फार तर वर्षभराचे— हिशेब-आडाखे नि धोरणं बांधतात, पण आपण एकेका तपाची तपश्चर्याच केली पाहिजे आजपासून! लोक सांगतील तिथं, लोक सांगतील तशी घरं बांधून केवळ मधला मध्यम दलाली-फायदा घेण्याचा आपला उद्योग चाललाय तो ठीक! पण आजच उद्यापरवाचा विचार करून, आपण पुढे अशी एक मोक्याची सुवेळ आपल्या आयुष्यात साक्षात उभी केली पाहिजे, की...आपण देऊ तेव्हाच—नि आपण देऊ तिथंच, लोकांनी स्वतःची घरं बांधली पाहिजेत! किंबहुना, आपण ठरवू त्या जागेत, आपण बांधू ती घरंच लोकांनी विकत घेतली पाहिजेत! किंवा, आपण बांधू त्याच आपल्या मालकीच्या घरात भाडोत्री म्हणून राहायसाठी लोकांची ही भली मोठी एकच एक झुंबड उडायला पाहिजे!—गाव वाढतोय, वाढणार, असं जे नेहमी नेहमी म्हणतात सगळे, तो वाढणार वाढणार म्हणजे तरी कुठं ? धोरणाने आपण सर्वांआधी आजच खरीदणार आहो त्याच आपल्या जागेत ना ?"

*

मनाला सारखं भंडावून सोडणाऱ्या या विचारांना नि इतर सहस्र सुखस्वप्नांना अधिक तपशिलाचं खाद्य पुरवायला, आधी त्यांना एक मूर्तस्वरूप आणायला मी मग दोन दिवसांनी कपडे चढवून तडकाफडकी बाहेर पडलो नि थेट सर्व्हे ऑफिसमधेच शिरलो.

'शंकर कॉलनी' नि 'नवग्राम' या दोन्ही वाढत्या नव्या वस्तींच्या दरम्यान असलेल्या रस्त्याला लागूनच्या सर्व मोकळ्या जागांचे नंबर, त्यांची क्षेत्रफळं, त्यांचे चालू मालक, इत्यादी जेवढा म्हणून मिळाला तेवढा तपशील, माझा अंतस्थ हेतू प्रकट न करता, तलाठी कारकुनाकडून मोठ्या शिताफीने मिळवला व घरी आलो.

पुढल्या दोन दिवसांत माझे स्थूल नकाशेही तयार झाले नि माझ्या मनच्या त्या नव्या योजनेत, त्या साऱ्याच भावी संयोजनांत, मी खोल खोल अवगाहन केलं.

प्रत्येक गोष्टीला तत्काळ एक एक निश्चित स्वरूप येऊ लागलं होतं. जवळ जवळ ४५० / ५०० एकरांचा तो मधला मोकळ्या जागेचा विस्तार होता. ते पाहून तर मी साफ भांबावून गेलो. मधल्या मधल्या दहाबारा एकरांच्या तुकड्यांना, कुठे तरी जुनाट पडकी घरं, कुठे म्हशींचे तबेले, कुठे पडक्या झोपड्याच व्यापून राहिल्या होत्या. कुठे तात्पुरत्या लीजने घेतलेल्या जागांमध्ये लाकूड-फरशी-विटांच्या नि कौलांच्या वखारीच विस्तारल्या होत्या.

अंदाज काढलेला चालू बाजारभाव एकरी रुपये दिडशे ते दोनशे म्हणजे डोक्यावरून पाणी! चालू मालकांना जमीन सोडायला आमीष-आकर्षण म्हणूनच, फार तर सव्वा

दोनशेपर्यंतची मागणी केली, की ते सारंच काही जमण्यासारखं होतं! पण मुख्य म्हणजे कसला गवगवा न होता, जसं काहीच झालेलं नाही अशा प्रकारे, तुकड्यातुकड्यांनी निरनिराळ्या लोकांशी निरनिराळे व्यवहार गुपचुपपणे करून, माझ्या कल्पनेतली ती जमीन-खरेदी-योजना सारी पुरी व्हायला हवी होती.

असल्या या माझ्या नवीन योजनेत, तसं आकडेमोड करून पाहिलं तर, कमीत कमी एक लाखाची तरी गुंतवणूक आवश्यक होती. तथापि आबांच्या वेळची, मीच आता पूर्ण सोडवलेली निर्वेध इस्टेट, दागिने रोकडीची वीस एक हजारांची भर, चालू धंद्याला खरेदी-पगारासाठी येणारे ॲडव्हान्स, नि बाजारातली माझी वाढत गेलेली पत, साऱ्या गोष्टी माझ्या जमेच्या बाजूला टाकताच, ते सारं सारं नवं स्वप्न मला तरी माझ्या अगदी आटोक्यातलंच वाटू लागलं!

तेव्हा, सुमारे ४५ / ५० हजारांच्या आधारावर, मी सारी सूत्रं हलवण्यात धोका मुळीच नाही, असंच अखेर माझ्या मनाच्या नव्या ईर्षेने तत्काळ घेतलं नि जवळ असलेल्या रोकडीवरच, स्थूल अंदाज घेणारे पहिले काही नमुना-खरेदीचे व्यवहार आपण धडकून सुरू करायचे, असं मी तत्काळ ठरवून टाकलं.

*

पुढले नऊ महिने माझे फार गडबडीत गेले. अंतराअंतरावरचे, सहज मिळण्यासारखे होते तेवढे, सुमारे सव्वाशे एकराचे तुकडे मी हस्तगत केले होते. 'तृतीयांश बयाणा, नऊ महिन्यांत व्यवहार पुरा' या अटींवरच बरेचसे सारे करार झाले होते. भाव सर-सकट एकरी १८० पडला होता. पण त्या गडबडीत जवळची होती-नव्हती ती रोकड पार संपून गेली होती. आणखी थोडी वापरायला मिळाली असती, पण ती त्या शेअर्समध्ये गुंतून पडली होती. नि त्या शेअर्समधेही मला जमिनीइतकंच सोनं पुरलेलं उघड उघडच दिसत होतं. त्याही गुंतवणीला हात लावायला माझं मन तयार होत नव्हतं.

अखेर, सर्कन एक प्रचंड विचार माझ्या मनामधे चमकून गेला. मी लागलीच माझी सारी हिशेब-टिपणं बरोबर घेतली नि तडक बँकेत शिरलो.

जाताना मला वाटत होतं, मला ते आयुष्यात नव्यानेच पटतही होतं, "काही खाजगी व्यक्तींची—त्याने स्वतः न केलेली—कर्जही ज्याने पै न् पै सव्याज परतवली, त्याला स्वतःच्या भावी काळच्या धोरणांसाठी, स्वतःच केलेल्या बँकेच्या कर्जाची भीती का वाटली! बेछूट, बेजबाबदार, व्यसनी कर्जबाजारीपणा वाईट असला, तरी प्रत्यक्ष कुबेरालाही जगात कर्ज असू शकेल! एखादा रकम वापरतो कशी व त्याचं करतो काय, यावरच ते सारं अवलंबून असतं. मी तरी आज जे कर्ज उभारणार आहे, त्यात मला लज्जास्पद असं काहीच नाही. किंबहुना, अशी माझ्या कुटुंबीयांच्या यशस्वी भवितव्याचीच मी ही मुहूर्तमेढ घालून ठेवीत आहे."

*

आमची बँक म्हणजे मुंबईच्या एका मोठया बँकेची, गेल्या आठदहा वर्षांतच सुरू झालेली स्थानिक शाखा होती. मी खातेदार होतो, शेअरहोल्डर होतो, शिवाय, स्थानिक कंट्रोलिंग कमिटीचा सभासदही होतो. तिथला मॅनेजर मोठा हुशार आणि चाणाक्ष होता. माझ्या तो चांगलाच परिचयाचाही होता. मी गेल्यावर त्याने मला आपल्या कॅबिनमधे बसवून घेतलं. अवांतर बोलणं संपल्यावर आम्ही मुख्य मुद्द्यावर आलो.

आमच्या जुन्या घरवाडी–इस्टेटीची किंमत तीस हजार धरायची, शेअर्सचे पंधरा हजार, बायकोच्या दागिन्यांचे पाच हजार, दहा हजाराचे विमे बँकेला असाईन करायचे, एवढ्यावर किमान नव्वद हजारांचा खेळता 'ओव्हरड्राफ्ट अकाउंट' उघडायचा. वार्षिक हिशेबावेळी, निम्म्याइतकीच रक्कम वापरली गेलेली राहून, पुढील वर्षासाठी निम्म्या ओव्हरड्राफ्टचा बॅलन्स सुरक्षित असेल अशी फार तर बँकेने अट घालायची. व्यवहार व बॅलन्सशीट पाहूनच वर्षावर्षाला मुदत वाढवायची. अशा प्रकारे, मी माझी एकूण पाच वर्षांची योजना त्याला समजावून सांगितली.

" तुमच्यासारख्या माणसाकडून आलेली ही कल्पना-योजना! नि पुन्हा, ती तशी फूलप्रूफही दिसतेय!" मॅनेजर हसून मला म्हणाला, " प्रत्यक्ष व्हॅल्युएशन कदाचित कमीजास्त ठरवलं जाईल, पण थोडं अलीकडे-पलीकडे एकमेकांच्या सवलत-सोयींनी जमवून, व्यवहार खासच करता येईल. निदान पंधरवड्याच्या कमाल मुदतीची काही जादा रकमेची टेंपररी ओनरशिप लिमिट तरी ठरवून देता येईल खास! अर्जाची नक्की शिफारस करतो मी मॅनेजिंग कमिटीला नि हेड ऑफिसला—"

त्या त्याच्या अनुकूल उत्तराने माझा जीव एकदम भांड्यात पडला नि मी उद्गारलो, " थँक्स—मेनी मेनी!"

" तरी पण, बाय द वे, अनंतराव—" चहा घेता घेता मॅनेजर मला कुतूहलाने म्हणाला, " काय योजलंयत तरी काय एवढं सारं प्रचंड? करणार आहा काय तुम्ही एवढ्या रकमेचं? वापरणार कशाला?"

त्या क्षणाच्या मनातल्या प्रचंड उत्साहाने खूप भारल्यासारखा होऊन मी गद्गदून हसत म्हणालो, " आजच्या घटकेला मी इतकंच सांगतो तुम्हांला, मॅनेजरसाहेब! रक्कम वापरणार ती धंदा करून स्वतः मोठं व्हायला! पण साहजिकच, त्याबरोबरच, तुमची इथली बँक आज आहे ना, त्याच्या दसपट तरी मोठी करायला! तुमची खाती आज आहेत ना, त्याच्या शतपटीने तरी वाढवायला! लोकांना छोटीमोठी टुमदार घरं बांधण्यासाठी जागा द्यायला!—यातायात नको असलेल्यांना तयार बंगले उभारून द्यायला! मध्यमवर्गीयांना राहायला भाड्याने सुखसोयींच्या जागा जय्यत तयार ठेवायला! थोडक्यात, मॅनेजर साहेब, ज्या गावात तुमची बँक आहे नि ज्या गावात मी स्थायिक आहे, त्या या आपल्या गावाच्या लह्याखुऱ्या कायमच्या अभ्युदयासाठी, आपल्या सर्वांच्याच फायद्यासाठी! सर्वांच्याच सर्वांगीण उदयासाठी!"

" वाः वाः! समाजसेवाच म्हणायची ही! मग आनंदच आहे!" थेट केबिनच्या

दारापर्यंत येऊन, मला निरोप देत हसून मॅनेजर म्हणाला, "म्हणजे हे तुमचं एक उघडं गुपितच वाटतंय की मला ! पण आज तुम्ही तुमचं हे कोडं कितीही ढाकळत, अनंतराव, तरी वर्षाभरातच आमच्या डोक्यात सारा काही प्रकाश पडल्याशिवाय राहणार नाही. आमच्या लेजरमधल्या तुमच्या दैनंदिन हालचाली का कुठे लपवता येणार आहेत ? तुमची कुंडली त्यातनं तपशीलवार मांडता येईल आम्हांला ! नि तरीही आम्ही इतके बथ्थड डोक्याचे ठरत असलो, तर वर्षअखेर तुम्हांला जाब विचारल्याशिवाय आम्ही राहू की काय ? हे वर्ष तुम्हांला घ्या ! पण पुढलं तर आमच्या हाती आहे !"

"अलबत् !" मीही हसून आव्हान स्वीकारलं, "नि माझ्याही !"

मग पुढल्याच पंधरवड्यात आवश्यक ते सर्व हिशेब आणि कागदपत्रं तयार होऊन माझं एकूण सत्तर हजारांचं नवं ओ. डी. खातं बँकेत सुरू झालं. मला बाजारात आता एक हुकमी पत आली होती.

घरी परतताना, माझ्या खिशात जाडजूड चेकबुक होतं नि त्यात करायच्या माझ्या सहीला एक नवीच किंमत व प्रतिष्ठा आता आली होती ! त्या वेळी मनात येत होतं, "झाला... सुरू झाला ! तसला नवा व्याप सुरूच झाला !"

पण माझं दुसरं मन मला लगोलग म्हणालं– मनात कसलं पाप नसलं, की असा व्याप असला तरच कर्त्या पुरुषाच्या पदरात यशाचं खरं खरं माप पडतं !

*

बँक व्यवहाराच्या या जमवाजमवीत, नकळतच, माझ्या साऱ्या कुटुंबीयांच्याही मी अधिक जवळ आलो होतो. प्रत्येकाचं माझ्यावर किती प्रेम आहे याची मला खरी जाणीव झाली होती.

जगात भावाभावांचं कधी पटत नाही, म्हणतात. पण मला मात्र अनुभव निराळा आला. बँकेच्या स्टँपकागदावर माझ्या बरोबरीने सदाशिवचीही सही हवी होती. म्हणून मी त्याला बरोबर नेलं, तेव्हाचा प्रसंग.

सही करायला हाती दिलेला टाक सदूने पुढे सरसावताच, थट्टेखोर मॅनेजर गमतीने त्याला म्हणाला, "वाचलंयत ना हो सगळं ? सही करण्यापूर्वी समजून घेतली आहेत ना ती सगळी कलमं ? आपल्या समोरचं हे सारं नीट दिसतंय ना तुम्हांला ?"

आपलं काही चुकलं की काय, अशा समजुतीने प्रथम एकदम चमकून सदूनं कागदांवरचा हात गोंधळून मागे ओढला. आम्हा दोघांकडे त्याने संकोचून पाहिलं. पण तेवढ्यातच त्यामागची गंमतही त्याला समजली. आपली पुरी सही करून होताच, स्मित करीत तो म्हणाला, "यात मला निराळं ते काय दिसायचंय ? अहो, बापू आहे म्हणूनच तर मी आहे ! आमच्या बापूच्या डोळ्यांनीच काय ते बघतो जगातलं मी नेहमी, मॅनेजरसाहेब !"

*

आईने आधल्या रात्री हळूच माझ्या खोलीवर थाप मारली होती. मी दार उघडून आश्चर्याने पाहतच राहिलो.

आपल्या ट्रंकेच्या तळाशी ठेवलेला दागिन्यांचा डबा तिने पदराखालून आणला होता. तोच माझ्यापुढे करीत ती म्हणाली, " आना, मला रे आता काय करायचंय हे सगळं ? तुझे हल्लीचे व्यवहार मला वेडीला तसे काय समजणार आहेत म्हणा ! पण—हे उपयोगी पडत असेल तर बघ बाबा ! मनात काही एक आणू नकोस बरं. आशीर्वाद आहे हो तुला माझा, अगदी यशच येईल तुला बरं सगळ्या कामात ! हं, हे घे—"

जुन्या काळचे तिच्या लग्नातले चांदीसोन्याचे दागिने होते ते. ते सारे कितीसे असणार ? आठ-बाराशेचे ! एवढ्या मोठ्या व्यवहारात त्यांनी काय कात होणार होता ? तरीही मी तो डबा आदराने हाती घेतला नि काळजीपूर्वक उघडला. त्यातल्या तिच्या चांदीच्या मासोळ्या तेवढ्याच काढून घेतल्या नि बाकीचं सारं बंद करून तिच्या हाती परत देत मी म्हणालो, " हे इतकंच पुरे तुझं आई ! ही तुझी पुण्याई माझ्या बायकोच्या दागिन्यांत जमा करीन नि तेच माझ्या व्यवहारासाठी ठेवीन मी बँकेत ! तुझ्या पुण्याई-बरोबरच सारं वैभव हजारपट वाढून आपल्या घरात परत येईल बघ, त्याबद्दल मला संशयच नाही बरं, आई ! "

जवळ घेऊन आईने माझं डोकं थोपटलं, नि अधिक काही न बोलताच, आपले डोळे पुसत, आणलेला वैभवाचा डबा घेऊन ती परत गेली.

*

आई माझ्याकडे आली त्याच्याच जरा आधी, माझ्या त्या ठरलेल्या व्यवहाराबाबतच यशोदेला मी समजावून सांगत होतो. आणि त्या दिवशी पूर्वी कधी नव्हे ती कमालीची आस्था-उत्सुकता दाखवून तिने सारं काही नीट ऐकून घेतलं होतं. तिला माझ्या मनाच्या नि भावी धोरणांच्या झेपी नीटशा कशा आकलन करता येणार ? तरीही ते सारं ती सस्मितपणे ऐकत होती, तिचे डोळे अधूनमधून चकाकतही होते.

तसल्या आपल्या खाजगी धंद्यासाठी, बँकेच्या दारात जाण्याची अशी पाळी का येते, हेच तिला कोडं पडलं होतं.

तेव्हा तिला मी समजावलं होतं, " हे बघ, सिमेंट, लाकूड, विटा, यांचे हे आजचे भाव पुढे वाढतील, म्हणून कधीकधी आम्ही आधीच त्याचे एकदम मोठे मोठे सौदे नाही का करून ठेवीत ? त्या साठ्यांच्या थप्प्या नसतात का लावलेल्या आपल्या घरा-पाठीमागे, शेडमध्ये ? तसंच आहे बरं का हेही ! मात्र, या वेळी खूप खूप जमिनीच्याच जागोजाग मोठमोठ्या थप्प्या मारून ठेवायच्या, एवढंच ! "

तेव्हा मात्र यशोदा तोंडभर हसली. का ते मला समजेना.

तोच डोळे किलकिले करीत मला तिने विचारलं, " तसा साठा–माल रोख रकम टाकून घेता तुम्ही !...त्यासाठी, बँकेत जाऊन घर-दागिने गहाण नाही टाकीत काही

तुम्ही कवी! आणि पुन्हा—चारसहा महिन्यांत, त्या मालाच्या शप्प्यांमधले तुमचे पैसे तर परत सवाईने वसूल होतातच त्या नव्या गिऱ्हाईक मालकांकडून?"

एकदम चपापलोच मी! अगदीच डोळे बंद ठेवून माझी गृहिणी जगत नाही आहे, तिलाही व्यवहाराचा 'श्रीगणेशा' चांगलाच समजतो आहे, याची मनातल्या मनात जाणीव होऊन मी किंचित वरमलो देखील.

तरी वरवर तिला पुन्हा समजवीत कौतुकाने म्हणालो, "छान काढलास हं हा मुद्दा! पण–असं बघ, थोडयाशा खरेदीवेळी, माल देणारे थोडे पैसे घेतात, थोडे मागेही ठेवतात. सगळं एकरकमी देऊन टाकणंही तसं म्हटलं तर फारसं जड नसतं आपल्याला! पण खरेदीचं प्रमाण जास्त झालं ना, की देणारा नि घेणारा दोघेही आपापल्या पैशाबद्दल सावध राहतात, ते रकमेलाच नडतात. या 'अ'–'ब' दोघांनाही एक प्रश्नच असतो तो! 'अ' हा गरज देणारा! तो रकमेतून मोकळा होऊ पाहत असतो. उलट 'ब' या घोरणी घेणाऱ्याकडेही, तो सगळा सौदा एकदम पुरा करायला हवी ती मोठी रकम गाठी नसते. आता या 'ब'कडे दुसऱ्या हजारो रुपयांच्या अनेक वस्तू असल्या, तरी रोख मात्र पाचशेही नसतात. शिवाय, त्या दुसऱ्या वस्तूंचीही त्या 'ब'ला किंमत वाटतच असते. तेव्हा, त्या त्याला काही एकदम विकून टाकायच्या नसतातच. उलट, नवीन वस्तूंचा तो फायदेशीर सौदा तर साधायचा असतो. तेव्हा मग, तो 'ब' त्या आपल्या हजारांच्या दुसऱ्या मौल्यवान वस्तू तिसऱ्या एका 'क'च्या ताब्यात देतो, नि त्यांच्याकडून पाचशे रुपये परतीच्या बोलीने घेतो आणि ते पाचशे बाहेरच्या बाहेर 'अ'ला देऊन त्याच्याकडील ती उपयुक्त नवी–हवी असलेली वस्तूही खरेदी करून टाकतो. यातून होतं असं—की त्याच क्षणी, त्या नव्या नि जुन्या दोन्ही वस्तूंचा एकाच वेळी, तो 'ब' मालक होऊन राहतो. जेव्हा त्या 'ब'ला पुढे कधी जमतं, तेव्हा ते घेतलेले पाचशे त्या 'क'ला तो परत देऊन टाकतो— अर्थात त्या वेळी आपल्या जुन्या वस्तूही परत ताब्यात घेतो नि आपल्या घरी आणतो! असलं आपलं दूरधोरण पाहून–पसंत करून, आपल्याला आजच पाचशे वेळेवर हाती देणारा तो तिसरा 'क' म्हणजे बँक! आता समजलं?"

क्षणभरच थांबून, मला यशोदेने पुन्हा हसत विचारलं, "समजलं! नि त्या 'क'ला भरपूर व्याज का देतात तेही आता चांगलंच समजलं! व्यवहार कळला! पण मग, पुढे त्या 'क'ला या 'ब'ने त्याचे घेतलेले पाचशे परत केव्हा नि कसे हो द्यायचं? ते मात्र नाही बाई समजलं नीट—"

"अग, ती पाचशेला घेतलेली नवी वस्तू पंधराशेला, हजाराला, निदान पाचशेला तरी विकली गेली पुढे कधी, म्हणजे! किंवा—ते काहीच जमलं नाही, तर अर्थात 'ब'ने पूर्वी त्या 'क'च्या ताब्यात देऊन ठेवलेली ती हजारांची वस्तू—हजाराला, साडेसातशेला, नाही तर वेळप्रसंगी पाचशेलासुद्धा विकून टाकून!"

"हं हं हं! आता आलं ध्यानी!" थट्टेखोरपणे मोठमोठयाने हसत यशोदा म्हणाली,

" पुरतंच समजलं ! म्हणजे असं, की सासूबाईंच्या लग्नात घेतलली समारंभासाठीची पैठणी ! वर्षानुवर्षे, ती नवीनवी म्हणून वापरायचीही नि आपल्या मुलींसाठी ट्रंकेतही जपून ठेवायची ! भुकेच्या वेळी लाडू तोंडात धरायचा — लोकांना वाटायचं, तो आता खाऊनच संपला — आपणही आपलं तो खातोच, असं क्षणभर म्हणायचं ! पण मग तो खायचा मात्र नाही हं ! म्हणजे एकूण त्या लाडवाचा आजच्या भुकेला विरंगुळा करायचाच, पुन्हा तो उद्यासाठीही जपून ठेवायचाच ! हे असंच ना असतं तुमच्या या बँक गहाण व्यवहाराचं ? "

यशोदा वेड पांघरून आपला मिस्किलपणा मुद्दाम लपवीत होती. मीही मनातच चपापलो असलो तरी साळसूदपणेच त्यावर खो खो हसलो होतो.

नि तेवढ्यातच ती आईची मघाची हाक नि थाप दारावर पडली होती !

*

आई परतून जाताक्षणीच, मघाचा यशोदेचा तो मिस्कील विनोदी नूर मात्र एकदम कोठच्या कोठे लोपला होता. बघता बघता अतिशय गंभीर होऊन, पण मधून मधून माझ्याकडे प्रेमभरल्या दृष्टीने टक लावून ती पाहत होती. तसेच पाहता पाहता, तिचे डोळे पाण्याने एकदम टचकन भरून आले होते.

" का ग, यशोदा ? डोळ्यांत पाणी का तुझ्या, एकदम ? "

आपल्या पदराने हलूच डोळे पुसून ती त्यावर म्हणाली– " दागिन्यांविषयी माझ्या-बद्दल किती विश्वासाने नि आपुलकीने नुकतंच सांगितलंत तुम्ही, सासूबाईंना ! पण मी मात्र मेली...पाच मिनिटांपूर्वीच, लहान तोंडी मोठा घास घेत होते–नि तुमच्या व्यवहाराची थट्टा करीत होते ! राग नाही ना आला ? क्षमा करावी हं— "

" चल ! काही तरीच !— उलट, तुझ्या समजूतदार चाणाक्षपणाचं मनात मी कौतुकच करीत होतो— " मी तिच्या खांद्यावर हात ठेवून म्हणालो.

तेवढ्यात यशोदा जागची पटकन् उठली नि आपल्या कपाटाकडे वळली. तिने त्यातून आपली दागिन्यांची मखमली पेटी बाहेर काढली, तिचं झाकण उघडलं, त्यातली एकच वस्तू हळूच बाहेर घेऊन, चटकन् ती आपल्या गळ्यात चढवीत, अगदी रुद्ध कंठाने ती मला म्हणाली, " हा ना माझ्या वडिलांनी लहानपणी माझ्या गळ्यात घातलेला, त्यांच्या कोकणच्या देवाचा ताईत. महिन्यातले तीन दिवस तेवढा मी हा काढून ठेवते. माझ्या मंगळसूत्राचा दागिना तर माझ्या गळ्यात आहेच. आणि तिसरा सर्वांत श्रेष्ठ अलंकार माझा—म्हणजे तुम्ही स्वतः ! आता उद्या ही पेटी तुमच्या व्यवहारासाठी तुम्ही खुशाल कुठे ती घेऊन जा ! ती गेली तरी माझे सारे अलंकार बाहेरच– माझ्याकडेच अगदी सुरक्षित असतील ! हे जातंय ते, परत येवो न येवो ! मला काय पर्वा त्याची ? आपलं माणूस नि त्याचं यश हेच माझं वैभव ! "

त्या क्षणच्या तिच्या त्या उद्‌गारांत, त्या वेळच्या तिच्या त्या दृष्टीत नि त्या वेळच्या

तिच्या सोज्वळ चेहऱ्यावरील हळुवार भावांमधे आपल्या पतीबद्दलचं नितांत प्रेम, त्याच्या-बद्दलचा आदर-विश्वास, सारं सारं कसं ओसंडोप्रत भरलं होतं !

तिच्या खांद्यांवर दोन्ही हात टाकून तिला मी एकदम जवळ ओढलं—

तेव्हा तर, आपण या पृथ्वीवरल्या स्वर्गातच आहो, असंच मला वाटलं !

माणसाच्या संसारात स्वर्ग उतरतो तो असा ! पार्थिवतेत दिव्यत्व भरतं ते असं !

*

चढउतार, आशा–निराशा यांनी जीवनौघाला खरोखर मौज येते ! सुखाच्या नि दुःखाच्या, समाधानाच्या नि असमाधानाच्या वेळी, कुटुंबात, आपल्या कित्येक हाल-चाली केवळ परस्पर–संसर्गानेच होत असतात. हळुवार भावनांनी, अशा वेळी, आपण एकमेकांचे जीव अगदी मोहरून टाकतो. परस्परांबद्दलच्या प्रेम-विश्वासामुळे, परस्परांच्या तीव्र इच्छा–आकांक्षा आपल्याला आपल्याच असं वाटून, त्या अहोरात्र मंडावून सोडतात !

मग त्यांच्या इच्छापूर्तीच्या मार्गावर–स्थानावर, नकळत आपलाही विश्वास, आपलीही श्रद्धा बसते. भावनाशीलतेला, भाविकतेला, धार्मिकतेला अगदी पूरच येतो आपल्या मनात अद्भुत– अतर्क्य गोष्टीही आपल्याला खऱ्या खऱ्या, भासमय होतात-दिसतात. त्या प्रत्यक्ष मूर्त स्वरूपच धारण करतात.

होय—नि मग तर, ते श्रद्धापूर्ण असं भोळ्या भाविकतेचं चक्र अधिकाधिक वेगानेच फिरू लागतं. हळूहळू आपल्या जीवनाचं, दैनंदिन हालचालींचं सुखदुःख आशा-निराशेच्या रोमहर्षणावेळचं, विरंगुळा द्यायला सदैव जागृत राहणारं ते एक अविभाज्य सूत्रच बनतं !

माझ्या कक्षेतील साऱ्या जड वस्तू अशा मोठ्या आत्मविश्वासाने पणाला लावून भावी काळच्या अफाट जड वैभवाच्या आशेनेच, मी जेव्हा ते भवितव्यतेचे फासे टाकीत होतो, त्याच वेळी अत्यंत निर्ममत्वाने माझ्याशी उदार मनाने एकरूप होणारी माझी आईही माझ्या कल्याणासाठी, माझ्या यशासाठी, मला आकलनही होणार नाहीत अशाच काही गोष्टी करीत होती. त्यात श्रद्धेची, भाविकतेची, दैवी मार्गातून ऐहिक सुखप्राप्तीच्या तीव्र आकांक्षांची गुंतागुंत– गल्लत भरपूर झाली होती ! आणि यशोदेच्या नैसर्गिक, धार्मिक मनाचीही त्याच प्रकारची हालचाल व्हावी, तिच्याही मातृहृदयाच्या आर्तीची त्यात आणखी भर पडावी, यात नवल ते कसलं ?

सासूसुना दोघींच्या असल्या त्या वृत्तीमुळेच, माझ्यापुढे मात्र एक मोठा प्रश्नच उभा राहिला अखेर !

जणू काय, त्या दोघी एकमुखानेच मला म्हणत होत्या– “ तुझ्या जड वैभवाच्या हेपीसाठी, तू ज्या साऱ्या धडपडी करीत आहेस, त्या साऱ्या आम्हांला कुठं कळतात ? तरीही, त्यात आम्ही स्वतःला अत्यंत विश्वासाने विलीन करून टाकलं ना ? आमचं

सारसर्वस्व, नैतिक पाठिंबा,...आम्ही तुला सारं सारं देऊन टाकलं ना? मग आता, आमच्या नि तुझ्या सुखाचे जे जे मार्ग आम्हांला यशदायी वाटतात, ते चोखाळताना, ते तुला पटोत, न पटोत– तूही त्यात स्वतःला विलीन करून का घेऊ नयेस? आमच्या श्रद्धेचा तूही हात का धरू नयेस? तुझ्यावर, तुझ्या मार्गावर, आमची निष्ठा, श्रद्धा आहे! तर मग, आमच्यावर, आमच्या मार्गावर, तुझी तरी का नसावी?"

पण माझा तरी स्वभाव म्हणजे मुळातचाच तर्कटखोर, वादविवादी! माझं मनगट, माझं धोरण, माझी बुद्धी— याच माझ्याकडल्या सगळ्या यक्षिणीच्या कांड्या! त्यातूनच मला काय मिळायचं ते मिळणार! त्यासाठी मी कोणापुढे नमणार नाही, त्यांच्याकडे कसली भिक्षा मागणार नाही! हीच माझ्या वृत्तीची नाडी होती!

याची यशोदेला तरी पुरती जाणीव होती. आईही मला पुरं जाणून होती!

तरीही त्या दोघींनी एके दिवशी अखेर आपापसात संगनमत करूनच, माझ्यावर एक हल्ला चढवला नि मला नकळतच, शेवटी, मी त्यात पार गारदही झालो!

त्यामुळेच, त्यानंतर हां हां म्हणता, माझ्या मनाचाही– मला ठाऊक नसलेला एक नवाच कप्पा बघता बघता उघडला!

*

"अरे आना—मोठ्या सूनबाईला घेऊन, आज मी स्वामींकडे जाणाराहे! तू पण कपडे चढवून तयार हो! हं, चल लौकर—" एकाएकी माझ्या खोलीत येऊन, एकप्रकारच्या अधिकारवाणीनेच आई मला म्हणाली.

दाराजवळ उभं राहून आईच्या पाठोपाठ यशोदाही अर्धस्मित करीत म्हणाली, "पटकन चलायचं हं– आम्ही काल म्हणालो आहो तसं–"

त्या सासू–सुनेच्या माझ्यावरील अकस्मात दुहेरी हल्ल्यामुळे मी तर पार गांगरूनच गेलो नि आश्चर्याने विचारलं, "स्वामी? कोण बुवा हे स्वामी? नि कुठं चलायचं मी, म्हणताय? हे काय नवीनच तुमचं आणखी?"

"कुठं म्हणजे? शंकराच्या देवळाकडे! सदानंदस्वामींकडे!" अगदी नैसर्गिक स्पष्टीकरण केल्यासारखं बोलत, आई माझ्या शेजारी कॉटवर येऊन बसत म्हणाली, "अरे, पाऊणशेपुढली, कोटकोळी, खुटखुटीत मूर्ती आहे ती! चेहरा कसा अगदी तेजःपुंज! नि बोलणं किती रसाळ!"

तिच्या पाठोपाठच, जवळ उभी असलेली यशोदाही म्हणाली, "प्रवचन करू लागले ना ते, की त्यांच्या डोळ्यांतून नि आपल्याही डोळ्यांतून पूर वाहायला लागतो अगदी! आवरतच नाही! ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास—साऱ्यांची वाणी नुसती अस्खलित मुखोद्गतच त्यांची! त्यांचा अभ्यास तरी किती दांडगा, बाई! ते नुसते बोलू लागले, की आमच्यासारख्या बथ्थड बुद्धीच्या बायाबापड्यांनादेखील सारं सारं कसं अगदी सुतासारखं सरळ कळायलाच लागतं! नाही का हो?"

तेवढ्यात आईने पुष्टी जोडली— "अरे सदाचे ते आपले पूजे-अर्चेत नि ध्यानातच मग्न असतात. सकाळी एक तास नि संध्याकाळी दोन...तेवढेच काय ते, ते—कोणा आल्या-गेल्यांना भेट देतात हो! चल! उठ बघू आधी! आपण तिथं पोचू तवर वेळ होईल त्यांची. चारच दिवस आणखी मुक्काम आहे हो त्यांचा इथं शंकराच्या देवळामागं—"

"अग पण आई, मी ग तिथं कशाला? तुम्ही दोघी जाताय त्या खुशाल जा की! मी येऊन आणखी काय करू तिथं?" त्या दोघींच्या त्या मडिमारातूनसुद्धा संधी साधून, मी कसंबसं तोंड उघडलं नि अप्रत्यक्ष नापसंती दाखवून तशी दुबळी रदबदलही करून पाहिली...

"करणार आहेस रे काय तू—काही एक करू नकोस!" आई चटकन् उठत नि मी येतोय असंच गृहीत धरून, घरामधे जाता जाता म्हणाली— "आज मी सांगतेय ना, म्हणूनच आपला चल हो! चल, उठ! तिथं त्यांच्या पायावर डोकं टेक नि तसाच ये आपला गेल्या पावली परत तुझ्या कामाला! अरे आता, संतांच्या आशीर्वादाशिवायच का तुला तुझ्या एवढ्या साऱ्या मोठमोठ्या कार्यात यश येणार आहे? त्याशिवायच का तुझं घर फुलणार आहे? चल...चल ऊठ बघू! काहीएक अळंटळे नकोय तुझी आता! मुळीच ऐकणार नाही मी!"

*

मग मात्र यांत्रिकपणेच माझे पाय जागचे हलले. मला नकळतच मी उठलो.

तरी एकदा मनात येऊन गेलंच, "कोण कोणाला असं वैभव द्यायला लागलं, मुलगा द्यायला लागलं, म्हणजे झालंच की! जगात कोणाला कसला पुरुषप्रयत्न करायलाच नको! सारंच काही आयतं मिळेल खाटल्यावर!"

तरी आता मात्र नाइलाज होता. कोट चढवता चढवता, आत डोकावून आईला-यशोदेला मी म्हणालो, "बरं बरं—चला हं! माझी तयारी झाली. आई, घेऊ ग काय बरोबर?"

"घेणारहेस रे काय वेड्या? काही नको!" पुन्हा चार पावलं चळून येऊन आई आतल्या दारातूनच मोठ्याने म्हणाली, "अरे त्या निरिच्छ साधुपुरुषाला काही एक नकोय बरं तुझं! आता मी आपला एक नारळ तेवढा घेतेय तुझ्या घरातला एवढंच-"

आई लगबगीने आत गेली, तशी अजून मागे मागे घुटमळणारी यशोदा चटकन माझ्या अगदी निकटच येऊन उभी राहिली नि पुटपुटली, "सासूबाई आत्ता म्हणाल्या खरं, पण एक मात्र तुम्ही घ्याच हं का बरोबर! केवळ मी सांगतेय म्हणून-"

"ती कोणती ग?" डोक्याला रुमाल गुंडाळता गुंडाळता मी थबकलो नि आश्चर्याने तिच्याकडे पाहू लागलो.

"बरोबर घ्या तुमचं खरं खरं निर्लेप मन. ते मात्र मुळीच विसरू नका या गड-

बढीत!" यशोदा हळूच हसून पुढे म्हणाली, "जगात इतरांवरही माणसाने कधी कधी विश्वास टाकावा हो! थोडी श्रद्धा ठेवावी मनात, म्हटलं! जिथं तिथं मी मी काही बरं नाही—"

बोलता बोलता तिचा चेहरा लज्जित झाला होता, डोळे आशेने नि विश्वासाने चकाकत होते.

अधिक काही न बोलताच, ती झटकन् स्वयंपाकघराकडे सटकली.

ती आत निघून जाता जाता मी जणू स्वतःशीच मोठ्याने पुटपुटलो,

"बरं बुवा! जशी तुझी मर्जी! हा निघालो—"

*

स्वामी बसले होते, ती बैठक साधी बोंगडीचीच होती. ते स्वतःही खरखरीत पिवळसर धावळी नेसले होते नि भिंतीला टेकून, उघडेच ताठ बसले होते. समोर उघडी ज्ञानेश्वरी, भोवती राख विखुरलेल्या उदबत्त्यांच्या पितळी बैठकीमधल्या दहाबारा पेटत्या काड्या, चौफेर धूर नि सुगंध दरवळीत होत्या. ज्ञानेश्वरीच्या रंगीत पाटाच्या दोन्ही बाजूंना दोन दोन तुपाची निरांजनं तेवत होती. त्यांतल्या ज्योती वाऱ्यावर लवलवत होत्या.

तीसचाळीस माणसं—स्त्री-पुरुष—त्यांच्या समोर व दोन्ही हातांना अगदी गप्प बसली होती नि स्वामींच्या तोंडातून बाहेर पडताना प्रत्येक शब्द, टवकारलेल्या कानांनी मनातल्या मनात टिपून घेत होती.

स्वामींच्या तोंडातले दात बहुतेक पडले होते. तोंडाचं तसं अगदी बोळकं झाल्यामुळे बाहेर पडणारे शब्द कचितच किंचितसे बुबडे-बोबडे येत होते. तरीही उच्चार मात्र स्वच्छ-स्पष्ट होते. कपाळाला व अंगाला त्यांनी भस्माचे लहान लहान पट्टे ओढलेले दिसत होते. हाडं वर आलेल्या डाव्या खांद्यावरून त्यांचं शुभ्र जानवं, सुरकुत्या पडून बलोटीला गेलेल्या उघड्या पोटाला वळसा घेऊन, शब्दागणिक हळूहळू थरथरत होतं!

स्वामींचा चेहरा खरोखरच अगदी तेजःपुंज, सोज्वळ दिसत होता. कपाळावर लावलेल्या गंधाच्या मोठ्या पांढऱ्या टिळ्यामुळे त्यालाही एक प्रकारची भव्यता आली होती आणि वृद्धत्व अंगांगाच्या साऱ्या सुरकुत्यांतून नि ठायी ठायी लोळणाऱ्या चामडीतून उघड उघड दिसत होतं. त्यांचे घारे घारे डोळे मात्र खरोखरच मधून मधून सारखे लकाकत होते—चौफेर फिरून प्रत्येकाच्या हृदयाचा जणू ते ठाव घेत होते.

ते सारं दृश्य पाहून नकळतच, माझ्या मनावर एक अत्यंत अनुकूल परिणाम झाल्यावाचून मात्र राहिला नाही. घरातून निघताना आई नि यशोदा यांनी स्वामींबद्दल दिलेला निर्वाळा अगदी यथायोग्य होता, असंच माझ्या मनाने मला तत्काळ सांगितलं.

यशोदेने तर मला आपलं निर्लेप मन, विश्वास, श्रद्धा घेऊन यायलाच सांगितलं होतं. प्रयत्न करून मीही तेथे तसाच आलो होतो.

तरीही, एक गोष्ट मनात पटकन डोकावल्यावाचून मात्र राहिली नाही– पण हे स्वामी झाले तरी आता ते मला असा मोठा गड्डा तरी काय देणार आहेत? नि मागून मागून मी तरी मागणार काय आहे त्यांच्याकडे?

*

तोच, हजामत केलेल्या आपल्या तुळतुळीत डोक्यावरून आपला उजवा हात फिरवीत, स्वामींनी आपला चालू प्रवचनाच्या ओघाला पुढली वाट मोकळी करून दिली. "ही अशी सारी मोठी गंमतच आहे!—या जगात आपल्या साऱ्याच हालचाली-धडपडी काही तरी मिळवण्यासाठीच चाललेल्या असतात, आणि प्रत्येक जण स्वतःचं स्वतःच काय ते मिळवत असतो. पण मग, काय मिळवायचं ते आपलं आपणच मिळवलं पाहिजे! नाही का?

"अगदी लहानपणी लहान मूल आपल्या आईबापांवर एक कमालीचा विश्वास ठेवतं, ते सांगतील तेच आपल्या हिताचं अशी त्याची दृढ—जवळजवळ आंधळी श्रद्धाच असते त्यांच्यावर! जणू काय त्यांच्या डोळ्यांनीच ते मूल जगाकडे पाहतं म्हणा ना! पण, आपण मोठेपणीही असली ही श्रद्धा मनात बाळगली पाहिजे. ती उत्तरोत्तर वाढवलीही पाहिजे.

"मी कदाचित एक लबाड मनुष्य असेन. पण सगळेच काही तसे नसतात हो! आणि समजा, मी लबाड असून माझ्यासारख्या लबाडावर तुम्ही मात्र श्रद्धा ठेवलीत तर तुमची ती श्रद्धा फुकट खासच जाणार नाही! भगवान कृष्ण म्हणतात– 'यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति। तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम्।' तेव्हा, उत्कट श्रद्धा अपात्र स्थानी बसली, तरीही ती कधी फुकट नाही जात! मी निःशंकपणे सांगतो तुम्हांला...तुम्ही खुशाल विश्वास ठेवा माझ्यावर...

"परमहंस रामकृष्ण एके ठिकाणी म्हणतात, श्रद्धेने प्रत्यक्ष निसर्गसुद्धा बदलतो! श्रद्धेहून अधिक श्रेष्ठ जगात दुसरं काही एक नाही! कसलेही वादविवाद नेहमी आपल्याला पुढेपुढे नेतातच असं नाही! केवळ वादविवादाने ईश्वरी ज्ञान तर कधीच कोणाला प्राप्त होणार नाही. म्हणूनच स्वामी विवेकानंदांनी एके ठिकाणी म्हटलंय—ज्ञान हे म्हणजे प्रत्यक्ष अनुभवाचाच एकमेव प्रश्न आहे, केवळ!

"म्हणजे अशी आहे एकूण ही श्रद्धा! ही श्रद्धा इतकी प्रचंड, प्रभावी असते, की येशू ख्रिस्ताने देखील एकदा आपल्या शिष्यांना सांगितलं म्हणतात, की बाबांनो तुमच्याकडे मोहरीएवढी जरी श्रद्धा असेल तरी देखील, एखाद्या अफाट डोंगरालासुद्धा' तुम्ही सांगू शकाल— हं चल, ऊठ येथून, जा तिकडे! नि आश्चर्य नव्हे काही—तो पर्वत तिथनं नक्कीच हलेल!"

अतिशय हळुवार, संथ शब्दांत, पण अस्खलित तन्मयतेनेच, ते सारं स्वामी बोलत होते. शेवटी बोलता बोलता त्यांना थोडा श्वास लागला, तेव्हा ते थांबले.

त्यांच्या शब्दप्रणालीबरोबरच चालू असलेली माझी मनोमय विचारशृंखलाही त्यामुळे मध्येच एकदम तुटल्यासारखी झाली. मला अगदी नकळतच माझ्या मनात तरळून गेलं, " स्वामी एकट्या माझ्यासाठीच तर नाही ना हे सारं बोलत आहेत ? माझ्याच प्रश्नांना तर उत्तरं नाही ना देत आहेत ? "

*

तेवढ्यातच, माझ्या मनात लागलीच दुसराही एक विचार भरारला—" काय मिळवायचं हे निदान आमच्या आईचं नि माझ्या यशोदेचं तरी ठरलेलंच आहे. त्यांना हवंय वैभव, त्यांना हवाय वंशाचा दिवा ! — तेवढ्यासाठीच त्या दोघींनी मला आज असं वेठीला धरून स्वामींसमोर उभं केलंय ! पण मग अजून मला समजत नाही, असल्या केवळ ऐहिक गोष्टींसाठीच का ही एवढी थोरली प्रचंड श्रद्धा आपण वापरायची ? "

तेवढ्यातच माझ्या कानांवर फिरून ते सकंप शब्द उमटले. किंचित उसंत घेऊन स्वामी मूळ विषयावरच पुन्हा पुढे बोलू लागले होते...

" स्वतः आपल्यावर नि आपापल्या अनुभवांवर आपण सर्वात अधिक विश्वास, सर्वात जास्त श्रद्धा ठेवतो, खरं ना हे ? पण असं पाहा, आपण तर असे सदैव ऐहिक गोष्टींमधेच रत-रममाण ! तेव्हा आपल्या आधिभौतिक सुखप्राप्तीसाठी, त्याच प्रकारच्या आपल्या इच्छा–आकांक्षा पूर्ण करणारीच एक श्रद्धा आपल्या मनात पहिल्या प्रथम अवतरणार! पण मग, त्यात तरी विशेष नवल ते काय ? मोठंसं वावगं तरी काय ? अहो, मी म्हणतो, ती झाली तरी एक श्रद्धाच ना ? या लहान श्रद्धेतून, म्हणजेच आधिभौतिक इच्छापूर्तीसाठीच मनापासून ठेवलेल्या या श्रद्धेमधून, ती मोठी प्रचंड श्रद्धा, ती आध्यात्मिक प्रगतीच्या नि प्राप्तीच्या साध्यासाठी ठेवायची श्रद्धा, मागून उत्पन्न होते ! हो ! हे अगदी खरं खरं तेच सांगतोय हो मी...!

" इथं एक उदाहरण घेऊ आपण. डॉक्टरने दिलेल्या एका लहानशा डोसाने आपल्याला जरा बरं वाटलं, झोप लागली,— तत्काळ बसली की हो तशी पहिली श्रद्धा त्याच्यावर आपली ! मग पुढे त्या डॉक्टरनेच ऑपरेशनसाठी सुरी-कात्री जरी एकदम आपल्या अंगावर सरसावली, तरी तो रोगी मुळीच डगमगणार नाही. यदाकदाचित घाबरलाच, तर एक समजूतदार धैर्यच तो मनात धरील नि म्हणेल– ' या वेळी बहुधा आपल्याला हेच योग्य, हेच सर्वात आरोग्यप्रद ! आपल्याला आपल्याबद्दल जे समजत नाही, ते डॉक्टरला खासच कळलं ! मागे तो कडूकडू डोस कसा आपल्याला लागू पडला ? अर्थात, आता डॉक्टर म्हणतोय तसं गपचूप कापूनही घेतलंच पाहिजे आपल्याला ! आपल्याच भावी आरोग्यासाठी, सुखासाठी ते प्राप्त नि पथ्याचंच असणार खास ! '

" तेव्हा मला असं म्हणायचंय की, आपण आपल्या कुटुंबातल्या व्यक्तींवर —आईवर म्हणा, बायकोवर म्हणा, भावावर म्हणा, जी श्रद्धा ठेवून चालत असतो, ती श्रद्धासुद्धा

काही कमी का किंमतीची असते ? छे ! तसं कधीच समजू नका बरं, महाराज ! अहो तिच्यातून, तसल्या आधिभौतिक श्रद्धेतून देखील अखेर ईश्वरप्राप्ती होतेच आपल्याला !

" पण मग त्यासाठी आपण तिथंच थांबून मात्र उपयोगी नाही ! आपण आपल्या कक्षा उत्तरोत्तर व्यापक केल्या पाहिजेत. सगळं विश्वच आपल्या हृदयात आणून ठेवायचा सारखा अहोरात्र निदिध्यास घेतला पाहिजे आपल्या मनाने ! त्या आपल्या प्रचंड श्रद्धेने, अखेर तोच मार्ग चोखाळला पाहिजे ! "

विजेचे धक्के बसावेत तसे धक्केच बसत आहेत क्षणोक्षण, असं मला ते सारं ऐकत असताना वाटत होतं ! मनात सारखं सारखं खात्रीपूर्वक येऊन जात होतं— औरच आहे हे सारं म्हणायचं ! स्वामी मनकवडे तर नाहीत ?

*

क्षणभर विसावा घेऊन, मुकाट्या मुकाट्याने जवळ असलेल्या तांब्यातलं पाणी स्वामींनी पेल्यात ओतलं नि त्यातला एक घोट घेऊन ते पुन्हा बोलू लागले— " माणसाचं मन ही एक अद्भुत चीज आहे. स्वतः माणसाला कल्पनाही करता येणार नाही, इतकी एक प्रचंड शक्ती त्यात आहे ! ती प्रत्येकापाशीच आहे. पण त्याने ती प्रयत्नाने प्राप्त करून घेतली पाहिजेय मात्र ! श्रद्धावान् लभते ज्ञानम् म्हणतात ते असंच ! अहो, मला तुम्ही सांगा, रामकृष्ण, रामतीर्थ, विवेकानंद, अरविंद घोष ही—ही—काय कमी सुशिक्षित माणसं म्हणायची एकेक ? पण, ही श्रद्धा प्राप्त झाल्यावर, या विषयाची गोडीच लागल्यावर, त्याच ध्यासामागे आपल्या जीवाच्या मोलाने ते सारे महाभाग अखंड धडपडत राहिले. निदान अशांच्या शब्दांवर तरी काही विश्वास ठेवून, त्या मार्गाने निष्ठेने जाण्याची आपल्या मनाची तयारी आपण जरूर जरूर केली पाहिजे. त्यासाठीच ही श्रद्धेची काठी रस्ता चापायला आपण आपल्या हाती ठेवली पाहिजे. चालू क्षणी आपल्याला अगम्य, अतर्क्य वाटणाऱ्या त्या थोरामोठ्यांच्या अनुभवी विधानांवर अगदी मनापासून विश्वास ठेवणं, हीच ती श्रद्धा ! तिच्यासाठीच आधी आपल्या हृदयाचा दरवाजा उघडा ! अगदी सताड उघडा ! "

तेवढ्यातच एका बाईच्या मांडीवर झोपलेलं मूल उठलं नि एकदम रडू लागलं. तिने त्याला थोपटून पुन्हा गप्प बसवेपर्यंत, सस्मित, प्रसन्न मुखाने तिकडेच पाहत, स्वामीही गप्प राहिले.

ते सारं स्थिर-स्थावर झाल्यावर, मग चौफेर एकदा सस्मित पाहून, स्वामी हास्यमुख होत पुन्हा पुढे म्हणाले, " हा नव्या दमाचा जीव, तुकताच ओरडून आपल्या भाषेत तुम्हांला म्हणत होता, ' या ठोंब्या थेरड्याची ही इथं उगीचच नुसती बडबड चाललीय ! याला स्वतःलाच यातलं असं काय समजतंय हो, तर तो मारे आम्हांला ज्ञानामृताचे हे डोस पाजणार ? ! '

" खरंच, खरंच आहे त्याचं ते म्हणणं! आतापर्यंत मी हे एवढं सारं म्हणालो ते खरं तरी कशावरून? मला हो कसली आलीय निराळी अक्कल? दोन हात दोन पायांचा तुमच्यासारखाच एक हाडामासाचा माणूस देखील! तर मग, आता माझ्या या बोलण्या-वर तुम्ही तरी सर्वांनी विश्वास का म्हणून ठेवावा? मी तुम्हांला फसवीतच कशावरून नसेन? किंवा मी फसवीत नसलो असं क्षणभर म्हणू या, तरी मी स्वतःच या सगळ्यात फसलेलो नसेन कशावरून??

" तरी पण, मी हे एक इथं नक्कीच सांगतोय ते ऐका! मी काही फसलेलो नाही! मला जे आतून स्वतःच्या अनुभवाने पटलं आहे, तेच मी तुमच्यापर्यंत पोचवण्याचं माझं कर्तव्य करीत आहे. ते तुम्ही घ्या...अथवा सोडून द्या! घेतलंत तर तुमचं कल्याण होईल! नि सोडलंत तरी काय? मी माझं काम केल्याचं समाधान तर माझं मला मिळेलच ना?" स्वामींनी किंचित उसंत घेऊन, क्षणभर आपल्या सभोवार चौफेर दृष्टी फिरवली नि मग ते म्हणाले,—" त्याचं असं आहे बवा—या सकल विश्वाचा—यच्चयावत सृष्टीचा एक अधिष्ठाता आहे!—तोच आपल्याही ठिकाणी असतो. तो अनुभव मिळवायला निष्ठा हवी, प्रयत्न हवा, त्याबाबत सारखा ध्यासच हवा! त्यासाठीच खरीखुरी श्रद्धा हवी!—श्रद्धेतून भाव, भावातून भक्ती, भक्तीतून ऐहिक सुखदुःखां-बद्दलचं आपोआप वैराग्य!...त्यातूनच ईश्वराबद्दलचं नितांत प्रेम स्थिरावेल, त्या प्रेमातूनच साक्षात्कार होईल, तिथंच आत्मानुभव येईल, अखेर!

" या ध्येयावरील निष्ठा! त्या प्रयत्नांतील तीव्रता नि चिकाटी! नि विलंब लागला तरी सबूरी! या त्रयीवरच हा अनुभव अवलंबून आहे. एवढ्याचसाठी 'उपासनेला दृढ चालवावे'! उपासनेचे डोंगरावर डोंगर उभे राहिले पाहिजेत. निष्काम बुद्धीच्या कर्मांचा अखंड यज्ञ झाला पाहिजे, यज्ञ!—मग त्याची अखेर या अनुभवांतच होणार, हे निश्चित.

" एखाद्या कार्याप्रमाणे, आपण त्याच्या सिद्धीसाठी लागणारा आवश्यक कालखंड ठरवतो. एक काम एक दिवसात उरकतं, तर एखाद्याला वर्षही पुरत नाही. या आपण नुकत्याच पाहिलेल्या कार्याला...कदाचित एक जन्मही पुरणार नाही! कोणी सांगावं, तुम्हांला-आम्हांला असले अनेक जन्मही घ्यावे लागतील!

" पण मग, मला सांगा, इच्छा धरून केव्हा तरी याही प्रचंड कार्याला आरंभ तर करावा लागेल ना? नि जर का केव्हा ना केव्हा प्रारंभ करायचाच, तर मग तो याच जन्मी—अगदी आजच—याच क्षणापासून, तो का हो नको? अरसं आहे हे सारं!

" म्हणून कार्याला लागा—सच्चिदानंद! सदानंद!"

स्वामी थांबले, सर्वांवरून चौफेर डोळे फिरवून, अखेर त्यांनी डोळे मिटले, हात जोडले, नि पुन्हा एकदा अंतर्मुख होऊन, स्वतःशीच पुटपुटले, " सत्–चिदानंद!' सदानंद!"

अगदी अभावितपणे माझेही हात एकदम जोडले गेले, डोळेही मी मिटले नि क्षणभर मी तसाच भक्तिभावाने गप्प उभा राहिलो.

गर्दीचा लोंढा हळूहळू कमी होत गेला. प्रत्येकजण स्वामींपाशी जाऊन काही ना काही ठेवीत होता. त्यांच्या चरणावर डोकं ठेवीत होता. त्यांच्याशी एखादं-दुसरं वाक्य तेही सस्मित मुखाने बोलत होते नि त्यांचा निरोप घेत होते. प्रत्येकाच्या हातावर अंगाऱ्याची एक एक चिमूट ठेवीत होते.

त्या वेळचं ते एकूण सोज्वळ दृश्य प्रत्यक्षच पाहून, माझ्या मनात लक्षावधी विचार येऊन जात होते.

स्वामींच्या त्या वक्तव्याने, प्रसन्न ध्यानाने, मित भाषणाने, सोज्वळ चेहऱ्यावरील प्रेमळ स्नेहाळ स्मिताने, त्यांच्या त्या एकूणच उपजत विनयशीलतेने नि अखंडच जणू दुसऱ्याच्या हृदयाचा ठाव घेऊन बोलत असलेल्या त्यांच्या त्या लखलखत्या डोळ्यांनी माझ्या हृदयाचं लोणी केव्हाच पार वितळून गेलं होतं.

दुपारी देवळाकडे जाताना, ज्या एक प्रकारच्या बेफिकिरीच्या नि संशयी भावना माझ्या मनात धिंगाणा घालीत होत्या, त्या साऱ्याच्या साऱ्या, सूर्योदयानंतर धुकं नाहीसं व्हावं तशाच साफ विरून गेल्या होत्या. त्या दोघींच्या श्रद्धेवरच मी श्रद्धा ठेवून, स्वामींच्या दर्शनाला आलो, पण त्यात काही चुकलं नाही. स्वामी वंदनीय-श्रवणीय आहेत, अशी एकच एक प्रखर भावना माझ्याही मनात सारखी स्फुरत राहिली.

*

तितक्यातच आई नि यशोदा स्वामींपुढे झाल्या- त्यांनी पुढे व्हायची मला पण खूण केली. माझी पावले आपोआपच तिकडे वळली.

आईने व तिच्या पाठोपाठ यशोदेने खाली वाकून नमस्कार केला. त्या दोघी बाजूस होताच, मीही मला नकळत गुडघे टेकले नि स्वामींच्या पायांवर डोकं टेकलं.

स्वामींनी त्याच वेळी यशोदेला हळूच विचारलं, "हेच तुमचे यजमान वाटतं?"

तसं ते विचारीत असतानाच, त्यांचा वृद्ध थरथरता हात खाली होऊन माझ्या मस्तकावर पडला होता. त्याबरोबरच, त्यांच्या तोंडचे "सच्चिदानंद... सदानंद..." असे पुटपुटते शब्दही माझ्या कानी पडले होते.

क्षणकाळच एक प्रकारची अननुभूत, चमत्कारिक लाट माझ्या अंगांगातून गेल्या-सारखा विस्मयकारक भास मला झाला. मी जागेवरून उठलो खरा, पण निमिषमात्र मला माझं भान हरवल्यासारखंच झालं होतं... तो सारा माझ्याच भावनांचा खेळ होता की स्वामींच्या त्या स्पर्शाचा? कोण जाणे!

मग स्वामींनी क्षणभरच माझ्याकडे आपली प्रेमळ, सोज्वळ, सस्मित नजर रोखली. आम्ही निघू लागताच त्यांनी आईचा नारळ तिला परत दिला नि जवळ पडलेल्या विविध फळांच्या राशीतून एक मोठंथोरलं रामफळ माझ्या हाती उचलून दिलं, नि मग ते मला हसत म्हणाले- "कसं अगदी छान छान फळ आहे हो हे! नाही? हा ईश्वराचाच प्रसाद आहे हो. तो माझ्या हाती आला, मी आपला तुम्हांला दिला. पण, फळ

तुम्हाला मिळालं, तुमच्या हाती पडलं, म्हणून स्वार्थी नका होऊ बरं का ? त्यातलं अर्धे यांना–तुमच्या अर्धांगींना द्या ! त्याचा आस्वाद घेऊन दोघांना आनंद– आनंद होईल ! सर्वांचं कल्याण होईल ! सदानंद– सच्चिदानंद... ”

आमच्या मागेही आणखी मंडळी होतीच. मी मान वाकवून ते माझ्या ओंजळीत घेतलं नि चटकन जायला बाजूला वळलो.

मागे वळून, माझ्याकडे यशोदा अत्यंत बोलक्या डोळ्यांनी सस्मित पाहत होती. तिच्याजवळ जाताच मी ते रामफळ तिच्या हाती दिलं. तिनेही अगदी जपून, आपल्या पदरात ते गुंडाळून घेतलं नि ती आईपाठून चालू लागली.

त्या दोघींच्या पावलावर पावलं टाकत, मी त्या संध्याकाळच्या साऱ्याच अपूर्व अनुभवावर विचार करीत, विस्मित पण उल्हसित मनाने घराकडे चाललो होतो.

*

दुसऱ्या कोणी मला हेच सारं असं सांगितलं असतं, तर ते मला खरं देखील वाटलं नसतं ! पण ही काही पुराणातली गोष्ट नव्हे, प्रत्यक्ष माझ्याच, याच आयुष्यातली गोष्ट आहे ही ! तो माझा स्वतःचाच अनुभव आहे.

घरी आल्यावर यशोदेने मोठ्या भक्तिभावाने देवाला नमस्कार केला. कापूर, उदबत्ती, धुपारती ओवाळली नि एका चांदीच्या छोट्या ताटलीत, रेशमी रुमालाखाली झाकून, ते रामफळ देवासमोर नेऊन ठेवलं.

रात्री सारी कामं आटोपून आल्यावर, यशोदेने पुन्हा देवापुढे आरती ओवाळली आणि ती झाकलेली चांदीची ताटली माझ्यापुढे आणून ठेवली.

त्यानंतरच्या साऱ्याच खाजगी गोष्टी मी इथं लिहून ठेवणं योग्य होणार नाही, पण ते खाताना यशोदेचा चेहरा कधी नव्हता इतका पुलकित झाला होता. प्रफुल्लित दिसत होता. तिच्या त्या उस्फूर्त आनंद–श्रद्धेच्या संसर्गाने, आपण अगदी नव्याच जगात वावरत असल्यासारखं मलाही त्या क्षणी वाटत होतं.

त्या अर्थपूर्ण रसाळ प्रवचनातील स्वामींचे ते गंभीर–प्रेमळ कापरे शब्द मला पुनःपुन्हा ऐकू आल्याचा भास होत होता. “ आधिभौतिक सुखांच्या प्राप्तीसाठीच मनात अवतरणारी ती श्रद्धा– तिच्यातूनच ती पुढली प्रचंड अशी आध्यात्मिक प्रगती–प्राप्तीच्या साध्यासाठी आवश्यक अशी एक श्रद्धा उत्पन्न होते ! हा ईश्वराचाच प्रसाद आहे, तो खाऊन दोघांना आनंद होईल— सर्वांचं कल्याण होईल ! ”

*

अगदी त्या क्षणापासूनच माझ्यात एकदम बराच बदल झाला होता. माझ्यात पूर्वी कधी विशेष नव्हती ती धार्मिकता तिथं राहायला आली होती. आणि यशोदा ! ती तर भाविक भक्तिरसाच्या महापुरातच जणू पोहत असल्यासारखी वागत होती.

आणि त्यामुळेच, आम्ही दोघं कधी नव्हतो इतकं मनाने जवळ जवळ आलो होतो, एकरूप झालो होतो.

मला कल्पनाही नसताना, केवळ यशोदेच्या संगतीमुळेच आम्हाला लाभलेल्या स्वामींच्या त्या प्रसादापासून, आमच्या मनात एका नव्याच प्रकारचा आनंद भरून आल्यासारखं वाटत होतं. ते सारं, नव्या असामान्य भावनांचं, अभूतपूर्व आनंदाचं, सारं सारं श्रेय माझ्या यशोदेचंच होतं! हो, नि माझ्या आईचंही.

ते दिवस, आठवडे, महिने, कधी नव्हत्या अशाच घरगुती समाधानात नि कुटुंबियांच्या निकट सहवासातच अधिक गेले. ते कसे झपाट्याने गेले ते माझं मलाही नीट समजलं नाही—

आणि त्या सुखद घटना-परंपरेच्या आनंदी कालखंडाचा अखेर तर कळसच झाला. तो योगायोग म्हणावा, नियती म्हणावी की खरोखरच स्वामींचा प्रसाद समजावा?

आई एके दिवशी पहाटेच माझ्याकडे धावत आली. तिने मला जागं केलं नि अगदी अत्यानंदाने गद्‌गदतच ती म्हणाली— "आना, रे आना! बाबा या वेळी मात्र सर्वांच्या मनासारखं झालं हो! तुझ्या यशोदेने मला नातू दिला! ऊठ- पाहायला चल लौकर- पण, त्याचं आता नाव काय ठेवणार आहेस रे?"

त्या बातमीने मलाही मनस्वी आनंदच झाला होता. लगबगीने तिच्या पाठोपाठ बाहेर पडून, तिकडेच जात, मी आईला म्हणालो—

"मी ग काय सांगू? यशोदेलाच विचार! ती त्याची आई!"

पण मग आईच हसत हसत मागे वळून, आपल्याच अधिकारात मला म्हणाली,

"– आता ती रे आणखी काय दुसरं सांगणार? सदानंद! दुसरं काय?"

"सदानंद!"

*

आधीपासून चालू केलेले नि अर्धवट मूर्त स्वरूप धारण करीत आलेले माझे व्यवहारही दरम्यान समाधानकारकपणे प्रगती करीत होते. जे जे नि जसे जसे मिळाले, तसे तसे खरेदी करत आणलेले सुमारे तीनशे एकराचे तुकडे तोवर मी हस्तगत केले होते. 'शंकर कॉलनी' व 'नवग्राम' यांच्या दरम्यानचा आता बहुतेक भाग माझ्या मालकीचाच झाला होता.

मधल्या मधल्या काही मालकांच्या दुराग्रहामुळे त्या माझ्या जमीन-मालकीच्या सलगपणाला थोडा खंड पडला होता. पण ते आता केवळ थोडीफार अधिक वाट पाहण्याचंच काम होतं. त्या साऱ्यांना माझ्या बेताची आधीच कुणकुण लागली होती, ते स्वतः त्या जागी खास काही करणार- बांधणार होते किंवा मी कमी पैसे देत होतो असातला तो प्रश्नच नव्हता. अगदी २५० रुपये एकरीपर्यंत भाव कबूल करूनही त्यांचा मला नकारच मिळत गेला होता. माझ्याशी किंचित अडवणुकीचं राजकारण खेळून पाहत होते ते,

एवढंच !

उरलेल्या दीडशे एकरांपैकी अगदी मध्यावरला एक पन्नासांचा विस्तार होता त्यातल्याच मधल्या, माझ्या ताब्यात आलेल्या साडेसात एकरांचा वाकडातिकडा भाग सोडला, तर बाकीचा आमच्या म्युनिसिपालटीच्याच मालकीचा होता. तो थोडा पाण-थळीचाही भाग होता.

मला एकदम एक कल्पना सुचली नि मी कमिटीशी पत्रव्यवहार केला.

कल्पना अशी—तो माझा मधला तुकडा मी आधी म्युनिसिपालटीला द्यायचा आणि तो संपूर्ण चौकोन होण्यासाठी त्या पन्नास एकरांच्या तुकड्यालगतचे दोन्ही बाजूचे आवश्यक तेवढे आणखी सुमारे सात एकराचे माझे भागही मी विनामूल्यच तोडून द्यावयाचे ! सगळयाच जागेत मी स्वखर्चाने हळूहळू भरणी करून तो सपाट करायचा ! अशा तयार होणाऱ्या त्या सगळ्या साठ–पासष्ट एकरांच्या विस्तीर्ण जागी, वाढत्या गावाचा एक मध्यवर्ती ऐसपैस ‘ पार्क ’ तयार करायचा, त्या विस्ताराचीच एक बाजू भव्य–विस्तीर्ण क्रीडांगणासाठी राखून ठेवावयाची. त्यातच मग क्रिकेट, फुटबॉल, हॉकी, खो-खो, आटापाट्या, हुतूतूचे सामने व्हायचे ! जमल्यास स्टेडियमही बांधायचा !

या कल्पनेच्या योजनेला निगडीत अशी म्युनिसिपालिटीला माझी अट केवळ एकच होती, ती अशी की त्याचं नाव आबापार्क असं ठेवायचं.

ती कल्पना आमच्या कमिटीलाही इतकी एकदम आवडली, की सर्वच सभासदांनी तिला मान्यता देऊन तो ठराव सहीसही मान्य केला. मोजणी–मापणी मुक्रर केली नि सगळ्याला प्राथमिक मूर्त स्वरूप आणून देण्याचं कामही माझ्यावरच सोपवलं. भरणी-खर्च माझा होता. पुढे फेन्सिंग-कट्टयाचा खर्च मात्र नगरपालिकेचा होता. फावल्या वेळात ते काम करीत जाण्याची मी माझ्या दोन कामगारसंघांना सूचना दिली, नि तिथं लागलीच एक भली मोठी नवी पाटीही लटकवून टाकलीच– ‘ आबा पार्क. ’

आता तीही त्या नव्या भागाची एक उत्तम प्रकारची आकर्षक जाहिरात झाली होती. लोक प्लॉट्सची चौकशी करू लागले होते. उरलेल्या शंभरएक एकरांच्या माझ्या खरेदी-बाबतही मी आता एक पक्कं जाणून होतो. निश्चित होतो. कारण पुढेमागे तिथं बांधकामावेळी त्यांनाच आपल्या जागेची प्रत्यक्ष गैरसोय दिसणार होती, नि ते हटेल मालक मग आपणहूनच आपल्या सोयीस्कर प्लॅनला कमी पडणारी जागा मागायला माझ्याकडे येणार होते ! आता त्यांनी जागा मला दिली नाही, तरी त्यांना हवा तेवढा माझ्यातला भाग त्या वेळी त्यांना देताना मला स्वतःला फायदेशीर होणारा सौदा करण्याचा एक भावी मौल्यवान मोका नक्कीच निर्माण होणार होता.

खरीदलेली ही सर्व जमीन मी बँकेच्या ओव्हरड्राफ्ट खात्याच्या तारणात जमा केली नि यशोदेचे दागिने व आमचे शेअर्स त्यातून सोडवून घरी आणले होते. सुनेचे दागिने इतक्या लौकर आपल्या मुलाने परत आणलेले पाहून माझ्या आईच्या डोळ्यांत पुन्हा आसवं दाटली होती. तिच्या पायीच्या मासोळ्या मात्र, हाती आल्या तरी, मी तिला परत

दिल्या नाहीत. मी नेहमी वापरीत असे त्या माझ्या पैशाच्या पेटीतच त्या मी टाकून ठेवल्या होत्या.

शेअर बाजारावरची माझी पूर्वीची हिरिरी-ईर्षा आता खूपच ओसरली होती. त्यांच्या भावांतील चढउतार पाहायला मात्र माझं पाक्षिक-मासिक लक्ष असेच.

मी खरीदलेल्या त्या तिन्ही प्रकारच्या शेअर्सबाबतची माझी धोरणं नि आडाखे फारसे चुकलेले नव्हते. ' हिंदमाता शुगर 'वर स्वदेशी चळवळीचा झटपट परिणाम झाला होता. त्याचे २४०० शेअर्स घेताना मला ५ रु. भाव पडला होता. ' भारत आयर्न 'च्या १६०० शेअर्सना ६ रु. भाव मी दिला होता. हे दोन्ही शेअर्स आता त्यांच्या मूळ रु. दहाच्या छापील किंमतीपर्यंत येऊन पोचले होते, नि आणा-चार आणे चढ-उतार करीत राहिले होते. उरले ' गॉडसेन्ट सिमेंट 'चे १२०० शेअर्स ४ रु. ला घेतलेले, ते आता फक्त सव्वा पाचला येऊन भिडले होते. तेव्हा ' सीमेन्ट 'सारखी बाब हळूहळू बांधकामात लोकप्रिय होईल नि ती गुंतवण मला पुढल्या पाच वर्षांत नक्की फलदायी होईल, असंच धोरण बांधून ती सुमारे साडेपाच हजारांची गुंतवण तशीच पडून ठेवण्याचा मी निर्णय घेतला.

केवळ " शुगर " व " आयर्न " तेवढेच विकूनही माझ्या हाती रावजींची व माझी एकूण रक्कम भरपूर फायद्यासह परत येत होती. तेव्हा आपला हा नवा फायदाच ' गॉडसेंट 'मधे गुंतला, असं समजून, रावजींचा हिशेब आता आधी साफ पुरा करून टाकायचा, असं मी निश्चित केलं नि जवळ जवळ पावणेदोन वर्षांनी, केवळ त्या विक्रीसाठीच, एके दिवशी, बाजारात पाऊल टाकलं.

*

मधल्या काळात रावजी कधीमधी रस्त्यात ओझरते नि चारदोन कुशल प्रश्न विचारण्यापुरते भेटले होते, तेवढेच. सदानंदच्या बारशाच्या दिवशी, घरच्या सर्व मंडळींसह ते आमच्या घरीही मुद्दाम येऊन गेले होते. तरीपण अलीकडे दीड एक वर्षात मी स्वतः त्यांच्या घरी असा मुद्दाम कधी गेलो नव्हतो.

तेव्हा त्या दिवशी सकाळीच उठून मी जेव्हा रावजींसमोर जाऊन उभा राहिलो, तेव्हा त्यांनी मिस्किलपणेच हसत माझं स्वागत केलं—" या, या आनाबापू ! पंचांगात कपिलाषष्ठीचा योग सांगितलाय का हो आजचा ? बरं, मुदत संपली म्हणावं, तर मला वाटतं अजून दोन महिन्यांहून अधिक अवधीही आहे शिल्लक ! असं कसं ? ? "

ते नि मी मोठ्याने हसत असतानाच, आधी घरी लिहून बरोबर घेतलेला १८,००० रु.चा त्या तारखेचा चेक मी त्यांच्या हाती दिला, हसत म्हणालो– " पण माझा रावजींशी संबंध आहे हा, हे विसरलेलो नाही मी, रावजी साहेब ! तेव्हा म्हटलं अगदी शेवटच्या दिवसापर्यंतच आपल्या स्नेहसौजन्याचा अंत बघू नये ! "

आपल्या संपूर्ण रकमेचा तो माझा चेक हाती घेऊन नि तिकडे स्मितपणे पाहत

राहून, रावजी अखेर म्हणाले— " आता भाव चढताहेत, अधिक मुदत ठरवायला आज आला असाल, असंच वाटलं होतं मला---मीही तुम्हांला 'हो' म्हणायचंच ठरवलं होतं..."

" छेः छेः, रावजीसाहेब!" मी पटकन म्हणालो, " तत्त्व तुमचंच! 'दस फार अँड नो फार्दर.' अगदी शिरसावंद्य!"

पुन्हा खो खो गदगदून हसत, रावजी मला स्नेहाने म्हणाले— " गुरूची विद्या गुरूला, काय!"

मीही मग हसत हसत खिशातून हिशेबाच्या तक्त्याची त्यांची कार्बन टाईप कॉपी काढली नि त्यांच्या हाती दिली.

त्यांनी तो सारा तपशील वाचेपर्यंत तिथं अगदी पूर्ण शांतता नांदत होती. माझ्या मनात अगदी मुग्ध आनंद–अभिमानाचं भरतं येत होतं!

वाचून पाहता पाहता, रावजी शेवटी ताडकन जागचे उठले. त्यांनी माझ्या दोन्ही खांद्यावर जोरजोराने थोपटलं व मला खुर्चीवरून ओढून गदगदा हलवीत ते म्हणाले— " वाः वाः! शाब्बास! आनाबापू, अस्सं हवं! शिष्यादिच्छेत् पराजयम्!"

मलाही तो माझ्या आयुष्यातला खराखुरा बहुमान वाटला त्या वेळी!

*

पण मग पुन्हा खुर्चीवर बसून मी चटकन् खिशातलं चेकबुक काढलं नि पेन उघडलं.

" अं! हे हो काय आणखी?" रावजी आश्चर्याने म्हणाले, " थांबा! सांगा आधी."

" म्हणजे काय झालं?— तुमच्या फायद्याचा सरसकट दहा हजारांचा चेक आता लिहून देतो." त्यांचं नाव लिहायला सुरुवात करीत, रावजींकडे पाहत मी हसत म्हणालो.

" हं! ऐसी बात? खबरदार, आनाबापू! त्याला मात्र माझा संपूर्ण विरोध आहे!" रावजी थोड्या करड्या स्वरात म्हणाले– " नो, नो! तेवढ्यावरून तुमचं माझं नक्कीच भांडण जुंपेल आज इथं!"

चेक लिहिणं अर्धवटच सोडून, आता काय करावं याचा मी विचार करीत होतो.

पण तेवढ्यात, रावजी पुढे म्हणाले– " हे पाहा आनाबापू, सरळसरळ वस्तुस्थिती सारी लक्षात घ्या... माझी ती तुम्ही गुंतवलेली मूळ फायद्याची रकम आता मला पुरी मिळालीय! आता या नव्या व्यवहारात तुम्हांला झालेल्या फायद्याशी माझा अगदी काडीचाही संबंध नाही पोचत! एवढंच काय, तुम्ही वापरलेल्या त्या अठरा हजारांवरील साध्या सरकारी व्याजावर देखील! त्या वेळी ठरलंच होतं मुळी आपलं तसं!"

" हा आपला तुमचा मोठेपणा, रावजीसाहेब!" मीही तितक्याच आग्रही स्वरात त्यांना म्हणालो, " तशी हजार–पाचशेची मैत्री मी जाणतो! पण– पण– एवढ्या

मोठ्या रकमेच्या माझ्या व्यवहाराला, तुम्ही म्हणता ते परवडणार नाही! आजपर्यंत तुमची मला अनमोल मदत झालीय! तीच नुसती लाखमोलाची आहे—"

कदाचित, मागचे त्यांचेच ते शब्द ऐकले म्हणून रावजी चमकले. तेवढ्यात चहा आला.

तो घेता घेता रावजींनी मला हडसून-खडसून पुन्हा एकदा निश्चयाने सांगितलंच— "छे छे! आनाबापू, या तिन्ही शेअर व्यवहारांचं धोरण सारं तुमच्या एकट्याचं, ते सारं कर्तृत्व अर्थात तुमचं! त्यातल्या कसल्या तोट्यात मी होणार होतो काय तुमचा भागीदार? मुद्दल सोडणार होतो का तुम्हाला एक पै तरी? नि ठरली दोन वर्षांची मुदत तुमच्या हातनं चुकली असती, तर तुमच्यावर मी ठपका ठेवल्याशिवाय तरी राहिलो असतो, तुम्हांला वाटतं? मग सांगा आता-- माझी मूळ रकम पुरी एकरकमी ठरल्या मुदतीच्या आतच तुमच्याकडून मला मिळाल्यावर, माझं उरलंयच काय येणं बाकी? तुमच्या व्यवहारात तुमच्या तुम्ही मिळवलेल्या फायद्याशी आता माझा हो काय नि कसला संबंध? मी तो न मागणं हेच जास्त माझं कर्तव्य, तसाच मला तुम्ही तो न देणं हा तुमचा हक्कच आहे!"

"पण मग— रावजीसाहेब, मी आपणहून देत असता तुम्ही माझा चेक न स्वीकारणं हा तर माझा सरळ सरळ अपमानच नव्हे का?" मी हसत रदबदली केली.

"ऐसा? ये बात? तर मग स्वीकारतो बापडा मी ती फायद्याची रकम!" रावजी एक निःश्वास टाकून नाटकीपणे क्षणभर थांबले नि पुढे म्हणाले, "पण ती रकम तशी स्वीकारून, ती मी जशीच्या तशी आताच तुम्हांला प्रेमाने परतही करतो! माझं ते तुम्हाला बक्षीस म्हणा. किंवा तुम्हांला ते कमीपणाचं वाटत असेल तर असं समजा, तुमच्याकडे मी कधी आपणहून न मागायची माझी ती बिनव्याजी पडून राहणारी ठेव-रकमच आहे तुमच्याकडील!"

"जशी तुमची मर्जी! तुमची रकम पडून राहील पेढीवर!" त्यांच्या त्या प्रेमळपणाला मी अखेर हारच गेलो, तरी पण हसत हसत मी रावजींना एक चिमटा काढलाच— "पण तुम्ही कधी निरोप पाठवलात ना, तर-- अगदी रात्रीच्या पोटातसुद्धा— क्षणार्धात मी ती आपल्यासमोर हजर करीन! ठरलं बरं का हे, रावजी साहेब!! तुम्ही रोकडीची माणसं!"

मागले ते आपलेच शब्द आठवून, रावजी त्यावर खो खो हसले! मीही मनमुराद हसलो! तसा मनसोक्त हसत हसतच, सारा कर्जभार हलका झालेल्या अंतःकरणाने मी घरी येऊन पोचलो!

खरोखर! रावजींसारखा दिलदार स्नेही मी माझ्या उभ्या आयुष्यात दुसरा कोणी कधी पाहिलाच नाही! धन्य रावजी! धन्य मी! नि धन्य आमचा तो ऋणानुबंध— स्नेह!

*

मी प्रारंभीच म्हणालो — अरे, मुंबईच्या एका गिऱ्हाइकाला जागेसकट तीस तीस हजारांची चार घरं बांधून द्यायची आहेत. पहिला नमुना-बंगला बांधायची त्याने स्थूल रूपरेषा मला दिलीय. पण पक्की योजना-कल्पना-प्लॅन, सारं सारं निश्चित करायचं आपल्यावरच सोपवलंय त्याने. तेव्हा आता तुम्ही सर्वांनीच त्यात अगदी आपलं सारं कौशल्य ओता! आपण या वेळी हजार दोन हजारांच्या फायद्याकडे मुळीच पाहायचं नाही, बरं का! या नमुना-बंगल्याच्या पसंतीवरच आपला त्याच्याबरोबरचा पुढला धंदा अवलंबून आहे. हं. हा घ्या पास झालेला प्लॅन. वेळेवर, तुम्हांला कोणाला यात कसले फेरफार सुचले, सहजासहजी काही जादा सोयी कराव्या वाटल्या, थोडं इकडेतिकडे करून सौंदर्य वाढत असलं कशाने, तर मला सांगाय-सुचवायचं राहू नका बरं का कोणी. चीफ ऑफिसरकडून आपण यात हवा तसा, हवा तेव्हा बदल करून घेऊ. बरं मालकाचं म्हणाल तर तो मालक इकडे फिरकणारसुद्धा नाही. तो आहे दिल्लीला! सर्व झाल्यावर एकदम शेवटीच येणार आहे पाहायला! म्हणजे— यामध्ये तर आपली जबाबदारी फार फार वाढतेय! हे मात्र नीट लक्षात असू द्या."

कोणी घरमालक म्हटला रे म्हटला की त्याची स्वतःची, त्याच्या घरातल्या सर्व मंडळींची, स्नेह्यासोबत्यांची, त्याच्या आर्किटेक्ट-इंजिनियरांची, सर्वासर्वांचीच उलटीसुलटी मर्जी संभाळायची! ती निरनिराळ्या प्रकारची त्याची रोजची किटकिट ही चालू असायचीच, हा तर त्या सगळ्यांना आजपर्यंत पन्नासदा तरी अनुभव आलेला! तेव्हा, या नव्या बंगल्याच्या तसल्या न्याऱ्या, अज्ञात मालकाच्या तसल्या लहरीपणाची त्यांना आधी गंमतच फार वाटली नि म्हणूनच, त्यांना मी दिलेलं ते आव्हान त्यांनी मोठ्या आनंदानंच स्वीकारलं!

मग खोदकाम झालं, आमच्या एका आबांपासूनच्या म्हाताऱ्या गवंड्याच्या हस्तेच मी मुहूर्ताचा दगड बसवून घेतला. साऱ्याच कामगारांना तो आपला कधी नव्हे तो गौरव वाटला. त्या दिवशी ते सगळे एकत्रच "घरमालकाच्या खर्चाने" जेवले. नि दुसऱ्या दिवसापासून त्या खऱ्या बांधकामाला जोरात सुरवात झाली. साऱ्यांनीच आपापल्या कामाच्या उरकाची शिकस्त सुरू केली त्या वेळी.

धाकट्याचे जिन्याबाबतचे व त्या खालच्या 'अडगळ खोली'चे एकदोन फेरफार मी स्वीकारले. सदाशिवने फरशांऐवजी हॉलमध्ये पेटंट टाइल्सची नवी स्टाइल नि इतर खोल्यांमध्ये भिंतींतली दोन दोन कपाटं वापरायचं ठरवलं. आमच्या सुतार मुकादमाने खिडक्यांची नवी डिझाइन्स तयार केली. वरल्या व्हेस्टिब्यूलला खिडक्यांऐवजी उघडझापीच्या लोखंडी जाळ्या व बाहेरून पुन्हा दुध्या काचेच्या तावदानांची झडप मुक्रर केली.

एकूण, त्या सर्वांच्याच आपुलकीच्या भावनेने, ते सारंच बांधकाम जितक्या खेळीमेळीने सुरू झालं होतं, तितक्याच झपाट्याने पारही पडलं! तीन महिन्यांच्या आत आम्ही छपरापर्यंतही जाऊन पोचलो होतो. आता फक्त रंगकाम तेवढं उरलं होतं.

त्यापूर्वी नि त्यानंतर मी इतरांसाठी इतकी लहानमोठी घरं बांधली, पण त्या घरंबांधणीमधे निर्मितीचा नि साऱ्यांच्या सहकार्याचा जो आनंद मी मनातल्या मनात दैनंदिन अनुभवला, तसला त्यापूर्वी किंवा फिरूनही कधीच मला माझ्या आयुष्यातच लाभला नाही !

*

इकडे घरात मी आडून आडून नव्या घराच्या आवश्यकतेबद्दल वारंवार बोलायचो ! ते माझं पद्धतशीर, गोड गुपित, कारस्थानच होतं मुळी !

अशा वेळी आई अगदी उत्सुकतेने म्हणायची, " खरंच—खरंच रे आना ! इतकी लोकांची एकएक घरं बांधतोयस तू—तुझं आपल्यासाठी बांधलेलं घर मला कधी पाहायला मिळणार आहे की नाही, देवच जाणे ! अरे, मी आता फार का दिवस जगणार आहे यापुढे ? साठी केव्हाच झाली ! डोकं भिरभिरतं, आता छातीही बघ थरथरते माझी वारंवार ! वाटतं, आकाशातून फिरतेय—"

" बरं तर—लौकरच तुला आई, नवं घर बांधायला घेऊ हं ! " मी तिला हसत म्हणालो..." त्या वेळी मात्र आकाशातून नको फिरूस ! "

" अरे, वैद्याचं पोर—म्हणतात ना ? " काम करता करता कडवट हसत, ती त्यावर म्हणाली होती, " त्यातलीच ही गत ! तुझ्या त्या सत्रा योजना नि हजार लटपटी ! एक संपतंय तवर आहेच काहीतरी दुसरं ! तुला रे कुठे पैसा नि वेळ आहे, आपल्या स्वतःच्या घराचं निश्चित काही ठरवायला ? केवळ तोंडापुरतं बोलून, वेळ मारूनच फसवणार तू ! लबाड कुठला ! दूधखुळी नाहीय हो मी ! "

त्या रात्री यशोदा खोलीत आली. एका हाताने चार वर्षांच्या सदानंदला व दुसऱ्या हाताने त्याच्या पाठीवरल्या दीड वर्षाच्या निर्मलेला थोपटून ती झोपवीत होती. मी काही हिशेब करीत होतो, लिहीत होतो.

धाकट्यांना झोपवून, मोठ्या गंगा-यमुनांना तिने नीट आपापल्या बिछान्यांवर सारलं नि माझ्या जवळ येऊन ती उभी राहिली.

मी आपला आकडेमोड करीत पुटपुटतच होतो. तेव्हा ती हळूच मला म्हणाली—" झोपायचं नाही का ? हे काय आज नवं घेऊन बसलाहात ? हिशेबच असणार कसला तरी ! हो ना ? "

" एकवीस न् दोन तेवीस न् एक चोवीस ! अं ? काय म्हणालीस ?—हो, एकूण चोवीस हजार होतात—सारे, या नव्या घराचे. " मी वही बंद करीत हसत म्हणालो.

" असले तुमचे नेहमी मोठमोठे आकडे ऐकले ना, की, मला आपली बाई भीतीच वाटते ! " यशोदा थोडी गंभीर होत म्हणाली, " एक झालं की दुसरं ! चालूच आपलं ! उसंत कशी ती नाहीच मेली ! तुमचं हे कधी संपणारच नाही का हो ? "

" वेड्डीऽ ! अग, हे कधी संपायचं-संपवायचं का असतं, यशोदा ? नवी नवी घरं

ही बांधलीच पाहिजेत! तो तर आपला धंदाच आहे!" मी संथ स्मित करून म्हणालो—

"बरं! मग आता हे कोणाचं नवं घर?" तिने अगदी सहजगत उत्सुकता दाखवली— "नि ते बांधून झालंय की बांधायचंय अजून?"

योगायोग! त्या बोलण्याला मला हवी तशी कलाटणी आपोआपच मिळाली होती!

मी पटकन तोच मोका साधून घेतला, नि यशोदेच्या गूढ मनाचा पुरा ठाव घेण्या-साठीच, तिला मी हसत हसत म्हणालो, "हे ना? आपलं नवं घर! अग ते बांधलं नसलं तर आपण बांधू! तसा त्याला कितीसा लागणार वेळ? नवं घर—आईसाठी, तुझ्यासाठी, आपल्या सदानंदासाठी!"

का कोण जाणे, ते ऐकून, अगदी बघता बघता, यशोदाने एकदम आपलं अंग शहारल्यासारखंच केलं!

ते पाहून तर मी मनात चरकलोच!

मला वाटलं, "काही काही स्त्रियांच्या मनात, घराबद्दलच्या नसत्या शकुन-अप-शकुनाची उगीचच काहीतरी गल्लत झालेली असते. त्या त्यांच्या भोळ्याभाबड्या समजुती, त्यांना आतल्या आत नाहकच भेडसावीत असतात! तसंच यशोदेचं होत आहे हे!"

तेवढ्यात, एक आवंढा गिळल्यासारखं करून, यशोदा चाचरतच म्हणाली, "सासू-बाईचं ठीक! पण, मी आपलं एक सांगू का मनातलं? मला काही नकोय हो नवं घर! माझ्या सदालाही नकोय! हे आमचं आबांचं छोटंसं आहे ना, तेच पुरे!"

*

तेव्हा मात्र, मला मनात भयंकर भिरभिरल्यासारखंच झालं! तरी मी गप्पच राहिलो. तीही गप्पच बसली.

थोडा वेळ तशीच अनपेक्षित शांतता राहिली. माझा पुरताच गोंधळ झाला होता. मीच अखेर, एकटक तिच्याकडे पाहत विचारलं, "हे ग तुझं कसलं नाही ते वेड? आहे काय मनात तुझ्या, समजतच नाही बघ मला! यशोदा, अग तुझा सदानंद आता वाढू लागलाय, तो भरभर मोठा होईल, शिकेल, त्याच्यासाठी नवं घर नको?"

ती अगदी मख्ख बसली होती. त्यावर अधिक काहीही बोलली नाही. पण क्षणभरात तिच्या डोळ्यांत एकदम भळभळ अश्रू मात्र साचून वाहू लागले.

ते पाहून तर मी अधिकच गोंधळलो. तिच्या मानेजवळ हात ठेवून मी तिला हळुवार शब्दांत म्हणालो, "यशोदा! ए वेडाबाई, हे काय आहे काय तुझ्या मनात, ते तरी नीट सांग ना एकदा मला. का? का ग नको तुला नवं घर?? नक्कीच तुझी ऐपत आहे आज, तुझ्या नव्या घरात राहायची!"

"का? सांगू? त्या घरानेच, तुमच्या साऱ्या भावी काळातल्या जीवनात पुन्हा एक नवी घरघर सतत सुरू होईल! म्हणून—" आपल्या डोळ्यांच्या कडा पदराने पुसून,

यशोदा ठामपणे पटकन म्हणून मोकळी झाली.

"म्हणजे?" मी अगतिकपणे उद्गारलो.

"व्यापातून व्याप! कल्पनांमधून कल्पना!— महत्त्वाकांक्षांमधून नव्या महत्त्वाकांक्षा!" किंचित थरथरत्या घोगऱ्या आवाजात, पण अगदी अस्खलितपणेच ती एकदम बोलू लागली, "तुमचं हे वर्तुळचक्र आपलं सदाचं चालूच आहे सारखं! पाहावं तो तो ते अधिकच व्यापक-व्यापकच होत चाललंय! खरंच! त्याचीच तर ही मला सारखी सारखी अहोरात्र भीती वाटतेय मनात! तुमच्या या सगळ्या आवडी— सगळ्या इच्छा! त्यांच्याशी समरस होण्याचा अगदी लग्नापासून आजपर्यंत आटोकाट प्रयत्न करीत आले आहे मी! पण तरीही— का नकळे— या क्षणी, अगदी या क्षणी फार फार भीती वाटतेय हो मला! आता माझ्या या कर्माला तरी काय करू? सांगा!"

तिला त्या वेळी काय वाटत असावं याची मला एक अंधुकशी कल्पना येत होती. तरी पण हळूच तिला जवळ घेत, मी समजावणीच्या स्वरात म्हणालोच, "पण मग असं बघ, यशोदा! आपलं सारं सारं सुरळीत चाललंय— चार पैसे जवळ झाले आहेत, तर तोवरच, या नव्यानव्या कल्पना नकोत का मूर्त स्वरूपात आणायला?"

त्यावर यशोदेने पुन्हा फक्त एक दीर्घतम निःश्वास टाकला. आपलं प्रक्षुब्ध मन आवरण्यासाठी ती क्षणभर थांबली. थरथरत्या ओठांतून शब्द फुटत नव्हता.

पण मग, मोठ्या आवेगाने माझा हात हातात घेऊन, तिने अतिशय कंपित स्वरात मला एकदम रोखठोक विचारलं, "काय हो? किती पैसे झाले तुमच्याजवळ अखेर— म्हणजे थांबाल तुम्ही?? तेच आज आधी मला सांगा! चला! आता मी खरंखरं एक सांगू तुम्हांला? तसे तुम्ही फार फार चांगले आहा, पण—पण—तुमच्या आयुष्यातल्या या अफाट बेछूट महत्त्वाकांक्षा! माझ्या दुबळ्या मनाला त्या मुळ्ळी मुळ्ळी पेलतच नाहीत! मी काय करू त्याला?"

त्यावर पुढे आणखी काय बोलावं तेच सुचेना, कळेना मला—

*

क्षणभर तसंच स्तब्ध राहून मग यशोदा फिरून म्हणाली— "आवांपश्चातची तुमची ती धडपड मी जाणली! पण मग— त्यानंतरही अव्याहत तेच आपलं एकच एक तुमचं चाललेलं आहे! तुमच्या मनाला क्षणाची म्हणून उसंत नाही!— घर बांधण्याचा धंदा आहेच, मध्ये शेअर बाजार येऊन गेला,— मग जमीन-खरेदी— बँकेचे व्यवहार— हाऊसिंग स्कीम! किती किती नवनवीन गोष्टी तुम्ही एकाच वेळी हाती घेऊन त्यांची सूत्रं हलवता आहा? पुन्हा एकदा विचारते मी, तुमच्या मनाला हा सारा ताण झेपतो तरी कसा? तो कधी तरी थांबून, आपलं आयुष्य संथ होईल तरी केव्हा? कसं?? सांगा ना मला ते—"

खरं म्हणजे त्या क्षणी जे यशोदा म्हणत होती त्यात खूपच अर्थ होता. मी त्या

मनोवृत्तीत त्या दिवशी, त्या क्षणी होतो, त्याहून निराळ्याच वातावरणात, निराळ्याच मनःस्थितीत, त्यामुळेच मला नकळतच मी खेचला जात होतो. तथापि, तो मनात एकदम होत असलेला बदल– तो कितीही वस्तुस्थितिनिदर्शक असला, तरी माझ्या त्या वेळच्या मनाला सहनही होत नव्हता! पेलवतही नव्हता.

त्या वेळची यशोदेच्या बोलण्यातली, तिच्या स्पर्शातली रसरशीत ऊब तेवढी माझ्या अंगांगात भरत होती, मला तीच अत्यंत बेचैन करीत होती—

तेवढ्यात यशोदाच पुन्हा कातर, भावपूर्ण शब्दांत म्हणाली, "आता माझं थोडं कान देऊन ऐका गडे! वैभवाला कधी, कधीच अंत नसतो! ते कधी मिळवायचं संपणारच नाही! तर मग –आयुष्याच्या चढाने, त्याच्या चलतीने, मन असं विचलित करून कसं बरं चालेल? चलतीमधे, आपल्या महत्त्वाकांक्षी मनाने, उद्धटपणे मोठ्या मोठ्या भौतिक गोष्टी हस्तगत केल्या, तर मग पडत्या काळी काय होईल? तुम्हांला खरं खरं सांगू? तुमचा पैसा ना, अगदी चमत्कारिकपणेच वाढत चालला आहे! त्याबरोबरच, तुमच्या योजना नि तुमच्या जबाबदाऱ्याही तितक्याच झंझावाती वेगाने वाढत आहेत. त्यांचीच मला मनात फार भीती वाटते नेहमी! मन चिंती ते वैरी न चिंती!— वाटतं, आधी तो जसा आला— तसाच—केव्हा ना केव्हा, अगदी त्याच वेगाने, त्याच वाटेने, चमत्कारिकपणेच निघूनही जाणार नाही, हे कशावरून? नि मग, तुमच्या वृद्धापकाळाचं काय? माझ्या सदानंदच्या तारुण्याचं काय?"

मधेच काहीशा हतबलतेने मी म्हणालो, "किती किती काळंकुट्ट चित्र तू तुझ्यापुढे नि माझ्यापुढे नाहक चितारते आहेस? अग यशोदा! माझी धोरणं, माझे आडाखे— इतके अगदी चुकीचे ठरल्यासारखे नाही आहेत! जरा विश्वास ठेव, जरा ऐक माझं!"

"आता तुम्हीच ऐका माझं! तसा मलाही संशय नाही—तुमच्यावर विश्वासच आहे माझा." यशोदा पुन्हा स्नेहाने माझा हात दाबून माझ्याकडे सस्मित पाहत होती. "तुमच्या तल्लख बुद्धिमत्तेबद्दल मला खूप विश्वास आहे— अभिमान पण आहे. पण— पण—"

ती क्षणभरच गप्पच झाली--नि मग पुढे पुन्हा झपाटून म्हणाली—"पण– त्या धोरण–आडाख्यांच्या यशस्वितेने, त्यांच्या खात्रीनेच सारखीसारखी पुढेपुढेच पावलं टाकत चाललाहा! आणि मी? दूरदूर...पार मागे मागे...राहिले आहे मी! तुम्ही खूप खूप मोठे झाला आहा, पण काही झालं तरी मी आपली एक साधी दरिद्री मास्तराची मुलगी!—माझी ती कसली धाव असणार? संसाराची माझी कल्पना ही मुळीच नव्हती. होती ती अगदी साधीसुधी!—म्हणूनच, तुमच्या या साऱ्या महत्त्वाकांक्षांशी मी कधी खरंखुरं समरसच होऊ शकत नाही —त्याला मी तरी काय करू हो??"

*

बोलता बोलता यशोदा मधेच थांबली खरी, पण तिला आज कधी नव्हे तो कंठ

फुटला होता—राहवतच नव्हतं अगदी आतून आतून तिला बोलण्याचे सारखे उमाळेच येत होते.

" आणखी सांगू? आकस्मिक येणाऱ्या नोटांच्या भेंडोळ्यात नि दगडामातीच्या त्या राशींमचे माझं इवलंसं मन काही केल्या गुंतूच शकत नाही, गुंगूच शकत नाही! माझा आपला कल्पनेतला संसार छोटासा; अगदी छोटासा! माझं वैभव तरी केवढं? इवलंसं! अगदी जरुरीपुरतं! हीच आपली माझी वेडीविद्री, बाळबोध कल्पना होती! पण मग, तुम्ही तर—कलेकलेने वाढत जाणाऱ्या वैभवाच्या पौर्णिमेपर्यंत—मनाच्या वारूवरून सहजासहजी पोचू शकता! लौकरच...आज-उद्या, केव्हा ना केव्हा तरी माझ्याजवळ तुम्ही याल, अशी आपली इतके दिवस वाट पाहत, मी आता साफ थकले आहे, नि मग माझ्या मनाच्या त्या गोंधळानेच, त्याच्या पुढल्या-मागल्या आमावास्येच्या काळोखा-तच, ठेचकळत ठेचकळतच, माझी आजची एकाकी पावलं कशीबशी टाकत राहिले आहे! हाच माझा आजवरचा संसार!"

अगदी सुन्नपणे, यशोदेकडे मी नुसता पाहतच राहिलो होतो. तिच्या मनाचं... त्याच्या खोल खोल गाभ्याचंच—ते विश्वरूप दर्शन त्या दिवशी मला नव्याने घडून येत होतं.

किंचित थांबल्यासारखं करून गप्प राहिलेल्या यशोदेचा मनातला महापूर क्षणभराने पुढेही प्रचंड वेगाने, जोराने खळखळत राहिला—"मला तर आता राहून राहून वाटतंय की, माझ्यासारख्या जगावेगळ्या, मूर्ख स्त्रीच्या आयुष्यात आता मी पूर्वी रंगव-लेलं—छोट्याशा, अल्पसंतुष्ट पण सात्त्विक संसाराचं घरकुलाचं मुळच उरलेलं नाही! माझे पूर्वीचे ध्येयवादी पती मला आता कायमचे, अगदी कायमचे, पारखे झाले. सप्तपदीवेळची माझी सारी सारी स्वप्नं आता विरळ झाली, विरली, विरघळली! सांगा, सांगा ना. आपसात खरं खरं तेच बोलताना तुमचं-माझं, आपलं दोघांचं असं एकदम झालंच नाही, तर राग येईल का तुम्हांला माझा??"

मला नकळतच, वैभवामागे उत्तरोत्तर चौखूर धावत गेलेल्या माझ्या त्या एकूण प्रवाहपतित वेगवान आयुष्याची अधूनमधून मलाही जी चुटपुटती चुणूक मनातल्या मनात जाणवायची, तिलाच माझ्या यशोदेने—माझ्या प्रिय पत्नीने अत्यंत सहजतेने, कमालीच्या आत्मीयतेने, शब्दरूपानं हुबेहूब उभं केलं होतं!

अखेर तिने विचारलं होतं—"राग येईल का?"—राग तर नाहीच—पण संसारात क्वचितच मिळणारा अनुराग, श्रेष्ठतम अनुराग—तोच माझ्या मनात त्या क्षणी कोंदाटला होता!

म्हणूनच, त्यावर एक शब्दही न उच्चारता, मोठ्या आवेगाने मी माझ्या यशोदेला माझ्यापाशी ओढलं!

*

नव्या घराबद्दलच्या यशोदेच्या त्या विरोधाला एका दृष्टीने बराच अर्थ होता, असं मलाही मागाहून सारखं सारखं वाटल्यावाचून राहिलं नाही. जड वैभवाच्या नवनव्या कल्पनाजालांत नि त्यासाठी लागणाऱ्या धोक्या-धडपडींत मी अधिकाधिक गुरफटत गेलो होतो, म्हणूनच माझ्या शरीरावर- मनावर त्याचा एक चमत्कारिक परिणाम होत गेला होता, हे सारं खरंच होतं. माझ्या खऱ्या आध्यात्मिक प्रगतीत मी आपणहूनच मोठमोठे तट नि खाचखळगे निर्माण करीत आलो होतो, असंच आपल्या स्वभावानुसार यशोदेला प्रामाणिकपणे वाटत होतं. ते सारं खरं असलं तरी त्या बाबतीत मधेच आता हात आखडता घेणं तरी कोणालाही कसं शक्य होतं ? मला तर ते तसच नव्हतं !

पुन्हा स्वतःच्या आयुष्याला लागत गेलेल्या विविध वळणांच्या प्रत्यक्ष अनुभवांवरून मला तरी वाटलं होतं की, प्रत्यक्ष मोह-वस्तू समोरच दिसल्यावर माणसाचा अगदी नाइलाजच होतो. कल्पना नसतानाही त्याचं विचार-परिवर्तनही होतं. नव्या नव्या भाव-भावनांचं, त्याच्या मनाच्या रंगभूमीवर नकळत तांडव-नृत्यच सुरू होतं. तो हार जातो. तसंच काही तरी कदाचित होईल. एवीतेवी आपण घर बांधलंच आहे, तेव्हा ते समोर दिसताच, कदाचित यशोदेचंही मन तसंच विरघळेल. तीही उत्साहाने त्याला मान्यता देईल, नव्या उत्साह-आशेने त्यात प्रवेशही करील. तसं कदाचित घडून येणं मला अशक्य वाटत नव्हतं.

याच एकूण विचाराने नि त्याच एका प्रखर अपेक्षेने, तीव्र इच्छेने, आमच्या घरात नवाच एक प्रसंग मी आठ दिवसांनी घडवून आणला.

वास्तुशांति-गृहप्रवेशाला शुभ असा एक चांगला मुहूर्त मी शोधून काढला नि त्याच्या आधल्या दिवशी दुपारी, घरात मी आईला एकदम म्हणालो, " चला पाहू सारी ! पटकन तयारी करा. टांगे बोलावले आहेत. आपल्याला आज ' आबा पार्क ' पाहायला जायचंय. "

अकस्मात कानांवर पडलेल्या त्या शब्दांनी, उत्सुकता व कुतूहल वाढून, आई मला म्हणाली, " काय, कुठे जायचं रे म्हणालास, आना ? "

" अग आई, घराबाहेर एवढ्या लटपटी अहोरात्र करतो मी," नि हसत हसत तिला म्हणालो, " तुम्ही नको का ते सारं काही, कधी तरी एकदा प्रत्यक्ष पहायला ? या चार भिंतींमधेच तुम्ही अहोरात्र नुसतं चुलीपाशी कोंडून राहता ! केवढी मोठी योजना तयार झालीय तिकडे—त्या ' शंकर कॉलनी ' नि ' नवग्राम ' यांच्या मधोमध ! आहे ठाऊक ? त्याच्या मध्यावर, आपल्या म्युनिसिपालिटीने मुलांसाठी नि गावच्या लोकांसाठी करमणूक-खेळाकरिता एक मोठा बाग- ' पार्क ' करायला घेतलाय ! ते काम आपल्या-कडेच सोपवलंय ! त्याचंच नाव ' आबा पार्क ' हो—आज सगळी मिळून आपण तेच सगळं पाहून यायचंय ! झटपट तयार व्हा. "

त्या वेळी आईचे डोळे केवढ्या आनंदाने चमकले होते !

गंगा, यमुना, सदाशिवच्या साऱ्या मुली—पोरं हर्षानं ' ओऽ ' करून नाचू-बागडू

लागली. आई आपल्या लाडक्या नातवाला—सदानंदाला—नवे कपडे चढवू लागली—
त्या सगळ्यांच्याच मनस्वी आनंदाच्या संसर्गाने मीही खूप हर्षभरित झालो होतो.

*

मग आम्ही सारी टांग्यांमधून ठिकाणावर पोचलो. माझ्या सूचनेप्रमाणे तिथे सदाशिव व भाकल्याही आधीच आले होते. आम्ही 'आबा पार्क'च्या फाटकापाशी टांग्यांमधून सारी खाली उतरलो.

आबा पार्क! अगदी साठएक एकरांचा ऐसपैस विस्तारलेला तो भलामोठा मध्यवर्ती एकत्र तुकडा! भरणी वगैरे घालून आता तर अगदी साफ सपाट नि उंच झाला होता. लंब-चौकोनी पट्ट्यापट्ट्यांचं त्याचं आता एक लोखंडी फेन्सिंग दोन फुटी दगडी कोटावर उभं राहिलं होतं. सौम्य पोपटी ऑइल पेंट दिल्यामुळे ते दूरवरपर्यंत मोठं मोहकच दिसत होतं. तो खरोखर होता त्यापेक्षा किती तरी मोठा नि विस्तीर्ण दिसू-भासू लागला होता—'आबा पार्क'! प्रत्यक्षात तो माझ्या मूळच्या कल्पनाचित्रालाही लाजवीत होता.

त्यात मुलांची खेळण्याची जागा कुठे असणार, खेळायची साधनं कुठे ठेवणार, त्यांच्यावर लक्ष ठेवणाऱ्या दोनतीन दाया नि नेमलेले एकदोन गुरखे कुठे बसणार, काय करणार-- वगैरे विविध कल्पनाचित्रं मी सांगत असता, सदानंद इत्यादी मुलं कान टवकारून ऐकत होती. त्यांचे चेहरे अधूनमधून सारखे फुलून येत होते. बायकांचेही कान निवत होते असं त्यांचे त्या वेळचे प्रफुल्ल चेहरेच मला सांगत होते!

मग, मोठ्या मुलांची नि तरुणांची खेळायची मैदानं कशी आखली जाणार आहेत, बसण्यासाठी बाकं टाकून भोवती फुलवायचा बाग कुठे उभारला जाणार आहे, स्थानिक म्युझियम व शिकारखाना रस्त्यालगत कसा व कुठे तयार होणार आहे, इत्यादी कल्पनाही खुलवून सांगत, त्यांना मी कोपऱ्या-कोपऱ्यातून स्वैरपणे फिरवलं नि अखेर आम्ही पुन्हा फाटकापाशी येऊन पोहोचलो.

माझ्या त्या साऱ्या कल्पना आजपर्यंत केवळ मनातच होत्या, त्या मी इतरांकडे कधी कधी सांगितल्यादेखील होत्या, तरी पण आज मी त्याच पुन्हा माझ्या कुटुंबीय माणसांना तशा अगदी खुलवून सांगताना मला झालेला आनंद अगदी अभूतपूर्व, न्याराच होता. शेवटी मी हसून सर्वांकडे पाहत म्हणालो,

"हं! कसा काय आहे आपला हा 'आबा पार्क'?"

यशोदेचा चेहराही त्या वेळी खूपच फुलला होता. आई एकदम हसून म्हणाली,

"हे जे तू काय करतोयस, ते आम्हाला आमच्या चुलीजवळून रे कसं दिसणार-समजणार? खरंच, खरंच! छानच कल्पना आहे हो ही अगदी! त्यांनाही फार फार आवडली असती—"

आईच्या त्या भावजड सूचक उद्गारांनी भाकल्या चुकचुकल्या-व्यथित अंतःकरणाने हळूच माझ्याकडे पाहू लागला. माझेही हृदय अनेक स्मृतींनी भरून येऊन पापण्या

ओलावल्या.

पोरं सैरावैरा धावत–ओरडत ‘ आबा पार्क ’मध्ये बागडत होती, नि तोंडाने तालात घोषणा करीत होती, “ आबा पार्क !—रे आबा पार्क ! आनाबापूंचा ‘ आबा पार्क ’ ! ”

*

तेवढ्यात, ‘ शंकर कॉलनी ’च्या बाजूकडल्या फेन्सिंगवर दूरवर बोट दाखवीत आईने विचारलं, “ आणि ही मोकळी, पलीकडली तारेचं कुंपण लावलेली जागा दिसतेय ती रे कोणाची, आना ? तीही खूपच आहे की ! ”

“ नि त्या अंगाला बघ, आई ! ती पण खूप आहे ! ” मी हसून म्हणालो, “ आबा पार्कच्या उजव्या-डाव्या दोन्ही अंगांची ही जागा, आई, दुसरी कोणाची असणार ? तुझीच ! ”

त्या तिला अनपेक्षित उत्तराने मात्र आई एकदम चपापली, ते पाहून मी हसत पुढे म्हणालो, “अग खरंच म्हणतोय आई, ती आपलीच जागा ! अग, हीच खरेदी करायला तर आपण तो बँकेशी मोठा व्यवहार केला होता मागे ! आता ना, हळू हळू त्या भागात एक एक लहान–मोठा बंगला उठणार आहे. आणखी दहापाच वर्षांत या ‘ आबा पार्क ’-च्या दोन्ही बाजूंना घरंच घरं होतील. अशी मोकळी नाही काही दिसणार ती मग ! ती नवी नवी वसाहत अगदी चौफेर गजबजून जाईल, नि मग-- आज आपण आत्ता उभे आहोत तो आबा पार्क ? तो तर तरुण-तरुणींनी नि मुलामुलींनी नुसता फुललेलाच असेल त्या वेळी ! ”

“ अस्संऽऽ नाही ? ” आईचा चेहरा खूपच मोहरला होता. मी एकदा हळूच चालना दिलेल्या तिच्या मनाच्या कल्पनाचित्रांमध्ये ती रमली होती. भवितव्याच्या भव्य भासाने धुंद झाली होती.

काहीशा मिश्र कौतुकानेच यशोदा आम्हा दोघांकडे गुपचूप पाहत होती. अखेर एकदम फेन्सिंगच्या दोन्ही बाजूंना आपले हात हलवीत तिनेच मला विचारलं— “ नि काय हो ? हा जसा ‘ आबा पार्क ’, तशा मग त्या उजव्या नि डाव्या बाजूच्या जागा— त्या दोन काय ? ते नाही सांगितलंत. ”

तिच्या त्या चाणाक्ष कुतूहलाचं मला मोठं कौतुक वाटलं होतं. त्या सूचक प्रश्नाने माझ्याही कल्पनेला एकदम नवीच चालना मिळाली होती. क्षणार्धात मला एक कल्पनाही सुचली होती. त्यानेच मी आनंदलो नि आईकडे पाहत राहिलो–

तिचंही त्याबाबतचं कुतूहल तोपर्यंत जागृत झालं होतं. यशोदेला मिळणाऱ्या उत्तराची तिलाही उत्कंठा लागलेली तिच्या डोळ्यांत तरंगत होती.

*

तेव्हा मग, मनातल्या एका आनंदपूर्ण अस्पष्ट कल्पनेला मी प्रथमच त्या सर्वांपुढे

बाबा फोडली, " ती ' शंकर कॉलनी 'च्या बाजूची, आबा पार्कच्या उजव्या हाताची ना ? ती ' अन्नपूर्णा कॉलनी ' म्हणायची ! नि ती दुसरी– डाव्या हाताची, 'नवग्रामा'च्या अंगाची ना, ती ' यशोदा कॉलनी ' ! "

" इश्श ! काही तरीच ! " किंचित लाजून-गोंधळून यशोदा उद्गारली.

" आणि माझं रे नाव असं कशाला द्यायला हवं होतं, आना ? " आईचा सुप्त आनंद लपून राहात नव्हता.

" अग आई, आबांजवळ तुझ्याही आठवणीला जागा नको का ? नि तुम्हा दोघां-जवळच तुमची लाडकी सून ! " मी त्या दोघींकडे पाहून हसलो.

मग क्षणभराने मी म्हणालो, " त्या ' अन्नपूर्णा कॉलनी 'चीच आधी योजना आखून सुरुवात केलीय. तो बघ, तो टुमदार बंगला दिसला का ग आई, तुला ? तोच अन्नपूर्णा कॉलनीतला पहिला बंगला. "

" तो तो ना ? छानच दिसतोय रे दुरून तरी—" आई डोळे किलकिले करीत म्हणाली.

संध्याकाळच्या उन्हाचे कवडसे मधूनच परावर्तित होऊन बंगल्याच्या खिडक्यांवरून आमच्यावर पडत होते नि आमचे सर्वांचेच डोळे दिपवीत होते.

" चला ! येता ? —तिकडे आता जवळ जाऊनच बघू या आपण तो. चालायला नको तुला, आई ! टांगे थांबलेले आहेतच—" आबा पार्कच्या फाटकातून बाहेर पडून आईला टांग्यात चढवून तिच्याजवळ बसत मी मग म्हणालो, " आता ना तिथं असेच आणखी तीन बंगले उठणार आहेत, जवळ जवळ ! "

" पुढे बस ग यशोदा ! " आई आनंदून, उत्सुकतेने तिला म्हणाली, " चल चल बघू या तरी, आपला आना लोकांची घरांमागून घरं कशी बांधून देत असतो ते. "

आईच्या त्या उद्गारात सारे सारे संमिश्र भाव होते. पण त्यातच आपलं नवं घर नसल्याचा एक दाट कडवट भावही स्पष्टपणेच लपलेला, प्रतिबिंबित झालेला मला दिसल्या-वाचून राहिला नव्हता ! नि म्हणूनच फक्त माझ्याच मनात तोपर्यंत दडून असलेल्या त्या प्रचंड गुपिताचा मला आतल्या आत अभिमानही वाटल्यावाचून राहत नव्हता. मला अधूनमधून आनंदाच्या जणू आतून उकळ्याच फुटत होत्या.

*

रंग वगैरे लावून त्या बंगल्याचं काम सर्व साफ–सूफ टाक–टीक जय्यत तयारच होतं. बंगल्याचा मालक आता केव्हाही अकस्मात बघायला येईल बरं का, अशी गेल्या आठवड्यातच मी धाकल्या वगैरेंना दोनतीनदा ताकीद देऊन ठेवली होती, तिचाच सारा परिणाम होता तो !

त्या कांपाउंडात शिरताच, तळमजल्यावरील हॉलमधे एका मोठ्या शिसवी राउंड टेबला-भोवती खुर्च्या टाकल्या होत्या. एकच गाद्या टाकलेली वेताची आरामखुर्ची होती.

आई थोडी दमली होती, आरामखुर्चीवर तिला आधी विसावा घ्यायला लावून मी म्हणालो— " दमलीस ना ग आई, फार ? "

" छे ! नाही रे ! तशी कशाची दमतेय मी ? " आपल्या पदराने तोंड व कपाळ पुसीत, आपला झपाट्याने चाललेला श्वासोच्छ्वास सावरीत ती धपापतच म्हणाली, " पण आताशा ना—जरा श्रम अधिक पडले की, छातीत कसं धडधडतं बघ ! कसं थरथरल्यागत होतं ! अरे, दिवसेंदिवस आता काय आम्ही या पोरींसारख्या तरुण का होणार आहोत, आना ? हं, आता हे असंच चालायचं आमचं ! असंच रेटायचं, डोळे मिटेस्तंवर ! नि केव्हातरी ते बोलता बोलता मिटायचे धपकन् ! "

तरी पण, थोड्या वेळाने तीच पुन्हा उठली आणि बंगल्याच्या खोल्या-खोल्यांतून आपणहूनच चौबाजूला पाहत हिंडू-फिरू लागली.

बाहेर बागेमध्ये, मोकळ्यावरच मुलं मनसोक्तपणे दंगा—धमाल करीत होती.

मी, सदाशिव, यशोदा, वहिनी, धाकल्या—आम्ही सारी आईपासून हळूहळू रेंगाळत आरशात बोलत चाललो होतो.

हळूहळू जिना चढून आई मग वरच्या मजल्यावरही गेली. मोठ्या आस्थेने, कुतूहलाने प्रत्येक बाबीची ती चौकशी करीत होती. जे जे आवडेल त्याबद्दल आनंद व्यक्त करून आम्हा बांधणाऱ्यांची पाठ थोपटत होती.

अखेर ती बंगल्याच्या आगाशीमधे जाऊन उभी राहिली. सगळयाच बाजूने मोकळं असल्यामुळे, तिथं वारा विमुक्तपणे भरभरत होता. त्यावर तिच्या पांढऱ्याशुभ्र केसांच्या बटा सारख्या भुरभुरत होत्या. त्यामुळे पुन्हा थोडी तरतरी-हुशारी वाटून, ' शंकर कॉलनी ', ' आबा पार्क ', ' नवग्राम ', साऱ्याच बाजूंना चौफेर दृष्टी भिरभिरवीत, काही एक न बोलताच, आई प्रथम मुग्ध उभी राहिली.

मग तिने कठड्याजवळ जाऊन, खाली बागेत वाकून पाहिलं. तिथं सारी मुलं स्वैरपणे हुंदडत होती. त्यांच्या दंग्याला तर आता अगदी ऊत आला होता.

आईच्या सुरकुतलेल्या वृद्ध चेहऱ्यावर हलूच स्मितरेषा झळकत राहिल्या आणि तिच्या तोंडून पटकन् उद्गार आले, " पाहा रे पाहा, आना ! कशी कशी बागडताहेत-भिरभिरताहेत माझी ती पाखरं ! आहे का त्यांना कसली चिंता ? जसं काही मेल्यांच्या बापाचंच आहे घर ! "

*

खरं म्हणजे, आईच त्या क्षणी अगदी खुषीत आली होती. तिचंच मन त्या वेळी त्या मुलांसारखं स्वैर बागडत, भिरभिरत होतं ! हजार कल्पनाचित्रं-सुखस्वप्नं रंगवीत होतं. मधूनच मनात डोकावणाऱ्या खट्टूपणाच्या भावना ती आतल्याआत दडपत होती.

अगदी लहानपणापासूनच बिचारीने भयंकर कष्ट उपसले होते. अपमानाचे हजार क्षण आसवांची गिळून नाना प्रसंगांना तिने धैर्याने तोंड दिलं होतं. आबांच्या पश्चात आमच्या

संसारात स्वतःला सामावून घेऊन ती शांततेने जगत आली होती. माझ्या धडपडी-हालचालींबरोबरही समजूतदारपणे समरस होऊन सुना म्हणून लोकांच्या घरच्या आलेल्या पोरींबरोबर मिळून-मिसळून वागत-बोलत आमच्याबरोबर एका प्रकारच्या अभिन्न निःस्पृहतेने स्वतःही फरफटतच ती पुढे येत गेली होती. जगात तिला आता स्वतःच्या असल्या कसल्याच निराळ्या आकांक्षा उरल्या नव्हत्या, व्यक्तित्व उरलं नव्हतं! ते सारं आमच्यातच विलीन झालं होतं!

तरी आज आईने जे सारं प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलं होतं, ते सारंच तिला विस्मय-जनक व सुखद-अभिमानास्पद असंच होतं! तिला आपल्या दोघा मुलांबद्दल—खरं म्हणजे माझ्याबद्दलच— वाटणारा तो अभिमान, ते कौतुक—तिच्या डोळ्यांत पाहण्याचा डोळ्यात भरण्याइतक्या स्पष्टपणे, तरंगताना दिसत होतं! त्याची मनोमन जाणीव होऊनच मीही पार सुखावलो होतो.

वरल्या हॉलमधे, आरामखुर्चीवर ऐसपैस पसरून विश्रांती घेत, अखेर आई मला म्हणाली, "किती झाला असेल रे सगळा खर्च या बंगल्याला, आना? मालक श्रीमंत दिसतोय!"

मी थोडी बेफिकिरी दाखवीत म्हणालो, "अं हं! किंमत तशी काही फार नाही ग, आई! आपल्याला सारे चोवीस हजार नऊशेच पडले. जागेसकट साडेसव्वीस हजार! लोकांकडून मात्र याचे घ्यायचे कमीत कमी साडेएकतीस-बत्तीस हजार!"

आई थोड्या गांगरल्या-भांबावल्या स्वरात म्हणाली, "ते पैशाचं नाही बाबा मला काही कळत हो! पण मग सोयीला, दिसायला, असायला अगदी...अगदी छानच आहे हो, हे घर! अं—आपलं नवं घर ना अगदी असंच असायला हवं!— नाही का ग, यशोदा?"

मी माझ्या जिवाचेच कान करून, दृष्टी झटकन यशोदेकडे फिरवली.

आतापर्यंत, चौफेर, अगदी आईबरोबरच तीही वरखाली फिरली होती. मधून मधून, आपली कुठे कुठे पसंतीही तिने व्यक्त केली होती. तेव्हा, आईने आताच तिला विचार-लेल्या प्रश्नाला यशोदेकडून मिळणाऱ्या उत्तराबद्दल म्हणूनच मला अतिशय कुतूहल वाटत होतं. त्याबाबतचं यशोदेचं प्रतिकूल मनोगत मला ठाऊक होतं. तरीही मला ती हुरहूर, उत्कंठा लागलीच होती. प्रत्यक्ष पाहणीनंतर झालाय का काही यशोदेचा हृदयपालट?

पण यशोदेचा चेहरा गंभीरच होता. त्यात कलाकृती आवडल्याची, मान्यतापसंतीची रसिकता प्रतिबिंबित होत असली, तरी आपुलकीची, काही हस्तगत करण्याच्या ईर्षेची, मालकी हक्काच्या जाणिवेची भावना, तीव्रता तिथं जरा देखील नव्हती! मनातल्या मनात अंतराळातून असंख्य योजनंच्या योजनं घरंगळल्यासारखं वाटलं मला.

मात्र सासुबाईंना कुठे खपू नये म्हणूनच जणू पटकन् हास्यमुख होत, माझी दृष्टी टाळून यशोदा आईला म्हणाली, "वाः! बंगला अगदी छानच बांधला आहे. नाव ठेवा-

यला जरा जागा नाही!"

ते उत्तर द्व्यर्थी होतं, त्यात विधानाची त्रयस्थ व्यापकता होती, पण आपुलकीचा उत्कट मोह औषधालाही नव्हता. यशोदा मुळीच, अगदी मुळीच पालटली नव्हती, असंच मी मनातल्या मनात तत्काळ ताडलं. तिला नवं घर नको होतं—म्हणजे नकोच होतं!

नि ते जाणताच, मीही मनाची तोवरची चलबिचल थांबवून तत्क्षणी एक निर्णय घेतला—

*

तत्क्षणी माझ्या मनाने ठरवलं—जे यशोदेला नको ते तिच्या मनावर लादून त्याला तडे पाडण्यात अर्थ नाही!

मग मला त्या क्षणी दुसरंही वाटलं— आईच्या त्या तीव्र भावना आता अधिक ताणून धरण्यातही अर्थ नाही!

आणि मला असंही एकदम वाटलं— या क्षणी सदाशिवला व त्याच्या बायकोलाच खरा आनंद मिळू शकेल!

असल्या सर्व संमिश्र विचार-भावनांनी मोहरलेल्या अंतःकरणाने मी आईकडे पाहिलं तेव्हा ती सहजच माझ्याकडे शांतपणे पहात होती.

"आई ग!" मी सस्मितपणे तिला हळूच हाक मारली.

पुढल्याच क्षणी, मी आता साऱ्यांनाच एक गोड धक्का देणार आहे, या जाणिवेने मी मनातल्या मनात खूपच आनंदलो होतो.

"एक सांगतो ते ऐक आता."

"काय रे, आना?" आईने सहज उत्सुकतेने विचारलं. त्या क्षणी यशोदेचा चेहरा क्षणकाळ किंचित गोंधळला होता, मी मारलेल्या हाकेने सदाशिव व वहिनी माझ्याकडे उत्सुकतेने पाहत होती.

"म्हणजे असं, आई—तुला—तसं कशाला—तुम्हां साऱ्यांनाच—मी साफ फसवलंय ग इतके दिवस!" मला आतूनच आनंदाने गद्गदून येत होतं- "तुमच्याकडून एक गुपित मी साफ लपवून ठेवलंय..."

"म्हणजे?—म्हणतो आहेस काय आना तू हे??" आईने एकदम आश्चर्योद्गार काढले.

"अग—हे हे घर तुम्हा सर्वांना आवडलंय ना? तर मग, ते तुमचंच—आपलंच आहे, नवं घर! आपल्यासाठीच बांधलंय ते!" मी गुपित अर्थ उघडं केलं नि हसलो.

"काय? आना? आपलं घर आहे हे?? खरं खरं म्हणतोयस??" बघता बघता आईच्या डोळ्यांतून घळकन आसू ओघळले.

"अरे म्हणतोस काय, आनाबापू?—नि मग तो मुंबईचा मालक?" सदाशिवनेही

गोंधळून विचारलं, " मला–आम्हांलाही फसवलंस ? "

" हो ! हे आपलं— आपल्या सदाशिवचं घर हे आई ! " मी आनंदाने उचंबळून अडखळतच म्हणालो, " उद्या वास्तुशांतीचा मुहूर्तही ठरवलाय. निवडक मंडळींना मी बोलावणीही करून ठेवली आहेत. सदू नि वहिनी पूजेला बसणार आहेत ! "

*

तो क्षण ! त्या वेळचा माझ्या वृद्ध आईचा तो कमळासारखा फुललेला चेहरा ! तो मी जन्मात कधीच—कधीच विसरणार नाही.

तो क्षण ! माझ्याबद्दलच्या प्रेमाने, आपुलकीने पाझरणाऱ्या आसवांनी ओलावलेला सदाशिवचा भांबावलेला चेहरा ! तो मी कधी कधीच विसरणार नाही.

आणि तो क्षण !—त्या वेळच्या मिश्र भावनांनी, माझ्याबद्दलच्या प्रेमाने प्रसन्न झालेला यशोदेचा चेहरा ! तोही मी जन्मात कधीच, कधीच विसरणार नाही.

सर्वात आनंददायक, विस्मित भावनांनी मीही मनात गद्गदलो होतो. आम्ही सारी तिथे फक्त एकत्र बसलो होतो. कोणीच काही, काही वेळ बोलत नव्हतं. बोलण्यासारखं काही नव्हतंच. ते सारं फक्त मनातल्या मनात अनुभवण्यासारखंच होतं ! असे क्षण जीवनात क्वचितच येतात !

असाच थोडा वेळ गेल्यावर मी संथपणे सुरुवात केली. " मी हे असं ठरवलंय, आई— की, आपलं हे नवं घर सदूचंच ! सदाशिव माझा उजवा हात, तो होता नि आहे म्हणूनच माझ्या कागदांवरल्या साऱ्या सह्या नि कल्पना आजवर खऱ्या ठरल्या— ठरतात ! त्याने नि त्याच्या बायकोने इतकी वर्षं खूप गैरसोयी निमूटपणे सोसल्या, पण एका शब्दाने त्या दोघांनी घरात कधी धुसफूस-कुरकूर केली नाही. मी आपला माझ्या एकेक अफाट कल्पना घेऊन बसलोय...पण सदूचं स्वतःचं असं काय आहे ? तेव्हा म्हटलं, हे नवं घर बांधलंय ते त्याचंच ! खाली भाडोत्री ठेवील उत्पन्नासाठी, वर तो स्वतंत्र संसार थाटील ! "

" खरं रे खरं— पटतंय हो मला हे तुझं, आना— " आई गद्गद स्वरात म्हणाली.

मग मी पुढं म्हणालो, " उद्या वास्तुशांती झाली की काही दिवस आपण सगळ्यांनीच इथं राहायचं. प्रथम तू इथंच राहा आई, सदाशिवच्या स्वतंत्र संसारात ! आठवड्याने आम्ही पुन्हा जुन्या घरी जाऊ. मग आपलं आईला हवं तेव्हा तिकडे जुन्या घरात तिच्या आनाकडे येता येईल, हवं तेव्हा इथं तिच्या सदूकडे नव्या घरी राहता येईल ! कसं ?—आहे ना छान कल्पना ? आईला आता दोन दोन घरं ! नि तिचे दोन दोन संसार ! नाही का रे सदू ? "

" आना, आना, खरंच, अगदी धन्य धन्य वाटतंय मला, हे सारं असं ऐकून, पाहून— " प्रचंड आनंदाने तसं बोलतानाही आई सारखी अडखळत होती. तिच्या डोळ्यांतून सारखी आसवं घळघळत होती. तिला मागलं सर्व आठवून मधूनच हुंदकेही

येत होते.

" कशाला या साऱ्या नाही त्या भानगडी केल्यास रे तू आनाबापू ? होतं तेच काय वाईट का होतं ?" धोतराच्या सोग्याने आपले डोळे पुसत सदू मला म्हणाला, " पण यातून काही झालं तरी आपण कधी दूर होता कामा नये ! "

इतक्यात, माझी कल्पनाही नसता, यशोदेच्या तोंडूनही अखेर एकदम उद्गार आले, " खरंच खरंच !—हे सारं कसं अगदी छान झालंय ! कोण कशाला होणार कोणापासून दूर भाऊजी ! ! आमचं तेही तुमचंच ! "

माझ्याबद्दलच्या, माझ्या योक्कतेबद्दलच्या, माझ्या त्या वेळच्या शहाणपणाबद्दलच्या साऱ्याच बाबतीतल्या कौतुकाच्या सहस्र छटा यशोदेच्या चेहऱ्यावर नि माझ्याकडे हळूच वळलेल्या तिच्या डोळ्यांमधे मला दिसल्या, तेव्हा मलाही अगदी धन्य वाटलं. ती खरी धीरोदात्त गृहिणी होती.

*

या साऱ्या प्रसंगाने आनंदून–गोंधळून, भांबावून गप्प गप्पच बाजूला उभ्या असलेल्या धाकल्याला मी मध्येच हाक मारली नि त्याला म्हणालो, " अरे धाकल्या, ही किल्ली घे, नि ती काल मुंबईहून आणवलेली छोटी पॅकबंद पेटी घेऊन ये इकडे ! जपून, अलगद आण हो— "

यशोदेबरोबरच्या त्या रात्रीच्या बोलण्यानंतर, मी स्वतःच मुंबईला जाऊन तो संगमरवरी तुकडा करवून घेतला होता नि स्वतःच गुपचूप आणवून कपाटात ठेवला होता.

पेटी समोर आणल्यावर खिळे, झाकण काढून, वरले कागद–भुशाचे पॅकिंगचे थर मी भरभर काढून टाकले नि ती पाटी अलगद उचलून आईसमोर धरली.

" हे बघ आई. " त्यावरली ती हिरवी वळणदार छान अक्षरं मीच तिच्यासाठी मोठ्याने एक एक करीत वाचली— " स–दा–शि–व. "

त्या अक्षरांकडे पाहता पाहता, आईच्या डोळ्यांतले आनंदाश्रू त्यांच्यावर पडले नि त्यांना अभावितपणेच तसं पहिलं मंगलस्नान घडलं.

" इथं आई, या आपल्या नव्या बंगल्याचं नाव लिहिलं आहे– ' सदाशिव '. " गहिवरून येऊन मी आईला म्हणालो, " उद्या सकाळी तू या पाटीचं पूजन केलंस की धाकल्या, मुकादम नि आमचा म्हातारा गवंडी आगाशीच्या कठड्याला, रस्त्याच्या बाजूने, ती सिमेंटमध्ये बसवून टाकतील ! "

त्या वेळी एकदम गदगदून येऊन, आईने एका हाताने मला नि दुसऱ्या हाताने सदूला जवळ ओढलं, नि आपला आसवांचा महापूर, आपल्या सुरकुतल्या गालांवरून तसाच ओघळू देता देता ती अडखळत अडखळत, मोठ्यामोठ्याने हुंदकत म्हणाली— " असे हे माझे मुलगे— असे तुम्ही जिवाला जीव देणारे भाऊ भाऊ— अशा या माझ्या कधी भांडणतंडण न करणाऱ्या प्रेमळ सुना ! हे हे इतकं सारं सारं असल्यावर

आगळी दुसरं रे काय होणार बाळांनो ? सदाशिवच होणार ! यांचीच ना लेकरं तुम्ही ! ”

दुसऱ्या दिवशीच्या वास्तुशांति–गृहप्रवेशाच्या त्या समारंभाची उरलीसुरली जमवाजमव, घरातल्या लहानथोर माणसांनी नि पदरच्या साऱ्या नोकरमाणसांनी मोठ्या उत्साहाने झटपटच उरकली होती. अकस्मातच मिळालेल्या नव्या बंगल्याच्या त्या प्रातीच्या व आपुलकीच्या आनंदात साऱ्यासाऱ्यांच्याच सोज्वळ भावना नि परस्परप्रेम उचंबळून आल्यासारखं झालं होतं.

आईच्या हस्ते पूजा होऊन पाटी वर चढली, भिंतीला लागली. मग ‘ सदाशिव ’चा शांतिहोम, प्रवेशविधी झाला, मंडळी पानसुपारी घेऊन गेली. खास निवडकांची पंगत उठली नि माझ्या साऱ्या साऱ्या नव्याजुन्या कामगार–कारागीर–नोकर मंडळींची वरल्या व खालच्या दोन्ही हॉलमधे पंगती बसल्या. दोघी जावा–मालकिणी हौसेने वाढायला गेल्या. माझी म्हातारी आई — आमच्या कुटुंबाची साक्षात अन्नपूर्णा स्वतःही जिलबीचं ताट हातात घेऊन एकदा त्यांच्या पंगतीतून हसत-बोलत फिरली. तिच्यामागून सदाशिव व मी पाणी वाढत होतो.

त्या वेळी सारेच कामगार आमच्या बद्दलच्या घनदाट आपुलकीने नि त्या अकल्पित आनंददायी समारंभाने भारावल्यासारखे झाले होते. दिलखुलासपणे हसत–खेळत एकमेकांनाही आग्रह करीत होते. ते घर त्यांचं — त्यांच्या श्रमाचं होतं — त्या घराचे मालकही त्यांचे होते — ते भोगीत होते तो त्या क्षणाचा प्रत्यक्ष आनंदही साराच्या सारा अमूलाग्र त्यांचाच होता !

*

जेवता जेवता धाकल्याचे डोळे एकदम भरून आले. आईने मोठ्या आग्रहाने वाढलेल्या एका रसाळ जिलबीचा घास तोंडात घालता घालता, त्याने आईला थांबवलं नि अगदी दाटल्या कंठाने एकदम म्हटलं, “ खरंच— खरंच, पूर्नावैनी ! आपल्या चपदरीमदले तुमचे आन् बाबादादाचे समदे समदे हाल आज अगदी शाफ धुऊन धुऊन निगाले बगा ! तुमी धन्य झालात आन् मी मी हे समदं याच जल्मी बगून, पुरा पुरा धन्य झालो ! ”

आईमागूनच पाणी वाढत मी येत होतो. माझ्या कानी ते त्याचे गदगदले शब्द पडताच मलाही दाटून आलं. मला तसं जवळ आलेलं पाहताच, धाकल्या सदऱ्याच्या बाहीने आपले डोळे पुसत, मुसमुसत म्हणाला— “ हं, काय ? आनाबापू! आता मातर मला रजा द्या बरं का ! माझे डोळे पुरे निवले, खरं खरं निवले ! आता म्हातारा बी झालो मी ! उरलेलं च्यार दीस, आता येकदा माज्या पोरा–नातवांच्या संसारामंदी जाऊन पडन म्हणतोय मी ! उद्या सकाळच्यालाच निरोप द्या आता मला— सानपावतो वागदरीत नि माझ्या घराला पोचन जी ! कसं ! देता ना रजा आता, सदूभाऊ ? ”

सदू माझ्या पाठोपाठ उभा होता. आमचे दोघांचेही डोळे धाकल्याच्या त्या उद्गारांनी डबडबले होते. त्या क्षणी मी नुसती होकारार्थी मान हलवली. मला बोलणंच अशक्य झालं होतं.

धाकल्या! त्याच्या हातून घडलेला तो अपराध! त्याच्या क्षालनार्थ जणू त्याने आपणहूनच शिरावर लादून घेतलेली ती 'जन्मठेप'! पोराबाळांपासून दूर दूर राहून, ती न्यारी सजा अशी आजतागायत पुरी करून, गोड करून, आम्हांला सांगून सवरून, तसं परत जाण्याचा त्याने आज तो स्वतःच निर्णय घेतला होता. त्याला नको म्हणायची आता कोणाची प्राज्ञा होती? कोणाला अधिकार होता? तो खरा खरा, पुरा पुरा पावन पुरुष होता!

*

दुसऱ्या दिवशी सकाळीच धाकल्या घरी जायला निघाला. तेव्हा त्याच्या साऱ्या पगाराचा हिशेब नि दोन हजार अधिक त्याच्या हाती ठेवून मी त्याच्या पाठीवर प्रेमाने थोपटलं. त्या क्षणी त्याच्या इतकेच माझे नि सदूचेही डोळे भरून आले होते.

आमच्या एका मुकादमाला त्याच्या थेट घरापर्यंतची सोबत देऊन, मी त्याला म्हणालो होतो, "धाकल्या! तू जातोयस खरा! पण मग, हवं तेव्हा उठून तू इकडे येत जा, बरं का? सदाशिवकडे राहा, माझ्याकडे राहा! नि येशील तो आता फक्त विश्रांती घ्यायला! काम करायला नव्हे हो! ही दोन्ही घरं आता तुझीच आहेत."

मग प्रत्यक्ष जाताना धाकल्या रडत रडत हसला नि हसत हसत रडला. देवघरात देवासमोर, आईसमोर, माझ्यासमोर, सदूसमोर, यशोदा व वहिनीसमोर, काही न बोलताच, थबकत थबकत, दोन्ही हात जोडून नमस्कार करीत नि अखेर लांब जाईपर्यंत वळून वळून मागे बघत, अगदी ओल्या डोळ्यांनी नि भरल्या हृदयानेच धाकल्या आमच्यामधून निघून गेला.

*

आईने स्वतः ठरवलं तेवढंच सामान बैलगाड्यांमधून आम्ही 'सदाशिव'मध्ये आणलं. सर्वांनी मिळून, वरल्या मजल्यावरील खोल्याखोल्यांमध्ये ते लावलं.

आईने अगदी स्वतःच्या हातांनीच 'सदाशिव'चं स्वयंपाकघर सजवलं. भिंतींतील कपाटं वगैरे टापटिपीने भरून पुन्हा स्वयंपाकघरात चारी बाजूला खूप खूप मोकळी जागा दिसताच, आई प्रसन्न हसून म्हणाली, "आहात खरे बाबांनो, तुम्ही कल्पक घर बांधणारे! एवढं सामान रिचवून पुन्हा स्वयंपाकघर मोकळं नि मोठं ते मोठंच—"

मीही हसत हसतच मुद्दाम चेष्टेने तिला म्हणालो, "अग आई— ती ना, ती तर सदाशिवाचीच कल्पना-योजना! त्यानेच तुझ्या सोयीसाठी ही भिंतीतली कपाटं घातली आहेत, आधीच!"

"चल रे! वा रे वा, बापू!— ठाऊक होतं वाटतं मला आई नि यशोदावहिनी या स्वयंपाकखोलीत अशा वावरणार आहेत म्हणून, हे बांधताना!" सदूही एकदम थोडा वरमूनच हसत-लाजत म्हणाला.

आईनेच आपल्या हाताने दुसऱ्या दिवशी रात्रीचा पहिला स्वयंपाक केला. नुसतं पिठलं-भात-चटणी, एवढंच!

सगळी रांगेने जेवायला बसली होती. ताटातील भात-पिठल्यातून वाफा निघत होत्या. मुलांचा स्वैर आनंदी गलगला-गोंधळ चालला होता. आमच्याच शेजारी आडवं पान टाकून आईही आपणहूनच निःसंकोचपणे जेवायला बसली होती. तिच्या सुना वाढत होत्या सर्वांना.

जेवता जेवता, अंतर्मुख झाल्यासारखं करून आई म्हणाली, "काय एकेका जागेचं भाग्य असतं बघा रे बाळांनो. कुठे आमचं मूळ गाव, कुठे वाघदरी, नि कुठे हे ठिकाण! हे तरी काल एक नुसतं रान होतं, पण आज याला आपण आपलं घर म्हणतो आहो, नि इथं आपल्या पोराबाळांसह अशी ही जेवायलाही बसलो आहो. काल इथं कोणी नव्हतं, आज आपण सगळी आहो!— आज आपण ही इथं सगळी आहो, उद्यापरवा कदाचित् मी इथं नसेन!"

"चला! हे काही तरीच काय, सासुबाई!" वाढता वाढता थबकून यशोदा आईला कळवळून म्हणाली. आम्हीही चपापलो.

"यात काही तरीच ग काय, सूनबाई!" आई तिच्याकडे प्रेमळ डोळ्यांनी पाहून स्मित करीत आमच्याकडेही वळून म्हणाली, "मला इथं होतं ते सारं सारं मिळालं!— माझा आनंद आता गगनात मावत नाही! असल्या तुमच्या नव्या भरल्या घरात, अशा माझ्या आयुष्यातल्या संपूर्ण आनंदात, मी म्हातारी बोलता बोलता आताच उठून गेले, तर ते काही तरीच ग काय?— तोच खरा शुभशकुन तुम्हांला! तुम्ही माझी सारी सारीच अगदी चांगली आहा! ईश्वर तुमचं अखेरपर्यंत कल्याणच करील. मी आता यापुढे असेन-नसेन, पण तुमच्या या 'सदा-शिवा'त सदा आनंदच आनंद राहील!"

आईच्या त्या सहजस्फूर्त शब्दांमधे, साऱ्या साऱ्या जीवनातली स्निग्धताच भरली होती. ती इतकी की, तिच्या त्या शब्दांच्या अद्भुत स्पर्शाने आम्हा साऱ्यांचीच हृदयं भरून गेली होती... कोणाला काय बोलावं तेच सुचत नव्हतं. बाहेरच फुटत नव्हतं.

आईने मग मुद्दाम मागून पुन्हा पिठलंभात घेतला. चवीनं जेवली, आमच्याबरोबरच पानावरून उठली, आचवली नि आपल्या कॉटवर गुपचूप जाऊन पडली. दिवसभराच्या श्रमांनी दमली-भागली होती ती!

*

तरी कोणालाही त्या वेळी रात्री कसली कल्पना देखील नव्हती, की आई सकाळी पुन्हा

उठणार नाही, हलणार नाही, आम्ही कोणाशी त्यानंतर काही बोलणार नाही! आनंदाने जेवत असताना रात्री जे ती बोलली, तेच, तेच तिचे अखेरचे शब्द ठरतील!

पण सकाळी तेच प्रत्यक्षात घडलं होतं. आई झोपेतच आम्हाला सोडून गेली होती. साऱ्यांनाच प्रथम ते खरं वाटेना.— साऱ्यांना त्या अकल्पित घटनेचा एकदम धक्का बसला. फार फार दुःख झालं. आम्ही सारी तिच्या शवाभोवती बसून खूप अश्रू ढाळले.

पण पुढलं सारं झाल्यावर, संथ विचार करता करता, मला तरी वाटलं— तसला तो आईचा मृत्यू म्हणजे आमच्या व आईच्या आनंदाचाच प्रसंग होता. कुटुंबीय परमोच्च सुखाचाच क्षण होता तो. अशा वेळी, आजारी न पडता, लुळीपांगळी होऊन बिछान्याला न खिळता, आम्हाला सारं सांगायचं ते सांगून, आनंदाने निरोप घेऊनच, आई तशी आमच्यामधून झटकन उठून गेली होती!— तेच, तसंच अगदी उत्तम झालं होतं.

पंधरवड्याने सर्वांच्या दुःखाची तीव्रता कमी झाली. मन पुन्हा भानावर आलं. मग यशोदेला व मुलांना घेऊन मी जुन्या घरी परत आलो.

घरी आल्यावर यशोदा मला रुद्ध कंठाने व ओल्या डोळ्यांनी हळूच म्हणाली, " खरंच! सासूबाई जितक्या भाग्यवान, तितकी मी पण आहे! त्यांची सारी थोर मायेची माणसे— तीच माझीही माणसं आहेत!"

*

आईच्या पश्चातचं माझं व यशोदेचं दीड वर्ष जुन्या घरी बऱ्याच सुखा-समाधानात गेलं.

घरातल्या माणसांची दोन घरांत विभागणी झाली असल्यामुळे, आता आमचं जुनं घरही आम्हांला मोठं वाटू लागलं होतं. गंगा, यमुना, सदानंद व निर्मला ही माझी चारी मुलं स्वैरपणे बागडायची, लहर लागली तर शनिवार-रविवार ' सदाशिव 'मधे जाऊन राहायची. ती मंडळीही त्यांना जीव लावून बागवायची, कधी त्यांची मुलं आमच्यात येऊन मिसळायची.

माझी बहीण भागा माझ्याकडेच जुन्या घरात राहायला आली होती. यशोदा व ती एकाच मराठी शाळेत यशोदेच्या वडिलांच्या हाताखाली शिकल्या होत्या. यशोदा तिची बालमैत्रीण होती, तेव्हा तिने यशोदेचाच सहवास नेहमीच म्हणून पसंत करावा यात आश्चर्य नव्हतं. कुटुंबीय माणसांच्या विभागणीमधे तिनेही जुनंच घर पसंत केलं होतं!

माझ्या मुलांना आपल्या आत्याचा फारच लळा. त्यांची रोजची व्यवस्था भागाही फारच आस्था-आपुलकीने जिथल्या तिथं ठेवायची. त्यांना काय हवं-नको ते सारं यशोदेपेक्षा तीच अधिक पाहायची.

सदाशिव आता निराळा राहत असला, तरी आमचा धंदा पूर्वीसारखाच एकत्र चालू होता. त्यात कसलंच अंतर पडलं नव्हतं. उलट, धाकल्या आमच्यातून उठून आपल्या घरी निघून गेलेला असल्यामुळे, सदाशिववरच कामाचा भार अधिक पडत असे. त्यात

आता घरं दोन नि अंतरा-अंतरावर झाल्यामुळे, त्याला सत्रा सायकल-फेऱ्या मात्र टाकाव्या लागू लागल्या होत्या. तरी पण, घाई-गर्दीच्या वेळी, मी त्याच्याकडे किंवा तो माझ्याकडे अगदी पूर्वीइतकंच, घरातल्या माणसाप्रमाणे, भिंतीजवळचा पाट आपल्याच हाताने मांडून बसायचो नि म्हणायचो, " हं वहिनी, पान वाढ लौकर ! "

ही आमची नि आमच्या मंडळींची दिलजमाई ! खरंच ! ती अगदी असामान्यच होती. एकमेकांच्या उरावर बसणाऱ्या, सदैव कोर्टदरबार नि भांडणं-शिवीगाळ करणाऱ्या भावाभावांनी जर मला या आमच्या यशाची गुरुकिल्ली विचारली असती तर मी पटकन त्यांना म्हणालो असतो, " समजूत, परस्पर आदर व मोजकाच पण हितकर सहवास ! हीच ती आमची गुरुकिल्ली ! मनातून नको नको वाटत असताना, एकत्र जीवन हट-योगाने ढकलत राहून, अखेर कायमचं दूर होणं हा एक प्रकार, आणि मनातून हवं-हवंसं वाटत असतानाच दूर दूर राहून वारंवार जवळ येत राहणं, एकमेकांना जीव लावणं, हा दुसरा प्रकार ! या दोहोंत हाच फरक असतो. पहिल्या प्रकाराने एकत्र राहणारी कायमची दुरावतात ! दुसऱ्या प्रकाराने विभक्त राहणारी कायमची जवळच असतात, अधिक जवळ येतात ! "

*

एक प्रकारचं नवं स्वास्थ्य मिळाल्यामुळे यशोदेची धार्मिकता मात्र दिवसेंदिवस वाढतच चालली होती. तिची ती व्रत-वैकल्यं नि पूजा-अर्चा, अनेक प्रकारच्या उपासातापासांतून नि देहकष्टांतून सारे सोपस्कार पार पडत असत. तिच्या संगतीने, मला नकळत, माझ्याही हातून धार्मिक पुस्तकांचं वाचन, पूजा–ध्यान, सारं वक्तशीर होऊ लागलं होतं.

एकदा तर यशोदा मला थट्टेथट्टेत म्हणाली, " तुम्ही इतकी घरं बांधली–बांधता! मीही आता एक भव्य घर बांधायला घेतलंय बरं का ! "

मी आश्चर्याने तिला विचारलं, " कोणतं ग ? कुठं ? ? "

त्यावर ती म्हणाली, " सदानंदाच्या जन्मापूर्वी स्वामींनी नव्हतं का आपल्याला सांगितलं ? तेच ! माझ्या हृदयात— खोल खोल– आत ! मोठ्या श्रद्धेचं ! खूप मोठ्या श्रद्धेचं ! "

मी किंचित चपापलो होतो, इतक्यात तिने मला हळूच विचारलं होतं, " तुम्ही कराल ना मला त्यात मदत ? माझा प्लॅन, तुमची निर्मिती ! अं– ठरलं ना ? "

असल्या तिच्या बोलण्यावेळी मी नुसतं गोंधळूनच जायचो. मला बोलायलाच काही सुचत नसे. तरी पण सकाळी रात्री मी यशोदेबरोबर तुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ वाचा-यचो, क्वचित तिच्याबरोबर उपास करायचो, पूजे–अर्चेत भाग घ्यायचो !

*

इतकं सारं होतं तरी, नि या गोष्टी मी तिच्याबरोबर बऱ्याच तन्मयतेने करायचो तरी,

घरातून एकदा मी बाहेर पडलो, माझ्या बाहेरील व्यावहारिक व्यापात शिरलो, की मग मात्र मी त्यातच पुरा बुडून जायचो ! मग मागल्या त्या घरच्या साऱ्या गोष्टींचा, किंबहुना प्रत्यक्ष यशोदेचाही, मला पार पार विसर पडायचा !

आमच्या गंगा-यमुना आता मोठ्या होत्या. सदानंदही शाळेत जाऊ लागला होता. निर्मला घरीच खेळायची-लुडबुडायची. मी घरी आलो की, त्यांना जवळ घ्यावं, बोलावं, त्यांच्याशी खेळावं, पण त्यांची आत्या नि त्यांची आई दक्ष असल्यामुळे, याहून त्यांच्या बाबतीतलीही कसली जबाबदारी माझ्यावर कधी पडण्याचं कारणच उरत नसे.

यशोदेच्या एक प्रकारच्या असल्या विरक्तीने नि बाहेरील माझ्या तसल्या अव्याहत व्यापाने मात्र माझं मन एक प्रकारच्या तसल्या द्विधा वृत्तींमधे कायमचं हेलकावे खात राहिलं होतं. त्यातच ते पहिल्या लढाईचे दिवस ! हळूहळू तेजी वाढत जाणार, याची आगाऊ चिन्हं रोजच्या रोज दिसू लागली होती. त्या दृष्टीने 'यशोदा कॉलनी' व 'अन्नपूर्णा कॉलनी' यांचे निश्चित प्लॉट पाडणं, मधले रस्ते आखणं, इत्यादी योजनां-मधे नि त्यांच्या प्रतवारीप्रमाणे किंमती ठरवण्यात मी पुरा पुरा गढून गेलो होतो. पुन्हा त्याशिवाय सरकारी-लष्करी कामं इत्यादींची कंत्राटं घरात आपणहून चालून येत होती ती वेगळीच ! कधी कधी निश्चित जेवायलाही फुरसद मिळत नसे.

*

या साऱ्याचा परिणाम पुन्हा माझ्या हालचालींवर, मला नकळत होत गेला होता. नवनवीन व्यावहारिक व्यापांच्या खोल पाण्यात अहोरात्र डुंबू लागून, माझं मन फिरून एकदा भावी काळच्या सहस्र अमूर्त स्वप्नांमधे स्वैर भराऱ्या मारू लागलं होतं. कधी कधी, दिवस दिवस मला घरीही फिरकायला मिळेनासं होत होतं.

हा माझ्यात फिरून पडत गेलेला बदल, मला न समजताच, झपाट्यानेच, वाढत होता. त्यामुळेच, यशोदा मला व तिलाही नकळत, दिवसेंदिवस अधिकच खिन्न होत गेली होती. आधीचाच तिचा काहीसा कुढा स्वभाव, तो फिरून एकदा दाट पटलांनी व्यापत गेला होता.

ती कधी माझ्यावर किंवा माझ्यातील तसल्या बदलाबाबत टीका करीत नसे. उलट, वरवर हसून, मोकळं वागल्यासारखं दाखवून, सारं नाटक बेमालूम करायची, माझं सारं सारं आस्थेने, हळुवारपणे करायची. त्यामुळेच मी पार फसायचो !... घरात मी फारच थोडा वेळ राहत असल्यामुळे, ती अखेर बिछान्याला पार खिळल्यावरच त्या साऱ्या खऱ्या परिस्थितीचा माझ्या मनात प्रकाश पडला—

तेव्हा मात्र मी अतिशय घाबरलो. माझं मलाच एक प्रकारे भयंकर अपराधी वाटू लागलं !

मी धावतच डॉक्टरांना आणलं, त्यांच्या सल्ल्याने सारे स्पेशॅलिस्ट मुंबईहून घरी बोलावले, पण मग त्या साऱ्या महिन्यातच बळावत गेलेला तो यशोदेचा आजार सुर-

क्षितिजेच्या पलीकडल्या मर्यादेला गेल्याचंच मला त्यांनी सांगितलं.

त्या भयंकर बातमीने व भावी जाणिवेने मला तर काही सुचेनासंच झालं. माझी बाहेरील सारी सारी यशं माझ्या समोरसमोरच विरत गेल्यासारखं मला वाटलं—ती मनःस्थिती उत्तरोत्तर वाढतच गेली.

*

माझ्या मनात एकेकदा येई, "सारं सारं काही ठीक असताना आपल्याच मनाच्या एका चमत्कारिक ठेवणीमुळे, कुढत-झिजत जाणाऱ्या या गोड जीवाला आणखी आता काय, करावं तरी काय आपण? त्यावर कोणता धन्वंतरी, कोणतं म्हणून रामबाण औषध देऊ शकणार आहे?"

यशोदेवर माझं खरंखुरं प्रेम होतं—पण तसंच, माझ्या साऱ्या योजना-कल्पना, भावी यशाच्या साधनांवरही ते होतंच की! मला माझ्या जीवनाच्या दोन्ही बाजू प्रिय होत्या. दोन्ही हव्या होत्या! यशोदेचंही माझ्यावर प्रेम होतं, पण त्याहून अधिक भाविक आध्यात्मिकतेवरच ते होतं आणि तिचा केवळ आध्यात्मिकतेचा ध्यास माझ्या तरी त्या क्षणच्या कक्षेपलीकडला, दुर्गम असाच होता!

यामुळेच यशोदा व मी—आम्हा दोघांत एक भयंकर खोल दरी नकळतच निर्माण झाली होती. ती आता अधिकच रुंदावली होती. कायम झाली होती, दुर्लंघ्यच झाली होती. पण त्याशिवाय स्वतःला परिस्थितीत सामावून घेऊन मी तसाच पुढे पुढे जात आलो होतो!

ती दरी तिलाही ओलांडता येत नव्हती. तिचे त्याबाबतचे अधूनमधूनचे प्रामाणिक प्रयत्न फोल ठरले होते!...नि म्हणूनच तिच्या भावनाप्रधान निर्मळ मनाला, नि त्यामुळेच तिच्या गात्रांना-शरीराला शिथिलता—भयंकर, अमर्याद शिथिलताच येत गेली होती. दिनानुदिन, सर्व सर्व वरवरचे औषधोपचार करूनही, ती भरून येत नव्हती. भरूण निघणं आता अशक्यप्रायच झालं होतं!

*

असल्याच मानसिक झगड्यामध्ये व दुःखी मनःस्थितीत तिला आपल्या सहवासाने नवा जोम आणण्यासाठी, जगण्यासाठी नवा उत्साह मिळवून देण्यासाठी, मी आता दिवसाचा बराच वेळ घरीच घालवू लागलो होतो. तीही माझ्याबरोबर बोलताना, वागताना, पूर्वीसारखीच वरवर दिलखुलास हसे, पण, ते सारं सारं वरकरणीच, हे मी—नि तीसुद्धा—पूर्ण जाणून होतो.

अशाच स्थितीत दिवस जात असताना एके रात्री ती गलितगात्र होऊन, क्षीण होऊन, डोळे मिटून पडली होती. मी तिच्या शेजारीच बसलो होतो.

तेवढ्यात एकदम डोळे उघडून, कावरंबावरं सभोवार पाहत, मला ती एकदम म्हणाली,

" सदानंद आहे ना तुमच्या बिछान्यावर झोपलेला सुरक्षित ? मी जरा जातेय—वाट पाहू नका माझी—स्वामी बोलावताहेत मला—"

मी केवळ्याने तरी दचकलो—यशोदेला हळूच हाक मारून जागं करण्याचा, कानशिलांना हलुवार हात लावून थोपटण्याचा प्रयत्न केला. तिने हळूच एकदा डोळे उघडले पण ते तसेच मंदस्मित करून पुन्हा मिटले—नि मग क्षीण स्वरात मला ती म्हणाली—" तशी मी जागी आहे—पण, आता ना—कसला तरी उगीच भास झाला मला—झोपा ना तुम्ही ! जागे कशाला ?"

तरी मी झोपलो नाही. बेचैन होऊन तिच्या जवळच बसलो. तिने एकदा हळूच डोळे उघडून माझ्याकडे पाहिलं, क्षीण हाताने माझा हात आपल्या हाती घेतला. एक मंद स्मित केलं नि डोळे पुन्हा मिटून घेतले.

थोड्या वेळच्या शांततेनंतर ती पुन्हा एकदा पुटपुटली, " सदानंद—सदानंद—"

मी पुन्हा चमकलो—खाली वाकून अगदी तिच्या कानाजवळ पुटपुटलो, " उठवू का सदानंदला ?"

पण एकदम डोळे उघडत, ती आश्चर्याने पाहून, क्षीण स्मित करीत म्हणाली, " कुठे ?—नको ! कोणाला ? अगदी कोणाला उठवू नका. तो कसला मोहच नको आहे आता मला ! ती सारी तुमच्या पांघरुणात झोपली आहेत गाढ, तेच बरं आहे !—माझं काय आता ?—मला काय त्याचं ?"

फिरून तिने डोळे मिटून घेतले. तिचा श्वासोच्छ्वास मंद मंद चालला होता. तिचा हात अजूनही तसाच माझ्या हाती होता. त्यात अजूनही ऊब होती. मी तो तसाच राहू दिला.

*

भरल्या हृदयाने तिच्याकडे तसाच पाहत मी किती तरी वेळ तिच्या शेजारी बसून होतो—हळूहळू, मला नकळत, माझ्या डोळ्यावर झोपेची झापड केव्हा आली ते मला समजलंही नाही. तिच्या बिछान्याच्या कडेला, मला नकळतच, मी माझं डोकं ठेवलं !

तसा किती वेळ गेला ते मला समजलंही नाही.

पण मला फिरून जाग आली, तेव्हा माझ्या हातात अजूनही असलेला तिचा हात मला गार गार लागला.

मी दचकून तिच्याकडे तसंच बसल्या बसल्या टक्कारून पाहिलं. मघासारखाच तिचा चेहरा शांत-सस्मित होता. डोळे बंद होते.

भयभीतपणे मी माझ्या हातातील तिचा हात हळूहळू हलवला तरी तिला जाग आली नाही. तेव्हा मी तिला तीनचारदा हळूहळू आवाज चढवीत हाका मारल्या, " यशोदा, —यशोदा, ए यशोदा !"

पण यशोदेने डोळे उघडले नाहीत, कसली हालचाल केली नाही. चेहरा स्मितपूर्ण

होता, पण तिचे ओठ हलले नाहीत, हसले नाहीत.

माझ्याशी ती आता कधीच बोलणार नव्हती. माझी यशोदा मला कायमची सोडून गेली होती. मला इच्या त्या योजना नि कल्पना करायला मला पूर्ण मुक्त करूनच ती गेली होती!

तोपर्यंतच्या, नि त्या क्षणच्या माझ्या वैभवसंपन्न यशस्वी आयुष्यातलं ते कधीही परत न लाभणारं, कधीही न परतणारं, माझं एकमेव हरपलं श्रेय होतं!—

माझी यशोदा मला यश देऊन गेली, पण मी मात्र खरा यशस्वी होऊ शकलो नाही.

## दुःखातलं सुख

वाचता वाचता अनेक ठिकाणी मंगलेचा कंठ जड होत गेला होता. स्वर कापत होता, अडखळत होता, वाचनच अशक्य होत होतं. डोळे आसवांनी भरून येत होते.

शेवटी आपले डोळे पुसत मंगल कितीतरी वेळ गप्पच राहिली आणि मग घोगऱ्या आवाजात ती सदानंदला हळूच म्हणाली—"किती किती आश्चर्य, नाही! हेच हेच आनाबापू सासूबाईंच्या—तुमच्या आईच्या—पश्चात पुढे मात्र कसे वागले! अगदी जमीन-अस्मान!"

डोळे मिटून, आपल्या तंद्रीत इतका वेळ आरामखुर्चीवर पडून असलेल्या सदानंदाने एक दीर्घ निःश्वास टाकला नि मंगलकडे स्नेहाने पाहत तो म्हणाला—"चुकतेस तू, मंगल! तुम्हा बायकांना आपल्या एका आयुष्यात एकच पती, एकच ध्येय, असंच फक्त सहजासहजी जगता येतं! मग, एकाच आयुष्यात अनेक आयुष्यं जगणाऱ्या, जगू शकणाऱ्या पुरुषांची कशी बरं कल्पना करता येणार तुम्हांला? मीही केवळ अलीकडेच जाणू शकतोय हे!"

त्यानंतर क्षणभर ती दोघंही निःशब्दच बसली होती. त्यांच्या डोळ्यांपुढे अन्नपूर्णा, आना-रावजी नि आनांचं ते हरपलं श्रेय फिरफिरून उभं रहात होतं.

मग सदानंदच उठून बसत म्हणाला, "तरी देखील, मंगल, आपल्या मनाचा अधिक कणखरपणा आनांना दाखवताच आला नसता, असं नाही मला म्हणवत!"

"तुमच्या आई पुढेही जगल्या असत्या, तर कदाचित त्यांचं आयुष्य साफच निराळं झालं असतं!" मंगल स्निग्ध स्वरात म्हणाली, "नि मग तुमचंही—"

अत्यंत गंभीर होऊन सदानंद म्हणाला, "तसं आपण नेहमी उगीच म्हणत असतो! असं आहे बघ मंगल, जे सुख किंवा जे दुःख आपल्या वाट्याला येत असतं आपल्या आयुष्यात, ते एकटं एकटं कधीच येत नसतं! सुखाबरोबर दुःख नि दुःखाबरोबर सुख असंच ते एक अद्भुत त्रांगडं असतं. एक हवं असेल तर दुसरं त्याबरोबरच चालून येतं.

ते स्वीकारावंच लागतं! जे आपल्या वाट्याला येतं ते त्या त्या वेळी, तसं तसं, आपापल्या स्वभावानुसार भोगण्यात नि त्याचा असा थंड विचार करण्यातच खरी मजा असते, म्हणून—कुणी सांगावं, एक दुःख आलं नसतं तर दुसरं एखादं किंवा दुसरी कित्येक सुखंही आपल्याला पारखी झाली असती. ती आपण कायमचीच गमावून बसलो असतो. एकूण ही गोळाबेरीज सारखीच असते! मी तर म्हणेन मंगल, दारुण दुःखांच्या परं-परेच्या रखरखीत वाळवंटातून जाताना, सोज्वळ, धीरगंभीर, सहज सुखांची अधूनमधून हिरवळ विखुरणारं जीवनच अधिकात अधिक सुखी होत असतं! आबांचं आयुष्य सुखीच होतं! आनाही सुखीच होते! नि मी? मीही सुखच अनुभवलंय—सुखच अनुभवतोय!"

बोलता बोलता सदानंदने एक लांबलचक जांभई दिलेली पाहून मंगल जरा हसून म्हणाली, "हे पहा—आता जरा निद्रेचं सुख अनुभवा की! वाजले किती पाहिलेत?"

टेबलाजवळच्या भिंतीवर मध्यभागी, छड्यासह खिळ्याला लोंबकळणारं आनांचं वेस्ट एंड घड्याळ होतं तिकडे पाहून, आश्चर्याने दचकून सदानंद म्हणाला, "काय? चार वाजून गेले? खरंच, खरंच! झोपलंच पाहिजे आता. चला—उठा—"

उत्तरार्ध

□

# प्रेरणा

## चार

### वाळवंट व हिरवळी

सकाळी मंगल थोड्या उशिराच उठली. जागरणामुळे सदानंद अजूनही गाढ झोपला होता. इतक्या दिवसांच्या श्रमांची त्यात एक आणखी भर पडली होती. त्याला न उठवताच, मुलांना बरोबर घेऊन ती हळकेच खाली उतरली.

आदल्या दिवशी ठरल्याप्रमाणे, घरातली बहुतेक सगळी कामं उरकता उरकता तिने टांगा बोलावून मुलांना आपल्या गड्याबरोबर सदूकाकांकडे ' शंकर कॉलनी 'त पाठवलं. मग, न्हाऊमाखू घातलेल्या अनंताला तिने पाळण्यात गुडुप झोपवलं नि हलक्या पावली खाली आली. जेवण तयार होताच, सारी झाकपाक करून तिने खालची दारं लावली.

मंगल पुन्हा वर आली तरी सदानंद अजून गाढ झोपलेलाच होता. त्याला न उठवताच, ती क्षणभर त्याच्याकडे स्नेहभराने पाहत राहिली.

तसं पाहता पाहता, मंगलला आपण सदानंदबरोबर घालवलेलं सारं भाव-मधुर जीवन अगदी प्रथमपासूनच आठवू लागलं.

तो रात्री म्हणाला होता, " दुःखाच्या परंपरेच्या वाळवंटातील मधूनमधूनच्या हिरवळी ! " त्या दोघांना त्या खात्रीनेच अनेकदा लाभलेल्या होत्या. कॉलेजमधे आलेला त्या दोघांचा सहज संबंध, मार्गात वाढून आलेल्या सान्या संकट-दुःखांच्या दाटीवाटीतून सुद्धा, अखेरीस मंगलेच्या सर्वांगीण सोज्वळ सुखालाच तो कारण झाला होता— त्याचीच तिला मनोमन खात्री पटत होती नि हृदय अगदी आनंदून येत होतं.

काल रात्रीचं त्यांचं जोडीने बसून वाचणं अर्धवटच राहिलं होतं. त्यामुळेच, उभ्या उभ्या तिचं मन एकदम हेलावून आलं. एका न्याऱ्याच उत्सुकतेनं मंगलचे पाय पटकन् सदानंदच्या टेबलाकडे वळले.

तिथे अजूनही एक वही-पत्र अशी चळत पडली होती. त्यातली ती वरली वही मोठ्या कुतूहलाने उचलून घेऊन तिने उघडली. ते हस्ताक्षर तिच्या निर्मलावन्संचं होतं. तिची उत्सुकता अधिकच बळावली.

जवळच्या आरामखुर्चीवर ऐसपैस पसरून मंगलेने अगदी आतल्या पहिल्या पानापासून वाचायला सुरवात केली.

## लक्ष्मीचं आगमन

(सदूकाकांचं कथन)

यशोदावहिनी एकाएकी गेली नि आनाबापूचा संसार पार कोसळला. तो धक्का मला नि माझ्या बायकोलाही फार मोठा वाटला.

विशेषतः सदानंद-निर्मला ही चिमुरडी अनाथ लेकरं इकडेतिकडे मिरमिर पाहत " आई कुठे ? " म्हणून केविलवाणं विचारू लागली, की माझ्या तरी पोटात फाळ पडल्यासारखं होई. तरी बरं, भागाचा नि माझा त्यांना आधीपासूनच खूप ळ्ळा होता. तेव्हा, पहिला महिनाभर ती ' सदाशिव 'मधे माझ्याकडेच असत.

आनाही आनच्यामधेच बराच वेळ घालवायचा. पण हळूहळू ते न मानवून एके दिवशी तो मला म्हणाला, " जुन्या घरीच विरंगुळा वाटेल मला— मुलं राहू दे इथंच तुझ्यापाशी—"

मग, दोन दिवस जेवणाचा डबा पाठवल्यावर भागाच म्हणाली, " असं कशाला ? मी जाते आपली आनाकडेच. तो आणखी हेळसांड करून घ्यायचा नि मग प्रकृती बिघडायची त्याचीही. "

भागा तिकडे, मुलं इकडे ' सदाशिव 'मधे. तिचा जीव तसा दोन्ही बाजूंना ओढला जाई. मुलं इकडे असली, की ' भागाआत्या हवी ' वाटे त्यांना. म्हणून ती तिकडे गेली, की, संध्याकाळपर्यंत तक्रारी करून ' सदूकाका ', ' सदूकाका ' करीत परत माझ्याकडे येऊन पोचत.

त्या दोन-तीन महिन्यांत आनाचं तर कामावर मुळीच लक्ष नसे. मलाही अनेकदा मुकादमांवर कामं टाकून सनानंद–निर्मला नि माझी मुलं घेऊन फिरायला जावं लागे.

*

ती आईविना पोरं आपसात खेळत असली, की माझ्या मनात विचार येई, " काय विचित्र घटना पाहा ! आना किती किती चांगला, यशोदावहिनी किती प्रेमळ ! पण सारं अनुकूल असताना, ऐन प्रौढपणी ते जोडपं एकमेकांना पारखं झालं ! आता या अनाथ, गोड पोरांचं पुढे काय ? "

भरल्या घरात, अगदी आनंदातच असतानाच, आमची आई गेली होती. जगात कुठे दिसणार नाही असल्या त्यागबुद्धीने श्रम–पैसा न वाचवता बांधलेला तो नवा

बंगला आनाबापूने मला वत्सलपणे यावा नि चारच दिवसांत आई निघून जावी, हे माझ्या मनाला प्रथम फार जाचलं होतं. पण, एकाच गावात दोघा भावांची दोन घरं, दोन संसार, ही गोष्टच माझ्या मनाला अधिक लागली होती. त्यानंतर केवळ दोन वर्षांत यशोदावहिनी पोरांना आमच्यावर टाकून एकाएकी गेली, त्या वेळी तर ते शल्य मनाला फारच खुपलं.

मनात आलं— एकत्र कुटुंबात, पूर्वीच्या स्थितीत, तो त्या चिमुकल्यांचा प्रश्न कधी उद्‌भवलाच नसता. आज तीच बाब आनासकट आम्हा सर्वांनाच बेचैन करीत आहे! पण म्हणजे माझ्या संसारासकट मी उठून आता आनाकडे जाणं हे जितकं अशक्य, तितकंच आपल्या मुलांसह त्याने माझ्याकडे येणंही अशक्य! आम्ही दोघे भाऊ कितीही सत्प्रवृत्त असलो, आमचं एकमेकांवर कितीही गाढ प्रेम असलं, तरी— तसं काही होणं हे आता अगदी अशक्य! आता, बापूची मुलं त्याच्या घरी, त्याच्याजवळ, त्याच्या देख-रेखीखाली असणं-वाढणं हेच योग्य, सयुक्तिक! कारण आता तो एक कायमचा प्रश्न होता. पुढलं सारं आयुष्यच तसं जायचं होतं—

✲

तेव्हा, साडेतीन-चार महिने निघून गेल्यावर, आनाने लाडीगोडी करून, समजूत पाडून आपली मुलं जुन्या घरीच नेली, बरोबर भागा तिकडे कायम राहायला गेली, तेव्हा माझ्या जिवाची कालवाकालव होत असूनही मी त्या व्यवस्थेला निमूट मान वाकवली.

आना सुज्ञ, विचारी, अर्थात आल्या परिस्थितीतून तो नीट वाट काढणारच. तो एवढा शिकलेला! आईविना वातावरणात मुलांना तो कौशल्याने रुळवणारच, याबद्दल मला खात्रीच होती. पुन्हा भागा तिकडे असल्यामुळेही मला निश्चिंत वाटत असे.

नि ते खरंच ठरलं—आना बांधकामाच्या पाहणीसाठी फिरे तेव्हा सदानंद-निर्मला त्याच्याबरोबर फिरत. त्या वेळी ती पूर्वीसारखीच माझ्याशी गप्पा-टप्पा करीत, पण राहा-यला येण्याचा कधी हट्ट धरीत नसत. मधल्या दोनतीन महिन्यांत, त्यांनीही आता स्वतःला नव्या परिस्थितीत चांगलं रुळवून घेतलं होतं.

कारण, जमेल तेवढा वेळ आना त्यांच्यातच मिसळून असायचा. त्यांना तो गोष्टी सांगायचा, त्यांच्याबरोबर भजनं म्हणायचा, निरनिराळे खेळ खेळायचा. सदा नि निर्मला बापाशी तासतास बोलत बसायची, रात्री दोन मोठे पलंग भिंतीपाशी जवळ जवळ लावून शेजारी आनाबापू तिसऱ्यावर झोपायचा; ती चिमुरडी त्याच्यापाशी गप्पागोष्टी करीत करीत झोपी जायची! राम, कृष्ण, ध्रुव, चिलया, सारे सारे त्या वेळी तिथे पुन्हा जन्म घ्यायचे. आपलं सारं आयुष्यच त्यांच्यापुढे जगायचे!

म्हणूनच, आता कधी मी त्यांना माझ्याकडे राहायलाच यायचं आमंत्रण दिलं तर त्या दोघांची मला एक तडजोडच करावी लागे. आनाबापू नि भागाआत्या दोघांसकट असेल

तरच दोन दिवस राहायला ती कबूल होत. नाहीतर सकाळी येऊन संध्याकाळी झोपायला पुन्हा घरी जायची आमची बोली असे.

अशी ती आईविना पोरं! नि तो पत्नीविना विधुर! असलेल्या नि आलेल्या त्या परिस्थितीत, एकमेकांच्या आधाराने, तिघंही समाधानाने रुळू लागली होती. मला हायसं वाटत होतं.

*

त्यानंतरही एकदोन महिने गेले होते. नि एके दिवशी सकाळीच माझ्याकडे आनाचा निरोप आला—"महत्त्वाचं काम आहे. रावजींच्या घरी ताबडतोब निघून ये."

पंधरवड्यापूर्वीच रावजीसाहेबांचं अचानक 'हार्टफेल' झालं होतं. त्या वेळी आम्ही दोघेही भाऊ त्यांच्या स्मशानयात्रेला गेलो होतो.

दोन नवीन बंगले पुरे करून मालकांच्या ताब्यात देण्याच्या तारखा जवळ जवळच आल्यामुळे मधला पंधरवडा माझी खूप कुतरओढ झाली होती. त्यामुळे घरी आनाकडे जाऊन मुलांची-भागेची ऐसपैस चौकशी करायला मला मुळीच जमलं नव्हतं. पण आधल्या दिवशी आम्ही एका नव्या बंगल्याचं खोदकाम सुरू केलं होतं, त्या वेळी आना मला समक्ष भेटलाच होता. तरी विशेष कशाबद्दल काही एक बोलला नव्हता.

तर मग, आता भल्या सकाळीच हा त्याचा तातडीचा निरोप कसला? पुन्हा त्याच्या घरी नाही, रावजींकडे? काय, काहीच मला समजत नव्हतं, तरी पटकन सायकलवर टांग टाकून तिकडे निघालो.

'रावजी व्हिला'च्या फाटकातून आत शिरून, वरल्या मजल्यावरल्या हॉलमधे मी प्रवेश केला, तेव्हा रावजींची नेहमी बसायची खुर्ची रिकामीच दिसून मला चुकल्या-चुकल्यासारखंच वाटलं. त्यांचा तो टक्कल पडलेला नि सदैव हास्यमुख, स्नेहाळ चेहरा मला एकदम आठवला नि क्षणकाळच मी अनेक स्मृतींनी बेचैनही झालो.

हॉलमधे आनाबापू एका खुर्चीवर आधीच येऊन गपचूप बसला होता. रावजींची मोठी मुलं— गोपू, लक्ष्मी— नारायणजवळच्याच कोचावर बसली होती. केशव जिन्यापाशी खेळत होता. जरा पलीकडे, अडीच वर्षांच्या आपल्या सर्वांत धाकट्या माधवला मांडीवर बसवून, माजघराच्या दाराजवळ, कुंकवाशिवाय ओक्याओक्या दिसणाऱ्या कपाळाने रावजींची बायको खाली जमिनीवरच गपचूप बसली होती.

जवळ जाताच, एका खुर्चीवर बसायला मला हात करून आनाबापू हळूच जड कंठाने म्हणाला, "अरे सदाशिव! रावजींनी त्यांच्या या मुलांची काही व्यवस्था करून ठेवली आहे. जरा वाचशील का हा कागद सर्वांपुढे, त्याचं सील फोडून!"

बोलता बोलता आनाचे डोळे ओलावले होते. त्या दोघांचा स्नेहच तसा होता. अगदीच जिव्हाळ्याचा. रावजींचे आमच्यावरही काही कमी उपकार नव्हते. माझी ते जाता येताना नेहमीच आस्थापूर्वक चौकशी करीत. त्यांच्याबद्दल मलाही नेहमी फार

आदर वाटे.

मी काही एक न बोलताच, आनाबापूने पुढे केलेलं ते पुडकं माझ्या हाती घेतलं.

सर्वांकडे एकदा मंदपणे दृष्टी फिरवून त्या लखोट्याचं सील फोडलं, नि आतले कागद काढून वाचू लागलो—

*

"आजचं हे माझं अखेरचं टिपण, यापूर्वीची मी सर्व फाडून टाकली आहेत. चुकून कुठलं सापडल्यास ते रद्द समजावं. हेच काय ते अधिकृत आहे. दुसरं कोणतंही अधिकृत नाही, माझी अंतिम इच्छा दर्शविणारं नाही.

हिशेबाची सोबतची टिपणंही अखेरची आहेत. ती व्यवहारासाठी मार्गदर्शक व उपयुक्त होऊ शकतील.

गोपाळ, लक्ष्मी, नारायण, केशव, माधव ही जरा उतारवयात मला झालेली माझी मुलं. ती सगळीच आज सज्ञान नाहीत. तेव्हा, आहे ते सर्व, अखेर, त्या सर्वांनाच सारखं मिळायचं असलं, तरी– अगदी शेवटचा मुलगा सज्ञान होईपर्यंत, मी माझ्या आहे त्या स्थावर–जंगमाचा एक ट्रस्ट करीत आहे. अर्थात कोणाही एकाला, तोपर्यंत स्वतःचं निराळं असं काही तोडून मागता येणार नाही, करताच येणार नाही. हे प्रत्येकाने इथे प्रथमच ध्यानी घ्यावं.

केवळ माणसांच्या संख्येवरच कोणत्याही कार्याची सुरळीतता, सुरक्षितता मुळीच अवलंबून नसते. तेव्हा, विश्वासाचा केवळ एक मनुष्यसुद्धा हजार ट्रस्टींपेक्षा श्रेष्ठ ठरू शकेल, अशा निश्चित मताचाच मी मनुष्य आहे.

तेव्हा माझ्यामागे माझ्याच धोरा-धोरणाने, मी चालवीन तितक्याच आस्थेने नि प्रामाणिकपणे, माझा सारा व्यवहार माझ्या मुलांच्यातर्फे सुरळीत चालू ठेवू शकेल असा एक मनुष्य माझ्या मनाने मी शोधूनही काढलेला आहे. तो सद्गृहस्थ म्हणजे– माझे मध्यमवयस्क परमस्नेही श्री. अनंत आबाजी खोत. देव त्यांचं भलं करो.

*

अत्यंत क्षुल्लक भांडण–तंटा–तेढीतूनही, दोन कुटुंबे कायमची वैरी होतात, पिढ्यानुपिढ्या ते वैमनस्य टिकतं– वाढतं– विकोपास जातं, असं आपण अनेकदा जगात पाहतो. तर मग, अमानुष कृत्यांमुळेच झालेलं तसलं वैर तर जन्मोजन्मीच उरायचं.

वास्तविक, तसली अमानुष आगळीक माझ्या एका कुटुंबीयाकडून अनंतरावांच्या कुटुंबीयांची झाली होती. होय प्रत्यक्ष माझा भाऊ, आबाजीमास्तरांच्या शतविध नाशासच कारण झाला होता.

तरी देखील, त्याच आबाजींचा मुलगा नि मी, योगायोगाने पुन्हा एकत्र येताच तो

मागला सारा इतिहास आम्ही दोघे विसरलो. ज्याचं कर्म त्याच्याकडे ठेवून, परस्पर पुरी दिलजमाई करू शकलो. एकमेकांचे मित्र होऊ शकलो. विश्वासाने एकमेकांशी व्यवहार करू शकलो– एकमेकांचा फायदाही करू शकलो.

पण मग, ही आमची माणुसकी असामान्य, आश्चर्यकारक मुळीच नव्हे, ती मानवसुलभ, नैसर्गिकच आहे. ती माझ्या पश्चात् देखील अविभाज्य व तितकीच नैसर्गिक राहील, निःस्वार्थी राहील! मला तसा प्रचंड विश्वास आहे. त्यामुळेच, मी माझ्या या अखेरच्या हस्तलेखाने, माझ्या सर्व इस्टेटीचे, आनाबापूंनाच एकमेव मुखत्यार व विश्वस्त नेमीत आहे.

थोडक्यात, श्री. अनंतराव खोत यांना मी माझ्या अज्ञान मुलाचे पालक, सज्ञान मुलाचे स्नेही–सल्लागार व सर्वांत धाकटा मुलगा सज्ञान होईपर्यन्त, माझ्या संपूर्ण इस्टेटीचे एकमेव संरक्षक व वहिवाटदार नेमीत आहे. सर्वाधिकारी तेच राहतील.

*

मला आलेलं वडिलार्जित, काही अप्पाजींच्या मुलांनाच देऊन टाकून उरलेलं सर्व मी विकून टाकलं आहे. वावदरीचा कसलाच संबंध आता उरलेला नाही. अशा जवळच्या रोकडीमधूनच हा राहता बंगला व चाळ मी ' नवग्रामा 'त बांधली आहे. या इमारतीमधून, माझ्या पश्चात कुटुंबीय चरितार्थ साधता येईल, असा मला विश्वास आहे. माझ्याकडे काही रोकड आहे. पण ते साचलेलं डबकं! सगळी मुलं सज्ञान होईतो ते टिकणं अशक्य. स्वतः माझा धंदा शेअरबाजाराचा. तो फार अनिश्चित व अत्यंत धोक्याचा. तो चालवण्यास जागरूकता व धोरण लागतं. तसा लायक माणूस माझ्या मुलांमध्ये तर कोणी नाही.

पण अनंतराव व मी, आम्ही दोघांनी तो धंदा काही काळ यशस्वीपणे हाताळला आहे. काही वेळा तर, माझ्यापेक्षाही अनंतराव त्यात अधिक धूर्त व हुशार ठरले आहेत. तेव्हा माझ्या मुलांच्या वतीने तो धंदा चालवण्याचा निर्णय वाटल्यास घेण्याचा अनंतरावांना मी येथे अधिकार देऊन ठेवीत आहे.

त्यासाठी या रोकडीपैकी, सुरवातीस पंधरा ते वीस हजार रुपयांपर्यंत वापरण्यास मी त्यांना पूर्ण मुभा देऊन ठेवीत आहे. त्यापैकी दहा ते बारा हजारापर्यंत, एखाद्या धोरणाच्या चुकीमुळे, त्याच्या हातून गमावले, तर त्याबद्दल त्यांना जाब विचारण्याचा माझ्या कुटुंबीयांपैकी कोणालाही कधीही अधिकार नाही. त्या धंद्यात तसला चढ-उतार, धोका आहे. तेव्हा, माझ्याकडून जशी एखादी गेलेली रकम मला अगर माझ्या मुलांना मागता आली नसती, तशीच अनंतरावांकडून मागण्याचा माझ्या मुलांना कसलाही अधिकार असणार नाही.

*

तेव्हा या पद्धतीने व या सर्व अधिकारांसह; या हस्तलेखाने, श्री. अनंतराव आबाजी खोत यांना, माझ्या सज्ञान-अज्ञान मुलांच्या इस्टेटीचे एकमेव विश्वस्त म्हणून मी नेमलं आहे. कधी काळी आवश्यक वाटल्यास आपले हे अधिकार तेच दुसऱ्या कोणाकडे सुपूर्द करू शकतील.

पण, त्यांनी ही जबाबदारी, वर उल्लेखिलेल्या मुदतीअखेरपर्यंत शिरावर घ्यावी, अशी त्यांना मी इथं हात जोडून स्नेहाची विनंती करीत आहे.

ती त्यांनी तशी एकदा स्वीकारून मला उपकृत केल्यावर, त्यांच्याकडून हे अधिकार काढून घेण्याचा, माझ्या सज्ञान-अज्ञान कोणत्याही मुलाला अगर माझ्या पत्नीला, अखेरपर्यंत कोणताच हक्क-अधिकार पोचत नाही, हे त्या सर्वांनी या क्षणीच ध्यानी बाळगावं...

श्री. अनंतराव यांच्या या जोखीम-श्रमांबद्दल, मी त्यांना निश्चित असं काहीच नेमून देत नाही. तो उलट त्यांचा एकप्रकारे अपमानच होईल.

पण मग दैनंदिन, नित्य व नैमित्तिक अशा कोणत्याही खर्चाच्या व देण्याच्या बाबतीत, मी स्वतः ज्या अधिकाराने वागलो असतो, त्याच अधिकाराने अनंतरावांनी वागावं, अशी माझी इच्छा असल्यामुळे, ते सारं काही, मी त्यांच्या नेकी-सद्सद्विवेक बुद्धीवरच सोपवून जात आहे. हे त्यांनी व माझ्या कुटुंबीयांनी ध्यानी घ्यावं.

ईश्वर अनंतरावांचं व त्यांच्या हातून माझ्या कुटुंबीयांचं सर्वतोपरी कल्याण करो. दस्तुर खुद्द.

सही—

सहीची साक्ष- सदाशिव आबाजी खोत | रावजी दीपाजी कुळकर्णी

ता. ।२।१९१२ | ता. :२।१९१२

*

ते सारं मी वाचलं, साक्ष-सही पाहिल्यावर डोक्यात एकदम चक्क प्रकाश पडला.

वर्षापूर्वी, असाच कामानिमित्त रस्त्याने सायकलवरून मी जात होतो. टाळ्या वाजवून रावजींनी मला वर बोलावून घेतलं होतं. वर गेल्यावर एका कागदावर आपली सही करून, शेजारी माझी ती साक्ष-सही करवून घेताना ते म्हणाले होते- " फक्त माझ्या या सहीचीच साक्ष केली आहे हो ही तुम्ही या कागदावर. लक्षात असू द्या- पुढे वेळप्रसंगी—"

मग मी सोबतचा रकमांचा तपशील मोठ्याने वाचला. दोनतीन बँकांची नावे व रोख शिल्लक, काही शेअर्स व सात-आठ मंडळींकडून येणं रकमांचा तपशील, अशी सुमारे सत्तर हजारांची बेरीज होती.

येणं यादी वाचताना एके ठिकाणी मी किंचित अडखळलो. कारण, त्या कलमांत 'अनंत आबाजी खोत, कॉन्ट्रॅक्टर' असं नाव होतं व त्यापुढे दहाबारा हजारांचा

आकडा होता. कंसात ' बिनव्याजी ' असा तांबडया शाईचा शेरा मारला होता.

मी आनाच्या तोंडाकडं पाहिलं. का कोण जाणे, ते ऐकून तो थोडं गालातल्या गालात हसत होता.

सगळं वाचून झाल्यावर रावजींची बायको म्हणाली, " हं—-चला बाई ! आता मी निश्चिंत झाले. आनाबापू, मीही या साऱ्या लेकरांच्या वतीने तुम्हांला आज पुन्हा विनंती करते—तुमच्याशिवाय कोण आहे बरं दुसरं आम्हांला ? सारं तुम्हीच आज ताब्यात घ्या कसं ! "

क्षणभर गप्प राहून आनाबापू म्हणाला, " जसा रावजीसाहेबांचा हुकूम ! जशी तुमची इच्छा ! "

मग सारी कागदपत्रं पाहून, त्यांची यादी करून आनाने ती एका बॅगेत घातली, कुलूप लावलं नि आम्ही बरोबरच निघून बाहेर पडलो.

*

आनाकडे आलेले ते भयंकर व्यापक अधिकार व एक प्रकारची एवढ्या मोठ्या रोकडीचीही ' कोरी हुंडी ' यांची पटकन जाणीव होऊन, माझ्या भावाबद्दल मला त्या क्षणी खूप अभिमान वाटल्यावाचून राहिला नाही !

जाता जाता वाटेत मी त्याला सहज म्हणालो, " केवढा मोठा विश्वास रे तुझ्यावर रावजींना हा ! "

" होय ! मलाही त्यामुळेच आज स्वतःबद्दल अभिमान वाटतोय—" आणि मग, आपल्याशीच हसत आनाबापू मला पुढे म्हणाला, " तरी पण– रावजी पक्के वस्ताद, बेरके !—बरं का, सदू ! येणं-यादीच्या टिपणांत, माझ्या नावापुढे बिनव्याजी दहा हजारांचा उल्लेख त्यांनी केलाय तो मघा पाहिलास ना तू ? "

" हो हो ! तांबडया शाईतला ! त्याचं रे काय ? " मी कुतूहलाने विचारलं.

" रावजी स्वतः माझ्याकडे कधीच मागणार नव्हते ती रक्कम—" आना थोडया गंभीरपणे पुढे म्हणाला, " पण मग— माणसाच्या स्वभावाला कसे बारकावे नि खाची-खोची असतात बघ ! कागदविगद कसला नाही ! आता त्यांच्या टिपणात ती ' येणं ' तर आहे, पण केव्हा द्यायची, द्यायची की नाही ते पुन्हा माझं मीच ठरवायचं, असं ठरवून गेले आहेत रावजी ! माझ्या सद्‌सद्विवेक बुद्धीवर त्यांनी सोपवलेल्या ज्या हजार गोष्टी आहेत, त्यांतलेच ते मी त्यांना द्यावयाचे दहा हजारही ! त्याचीच गंमत वाटली मला मघा. "

*

रावजींचा सर्वात मोठा मुलगा गोपू— पंचविशीकडला—मॅट्रीक झालेला होता खरा, पण त्याच्यामधे बापाची धडाडी काही नव्हती. तल्लखपणा मुळीच नव्हता. त्यामुळे त्या

सर्व व्यवहारामधे सुरुवातीला आनाबापूंचा मीच मदतनीस होतो. गोपाळबरोबर जवळ जवळ प्रत्येक ठिकाणीच मला जावं लागे नि त्याने करायच्या गोष्टी साऱ्या मलाच अधिक कराव्या लागत.

रावजींच्या सर्व रोकडीचे आनाबापूने प्रथमच पाच विभाग केले. पाच मुलांच्या नावांची सेव्हिंग फिक्स खाती उघडली. आठ-दहा हजाराचे दागिने रावजींच्या बायकोच्या नावे बँकेत सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधे ठेवले. शेअर्स वगैरे मालमत्तेचीही अशीच वाटणी केली.

झालेली कुठली वसुलीसुद्धा आनाबापू त्या पाच खात्यांत विभागून टाकी. कुठला घरचा खर्च आला, की पाची खात्यांतून तो सारख्या प्रमाणात रकमा काढून घेई. एवढ्यासाठी आनाने आपल्या नावचं मध्यवर्ती खातं काढलं होतं. रोजच्या रोज, अगदी पद्धतशीर हिशेब तो मलाच लिहायला लावी.

या मधल्या खात्यातूनच सुरवातीस १०,००० रु. आनाने काढून 'धंदा खातं' म्हणून निराळं उघडलं. हळूहळू प्रॉ. नोटा, सोनेचांदी, बिनधोक शेअर्स यांच्या खरेदी-विक्रीची सुरुवात रावजींच्या मुलांतर्फे केली. त्यासाठी आठवड्यातून दोन दिवस तो मुंबईस जायचा तेव्हा त्याच्याबरोबर गोपू असे.

ह्या नव्या व्यापाबद्दल बोलता बोलता एके दिवशी आना मला म्हणाला, "यात थोडी भीती आहे खरी, पण कोणी सांगावं ! रावजींसारखंच त्याच्या पोरांचंही नशीब कशा-वरून यातच नसेल ? इतकी व्यापक सुभा मला रावजींकडूनच मिळालेली असल्यावर मी धोका न पत्करणं, तो धंदा त्यांच्यातर्फे करून न पाहणं, हेही चुकीचं होईल !"

खरोखर, स्वतः रावजींनीही आपल्या कारभाराची व्यवस्था इतकी चोख नि पद्धतशीर ठेवली असती की काय, मला संशयच आहे. आना कधीच कंटाळत नसे, की कसला आळसही करत नसे.

सुरवातीला मला व नंतर गोपाळला हळूहळू माहिती करून देऊन, आनाने त्यालाच हाताशी धरलं होतं. या साऱ्या व्यवहारात आनाने इतका समतोलपणा ठेवला होता, की माझ्या साऱ्या श्रमांबद्दल त्याने मला वर्षभर दरमहा शंभर रुपये मी नको म्हणत असताही– रावजी ट्रस्टतर्फे दिले होते. त्यापुढे तो गोपाळलाही दरमहा दीडशे रुपये त्याच्या व्यक्तिगत श्रमांबद्दल देऊन त्याच्या खाती जमा करू लागला होता.

थोडक्यात, कुठल्याही क्षणी कुठल्याही मुलाच्या वैभवाची त्याला माहिती स्वतंत्रपणे सांगता येईल, अशी एक पद्धत त्याने लावली होती.

*

रावजींचा गोपाळ तसा खूप प्रेमळ होता. पण अगदी सीधा व बुद्धीने माझ्यासारखाच आपला मध्यम होता. स्वतःच्या कल्पनेने स्वतःच्या हिंमतीवर त्याला काही करता आलं नसतं– पण मग, दिलेले हुकूम मात्र कसोशीने व पद्धतशीर पाळण्यात त्याची कधी

कुचराई की चालढकल नसे.

त्या मानाने, त्याची त्याच्यापेक्षा दोन वर्षांनी लहान बहीण लक्ष्मी अधिक चलाख! घरातली एकटीच मुलगी, त्यामुळे प्रथमपासूनच आईबापांकडून तिचे खूप लाड झालेले. कॉलेजात एकदोन वर्षे घालवून, गेली दोन वर्षं ती घरीच होती. घरची सगळी खरेदी वगैरे तीच करायची. असल्या सगळ्याच गोष्टींमुळे, तिच्यामधे एक प्रकारचा आत्मविश्वास व त्याबरोबरच तितकाच अहंपणाही वाढला होता.

विशेषतः गोपाळ नुसता बावळा! त्याला डोकंच नाही!— अशी तिची त्याच्याकडे पाहण्याची दृष्टी झाली होती. तो तिचा मोठा भाऊ असूनही, वेळीअवेळी त्याचा ती चारचौघात पाणउतारा करी. गोपू बापडा थंड स्वभावाचा असल्यामुळे तिला कधी उलटून बोलत नसे. ते सारं तो हसण्यावारी नेई. त्यामुळे तर तिचं ते वर्तन अधिकच वाढत गेलं होतं.

या वातावरणामुळे गोपाळचा स्वभाव मात्र एक प्रकारचा भयंकर गोंधळ्या झाला होता. त्याला आपलं नेहमीच वाटायचं, " छे - आपलं काही तरी चुकतंय! कोणी तरी आता आपल्याला नक्की हसेल— मूर्ख म्हणेल— दोष देईल—रागावेल!" अशामुळे तर त्याच्या हातून कित्येकदा अधिकच वेंधळेपणाची कृत्यं होत, नि तो अधिकच हास्यास्पद होई. लक्ष्मीला आयतेच मोके मिळत त्याला हिणवायला नि बावळट ठरवायला.

घरातल्या असल्या नेहमीच्या लहानसहान प्रसंगांच्या त्या सतत परिणामाने, गोपाळच्या मनातला होता नव्हता तो स्वातंत्र्य आत्मविश्वासही नाहीसा होत गेला होता. तो गपचूप गपचूप असायचा, लक्ष्मीला वचकायचा, आईला घाबरायचा, थोडकं बोलायचा— सांगतील तेच करायचा—कोणी विचारतील तेच मोजकं सांगायचा!

आनाबापू मात्र धंदा-व्यवहारात गोपाळला खूपच उत्तेजन द्यायचा. त्याच्याकडून अनेक गोष्टी मुद्दाम करून घ्यायचा. त्याला काही समजलं नाही, तर पुनःपुन्हा समजवायचा, काही चुकलं तर त्याला सावरून घ्यायचा, त्यामुळे गोपाळला आमचा आना म्हणजे मोठाच आधार वाटायचा, देवमाणूस वाटायचा.

पहिल्या वर्षाअखेर त्या ट्रस्टच्या धंदा-खात्यातून पाचसहा हजारांचा फायदा झालेला प्रत्यक्ष हिशेब मी पाहिला, लिहिला, तेव्हा तर मला कमालीचं आश्चर्य वाटलं, पण त्याबरोबरच रावजी आणि आनाबापू या दोघांच्या एकूण स्नेहाचं व संयुक्त धोरणीपणाचं मला कौतुकच वाटलं. नि आमच्या आनाबद्दलचा, त्याच्या अक्कलहुशारीबद्दलचा माझा आदर तर दसपटीने वाढला!

*

स्वतः आनाबापूचे वैयक्तिक व्यवहार-व्यापदेखील या कालात खूपच वाढत गेले होते. त्याने आखलेल्या ' अन्नपूर्णा कॉलनी 'मधले तीस-चाळीस प्लॉट पटापट विकले गेले होते. ' आबा पार्क 'मध्ये बांधायच्या म्यूझिअमच्या इमारतीचं बांधकाम कॉन्ट्रॅक्टने

आम्हांलाच मिळालं होतं. आमचे इतर व्याप वाढल्यामुळे, एकाच वेळी पाच पाच बंगल्यांची कामं आम्ही आत्मविश्वासाने अंगावर घेतली होती. तशी आणखीही घेऊ लागलो होतो.

माझ्याबरोबरचे आनाचे व्यवहार तर फार चोख असायचे. मुख्य व्यवस्थापक म्हणून तो मला महिना दोनशे रुपये द्यायचा. कामानिमित्त धावपळ, फिरती वगैरे किरकोळ खर्चांकरिता मला आणखी शंभर रुपये दरमहाला मंजूर होते. हिशेब तो व मी मिळून ठेवायचो नि पुरे करायचो. फायद्यामधे पुन्हा तो माझे पंधरा टक्के कापून, वर्षाकाठी माझ्या हाती एकरकमी द्यायचा. स्वतःवर जबाबदारी फारशी कसली नाही नि फायदा असा बऱ्यापैकी, अशीच सर्व ती योजना असल्यामुळे आनाबरोबर काम करायला मला नेहमी हुरूपच वाटायचा. माझ्यासारख्या सामान्य अशिक्षिताच्या संसाराला आनामुळेच पुरी स्थिरता आली होती.

'अन्नपूर्णा कॉलनी' व 'यशोदा कॉलनी' हे आपले व्यवहार आनाने स्वतःचे स्वतंत्र ठेवणं योग्यच होतं. मला 'सदा-शिव' बांधून दिल्यावर त्याचा कागद रजिस्टर करताना, आनाबापूने आबांवेळचं जुनं घर-वाडी माझ्या संमतीने स्वतःच्याच नावे करून घेतली होती. आबांचं पूर्वीचं कर्ज त्यानेच फेडलं होतं. त्यामुळे मला कधी त्यातल्या कोणत्या गोष्टीचं स्वप्नातही वैषम्य वाटलं नव्हतं.

कारण, मला वाटे, "आबांच्या पश्चात मी एवढा मोठा झालो, मला थोडंफार महत्त्व आलं, प्रतिष्ठा आली, ती केवळ आमच्या आनाबापूमुळेच! माझा स्थिर संसार म्हणजेही एक प्रकारे त्याचंच कर्तृत्व होतं. तेव्हा असला माझा मोठा भाऊ माझ्यापेक्षा अधिक वैभवसंपन्न झाला, मानाने मोठा झाला, तर ती त्याचीच योग्यता, ते त्याचंच कर्तृत्व! तीच माझीही अप्रत्यक्ष थोरवी!"

यामुळेच, मी तरी फारच समाधानात होतो.

स्वतः आनाच्या व आमच्या दोघांच्या या वाढल्या व्यापामुळे एक मात्र गोंधळ झाला होता. वहिनीपश्चात सुरुवातीस, घरातच अधिक काळ राहून, मोठ्या उत्साहाने आपल्या मुलांची आना जशी काळजी घेई, तशी 'रावजी ट्रस्ट' नि इतर लटपटी वाढल्यानंतर त्याला आता जमतच नसे. बिचाऱ्या भागीलाच त्याचं घर सांभाळावं लागे. तिच्या अंगावरच सारी मुलं असत, घरकामही असे.

आनाच्या गंगा-यमुना लग्नाच्या झाल्या होत्या. सदानंद-निर्मला शाळेत जात. पण त्यांची वास्तपुस्त करायला त्याला मुळीमुळीसुद्धा वेळ नसे. म्हणूनच एकेकदा आना तिरसटासारखा वागे. कधीकधी माझ्याकडे निःश्वास टाकून म्हणे, "बाहेर हे आपलं सारं झपाट्याने वाढतंय नि सारं सुरळीतही चाललंय सदू! पण घरचा पोरवडा पाहिला की मनाचा मोठा गोंधळ उडतो. हे सारं पुढे कसं होणार आहे कोण जाणे!"

आनाच्या त्या बोलण्यात अर्थ होता. घरात सगळं काही नीट असलं म्हणजेच माणसाला बाहेर काम करायला, व्यवहाराची ग्यादी धोरणाने, धडाडीने हलवायला जोर

येतो, हे खरंच ! तेव्हा, आनाच्या मनाचा त्या काळात कसा एकेकदा विलक्षण गोंधळ होत असेल, त्याची मला कल्पना करता येई. त्याच्या बेचैनीचं कसलं आश्चर्य वाटत नसे मला !

पण मग अखेर " ईश्वरेच्छा ! " एवढंच म्हणून निःश्वास टाकण्याशिवाय मला तरी त्यात दुसरं काही सुचत नसे. यशोदावहिनींची आठवण होऊन चुटपुट वाटायची, दुःखही दाटायचं ! पण आता त्याचा उपयोग काय ?

*

अशा माझ्या मनःस्थितीतच एके दिवशी मला रावजींच्या बायकोकडून बोलावणं आलं.

नि त्या भेटीतूनच, पुढल्या महिनाभरात, कित्येक अगदी अकल्पित गोष्टी आमच्या घरात घडत गेल्या.

तेथे मी पोचल्यावर मला चहा वगैरे देऊन रावजींची बायको माझ्याजवळ आली नि विनयाने दारासरशी जमिनीवर बसली. क्षणभर घुटमळल्यासारखं करून ती अखेर म्हणाली— " सदूकाका, गेले चारपाच महिने तुमच्याकडे एक गोष्ट सांगावी असा माझ्या मनात विचार येऊन जातोय. शेवटी आज ठरवलं— म्हटलं होईल ते होवो, एकदा बोलून तरी टाकावं. असली नाजूक बाब मी दुसऱ्या कोणाला सांगणार तुमच्याशिवाय ? "

मी साश्चर्यच तिच्याकडे एकदा कुतूहलाने पाहिलं, नि अबोलपणेच मान खाली वळवली. मुद्याचा मला काहीच थांगपत्ता लागेना.

तेवढ्यात तीच पुढे म्हणाली, " तुमचे आनाबापूच आमचं सारं यांच्या पश्चात चालवताहेत. आता या कुटुंबाशी, यापुढे नाही नाही तरी माधव सज्ञान होईतो, आणखी पंधरा तरी वर्षं, जिव्हाळ्याचा संबंध राहणार आहे त्यांचा !— पण मग—"

ती पुन्हा बोलता बोलता घुटमळली. मला तिचा एकूण रोख समजतच नव्हता— कोणामुळे काही बिघडलंय की काय ? बरं—आनाच्या हातून त्यांची कसली व्यवहाराची आगळीक होणं तर सुतराम् अशक्य ! मग ? तो प्रकार तरी कोणता ?

तोच, रावजींची बायको कुजबुजली, " आनांचं वय काय फार झालंय का हो ? सारे त्रेचाळिशीचेच तर आहेत ! "

तेव्हा मात्र, निमिषार्धात माझ्या मनात एक अंधुक कल्पना चमकून गेली. मी गोंधळलो...

रावजींची बायको पुढे म्हणाली, " घरात त्यांची मुलंही तशी लहान ! यशोदावहिनी गेल्या—फार फार वाईट झालं !— पण आता आनांचं फिरून लग्नकार्य नको का व्हायला ? "

*

येतो, हे खरंच! तेव्हा, आनाच्या मनाचा त्या काळात कसा एकेकदा विलक्षण गोंधळ होत असेल, त्याची मला कल्पना करता येई. त्याच्या बेचैनीचं कसलं आश्चर्य वाटत नसे मला!

पण मग अखेर "ईश्वरेच्छा!" एवढंच म्हणून निःश्वास टाकण्याशिवाय मला तरी त्यात दुसरं काही सुचत नसे. यशोदावहिनींची आठवण होऊन चुटपुट वाटायची, दुःखही दाटायचं! पण आता त्याचा उपयोग काय?

*

अशा माझ्या मनःस्थितीतच एके दिवशी मला रावजींच्या बायकोकडून बोलावणं आलं.

नि त्या भेटीतूनच, पुढल्या महिनाभरात, कित्येक अगदी अकल्पित गोष्टी आमच्या घरात घडत गेल्या.

तेथे मी पोचल्यावर मला चहा वगैरे देऊन रावजींची बायको माझ्याजवळ आली नि विनयाने दारासरशी जमिनीवर बसली. क्षणभर घुटमळल्यासारखं करून ती अखेर म्हणाली— "सदूकाका, गेले चारपाच महिने तुमच्याकडे एक गोष्ट सांगावी असा माझ्या मनात विचार येऊन जातोय. शेवटी आज ठरवलं— म्हटलं होईल ते होवो, एकदा बोलून तरी टाकावं. असली नाजूक बाब मी दुसऱ्या कोणाला सांगणार तुमच्याशिवाय?"

मी साश्चर्यच तिच्याकडे एकदा कुतूहलाने पाहिलं, नि अबोलपणेच मान खाली वळवली. मुद्दयाचा मला काहीच थांगपत्ता लागेना.

तेवढ्यात तीच पुढे म्हणाली, "तुमचे आनाबापूच आमचं सारं यांच्या पश्चात चालवताहेत. आता या कुटुंबाशी, यापुढे नाही नाही तरी माधव सज्ञान होईतो, आणखी पंधरा तरी वर्षं, जिव्हाळ्याचा संबंध राहणार आहे त्यांचा!—पण मग—"

ती पुन्हा बोलता बोलता घुटमळली. मला तिचा एकूण रोख समजतच नव्हता— कोणामुळे काही बिघडलंय की काय? बरं—आनाच्या हातून त्यांची कसली व्यवहाराची आगळीक होणं तर सुतराम् अशक्य! मग? तो प्रकार तरी कोणता?

तोच, रावजींची बायको कुजबुजली, "आनांचं वय काय फार झालंय का हो? सारे त्रेचाळिशीचेच तर आहेत!"

तेव्हा मात्र, निमिषार्धात माझ्या मनात एक अंधुक कल्पना चमकून गेली. मी गोंधळलो...

रावजींची बायको पुढे म्हणाली, "घरात त्यांची मुलंही तशी लहान! यशोदावहिनी गेल्या—फार फार वाईट झालं!—पण आता आनांचं फिरून लग्नकार्य नको का व्हायला?"

*

माझ्या सिध्या डोक्यात यातलं काही पूर्वी आलं नव्हतं, याचं मला आश्चर्यच वाटलं क्षणभर. तिच्या त्या बोलण्यात थोडं तथ्य होतं. पण—

तेवढ्यात ती पुढे स्पष्टच म्हणाली, " मी सांगू का माझ्या मनातलं ? मला आपलं सारखं सारखं वाटतंय, हे असे आलेले तुमचे–आमचे संबंध अधिक कायम स्वरूपाचे करावेत! म्हणजे असं, आमच्या — आमच्या लक्ष्मीलाच तुमच्या घरात यावी! आनांच्या संसाराला फिरून सौभाग्य आणावं ! "

का कोण जाणे, ती कल्पना तशी अनपेक्षितपणेच कानावर पडल्यामुळेही असेल कदाचित, पण मला एकदम दचकल्यासारखं झालं. मी गप्पच राहिलो.

" आता तेविसावं सरून चोविसावं निम्मं गेलं तिचं. कॉलेजपर्यंत शिकलीय. जाणती आहे—मुलांची काळजी घेईल नीट! परस्परांनाही सारं साजेसं आहे. " ती आपल्या मुलीच्या गुणांच्या तपशिलात शिरली.

तरी मी खाली मान घालून गपचूप ऐकत होतो.

शेवटी, क्षणभर माझ्या बोलण्याची वाट पाहून तिने विचारलं, " आनाचे धाकटे भाऊ तुम्ही ! तुम्हीच नाही आता लक्ष घालणार यात, तर दुसरं कोण आहे बरं त्यांना ! खरं ना ? कसं वाटतं तुम्हाला ? "

खरं म्हणजे, आनाचं तसलं लग्न समाजरीतीला धरूनच होतं. रावजींच्या बायकोने तो विचार मनात बाळगला, हेही तिच्या बाजूने रास्तच. आनाबापू " पोरवंडा " म्हणायचा कधी कधी, त्या दृष्टीनेही ते वावगं नव्हतं !

तथापि, तसली कसली कल्पना माझ्या मनाला कधीच स्पर्शूनही गेली नव्हती. आपली वहिनी म्हणजे यशोदावहिनी ! आता ती दुर्दैवाने गेली...! अशी त्या बाबतीतल्या माझ्या मनाच्या विचारांची एकच एक धोपटमार्गी चाकोरी झाली होती.

त्यामुळेच, रावजींच्या बायकोने विचारलेल्या त्या अकस्मात प्रश्नाने मी तर मनस्वी गोंधळून गेलो होतो.

*

तरी पण काही वेळाने थोडंसं घुटमळून मी तिला म्हणालो, " हा काही माझ्या कसल्या वाटण्याचा प्रश्नच नव्हे. आनाबापूच्या स्वतःच्याच विचाराची बाब आहे ती ! मी काय बोलू, सांगू ! "

" मग तेवढ्याचसाठी तर तुम्हांला आज बोलावलं मी, सदूकाका ! " आग्रही स्वरात ती म्हणाली, " तुम्हीच काढाल का त्यांच्याकडे हा प्रश्न माझ्या वतीने ? मला तरी दुसरं कोण ? घरातला मोठा म्हणजे आमचा गोपाळ, पण तो तसा बावळट ! आहेच सारं तुम्हाला ठाऊक. त्याच्याच नाकावरची माशी दुसऱ्यांनी उडवली पाहिजे ! तो हो कसला बहिणीचं लग्न जमवणार ! "

मला पडलेला एक मोठा पेचच होता तो ! तरी मी म्हणालो, " काढीन विषय

कधी तरी."

"कधी तरी नव्हे! आजच! इथून गेल्याबरोबर!" ती आग्रही स्वराने म्हणाली.

स्वतःच्या मनाचाच गोंधळ होत असताना, एका धाकट्या भावाने आपल्या मोठ्या कर्तबगार भावाचं दुसरं लग्न जमवणं म्हणजे—म्हणजे अशक्यप्राय, अवघडच गोष्ट!

पण तरी ती गोष्ट मी आनाकडे काढली, विषयाला एकदा तोंड फुटलं. अखेर आठवडा मधे गेला, योगायोग सारे जमत गेले. नि पंधरवड्याने आनाबापूचं ते दुसरं लग्न झालंही!

*

त्या वेळी आवश्यक तो छोटासा धार्मिक विधी झाला. नि आनाच्या आयुष्यातला दुसरा नवा कालखंड सुरू झाला.

मला नवी वहिनी आली. मुलांना घरात नवा आधार झाला.

एक गोष्ट मात्र माझ्या मनात हुरहुरल्याशिवाय राहिली नाही—"आनाच्या घरातला तो पूर्वीचा अंगवळणी पडलेला सुपरिचित जमाना निघून चाललाय! नवीनच एक अगम्य कारकीर्द तिथं सुरू होत आहे! तिथल्या जुन्या घरच्या संसारातली यशोदा आता गेली! आता ही आनाच्या घरात नवी लक्ष्मी चालून येत आहे!"

बेताबाताची शिकलेली यशोदावहिनी मी पाहिली होती. तिच्याबरोबर मी वागलो होतो!

लक्ष्मी मला तशी परिचित होती. त्या लक्ष्मीला मी दुरून खूप पाहिलंही होतं.

पण मग, आमच्या लक्ष्मी-वहिनीशी मात्र मला अजून वागायचं होतं!

*

रावजींच्या घरी, प्रथमच जेव्हा आनाच्या या नवीन संसाराबद्दल माझ्या मनात कल्पना शिरली, तेव्हाच जर एखादं कर्णपिशाच्च मला म्हणालं असतं, की बाबा रे, आणखी वर्षा-दीड वर्षातच तुझ्याबद्दल आनाच्या मनात किल्मिषं येणार आहेत, दोन वर्षांत तुझे नि आनाचे इतक्या वर्षांचे एकत्र व्यवहारसंबंध तटातट तुटून जाणार आहेत, प्रत्यक्ष आनाबापूच्या संसारातही धरणीकंपाचे छोटेमोठे हादरे बसत जाऊन येत्या सातआठ वर्षांतच निर्मला-सदानंद ही तिथली चिमुकली गोड पाखरं सैरभैर भिरभिरू लागणार आहेत! एवढंच काय, आणखीही किती किती चमत्कारिक घटना घडणार आहेत!

—तर त्या भविष्य सांगणाऱ्याला मी पटकन म्हणालो असतो, "तू एक अस्सल महागाढव आहेत! त्यातल्या एकावरही माझा काडीचादेखील विश्वास बसत नाही! आमच्या आनाला मी लहानपणापासूनच चांगला ओळखतो—एकाच आईच्या उदरी जन्म घेतला आहे आम्ही!"

पण मग हळूहळू, प्रत्यक्षच तसं सारं घडत गेलं, ते नाइलाजाने मला पाहावं लागलं. परिस्थितीपुढे मान तुकवावी लागली !

*

आनाच्या त्या लग्नाला रावजींच्या बंगल्यात मीच देवक ठेवलं होतं. आमच्या घरातल्या साऱ्या मुलांना भागाच्या ताब्यात जुन्या घरी ठेवलं होतं.

दुसऱ्या दिवशी लक्ष्मीवहिनीसह आनाने गृहप्रवेश केला होता. आमचं जोडपंही त्यांच्याबरोबर घरात त्यांचं स्वागत करायला हजर होतं.

आम्ही आत शिरलो तेव्हा खेळणारी मुलं कुतूहलाने पुढे झाली.

गतस्मृतींनी आनाचे डोळे किंचित पाणवलेले दिसले. गंगा-यमुना दारामागेच उभ्या होत्या. त्यांना त्या प्रसंगाचा अर्थ समजण्याइतका त्या मोठ्या होत्या.

पण सदानंद–निर्मला कावऱ्याबावऱ्या चेहऱ्याने तिथंच दूर घुटमळत राहिली होती. आनाला ते जरा चमत्कारिक वाटत होतं, तेव्हा मी त्या दोघांना हाका मारल्या. आनाने छोट्या निर्मलेला जवळ ओढली ! सदानंद माझ्या पाठीवर रेलून हलू लागला.

आपल्या नव्या जावेचं शास्त्रोक्त स्वागत करून माझी बायको चहा करायला घरात गेली. लक्ष्मीवहिनी काहीशा परकेपणे आतल्या दाराजवळच घुटमळत राहिली होती.

तिच्याकडे स्मित करून पाहत, छोट्या निर्मलेला आना म्हणाला, " या कोण माहीत आहेत का तुला, निमा ? "

माझ्या मांडीवरून सदानंदने पटकन उत्तर दिलं, " हो ! आमच्या नव्या आई ! "

" हं— " असा काहीसा उच्चार आनाने काढला असेल नसेल, इतक्यात लक्ष्मीवहिनीच पटकन हसत म्हणाली,

" नवी आई नाही बरं का मी ? मी नानी ! नानी म्हणायचं मला तुम्ही— "

*

त्या उद्‌गारांनी मी चपापलो. सदानंद आपलं चुकल्यासारखा भाव चेहऱ्यावर आणून आनाकडे पाहू लागला. निमा नानीकडे टवकारून पहात होती. पण मग, तेवढ्यात आना सारवासारवीच्या स्वरात मुलांना म्हणाला, " नानी आपल्याकडेच राहणार आहेत. हे त्यांचंही घर आहे. तुम्ही त्यांच्याशी बोलायचं, खेळायचं, फिरायला जायचं ! पुष्कळ–पुष्कळ शिकलेल्या आहेत हो, नानी ! तुम्हाला त्या शिकवतील, गोष्टी सांगतील, पुस्तकं वाचून दाखवतील ! "

इतका वेळ निर्मला काहीच बोलली नव्हती. का कोण जाणे, तिच्या डोळ्यांत पाणी साचलं होतं. ते पाहून मी तिलाही जवळ ओढलं. हसून तिचे गाल कुस्करले नि म्हणालो, " हे काय वेड्यासारखं रडूबाई ? या गंगायमुना ग कशाला ? त्या नानी फार चांगल्या आहेत हो निमा ! "

" खरंच पण—गंगा-यमुना नाहीत दिसल्या, आल्यापासून कुठं ? गेल्या कुठं त्या ?" जागचा उठून आनाबापू म्हणाला.

" काऽय आना ? या काय इथं आम्ही !" म्हणत दारापाठून दोघी पुढे झाल्या. गंगाचा चेहरा कावराबावरा झाला होता. यमुनाही तिच्या पाठीच उभी होती.

" अग सदूकाकांना नि मला चहा आण की !" आना हसून म्हणाला, " नि हे बघ यमुना, सदानंद, निर्मल, तुम्ही सारी आत घेऊन जा हं यांना ! आधी चहा होऊ दे त्यांचा. नि मग आपलं सगळं घर, मागली वाडी, सारं बरोबर फिरून दाखवा हं नानींना—"

मग लक्ष्मीवहिनी पुढे झाली. तिने सदानंदचा हात धरला. निर्मल नाखुषीने मागे मागेच होती. तिला वहिनीने उचलून घेतलं. तेवढ्यात मोठ्या माणसासारखं गंगा म्हणाली,

" चला हं नानी इकडून—"

चहा घेता घेता मंद स्मित करून आनाबापू मला म्हणाला, " हळूहळूच होणार ओळख—मग परिचय—होईल सारं नीट !"

मला खरोखरच काहीच समजत नव्हतं. मी अबोलपणेच चहा घेतला.

तरी पण–" त्या शिकल्याहेतही पुष्कळ पुष्कळ." ही आनाने नव्या वहिनीची करून दिलेली ओळख माझ्या मनाला खटकली होती; " मी नवी आई नाही. नानी म्हणायचं तुम्ही मला-" हा लक्ष्मीवहिनीचा स्वतःचाच अधिकारवाणीतला निर्णय माझ्या काळजाला कापून गेला होता.

*

फायनलनंतर दोन वर्षे गंगा घरीच बसली होती. तिच्यासाठी आनाबापूने आपल्या लग्नानंतर मला बरोबर घेऊन तीनचार स्थळं पाहिली नि अखेर एक चांगलं स्थळ पाहून, सहा महिन्यांतच, लग्न होऊन गंगा सासरी गेली.

माझ्याबरोबर आपल्या घरी जायला निघताच, भागेच्या गळ्यात पडून गंगा खूप रडली नि स्फुंदत म्हणाली, " भागाआत्या, आता आपल्या निमा-सदाचं ग कसं होईल ! "

आनाबापूने ते ऐकलं, तो झटकन पुढे झाला. गंगाला बाजूला घेऊन त्याने तिला थोपटलं, नि जरा करड्या आवाजातच भागाला मात्र तो म्हणाला, " तुम्हा लोकांच्या असल्या या करण्यानेच त्या लहान मुलांवर नसते वाईट परिणाम होतात. कोणी इथं रानात का पडली आहेत ! काय कमी आहे त्यांना ! म्हणे निमा-सदाचं कसं होईल !"

गंगा गेल्यावर, अलीकडे अलीकडे, आनाची परवानगी काढून यमुना, सदानंद, निर्मला माझ्याकडे एखाद्या रविवारी तरी येऊन राहत. कधी कधी भागाही त्यांच्या-बरोबर यायची. अशा वेळी आनाबापू व लक्ष्मीवहिनी तिथंच राहत किंवा धाकल्यावर घर सोपवून ' रावजी व्हीला 'मधेच निघून जात.

भागा कित्येकदा माझ्या कानांवर तिकडच्या काही गोष्टी घाली. मी अस्वस्थ होई. तरी मला अनेकदा वाटे, "या बायकांचे विचार नेहमी उगीचच पुढे पुढे, वाकडे-तिकडे धावत असतात." म्हणूनच तिच्या तसल्या तक्रारींकडे मी अधिक लक्षच देत नसे. स्वतःचं घर नसलेली बिचारी बालविधवा ती! अशा वेळी आमच्या आईची ती आठवण काढायची. यशोदावहिनीचा सहवास आठवायची नि मग बोलता बोलता गप्प होऊन मोठमोठ्याने हुंदके देऊन रहायची!

पण मी उलट त्यावर तिला म्हणायचो, "अग भागा—त्या दोघी खरोखरच खूप खूप चांगल्या होत्या. एक अन्नपूर्णा होती, दुसरी यशोदा होती! पण त्या आता गेल्या ना? तू बोलून त्या परत का येणार आहेत? आता लक्ष्मी आलीय ना आनाच्या घरात? मग तिकडे पाहिलं पाहिजे. तुला ते काही सहन होत नसेल, तर तू आपली माझ्याकडे येऊन राहा कशी!"

मग ती चरफडून एकदम बोलायची, "हो हो तर! तुला रे बोलायला काय? मी बरी येईन!! आणि मग, माझ्या यशोदेची ही पोरं तिथं काय करतील? नि तुझ्या लक्ष्मीवहिनीला खोलीत चहा कोण नेऊन देईल? आपल्या आनाच्या घरात चूल कशी पेटेल? ती खूप शिकलेली आहे बाबा!"

*

विषय असा पुन्हा मूळ पदावरच आला, की मनात कितीही वाईट वाटत असलं तरी, मला गपचूप कानावर हात ठेवून तोंडाला कुलूप घालावं लागे. ते भागच पडे. कसला प्रत्यक्षाप्रत्यक्ष भडका माझ्या हातून तरी उडायला नको होता मला. आना त्याचा तो पुरा समर्थ होता—स्वतःचा विचार ठरवायला, आचार करायला—

तिथून उठून मुलांबरोबर गप्पा मारायला व विषय बदलायला मी निघून जाई. पण त्यांच्या गप्पा ऐकता ऐकताही पुन्हा मन काळवून जाई.

एकदा तर निर्मलेने मला सांगितलं, "सदूकाका! अहो, आता ना, नानी एक नवा बाळ आणणार आहेत. आणखी त्या म्हणाल्या, त्या घाणेरड्या जुन्या घरात नाही राहणार त्यांचा तो बाळ. आणि ना एक नवंनवं छान छानसं घर बांधणार आहेत बापू नानींसाठी लौकरच! त्यातच तो बाळ राहणार. आपलं हे घर पडकं जुनं आहे, नानी म्हणतात. पण ते घाणेरडं आहे का हो, काका?! नाही ना?'

सदानंद मात्र असल्या काही गोष्टी माझ्याकडे कधी बोलत नसे. मोठा लबाड होता तो! त्याला काही विचारा, त्यात त्याची कसली तरी टाळाटाळ चालत असल्यासारखंच दिसत असे नेहमी मला.

असल्या सगळ्या अधूनमधून मिळणाऱ्या 'बातमीपत्रां'वरुन, तिथलं वारं कुठल्या बाजूला वाहतंय, याची मात्र मला निश्चित चुणूक मिळायची, नि कधी कधी मन अत्यंत अस्वस्थ व्हायचं!

असे दिवस जात असतानाच, तीनचार महिन्यांनी लक्ष्मीवहिनीला मुलगा झाला. त्याचं नाव 'श्रीधर' ठेवलं तिने.

*

मी जवळच राहत असल्यामुळे, 'अन्नपूर्णा कॉलनी 'मध्ये दुसऱ्या प्रतीने बहुतेक प्लॉट माझ्या मार्फतीनेच खपत आले होते. 'खरेदी एकरी नि विक्री वारावर' या हिशेबामुळे त्या प्लॉट विक्रीमध्ये आनाबापूला खूपच फायदा होत होता. तर प्लॉट-विक्रीमधूनच चारपाच नवीन बंगल्यांची फायदेशीर दरांची कॉन्ट्रॅक्टंही आम्हाला मिळाली होती.

असा आनाचा बराच फायदा झालेला असल्यामुळे, त्याने पुढलीही धोरणं बांधायला सुरुवात केली होती. जुन्या गावचं आमचं जुनं घर, वाडी यांच्या दरम्यानच्या भात-शेतीच्या नि ओसाड जागा, भराभर खरेदी करून ठेवायचा सपाटा चालवला होता. पैसा बँकेत तो कधीच रिकामा पडून ठेवीत नसे.

'अन्नपूर्णा कॉलनी 'मधल्या उरलेल्या प्लॉटसंबंधी आनाने बँकेमार्फत 'हाऊसिंग सोसायटी स्कीम' काढली होती. जागेच्या विक्रीच्या फायद्याबरोबरच घरबांधणीमधील आपला फायदा आपण दुसरीकडे फेकता कामा नये, तसा पैसा गमावून आपल्याला मुळीच चालणार नाही, असं आपलं व्यवहारतत्त्व तो वारंवार मला सांगे.

'निम्मे पैसे आधी, निम्मे साठ मासिक हप्त्यांमध्ये' अशा घोषणेवर आधारलेली तीन निरनिराळ्या आकार-सोयी-प्रतींच्या छोट्या बंगल्याची एक योजना त्याने काढली होती. वीस हजार, पंचवीस हजार व तीस हजार अशी आपापल्या ऐपतीप्रमाणे गिऱ्हाइकाने निवड करायची, ठरलेल्या सहा प्लॅन्सपैकी कोणताही एक आपल्या आवडीचा म्हणून निवडायचा, अशी मुख्य बैठक त्या योजनेसाठी ठरली होती.

'गाठी जास्त पैसे नसताना, तीन महिन्यांच्या आत राहायला स्वतःचा बंगला! पुन्हा दोनअडीच हजारांची सर्वांतही बचत होऊन, बांधकाम सामानाची जमवाजमव, बांधणीवर देखरेख, इत्यादी कसली यातायातही मुळीच नाही. शिवाय, महाग भाडे भरत राहण्यापेक्षा मासिक एकूण शंभर ते दीडशेचे हप्ते भरत राहिले, की मुदतीअखेर आपल्या स्वतःच्या बिनबोजाचा, बिनभाड्याचा बंगला तयार!' हा साहजिक मोह नि हमखास आकर्षण यात काही कमी नव्हतं! तेव्हा, कोणाच्याही पटकन् डोळ्यांत भरणारी नि भावनेला व व्यवहाराला तत्काळ पटणारी अशीच आनाची योजना होती.

त्यामुळे, चांगल्या चांगल्या सरकारी ऑफिसर लोकांची चौकशीसाठी आमच्याकडे सारखी रीघ लागली. ज्याला जो प्लॅन आवडेल व ज्याची जी ताकद असेल, त्याप्रमाणे तो निवड करीत होता. चतुर्थांश पैसे डिपॉझिट ठेवून आपला प्लॉट व आवडीचा प्लॅन तीन वर्षे राखून ठेवण्याचंही एक धोरणी कलम या योजनेत होतं. मात्र या सवलतीचा फायदा घेणाऱ्याला, इतरांच्यासारखे साठ हप्त्यांऐवजी घरबांधणीनंतर बेचाळीस हप्त्यांत

सर्व रक्कम पुरी करावी लागे. पुन्हा, त्यातले जे पाऊल मागे घेऊ इच्छित, त्यांनादेखील भरलेल्यांतली २/३ रक्कम परत घेऊन तो करार रद्द करण्याचीही सवलत अनाने ठेवली होती. त्याचा आत्मविश्वास दांडगा होता.

बुद्धीला व व्यवहाराला पेलणाऱ्या असल्याच साऱ्या तपशिलामुळे, आनाबापूची ती एकूण योजना केवळ सहा महिन्यांच्या आतच अत्यंत लोकप्रिय झाली होती नि वर्ष-दीड वर्षांत सारे प्लॉट भरून संपूनही गेले होते. काहींवर बंगले बांधून आम्ही गिऱ्हाइकांच्या ताब्यातही देऊन मोकळे झालो होतो.

या साऱ्या व्यवहारांच्या यशस्वितेतून आमचा कॉंट्रॅक्टचा मूळ धंदाही भरमसाठ वाढला होता. स्वतः आनाला तर लोकांच्या भेटीगाठीनंतर दुसरा वेळच मिळत नसे. मलाही एकट्याला एकाच वेळी सगळीकडे देखरेख करणं अशक्य झालं होतं. तेव्हा आमचे चौघे मुकादमच आता एकत्र व्यवस्थापक झाले होते. आनाबापूने त्यांना शंभर शंभर व मला दोनशे रुपये आपणहूनच मासिक पगारवाढ केली होती. मजूर-नोकरांची संख्या नि कामं सारखी वाढतच होती. आवांच्या वेळच्या दसपटीने सारं खटलं वाढतं होतं...

अशा साऱ्या समृद्धीच्या त्या दिवसांत नि लक्ष्मीवहिनीचा श्रीधर वर्षभराचा झाला असतांना, माझ्या आयुष्यात एक चमत्कारिक प्रसंग घडून आला.

आनाची नि माझी कधी नव्हती ती थोडीशीच बाचाबाची त्या वेळी झाली.

पण त्यानंतर मी मात्र कायमचाच भयंकर अस्वस्थ झालो.

*

एक काम संपवून दुसरीकडे जायला आना मोटारीतून निघाला होता. तेवढ्यात मधेच थांबून मला तो म्हणाला, " अरे हो—सदाशिव, तुझ्या वहिनीने तुला कसला प्लॅन पाहायला बोलावलंय बा! तो जाऊन पाहा हं आधी—आजच. मग त्यावर आपण बोलू उद्या."

हातातली मुख्य कामं आवरल्यावर, सायकलीवरून मी आमच्या जुन्या घरी पोचलो. कशाबद्दल? याचं मनातलं कोडं, जाताना, सायकलीच्या चाकांबरोबरच चक्राकार फिरत होतं!

मी जाऊन पोचलो, तेव्हा लक्ष्मीवहिनी श्रीधरला खेळवीत होती. सदानंद-निर्मल शाळेत गेली होती. भागी घरात चुलीजवळच काही करीत होती.

मी आत जाताच श्रीधरचा हात आपल्या हाती धरून तो वर करीत वहिनी म्हणाली, " ते बघ तुझे सदूकाका आले! हं—सांग आता त्यांना सगळं— "

मी कपाळाचा घाम पुसला नि पुढे आलेला त्याचा हात-चिमणा हात हाती घेऊन तो हळूच हलवला नि लाडात म्हणालो, " हं काय रे बबड्या! काय सांगायचा विचार आहे तुझा, तुझ्या काकाला??"

" अहो, श्रीऽऽधर आहे तो!" काहीशा ठसक्यामधेच नानी उद्गारली, " एक नवा बंगला हवाय म्हणतोय तो आपल्याला आता—"

त्यातील सुप्त उग्र दर्पानं माझ्या डोक्यात एकदम एक झिणझिणीच येऊन गेली. नवा बंगला मागणाऱ्या केवळ वर्षाच्या चिमुरड्या श्रीधरची वकिली ही आमची लक्ष्मीवहिनी करीत होती!

*

तरी पण मी माझं मन आवरलं नि संथपणेच म्हणालो, " हं हं!—आत्ताच आना भेटला, तेव्हा तसं काहीसं म्हणाला खरं!—कसला प्लॅन पाहायला बोलावलंय तुम्ही मला?"

लक्ष्मीवहिनीने मग कमरेला किल्ल्यांचा घोस घेऊन गोदरेज कपाट उघडलं नि अगदी पूर्ण तयार केलेला नवीन बंगल्याचा एक पास झालेला शिक्क्याचा प्लॅन तिने माझ्यापुढे केला.

आधी कित्येक दिवस कल्पना, फेरफार, विचारविनिमय असं सारंच चक्र पुरं झाल्याशिवाय आमचे असले पक्के प्लॅन कधीच तयार होत नसतात, हा माझा तरी इतक्या वर्षांचा अनुभव. मग स्वतः आनाबापूने पाहिला नसेल का तो? तर मग, मला इतक्या दिवसांत कधी यातलं काहीच कसं तो बोलला नाही? त्याच गोष्टीची झालेली जाणीव, त्या क्षणी ते ऐकता ऐकता माझ्या मनात एकदम खोल खोल खुपली.

तेवढ्यात लक्ष्मीवहिनीच पुढे म्हणाली, " हा प्लॅन पास होऊन आलाय—जागाही नक्की झालीय!"

" प्लॅन पास झाला? केव्हा?? जागाही ठरली? कुठली??" माझ्या तोंडून जरा भावनावेगानेच ते प्रश्नोद्गार एकदम बाहेर पडले. कारण तशा प्रकारे माझ्या विरुद्ध एक गुप्त कट झाल्यासारखंच वाटून, मला आता मनात खूप खूप रागच आला होता.

पण नेहमीचं बेरकं स्मित करीत, लक्ष्मीवहिनी त्यावर संथपणे म्हणाली, " का? चार दिवस झाले की! यशोदा कॉलनीचा ' नवग्राम 'ला लागूनचा भाग आहे ना, त्यातलाच सव्वाहजार वारांचा तो रस्त्यालगतचा प्लॉट आहे नाही का? आमच्या ' रावजी व्हीला 'जवळच येतो की तो! तीच बंगल्याची जागा—"

" ते प्लॉट्स सध्या आपल्या दोस्तांमधेही विकायचे नाहीत म्हणावं"— असं एकदा माझ्या एका मित्राने तो प्लॉट मागितला असताना त्याला उत्तर द्यायला मला आनानेच सांगितलं होतं. " अधिक फायदा पुढे मिळेल" असा आपला त्याबाबतचा कयास त्याने दोन महिन्यांपूर्वीच माझ्याकडे बोलून दाखवला होता.

मग तोच आना आता एकाएकी तो बेत बदलतो, त्यावरल्या बंगल्याच्या पक्क्या प्लॅनपर्यंतही तो गुपचूप जाऊन ठेपतो, याचा मला का राग येऊ नये? अगदी आजपर्यंतच्या आम्हा भावा-भावांमधल्या माझ्या नित्य अनुभवाला ते पेलेना, सोसेनाच मुळी!

*

मी तसा गप्प असतानाच यमुनेने कॉफी आणली. ती घेत असतानाच वहिनीने पुढे प्रश्न टाकला, " ते असो. आता ठरून गेलंय सारं. पण मग, आता...किती दिवसांत बंगला उठू शकेल तिथे ? "

माझ्या मनातल्या आधीच्याच रागात त्या तिच्या नव्या उद्धट प्रश्नाची आणखी भर पडली. तेव्हा मीही एकदम टोमण्यानेच म्हणालो, " एका दिवसात तरी नक्कीच नाही ! "

माझ्या उत्तराने वहिनी प्रथम क्षणभरच चपापली. पण जसं काही काहीच झालेलं नाही अशा स्वरात तिने विचारलं, " तेवढं समजतं मला. पण मग, एका महिन्यात ? दोन महिन्यांत ?? अंदाज सांगा ना ! "

माझा टोमणा माझ्यावरच उलटवण्यासाठी तिने ते सारं मला थांबत थांबत विचारलं होतं. मोठी धोरणी बाई ती !

" तसं म्हटलं तर आणखी एक वर्षही जमणार नाही. " मी उत्तर दिलं, " तो काय पत्त्यांचा बंगला आहे थोडाच, वहिनी ? हाती घेतलेली, आधीचीच फायदा देणारी चिक्कार कामं तुंबलेली आहेत, लोकांची— "

" एवढा मोठा धंदा चाललाय—श्रीधरच्या वडिलांचा ! तो काय पत्त्याचे बंगले बांधायचा ! ते ठाऊक आहे मला ! " तरीही लक्ष्मी खोचक हसून मला संथपणेच म्हणाली, " पण मग त्यांचे लहानमोठे नोकर करतात तरी काय रोज ? "

तेव्हा मात्र मला अगदी सात्त्विक संतापच आला. मी जरा तिरमिरीने म्हणालो, " नोकर म्हणजे माणसंच असतात ना ? जरा जागेवर स्वतः जाऊन पाहिलंत म्हणजे समजेल, दिसेल ! आमची माणसं कसं मरेमरेतो काम करतात अहोरात्र, ते घरी बसून काय समजणार ? जीव मुठीत धरावा लागतो ! "

" असं ? नि तरी देखील, आपल्या प्रत्यक्ष मालकाचाच बंगला बांधायलाही त्यांना एक वर्ष लागणार अं ? " वहिनीच्या बोलण्यात ओतोप्रोत तोरा होता, त्या स्वरात मला बोचणारी खोच होती— " तर मग, असले नोकर असले-नसले सारखेच ! "

लक्ष्मीवहिनीचं ते बोलणं सिधं वाटावं इतकंच मुद्द्याला धरून होतं, पण ती कोणाला नि कशाला टोमणा देत होती ते न समजण्याइतका मीही काही दूधखुळा नव्हतो.

मनात तिरमिरलेला राग कदाचित नाहक आणखी भडकायचा, म्हणून स्वतःला अतिशय प्रयत्नाने आवरूनच मी म्हणालो, " ते काय ते मालकाने—आनाने ठरवायचं ! तो तुमचा—आमचा इतरांचा प्रांत नाही, बायकांची बाब नाही ! "

ते बोलता बोलता, मी जागचा एकदम उठलो हे पाहताच प्रसंग जाणून, नाटकी विनयाने लक्ष्मीवहिनी म्हणाली, " बरं बाई ! आम्हाला आमच्या हौसेबद्दल बोलण्या-इतकाही कसला मालकी हक्क नाही म्हणायचा ! ठीक— ठरवतील तर मग, त्यांचंच ते काय ते ! राहू द्या तो प्लॅन—तुम्हांला तरी उगीच कशाला आता दाखवायचा तो ? "

काही न बोलताच, मी सायकलसह रस्त्यावर येऊन उभा राहिलो. माझ्या मनाची

अंग आग झाली होती नुसती!

भागाकडून, मुलींकडून आजवर जे अप्रत्यक्षच कानी पडे, त्याची चुणूक, त्याचा अकस्मात मिळालेला प्रत्यक्षच फटका अनुभवून मी त्या दिवशी तसा घरी परतत होतो.

*

आनाच्या घरी, कसला हासभासही नसता, घडलेल्या त्या अनपेक्षित प्रकाराने मी खूपच चिडलो. अगदी अस्वस्थचित्त झालो. फार फार खिन्न झालो.

खरं म्हणजे आपल्या बालिश गप्पांमधे अगदी पंधरवड्यापूर्वीच या बाबतीत निर्मलेने मला आगाऊ कल्पना दिली होती! त्या वेळी चिरमुडी निमा म्हणाली होती, "नानी मला सांगत होत्या, सदूकाका, माझ्या वडिलांनी माझं नाव लक्ष्मी ठेवलं, मी त्यांच्या घरात आले नि मग त्यांच्या घरात खूप खूप पैसा आला. आता तुमच्या वडिलांच्या घरात मी आले, त्यांनीही माझं नाव लक्ष्मीच ठेवलंय! मग, माझं नावच लक्ष्मी आहे. लक्ष्मी म्हणजे श्रीमंती! मी तुमच्या वडिलांच्या घरात शिरले नि तेव्हापासून लक्ष्मी त्यांच्या घरात आली! ती रोज सारखी वाढतेय! हल्ली मोटार कशी छान घेतलीय त्यांनी पाहिलीस ना? पूर्वी कधी होती का तुमची तशी?? आताच नवीन घरांची कामं किती चालली आहेत! लोकांना रोज बंगले विकताहेत, बापू, जागा विकताहेत! आणि लोक त्यांना पुष्कळ पुष्कळ नोटा रोज देताहेत. आता माझ्या बाळाचंही नाव मी श्री-घर ठेवलंय. किती छान आहे नाव, नाही? श्री म्हणजेसुद्धा लक्ष्मीच! श्रीमंतीच! समजलं? त्याच्यासाठी आता नवं नवं खूप मोठं घर बांधायचंय! तिकडेच मग राहायला जायचं. श्रीघर मोठा झाला ना, की तो पण खूप खूप पैसा मिळणार आहे. खूप खूप मोठी घरं बांधणार आहे– मोटारी घेणार आहे. पुष्कळ पुष्कळ नोकर ठेवणार आहे. त्याच्या वडिलांचे आहेत ना, त्यापेक्षा खूप! हुशार! मोठ्या पगाराचे!"

त्या दिवशी ते ऐकताना मी निर्मलेला पोरकट म्हणून वेड्यात काढलं होतं. तिच्याच त्या कल्पना असं वाटून मी गोंधळलो होतो. पण त्या दिवशी जितका चमकलो होतो, त्याच्या लाखपट अधिक तो प्लॅन पाहून घरी परतताना मी आज दचकलो होतो.

मी म्हणजे आनाचा केवळ एक नोकर! ही कल्पना मला प्रथमच लक्ष्मीवहिनीच्या तोंडाने भेटायला आली होती. ती भेसूर भुतासारखी मला सारखी सारखी भेडसावीत होती. त्यामुळेच, साऱ्या परिस्थितीची व भवितव्याची एकदम झालेली ती दुःखद कठोर जाणीव— तिच्या सहस्र इंगळ्यांसह— माझ्या मनाला काही केल्या सोडतच नव्हती.

तरी नाइलाजाने मन आवरून–सावरून मी दुसऱ्या दिवशी, नेहमीसारखाच, अंगावर पडली कामं नित्याप्रमाणे पार पडायला, एका बंगल्याच्या तक्तपोशीच्या कामावर देखरेख करायला गेलो.

*

संध्याकाळी आना आपल्या मोटारीतून तिकडे आला.

एकेका बांधकामाकडे पाचच मिनिटं तो तसा यायचा. पण त्याच्या प्रश्नांचा चौफेर झपाटा नि अचूक भडिमार एकदा झाला, की तेवढ्याच वेळात तिथलं एकूण झालंय काय, होतंय काय नि व्हायचंय काय, याची त्याला पुरी कल्पना यायची—त्याच्या त्या धूर्ततेची व हुशारीची मला मोठी गंमत वाटायची नेहमी. अभिमानही वाटायचा.

पण त्या दिवशी त्यातलं काहीच घडलं नाही. एकटा एकटाच तो इकडेतिकडे गप्प गप्प फिरला नि आला तसाच पटकन आपल्या मोटारीकडे माघारी वळला.

माझ्या बदललेल्या मनाचा तो खेळ असेल कदाचित, पण मला त्यामुळे उदास वाटलं मनामध्ये. वाटलं, आमचा आना बदलला!

तोच, मोटारमधे पाय टाकता टाकता, थबकून त्याने मला हाक मारली, " अरे सदाशिव— "

मी जवळपासच होतो. पुढे झालो.

" तू घरी असं काय सांगितलंस काल? नवं घर बांधायला काय एक वर्ष लागतं आपल्याला ? " आनाने मला हळूच विचारलं.

मी तत्काळ ओळखलं, त्याचं नि वहिनीचं घरात माझ्या भेटीबद्दल नक्की तपशील-वार बोलणं झालेलं असावं नि ते त्यांनी नक्कीच काही वगळून, काही वाढवून त्याला सांगितलेलं असावं.

तरी मी संथपणे म्हणालो, " हो! पण मग, त्याच्या आधी नि त्याच्यानंतरही मी काही काही सांगितलंय लक्ष्मीवहिनींना ! "

" अरे, पण बायकांबरोबर अशी रागारागी करून रे कसं चालेल ? होत असते... एखादी चूक त्यांची ! " केविलवाणं हसत आना म्हणाला, " खरं म्हणजे मी म्हणालो होतो हो त्यांना की—सदाशिवला सांगितलंत तर तो तीन महिन्यांत बंगला उठवून देईल ! बरं चला ! माझं चुकलं ! "

" पण मग, आना, त्यांच्या तोंडून आपले बेत केव्हापासून मला सांगायला लागलास तू ! " जरा घुश्शातच मी त्याला रोखठोक विचारलं. तो एकदम दचकला.

*

त्या वेळी आनाबापूच्या चेहऱ्यावर अनेक विचारांचा एकच एक गोंधळ चालेला मला दिसला. तो चपापून म्हणाला, " म्हणजे ? ? "

मी थंडपणे म्हणालो, " अरे—एखाद्या गिऱ्हाइकाशी नुसतं पहिलं-वहिलं बोलणं झालं, तरी तेव्हापासून त्याबद्दल, त्याच्या आवडीनिवडीबद्दल, त्याच्या अखेरच्या प्लॅनबद्दल—मी आजवर तुझ्या तोंडून ऐकत आलोय ! मग, हे तर—तुझ्या शेवटचं घर ! वहिनी म्हणाल्या मला तसं !—तर सांग—तो प्लॅन, ती जागा—कधी, कोणी, कशी रे ठरवली, आनाबापू ? सरळ सरळ उत्तर दे पाहू ! असला कसला आडपडदा

नाही आवडत मला मुळीच!"

आनाबापू किंचित काळ गोंधळला, गप्प झाला. मग चाचरल्या स्वरात म्हणाला, "का? मीच! नि श्रीधरच्या आईनेच! गेल्या आठवड्यातच सहज ती कल्पना निघाली. चेअरमनना नि चीफ ऑफिसरना सांगून, मीच पास करून घेतला प्लॅन चार दिवसांत! यात तसं काय रे चुकलं माझं?"

"छे छे! आनाबापू, तुझा तू मालकच आहेस! तुझं तर काहीच चुकलं नाही!" मी एक निःश्वास टाकून त्याला डिवचलं, "लक्ष्मी वहिनींचंही त्यात काही चुकलं नाही! असं हे तुला विचारण्यात, बोलण्यात माझंच नोकरमाणसाचं सगळं चुकलं! माझी पायरी मी ओळखली नाही, हेच माझं चुकलं! मी तुझा केवळ एक मूळपासूनचा नोकर आहे, हे मी असं एकदम विसरायला नको होतं, आना!-- पण मग-- ते लक्ष्मीवहिनींच्या तोंडूनच ऐकायची मात्र माझी इच्छा खासच नव्हती!-- म्हणूनच माझं थोडं पित्त खवळलं. जो प्लॉट तू पुढल्या फायद्यासाठी माझ्या मित्राला नाकारलास, तोच एका क्षणात या बंगल्यासाठी मात्र तू निवडू शकलास! योग्यच आहे! तुझा तू समर्थ मालक आहेस! कोण हात धरील तुझा? म्हणून म्हणतो, सारं सारं जे काही काही चुकलंय ते माझंच!"

"अरेऽ— अरेऽ— अरेऽ, पण सदू, माझं ऐकून घे —" अतिशय गोंधळून, चाचरत चाचरत, रदबदली करण्यासाठी आना बोलण्याचा थांबून थांबून प्रयत्न करीत होता.

पण मीच त्याला एकदम थांबवून म्हणालो, "जाऊ दे, आना, काही सांगू नकोस! पण मग, आता गेल्यावर लक्ष्मीवहिनींना मात्र माझा एक निरोप सांग. म्हणावं, नोकरांनाही एक लहानसा चिमूटभर जीव असतो. मालकाबरोबर, मालकाच्याच फायद्यासाठी— मालकाचाच आधी विचार करून-- बांधकामाचे काही कार्यक्रम आधी आखलेलेच असतात! ते आधी पार पाडणं हेच नोकराचं पहिलं कर्तव्य! आणि मुख्य म्हणजे, नोकराला पगाराबरोबरच योग्य तो मानही मिळायला हवा असतो! नुसता पैसाच कोणी बसून खात नाही म्हणावं!"

"छेः छेः छेः! उगीचच डोक्यात अशी राख घालून घेतोयस तू ही— सदू!" आनाबापू मोटारीत शिरून बसता बसता मला समजावणीच्या स्वरात म्हणाला, "बोलू आपण मग--"

त्याचा ड्रायव्हर दार बंद करीत होता. त्या परक्या नोकरासमोर आणखी आपली भावाभावांमधली आपसातली ती कुरबूर नको, तिची बाहेर आणखी वाच्यता व्हायला नको, म्हणूनच केवळ पटकन् मानावर येऊन माझं मन दडपून मी गप्प झालो.

तरी पण त्या क्षणी मनातल्या मनात मात्र मी अगदी ओक्साबोक्शीच रडत होतो.

*

त्या दिवशीच्या त्या बोलण्यानंतर आनाने फिरून कधीच त्या प्लॅनबद्दल अगर पुढल्या प्रत्यक्ष बांधकामाबद्दल माझ्याकडे बोलणं काढलं नाही. पण तसं मग त्याला कारणच उरलं नव्हतं.

कारण, त्या बंगल्याचं बांधकाम सुरूही झालं होतं!

म्हणजे, लक्ष्मीवहिनी तिच्या माहेरी गेली होती. तिला पुन्हा तीनचार महिने गेले होते. 'रावजी व्हिला 'मधे असल्या असल्याच त्या 'नवग्राम '–' यशोदा कॉलनी ' यांच्या सीमेवरील ठरल्या प्लॉटवर स्वतः लक्ष्मीवहिनीच्याच देखरेखीखाली त्या नव्या बंगल्याच्या बांधकामाला सुरवातही झाली होती.

अलीकडे आमच्या हाताखाली नाही नाही तरी बारा-तेरा मुकादम व बारा-तेरा कामगार-संच होते. त्यांच्यातल्याच एका चाकवगार मुकादम–संचाची आनाबापूने त्या कामावर परस्परच, मला नकळतच, नेमणूक करून दिली होती.

ते बांधकाम भराभर वर चढू लागलं होतं. जाता-येता, कित्येकदा, लक्ष्मीवहिनी स्वतःच त्या कामावर देखरेख करताना मला आढळे. त्या मनःस्थितीतही, तिचा तो उत्साह, महत्त्वाकांक्षा, ईर्षा, चिकाटी पाहून मला तिचं कौतुकही वाटे. आनाबापूने मात्र तो विषयच साफ बंद करून टाकला होता.

दोन निरनिराळ्या घरांमधे आम्ही पूर्वीच राहू लागलो होतो. तरी पण, आजवर आम्हा दोघां भावांमधे कधी कसली भिंत उभी राहिली नव्हती! पण ही एकूण घटना मात्र मला आता आनाबापूपासून विटेविटेने दूर दूर नेत चालली होती. आमच्यामधे एक अदृश्य भिंत उभारली जात चालली आहे, असा मला तरी अलीकडे रोजच्या रोज भास होऊ लागला होता. त्यामुळे माझं मन अधिकाधिक खिन्न होत जात होतं.

*

नवा बंगला पूर्ण होत आला नि त्याच सुमारास त्या कामावर योजलेला आमचा तो मुकादम जातायेता कधी कुठे एकदा वाटेत मला भेटला.

त्या वेळी हसत हसत त्यानेच माझ्याकडे प्रश्न केला, "काय काकाजी शेठ? झालं की नाही बंगल्याचं काम पुरं! अजून चार महिने पण पुरे व्हायचे आहेत! आता काय, दहाबारा दिवसांत रंगरंगोटी! नि श्रीधरशेठच्या दुसऱ्या वाढदिवसाला वास्तुशांती पण!"

त्याच्या तसल्या अकस्मात हिणवण्याच्या उद्गारांनी मी भयंकर चमकलो. मला थोडा संशयही आला, की ही या प्राण्याची 'बांधली शिदोरी 'च आहे. म्हणून मग वर वर हसतच पण खोचून मी त्या मुकादमाला विचारलं, "काय रे? खरं खरं सांग! हे तुझ्याच मनचं सारं कौतुक की, आणि कोण म्हणालं, म्हणतं, तसं!!"

माझ्या हाताखाली काम करीत असलेला तो! मग मात्र तो हळूच हसला नि मला म्हणाला, "नव्या वहिनीबाई पण परवा म्हणत होत्या—सद्भावजीला म्हणावं आता

घ्या! वर्षं लागेल! वर्षं कशाला लागतंय? मनात असलं, नि सारं सिद्ध असलं की सगळं काही नि हवं तेव्हा जमतं! निदान मला तरी हवं ते नि हवं तेव्हा तयार करून घ्यायची सवय आहे, मुळापासून!"

त्या नोकर माणसाला मी आधी विचारलं होतं तेच मुळी जास्त होतं. तोच माझा आधी मूर्खपणा झाला होता.

तेव्हा, घरच्या बाबतीतलं अधिक काही न बोलता, मी पुन्हा सायकलवर टांग टाकली नि त्याच्यापासून दूर निघून गेलो—

*

रावजींची लक्ष्मी माझी लक्ष्मीवहिनी होण्यापूर्वीपासूनच मी तिला ओळखत होतो. त्या थोड्याशा अनुभवानेही मला त्या वेळी वाटायचं, हिची वृत्ती थोडी ताठर, स्वयंनिष्ठ आहे. गोपाळबरोबरच्या तिच्या वागणुकीवरूनही मला त्या वेळी वाटे, हिला दुसऱ्याची कसली किंमत नाही, पर्वा नाही. इतरांवर हुकमत चालवणं, त्यांच्यावर सत्ता गाजवणं, त्यांचा सहजासहजी उपमर्द–पाणउतारा करणं, याचं हिला नैसर्गिकच आकर्षण!

पण मग, गेल्या तीन-साडेतीन वर्षांतील, आमच्या कुटुंबामधील व्यक्ती या नात्याच्या तिच्या अधूनमधूनच्या सहवासातून हळूहळू मला होत गेलेलं तिचं हे नवं ज्ञान! ते सारंच अकल्पित! तिला एकप्रकारे आम्हा सर्वांचा हेवा, मत्सरच वाटत असावा, तिला एक प्रकारच्या कुत्सित अहंगंडानेच पछाडलेलं असावं, असंच मला वाटू लागलं होतं. आनासुद्धा दुबळा होऊन तिच्या आहारी अधिकाधिक जात असावा असंही मला वाटू लागलं होतं.

आनाच्या वैभवाची, अलीकडल्या तीनचार वर्षांत, चारी बाजूंनी झपाट्याने होत गेलेली व होत असलेली बेफाट प्रगती!—ती वास्तविक कोणालाही समाधानच देणारी होती. मग, मी तर त्याच्या खांद्याला खांदा भिडवून काम करणारा त्याचा सहकारी, त्याचा सहोदर, सख्खा भाऊ! मला त्या परिस्थितीबद्दल आनंद नि आनाबापूबद्दल आदर–अभिमान का बरं वाटू नये?

आनाने आधी दुःखं भोगून, जबाबदाऱ्या स्वीकारून, शिरावर कर्जाचे डोंगर पेलून जे केलं होतं, जे पूर्वी पेरलं होतं, तेच आता अनुकूल परिस्थितीचा त्याच्यावर पाऊस पडून अमाप उगवलं होतं, उगवत चाललं होतं, त्याचे कणगे वैभवाने भरत चालले होते!

पण म्हणजे, तो काही भाताच्या राशी देणारा वार्षिक पाऊस नव्हता. त्याच्यासाठी साऱ्यांची पुण्याई, साऱ्यांचे श्रम नि आनाबापूची धोरणी चिकाटी, बुद्धिमत्ता वर्षानुवर्षे खर्ची पडत गेली होती! त्याच जाणिवेने मला मनात वाटलं, 'आनाबापूच्या आजच्या या यशाचे, आजच्या या वैभवाचे निदान, त्या मागल्या त्या पुण्याईचे नि अविश्रांत श्रमाचे तरी आम्ही सारेच वाटेकरी आहो! ती पुण्याई आमच्या अन्नपूर्णामातोश्रींची! ती पुण्याई— प्रेमळ, सोशिक, साऱ्या माणसांची मनं अहोरात्र, अखेरपर्यंत सांभाळून

राहिलेल्या आमच्या यशोदावहिनीची ! तसंच म्हटलं तर थोडीफार ती माझीही पुण्याई, असं का वाटू नये मला ?'

नि असं सारं असताना, त्यांचंच ते सारं श्रेय, या उथळ मनाच्या, कानामागून येऊन तिखट झालेल्या लक्ष्मीवहिनीने आपल्या स्वतःच्याच पायगुणाला ओढून घ्यावं ? आनाबापूच्या निर्मल पोराबाळांच्या अपक्व बालिश मनावर, त्याच अनाठायी अहंमन्य कल्पनेचा दाब आणून स्वतःचा तोरा वेळी-अवेळी मिरवावा नि त्यांचा कोंडमारा करावा, हसत हसतच पण प्रत्यक्षाप्रत्यक्ष माझाही असा अपमान करावा, हे सारं मला कसं पेलावं ? कसं सहन व्हावं ?

*

तरीपण, लक्ष्मीवहिनी तशी मोठी कुशल ! बोलण्यावागण्यात तर फारच पटाईत. शब्द एक, धाटणी दुसरी, अर्थ तिसरा, अशीच बोलण्या-वागण्याची नैसर्गिक कला व चतुराई तिला अवगत झाली होती. दोन निरनिराळ्या भूमिका कौशल्याने नटवणं-वटवणं तिला कधीच अशक्य नव्हतं. तसल्या वागणुकीने आनाबापूसारखा सीधा आदमी फसावा, त्याची खऱ्या वस्तुस्थितीबद्दल सहज दिशाभूल व्हावी, आमची हृदयं रक्तबंबाळ होत असतानाच, त्याला उलट आमच्याबद्दल मनात राग यावा, "या लोकांनाच माझा हा नवा संसार पाहवत नाही," असाच उलट त्याचा प्रामाणिक समज व्हावा, या कशात कसलं आश्चर्य मुळीच नव्हतं. जणू धावतच घरात चारी बाजूंनी शिरणारं आपलं ते वैभव– ती लक्ष्मी ! आपल्या या लक्ष्मीच्याच हाताला धरून आत शिरली, या लक्ष्मीच्या नि श्रीधरच्या पायगुणाचाच हा सारा प्रभाव नि परिणाम, असंही त्याला खरोखरी वाटू लागावं, हेही काही नवल नव्हतं.

त्यामुळेच माझ्या मनाला आग लागली होती, 'काय विचित्र गंमत पाहा— यशोदावहिनीबरोबरचा आपला साफ निराळ्या स्वरूपाचा गत-संसार आनाबापू किती झपाट्याने विसरून गेला !'

*

होय ! वैभवपूर्ण अशा या नव्या नवलाईच्या संसारात अशा प्रौढपणीही तो किती झटकन् रमून-रंगून-गुंगून गेला !

यशोदावहिनीभोवती प्रशांत, सोज्वळ, सहजसुंदर वातावरण होतं, पण त्याहून काही-तरी न्यारा, निराळा, रोमांचक जमाना लक्ष्मीवहिनीने आनाबापूभोवती मांडला होता ! आजपर्यंत त्याला न मिळालेलं ते एक प्रकारचं उत्तेजक, मादक असं पेय होतं ! एका नव्या वारुणीचा तो प्याला आनाला हस्तगत झाला होता ! त्याचंच मनसोक्त पान त्याला बेभान करून सोडीत होतं !

घरातल्या स्त्री-पुरुष दोन्ही बाजू वैभवाच्या भावी रोमहर्षक कल्पनाचित्रात रंगू

लागल्या, की मनोवारू जोरजोराने चौखूर धावू लागतात! आपली बायको आपल्या मनच्या साऱ्या महत्त्वाकांक्षा सहजतेने जाणते, पेलते, किंबहुना, ती आपली एक मदतनीस होण्याइतक्या वैभवलोलुप, महत्त्वाकांक्षी धमकेची स्त्री आहे! ही जाणीव म्हणजे पुरुषाच्या मनाचं न्यारंच 'टॉनिक' ठरतं! आजपर्यंतचा तो त्याच्या मनाचा अखंड अतृप्त मोह! त्याच्याच तसल्या नवख्या प्रत्यक्ष परिपूर्तीने त्याला अगदी खरं खरं कृतकृत्य वाटू लागतं!

पत्नी हीच त्याच्या त्या नव्या आनंद–समाधानाची अखंड निर्झरिणी ठरते! म्हणूनच, तिच्याबद्दलची एक अमर्याद, अद्भुत आपुलकीच त्याला वाटू लागते! त्याची इच्छा असो नसो, म्हणूनच केवळ, तिच्या असमाधानाला कारण होणाऱ्या इतर सर्वांचा त्याला मनस्वी राग येतो! त्या आत्मकेंद्रित वृत्तीमुळे त्याची त्या साऱ्यांबद्दलची बेफिकिरी, त्याला नकळतच, वाढत जाते! तो पुरा पुरा भारलेला नि म्हणूनच पुरा पुरा आंधळा बनून जातो.

हेच, हेच सारं आमच्या आनाबापूच्या आयुष्यात घडलं! तो पूर्वीचाच होता. पण तो तसा असूनही आता नसल्यासारखा होता. तो भारलेला होता! आना आता त्याचा तो उरलेलाच नव्हता.

याच सर्व विविध विचारांची माझ्या मनाला त्या वेळी तीव्र जाणीव होई. मन खिन्न होई, कष्टी होई... पण ते आता आपल्या आटोक्याबाहेरचंच... या अगतिकतेच्या आहारी जाऊन मी स्वस्थ बसे.

आनाबापू आमचा असूनही आता आमचा उरला नव्हता, आमचा पूर्वपरिचित आना आम्हाला आता यापुढे कायमचा पारखा झाला होता, हे दुःख किती किती दारुण होतं!

*

श्रीधरच्या दुसऱ्या वाढदिवशी, थाटात झालेल्या 'श्री–धर' बंगल्याच्या वास्तुशांतीला आनाच्या निमंत्रणाप्रमाणे अथपासून इतीपर्यंत मी हजर होतो. त्यापाठोपाठच, आनाबापूला झालेल्या मुलीचं—मालेचं—बारसं 'श्री–धर'मधे साजरं झालं. त्या वेळीही, तिथं उपस्थित राहून, त्यांच्या त्या सुखात मी भागीदार झालो होतो.

तरी पण, त्या वर्षाअखेरचे आमचे हिशेब पुरे झाले नि ठरल्याप्रमाणे रीतसर देणंघेणं आनाबापूने प्रतिवर्षाप्रमाणे केलं, त्यानंतर मी क्षणभरच त्याच्याजवळ बसून घुटमळलो.

नि मग– मनाच्या एका पक्क्या निश्चयाने मी आनाबापूला हळूच म्हणालो, "आना! आता उद्यापासून, या वर्षापासून, मी आपला एक छोटासा निराळाच व्याप करायचं ठरवलंय! हल्ली आपले आहेत त्या सोळापैकी कोणतेही चार मुकादम नि चार कारागीर–कामगार–संच, आपल्याच मनाने तू मला निवडून दे. वाटलं तर, काही जुनी साधनं–तुला नको असतील ती मला योग्य किंमतीला दे. तो तुझा प्रसाद घेऊन

मी आपला दूर होतो. मला तरी यापुढे कसली आपल्या व्यवहारांची नसती गुंतागुंत राह्यला नको आहे!"

*

त्या माझ्या अकस्मात आलेल्या शब्दांनी एकदम चमकून, अगदी आश्चर्यचकित चेहऱ्यानेच, माझ्याकडे आनाबापू वर मान करून पाहून लागला. व्यावहारिक सर्व काही सुरळीत व मला फायद्याचं चालू असता, त्याच वेळी मी तसं काही म्हणेन, अशी त्याला स्वप्नातही कल्पना नव्हती.

त्यामुळे तो उलट गोंधळून माझ्याकडे प्रथम टकमका पाहतच राहिला नि मग एकदम मोठ्याने म्हणाला, "हे आणखी काय नवीनच निघालं तुझं बाबा सदाशिव? अरे, मी कधी म्हणालोय का तुला तसं काही!! काय कमी का पडतंय तुला? तसं सांग नीट मला! सोयीने सुधारून घेऊ!"

"छेः छेः! तसं काही नाही! मला काही तुझ्याकडे कमी मिळत नाही! पण मग—" कंठ अगदी गद्गद होऊन मी क्षणभर थांबलो, नि मग प्रयासानेच शब्द उच्चारीत पुढे त्याला म्हणालो, "तू माझा तसा चांगलाच भाऊ आहेस, आना. आजपर्यंत तुझ्या तोंडानेच मी माझ्या जीवनात पाणी प्यालो. त्याने माझं पोट तसं खूप भरलं आहे—मी तसा तृप्तच आहे! पण यापुढे, आता मात्र मला जरा स्वतंत्र व्यवहार करायला शिकू दे! तू मला तसं काहीच म्हणालेला नाहीस बरं, आनाबापू...पण परिस्थितीने तशी वेळ आलेली नाही तोपर्यंतच, मीच आपला सुखासमाधानाने तुझ्यापासून बाजूला होतोय! मला तू आता अनुज्ञा देच! तुझा आशीर्वाद दे, अंतरापासूनचा."

*

त्या क्षणी, ते बोलता बोलता माझं जसं झालं होतं, तसंच आनाचंही झालं होतं.

बघता बघता आनाचे डोळे पाण्याने तुडुंबले. मग तो हळूच अगदी रुद्ध, जड स्वरात मला म्हणाला, "बऽरंऽ—जशी तुझी मर्जी, बाबा! तुला हवी ती माणसं नि हवी ती साधनं तूच तुझ्या निवडीने घे, आपली इथली आहे ती घडी नीट लावून दे, नि जा! कधी अडीनडीला माझ्या मदतीला धावून येशीलच असा मला पुरता विश्वास आहे! जा हो, जा! माझी अनुज्ञा आहे तुला! देव तुझं सदैव भलं करील—"

बोलता बोलता आनाला अखेर एक लहानसा हुंदका आला. तो कसाबसा दाबून त्याने आपले डोळे प्रयासाने पुसले व तो गप्प बसून राहिला.

मलाही त्या क्षणी भयंकर कालवल्यासारखं, आत आत अगदी कुरतडल्यासारखंच वाटत होतं. निमिषमात्र माझं मन अगदी लोण्यासारखं विरघळूनही जाऊ लागलं होतं. 'चुकतोय का आपण? नको जाऊ या आनापासून दूर—' असंच सारखं वाटायला लागलं होतं.

पण पुन्हा ठाम विचार आतून प्रगटला—ठरलं ते ठरलं आता!

तेव्हा मग मी झटकन आपला उठलो, खाली वाकून हळूच आनाबापूंच्या पायांना स्पर्श केला. त्याने तो किंचित अस्वस्थ झाला.

मग मात्र मागे वळून न पाहताच, मी मोठ्या धीराने, आनाबापूंच्या दारातून, इतक्या प्रौढपणीही, माझी पहिली स्वतंत्र पावलं बाहेर टाकली!

## लक्ष्मीचं ग्रहण

मंगल–सदानंदाच्या चालू जीवनात सदूकाका नि भागाआत्या यांना फारच जवळचं स्थान होतं. ती जुन्या पिढीतली वृद्ध माणसं या जोडप्याच्या संसारात मोठ्या आत्मीयतेने समरस होत. बालपणी निर्मला–सदानंद ही दोघं भावंडं जशी 'सदाशिव'मधे जाऊन राहत, सहजतेने तिथल्या वातावरणात तल्लीन होत, तशाच मंगल–सदानंदाच्या छोट्या पुष्पा–पद्माही "आजोबा, आजोबा" करीत सदूकाकांकडे अधूनमधून धाव घेत. भागाआत्याच्या गळ्याला आपल्या चिमुकल्या हातांच्या मिठ्या मारून, एकरूप होऊन तिच्या 'आजीबाईच्या गोष्टी' तासन्तास ऐकत बसत. होतीच ती तशी लोभाळू–मायाळू माणसं. त्यामुळे 'सदा-शिव'मधील आजोबांच्या नि आजीच्या राज्यात या मंगलेच्या चिमुरड्या शिरल्या, की कधी कधी दोन दोन दिवस त्यांना आपल्या आईबापांची आठवणही होत नसे. आपल्या पोरी सगळ्या लग्न होऊन आपापल्या घरोघरी गेलेल्या. एवढ्या मोठ्या 'सदा-शिव'मधे सदूकाकांना अगदी रिकामं–रिकामं, ओकंओकंच वाटे. या पोरींचं हुंदडणं–बडबडणं म्हणजेच सदूकाकांना व भागाआत्याला वृद्धपणीचा एक मोठा विरंगुळा वाटे.

तेच ते प्रेमळ सदूकाका!... मंगलच्या लग्नापूर्वी, सदानंद आजारी असताना, त्याची शुश्रूषा करीत असताना, निर्मलवन्संना नि सदाभय्यांना त्यांनीच सांगितलेला हा वृत्तांत! तरुण सदानंद-निर्मला या प्रेमळ भावंडांना प्रेमळ सदूकाकांनी सांगितलेली ती आपल्या स्वतःच्या, आपल्या भावाच्या, नि सदानंद–निर्मलांच्या आयुष्यांतील हकीकत. निर्मलवन्संनी गंमतीत लिहून आपल्या सदाभय्याकडे पाठवून दिलेल्या त्या वह्या—

*

त्या सदूकाकांनीच ओळख करून दिलेली ती आनाबापूंची लक्ष्मी! 'श्री-घर'मधली नानी! मंगलेला आपल्या आयुष्यात नानीचा फारसा दाट सहवास घडलेला, लाभलेला नसला, तरी नानी मंगलेच्या चांगलीच परिचयाची होती. तिच्या आनाबापूंच्या घरात सून म्हणून येणारी तिची सासूच ती!

कित्येक वर्षांच्या अप्रत्यक्ष विरोधानंतर अखेर आनांनीच सदानंदला तिच्याशी लग्न करायला संमती दिली होती. मंगलला ते सारं सारं आठवत होतं. त्या त्यांच्या लग्नावेळी तिने प्रथमच पाहिलेला नानींचा चमत्कारिक संचार व बोवाळ, आनांनी मंगलला लग्नानंतर आपल्या माणसांमधून घरी नेलं त्या वेळचा, त्या नव्या सूनबाईचा तो न्यारा गृहप्रवेश! सासूबाईकडून मंगलचं झालेलं ते जगावेगळं स्वागत! नव्या हुरूपाने, आपलं शिक्षण–पदव्या सारं काही विसरून, त्यातलं काहीही आड येऊ न देता, आपल्या सासूसासऱ्यांच्या संसारात समरस व्हायला, ती पहिली विनयशील 'सासुरवाशिणी'ची पावलं टाकून पाहायला तिने सुरवात केली होती. कसलाही पूर्वग्रह मनाला जाचू न देताच मंगलने आपल्या त्या नव्या आयुष्याला प्रारंभ केला होता.

पण त्या चारदोन दिवसांतच ती पुरी अयशस्वी झाली होती. मंगलचा पुरा पुरा भ्रमनिरास झाला होता. अगदी हसत हसत, परंतु कुशल कौटिल्याने नानींनी तिला दूर दूर सारली होती, तिची सफाईदार झिडकारणी केली होती. एखादं घरातलं माणूस म्हणून हिने काहीही करायचं म्हटलं, तरी अगदी परक्या पाहुणीसारखी व लपलेल्या टोमण्यांनीच नानींनी मंगलची संभावना केली होती. आपल्या अकलुषित, निर्लेप मनाने, वर्तनाने आपल्या सासऱ्याचं घर आपण आपल्या प्रेमगुणांवरच जिंकू, सहजच आपलं त्यातील सहजस्थान पटकावू, ही सदानंदकडे तिने प्रकट केलेली ईर्षा नानींच्या राज्यात साफ साफ विफल ठरली होती. मंगलच्या तसल्या साऱ्या मनापासूनच्या प्रयत्नांचा, नानींच्या हास्यमुख कारवाईने, पुरा धुव्वा उडाला होता.

नि मग मंगल तिथून त्या वेळी एकदा बाहेर पडली ती पुन्हा राहायला म्हणून तिकडे परतली नव्हती. खूप विचार करूनच सदानंदने निराळं बिऱ्हाड केलं होतं. आनांना काय वाटेल म्हणून तो कित्येक दिवस पुटपुटला, तळमळला होता. पण अखेर झालं ते बरंच झालं असंच त्यांनाही वाटलं होतं. नानींसकट इतरांना ते तसं आधीच वाटत होतं.

*

त्यानंतरचा मंगल–सदानंदचा तो स्वतंत्र संसार, त्यात पदार्पण करणाऱ्या प्रत्येक बालकाचा जन्म! त्या प्रत्येक सुखद प्रसंगी आनांसकट सर्वांचीच संपूर्ण बेफिकिरी, प्रेमहीन निरुत्साह!... नि मग... मग तिच्या पहिल्यापहिल्या वाढत्या परागचा अकल्पित, अकाल मृत्यू! त्यावेळचा मंगलच्या मनाला बसलेला असह्य धक्का, आनांची धावून आलेली पत्ररूप सहानुभूती, सदानंदच्या मनाचा कधी नव्हे तो भावनात्मक धडका!

सर्व सर्व गोष्टी मंगलला भरभरभर आठवत होत्या. ती बेचैन होत होती.

## भाऊबिजेची स्मृती

आता दुपारचे बारा वाजून गेले होते. आंघोळ करून, पोट भरून, गाढ झोपलेला अनंता, अजून तसाच गुडूप-शांत पहुडला होता. पाळण्यावर पुन्हा मच्छरदाणी सारखी करून ती बाजूला झाली.

शेजारच्या पलंगावर ऐसपैस हातपाय पसरून सदानंद अजून गाढ झोपलेलाच होता. जवळ उभी राहून ती त्याच्याकडे निश्चल दृष्टीने पाहू लागली. पाळण्यात झोपी गेलेला आपला मुलगा, नि समोर निद्रासुख अनुभवीत असलेला आपला पती, दोघांत तिला क्षणभर एक प्रकारचं साम्य असल्यासारखंच वाटलं नि तिने आपल्याशीच एक मंद स्मित केलं. त्या क्षणी तरी, त्या दोघांकडे पाहतानाची तिची दृष्टी एकाच प्रकारची, अगदी वात्सल्याचीच होती. दोघांचेही ते संथ–शांत चेहरे अगदी निष्पाप वाटत होते.

पण तोच तिच्या सदानंदाचा चेहरा तिने अनेकदा अनेकविध भावनांनी नटलेला पाहिला होता. आपल्याशी बोलता–वागताना, मुलांशी खेळता–शेलताना, इतरांशी वागताना— कधी आनंदी, कधी विलासी, कधी वत्सल, कधी रुष्ट, कधी दुःखीकष्टी, कधी भयंकर भयभीत... पण त्या क्षणी मात्र तो अगदी शांत शांत, निर्विकार, सोज्वळ, संपूर्णतया शालिश, निष्पाप दिसत होता.

तिकडे पाहता पाहता, तिला अकस्मात एक भयंकर मोह झाला. झोपलेल्या अनंता-जवळ वाकून ती जशी त्याच्या गालाला आपल्या ओठांनी हळूच अलगद स्पर्श करी, तसाच मंगलने खाली वाकून, स्वतःला नकळतच, हळूच आपल्या ओठांनी सदानंदाच्या भालप्रदेशाजवळ अलगद स्पर्श केला. ती स्वतःशीच हसली.

नि मग मात्र एकदम भानावर आली. तो उठेल, त्याची झोपमोड होईल या कल्पनेने ती एकदम दूर सरू लागली. तेवढ्यात तिच्या बांगड्यांचा आवाज झाला...

*

मंगलेच्या अगदी जवळच्या श्वासाच्या नि स्पर्शाच्या जाणिवेने आणि गडबडीत झालेल्या बांगड्यांच्या आवाजाने सदानंदाला एकदम जाग आली. त्याने डोळे उघडले तेव्हा त्याची मंगलच त्याच्याजवळ त्याला उभी दिसली. ती वाकलेली पुन्हा सरळ होत होती.

तोंडभर स्मित करून तो पटकन् उठून बसला— नि त्याने मंगलचे हात एकदम पकडले. तिला आपल्याजवळ बसवीत, संपलेल्या झोपेने डोळे लवलवत म्हणाला— "वा! छानच झोप झाली! काय करत होतीस तू?"

त्याचा प्रश्न साधा होता. पण क्षणापूर्वीच्या आपल्या हालचालींच्या जाणिवेनेच मंगल चपापली, लाजली. हळूच वर डोळे काढून त्याच्याकडे पाहू लागली.

तेवढ्यात आळोखेपिळोखे देत चारी बाजूंना पाहत सदानंद म्हणाला, "अग

वाजले किती ? उठवलं का नाहीस मला ? काय करीत होतीस सकाळभर ?— "

" वाचत होते... निर्मलवन्संची वही ! " मंगल हसून म्हणाली, " पोरी गेल्याहेत 'सदाशिव 'मधे... अनंता नि तुम्ही, बापलेक मारे झोपला होता ऐसपैस ! मग मी एकटी काय करू ? बसले आपली वाचत— सदूकाकांच्या गप्पागोष्टींत मन रमवून— "

" अप्पलपोटीच आहेस अगदी ! " आपला झोपाळू चेहरा धोतराच्या सोग्याने पुसत, मंगलच्या पाठीत हळूच एक थाप मारून सदानंद म्हणाला, " एकटीच बसलीस ना वाचत ! मला तरी उठवायचं होतंस. "

" कशाला ! बरे आपले आरामशीर ऐसपैस झोपला होता की स्वस्थ ! नाही तरी जाग्रणं झालीच आहेत— " मंगल हसत म्हणाली, " चला, तोंड धुवा— चहा घेणार ? नाहीतर स्नान करा— जेवण तयार आहे. पोरी इथं नाहीत— आपणच दोघं जेवायची आहोत आज— "

सदानंद हसला नि टॉवेल खांद्यावर टाकून निघाला.

*

तेवढ्यात मंगलला एकदम आठवण होऊन ती सदानंदला म्हणाली, " हो, बरं वेळेवर आठवलं— आठ वाजता फोन आला होता सकाळी शंभुनंदनांचा तुम्हाला— "

" काय ? शंभुनंदनांचा ? मग उठवलं की नाहीस पण मला ? काय, काय म्हणाले ? " सदानंद थबकला— घाईघाईने मंगलेकडे परत येत म्हणाला.

" कशाला ? माधवकाकांनीच घेतला होता, सिनेमात. नुसता निरोप होता एक— तो सांगून गेले ते—" मंगल त्याला म्हणाली, " अहो, शंभुनंदन उद्या सकाळी म्हणे मोटारने कोल्हापूरला जाणार आहेत, नि परवापर्यंत परत येणार आहेत. मुलांना घेऊन तुम्ही सहज तिकडे जाऊन येणार असला तर भरपूर जागा आहे म्हणे— संध्याकाळपर्यंत काय ते कळवलं तरी चालेल म्हणून सांगितलंय त्यांनी — मग मुद्दाम कशाला उठवू तुम्हांला तुमच्या गाढ झोपेतून, म्हटलं ! "

" अस्सं होय ? " सदानंद आनंदून म्हणाला, " खरंच ! जाऊ या काय ग आपण सगळीच दोन दिवस ? "

" मी नाही बाई ! " मंगल म्हणाली, " पण तुम्ही जाणार तर जा बापडे खुशाल ! हवं तर पुष्पा-पद्मांनाही घेऊन— "

" फक्त दोघींनाच घेऊन ? मीच एकटा ? " किंचित बेचैन होऊन सदानंद म्हणाला.

त्याच्याकडे पाहात, किंचित थांबून मंगल म्हणाली, " पण कशाला आता मुद्दाम घाईघाईने, मी म्हणते ? उद्या पहाटेच तर आंघोळी ना, दिवाळीच्या !! "

" अग खरंच की ! विसरलोच की अगदी, दिवाळी आहे हे — " सदानंद किंचित वरमून म्हणाला.

" अहो, राजाला काय सदाच दिवाळी ! " मंगल हळूच हसली, " पण... मग...

मुलं, तुम्ही, सगळेच उठून गेलात... म्हणजे मी आपली ऐन दिवाळीत एकटीच काय— ”

एकदम मधेच सदानंद मोठ्याने म्हणाला, “ आणि— अरे! म्हणजे— मंगल, दोनतीन दिवसांवरच भाऊबीजही असणार! निर्मल येईल आपल्याकडे— ”

*

नि मग एकदम नव्यानेच काही सुचल्या–आठवल्यासारखे करून, एक टिचकी वाजवीत, सदानंद हसत हसत म्हणाला, “ वा:! खरंच... आयडिया!... मंगल, एक गंमत सुचलीय— आपण असं करू या का, मंगल? आता मी तर काही जात नाहीच मुलांना घेऊन— पण— शंभुनंदनना मात्र येताना जरा आडवी वाट करायला विनंती करतो... सांगतो की, येताना सातान्याला वळा नि आपल्या गंगाअक्काला घेऊन या. अग गेली चारपाच वर्षे तरी तिची भाऊबीजच झालेली नाही. तेव्हा— या वेळी तिच्या ‘ भाऊरायाची मोटार ’च एकदम तिच्या दारासमोर जाऊन धडकू दे! काय येत नाही बिशाद लागलीय? एक सज्जड पत्रच देतो तिला शंभुनंदनांबरोबर. ते जरूर जरूर अगदी करतील ते सारं— नक्की येईल वेळेवर गंगाअक्का! बस्स, ठरलं! असंच करायचं! इथं निर्मल येणारच आहे— आणखी भागाआत्या, सदूकाका यांनाही मुद्दाम त्या दिवशी बोलवून घेऊ या आपण! असं आपल्या घरातलं छोटंसं संमेलनच घडवू आपण भाऊबीजेला— ”

“ खरंच! खरंच! छानच आहे हं हा बेत! ” मंगलही अतिशय आनंदून म्हणाली, “ सकाळपासून पाच मिनिटांपूर्वीपर्यंत मला काय वाटत होतं... नि आता काय वाटतंय—खरंच, हेच छान...माझी हुरहूर संपली! नाही तरी आक्कावन्सं आपण-हून कधी नाहीतच यायच्या लौकर! असं काही करून, तुम्ही त्यांच्या गळी पडलात तर मात्र आपसूक येतील— ”

“ आणि भागीआत्याही आता अगदी म्हातारी झालीय ग, मंगल! ” सदानंद हलुवार शब्दांत म्हणाला, “ सदूकाका तर तिच्या आणखी पुढले— नि आमची अक्का तरी आता अशी मोठी तरुण राहिलीय? अग, मीच गेल्या वर्षी ओलांडली चाळीशी—हं... चल चल, आटप लौकर— पाणी दे मला आंघोळीला. चार घास खातो नि पळतो मुंबईला शंभुनंदनांकडे— संध्याकाळी येईन परत. ”

“ चला ना! माझी कुठं खोटी आहे? ” मंगल हसत जिना उतरू लागली.

तिच्या पाठून पायऱ्या उतरता उतरता, तिचा हात धरून बरोबर चालता चालता सदानंद गद्गदून म्हणाला, “ खरंच— खरंच! मंगल, खरंच ही मोठी गंमतच होईल! अगदी अचानकपणे अशी अगदी सारी सारी एकत्र भेटू पुन्हा! ”

*

सदानंद निघून गेल्यावर मंगलने स्वयंपाकघर बंद केलं. उठलेल्या अनंताला दूध पाजून त्याच्याबरोबर ती थोडा वेळ लाडेलाडे बोलली, खेळली. अखेर खेळता खेळता अनंताचे डोळे झोपेने मिट्टू लागले. त्याला थोपटून, निजवून, तिने पाळण्यात घातलं नि ती टेबलाजवळच्या आरामखुर्चीवर पडली.

तसं एकटंच पडल्या पडल्या, तिला काल रात्रीपासून सुरू झालेला नि सकाळी वाचताना पाहिलेला तो सारा सारा चित्रपट दृष्टीसमोर दिसू लागला. त्यातच आपली–सदानंदाची जोडीने झालेली मागली सारी धडपड दिसू लागली.

सदानंदचं नि तिचं तारुण्य, त्यांच्या इच्छा–आकांक्षा, त्यांच्या सहवासात आलेले खंड व अडथळे, सारं काही समोर दिसून तिला एकदम सदानंदांच्या पत्रांची आठवण झाली. त्यातली काही त्याने आनाबापूंना लिहिलेली, त्यांच्या पश्चात् त्यांनीच त्याच्या हाती परत दिलेली, नि काही त्याने तिलाच लिहिलेली, नि ती अगदी जिवाच्या मोलाने आजवर जपून ठेवलेली होती.

मंगल स्मितवदनाने आरामखुर्चीवरून उठली. टेबलाचे खण उघडून तिने ती पत्रे बाहेर काढली. पुन्हा आरामखुर्चीवर पाय पसरून पडल्या पडल्या, अत्यंत हळुवार अंतःकरणाने ती त्यातलं एक एक वाचू लागली...

## पाच

### पदवीधरांच्या आकांक्षा

२६ जून १९२८

प्रिय आना–

दुपारपासून हुरहुरत्या मनाने वाट पाहत होतो. अखेर आलेल्या तारेने पदवी-वार्ता दिली. निदान दुसऱ्या वर्गाचं समाधान होतं. तत्काळ, एक प्रकारचा 'पदवीधराचा अहंगंड' सूक्ष्मपणे मनात वावरू लागला. "लौकिक मोठेपणाचं कायम लायसन्स" एकदाचं असं माझ्या हाती आलं!

पण, मग वाटलं– किती क्षुद्र ध्येयांनी प्रेरित होऊन माणूस धडपडत असतो? ती गुंगी, ती तन्मयता— सारंच काही हास्यास्पद! मिळवलाय तो केवळ कागदाचा कुचकामी कपटा! पुढल्या आयुष्यात जे काही चांगलं हातून घडणार ते माझ्या नैसर्गिक गुणांवर, इच्छाशक्तीवर, कार्यशक्तीवरच— हस्तगत पदवीवर खासच नव्हे. पण जर का हे यश आलं नसतं, तर मात्र मी खासच तुच्छ ठरलो असतो!

*

वसतिगृहातलं खरंखुरं जीवन–शिक्षण मला अध्ययनकाळात मिळालं, हे माझं मोठं भाग्य. त्यानेच मला आत्मविश्वास वाटतोय. नाना व्यक्ती, नाना तऱ्हा! तसलाच अहोरात्र निकट संबंध, नवखं कुतूहल, विविध मोह–प्रसंग, सारं सारं तिथं अनुभवलेलं! त्या मानाने या कागदी पदवीची निरर्थकता म्हणूनच मला पटते!

खरंच! ते स्वातंत्र्य ज्यारंच असतं! व्यसनाधीनता, शीलभ्रष्टता, ध्येयशून्यता, चैनबाजी, सुखासीनता यांचा तुटलेला कडा एका बाजूला, तर उलट व्यासंग, वाचन, वादविवाद, मनन, प्रखर ध्येयशीलतेची बैठक, व्यष्टिसमष्टीच्या छोट्यामोठ्या समस्यांची जाणीव व त्यातून दिसणाऱ्या दूरदूरच्या यशोमंदिराचा कळस नि राजमार्ग दुसऱ्या बाजूला! आपापल्या कुवतीप्रमाणे इकं त्या बाजूला झुकायं, आपल्या भवितव्याचे शिल्पकार —

ब्रह्मा-विष्णु-महेश—आपले आपणच! अग्नी हाती आल्यावर आग लावा, नाही तर अन्न शिजवा, सारी योजकता केवळ आपली आपल्या हाती! साधन नाममात्र, साधकाच्या साध्य हेतूलाच सारी, खरी किंमत!

दिव्य साध्यांच्या ध्यासातच व्यक्तीने स्वतःला नेहमी विलीन करायचं असतं, हे मी तरी जाणत होतो. म्हणूनच, त्या वसतिगृहजीवनाबद्दल व ते मला सुलभ करून देणाऱ्या माझ्या पित्याबद्दल— आपल्याबद्दल— मला फार फार अभिमान, आदर वाटतो. पण त्यामुळेच आज मला प्राप्त झालेली पदवीही अगदी क्षुल्लक वाटते.

आना, तुम्ही वैभवसंपन्न, यशस्वी, तर मी आताच कुठं जगात, माणसांत जमा होतोय. 'आनांचा मुलगा' एवढाच एक मोठेपणा मला नकोय, म्हणूनच मी संकोचतो. पण तेवढ्याने माझा तरुण आत्मविश्वास मात्र कमी होत नाही. माझं वैयक्तिक व सामाजिक महत्त्व मलाही लाभेल, याची मला मनोमन खात्रीच आहे.

*

पण वाईट एवढंच वाटतं, की त्याची तुम्हांला खरी जाणीव नाही, जाणीव होतही नाही. "आता पुढं?" असं मोठं थोरलं प्रश्नचिन्ह महिन्यापूर्वीच माझ्यापुढे तुम्ही उभं केलं. त्यातला हेतू मी जाणत होतो. स्वतःच्या धंद्यातल्या भावी यशोपरंपरेची निश्चित चित्रं असलेला यशस्वी मनुष्य आपल्या जाणत्या, शिकलेल्या मुलाकडून काही अपेक्षा करीत असणारच! मात्र त्यात कोणती आग्रही वृत्ती नसावी. ती गौणच! तुमचाच मार्ग मीही चोखाळावा, त्याच व्यापात स्वतःला विलीन करावं, तरच मी सन्मार्गी, नाही तर बेजबाबदार, निरुपयोगी, उद्धट!—अशी आपली नैसर्गिक अपेक्षा असल्यास ती मात्र चुकीची ठरेल, अस्थानी ठरेल! धंदे– व्याप– यशोपरंपरा पिढ्यानुपिढ्या एकाच प्रकाराने चालावेत, अशी अपेक्षा यशस्वी वैभवसंपन्नांच्या मनाला नैसर्गिक असली, तरी ती रास्त खासच नव्हे. व्यक्तिशः मला तरी ती पार पाडणं केवळ अशक्य आहे!

असल्याच हेतूंनी मी त्या दिवशी नापसंती दाखवली, तेव्हा तुम्ही मात्र काहीशा दुखावल्या शब्दांत मला विचारलं, "दुसरं काय जमणार आहे मग? पैशाशिवाय जगात पान हलत नाही... नि बापाचा पैसा कोणाला कधी पुरत नाही—"

ते मला समजत होतं. "विचार करतो" असं मी मोघमच म्हणालो. तत्काळ तुमचा आवाज चढला. तुम्ही म्हणाला, "हवं ते कर! माझ्या धंद्यात नसलं पडायचं तर निदान एखादी सुरक्षित नोकरी तरी धर! हे तुझं अवलंबित जिणं पुरे झालं आता!"

"मलाही धंदाच...पण माझ्या आवडीचा करायचा आहे! धंदा काय एकच असतो? ध्येय नि धंदा यांचा समन्वय करणारा, सांगड घालणारा एक व्याप मला करायचाय! थोडंसं भांडवल असलं म्हणजे झालं— एखाद्या छोट्या घराइतकं— दहा-पंधरा हजारांचं— "

" वाः ! फारच थोडी रक्कम ! " तुमच्या त्या शब्दांमधली हेटाळणी मला स्पष्ट दिसून येत होती— " आणणार कुठून ? "

आतून मी आधीच थिजलो होतो... तरी, तुम्ही पटकन पुढेही हलवून खुंटा बळकट केला, " कवडीचीही अपेक्षा करू नकोस बरं का, माझ्याकडून. "

त्या क्षणी जे मनाला वाटलं, तितकं पददलित, अवमानित, खिन्न, मला तोपर्यंत आयुष्यात कधीच वाटलं नव्हतं.

तेव्हा मी गप्प राहिलो, पण म्हणूनच, सारं एकदा स्पष्टपणे कळवून टाकायलाच हे मी आज लिहीत आहे—

*

अप्रत्यक्ष आग्रह व अपेक्षा दिसत असूनही मला तुमच्या धंद्यात पडणं मुळीच अशक्य वाटत आहे. तुम्हांला जे पटलं-पेललं, ज्याच्या भावी यशाबद्दलही तुम्हांला विश्वास आहे, त्यात मला तरी खरा रस नाही. आयुष्यात पैसा मिळवण्याची इतकी मातब्बरी मी गृहीत धरून चालत नाही. दगड-माती, लोखंड-सिमेंट, आयुष्यभर हृदयाशी कवटाळायला माझं तरी मन धजत नाही. त्याहून निराळ्या कोणत्याच हालचाली करता येणार नाहीत, असं आज तरी धरून चालायला मी मुळीच तयार नाही.

उरला, आपण सुचवलेला ' नोकरीचा सुरक्षित मार्ग ' ! तोही मला आजच ग्राह्य वाटत नाही. जे कोणाकोणाला नोकरी देतात, ते कसलं काम असल्याशिवायच ? काम निघतं ते धंद्याचंच ना ? धंदा करतात तो भांडवलाशिवायच का ? आपला धंदा चालू असताना, आपला फायदा नि आपलं भांडवल, ते धंदेवाले रोजच्या रोज तर नाही ना रोख नोटांमधे मोजू शकत ? मग तसलीच रास्त महत्त्वाकांक्षा एखाद्या तरुणाने बाळगली, भांडवलाची अपेक्षा केली, तर त्यात चूक काय ? तो मार्ग कदाचित कठोर असेल, सुकर नसेलही, पण अधिक हितकर खासच असेल !

तरी पण, स्वतः यशस्वी, वैभवसंपन्न झालेल्या माणसाचं—तो प्रत्यक्ष पिता का असेना—नेहमी अडवणुकीचंच राजकारण असतं ! कोणा ना कोणासमोर मुलाने नमावं नि एकदाचं सापेक्ष सुरक्षित व्हावं ! हाच त्यांचा महान निर्णय ! मला ठाऊक आहे, लहान तोंडी जरा मोठा घास होईल, पण भांडवल-रकमेबद्दल जे सहज म्हणून सुचवलंत, तेही माझं नाक दाबून तोंड उघडण्यासारखं नव्हतं का, एका प्रकारे ? मला तर आता वाटू लागलंय, आपापल्या क्षेत्रात प्रथितयश झालेल्या साऱ्यांचीच ही पद्धत असावी. आपल्या मागून येणाऱ्या दुसऱ्यांच्या अपयशांचीच तेवढी ते खात्री बाळगतात; आपल्या प्रामाणिकपणाच्या अभिमानामुळे, आपण तेवढे सोडून अन्य सारेच अप्रामाणिक असतात असं ते कायमचं धरून चालतात, आपल्याहून इतर कोणत्याही धंदेवाईक हालचाली म्हणजे केवळ अविचारी अयशस्वीपणाचे पोरखेळच, असा त्यांना हमखासचा संशय वाटतो ! स्वतःला हस्तगत झालेल्या यशामुळेच हा दंभ त्यांच्या

मनाला हातांच्या मळासारखा चिकटलेला दिसतो !

*

उमद्या, आशावंत, महत्त्वाकांक्षी तरुणांना याच एका गोष्टीची जास्तीत जास्त जाचणूक होत असते. ज्याने त्याने आपल्या यशाबद्दल, धंद्या-व्यापाबद्दल, कर्तबगारीबद्दल, जरूर कृतकृत्य समाधान बाळगावं, पण मग, तरुणांच्या नव्या व्यापाबद्दल, विशिष्ट कर्तबगारीबद्दल, त्यांच्या भावी जीवनातील यशापयशांबद्दल, आगाऊच इतकं संशयग्रस्त असणं, तसली विकृत वृत्तीची खात्री बाळगून चालणं याला काय म्हणावं ? तरुणांच्या अप्रकट कर्तृत्वाबद्दल काहीचाही विश्वास मनात न बाळगता, त्यांना तसं हरघडी नामोहरम तेवढं करणं, हे काय अनुभवसमृद्ध मानवी मनाचं जीवितकर्तृत्व ? त्यामागे असेलही कदाचित तरुणांच्या कल्याणाची सुप्त दूरदृष्टी ! पण एकवेळ त्यांना ती न लाभलेलीही पत्करली ! त्याऐवजी, तरुणांना त्यांच्या त्यांच्या चुका करण्याचीच नैसर्गिक मुभा असावी ! जग वाढतं-सुधारतं ते नवनवीन चुकांमधून ! नवं ज्ञान, नवं यश, नवं सुख, नवे शोध, हे सारं काही नव्या नव्या चुकांमुळेच नाही का आजवर जगाला, मानवाला लाभलेलं ?

मी तरी निश्चितपणे म्हणेन—आजची तरुण पिढी अधिकाधिक जबाबदार वृत्तीचीच होत चालली आहे. आपला नवा स्वर्ग निर्माण करताना, इतरांच्या पैशावर पिंड पोसणारं अवलंबित जिणं जगायची तात्पुरती पाळी आली, तर त्यांचं मन अधिकाधिक ओशाळंच होतं ! ते स्वतःवर हजारो बंधनं घालीत राहतं ! तरीही, ही मागली पिढी आपल्याच छोट्यामोठ्या यशांच्या नि वैभवाच्या जोरावर, तरुणांना ओशाळवण्यात हरघडी कचरत नाही ! आपलं तारुण्य, आपली परिस्थिती, आपली पदवी, आपली कुवत, आपली संधी, यांचाच जिथं त्या प्रतिष्ठितांना विसर पडतो, तिथं ते तुलना तरी कशाची करणार ? आठवणी होतात त्या केवळ तुलनेने हेटाळण्यासाठी ! स्वतःचा टेंभा मिरवण्यासाठी !—म्हणूनच, मी स्पष्टच म्हणेन की प्रत्येक यशस्वी माणसाला, आजच्या या नव्या काळात त्या स्थिर अकिंचन आयुष्याची पुन्हा एकदा नव्याने सुरवात करायला नि जगायला लावावं ! माझी पक्की खात्री आहे, अशा वेळी त्यांच्यातल्या कित्येकांची घाबरगुंडी उडेल, अनेकांची पार भंबेरीच उडेल ! आजच्या जीवनकलहात आमच्याइतके जरी ते यशस्वी झाले तरी खूप मिळवली, म्हणेन मी !

*

तथापि, दंभ हाच जगात सर्वांत प्रभावी ! त्या ' व्हॅनिटी 'मुळेच जुन्यांचे डोळे दिपलेले असतात. आजच्या प्रतिकूल जमान्यात वावरणाऱ्या, अंधारात धीराने चाचपडणाऱ्या या तरुणांकडे, त्यांच्या यशापयशांकडे, दुःखद अडचणींच्या डोंगरांकडे पाहताना त्यांचे ते एकमार्गी डोळे आपोआप गपकन बंद होतात ! किंबहुना, आजच्या तरुणांच्या असल्या

अडचणी-अपयशांनी— सापेक्ष तुलनेमुळे, अप्रत्यक्षपणे जुन्यांचा अहंभाव समाधानच पावतो !
वास्तविक, त्या जाणत्यांचंच रक्त त्यांच्या या पुढल्या पिढीच्या अंगात सळसळत असतं. तेच, त्यांचंच सुसंस्कृत रक्त, या नवीन परिस्थितीशी नव्या पद्धतीने झगडण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न करीत असतं. म्हणूनच, उलट या नवीन पिढीतलं रक्त क्षणोक्षण आटवून- गोठवून टाकणारी ही नवीन कठोर प्रतिकूल परिस्थिती, त्या एका नाडीमुळेच जुन्यांच्या हृदयांत रोमहर्षक ठोके उत्पन्न करू शकली पाहिजे !— पण हाय ! ते आढळणार नाही !

*

असो. या स्पष्टोक्तीबद्दल राग नसावा, आला तरी क्षमा असावी.
आता यापुढे कसल्या आर्थिक मदतीची अपमानास्पद अपेक्षा मनात न ठेवताच, मला व माझ्या पित्याला शोभेसंच वागायचं मी ठरवलेलं आहे. नि तेच नीट कळवण्यासाठी हे पत्र लिहिलं आहे.
कळावे, आशीर्वाद असावा—

आपला
सदानंद

## अपेक्षाभंगाची परंपरा

४ जून १९३४

प्रिय आना,
गेल्या पाचसहा वर्षांमधे, वेळोवेळी घडत गेलेल्या एकेक घटनांनी तुमच्या–माझ्यामधे एक प्रकारची खोल दरी निर्माण झाली आहे. दोघांचा विशिष्ट आग्रही स्वभाव ! परस्परांची नैसर्गिक मनोवृत्ती ! त्यामुळेच ती आता दुर्लंघ्य होऊन बसली आहे ! पण त्याला इलाज नाही.
आपल्या उतारवयात माझं तारुण्य आलेलं नि मी तर असा अनेक दृष्टींनी ' उच्छृंखल ', ' स्वयंनिष्ठ ', ' मूर्ख ' ! जणू " आपल्या हृदयावरील एक असाध्य व्रण "—सदा ठुसठुस, भगभग करून आपल्याला असह्य वेदना देणारा !
या दैव–दुर्विलासाला, तुमच्या मते मी असा एकटाच जबाबदार ठरलो गेलो असलो, तरी माझा मात्र त्या बाबतीत अगदी नाइलाज आहे, आना.
माझा एक सतत उद्योग चालू आहे. माझ्या दृष्टीने ठरणारा माझ्या अधिक उज्ज्वल

भवितव्याचा, सात्त्विक सुखाचा, यशाचा एक मार्ग मी शोधत आहे, तशी वाटचाल करण्यामध्ये मी गर्क आहे. मला ठाऊक आहे, मी उभा असलेली बैठक स्थिर नाही. दोन नव्हे, तीनचार दगडांवर पाय ठेवूनच मी कसाबसा उभा आहे. त्याने मलाही काय कमी का त्रास होतो ? दुसऱ्या कसल्या असो-नसो, वात्सल्यदृष्टीने तरी पाहून, आपल्यालाही त्याने त्रास होत असेल, असं अनेकदा आपल्या अनेक उद्‌गारांवरून वाटतं. पण इलाज काय ?

*

माझ्याशी कधीमधी बोलताना, आपले सुस्कारे माझ्या कानी पडतात. कधी तुकाराम-रामदासांच्या शब्दांतूनच मला आपलं मन समजतं. जे जे होईल ते ते आपण पाहत आहा, देवावर भार टाकत आहा, जगात सुखी असा कोणी नाही...! त्या महात्म्यांच्या शब्दांत तुमचं मन तुम्ही बोलताना डोकावू लागलं, की माझ्यासारख्या सामान्य माणसाचा आत्मा एकदम निःशब्द होतो. मन अतिशय व्याकुळतं, हुरहुरतं ! वाटतं, आजपर्यंतप्रमाणेच पुढेही आपण आपल्या पित्याच्या असमाधान, दुःख-अडचणींनाच कारण होत राहणार ! आपलं उत्स्फूर्त प्रामाणिक आयुष्य विचार, आचार, आपल्या प्रत्यक्ष जनकाच्या दुःखाचाच एकमेव झरा ठरावा, यापरतं दुसरं भयंकर दुःख ते कोणतं !
स्वभावानुसार माझ्या हातून घडणारी प्रत्येक गोष्ट तुमच्या मनाच्या असमाधानाला, भोगालाच कारण व्हावी, या नियतीला म्हणावं तरी काय ? तो एक प्रामाणिक मतभेद असेल, तो मलाही कमी दुःखद होत असेल; पण मग कशामुळे तुम्ही सुखी व्हाल ? हेही मला अगदी या क्षणापर्यंत समजलेलं नाही ! माझ्या विशिष्ट मनोभूमिकेमुळे मला जे विचार सुचतात, त्यानुसारच माझे प्रामाणिक आचार होतात. घडतं ते ते तुमच्या मनाविरुद्ध असतं, हेही तसं घडून गेल्यावरच मला समजतं. पण उमज पडला तरी मागाहून ते ते बदलणंही अनेक प्रकारे अशक्य असतं. माझ्या निकषावर मात्र मी केलेलं ते सारं, माझ्या पश्चात विचारांतही, मला दोषास्पद वाटत नाही.
असंच हे सारं येथवर चालू आहे ! कोणाची इच्छा नसताना आपण उभयताही त्याच एका दुःखद चक्रात गुरफटलो आहो. हीच ती नियती ! आपल्याच व्यक्तित्वाच्या संस्कारांवर वाढलं-सजलेलं माझं व्यक्तित्व, आता असं दिनानुदिन आपल्याशीच झगडत राहावं, ही वस्तुस्थिती जास्तच हृदयाला कुरतडते !
तरी पण तेही अगदी साहजिकच आहे, असं मी तरी समजतो. मी आता आपल्यामध्ये विलीन होऊ शकत नाही, राहू शकत नाही. आपली माझी जीवनमूल्यं, आपला माझा जीवन-दृष्टिकोन, आता सहजगत्या एकरूप होऊच शकत नाही.
पण, आना, तुमची अपेक्षा नक्की हीच आहे. त्यामुळेच माझ्यामुळे तुमचा वारंवार अपेक्षाभंग होतो, तुम्ही दुःखीकष्टी होता, त्याला केवळ मीच जबाबदार आहे असंच

सारखं आपल्याला वाटतं ! त्या जाणिवेने मीही दुःखी होतो. मलाही अपराधी वाटतं ! पण मग मला माझं मन पुनःपुन्हा सांगतं, ' बाबा रे, ते तुझ्या नाही नि आनांच्या नाही — कोणाच्याच हातचं नाही ! '

*

तुमच्या इच्छेप्रमाणे मी कॉंट्रॅक्ट धंद्यात पडलो नाही. हा एक तुमचा मोठा नि पहिलाच माझ्याबाबतचा अपेक्षाभंग. त्याने रागावून, आपल्या वत्सल पितृत्वाच्या व संपन्नतेच्या अधिकारामधे, तुम्ही माझी अप्रत्यक्षपणे आर्थिक कोंडी केली आणि तो तुमचा नैसर्गिक हक्क मी शिरसामान्य केला. अडीअडचणींना तोंड देत माझ्या स्वाभिमानाला व कुवतीला मी जागलो — आपल्याकडून कोणाला उपद्रव होणार नाही अशी जागरूक कसोशीची काळजी घेतली. आपल्या वैभवाचा आसरा सोडला.

वृत्तपत्रीय व्यवसायाच्या आळवावरच्या पाण्याने माझी तहान भागवण्याची मी शिकस्त केली. मासानुमास तुषार्त राहून भावी उज्ज्वल काळाची आस उराशी धरली, जाता जाता एकदोन पदव्या पदरात पाडून ठेवल्या, समानधर्म मित्र जोडले, त्यांच्या साह्याने नि त्यांच्या धडाडीने त्यांचे स्वतंत्र व्याप उभारले, त्यात आलेले चढउतार हसतखेळत त्यांच्याबरोबर झेलले. अखेर, ध्येयप्रवणतेमुळेच, माझ्याबरोबरच मी त्यांनाही आर्थिकदृष्ट्या खाली पाडलं, त्या परिस्थितीला तोंड देण्यासाठीच कॉलेजात लेक्चरर झालो. पण वर्षभरात गांधीजींच्या चळवळीत ते जीवनही माझ्या वाट्याला उरलं नाही. या सर्व काळामध्ये माझे विचार-आचार—साऱ्यासाऱ्यामुळे तुमचा अपेक्षाभंग खासच झाला असणार. पण मग तो माझा आयुःपट एकतर्फी खासच नव्हता. मी कधी तुमच्याकडूनही कसल्याच अपेक्षा केलेल्या नव्हत्या. कारण, माझं ते वेडं-बरं विचार-आचार-स्वातंत्र्य आर्थिकदृष्ट्याही तुमच्यापासून अलग व स्वतंत्र राहील अशी मी डोळ्यांत तेल घालून काळजी घेतली होती. मला ओशाळगत वाटावं नि तुम्हाला उपद्रवकारक व्हावं, अशा कशाचा त्यात किंचितही अंश नव्हता.

*

तरी पण दुर्दैव असं की त्यातूनही तुमचा एक प्रकारचा नवाच अपेक्षाभंग झाला. ते सारं काही माझा उच्छृंखलपणा, उद्धटपणा यातच अप्रत्यक्षपणे जमा झालं. कदाचित तुम्ही मला वठणीवर आणायला उभी केलेली कोंडी माझ्या हातून हातोहात फुटली, याचंच ते तुमच्या मनाला वाटलेलं वैषम्य असावं !

त्या चळवळीतूनच माझ्या वाट्याला कारावास आला. तुरुंगामधील व त्यानंतरचा माझा रेंगाळता आजार, तुमची हुरहूर- दुःख, माझ्या मनाची भयंकर रस्सीखेच ! त्यानंतरचं माझं विषमज्वर-ॲपेंडिसायटीसचं जिवावरचं जोडदुखणं ! त्या वेळी सदूकाका धावले, तुम्ही धावला...एकाएकी द्रवून आलेल्या मनाने, धडधडत्या छातीने, तुम्ही दोघांनी केलेली माझी त्या काळातली अहोरात्र शुश्रुषा ! त्या वेळची तुमच्या

जीवाची ती धडपड, तो तुमचा कारुण्याने ओथंबलेला बेचैन चेहरा, माझं कृतज्ञ मन...
मी ते कधीच विसरू शकणार नाही. कित्येक वर्षांनी बालपणीचे, रसरशीत हृदयाचे आना मला त्या वेळी भेटले!

मी आजारातून साफ बरा झाल्यावर सदूकाका तुमचा निरोप घेऊन मजकडे आले होते. पण मी त्यांना तुम्हाला सांगायला निरोप दिला होता. त्यापुढे माझं आयुष्य माझ्याच पद्धतीने चालायचं होतं, ते कोणाला बदलणं आता शक्य नव्हतं. माझं आयुष्य मी सुखासुखी नि केवळ सुखासाठीच निवडलेलं नव्हतं. अर्थप्रधान जगाची, जडपायाच्या जडबुडाची, मला कल्पना आलेली होती. केवळ ध्येयवाद, केवळ भावना-बुद्धिवाद निरुपयोगी नि हास्यास्पद ठरतो, हेही मी जाणून होतो. पैशाशिवाय पाऊल उचलत नाही, हे का मी जाणत नव्हतो? पण म्हणून, मला स्वतःला बदलायचंही नव्हतं! म्हणूनच, मला स्वतःला बदलायचंही नव्हतं! म्हणूनच, राष्ट्रीय कॉलेजात पुन्हा प्राध्यापकाची मिळालेली तुटपुंजी नोकरी मी पत्करली होती.

*

माझ्या आजाराच्या वेळी तुम्ही माझ्या अगदी जवळ आला होता. पण मग, यापुढल्या घटनांमुळे तुम्ही पुन्हा दूर दूर गेला. पुन्हा एका नव्या अपेक्षाभंगाने एकूण तुमच्या असुखालाच मी कारण झालो!

सातआठ महिन्यांनी सदूकाकांबरोबरच तुम्ही अनपेक्षितपणे माझ्याकडे पाच हजार रुपये पाठवून दिले. प्रथम मी नको म्हणून सांगितले, तरी काकांच्या आग्रहाने, आपल्या निरोपाप्रमाणे मी ते स्वीकारले. पूर्वी चालू असलेल्या हालचालींत, साप्ताहिकाचा व त्याच्याच जोडीला छापखान्याचा व्याप उभारला-चालवला. रडखुडं आयुष्य चाललं होतं, पण मनाला खूप हुरूप, समाधानही मिळत होतं. तरी आपल्या रकमेचा मी केलेला तसला उपयोग, विनियोग मात्र पुन्हा आपल्या दृष्टीने अनपेक्षित व म्हणूनच आपल्या असुखालाच कारण झाला.

याच काळात मंगलचा माझा परिचय-स्नेह वाढला. तिच्याकडे मी खूप आकर्षिला गेलो. ते आपल्या कानी जाताच तिच्या भिन्न जातीयतेने आपण अस्वस्थ झाला. आपला फिरून अपेक्षाभंग झाला. मी त्यामुळेच माझ्या भावनांची लगाम खेचली. आपल्या असमाधानावर उभारलेलं माझं वैवाहिक सुख नि प्रेम मला नको होतं. तीही भावनाप्रधान पण तितकीच खंबीर, समजूतदार. आपलं पदवीपुढलं शिक्षण चालू ठेवून आपलं स्वतंत्र आयुष्य प्रवाद-आघात-संकटं सोसूनही ती जगू लागली. आम्ही दूर दूर राहिलो. त्यात तुमचा कसला अपेक्षाभंग नसला, तरी तुमचं मन एकदा दुखावलं गेलं ते गेलंच. अशा नियतियोगावर माझ्याकडे दुसरा कसला उपाय होता?

माझ्या व्यावहारिक व्यापांमध्ये मी अयशस्वी होत जात जात, अखेर माझी ध्येयप्रवण कल्पनासृष्टी फिरून अधिक शून्याप्रत येऊन पोहोचली, नि म्हणूनच चार वर्षांनंतर

मी फिरून या नव्या नोकरीच्या खोड्यात पडलो आहे. त्या घटनेकडे " सांगितलं नव्हतं ! " अशा हेटाळणीनेच तुम्ही पाहता, हे मी जाणू शकतो. पण जीवनकलह कोणालाच सुटलेला नसतो. तेव्हा, ध्येयं उरातल्या उरात दडपून, मधून मधून, परिस्थित्यनुरूप नागमोडी वळणं घेणं कोणालाही भागच पडतं ! त्याला मीच कसा अपवाद ठरणार ?

दोन महिन्यांपूर्वीच्या आपल्या भेटीत, माझ्या विवाहाच्या प्रश्नाला आपण स्वतःच जेव्हा तोंड फोडलंत, तेव्हा मी पूर्वीचीच निश्चित निवड कळवली. तुम्हांला ते पूर्वीइतकंच समाधानकारक नसूनही अखेर तुम्ही या वेळी संमती दिली. गेल्या पंधरवड्यात मंगलेशी माझं लग्न झालं. तेव्हा तुम्ही उपस्थित होता. पण त्या वेळच्या आपल्या मनःस्थितीवरून–वागण्यावरून, त्याही बाबतीत आपल्या झालेल्या अपेक्षाभंगाचीच मला जाणीव झाली. हीही एक कठोर नियतीच नव्हे का ?

*

आता ! अशी एकूण स्थिति–परिस्थिति–वस्तुस्थिती आहे. माझं एक भलंबुरं ध्येयजीवन, माझा स्वतंत्र जीवनकलह असाच चालू आहे—नि माझ्या हालचालींमुळे निर्माण होत गेलेल्या तुमच्या जीवनातील अपेक्षाभंगांची एक परंपराही अव्याहत चालूच आहे ! दुसरं काही नाही तरी आपली साधी सहानुभूती, प्रेमळ आशीर्वाद, यांचाच मला पाठिंबा तरी निदान लाभावा, हीच माझी एकमेव अपेक्षा वर्षानुवर्षे मनात राहत आली आहे. पण तेवढी मात्र अव्याहतपणे भंगतही आली आहे ! अयशस्वी जडजीवन नि यशस्वी नसलं तरी सापेक्ष समाधानकारक ध्येयजीवन यांच्या कठोर कात्रीतून माझे लहानमोठे तुकडे पडतात ! तरीही माझी निष्ठेने वाटचाल पुढे चालूच आहे.

मात्र, आपल्या या जीवनामुळे आपल्या पित्याचा सारखा अपेक्षाभंगच होत आहे, या जाणिवेमुळेच माझ्या एकमेव आशा–अपेक्षा पदोपदी भंग होत आहेत. ती रुखरुख माझ्याही मनाला घर करीत आहे, ती दुःखद होत आहे. हे आता लपवून ठेवणंही मला अशक्य होत आहे.

पण मग, हे दुःख असह्य असलं, तरी ते सहन करत करत आपल्याच मार्गाने पुढे जाणं, हेच माझं एकमेव कर्तव्य आहे, असंच आता मी तरी धरून चालत आहे. असो. मनातली हीच अखंड हुरहूर शब्दांत बोलकी करण्यासाठीच हे आज एवढ्या विस्ताराने लिहिलं.

प्रत्यक्ष जमलं नाही, अशक्य ठरलं, तरी आपल्याला सुख व्हावं, निदान मी आपल्या प्रत्यक्ष असुखाला तरी कधीही कारण होऊ नये, हीच इच्छा सदैव मनात बाळगणारा

आपला विनम्र— सदानंद

## दोन पिढ्यांतलं अंतर

१७ जानेवारी १९३६

प्रिय आना—

पंधरवड्यापूर्वी केव्हातरी सदूकाकांकडे तुम्ही माझ्या संसाराबद्दल पुन्हा एकदा आस्थेवाईक चौकशी केल्याचं ऐकलं. फार आभारी आहे.

हल्ली आम्ही दोघंही नोकरी करतो, ते ऐकून तुम्हांला फार आश्चर्य वाटलं, असं ते म्हणाले. तेवढ्यासाठीच हे लिहीत आहे.

“नोकरी कधी न करण्याचं म्हणणारा, स्वतःच नव्हे, आपल्या बायकोलाही नोकरीला पाठवायला कसा तयार झाला? खरं म्हणजे, या मुलांना आपोआप पैशाची किंमत-महत्ती कळू लागते. तारुण्याच्या सुरवातीच्या उड्या अशाच व्यवहारी नि कोलमडवणाऱ्या असतात, अनुभवानेच पहिली धुंदी पार उतरते! पण मग, नोकरीच करायची होती, तर घरचा धंदा काय वाईट का होता? त्याला का त्याने उद्धटपणे पाठ फिरवलीन?”

अशाच काहीशा प्रकारे, तुम्ही आपलं नवं असमाधान त्या वेळी काकांकडे व्यक्त केलंत असं ते मला हसत हसत म्हणाले. त्यांनाही ते काहीसं पटलं म्हणे. आनंद आहे! त्यामुळे माझ्या मात्र मनात अनेक भिन्न भावना तरळून-उमटून गेल्या. अर्थात याबद्दल मला काय वाटलं, काय वाटतं, हे आपल्यापर्यंत पोचवणं हे माझं एक कर्तव्य आहे, म्हणूनच हे मुद्दाम लिहीत आहे.

“आम्ही हे पूर्वीच सांगत होतो...यांना आता कुठं मागूनच हे पटतंय!” असं बोलणारे- वागणारे तत्त्वज्ञानी स्वतःला व इतरांना जास्तीत जास्त गोंधळात व दुःखात टाकतात! आना, तुमचे वरच्यासारखे उद्गार कितीही वात्सल्याचे नि आस्थेवाईक असले तरी तेही याच सदरात पडतात, यात मला तरी मुळीच संशय नाही.

*

एक गोष्ट निश्चित आहे, की मानवी जीवनातल्या काही हालचालीच अशा स्वरूपाच्या असतात, की त्यांचं यश केवळ पैशामध्ये मोजता येतच नाही. चालू युगात दुर्दैवाने असेल! तरीही एखादा विशिष्ट जीवनहेतू नि त्याबाबतच्या त्याच्या प्रामाणिक हालचाली कोणाला गौण-त्याज्य ठरवता येत नाहीत, त्या बदलता येणार नाहीत.

असल्या अनिश्चित जीवनाच्या व्यक्तींनी संसारच साफ टाळणं हा सर्वोत्तम मार्ग. पण मग संसार टाळणं हीही काही मोठी मर्दुमकी ठरू शकत नाही. मात्र संसार एकदा सुरू झाला, की तो केवळ पोरखेळही उरत नाही.

अल्पसंतुष्टता, कमीत कमी गरजा, यांची सनातन शिकवण जमेस धरूनही, मानवी संसारात किमान गरजा उभ्या या राहणारच. स्वतःला झेपणाऱ्या लहान चौकटीत संसाराचं चित्र व अस्तित्व बसवणं अगदी मनावर घेऊनही, आपला कुठे ना कुठे

नाइलाज हा होतोच. अशा स्थितीत, कित्येकांना प्रत्यक्षाप्रत्यक्ष व स्वतः आपल्यालाही दुखवणं, वारंवार दुखवणं, आपल्या कपाळी यायचंच ! असे आपण अनेकदा दोषास्पद ठरायचोच ! तेवढ्यासाठी, केवळ आपल्या अंतिम साध्यांसाठी म्हणूनच, तात्पुरती नागमोडी अशी वळणं-वळणंही माणसाला घ्यावी ही लागायचीच !
तेव्हा तुमच्या दृष्टीची तसली दोषास्पदता स्वीकारण्यासदेखील मी एक वेळ तयार होईन. पण, मला जे मनोमन पटत नाही, आवडत नाही, पेलत नाही, ते केवळ दांभिकपणे इतरांसाठी आयुष्यभर करीत राहायला मी कधीच कबूल होणार नाही.

*

माझ्या दृष्टीने तरी, माझं पाऊल माझ्या ध्येयकार्यामध्ये पुढेच आहे. त्या माझ्या धडपडींचं दृश्यफळ, त्याचं मोजमाप, मला पटकन कोणाला दाखवता येणार नाही, नि 'फलानुमेयाः प्रारंभाः' ही मशहूर जनरीती मलाही पुरी परिचित आहे. तरी देखील, आता, सर्वसाधारण तरुणापेक्षा मी खात्रीने एक निराळं, धडपडीचं नि महत्त्वाकांक्षी आयुष्य जगत आहे, आयत्या पिठावर रेघोट्या मारण्याचं सदैव त्याज्य ठरवलं आहे, माझ्या मार्गाने मी एक अविश्रांत असा चिकाटीचा, धीराचा प्रयत्न करीत आहे ! माझं मला लाभत असलेलं हे असलं समाधान ! ते तरी माझ्यापासून कोणी हिरावून घेऊ शकत नाही ना ?
तेव्हा माझ्या असल्या नोकरीचं माझ्या यशस्वी पित्याला मुळीच कसलं आश्चर्य वाटायला नको ! विशेषतः छोट्या-मोठ्या ध्येयवादी संसार-जीवनांच्या यशस्वितेच्या मार्गांमध्ये, प्रतिकूल परिस्थितीचे तट वारंवारच येत असतात. परिस्थितीशी तात्पुरती तडजोड करणं प्रत्येकाला भागच होतं. आपला स्वाभिमान व स्वातंत्र्य कायम ठेवण्यासाठी, व्यक्तिगत निर्धनतेला सावरून धरण्यासाठी, केवळ एक किमान दर्जाचं संसारसाधन म्हणून, एखादी तात्पुरती नोकरी पत्करण्यात कमीपणा तो कसला ? यात "तारुण्यातील पहिल्या उड्यांची धुंदी उतरण्याचा" प्रश्नच येतो कुठे ?

*

राहणीचा दर्जा आपल्या मनाजोगता ठेवण्यासाठी माझ्याबरोबर माझ्या पत्नीनेही नोकरी धरणं, हे आपल्या घराच्या आजवरच्या प्रतिष्ठित परंपरेला धरून नसेल; पण त्यात तरी वावगं ते काय ? बदलत्या काळानुसार ते अदलबदल घडणारच, त्यांचा स्वीकार करावा लागणारच, ते पाहावे लागणारच !
नोकरी हा, ध्येयदृष्ट्या, काही प्रमाणात कालापव्यय होय; गेलं तारुण्य, गेला उत्साह, गेली शक्ती, गेली संधी, फिरून कधीच येत नसते, याची मलाही जाणीव आहे. पण मग आपापलं आयुष्य, आपापल्या परिस्थितीनुसार, आपापल्या मार्गाने आपलं आपणच जगायला हवं, हे तत्त्वही मी पूर्णपणे जाणतो ! नि म्हणूनच, तेच मी आचरणात

आणतो आहे.
सध्या मी व सौ. मंगल अशी दोघंही परिस्थित्यनुसार नोकरी करीत आहो, हे योग्यच नव्हे का? आमची उभयतांची नोकरी हा कुळमाचाच रामराम असेल, पण तो खुषीचा सौदा आहे. पण तो क्रमप्राप्त नि तात्पुरताच आहे. म्हणूनच आपल्या पदवीधर कुवतीचा, आजच्या धकाधकीच्या जमान्यात, सौ. मंगलही उपयोग करीत आहे, तीही अर्थोत्पादन करते आहे, तिच्या ध्येयानुसार तीही माझ्यासह अहोरात्र धडपडत आहे, माझ्या छोट्याशा निर्धन संसाराच्या गाड्याची दोन्ही चाकं संवादी प्रवास व सहवास करीत, एकूण पुढेच जाण्याचा असा सुरळीत प्रयत्न करीत आहेत! मला त्याचा मनात उलट अभिमान वाटतो. तसा आपल्यालाही वाटत नसला, तर अर्थात आपणा उभयतांचं ते दुर्दैवच म्हणायचं!

*

नोकरीऐवजी घरातला धंदा वाईट नव्हता हे कबूल, पण मला तो आवडणारा नव्हता. पुन्हा ज्या विशिष्ट परिस्थितीने मला तो हाताळावा लागला असता, त्यात माझा खरा उपयोग तुम्हांला कधीच झाला नसता. त्यातून आपणा दोघांनाही सुखापेक्षा दुःख-असमाधानच अधिक भोगावं लागलं असतं. अधिक स्पष्टपणे न लिहिता मी एवढंच म्हणतो, की माझ्या अभावी श्रीधर आता आपल्याला उत्तम मदतनीस होत चालला आहे असं जे सदूकाका म्हणाले, तेच मला अधिक आनंददायक आहे. मात्र, असल्याबाबतचे अभिप्राय व्यक्त करताना "हेड्स आय विन, टेल्स यू लूज—" अशा प्रकारची विचारांची वाटणी आपण कृपा करून मनात ठेवू नये व बोलूनही दाखवू नये!
आता, प्रत्येक महत्त्वाकांक्षी, ध्येयशील, कामसू तरुण स्वतःच्या आयुष्याची आखणी-उभारणी आपल्या प्रामाणिक कल्पनांप्रमाणे करण्याचा प्रयत्न तरुणपणी करीतच असतो. अशा वेळी, आपल्या कर्त्या वडील मंडळींचा आर्थिक, नैतिक, आनुभविक असा एक सदिच्छापूर्ण पाठिंबा आपल्याला लाभावा, त्याचा सर्वांगीण आशीर्वाद मिळावा, असं त्याला नैसर्गिकपणेच वाटत असतं नि ते त्याचं हक्काचं नि न्याय्य असंच नसतं का? न्यायबुद्धी 'हो' असंच म्हणेल.
पित्याची स्थिती जितकी स्थिर व संपन्न, तितका मुलाने अधिक उच्च ध्येयांच्या स्वतंत्र कल्पनांना वाव देण्याचा प्रयत्न करणं हेच रास्त ठरणार! तेच त्याच्या व साऱ्या समाजाच्याही हिताचं असणार. अशा वेळी केवळ स्वतः चोखाळलेल्या मार्गाचा, स्वतःच्या मूल्यांचा, कल्पनांचा, मोठेपणाचा नि स्वतःकडून होत आलेल्या- होणाऱ्या साहाय्याचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष वृथाभिमान व दुराग्रह पित्याला शोभायमान तरी खासच ठरत नाही. किंबहुना, ते अनैसर्गिक नि कठोरच होय.
सुशिक्षित तरुण व त्याचा विचारी, अनुभवी, यशस्वी बाप यांचे संबंध हे केवळ

अधिकार-सत्ताप्रेरित, औपचारिक, ह. आ. पै.चे नि एकतर्फी असावेत, हे कोणताही विचारी माणूस कबूल करणार नाही. पिता हा पुत्राचा केवळ एक प्रेमळ, अधिक अनुभवी, जिवलग स्नेहीच असतो! म्हणूनच, पित्याच्या ठिकाणी सहानुभूती अधिक असावयास हवी. योग्य तऱ्हेच्या पण नवीन मार्गाने मुलगा जात असला, तर त्याला सदैव उत्तेजन देणं, आपल्या दृष्टीने त्याचं त्यात काही चुकत असलं तर त्याला युक्तिवादाने पटवून, तो सुधारून योग्य मार्गाला लागेल अशी सुलभ वाट करून देणं, हेच त्याचं कर्तव्य असतं!

*

दुर्दैव मात्र असं, की या घटकेची जाणती, अनुभवी, यशस्वी पिढी पार निराळी आहे. तिची पद्धती मोठी गमतीदार आहे. स्वतःला ती नव्या सुधारकांमधे जमा करून घेते. तरी पण, त्या विचार-आचार-मतांची-नियमांची अभिव्यक्ती मात्र अगदी विलक्षण असते. ती ते अगदी विवक्षित मर्यादेपुरतीच वापरताना आढळतात. त्यांनी आगाऊच कल्पिलेल्या या मर्यादांपुढे त्यांचा अनुभव, त्यांचा युक्तिवाद, त्यांची बोलकी धिटाई कधीच जाऊ शकत नाही. अशा वेळी त्यांच्या अंगी एकदम निराळ्याच प्रकारच्या अहंगंडाचा — 'सुपीरिऑरिटी कॉम्प्लेक्स'चा — अस्थानी आवेश संचारतो. त्यांच्याच मनाचे नवखे कप्पे — 'वीक पॉइंट्स' — त्यांना भेडसावू लागून दगा देतात! आणि मग एकदम पलटी खाऊन, थेट राणा भीमदेवी थाटात ते तरुण पिढीला ओरडून म्हणतात, "चूप! मी सांगतोय ते ऐक! तुला काही एक कळत नाही, माझंच बरोबर आहे. तुझ्या युक्तिवादाच्या शाब्दिक कोल्हांटउड्या माझ्यापुढे तरी चालणार नाहीत. या जगात तुझ्यापेक्षा मीच अधिक पावसाळे काढले आहेत. तू जितक्या दिवक्या अजूनपर्यंत मोजल्या नसशील, तितके रुपये मी मिळवले आहेत, मोजले आहेत, बँकेत सांभाळून ठेवले आहेत! मी तुझा बाप आहे, हे तू विसरलास वाटतं!"

*

मात्र थोड्याच काळापूर्वी, आपल्या तारुण्यात, आपणही आपल्या पद्धतीच्या तसल्याच कोल्हांटउड्या खाल्ल्या होत्या, किंबहुना चालू काळीदेखील, जड जीवनाच्या जड व्यवहारांत, लहानमोठ्या आर्थिक फायद्यासाठी तसल्याच शाब्दिक कोल्हांटउड्या आपण आजही खातो, अगदी राजरोसपणे ते सारं आपण करतो, हेच ते त्या वेळी पार विसरून जातात. हरघडी खोटे मुखवटे लावून, राजाचे नि देवाचे, संताचे नि साधूचे आव आपणही आणीत होतो, आणीत असतो, हे त्या क्षणी त्यांच्या ध्यानीमनीही नसतं. आपल्याप्रमाणेच या तरुणांनाही काही मतं, दृष्टिकोन असणार, त्यांच्याही आवडीनिवडी, भावना, व्यक्तित्व-वैशिष्ट्य असणार — हे ते सारं सारं एका क्षणात — आपल्या त्या अहंगंडी आवेशातच — पार पार विसरतात!
मला कोणी विचारलं तर मी म्हणेन, आजचा तरुण विचारी, सुसंस्कृत, सुशिक्षित,

आहे; तो फटकळ, स्पष्टवक्ता, अधिक युक्तिवादी वृत्तीचा असला, त्याचे जुन्या पिढीशी मतभेद— अगदी तीव्र मतभेद — असले, तरी तो आपल्या पित्याबद्दल जितका आदर बाळगत असतो, त्याच्या शतांशही, ही मावळती पिढी आपल्या तरुण मुलांच्या भावभावना, इच्छा–आकांक्षा, यशापयशं, ध्येयं, कर्तबगारी इत्यादि सुस्पष्ट वैशिष्ट्यपूर्ण बाबींबद्दलचा अभिमान, आपुलकी, सहानुभूती, प्रेम... मुळीच बाळगत नाहीत. त्या त्यांच्या विरोधामागे हेतू चांगले असतीलही कदाचित ! पण तरी तरुणांच्या नैसर्गिक आकांक्षांच्या तपशिलांकडे, त्यांच्या ध्येयांकडे, तत्त्वांकडे, ते अनुसरीत असलेल्या भिन्न मार्गाकडे जुनी माणसं खुल्या दिलाने कधी पाहूच इच्छित नाहीत, शकत नाहीत ! 'आपले डोळे– आपलं जग' ही एकच एक त्यांची जगाकडे पाहण्याची दृष्टी असते.

*

काळ पार बदलला आहे. परिस्थित्यनुरूप ध्येयं बदलली आहेत. अभिनव संक्रमणावस्थेचा पुढला पल्ला गाठण्याचा समाज नेटाचा प्रयत्न करीत आहे. अशा या वेळी, नव्या तरुण समाजघटकांच्या जीवन–तत्त्वज्ञानामधे नि जीवननिष्ठांमधेच एकप्रकारची आमूलाग्र व विविध क्रांती घडून येत आहे ! हे जुने–जाणते नेमकं हेच विसरतात !

आपल्या काळात आपण एकदा हस्तगत केलेल्या विशिष्ट व आपल्याला सुलभ झालेल्या लहानमोठ्या यशांच्या धुंदीतच ते गुंग असतात ! नि त्याच पूर्व–यशाच्या हस्तगत भांडवलाच्या जोरावर आजच्या उगवत्या तरुणाला मात्र पूर्णपणे निष्क्रिय, कमी बुद्धिमान, ऐदी, नालायक, असं तडकाफडकी ठरवून ते मोकळे होतात. त्याच आपल्या आर्थिक सुस्थिती–संपन्नतेच्या जोरावर, स्थैर्यावर, स्वतः विराजमान राहून, तरुणांची ते खुशाल मानखंडनाही करतात. अकिंचन पण अन्यप्रकारे उज्जिगीषू वृत्तीच्या या नव्या पिढीची— त्यांच्या चुकांबद्दल, व्यापक ध्येयांबद्दल— ते पदोपदी अवहेलनाच करतात.

पोहायला तर द्यायचं नाही... नि पोहता येत नाही म्हणून पुन्हा खदखदा हसायचं ! अशा प्रकारचाच तो एकूण सारा न्याय !

हे सारं त्या मावळत्या पिढीच्या हातून इतक्या गणितभेदीने होत जात आहे, की आपली निर्धनता, सापेक्ष अपयशं इत्यादी या कालपरवाच्या यशस्वी जाणत्या माणसांकडून, हेटाळणीच्या रूपाने वारंवार उगाळली गेलेली पाहून ते बापडे नवतरुण क्षणभर खिन्न, सुन्न, निरुत्साहीच होऊन जातात ! कित्येकदा तर त्यांची उरलीसुरली धिटाई, कर्तृत्वशक्ती, उच्च ध्येयप्रवणता, सारं काही, त्यांच्यावर होणाऱ्या या न्यूनगंडाच्या कायम संस्कारामुळे कित्येकदा पार नष्टही होतं !

हा जुन्यांचा अहंगंडाविष्कार त्यांना अगदी नकळतही होत असेल, त्यात दुष्टावा

नसेलही, पण मग समाजप्रगतीच्या व्यापक हालचालींच्या कसोटीवर तर ते त्यामुळे त्यासच अवसानघातकी समाजद्रोही ठरतील !

*

तुम्च्या यशस्वी पिढीच्या तरुण वारस पिढीचा एक घटक प्रतिनिधी या नात्यानेच मी हे सुचलं तसं लिहिलं...ते बहुतेक सत्याचं, पथ्याचंच असेल व आहे, पण त्यातून उथळ अभिनिवेशाचा व व्यक्तित्व-अनादराचा विपरीत अर्थ कृपा करून घेऊ नये, हीच विनंती. आशीर्वाद असावा.

आपला
सदानंद

## स्पष्टोक्तीचं अतिक्रमण

१२ मार्च १९७८

प्रिय आना—
समक्ष भेटींमधे व कार्ड पाठवून, गेल्या तीनचार महिन्यांत तुम्ही अशी इच्छा व्यक्त केली की, मी आपली अखेरची व्यवस्थाविषयक टिपणं पाहावीत. त्या साऱ्या आपल्या पश्चातच्या गोष्टी, त्यातून लाभणाऱ्या स्वार्थाबाबत मी उत्सुकता का दाखवावी ! तसल्या नाजूक प्रश्नांत ओढलं जाण्यापेक्षा ' अज्ञानातील आनंद 'च अधिक हितकर, असं वाटून मी नको म्हणालो, कारण तशी स्पष्टव्यक्ती मतं कळवणं, अभिप्राय देणं, म्हणजे नवे वादविवाद, किल्मिषं, दुःख ओढवून घेणं, असंच मला वाटत होतं.
पण आपण फार आग्रह केल्यामुळेच मी अखेर कबूल झालो. " कसल्या सूचना करणार नाही " ही माझी त्या वेळची अट होती. पण वाचल्यावर पुन्हा तुम्ही खोदखोदून प्रश्न विचारलेत नि किंचित चिडक्या स्वरात म्हणाला, " मनातलं सांगणं कर्तव्यंच आहे तुझं. तुझ्या कल्पना समजल्याच पाहिजेत मला. माझं कोठे काही चूक असेल, तर तू तरी ते बरोबर कसं करशील, ते मला तुझ्याकडून समजू दे ! पटलं तर मी स्वीकारीन नाही तर सोडीन, तुझं तर काम तू कर ! "
एकूण माझा नाइलाच झाला आहे. अशा सूचना करण्याचा कसला हक्क-अधिकार मला मुळीच नाही. स्वार्थ-दुष्टाव्याचे, वाकड्या हेतूचे आरोप मजवर होऊन गैरसमज माजण्याचाच प्रसंग असा माझ्यावर लादल्यासारखं झालंय हे. पण आता आपल्या इच्छेला मान देऊनच हे लिहून पाठवीत आहे. स्वीकारण्यास-धिक्कारण्यास तुमचे तुम्ही सर्वस्वी समर्थ, स्वतंत्र अधिकारी आहा—

*

( १ ) माझ्या मते माझ्याबद्दलचे आपले अभिप्राय-व्यवहार टिपणांमधे अस्थानी आहेत. पित्याचा तो अधिकार मान्य करूनही ते सर्व अगदी हास्यास्पदच आहे.
( २ ) श्रीधरला त्याच्या आईच्या पश्चात तिचे दागिने स्मरणखूण म्हणून मिळणार असल्याचं वाचलं. मग माझी आई ? तिचे दागिने ? मला मिळू शकणारी स्मरणखूण ? माझ्या आईला दागिन्यांचा मुळीच सोस नव्हता हे खरं, पण मग तिच्या वडिलांनी तिच्या लग्नात अगर माझ्या वडिलांनी तिच्या साऱ्या आयुष्यात कधी तिला दागिनेच केले नसतील, केले असलेले अदृश्य झाले असतील, असं मी कसं समजू ? माझं एक असो, पण गंगाअक्का, निर्मला या तिच्या मुलींना तरी तसं विचारण्याचा हक्क आहे ना ?
( ३ ) तुमच्या सर्वच मुलींची लग्नं झाली आहेत आता. निर्मला आपल्या पायानेच घरातून निघून गेली असल्यामुळे तिच्या लग्नाचा त्रास, खर्च, यांचा प्रश्न त्या वेळी परभारेच संपला. " ती काहीशी हेकेखोर, स्वैर व उद्धटवृत्तीने वागली " असाच लिहिण्याच्या ओघात तुम्ही टिपणात निर्वाळा देऊन ठेवलेला आहे. तरी पण, गंगाअक्का व निर्मला यांना जे समान दिलंत, ते तुमच्या दुसऱ्या दोघा मुलींच्या ( त्यांची लग्नं करून दिल्यावरसुद्धा ) जेमतेम एकतृतीयांश इतकंच का भरलं ? हा केवळ योगायोग नि हिशेबी भूलचूक समजायची काय !
( ४ ) आपल्या पत्नीला मुलांइतकेच समान हक्क द्यायचा आपला निर्णय रास्तच आहे. तसे तीन तुकडे करून आपलं वैभव तुम्ही वाटलं, तर ते योग्यच. पण मग, तिच्या पश्चात तो तिच्याच मुलाला मिळावा असा आगाऊच निर्णय आपणच देऊन ठेवणं, हे तुमच्या अधिकारकक्षेत कसं बसतं ? ते तसंच प्रत्यक्षात साहजिक होणार असेलही ! तरीपण, तसं स्वतःच तुम्ही निर्णयात्मक लिहून ठेवणं, म्हणजे आपल्याच हाताने दोन व एक असे गट पाडण्यासारखं अन्याय्य व तर्कदुष्ट हे ठरणारच ! वरवरचा न्यायाचा बुरखा घालता घालताच, फाटल्याचं, कोणत्याही सामान्य बुद्धीच्या माणसाला पटकन समजणार, तसंच ते मलाही समजतं. लहानपणी तुमच्याच तोंडून आम्ही ऐकलेल्या ( " पांडव किती ? बाजेच्या खुराइतके—दोन—" म्हणून हाताने दोन बोटे दाखवून, एक डोळा मिटण्याच्या ) एका गोष्टीकडे मला माझे दोन्ही डोळे सहजासहजी झाकता कसे येणार ?

*

(५) स्वतःच्या पश्चात पत्नी ताठ मान करून, कसलीही ददात न पडता चालावी-राहावी, तिच्या स्वातंत्र्यावर कोणाही मुलाची छाया पडू नये, कोणाचा उपद्रव तिला होऊ नये, ही आपली साहजिक व रास्त इच्छा मलाही शिरसामान्य आहे. स्वतःच्या देखरेखीखाली, स्वतःच्या इच्छेप्रमाणे, हाताखाली धंद्या-उद्योगाचं काम करीत आलेला तुमचा धाकटा मुलगा—अननुभवी, अजून स्थिरता न पावलेला, तेव्हा त्याला आपल्या वैभवाचा अधिक पाठिंबा मिळावा, तो आपल्या मोठ्या भावाकडून

बनला जाऊ नये, असं आपलं कमीजास्त आग्रही स्वरूपाचं नि सावधगिरीचं धोरण असावं, यातही वावगं ते काय शोधणार !

जवळ जवळ मिसरूड फुटल्यापासूनच, ज्याने आपल्या स्वतंत्र ( स्वैर ) वागणुकीमुळे तुम्हांला प्रत्यक्षाप्रत्यक्ष मनस्ताप नि त्रास दिला, ज्याच्याबद्दलच्या तुमच्या व्यक्तिगत सर्वच अपेक्षा या ना त्या प्रकारे पार दुखावत गेल्या, सत्रा लहरींच्या स्वतंत्र साहसी उचापती करून ज्याने स्वतःच्या व काही अंशी तुमच्यादेखील पैशाचा थोडाफार अपव्यय केला, जो मोठा असूनही तुमच्या व्यवहारात नि धंद्याव्यापात लक्षच घालू शकला नाही, तुमच्या कोणत्याही कल्पना-योजनेत जो कधीच समरस होऊ शकला नाही, जो घरी कधी टिकू शकला नाही, वैभवाची आपल्याला फारशी तमा नाही असं म्हणत, काहीशा उद्धटपणेच परिस्थितीशी व तुमच्याशी जो वागला नि वागतो असं तुम्हाला निश्चित वाटतं, तोच आपला मोठा मुलगा—मी !

तेव्हा आपलाच म्हटलं तरी त्याच्यावर स्वतःच्या पश्चात काही काटेकोर बंधनं लादलेली असलेली बरी, आपल्या पत्नीवर त्याची कसलीच प्रत्यक्षाप्रत्यक्ष हुकमत चालता कामा नये, त्याने आपल्या धाकट्या भावाला कसला उपद्रव तर पोहोचवू नयेच, पण उलट, जमेल तर, जमेल तेव्हा, त्याने त्याची शक्य ती काळजीच घ्यावी, आपल्या पत्नीलाही तिच्या वृद्धापकाळी तो मदतनीस व्हावा नि म्हणूनच त्याचे आपल्या पश्चातचे सारे व्यवहार ' एक घाव, दोन तुकडे ' पद्धतीचे स्वतंत्र ठेवू नयेत, तर त्या उभय व्यवहारांमधे एक सुप्त सांगड नि गुंतागुंत ठेवावी... असं सारं तुमच्यासारख्या कर्तुमकर्तुम् शक्तीच्या वैभवसंपन्न माणसाला वाटलं असावं, हेही मी पूर्णपणे जाणतो. ते सारंच दोषास्पद, असंही मी म्हणत नाही.

तो एकूण विशिष्ट दृष्टिकोण व भावी व्यवहार-योजनेचा तो सांगाडा तुमच्यासारख्या व्यवहारकुशल माणसाला सुचला नसता, तरच आश्चर्य. त्यातले बरेच तपशील अमान्य असूनही, आपल्या पित्याच्या या एकूण व्यवहार-कौशल्याचं मला एकंदरीत कौतुक वाटलं.

तथापि या बाबतीतही काही गोष्टी स्पष्ट करून टाकणं आता मी माझं कर्तव्यच समजतो-

*

( ६ ) दोघा भावांमधे अथवा आई-मुलांमधे प्रेमलोभ राहण्यासाठी व्यावहारिक गुंतागुंतींची, अखेरच्या आदेश-संदेशांची, कायदेशीरपणे नमविणाऱ्या बंधन-अटी-योजनांची मुळीच जरूर नसते. ती तुमची सारी खटपट व्यर्थ आहे, निरुपयोगी आहे. मानवी भावनांचं त्यात अज्ञान आहे. कारण, कायदा व व्यवहार माणसाला प्रेम करायला तर कधीच शिकवणं शक्य नाही. त्यासाठी उपयोगी असेलच तर सर्व दृष्टींचं परस्परस्वातंत्र्य, परस्परनिर्लेप देवाण-घेवाण ! तरच निरनिराळं राहूनही एकमेकांना स्नेह-प्रेम ठेवून मदत करता येते.

केवळ कायदेशीरपणा, हकबाजी, गुंतागुंत यांमुळे, मुळीच नसेल तिथं व नसतील ते सद्‌हेतू-प्रेम कधीच उद्‌भवणं शक्य नाही.

( ७ ) ' श्रीधर ' बंगल्याची तुम्ही ठरवलेली सामायिक मालकीच उदाहरणार्थ घ्या. आपल्या पश्चात त्याची मालकी तुमच्या पत्नीकडे. दोघा मुलांनी तिला भाडं देऊन त्यात राहायचं. तिच्या पश्चात तो दोघा मुलांच्या समान मालकीचा. पार्टिशन-भिंती घालून त्याची वाटल्यास वाटणी करायची. पत्नी हयात असेपर्यंत तिने मुलांकडून हवं तर भाडं मागावं, मागू नये. अशा प्रकारच्या ' जरी-तरी 'ची व वर्षानुवर्षं चालू राहणारी तुमची ती योजना आहे. त्यामुळे, असलेलं प्रेमदेखील नाहीसं होईल, तेढी वाढतील, तंटेबखेडेच उभे राहतील—व म्हणूनच ते सर्व त्याज्य आहे, हे मी इथं तुम्हाला अगदी स्पष्ट शब्दांतच सांगू इच्छितो.

थोडक्यात, जे असेल ते कमीजास्त, सलग, स्वतंत्र असावं; प्रेमासाठी देखील त्यात कसलीच गुंतागुंत नसावी. प्रत्यक्ष नसावी, अप्रत्यक्षही नसावी.

*

( ८ ) तुमची टिपणं वाचून अखेर मला मुख्य एवढंच एक सुचवायचं आहे, की त्या मांडणीमध्ये अतिशय गुंतागुंत तर आहेच, पण त्यात पुन्हा विषम गोष्टींना समानतेचे अकारण पोषाखही चढवले गेले आहेत. जे करायचं ते स्पष्ट शब्दांत नि उघडपणे केलं तर हरकत नसते. पण लोखंडाला अकारण सोनेरी मुलामा चढवलेला बरा दिसत नाही. एवढ्याचसाठी, मी अधिक तपशिलात न शिरता एवढंच म्हणेन, की असल्या गुंतागुंतीच्या खटाटोपाची मुळीच जरुरी नाही. एकच स्पष्टपणे लिहावं की, “ सदानंदला मी अमुक एक गोष्ट देत आहे. ती त्याने स्वतंत्रपणे वापरण्यासाठी समाधानाने घ्यावी. ” अशा पद्धतीने केवळ एक आशीर्वादपूर्वक नारळ जरी आपल्याकडून मला मिळाला, तरी तो मला सुखद होईल.

माझी प्रामाणिक स्पष्ट मतं तुम्हाला हवी होती, म्हणूनच ती आतापर्यंत मी येथे मांडली. त्यात उद्धटपणा नाही, अपमानाचा हेतू नाही, कोणाबद्दलचा दुष्टावा-मत्सर तर मुळीच नाही. स्पष्टवक्तेपणा मात्र भरपूर आहे, नि तो तुम्हालाही हवा होताच. मी लिहिलेलं हे खरं खरं, मनापासून व प्रामाणिकपणेच लिहिलेलं आहे. त्यामुळे त्यात माझ्या दृष्टीने कधी बदल होण्याचा संभव नाही. याच दृष्टीने, जरूर तर याचा कायदेशीर बाबींसाठीही आपल्याला उपयोग करायला माझी कसली हरकत नाही. निःस्वार्थी, निर्भय, प्रेमळपणेच मी हे सर्व लिहून कळवलं आहे.

आणखी एक स्पष्ट करायचंय—आपल्या पश्चातचं माझं कर्तव्य मला आज जे व जेवढं समजतंय तेवढंच पुढेही मला समजणार. आपल्या संदेश-आदेश-उपदेश यांनी किंवा कायदेशीर तटबंध-बंधनांच्या उल्लेखांनी ती कर्तव्यबुद्धी नव्याने निर्माण होणार नाही, की वाढणारही नाही. माझ्या मनात तशी इच्छा नसलीच, तर तीही नव्याने

उत्पन्न होणार नाही. तर मग, आपल्या व्यवहारचातुर्यावर व न्यायीपणावर उघडउघड दिसणाऱ्या विकृत समर्थनाचे ठिबके टाकण्याचे द्राविडी प्राणायाम तरी हवे आहेत कशाला हे ?

*

( ९ ) मी स्वतः काय काय केलं असतं, या दृष्टिकोणाच्या विधायक सूचना करायलाही तुम्ही मला सांगितलं होतं. वैभवसंपन्न माणसाच्या ठिकाणी स्वतःला कल्पिणं व त्या दृष्टीची योजना करणं, हे खरं म्हणजे हास्यास्पदच आहे. ते शक्यही नसतं ! तरी पण आपल्या इच्छेप्रमाणे मी तोही प्रयत्न केला आहे. त्या योजनेचा स्वीकार करा असा माझा किंचिन्मात्रही आग्रह नाही. मी कोणी व्यवहारज्ञ नाही, पण मी वाचलेल्या एका जुन्या गोष्टीमधल्या त्या माणसाची मला येथे एकदम आठवण होत आहे.
त्याने केलेलं मृत्युपत्र—छोट्यात छोटं— अगदी एका परिच्छेदाचंच होतं म्हणे. दोघा मुलांसाठी त्याने लिहून ठेवलं होतं, " आहे ते सर्व यादीत आहे. आहे ते सर्व तुम्हा दोघांचंच आहे. तेव्हा अनुभवी मोठ्याने त्याचे दोन सारखे वाटे करावेत नि मग धाकट्याने त्या दोन वाट्यांपैकी त्याला हवा तो प्रथम निवडावा. विभागणी करणाऱ्या मोठ्याने उरेल तो स्वतः घ्यावा ! देव तुमचं दोघांचंही कल्याण करील ! "
आज तसलाच अधिकार मला तुम्ही दिल्यासारखं गृहीत धरून, मी तेच केलं आहे. तथापि सोबत स्थूल नकाशे आहेत. वाटणीचे त्यात पाचसहा पर्याय आहेत. कोणत्याही एका पर्यायातील एक भाग स्वतः आपणच श्रीधरतर्फे निवडावा, त्या योजनेतला उरलेला भाग, त्या योजनेत उरलेल्या आगाऊ काटेकोर तपशिलांसह आपणच उचलून मला द्यावा.
हीच माझी कल्पना, योजना ! पण तीसुद्धा आपल्याला पटेल असं मला मुळीच वाटत नाही. नि तशी माझी अपेक्षाही नाही. हे केलंय ते सारं आपल्या इच्छेने केलंय ! काही झालं तरी तेही आपल्या इच्छेनेच होणार ! या बाबतीत मला कसलेच नैसर्गिक वा कायदेशीर हक्क नाहीत, अशी माझी पूर्ण व प्रांजळ समजूत आहे.
या सर्व बाबतीत, येथवर झालं-लिहिलं तेच भयंकर, माझ्या ते आटोक्याबाहेरचंच होतं ! पण तुमच्या आग्रही इच्छेनेच हे सारं मांडलं आहे.
कृपया, यापुढे आणखी काही या बाबतीत मला विचारू नये. कळवूही नये. त्यानेच मला अधिक समाधान लाभेल. तसेच आपल्याला व इतरांनाही ते वाटेल. माझ्या दृष्टीने तरी या प्रकरणावर येथेच पडदा पडला आहे.
अधिक-उण्याची माफी मागणारा व ईश्वर आपल्या सर्वांचंच शुभ करो ही इच्छा करणारा...

आपला विनम्र
सदानंद

## दडपलेल्या भावना

१ डिसेंबर १९४०

प्रिय आना–

कोंदाटल्या भावनांना वाव करून द्यायला म्हणून हे लिहायला घेतलं खरं—पण हजारो दृश्यं समोर उभी राहून प्रचंड कल्लोळ तेवढा माजत आहे. बालपण सारं डोळ्यांपुढून भराभर तरळून जात आहे. आई–वडील दोन्ही जागा भरून काढणारे प्रेमळ आनाच, आम्हा पोरांना घेऊन हसतखेळत गोष्टी सांगत बसलेले मला फिरफिरून दिसत आहेत. पण त्यातूनच तो एकच एक प्रसंग फिरफिरून माझ्या डोळ्यांसमोर येऊन मला सतावीत आहे. त्या दिवशी आम्ही शाळेतून परतल्यावर, डोळ्यांत चमकलेलं पाणी पुसत, भागाआत्यानं घोगऱ्या आवाजात उद्‌गारलेले ते शब्द सारखे कानावर फडफडत आहेत... डोळ्यांत पाणी आणून ती गंगाअक्काला म्हणत आहे, "आठवण झाली सहज तुमच्या आईची! 'तुमचं कसं होणार?' अशी आनाला आता काळजी लागलीय! आम्ही ग काय, चुलीतली लाकडं—या तुमच्याच घरात जळून अर्धी झालो! पण आम्हा पांढऱ्या कपाळाच्यांना काय पोरांची माय समजते! म्हणून—तो तुम्हाला वाढवायला घरात एक हक्काचं तरणंताठं माणूस आणतोय हो!—त्याचं बरोबर आहे, पण मला आपली माझ्या बालमैत्रिणीची, यशोदावहिनीची—तुमच्या आईची आठवण झाली. माझं हे मेलीचं मनच असं!"

त्या वेळी आत्याने आमचे सर्वांचे भराभरा मुके घेतले होते. एकीकडे ती ओक्साबोक्शी रडली होती.

तो प्रसंग आला–गेला—त्यानंतर दुसऱ्या दिवशी घरात नानी आल्या. त्यानंतरच्या आजपर्यंतच्या तेवीसचोवीस वर्षांच्या काळात अनेक घटना आल्या–गेल्या.

पण तो एकच एक प्रसंग नि आत्याचे ते उद्‌गार मला पुन्हा पुन्हा घेरत आहेत.

*

कारण, त्यानंतर पुन्हा कधीच आम्हांला आमचे पूर्वीचे आना दिसले नाहीत. आईपाठोपाठच आमचे परिचित आना आम्हांला कायमचे सोडून गेले, याचीच एक तीव्र जाणीव तेवढी आमच्या मनात अधिकाधिक नि कायमची स्थिर होत गेली. कारण, त्यापूर्वीचं माझं भावजीवन नि त्यानंतरचं आजपर्यंतचं, यांची ती एक सीमारेषाच होती. त्यावेळच्या बालमनालाही त्याची त्या वेळीं अभावितपणे पक्की जाणीव झाली होती! मग भोवतालची परिस्थिती अगदी नकळत, हळूहळू कात टाकल्याप्रमाणे, कायाकल्प केल्याप्रमाणे, बदलली. जसजसा मी वाढत गेलो, तसतसं मी माझ्याच मनाला अधिकाधिक शिकवत गेलो. घरी जो नैसर्गिक असा विश्वास पूर्वी वाटे आनांबद्दल, त्यांच्या न्यायीपणाबद्दल जी साहजिक खात्री वाटे, ती लोपत असूनही, मी थंड–मुग्ध

होत गेलो होतो.

वारंवार वाटे, " या बदलत्या परिस्थितीचा त्रास पत्करला, आनांच्या मनोमन सुखात आपण आपल्या निरर्थक विरोधी बोलण्याने मिठाचा खडा टाकायचा नाही. असह्यच झालं तर आपण स्वतःच फार तर त्या परिस्थितीला पाठमोरं व्हायचं ! पण आनांच्या घरात, आनांच्या मनाविरुद्ध झगडे करून, आपल्या सुखासाठी आनांना नि इतरांना असंतुष्ट–असुखी म्हणून कधीच करायचं नाही ! "

पण मनस्वी दुःख आता वाटतंय ते असं, की तुमच्या न्यायी प्रेमळपणाबद्दलचा विश्वासच दिवसेंदिवस अंतर्धान पावला, त्याचा चक्काचूरच होत गेला. कोंडमारा अधिकच झाल्यानंतर, योग्य संधी मिळताच, अन्य कारणांचा वरवरचा आधार घेऊन, मी त्या बदललेल्या परिस्थितीतून नि घरामधून दूर गेलो... स्वतःची स्वतंत्र भवितव्यं नि स्वतःची सुखस्वप्नं निर्मिण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला. पण तरी देखील त्यातून एकदा निर्माण झालेली भुतं मला आतून कुरतडायला, छळायला, माझ्या भोवती भेसूर घिरट्या घालीतच राहिली !

आमच्याचसाठी आनांनी " नवी आई " घरात आणली, नि आदल्या दिवशी मी पाहिलेले–अनुभवलेले आना, त्यानंतर आजतागायत आम्हांला कधीकधीच फिरून दिसले नाहीत. ते आम्हांला कायमचे सोडून गेले. आमचं–त्यांचं जग पार पार बदललं, निराळं झालं. काही काळ आर्थिक जीवनछत्र कायम राहिलं, तरी आईपाठोपाठच आमचे आनाही त्या वेळी कायमचेच आम्हांला पारखे झाले. आमचं नित्य, परिचित, प्रेमळ, वत्सल, नैसर्गिक घरगुती वातावरण आयुष्यातून पार नाहीसंच झालं !

*

हे सारं आजच मला विराट स्वरूपात जाणवण्याचं कारण म्हणजे आमच्या परागचा मृत्यू... नि त्यानंतरचं तुमचं ते सांत्वनपर आलेलं वर्षानुवर्षानंतरचं दुर्मिळ, असामान्य वत्सल पत्र ! त्यात मला आमच्या बालपणाच्या प्रेमळ आनांचाच क्षणकाळ भास झाला. क्षणार्धात, क्षणभरच माझं दुःख पार हलकंही झालं !

पण मग तितक्याच वेगाने, कशा कोण जाणे, इतक्या वर्षांच्या मी मनातल्या मनात दडपून धरलेल्या साऱ्या साऱ्या सुप्त भावना, एक प्रचंड बंड करून मला अगदी वेडापिसाच करायला वरवर उफाळून आल्या. त्या वेळी माझ्या मनाचा तो झालेला संताप संताप मला तरी अगदी असह्य झाला. कारण, त्या घटनेमुळेच आजवरच्या माझ्या विचारी शांततेचाच मला भयंकर राग आला. नि त्याबरोबरच तुमच्या आजच्या प्रेमळ पण दुबळ्या, दांभिक सहानुभूतीचाही मला राग आला.

मला वाटलं, " माझ्यावरील आजचा हा प्रसंग कसाही असो, आनांची ही दुःखपूर्ण सहानुभूती कितीही नैसर्गिक दिसो, ती प्रेमळ हृदयापासूनच उगम पावलेली असो ! पण मग ज्या तुफान भावना आपण आजपर्यंत, इतका काळ अव्याहतपणे दडपून ठेवल्या,

त्या अजूनही तशाच दपटून ठेवून आपलं हृदय फुटू देण्यात आता काय अर्थ ? एका क्षणाचाही विलंब न लावता, आनांपुढे अगदी प्रामाणिकपणे जशाच्या तशा त्या आपण फेकून दिल्याच पाहिजेत!"

नि म्हणूनच हे मी लिहायला घेतलं...कधी ना कधी, आपणहूनच, तुम्ही जे जाणाल अशी मला आशा होती, एक विश्वास होता, तेच आता नाइलाजाने मला स्पष्ट शब्दांत तुम्हांला सांगावं लागणार आहे —त्या साऱ्या शाब्दींची बैठक, परिणाम व स्थिरभाव म्हणजे क्षुद्रत्वच! तेव्हा, यापुढे लिहिताना क्षुद्र प्रसंग-घटनांना अधूनमधून प्राधान्य आलं, तर तो व्यक्तिशः माझा दोष नव्हे. आना, तुमचाही त्यात प्रत्यक्ष संबंध असल्यामुळे ते नाइलाजाने तुम्हांलाही ऐकावंच लागणार —त्या आठवणींचं, पृथक्करणाचं कमीजास्त दुःख भोगावंच लागणार! माझा काय इलाज?

तुमचा
सदानंद

## दोन जगांची निर्मिती

३ डिसेंबर १९४०

प्रिय आना—

गेल्या जवळजवळ दोन तपांच्या काळात, पिता-पुत्र-संबंध राहूनही, आपल्या दोघांच्या एकाच आयुष्यात आपण दोन निरनिराळी जीवनं जगत आलो आहो! तुम्ही सुविद्य, सुशिक्षित, विचारी नि अनुभवी आहा, म्हणूनच तर मी हे सारं आता तुमच्यापुढे मांडण्याचा प्रयत्न करीत आहे, करणार आहे.

आईपश्चातही तुमच्या केंद्राभोवती आम्हा छोटयामोठया भावंडांचं एक चिमुकलं जग निर्माण झालं होतं. एकटा पुरुष या नात्याने भयभीत वाटल्यासारखं होऊन, त्या आपल्या जगात अधिक सुखं आणण्याच्याच हेतूने शिक्षण, समजूत, वय, सर्व पाहून, आपल्या मध्यम वयाच्या संसारात तुम्ही अखेर नानींना स्थान दिलं.

पण झालं भलतंच! त्याच दिवसापासून, तुम्हांला नकळत तुमची एकदम दोन जगं निर्माण झाली! त्यांतलं पहिलं होतं त्याला बघताबघता गौणत्व आलं, उलट, दुसरं एक नवं जग— की, ज्यात आम्हा कोणालाच स्थान नव्हतं, तेच अधिकाधिक प्रकाशित होऊ लागलं. एका चिमुकल्या जगाच्या निरामय सुखाची केवळ साधनभूत व्यक्ती या नात्यानेच नानी आपल्या घरात शिरल्या, पण पुढे साधनानेच साध्याला व साधकाला हां हां म्हणता अखेर पार ग्रासलं, पचवून टाकलं!

होय, आना! त्यामुळेच मूळचं आमचं जग तुमच्या मनातून विरत गेलं. नवं जग

अजाणताच अवतरलं, तरी जुन्या जगाचे काही प्रभावी अवशेष त्यात अधूनमधून डोकावल्यावाचून राहिले नाहीत. त्यामुळेच आमच्या कित्येक नैसर्गिक गोष्टीही तुम्हांला विसंगत, अनैसर्गिक वाटत गेल्या. माझ्या वाढत्या तरुण मनाच्या स्वतंत्र इच्छा-महत्त्वाकांक्षा उत्तरोत्तर उफाळून वर येत गेल्या, हे कबूल. पण मग माझ्या कल्पना निदान मी कधीही तुमच्या मनावर, वैभवावर, घरातल्या वातावरणावर लादल्या नाहीत, हे तुम्हीही कबूल कराल. पण त्यातून झालं मात्र एक— आपला दैनंदिन परस्पर-सहवास कमी होत गेला, परस्पर-रसरशीत सहानुभूती, आत्मीयता केवळ अल्पस्वल्पच उरली. अखेर प्रत्यक्षात आपली जगंच साफ विभिन्न, विसदृशच झाली.

*

या अद्भुत परिवर्तनाचं मुख्य श्रेय मी नानींनाच व त्याखालोखाल तुम्हांला देतो, पण त्यात माझीही अप्रत्यक्ष भर पडत गेली.

नानींच्या अंगी बुद्धिमान कौशल्य होतं. जितक्या कुशलतेने त्या तुम्हांला समाधान देत, संतुष्ट करीत, तितक्याच एका भावशून्यतेने त्या आमच्या भावना पदोपदी हसत हसत दुखवीत. आमच्या चिमुकल्या आकांक्षा तुडवणं, अप्रत्यक्ष टोमण्यांच्या वर्षावाने आमचा स्वाभिमान- आत्मविश्वास चुरगाळणं, कुस्करणं, आम्हांला दूर दूर ढकलल्यासारखं करणं, हा त्यांच्या हातचा अगदी मळ होता. कमी बोलून त्या शहाण्या राहत, वरवर अत्यंत निरुपद्रवी वागत. त्यांच्या प्रच्छन्न टोमण्यामधे सहस्र टी. एन. टी. चं बळ असे! तुमच्याशी सौजन्य-समजुतीने बोलता-वागताना दाखवायचे त्यांचे दात त्या आमच्या भावनांना करकरून खाताना साफ बदलून निराळेच-तीक्ष्ण करीत. ती त्यांची हातोटी असामान्य, बेमालूम! त्यामुळेच तर घरातलं मूळचं साधंसुधं एकसंध वातावरण, तुम्हांआम्हांला साऱ्यांनाच नकळत, अत्यंत शीघ्रगतीने, दिनानुदिन नानींना पालटवता आलं! धन्य त्यांची!

आईपश्चातच्या आमच्या जगात माझ्या तीन बहिणी.

लग्नानंतर गंगाअक्काला तर माहेरची इच्छाच उरली नाही. यमुनाताईचं लग्न अपेशी होऊन, अपमान-अश्रू यांच्याबरोबर घास गिळत झिजून मरायलाच ती 'नानींच्या घरी' आली. तिसरी निर्मला—मोठी प्रेमळ, भावनाप्रधान, स्पष्टवक्ती. ती बुद्धिमान असल्यामुळे शिकत गेली, सोसतही गेली. पण मग अखेर प्रतिकूल परिस्थितीविरुद्ध उघड उघड बंड पुकारून ती राजरोस घरातून बाहेरच पडली. तीस सालची चळवळ नि प्रभाकरवरील प्रेम यांच्या निमित्ताने तिने कॉलेज सोडलं, तुमचं नाव सोडलं. तुमच्याकडून 'कृतघ्न', 'निष्ठुर', 'स्वैर मुलगी' हे नाव कमावायलाही ती निमूटपणे तयार झाली.

माझ्या आईचा घरात उरलेला अवशेष म्हणजे मी स्वतः! माझा स्वभावच चमत्कारिक. तुमच्याशी अगर कोणाशीच निकराने असं मी कधी भांडलो नाही.•

शिक्षणानिमित्त म्हणून घर एकदा सुटलं ते सुटलं. कोणाचंही केवळ ताटाखालचं मांजर व्हायचं नाही म्हणून, पुन्हा तुमच्या घराचा दैनंदिन घटक म्हणूनही मी कधीच परतलो नाही.
ठरवलेल्या गोष्टी, ठरल्या पद्धतीने, ठरल्या काळात हमखास व कमीत कमी श्रमांत घडवून आणण्यामधे, सर्वांगीण संपूर्ण यश मिळवणं हे मोठ्या बुद्धिमत्तेचं लक्षण होय. आम्हांला एकूण कडवट झालं असलं, तरी असल्या एका न्यान्या यशाबद्दल, मानवी स्वभावाच्या चतुर हालचालींचा एक सूक्ष्म अभ्यासक या नात्याने, नानींचं मी कौतुक करतो.

*

पण त्या जगाच्या अद्‌भुत परिवर्तनाचं दुसरं -- अकरणात्मक श्रेय मी व्यक्तिशः तुम्हांलाच देतो.
याच काळात तुमचा नवा संसार, नवे व्याप वाढत गेले. आधी आखलेल्या जुन्या व्यावहारिक योजनांना भराभरा फळं लागत गेली. पूर्वी कित्येक वर्षांत जेवढं वाढलं नव्हतं, तेवढं चौफेर तुमचं वैभव विद्युतवेगाने केवळ तीनचार वर्षांतच वाढलं. तुम्ही एक मोठे यशस्वी धंदेवाईक झाला.
तुमच्या वैयक्तिक सुखी-समाधानांनाही मोहरून टाकण्याची नि व्यक्तिशः तुमच्यावर त्या सापेक्ष खिन्नतेच्या प्रौढत्वामधे— सहानुभूती, प्रेमळ, आस्था-कळकळ इत्यादींचा पाऊस पाडण्याची ही एक असामान्य हातोटी नानींच्या अंगी होती. एका थोड्याशा गंभीर स्वरूपाच्या आजारात त्यांनी तुमची शुश्रुषाही फार काळजीपूर्वक केली. त्या व्यक्तिगत दृष्टीनेही तुम्ही यशस्वी झाला.
पण मग, या सर्व प्रसंगपरंपरेची तुमच्या मनाने मात्र एक न्यारीच गल्लत-गोळाबेरीज केली ! तुम्हांला वाटू लागलं, "आपण आहो तसेच आहो ! पण, आपलं हे सारं वैभव, हा सारा चौफेर पसारा, हा सुखाचा पसारा, ते सारं सारं, आपल्या घरात आलेल्या या लक्ष्मीच्या पायगुणामुळे, तिच्या आगमनामुळेच ते सारं घडलं, आपल्याला लाभलं ! किंबहुना, ती घरात होती म्हणूनच केवळ आपण जिवंतही राहिलो.
त्या काळात, निदान स्वतः नानी, आम्हांला तरी वेळी-अवेळी असंच बोलून लाजवत-हिणवत. आमचा सर्व भावंडांचा तो प्रत्यक्ष अनुभव आहे. तर मग, संधी लाभेल तसा, त्याच प्रकारचा परिणाम नानींनी तुमच्यावरही कुशलतेने, नकळतच केला असेल, यात काय संशय ! तेव्हा, त्याच नव्या प्रबळ भावनेने तुम्हीही मग संमोहित झाला, अगदी मंत्रमुग्ध झाला.
होय आना. स्वतःकडे, आपल्या भोवतालच्या साऱ्या वातावरणाकडे, आमच्याकडेही, तुम्ही त्यानंतर नकळतच, फक्त एकट्या नानींच्या दृष्टीनेच पाहू लागला. ओघानेच मग तुमच्या नव्या जगाचा मध्यबिंदू नानी व तुमचा-त्यांचा नवा संसार, एवढ्याच गोष्टी

ठरल्या. आम्हा कोणाला त्यात प्रत्यक्ष स्थान नाही, असं नानींनीच ठरवलं होतं. म्हणूनच आमचं स्थान हळूहळू तुम्हांलाही दिसेनासं झालं.
किंबहुना, मी स्पष्टच म्हणतो, तुमच्या त्या नव्या जगांमधील आमचं अस्तित्व केवळ नानींना विसंगत, विरसकारक वाटलं, म्हणूनच मग तसं ते तुम्हांलाही वाटू लागलं. केवळ तिथल्या आमच्या अस्तित्वाला पूर्वपीठिका, पूर्वपरंपरा, सातत्य होतं, म्हणूनच त्याला धरून आमच्या न्याय्य इच्छा–आकांक्षाही अधूनमधून उभ्या राहत होत्या. पण त्यांच्याकडे देखील पाहण्याची तुमची स्वतःची निर्मळ पूर्वदृष्टी नष्ट झाली होती. तिथं नानींचाच चष्मा नकळत निवडला जाऊन, तुमच्या नाकावर येऊन बसला होता. त्याच्या काचा मत्सर–तिरस्कारांच्या विवळ्या होत्या, हे तुमच्या ध्यानीमनीही नव्हतं. त्यात त्यांच्या विकृत दृष्टीतून आमच्याकडे वारंवार पाहण्याची तुम्हांला हळूहळू सवय होत गेली. त्यातून तुमचे आमच्याबद्दलचे गैरसमज नि किल्मिषं उत्तरोत्तर वाढत जात होती. पण उलट, तुम्ही केवळ कुटुंबप्रमुखाच्या अधिकारवाणीचा सोयीस्कर आसरा–आधार घेऊन आम्हालाच उलट ‘ विकृत ’, ‘ मत्सरी ’ अशा ‘ न्यायदाना ’ने धिक्कारत–हेटाळत पुढे चालत राहिला होता.
वास्तविक आम्ही होतो तसेच होतो, अन्य बाबतीत तुम्हीही होता तसेच होता. पण तुमचं अंतरंग, त्यातलं जग, तुमची दृष्टी...सर्वच पालटून नवं झालं होतं. त्यामुळेच आपल्या अनुभवाचं, आमचं जग—आपलं पूर्वीचं जग—मात्र तुम्हांला दिसेनासं झालं होतं. ते हळूहळू उद्ध्वस्त होत गेलं होतं.
असलं हे सारं क्रियाचक्र केवळ सहासात वर्षांच्या काळातच संपूर्ण झालं होतं, प्रभावी झालं होतं. नि त्याचं सारं ‘ श्रेय ’ तुमच्याच ‘ अकरणात्मक ’, हळव्या, संस्कारक्षम, अस्थिर व्यक्तित्वाला द्यायला हवं. कारण त्या विशिष्ट वातावरणात अखेर “ आपण आपलं स्वतःचं मूळ तर पार विसरलो आहो ” हेच मुळी तुम्ही पार विसरत गेला होता. ते विस्मरणही तुम्हांला पुढे पुढे हळूहळू नैसर्गिक वाटू लागलं होतं ! केवळ दैवदुर्विलास !
साधनाने साध्याला व साधकाला हां हां म्हणता ग्रासून–गिळून–पचवून टाकल्याचा हा एक अत्यंत करुण हृदयविदारक दाखलाच होय !

*

या अद्भुत परिवर्तनाच्या यशस्वितेला माझ्या स्वभावाच्या ‘ विरक्त शरणागती ’नेही आणखी हातभार लावला, तेव्हा त्याचं थोडं ‘ श्रेय ’ मी स्वतःलाही घेतो.
अधिकाधिक विचार केल्यावर मला वाटत गेलं, मानवी संसारातली असली भेदभावपूर्ण मत्सर–भावना काहीशी नैसर्गिकच असते. तिची क्रिया–प्रतिक्रिया दुहेरी व दुतर्फा असते. काही व्यक्तींमधे ती प्रत्यक्ष—ॲक्टिव्ह—तर काहींमधे ती अप्रत्यक्ष—पॅसिव्ह—असते. सामान्य क्षुल्लक सुख, जडवैभव यांच्यामधेच रममाण असलेल्यांना ती अधिक

असते. त्या भावनेच्या प्रकर्षाने निरनिराळ्या कल्पना, हालचाली त्यांना आतूनच अखंड स्फुरत जातात. उलट, जडवैभवाने कमी आकृष्ट होणाऱ्या विचारी व्यक्तींमधे ती भावना केवळ प्रतिक्रियेपुरती, संरक्षणापुरती, स्थिति–स्थापकत्वापुरतीच असूनमधून येत–जात असते.

पण मग, अधिक सखोल मननानंतर, या दुसऱ्या प्रकारच्या व्यक्तींना तसल्या प्रतिक्रियात्मक हालचालींचीही किळस येऊ लागते. त्या परिस्थितीलाच पार पाठमोरं व्हावं...तिच्यापुढे विरक्त शरणागती पत्करून नवीच, निराळीच परिस्थिती निर्मून पाहायला त्या हळूहळू उत्सुक होतात, बाजूला सरतात.

त्यामुळे तर त्या पहिल्या प्रकारच्या आत्मकेंद्रित कर्त्या व्यक्तींना, आपण महादिग्विजयच मिळवल्यासारखं वाटू लागतं. त्यांच्या त्या भावनांना नवाच ऊत येतो. त्यांच्या तसल्या क्षुद्र भावनांचा घोडा उधळतो, नि पार चौखूर धावू लागतो.

या दोन टोकांच्या मधल्या प्रकारच्या वृत्तीने जगणाऱ्या व्यक्तींना स्वतःच्या अशा ठाम भावना, ठाम मतं नसतातच. आपल्या भोवतालच्या व निकटच्या विशिष्ट वातावरणाचीच त्यांच्यावर त्यांना नकळत, दाट छाया पडत जाते. त्यातच हळूहळू त्या व्यक्ती एकरूप, विलीन होत जातात. संघर्षाच्या दोन बाजूंपैकी अधिक सातत्याच्या संस्कारांची पुटं चढून, तीच आपली स्वतःची नैसर्गिक मतं नि परिस्थिती असं त्यांना भासू लागतं, दिसू लागतं. त्या परिस्थितीशी विसंगत अशा सर्व हालचाली, व्यक्ती, प्रसंग त्यांना तुच्छ–तिरस्करणीय वाटू लागतात. एकाच बाजूच्या दैनंदिन आत्मीयतेने त्यांचा नैसर्गिक तोल, अधिकार, स्वतंत्र दृष्टी, या सगळ्यांनाच खग्रास ग्रहण लागतं !

अशा विचारांमुळेच मला आता वाटतं, पटतं, की नानींनी प्रथमपासूनच एका बाजूची जितकी क्रिया केली, तितकीच आम्ही सुरवातीस जोराची प्रतिक्रिया केली.

पण त्या प्रतिक्रियेला मर्यादा होती.

गंगाअक्का तर त्या वातावरणातून दूर दूर निघूनच गेली. तिला त्यात कसला रसच उरला नाही.

यमुताई त्या वातावरणाच्या कठोर क्रियेने पुरीपुरी अगतिक होऊन, होरपळून, झिजून, अखेर बळीच पडली.

मीही सुरवातीस मर्यादित प्रमाणात प्रतिक्रिया केली. पण अखेर त्या वातावरणातून बाहेर पडून विरक्तीची शरणागतीच स्वीकारली व एकदाचा मोकळा झालो.

निर्मलेला तिची बाहेरील व्यापक ध्येयं मोहवीत गेली. आपल्या नशिबाच्या असल्या परिस्थितीची भयंकर जुगुप्सा वाटून तिची प्रतिक्रिया उत्तरोत्तर वाढत गेली. पण आपलं नवं जग निर्माण होताक्षणीच, एका अखेरच्या झगड्यासरशी त्या साऱ्याच चालू परिस्थितीला व आपल्या तोवरच्या जगाला क्षणार्धात ठोकरून आपण होऊनच कायमची पाठमोरी होऊन, ती दूर दूर निघून गेली.

वास्तविक तो प्रसंग भयंकर होता. त्याने तुम्हांला मधल्या झोपझापडेमधून खडबडून जाग यायला हवी होती. पण हे असं का घडलं याचा क्षणभरही विचार तुमच्या मनात त्या वेळी आला नाही. तुमच्या पुनर्जागृतीचा तो एकमेव मोका तसा हवेत निरर्थकच विरून गेला.

आमच्या सर्वांच्याच प्रतिक्रियांचा असा निरनिराळ्या प्रकारे, लौकरच अंत झाला. त्यामुळे नानींना मात्र "तो आपलाच विजय" असं वाटून कृतकृत्य वाटलं!

घरातल्या माला–शालांनाही अप्रत्यक्षपणे तसल्या निष्कंटक स्थितीचं समाधान वाटलं. आणि एका दृष्टीने पाहिल्यास "आता यापुढे हीच एक नैसर्गिक प्राप्त परिस्थिती" असं समजून, गृहीत धरून, स्वतः तुम्ही व श्रीधरही त्या नवीन परिस्थितीशी एकरूप एकजीवपणे वागू लागला.

क्रिया–प्रतिक्रियांचं ते दुष्ट वर्तुळ असं पुरं झालं!

*

त्यामुळेच, त्या काळातल्या अगर त्यानंतरच्या, माझ्या काय, निर्मलच्या काय, अनेक नैसर्गिक भावना–आकांक्षा–हक्कांना तुम्ही स्वतःही अनैसर्गिक, मत्सरपूर्ण, दुष्ट, उद्धट, विकृत अशा उघड उघड विशेषणांनी उल्लेखू लागला, समजू लागला. प्रथम नकळतच सुरू झालेल्या त्या संघर्षाचा तो तसला अंतिम दारुण परिपाक! त्याच्याच आहारी पूर्णपणे जाऊन त्यात आपल्या नैसर्गिक अधिकारांच्या अहंभावाची भर टाकून स्वतः तुम्हीच तो वाढवत नेला. ओघानेच, जे आमचं व आनांचं मूळचं एक जग होतं ते अखेर बघता बघता उद्ध्वस्तच होऊन पडलं!

उद्ध्वस्त होऊन पडलेलं असलं, तरी ते आमचं आई–आनांच्या मध्यबिंदूभोवतालचं जग आम्ही कधीच विसरू शकलो नाही. पण मग आम्हीच कशाला, त्याचे कित्येक अवशेष तुमच्याही हृदयाच्या खोल खोल कप्प्यात दडून, रेंगाळत, मधूनमधून वर डोकं काढीत, मागे उरलेच!

तेच प्रभावी चैतन्य तुम्हांला कधी कधी त्या जुन्या जगात खेचून नेतं नि तुमच्या हातून अगदी तुम्हांला नकळत काही हालचाली होऊन जातात. आमचा पराग गेला—तुमचा गोड नातू गेला—त्या वेळी हेच झालं. त्या घटनेचा क्षणभरच तुमच्याही मनाला हादरा बसला. तुमचं जुनं उद्ध्वस्त जग जागं होऊनच तुमची नैसर्गिक सुप्त सहानुभूती माझ्याकडे वायुवेगाने धावत आली. काही वर्षांपूर्वी मी अत्यवस्थ, आजारी झालो तेव्हा तुमची जी धावपळ–धडपड झाली, ती त्याच उद्ध्वस्त विश्वातील दडपल्या भावनांच्या प्रभावाने. एकतीस साली मिरवणुकीच्या लाठीमारामधे निर्मलचं कमाळ फुटलं, टाके मारावे लागले, ती दीड दिवस बेशुद्ध होती, तेव्हा धावत जाऊन तुम्ही तिच्या शेजारी दोन दिवस सारखे बसून होता. ती बरी झालीसं दिसताच, तिच्याबरोबर न बोलताच, घाईगडबडीने तुम्ही निघून गेलात. हे सर्व त्याच उद्ध्वस्त जगाच्या उरल्यासुरल्या

अवशेषांमुळे!
पण हे असामान्य क्षण पळते, पळपुटे असतात. गडप झालेल्या अज्ञात विश्वातून चुकून कानी पडलेल्या, अदृश्य तारायंत्राच्या उडत्या संदेशांप्रमाणे ते तुम्हांला सतावतात, तुमच्या नकळतच तुम्हांला तसल्या हालचाली करायला लावतात. कारण आम्हांला स्पष्टच दिसतं की, तुमच्या आजच्या प्रत्यक्ष जगामध्ये आम्हा कोणाच्या दैनंदिन सुखदुःख- भावनांबाबतची व त्याबद्दलच्या तुमच्या सहानुभूतीची सूक्ष्मसुद्धा हालचाल नसते. हे आम्ही पूर्ण जाणतो. पण तुम्हांला दुःखी करण्यापेक्षा आम्ही त्याबाबत पूर्ण मौन स्वीकारतो.

*

आज मात्र, हे सारं तपशीलवार तुमच्यापर्यंत सुपूर्त केल्यावाचून मला राहवेच ना! माझ्या आजपर्यंतच्या मौनामुळे तुम्ही जितके अप्रत्यक्ष समाधानी राहिला असाल, तितकेच आजच्या या माझ्या स्पष्टवक्तेपणामुळे तुम्ही प्रत्यक्ष दुःखी व्हाल, हे मी जाणून आहे. त्यामुळे तुमचा क्षणकाळ संताप–संतापही होणार.
पण इलाज नाही! तुमचं–आमचं जग एकदा—केव्हा ना केव्हा तरी—एक होतं. स्वतः तुमची इच्छा असो नसो, ते उद्‌ध्वस्त झालं! त्याचे सूक्ष्म अवशेष तुम्हांला अजूनही अनेकदा बेचैन करतात. आम्हांला तर नेहमीच स्मृतींनी जाळत राहतात. तेव्हा त्याचीच ही यथार्थ कल्पना तुम्हांला आज होत असली नि त्याने तुम्ही दुःखीकष्टी होणार असला, तर तेही नैसर्गिकच आहे, नि अगदी अटळही आहे. असल्या लिहिण्याने मी केवळ निमित्तमात्र ठरत आहे, एवढंच. उद्‌ध्वस्त जगातील कठोर स्मृती नि तीव्र भावना आपणा दोघांनाही सारख्याच दुःखी, बेचैन करणार! पण नाइलाज आहे.

तुमचा
सदानंद

## उद्‌ध्वस्त जग

५ डिसेंबर १९४०

प्रिय आना—
असं आमचं उद्‌ध्वस्त जग, असे तुमच्या मनातले त्याचे अधूनमधून आम्हांला आढळणारे अवशेष! पण तुमचं नवं जग निर्माण झालं, त्याच काळात आम्हीही आपापली विभिन्न जगं निर्माण केली, जोपासली.

दुर्दैव मात्र असं, की तुमच्या नव्या जगातील काही संशयपिशाच्चं, तुमच्या अधिकाराचा बलवान हात धरून, तुमच्या पाठिंब्याने नि तुमच्याच शब्दांच्या रूपाने, अधूनमधून आमच्या जगात शिरत राहिलीच! कधीमधी ती तिथंही धुमाकूळ माजवू लागली. तुमचा एकतर्फी विश्वास नि सत्य परिस्थितीबद्दलचं बेफिकीर अज्ञान त्या संशय-पिशाचांना भरपूर साह्य करीत होतं, म्हणूनच तुमच्या जिव्हेने, घरातल्या निर्मलेला व अधूनमधून भेटणाऱ्या मला रागारागाचा कांगावखोर इशारा कित्येकदा दिला—
" तुम्हांला मत्सरभावनेने, क्षुद्रहीन दुस्वासाने, झपाटलं आहे! तुम्ही माझा, माझ्या लहान मुलांचा, त्यांच्या आईचा, हिणकसपणे हेवा करता. आयुष्यभर धडपड करून मी जे जे प्रयासाने जोडलं आहे, घरात जी एक सर्वांगीण शांतता आणली आहे, ती पार पायदळी तुडवण्याचाच तुमच्या हलक्या मनाचा बेत दिसतो. तुम्हांला माझं, आमचं सुख नको आहे...म्हणूनच तुमचं नेहमी असं वागणं होत असतं!"
मी त्या वेळी गप्प राहिलो. पण निर्मलेने मात्र एकदोनदा पाहून-ऐकून तुम्हांला त्याचं तत्काळ तडकाफडकी उत्तर दिलं. ती नुसती रडत बसली नाही, विचार करीत कुढत राहिली नाही. तिने एकदम निर्णयात्मक आचार केला. पण तसली कोणाच्या आत्यंतिक वर्तनाची तुम्हांला अपेक्षा नव्हती, कधी सवय नव्हती. म्हणून त्यामुळेही तुम्ही अतिशय स्तंभित झाला! तो तुमच्या प्रतिष्ठेचा, अब्रूचाच प्रश्न वाटला तुम्हांला. आपल्याच कल्पनांना अनुकूल अशा पद्धतीने जग चालतं, असला तुमच्या अधिकारवैभवसंपन्न मनाचा त्या वेळी अनपेक्षितपणे पुरता भ्रमनिरास केला, तो तुमच्याच चिमुरड्या निर्मलने!
निर्मल त्या वेळी नानींच्या जगात, नानींच्या स्थूल नियमांत वावरत, वागत, वाढत होती. पण तिचं प्रत्येक पाऊल त्याच प्रकारे जखडून टाकण्याचा तुमचाही न्याय-निवाडा-निर्णय तुम्ही उतावळ्या रागाने तिला सांगताच, स्त्री असूनही तिने तत्काळ बेडरपणे बाहेर उडी फेकली. त्यानंतर ती तुरुंगात गेली. तिने नाना हालअपेष्टा भोगल्या, मग प्रभाकराचा हात धरूनच तिने आपलं नवं जग निर्माण केलं! त्यात वाट्याला आलेल्या परिस्थितीचा धडका तिने दैनंदिन धीरानेच सहन केला. तुम्हांला व तुमच्या जगाला ती तशी एकदा पाठमोरी झाली ती कायमची!
निर्मलेच्या हालचालींमागल्या काल्पनिक अनैतिकतेवर नि उच्छृंखलतेवर हसत हसत पडणारे-उडणारे नानींचे फूत्कार! त्या साऱ्या घटनापरंपरेला, तशा विद्युत्वेगाने, तेच चालना देऊ शकले होते. पण स्वतः होऊन, तुमच्या त्या चार भिंतींतून नि तुमच्या "नव्या" जगातून निर्मल बाहेर पडून पार अदृश्य होताच, निरर्थ कल्पनांचे नानींचे ते फूत्कार, केवळ त्या निर्जीव भिंतींनाच नि स्वतः तुम्हांलाच फक्त निमूटपणे ऐकणं भाग झालं. निर्मल मान ताठ ठेवून धाडकन बाहेर गेली ती गेलीच. ती तुमच्या एकमार्गी अहंगंडाच्या चौकटीत फिरून आलीच नाही!
निर्मलेची ती स्वाभाविक तडफ तशी वेळेवर जागी झाली नसती, तुमच्याबद्दलचा

नैसर्गिक नितांत आदरभावच मनात ठेवून, आपल्या प्रांजळ प्रखर भावना आतल्याआत दडपून ती तशीच पुढेही वागत राहिली असती तर? तर नानींच्या कर्तृत्वाने नि तुमच्या निष्क्रिय, पूर्वग्रहदूषित, पक्षपाती तटस्थतेमुळे, निर्मलेची देखील एक सुशिक्षित यमुनाताईच व्हायला मुळीच वेळ लागला नसता! यात मला तरी संशय नाही.

तीच निर्मला! आज तिला तिचं असं स्वतंत्र अस्तित्व आहे. एक काँग्रेस कार्यकर्ती म्हणून तिचं नाव आहे. तिचा-प्रभाकरचा स्वतंत्र चिमुकला संसार आहे. पण इतकं असूनही, महत्त्वाचं म्हणजे, तसल्या त्या विकृत झगड्यानंतर नि चमत्कारिक मानहानीकारक घटनापरंपरेनंतरही, निर्मलेच्या मनात लहानपणीच मूळ धरून वाढलेला पित्याबद्दलचा एक नितांत आदर अजून कायमच आहे! याचं मला अनेकदा खात्रीपूर्वक प्रत्यंतर आलेलं आहे! अशी माझी ती धाकटी तडफदार बहीण—तिला कमीपणाचं ठरेल असं तिच्यात काहीच नव्हतं, काहीच नाही!

*

त्या मानाने मी अधिक थंड, मिळतं घेणारा. मी नानींना छोटेमोठे प्रतिकार केले, पण माझ्या हातून झगड्यांचा कधी भडका उडाला नाही. या ना त्या कारणाने तुमच्या नव्या जगापासून मी अव्याहत दूर राहू लागलो एवढंच. माझी दुःखं, माझ्या आकांक्षा मी मनातल्या मनात दडपल्या. बहुतेक बाबतींत जुळतं-मिळतं घेऊन तटस्थ राहिलो. माझ्या भावी इच्छाआकांक्षांबाबत तुमच्याकडून उत्तेजन सहानुभूती न मिळताही, माझे तेच वेळोवेळी जे निर्णय घेतले, निश्चित केले, तेवढेच काय ते मी तुम्हांला दुखवण्याचे प्रसंग!

पण त्यातूनही तुमचा संताप मजवर ओढवलाच! मात्र तेही सर्व शांतपणे गिळून, स्वतःचे निर्णय न बदलता, पण इतर दृष्टीने मी तुमच्याशी आजतागायत जुळतं-मिळतंच घेत आलो आहे. असा एका प्रकारे मी तीन जगांत एकाच वेळी वावरत आलो. ती माझी तीन जगं म्हणजे बाळपणचं उद्ध्वस्त, तुमचं नवं, नि माझं स्वतंत्र नवं! त्यामुळेच, नानींच्या जगातून मी इतरांप्रमाणे निघून गेल्याचं समाधान त्यांना काही कधी लाभलं नाही. तुमच्या संशय-पिशाच्चांच्या तांडवानेही न डगमगता उलट मी तशीच संथ वाटचाल करीत राहिलो.

दैनंदिन असुलाने आनांचं घर भरून राहू नये, याच हेतूने मी तुमच्या धंद्याव्यापातही पडलो नाही. त्या जगातलं वास्तव्य, दिनानुदिन सहवास-संबंध जाणतेपणी टाळला. पण त्यातूनही, तुमचा अहंभाव दुखवण्याला नि नाना अपेक्षाभंगांना मी कारण झालोच. तशाही परिस्थितीत, माझ्या कल्पनेच्या व्यक्तिगत सुखाला, हळुवार भावनांना, विरंगुळ्याला, मी एकेक नवं स्थान शोधत राहिलो. माझं स्वतःचं नवं जग मी शोधू लागलो. त्या वेळी सहजासहजी मंगला माझ्या आयुष्यात शिरली. तिचा हात मी घट्ट

धरला. पण त्यानेही तुमचा अहंभाव दुखावून, तुमच्या मनाचं अकाळविकाळ तांडव झालं. तेही मी तात्पुरतं सहन केलं. अनुकूल काळाची आम्ही वाट पाहत राहिलो. त्यानंतर तुमच्या संमतीनेच मंगला घरात आली. तुमचं लक्ष्मीचं जग तिच्यासह मला आत मनापासून घेत नाहीसं दिसताच नाइलाजाने, कसलाही गाजावाजा न करता, त्या जगाला पूर्ण पारखं होण्याची नियती मी पुन्हा शांतपणे स्वीकारली. नवा संसार मी थाटला, त्या वेळी तुमच्या घरात हजारो वस्तूंची प्रचंड अडगळ पडलेली तुम्हांला व मला दिसत असताही, केरसुणीच्या लक्ष्मीपासून तो आंघोळीच्या बंबापर्यंत नि दारातल्या पायपुसण्यापासून तो डोक्यावरल्या मच्छरदाणीपर्यंत सारं सारं माझं मीच, माझ्या तुटपुंज्या प्राप्तीतून एका खोलीच्या टिचभर जागेत उभं करून मांडलं !

असला माझा चिमुकला निराळा संसार—ते निराळं जग ! त्यात तुमची इच्छा असती तर व्यक्तिशः तुम्हांला तरी निश्चित, कधीमधी तरी स्थान होतं ! पण तुम्ही कधी त्यातही आपली आशीर्वादाची पायधूळ झाडली नाही.

मग मंगलेला दिवस गेले, प्रसूतिकाळ आला, तुम्हांला पहिलावहिला नातू झाला. त्याचं चिमुकलं बारसं झालं. तो आमचा पराग वाढला—त्याने बाळसं घेतलं. आपल्या भोवतालच्या साऱ्यांचा तो एक आकर्षणकेंद्र झाला. त्याचा पहिला गोड वाढदिवस नि त्यानंतर यथाकाळ तीन वाढदिवसही होऊन गेले. त्यावेळची त्याची गोड गोड गाणी, त्या नाटकी ठसक्याच्या गोष्टी, नकला—तो दहापाच शब्दही लिहू-वाचू लागला होता.

*

या साऱ्या हवेत विरून गेलेल्या घटना ! तुमच्यापासून दूरदूरच्या, विभिन्न अशा, केवळ माझ्या एकट्याच्याच नव्या जगातील या साऱ्या घटना ! मीच कधी आपणहून एकदोनदा, परागची स्वैर लहर म्हणून, त्याच्या आजोबांना भेटायला त्याला घेऊन तुमच्याकडे आलो असेन तेवढाच. बाकी स्वतः होऊन तुमच्याकडून स्वयंस्फूर्तीने त्याचं कसलं कधी कौतुक झाल्याचं मला तरी स्मरत नाही. त्या साऱ्या साऱ्या माझ्या सुखात, क्षणाचे वा कणाचे तुम्ही कधी भागीदार झाल्याचं मला तरी मुळीच स्मरत नाही !

पण आता कठोर नियतीने आमचा पराग एकाएकी नेऊन मंगलेच्या व माझ्या दुःखाचा एकदम निष्ठुर असा कडेलोट केला. नि त्या वेळी मात्र तुमची खरीखुरी वत्सल सहानुभूती, आपल्या पायानेच जणू अगदी अविलंबे माझ्या दारी धावत आली ! केवढा हा निर्दय योगायोग !

आजवर कधी नव्हता एवढा भडका माझ्या मनात या क्षणी उडाला आहे, तो यामुळेच ! त्यामुळेच, अगदी आजवर प्रयासाने तोल संभाळून अडलेलं माझं मन कोलमडून पडलंय ! त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या आहेत. आपल्या पूर्वीच्या उद्ध्वस्त

गंगाच्या अवशेषाने भावव्यथित झालेल्या आनांना या क्षणीच आपल्यां मनातली सारी खळखळ-हुरहूर स्पष्टपणे सांगून टाकावी असं मला वाटलं, त्याचं कारणही हेच!

*

पण याहून अधिक तपशिलामध्ये मी स्वतः पडलो, तर ते मला जमणार नाही. या बाबतीत स्त्रिया मात्र जात्याच भावशील, संस्कारक्षम, भावनाप्रधान असतात. त्यांचा हळव्या हृदयाचा बॅरॉमिटर, भोवतालच्या वातावरणामधील सूक्ष्मसा फरकदेखील अचूकपणे नोंदून ठेवतो.

चारपाच वर्षांपूर्वी, मद्रेराहून घरी परत गेल्यावर, आमच्या गंगाअक्काने तुम्हांला द्यायला म्हणून एक पत्र माझ्याकडे दिलं होतं. तुम्हांला दुःख होऊ नये म्हणूनच आजपर्यंत मी ते माझ्याकडेच दडपून ठेवलं होतं. तुमच्या-माझ्या, आपल्या कोणाच्याच दैनंदिन जीवनाशी आता ज्या गंगाअक्काचा काडीचाही संबंध उरलेला नाही, तिनेच अगदी आत्मीयतेने नि मनमोकळ्या स्पष्टतेने जे लिहिलं आहे, तेच अखेर, तसंच्या तसंच, याला जोडून आज तुमच्याकडे पाठवणार आहे.

तुमचा

सदानंद

## गंगा-प्रवाह

२४ ऑक्टोबर १९३७

तीर्थरूप आनाबापूंच्या चरणी मस्तक ठेवून, त्यांचीच ज्येष्ठ मुलगी सौ. गंगा हिचा शिरसाष्टांग नमस्कार, विनंती विशेष.

साऱ्या आयुष्यात, माझ्याकडून तुम्हांला हे पहिलंच नि एकच पत्र लिहिलं आहे. तेच एवढं मोठं पाहून तुम्ही गोंधळाल. पण तरीही ते शांतपणे वाचावं, अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

मनात हजारदा येऊन जात असे. आताही, प्रथम, लिहावं- लिहू नये असंच सारखं होत होतं. सदानंद तर पटकन म्हणाला, " नकोच लिहूस. "

पण अखेर मीच ठरवलंय, लिहायचंच! फार तर भय्याकडेच ते देऊन टाकायचं. हवं तर त्याने ते आपल्याला द्यावं-देऊ नये. मनातलं सारं लिहून टाकल्यावर मला तरी दोन्ही सारखंच! लिहून टाकल्याचं माझं समाधान तरी मिळवायचं मी आज ठरवून टाकलंय!

आना, मला फायनल करून तुम्हीच माझं लग्न करून दिलंत. तत्काळ मी संसारात

पडल्ये. सारखं चुलीजवळच अष्टौप्रहर राबत राहणारी, एक केवळ सामान्य संसारी स्त्री आहे मी. तुम्ही, सदाभय्या, निर्मला यांच्यासारखी काही साऱ्या जगाची अक्कल मला खासच नाही. माझ्या तुटपुंज्या ज्ञानाच्या इवल्याशा ज्योतीने मी तुमच्यासारख्या सूर्यावर कसला प्रकाश पाडणार ? तुम्हांला कशाबद्दल नि काय म्हणून मी असलं हे मोठं थोरलं पत्र लिहिणार ? खरं म्हणजे, तसला लहान तोंडी मोठा घास घ्यायची माझी मुळीच लायकीही नाही !

तरी पण आज मात्र मी ठरवून टाकलंय. एवीतेवी आनांचा—आपला प्रत्यक्ष संबंध आता साफ संपलाय. बापलेक एकत्र बसून कधी मोकळेपणे बोलण्याची आता यापुढे, या आयुष्यात तरी मुळीच शक्यता नाही. चुकल्यामाकल्या भेटीत आपणहून तसं घडत नाही. स्वतः मलाही प्रत्यक्ष भेटीवेळी अधिक बोलायला आता संकोचच वाटतो. तेव्हा म्हणूनच, तुमच्याशी सारं सारं शांत, उघड बोलायलाच हे मी आज लिहायला घेतलंय. या क्षणी अगदी आई गेल्यापासूनच्या गोष्टीच मनात सारख्या खतखतून येत आहेत. जे आठवतंय—सुचतंय तेच तसंच झराझरा लिहून मी मोकळी होणार आहे.

*

आमच्या आईच्या मृत्यूवेळी भावंडांत मीच मोठी. देव-पूजा-ध्यान यामधेच शेवटी ती गुंग असायची सदा. तरी कधी कधी मला ती म्हणायची, "पोरी, दोन वर्षांत तू आता सासरी गेल्यावर माझ्या सदाचं, निमाचं काय नि कसं ग होईल ? ती वेडीविद्री यमुना ! तिचं बापडीचं काय होणार ? माझ्या मागे माझी सारी पोरं भिरीभिरी पाहणार आहेत इकडेतिकडे !— अगदी उघडी पडणार आहेत !"

त्या वेळी ते अर्धवटच समजून माझ्या मनाचा गोंधळ उडून जाई. पण मग महिन्यातच आई गेली, नि वर्षभरातच मला तिच्या उद्गारांचा सारा सारा अर्थ समजून आला. माझ्या लग्नानंतर आजपर्यंतच्या एवढ्या काळामधे, एकूण बेरीज केली तर केवळ साडेतीन-चार महिनेच फक्त, माझं घर सोडून मी माहेरी तुमच्या घरी कार्यासणानिमित्त आले-गेले आहे. माझी इतर भावंडंही इकडेतिकडे भिरभिर पाहून, आता तेथून अखेर अंतर्धान झाली आहेत. माझी आता तर ठाम समजूत, खात्रीच झाली आहे— आई म्हणाली होती तसंच एकूण घडलंय ! आमच्यातलं कोणी एक सुद्धा त्या मूळ घरी आता उरलेलं नाही.

होय, आना. माझ्या माहेरी—तुमच्या घरी आता कधी जर मी आले, तर ते मला ओळखता सुद्धा येणार नाही. ते आजचं घरही मला आपली म्हणून ओळखू शकणार नाही. तिथलं जग आता आमचं म्हणून उरलेलंच नाही. तिथं आम्ही आता पार परकी झालो आहो ! मला तर अधूनमधून असंही वाटतं, एकेकाळच्या आमच्याच असलेल्या आमच्या आनांना देखील तसंच वाटत असावं !

का ? असं का ? कोणाचं कुठे काय चुकलं ?



*

हल्ली सदानंद इकडे माझ्याकडे आला आहे. त्याला नि त्याच्या बायकोला सदान्कदाची कसली ना कसली कामं असतात. तरी मोठ्या आग्रहाने मी त्या दोघांना माझ्याकडे आठ दिवस ठेवून घेतलं. बोलता बोलता, आम्ही कितीतरी नवं-जुनं सारं सारं बोलो. अखेर अगदी खिन्न हसून सदाभय्या मला म्हणाला, "तुम्ही बायका या अशाच, अक्का! मत्सर मत्सर करता सदान्दा! सख्खे, सावत्र—हजार गोंधळ माजवता पावलोपावली तुम्ही. आपल्या मनात नि भोवतालच्या जनांत—"

ऐकताच, अगदी रागाने नि आश्चर्याने मी त्या विचारलं, "काय? तूच म्हणतोयस का हे, सदाभय्या?"

तरीही हसतच संथपणे तो मला म्हणाला, "हो हो! तू, निर्मला, भागीआत्या! अग एवढंच काय, पुरुषासारखा एक पुरुष असून, मीसुद्धा! आता आणखी ही मंगल आलीय ना मला तसंच आणखी बायकी–बायला बनवायला!"

"हो हो! मोठा आलास रे पुरुष!" मला त्याचा खूपच राग आला होता— "हेच का तुझं सुशिक्षिताचं मत?"

"माझं नव्हे—नानींचं! माला, शाला, एवढंच काय— अगदी आपले पुरुषासारखे पुरुष आनासुद्धा! असंच म्हणतात हो अक्का!"

ते ऐकून मात्र माझ्या जिवाचा संताप संताप झाला! वास्तविक माझी आजची सुखदुःखं कायमची इकडे, दूर दूर, निराळ्याच ठिकाणी गुंतलेली आहेत. आनांच्या घरच्या असल्या सुखदुःखांत, स्वार्थात नि बेजबाबदार शेऱ्यांमधे मला तर आता मुळीच वैषम्य नाही. तरी पण माझ्या त्या संतापाने, मी मला जे जे वाटलं, जे जे सुचलं ते त्याच्याकडे बोलत सुटले. अखेर त्याला म्हणाले, "थांब तर! हे सारं मी आता आनांनाच लिहून कळवते, लांबलचक पत्रच पाठवते. काय म्हणतील रे ते मला? काय करतील ते माझं?"

"जाऊ दे ग अक्का. काही बोलू नकोस नि लिहूही नकोस!" असं सदाभय्या म्हणाला नि त्याने ते त्या वेळी हसण्यावारीच नेलं सारं. "महामूर्ख म्हणतील तुला ते." तरी पण, मी मात्र आज आता हे खरोखरच तुम्हांला लांबलचक पत्र लिहायला मनाचा घडा करूनच बसले आहे. किती का दिवस लागेनात—एकदोन—चारसहा— मी ते पुरं केल्याशिवाय आता मुळी राहणारच नाही!

*

आना, तुम्ही तसं एकदा जरी खरोखरच बोलला असला तरी ते अगदी अयोग्य आहे, ते अगदी धादांत खोटं आहे! तुम्हांला ते शोभणारं नाही! हे मी सुरुवातीसच स्पष्टपणे निक्षून सांगून टाकते.

आम्ही तुमची लेकरं, तशीच आमच्या आईचीही लेकरं आहो. तिच्या पश्चात ते घर पालटलं, फिरलं, हे अक्षरशः खरंच! पण ते आमच्यामुळे नव्हे. थिएटरात बसून,

पडद्यावरच्या सिनेमात, आपण बघता बघता जसा देखावा बदलत जातो, साफ पालटलेलाही आपल्याला दिसतो, त्यात आपला काही संबंध नसतो, तसंच ते सारं आम्ही गपचूप पाहत आलो आहो, एवढंच! अधिक दुःखाची गोष्ट मात्र अशी, की तो देखावा बदलत असताना, तितक्याच तिऱ्हाईत दृष्टीने, स्वतः तुम्हीही ते सारं पाहत होता. अजूनही तसंच पाहत आहा! नि म्हणूनच तुम्ही तसं बेदरकारपणे बोलू शकता! असत्य असून...

आता तर तुम्ही आम्हाला दिसता ते फक्त केवळ त्या बदललेल्या देखाव्यामधेच वावरताना! होय आना, तुम्ही स्वतःच त्यात शिरला आहा. केवळ त्यामुळेच तुम्ही आता उलट आम्हाला म्हणू लागला आहा, की "तुमच्यात क्षुद्र मत्सरभावना आहेत, दुरावा आहे, तुम्ही सर्वांशी हीनपणेच वागता, बोलता!"

त्याला उत्तर म्हणून मी एकदा-दोनदा नव्हे, त्रिवार म्हणते- हे सर्व अगदी धादांत असत्य, अनुदार, अयोग्य आहे!

मला तसं का वाटतं? तेच मी आता, यापुढे माझ्या अर्धवट शिक्षणाला नि अल्प बुद्धीला जमेल तसं दाखवणार आहे. माझ्या अज्ञानाला हसू नका. खऱ्या अनुभवाच्या माझ्या बोलांनी रागावूही नका.

कदाचित ऐकायला-वाचायला तुम्हांला वेळ नसला, तरी मला लिहायला मात्र आज भरपूर वेळ आहे. साऱ्या आयुष्यात मी तो आज एकदाच काढीत आहे. कारण माझा संसार करणं हे जसं माझं एक कर्तव्य, तसंच या गोष्टीचा तुमच्यापर्यंत खुलासा पोचवणं हेही एक माझं आज प्राप्त कर्तव्यच वाटत आहे. मोठी बहीण ही भावंडांना आपल्या आईच्या ठिकाणीच असते!

*

माझा अनुभव एकाच वाक्यात सांगू, आना? नानी घरात येण्यापूर्वीचे आमचे आना, त्या आल्या त्या दिवसापासूनच आमच्या बाबतीत गाफील, बेफिकीर होत गेले. आमच्या खाण्यापिण्याची, आवडीनिवडींची विचारपूस नाही, पूर्वीसारखं हसणं-खेळणं नाही. सदैव तुमच्या अंगाखांद्यावर बागणारी सर्वांत धाकटी निमादेखील हळूहळू तुमच्याशी तुमच्याचसारखी परकं परकं वागू लागली.

लग्नानंतर प्रथमच सासरी निघताना आत्याच्या गळ्यात पडून मी रड रड रडले, माझा पाय उचलेना, तो त्यामुळेच! पण त्या वेळीच, ते तसं मला अखेरचंच वाटलं. त्यानंतर झालेल्या माझ्या चारदोन खेपांच्या वेळी, उलट त्या घरातून केव्हा एकदा मी बाहेर पडते, असंच मला वाटत आलं आहे. म्हणूनच शक्य तो मी माझं माहेरी येणंच टाळत आलेली आहे. का? असं का? ते माझं मलाच मुळीच समजत नाही! मला तरी वाटतं, आपल्या आतआतल्या मनाला नकळतच आपल्यापेक्षा अधिक समजत असतं.

माझ्या पहिल्या बाळाच्या जन्मावेळी वर्षभराने मी माहेरी आले, तेव्हा घरची सारी भेटणार म्हणून मी किती किती उत्सुक होते! तुमच्या घरात त्या वेळी श्रीधर सहासात महिन्यांचा होता. मी आले होते चार महिन्यांसाठी, परतले मात्र चार आठवड्यांच्या आतच—प्रसूतीसाठी— माझ्याच घरी. तशी एकाएकी मी का निघाले ते तुम्हांला त्या वेळी सांगितलं नाही. पण मग, तुम्हीही ते स्वतः विचारलं नाही.

का परतले ते आता मात्र सांगणार आहे, आना! आज अशी वेळच आली आहे म्हणून —

*

कोणा शेजारच्या बाईची माहेरी आलेली मुलगी परत जात होती. टांग्यात ती बसत असताना तिकडे बोट दाखवून नानी मला म्हणाल्या, "अशा असतात हो माहेरवासणी. चार चार महिने नाही काही राहत!"

मी गपचूप घरी पत्र टाकून बोलावून घेतलं नि थोड्याच दिवसांत घरी यायला निघाले. नानींनी नाहीच, पण तुम्हीही का म्हणून एका शब्दाने स्पष्टीकरण न विचारण्याइतकी मी तुमच्या घरात वर्षभराच्या आत परकी झाले होते.

पण परत यावं असं वाटण्यासारखेच त्यापूर्वीच्या आठवड्यात दोन तीन प्रसंग घडले होते.

मी पोचले त्यानंतर पाच-सात दिवसांतच, श्रीला सहा महिने झाले म्हणून तुमच्या घरी सत्यनारायण होता. भागीआत्या चुलीजवळ, शिऱ्याला तूप हवं म्हणून खोळंबून बसली होती. त्या घरी मला पूर्वीचा कधी तसला अनुभव नव्हता. पण दरम्यान सर्व वस्तूंना कडीकुलपात पडण्याची नित्याची सवय झाली होती! मी आपली सगळीकडे तुपाची बरणी शोधत होते.

तेवढ्यात नानी माझ्याजवळ येऊन चमत्कारिक हसल्या.

"काय ग शोधते आहेस?"

"तूप कुठे?"

"झालं काय जरा थांबायला आत्यांना? निरोपांवर निरोप हवेहेत कशाला? कुठल्या गाडीने जायचंय त्यांना? थांब— कपाटाची किल्ली तिकडे राहिली! जशी काय दुसरी कामंच नाहीत मला."

तसं एकदोनदा बोलून त्यांनी आपल्याच घरातल्या सत्यनारायणाचा प्रसाद करण्यासाठी आत्याला मोजूनमापून तूप काढून दिलं एकदाचं.

आबा, आई, सदूकाका, काकी, सारीच तिथं एकत्र राहत असतानाच्या काळातही असलं काही कधी घडलं नव्हतं. मी पाहिलं नव्हतं. मग हे असं का? मला समजेच ना.

भागीआत्या बापडी तिच्या दुर्दैवानेच तुमच्या घरात आपली हाडं पिचवत होती. तिला

कसला आला आता निराळा स्वार्थ ? स्वत: तूप खाऊन रूप का मिळवायचं होतं आता त्यापुढे तिला ? माझं घरही कुठे शेजारीपाजारी नव्हतं ! मग हा कडीकुलपांचा बंदोबस्त कोणासाठी ? कशासाठी ?

*

पण मग, ते कडी-कुलपाचं प्रकरणच दरम्यान घरात फार माजलं होतं. त्याचे अधूनमधून सर्वांनाच फटकारे मिळत होते. अगदी हसत हसत नि गपचूप.
मुलांना कॉफी प्यायची लहर लागली की अधिक आरोग्यप्रद म्हणून दूध त्यांच्यापुढे येई, नि दूध हवं झालं की कॉफीचे कप समोर येत. आखख्या लाडवांचा त्यांचा आग्रह असला तर " भूक मरेल; जेवायच्या वेळी पोट जड होईल " अशा समर्थनाने, हटकून अर्धाच लाडू फोडून त्यांना मिळे. त्यानेच मुलांची जोपासना अधिक चांगली होते हे कुठल्या इंग्रजी संगोपनशास्त्रात लिहिलं होतं, मला माहीत नाही ! पण हेच सारं नानींच्या राज्यात नेहमी चाललेलं मला तिथे असताना वारंवार दिसे.
एवढंच कशाला, निर्मल-सदानंद कधी सकाळी नानींकडे खायला मागायची. त्यावर त्यांना त्या म्हणायच्या, " जरा थांबा हं ! डब्याला कुलूप आहे. किल्ली वरच्या खोलीत राहिलीय— "
थोड्या वेळाने अधीरपणे पुन्हा खायला मागितलं, की त्या म्हणत, " मी जरा वेणीफणी करून घेते— खेळून ये जा. "
जरा खेळून ती पुन्हा मागायला आली. की लाडीक शब्दांत नानी म्हणत, " अग पण आता असं खाऊन तुम्ही जेवणार ग काय ? जा बघू— पटपट अंघोळी करून घ्या— नि जेवायलाच बसा आता पाट मांडून. "
ती दोघं बिचारी बापुडवाणी निघून जात.
त्या नाटकाचा हा शेवटचा अंक नानींनी आधीच कल्पिलेला असायचा. पण ते सरळ शब्दात प्रथमच सारं न सांगता, आडवेवेढे घेत, वळशावळशाने सारं तीनचार अंकी नाटक दीडदोन तासांत रंगभूमीवर पुरं व्हायचंच. कारण दरम्यान कोणत्याही क्षणी कोणत्याही अंकाला जर तुमची पटकन् ' एन्ट्री ' झालीच, तर त्यात काही वावगं दिसण्याची, रागारागीची शक्यताच नसे. कारण त्यातलं प्रत्येक उत्तर वेगवेगळं घेतलं, की साफ निरुपद्रवीच असायचं; मुलांच्या हिताचंच नि सकारणच असायचं !

*

एकदा अंदाज घेतला की सदा समजुतदारपणे, स्वाभिमानीपणे निघून जायचा. पण निर्मल मात्र मुळातच थोडी धीट, हेकेखोर नि लाडकर. दोनचारदा असं झाल्यावर तिने एकदा तुमच्याच कोर्टात केस नेली. हट्टच केला.
तेव्हा तुम्ही तिला कसं समजावलंत, ते मी स्वतःच माझ्या या कानांनी ऐकलंय—

" हात ग वेडे ! कसला फुसका हट्ट हा तुझा खाण्यासाठी ? नुसतं खाण्यासाठीच का तू मोठी होणार आहेस ? आमच्या लहानपणी आम्हांला ग कोण असले तहानलाडू-भूकलाडू देत होतं ? दोन वेळा भरपूर सारभात असायचा — बस ! "
ते ऐकून, आपलं काही तरी चुकलं असं वाटून ती चिमुकली पोर तिथून गेली होती. उच्च ध्येयांचा इतका छान उपयोग मुलांच्या समजुतीसाठी जगात दुसऱ्या कोणी केला नसेल ! मला मात्र त्या वेळी वाईट वाटलं होतं, रागही आला होता ! तुमचा ! !
आना, आता ती दोन्ही भावंडं मोठेपणीच आपापल्या उद्योगात पार गढून गेलेली असतात, दिवस-दिवस त्यांना खाण्याची देखील शुद्ध नसते. असल्या गोष्टींची लहानपणीच गोडी नि अभिलाषा. पण ते त्या वेळचं, त्यांच्या आटोक्यामधलं क्षुद्र सुखदेखील त्यांना तुमच्या घरात, तुमच्या नानींच्या राज्यात, कधी हक्काने सहज लाभू शकलं नाही !

*

त्याच वेळी, बोलता बोलता डोळ्याला पदर लावून, भागीआत्याने मला सांगितलेला प्रसंग मी जन्मात कधी विसरणंच शक्य नाही—
श्रीधरच्या जन्मावेळी नानी हॉस्पिटलमधे गेल्या, तेव्हा त्यांनी तुमचे व आपले सारे ट्रंक बंद केले होते. त्यांना मोठमोठी कुलपं घातली होती. वरलं झाकण व खालचा भाग या दोहोंवर पसरेल असं एकेक मोठं त्रिकोणी लेबल, त्यांनी प्रत्येक पेटीवर चिटकवलं होतं व त्यावर स्वतःच्या हस्ताक्षरात तुमचं व स्वतःचं अशी दोन नावं इंग्रजीत घालून ठेवली होती. ट्रंक कोणी उघडली की लेबल फाटेल ! कल्पना फार छान, कल्पक होती. त्या साऱ्या ट्रंका ठराविक पद्धतीने एकावर एक रचून, मगच म्हणे नानी घरातून बाहेर पडल्या होत्या. तुमच्याखेरीज भागीआत्या, यमुना, सदानंद, निर्मला एवढीच काय ती घरात राहणारी माणसं, तरी एवढा प्रचंड बंदोबस्त ! कशाला तो ? कुठला दरोडा का पडणार होता ?
अज्ञान छोट्या मुलांचं एक सोडा. पण भागीआत्या, यमुना यांना ते पाहून काय वाटलं असेल ? आत्या तर तुमचीच वयस्क, विधवा, सख्खी बहीण. ना मूल ना बाळ. अगदी नानी घरात येईपर्यंतही कित्येक वर्षं त्याच घरात एका खास अधिकाराने ती वागत आली होती. घरात ती बापडी पूर्वी जितकी मरेमरेतो काबाडकष्ट उपसत होती, तितकेच— कांकणभर अधिकच— रामरगाडे एकट्या हाताने, नानींच्या आगमनानंतरही ती काढीत होती. त्यात तिचा स्वतःचा कसला स्वार्थ, स्वतःचा संसार, काही एक औषधालादेखील सापडण्यासारखं नव्हतं.
आणि तरीदेखील आत्याबद्दलचा नि घरातल्या इतर साऱ्या लहानमोठ्यांबद्दलचा पावलो-पावली आढळणारा, तो कडी-कुलपांचा क्षुद्रमनस्क संशयकल्लोळ !
आता सांगा आना, यात हीन वृत्तीचं प्रदर्शन कोणाचं ? वयस्क भागीआत्याचं, तेराचौदा

वर्षांच्या यमुनेचं, आपल्या नादात नि हौशींमधे गुंतलेल्या बारातेरा वर्षांच्या सदानंदाचं, की निर्मल नावाच्या सातआठ वर्षांच्या पोरक्या चिमुरडीचं ? मी तर तिथं नव्हतेच पळवापळवी करायला !

✽

पण मी तिथं असतानाच्या पंधरवड्यात, घरातल्या कुठल्याही कामाला पूर्वीच्या सवयीप्रमाणे मी हात लावू लागले, तर नानी मला पटकन थांबवत, हातचं काम काढून घेत, नि मला म्हणत, "तू कशाला ? माहेरची पाहुणी तू ! इथंही काम करावं लागलं म्हणशील, घरी गेल्यावर. माझ्या घरातलं काम काय, ते कधीच संपत नाही ! माझ्या शरीराला झेपेल तसं, माझं मी आपलं उरकेन ! कुठं काय आहे, कशाला काय लागतं, तुला ग काय समजणार ? जा हो तू ! बाहेर बस जा आपली वाचत..."

कोण्या अनोळखी माणसाच्या घरातही कोणी संसारी बाई शिरली, तर समोर चालू असेल त्या कामाला ती पटकन साहजिकच हातभार लावू लागते. मग स्वतःच्या माहेरी तर समोरचं काम करून कोणीच झिजत नसतं. एखादं काम एकीऐवजी दोघींनी गप्पागोष्टी करीत केलं की ते लौकर संपतं !

पण मी केवळ त्या घरी पाहुण्यासारखीच बाहेर बाहेर असावं, आत माझा कुठंही शिरकावच नसावा, असंच नानींना मनात वाटत असलं, तर त्या तसंच बोलणार, करणार, हे समजायला मला वेळ कशाला लागणार ?

तेव्हा मग, आम्ही मुली मुली गप्पा मारीत बसायचो. कधी कधी चुलीपाशी भागाआत्या स्वयंपाक करीत असे. तिच्या जवळ बसून, हसत-खेळत इकडच्या-तिकडच्या गप्पा मारीत असायचो. आत्याही, कधी कधी आबा आजोबांवेळच्या गोष्टी आठवून आठवून आम्हाला सांगायची, कधी रडायची.

असं आम्ही बोलत असताना नानी इकडून तिकडे कधी जात-येत असल्या, तर आमच्यामधे मिसळण्याऐवजी त्या अशा काही चमत्कारिक नजरेने आमच्यावर कटाक्ष टाकायच्या, की आम्हांला ओशाळल्यागतच वाटावं !

एकदा तर निर्मल मला येऊन म्हणाली, "ए अक्का— नानी म्हणतात, हल्ली घरात गांधीलमाशा फार सुळसुळताहेत नि म्हणूनच आतू मधून मधून पिसाळतात !"

निमाला बापडीला त्यातलं खरं इंगित काय समजणार त्या वेळी ? पण ते ऐकून आतूला फार वाईट वाटलं. तिने डोळ्याला एकदम पदर लावला. मीही मनात खूपच वरमून गेले.

नि त्यानंतर पाचसहा दिवसांमधेच तो माझा तसला न्यारा माहेरवास अर्धवटच सोडून पत्राप्रमाणे काही तातडीचं कारण घेऊन आलेल्या माझ्या धाकट्या भाऊजींबरोबर मी लागलीच माझ्या सासरी निघून आले.

✽

त्यानंतर वर्षाभरानेच तुमच्या कार्डावरून आम्हांला समजलं— मालाचा जन्म झाला, यमुनेचं लग्न झालं.

यमुनेचं लग्न! ते जरा घाईघाईनेच झालं. जन्मतःच ती बापडी अधू डोळ्यांची, कमी बुद्धीची, कमी शिकलेली, दिसायला अशीतशीच— पण मूर्ख नव्हती ती. रावजी अण्णांच्या बायकोचा कोणी चुलत चुलत भाऊ नानींच्या संबंधावरूनच तुम्हांला सुचला, नि झटपट तुम्ही तिचं लग्नही उरकून घेतलं होतं. सातआठ महिन्यांच्या आतच बिचारी माहेरी परतली. तिच्या नवऱ्याने तिला टाकून दुसरं लग्नही केलं. हे सदूकाकांकडून मला पत्राने समजलं.

आणखी तीनचार महिन्यांनी तुमचं माझ्या मामंजींना कार्ड आलं. त्यावरून समजलं— "शालाचा जन्म झाला, यमुना थोडी आजारी आहे."

पुन्हा माहेरच नको असं मनात मी खूप म्हणत होते. पण काही झालं तरी असं काही ऐकलं की बायकांचा जीव थोडा तरी टांगल्याबाचून राहत नाही. आपली माणसं पुन्हा एकदा पाहावीशी वाटतात. अलीकडे बरेच दिवस माहेरी जाण्याची मी गोष्ट काढली नव्हती, म्हणून भाऊजी नि हे माझी थट्टा करीत असत. यमुनेच्या आजाराची ती बातमी ऐकून तर माझ्या जिवाने आणखीच उचल खाल्ली. हृदय वरखाली झालं नि मी ठरवलं, "आठ-पंधरा दिवस तरी आनांकडे जाऊन यायचंच! माहेरी आपणहून जायला काय आहे हरकत ? इथंय कशाला कुणाचं बोलावणं नि आमंत्रण ?"

*

आना, त्यावेळच्या माझ्या तसल्या आपुलकीच्या अचानक येण्याने तुम्हांला आनंदच झालेला दिसला. सदानंद-निर्मला माझ्याकडे हसत हसत धावत आली. यमुना आजारी होती तरी मला पाहायला खाटेवरून उठून खिडकीतून डोकावली—

पण नानींच्या डोळ्यांत मात्र स्वागत नव्हतं. चेहऱ्यावर स्मित नव्हतं. तोंडातून शब्दही बाहेर पडला नव्हता.

मी मनात किंचित रंजिस झाले, तरी तशीच आत गेले, भागाआत्याबरोबर बोलले. यमुनेच्या बिछान्यावर बसले.

दोन वर्षांत यमूची अगदी दशा दशा झाली होती. आधीच तिला सगळेच "तुला काय कळतंय ? गप्प बस!" असं वागवीत. आता तर ती नवऱ्याने टाकलेली, माहेरी परतलेली!

तिने पार हाय खाल्ली होती. रडत रडत, पण अगदी घाबरत घाबरत, इकडेतिकडे पाहत, मला ती सारं सांगत होती. तिचं सांत्वन कसं नि काय करायचं, तेच माझं मला समजत नव्हतं.

मिळेल तो तुकडा मोडून ती बिचारी दिवस कंठत होती. कारण माहेरी परतल्यापासून तिला सर्व बाजूंनी, अनेक प्रकारे अगदी हिडिसफिडीस होई. एवढे मोठे कर्तेसवरते तिचे

वडील! तिला टाकून दुसरं लग्न करणाऱ्या तिच्या त्या नवऱ्याला " का ? " असा एका शब्दानेही त्यांनी कधी जाब विचारला नव्हता. तिच्याशी बोलून, तिला कधी कसला प्रेमळ धीरही दिला नव्हता. म्हणूनच, मग ती तशी हळूहळू अंथरुणाला खिळली होती. नानींच्या दृष्टीने तर यमुना म्हणजे घरातली नको असलेली अडगळ! ती आजारी असूनही तिची अतिशय आबाळच चालली होती. तोंडाला रुची नसेल तर तिला फळं वगैरे आणून द्यायला तुम्ही त्यांना सांगितलं होतं. नानी जी मोसंबी तिला आणून देत, ती एकदोनदा डोळ्यांनी पाहून मला अगदी राग आला. एके दिवशी मी ती फेकून दिली नि माझ्या बरोबर असलेल्या माझ्या गड्याकरवी नवी चांगली आणवली.
ते पाहून, त्यावरूनच नानी मला म्हणाल्या, " आपली नेहमीची मीठभाकर ती खरी! हा चार दिवसांचा श्रीखंड-पुरीचा पाहुणचार! तो काय कामाचा ? "
त्या वेळी अगदी मोठ्या आक्रांतानेच मी माझं मन आवरलं!

*

आमच्या आईच्या पूजेअर्चेच्या जमान्यात, तिथल्या घरातला मांसाहार साफ वर्ज्य ठरला होता. तुमचाही त्यावर पूर्वीपासून फार कटाक्ष होता. पण नानींच्या माहेरच्या माणसांची ये-जा होई. त्यामुळे त्या त्या वेळी अनेकदा मटन-मासळी घरात पुन्हा शिजू लागली होती. तो विविध वास त्या विचाऱ्या आजारी पोरीच्या जीवाला, नाकात शिरून कासावीस करी. तिला त्याची पूर्वीपासूनची आवड. लहानपणी खाल्लेलं खाणं खावंसं वाटे तिला, पण त्यातला एखादा कणसुद्धा कधी तिच्या तोंडात पडेलसं नानींनी केलं नाही.
आमच्या आईच्या वेळची एक लोभाळू म्हातारी शेजारीण सीतामाय म्हणून तिथं होती. तिच्या ते लक्षात आलं. मग ती कधी कधी हळूच तुकडे वळून, कागदात गुंडाळून, पदराखाली पवून-छपवून, यमुनेची विचारपूस करायला यायची नि जाताना हळूच उशापाशी ती पुरचुंडी ठेवून ती निघून यायची.

*

या साऱ्या गोष्टी सांगतेय त्या अगदी तुमच्याच राज्यामधल्या बरं, आना! पण त्या तुम्हांला कशा नि कोणाकडून समजणार ? तुमच्या " दुनिया कैसी है ? " च्या वेळी नानींची उत्तरं " आबादी आबाद ! " म्हणून असली, की सारं तिथंच संपलं ! मला कधीमधी तुमच्याशी रागाने चारदोन वाक्यं तरी बोलावीत असा सारखा मोह व्हायचा...
पण अशा वेळी पुन्हा विचार येई, " बदल तर होणार नाहीच. मात्र नको ती धुसफुस तेवढी घरात आपल्यामुळे सुरू व्हायची नि तिचा परिणाम पुन्हा हळव्या झालेल्या यमूच्याही मनावर व्हायचा. नको ते विपरीत आणखी आपल्या हातून नको व्हायला ! "

तेव्हा खूप दुःख झालं, मनाचा प्रचंड कोंडमारा झाला, तरी त्या साऱ्या वास्तव्यामधे, तसल्या एका भीतीमुळेच, एक शब्दही तोंडामधून काढण्याची मला छाती झाली नाही. उलट मनाला वाटत राहिलं, " यातलं आता आपल्या हाती काही नाही ! "

*

त्याच एकूण परिस्थितीत सहासात दिवसांवर दिवाळी आली होती. फराळाचं सामान अय्यांकडूनच करून घ्यायचं नानींनी ठरवलं होतं. बुंदीचे लाडू चालले होते. ते सारखे मोडून पडत होते. अय्ये पुन्हा पुन्हा साखर मागून नेऊन आपलं काम पुढे चालवीत होते.

माझ्या घरी तर तसला राबता बारमहाचा चालू ! तसं सारं काही आम्हांला तर स्वतःच करावं लागे. पुरं पडावंच लागे. अय्यांनी चालवलेला तो गोंधळ, ती नासधूस मला तरी पाहवेना. पुन्हा त्यांनी साखर मागून नेली, तेव्हा अखेर माझ्याने अगदी राहवेचना. मी म्हणाले, " कशी अगदी नासधूस करताहेत मेले पाहा नानी ! पाहवत नाही अगदी— "

पण नानी त्यावर पटकन् मलाच उलट म्हणाल्या, " तुला नको बरं काळजी त्याची ! वस्तू नाश झाली तर या घरातली होईल. तुझा संसार तुझ्या घरी आपला तू काटकसरीने कर ! कोणी कोणाला काही शिकवायला नकोय ! ज्याचं त्याला चांगलं समजतं हो... "

जणू फाडकन तोंडात बसावं, तशीच त्यांच्या त्या शब्दांनी माझी स्थिती झाली. केवळ चारपाच वर्षांत, योग्य ते नुसतं बोलायची देखील आनांच्या घरात मला चोरी झाली होती !

*

माझ्या दोघा मुलांसह एके दिवशी संध्याकाळी आम्ही सारी देवळातून परतत होतो. ओळखीचा फाटक नि घराचा परिचित आकार दिसताच माझा छोटा बाळ उडी मारून हसत म्हणाला, " ओ...आलं ग आई आपलं घर ! "

पण त्या बालिश सहजस्फूर्त उत्साहाचं कौतुक कुठल्याकुठं विरून गेलं...कारण फाटकातून आत शिरता शिरता, थबकून मागे पाहत नानी त्याला हसत म्हणाल्या, " तुमचं नाही काही हे घर ! आजोबांचं, माझं घर आहे हे ! तुझं घर दूर दूर— तिकडे साताऱ्याला आहे हो— "

माझ्याहून तुम्ही खूप अनुभवी, चाणाक्ष आहात ना, आना ? घडलं ते एकूण एवढंच ! तर मग मला सांगा—कोणाला उद्देशून असतील ते उद्गार नानींचे ?

ते पोर बापडं गोंधळून म्हणालं, " म्हणजे काय ग आई ? "

आनांचं ते माझं घर नाही ! माझ्या बाळाचं नाही ! सुदैवच म्हणायचं, की ते " दूरदूरचं " घर तरी माझ्या बाळाचंच, असं नानींना वाटत होतं ! आधीच अनेक

प्रकारे विषण्ण–खिन्न झालेल्या माझ्या जीवाचा त्या क्षणी अगदी तिळपापड झाला होता. त्याच दिवशी तत्काळ आपल्या घरी परतावंसंही वाटून गेलं.

पण केवळ चारपाच दिवसांवरच दिवाळी आली होती. भाऊबीजेला सदानंदला ओवाळूनच जावं असं तीव्रपणे मनात आलं, म्हणूनच मन आवरलं. कित्येक वर्षांनंतरची ती भाऊबीज साजरी झाल्यावाचून माझा माहेरहून पायच उचलेना. पुन्हा माहेरी आल्यावर प्रत्येक वेळी, परत घेऊन जायला पत्र पाठवण्याइतकी घरच्या मंडळींची साफच लाज नव्हती सोडलेली मी! मनातली ही दुःखं! ती माझी माझ्याकडे...अपमान माझ्या पोटात! माझ्या घरच्या मंडळींनी झालं तरी आनांना नि आनांच्या घरच्यांना बोल लावलेला, उणा शब्द बोललेला, माझ्या मनाला कसा खपावा? म्हणूनच खतखतणारं मन आवरून मी तशीच आणखी चार दिवस राहिले.

*

अखेर आला एकदाचा तो भाऊबीजेचा संस्मरणीय दिवस!

मोठ्या हौसेने मी रंगीबेरंगी रांगोळी काढली. नानींकडून मुद्दाम मागून घेऊन, आमच्या आईच्या वेळची चांदीची परिचित ताटं घासूनपुसून चकचक करून मांडली. त्यात फराळ मांडला. दोन चकाकत्या समया दोन बाजूला ठेवल्या. एका पाटावर सदानंद नि दुसऱ्या पाटावर तीन वर्षांचा श्रीधर, दोघे बसले. दोघांच्या कपाळाला ओल्या पिंजरेचे टिळे लावले. त्यावर अक्षता टेकवल्या. समोर चांदीच्या ताम्हनात चांदीचं निरांजन लवलवत होतं.

किती किती सोज्वळ, प्रेममय दृश्य होतं ते! माझं तर हृदय अगदी आकंठ भरून आलं होतं! आतून आतूनच मला वाटत होतं, "बघा माझे दोघे भाऊ! कसे अगदी सोन्यासारखे! गुण्यागोविंदाने शेजारी शेजारी बसले आहेत—"

तेवढ्यातच आना, तुमची कामं संपवून तुम्ही कुठूनसे घरी परतला. तसेच थेट माजघरातही शिरला. ते दृश्य समोरच पसरलेलं एकदम पाहून, तुमचेही डोळे साहजिकच चमकलेले मला दिसले.

नि तुम्ही उत्स्फूर्त हसून म्हणाला, "अरे वाः! थाटच आहे रे पोरांनो तुमचा! इतक्या तुमच्या बहिणी जमल्या आहेत—सगळ्याच आता ओवाळणार की रे तुम्हाला! वाः वाः!"

आणि मग, एकदम खिशात हात घालून, मोठ्या उल्हसित मनाने तुम्ही म्हणाला, "किती रे नोटा द्यायच्या तुम्हाला? दहा नाही का? बरं दहाच्या की पाचाच्या?" पटकन तुम्ही पाकीट उघडलं. दहाच्या नोटाही बाहेर काढल्यात.

इतक्यात नानी झटकन म्हणाल्या, "नोटा कशाला त्या? मी घेतले आहेत वीस रुपये!"

एकदम चपापून, थोडंसं गोंधळून, काहीसं अवघडत, तुम्ही नोटा पुन्हा आत

ढकलल्या, पाकीट बंद करून खिशात सारलं नि अवघडल्यासारखं तोंडातल्या तोंडात पुटपुटून म्हणाला, " असं का...असं का! चालू द्या तर तुमचं—"
नि अधिक काही न बोलताच, तुम्ही नंतर गपचूप आल्यापावलीच ओटीवर निघून गेलात!

*

पाच मिनिटांपूर्वीच ज्या सात्त्विक, सोज्ज्वळ आनंदाच्या शिखरावर चढून माझं मन गोड गोड हेलकावे घेत होतं, तेच निघून, क्षणार्धातच धाडकन् अनंत योजनं खाली कोसळलं होतं!
का? खिशातून बाहेर पडलेल्या तुमच्या दहा रुपयांच्या नोटा पुन्हा आतल्या आत तिथंच शिरल्या म्हणून? ते का म्हणून?? माझ्या सासरीही, तुमच्याच कृपाप्रसादाने, मी दहा रुपयांच्या नोटा हव्या तेवढ्या हाताळल्या-वागवल्या होत्या! पण—मग— नानींचा तो आगाऊच तयार असलेला हिशेब, नि त्यांच्या त्या निर्णयानेच तुम्ही यंत्राप्रमाणे पुन्हा अगतिकपणे आत दडपलेल्या त्या नोटा! त्या एकूण प्रकाराचीच इंगळी माझ्या मनाला एकदम डसली होती.
त्या ओवाळणीसाठी दहाच्या दहा नोटा जरी बाहेर पडल्या असत्या, तरी त्यांतल्या फार तर दोनच काय त्या माझ्याबरोबर माझ्या सासरच्या वाटेला लागल्या असत्या. इतर साऱ्या या ना त्या प्रकारे तुमच्या खिशात पुन्हा शिरणारच होत्या. त्या तुमच्या खिशातून माझ्याकडे येणाऱ्या दोन नोटा म्हणजे मलाही काही मोठीशी आयुष्याची जोड होणार नव्हती. पण नानींच्या हिशेबी मनाला तेवढंही सहन होत नव्हतं.
पण त्याहूनही भयाण विषण्ण आश्चर्य म्हणजे, कळत-नकळत, तुम्हीही त्याच क्षुद्र मत्सरभावनेच्या आहारी, अगतिकपणे शरणचिठी देऊन उघड उघड पडला होता! तुम्हांला तुमचं मन उरलं नव्हतं! मनातील सहजस्फूर्त उत्साहातूनच त्या भाऊबीजेची सुरवात झाली होती. पण मग तितक्याच खिन्न मनाने, गपचूप गपचूपच, ती अखेर तशी एकदाची पार पडली होती.

*

काय तरी योगायोग! त्या दिवशी सदानंदाला यमुना अखेरचंच ओवाळून घेणार होती. त्यानंतर पुढली अगदी दहा वर्षं माझ्याही आयुष्यात भाऊबीज म्हणून येणार नव्हती! पण त्या क्षणी त्याची कोणाला कशी कल्पना असणार?
दुसऱ्याच दिवशी मी निरोप घेऊन घरी परतायला निघाले. पंधरवड्यातच यमू आम्हांला कायमची सोडून जाईल, त्या घरात त्या दिवसाइतके घरचे म्हणून सदानंद-निर्मला वावरताना मला तरी फिरून कधी दिसणार नाहीत, याचं मला त्या क्षणी अंधुकसं स्वप्नही नव्हतं! मनाला तजेला आणायला म्हणून मी माहेरी गेले होते. पण पूर्वीपेक्षा

अधिकच विषण्ण-खिन्न होऊन घरी परतत होते, एवढं मात्र खरं !

*

आना, येथवर लिहीत आले आहे ते प्रसंग म्हणजे केवळ तुरळक, वरवर आठवणारे, मासलेवाईक नमुनेच ! त्या काळ्या समुद्राचा हा केवळ पृष्ठभागच नुसता !
तरी देखील, मी इथं पुन्हा एकदा तुम्हांला आव्हानपूर्वक विचारते—यातल्या कोणत्या प्रसंगामधे तुम्हांला आमची दुष्ट, अप्पलपोटी, मत्सरी भावना दिसली, आना ?
पण मग, तसली भावना त्या घरात तीव्रपणे वाढीस लागली होती यात मात्र मुळीच संशय नाही ! त्याचं खापर तुम्ही आमच्यावर, भागाआत्या-सदूकाका यांच्यासारख्यांवर फोडून, अनेकदा सर्वांना दोष दिला. खरं आत्मसंशोधन करण्याची तुम्हांला कधी कदरही वाटली नाही. ती तुम्हांला ताकदच उरली नाही. आमच्या सोशीक तटस्थतेमुळे तर तुम्हांला, ‘ आपलंच बरोबर ’ असं अधिकाधिकच वाटत गेलं ! अन्य ठिकाणी दिसतो तसला नागडा-उघडा मत्सराचा झगडा, इतकं असूनही, तुमच्या घरात कधी दिसला नाही, हे खरंच ! त्याचंही श्रेय तुम्ही नानींना देत असाल; सहजसुलभ अहंभावाने अल्पसंतुष्ट होऊन स्वतःलाही घेत आला असाल ! घ्या बापडे ! आम्ही सारेच सोशीक, समजूतदार : आमच्यातली निर्मला तेवढीच सर्वांत अधिक स्पष्टवक्ती, अगदी त्राटिका ! हतबलपणे पडून सहन न करता, उत्तराला तत्काळ प्रत्युत्तर देणारी ती ! टोमण्याला टोमणा मारून, दंभाचा पडदा पार फाडूनच टाकणारी ! पण मग तीही अखेर सारं असह्य होताच समजूतदारपणे स्वतःच तुमच्या घराबाहेर पडली.
मग आता असं सांगा आना, तुमच्या घरातल्या त्या तसल्या एकसंधी नव्या राज्यात अखेर झगड्याचा सुतराम् संभवच कुठे राहिला होता ? नानी झाल्या तरी काय आमच्या फोटोबरोबरच का झगडे करणार होत्या ? नि आम्ही तरी काय जिथं दूर असू तिथल्या वाऱ्याबरोबरच का भांडणार-झगडणार होतो ?
पण नाही ! आना, तुमच्या कृपाछत्राखालच्या त्या एकछत्री राज्यातला आमचा मधीमधीचा नैमित्तिक प्रवेश देखील एकंदरीत असह्य ठरू लागला होता, तुमचीच मुलं या नात्याचे आमचे केवळ नैसर्गिक साधेसुधे हक्क देखील, त्याच तिथल्या हीन मत्सर-भावनेला, अखेर मोठ्या शीघ्रगतीने बळी पडत गेले होते !!
दहा-अकरा वर्षांनंतर मला पुन्हा ते प्रत्यक्षच पहायला-अनुभवायला मिळालं.

*

सदानंद कॉलेज संपवीत आला होता. निर्मला मॅट्रिकपर्यंत आली होती. श्रीधर-माला-शाला सारी मोठी झाली होती. श्रीधरची मुंज म्हणून तुम्ही स्वतः ( पत्र पाठवून का होईना ! ) बोलावलं होतं. म्हणून मी दोन मुलगे, तीन मुली—अशा तुमच्या सगळ्या नातवंडांना आजोळ दाखवायला बऱ्याच वर्षांनी आले होते.

मधे तुमची-माझी एकदाही भेट नव्हती. सदानंद वर्षाभरातून कधीमधी येई, निर्मला पत्र पाठवी— एकदा ती स्वतः सदानंदबरोबर येऊन इकडे राहून गेली होती. तेवढाच काय तो माझा माहेराशी उरलेला उडता, ओझरता संबंध !

दरम्यान माझा संसार वाढला होता. प्रत्येक मुलाच्या वेळी तुमची सर्वांची आठवण होई. तसं देवदयेने मला इकडे काही एक कमी नव्हतं, पण आम्हा बायकांना तो एक प्रकारचा प्रेमाचा हक्क-मान वाटतो, एवढंच. बाळओटीतून कोणी कसल्या डबोल्याची का अपेक्षा करीत असतं ? पण वेळेवरच्या साध्या आस्थेनेही माणसाचं मन मोहरून येतं, मूठभर मांस चढतं.

तरी स्वतः तुम्ही कधी या काळात माझ्या घरी आला नाहीत, हौसेने वीसपंचवीस रुपयांचे कपडे किंवा एखादी सोन्याचांदीची लहानमोठी वस्तू, लुगडं-खण, काही कोणाबरोबर पाठवलं नाहीत. तुमच्या वाढत्या परिस्थितीला ते काहीच जड नव्हतं. खास पेलणारं होतं. माझा तर तो एक हक्कच होता ! त्यात नानींचा कसला प्रश्न ? त्या कोण आल्या ? त्यांच्या आवडीनिवडीच्या प्रश्नापेक्षा, तुमच्याच कर्तव्याची ती एक बाब होती.

पण संसारातली उदासीनता, विरक्तता यांचं जे तुम्ही कधीमधी " रसभरीत " वर्णन करता, तीच वृत्ती अशी फक्त माझ्याच नि आमच्याच वाट्याला सतत येत राहिली होती ! मला दरवेळी त्याचंच वाईट वाटत आलं होतं.

इतकं असूनही मुंजीला जाताना मी ते सारं क्षणार्धात पार विसरून गेले होते. सगळी भेटणार, जमणार, याच एका उत्साहाने माझं मन नव्या तजेल्याने टवटवलं होतं. माझी पोरंही कधी नव्हेत ती प्रथमच जाणतेपणी आजोळी अशी निघाली होती; म्हणून हौसेने नाचत-बागडत होती.

पण तिथं गेल्यावर पुन्हा मागील अंकावरूनच तेच नाटक— करुण, कुत्सित नाटक— पुढे चालू झाल्यासारखंच मला वाटावं, असेच एकेक प्रसंग घडले.

*

ज्या मत्सर-भावनेचा, कुत्सितपणाचा तुम्ही आमच्याकडे अनेकदा उच्चार-धिक्कार केला आहे, तिचंच थैमान, मलाच कशाला, माझ्या छोट्या वाढत्या मुलींनाही, पाहायला मिळालं.

माझ्या मुलींपेक्षा माला-शाला फार तर वर्षा-दोन वर्षांनी मोठ्या. एके दिवशी त्या सर्वांसह तुम्ही बाजारात गेला होता. वाटेत सुंदर वेण्या घेऊन जाणारा एक वेणीवाला दिसला तुम्हांला. त्याला पाहून तुम्ही अगदी सहजस्फूर्तीने पटकन म्हणाला, " त्या बघ माला वेण्या ! ठरव नि घे डझनभर ! "

पण माला उलट पुढे चालत म्हणाली, " आजच कशाला वेण्या हव्यात, आना ? पुढल्या आठवड्यात मुंजीच्या दिवशी आपण सांगितल्याच आहेत की तीस डझन. "

केवढं आश्चर्य! तिला वेळीच स्फुरलेली ती काटकसर तुमच्याही सहज झालेल्या इच्छेला तत्काळ दडपू शकली. हीच ना ती तुमची संसारातली उदासीनता!

*

मुंजीच्या मानपानातली घरात कापडखरेदी चालली होती. कापडवाल्याचा नोकर गाठोडी घेऊन घरी आला होता. त्यातच मुंजीच्या वेळच्या स्वतःच्या पोषाखासाठी माला-शालाची कपड्याच्या निवडीची गडबड सुरू झाली होती. त्यांनी एक सुंदर कापड तुम्हाला दाखवताच तुम्ही एकदम म्हणाला, "तर मग, तुम्हांला नि त्या दोघींना—चौघींना एकाच प्रकारचं कापड किती होतं ते ठरवा नि घेऊन टाका—"
पण त्यावर शाला पटकन म्हणाली, "अहो त्यांना मुंजीत द्यायचंय ते सगळं आईने निवडलंय आधीच! खूप आणले आहेत नवे परकर-पोलके बरोबर त्यांनीही! नि आपला शिंपी ना आता, अगदी पक्का थापाड्या! हे आमचे दोघांचेच कपडे त्याने वेळेवर शिवून दिलेन नीट, तरी मिळवली. जास्त दिले तर कोणतेच द्यायचा नाही तो वेळेवर!"
अर्थात, त्या बाबतीत सुद्धा, त्यानंतर तुम्ही तुमच्या नियमाप्रमाणे संसारातली विरक्ती आपल्या अंगी आणली!

*

त्याच एकदोन दिवसांत आपल्या आईचा लहानपणीचा गाव पाहायला नि फिरायला म्हणून बाहेर पडली होती माझी मुलं. सोबतीला बरोबरीच्या शाला-माला होत्या. वाटेत, माला-शालांच्या शाळेतल्या मैत्रिणी त्यांना भेटल्या. पाहुण्या कोण म्हणून त्यांनी विचारताच, मालानेच त्यांना बातमी दिली, "सावत्र भाच्या माझ्या या! माझा मोठा सख्खा भाऊ श्रीधर आहे ना, त्याच्या मुंजीला आल्या आहेत चार दिवसांसाठी आमच्याकडे!"
साऱ्या विशेषणांसह नि मुदतबंद तपशिलाची ती आपली ओळख! आधीचा तसला कधी अनुभव- सराव नसल्यामुळे माझ्या मुलींच्या कानाला ती झोंबली, त्या किंचित ओशाळल्या देखील. घरी आल्यावर त्यांनी मला तक्रार म्हणून ते सारं हळूच सांगितलं. मला दुःखही झालं, तरी पण मी उलट माझ्याच मुलींना डोळे वटारून गपचूप दटावलं!

*

साऱ्या बरोबरीच्या त्या मुली. एकमेकींमागून घरभर, दबदबा धावायच्या. नानी सगळ्यांनाच म्हणून दबकवायच्या, नि माझ्या मुली ओशाळून मग एकदम कुठे तरी गप्प जाऊन बसायच्या. तरीपण एक काही करू लागला की दुसरी ते पाहत उत्सुकतेने

जवळपास असणारच. माला–शाला मोठ्या होत गेल्या होत्या. घरात त्यांच्या त्याच साऱ्या होत्या. परकं कोणी नव्हतं. तरी पण नानींनी पूर्वापार पाडलेला घरातला कडीकोयंड्यांचा पायंडा त्या आठदहा वर्षांत अफाटच विस्तारला होता. तुमच्या धाकट्या मुलींना देखील त्याचं महत्त्व खूपच कळू लागलं होतं.
माझ्या मुली जवळपास असल्या, तर त्यांच्या त्या बरोबरीच्याच "मावश्या" कपाट–ट्रंक किल्ल्या लावून उघडू लागत. त्यांची दारं–झाकणं त्या हळूच अर्धवट उघडीत, हव्या त्या वस्तू हळूच आत हात घालून काढीत–ठेवीत, कुलपं लावून किल्ल्यांचा घोस पुन्हा बरोबर घेऊन जात.
हे सगळंच माझ्या मुलींना नवं नवं. त्या एकदम अगदी अस्वस्थ व्हायच्या, ओशाळ्या, धिक्कारल्यागत व्हायच्या, नि माझ्याकडे येऊन हळूच विचारायच्या, "हे ग काय आई! आम्ही काय आतल्या वस्तू खाऊन का टाकतो त्यांच्या! असं ग का करतात त्या!"
तुम्ही मोठे विचारी आहा! निर्मळ जीवनाची आवड असणारे आहा! होय ना, आना! तुम्ही काय उत्तर दिलं असतं त्या पोरींना त्यावर!!

*

मुंजीचा धोवाळ संपला होता. पण देण्या–घेण्याचा नि कापडखरेदीचा गोंधळ अजून आटोपला नव्हता.
लुगड्या–कापडाच्या निवडीमधे निर्मलेने स्वतःसाठी एक नि माझ्यासाठी एक, अशी दोन इंदुरी जरीकाठी लुगडी जोडीजोडीची निवडली होती. पण अखेरच्या चाळणीमधे नानींनी ती रद्द केली होती; त्यांच्याऐवजी दोन महेश्वरीच नक्की केली होती.
तो अकस्मात बदल दिसताच, त्यावरूनच अतिशय चिडून निमा अखेर नानींना रागारागाने म्हणाली, "मला तुमचं लुगडंच नको आहे जा! नि गंगाक्का, तूही घेऊ नकोस ग ते! आमच्यासाठी थोडा जास्त खर्च झाला, की या नानींना ना, अगदी छातीवर धोंडा पडल्यासारखं होतं! आता उद्यापरवा माला–शाला लुगडी नेसू लागल्या की पाहीनच ना, आनांच्या पैशांची किती काटकसर करतात नानी त्या! म्हणतात ना, जाणाऱ्याचं जातं नि कोठावळ्याच्या पोटात दुखतं! राजाचा नाही इतका हुजऱ्याचा त्रास होतो!"
रागीट नजरेनेच निर्मलकडे पाहत चिडक्या स्वरात नानी एकदम म्हणाल्या, "काय? काय बोललीस, निर्मल? पुन्हा बोल?"
"एकदा नाही, दोनदा नाही, शंभरदा, अगदी सहस्रदा म्हणेन!" भयंकर चिडून, निर्मला अधिकाधिकच बेफिकिरीने नानींना म्हणाली, "मी असं म्हणाले, जाणाऱ्याचं जातं नि कोठावळ्याचं पोट दुखतं! समजलं? जा जाऊन सांगा आनांना, अशाच! मी तशी घाबरायची नाही म्हटलं, नानी! माझ्या बाजूला साक्षात सूर्य आहे, तुमच्या बाजूला अमावास्येचा अंधार आहे!"

मनात नानी खूपच चिडल्या होत्या. तरी पण निर्मलच्या त्या वेळच्या एकूण आवेशाने त्या किंचित दचकल्याच. त्यांनी लागलीच आपला चेहरा पालटला. सोशिकपणाचा सोवळा आव आणून त्या सौम्य शब्दांत, सस्मितपणे म्हणाल्या, " बोल बाई हो, तुला वाटेल ते बोल ! तुला काय ? मला सगळीकडेच पाहावं लागतं ! तुम्ही जाल उठून आज ना उद्या आपल्या घरी, माझ्या घरात पुरवावं लागणार एकट्या मला अखेर ! बरं, घ्या हो ती इंदुरी लुगडी तुम्हांला हवीत तर ! मी ग कशाला मधल्या मधे वाईट होऊ ? ! "
" आता बस्स कराल का ती तुमची नाटकी बडबड, नानी ? " निर्मल पुन्हा संतापाने डोळे गरगरा फिरवून ओरडली, " तुमचं ते इंदुरी नकोय नि महेश्वरीही नकोय मला आता ! आणि तू ग गंगाअक्का ! तूही घेऊ नकोस ! त्यातल्या कुठल्याही लुगड्याला तू हात लावलास तर खबरदार ! हे आपलं घर नाही, नानींचं आहे ! त्यांना सगळं आपल्या घरात थोडं थोडं करून पुरवावं लागतं ! म्हणूनच त्यांनी यमूताईचं मागे लावून दिलं, तसंच माझंही आता कुठल्यातरी वाटेवरल्या एखाद्या भिकाऱ्याशीही पटकन लग्न लावून देऊन मोकळ्या होणार आहेत त्या ! नि आनाही मला नकळत ते उरकून देखील घेतील ! मी एकटीच राहिले आहे ना बाहेरची अशी, नानींच्या घरात ? "
तसं फाडफाड बोलता बोलता न आवरवून निर्मला एकदम ओक्साबोक्शी रडू लागली. मी तिला दबकवलं; कळवळून जवळ ओढलं. नानी तेवढ्यात उठून घरात जाता जाता मला उद्देशून हळूच पुटपुटल्या, " इथं समक्ष होतीसच तू, म्हणून बरं झालं हो, नाहीतर कोणी पटकन् म्हणालं असतं, हिने पोरीला काय केलं नि काय नाही ! "

*

ते सारं प्रकरण संध्याकाळी माला-शालांकडून तुमच्या कानी गेलं. तुम्ही मला बोलावून घेतलंत नि इंदुरी लुगडं स्वतःच्याच हाताने मला दिलंत. अर्थात मी ते निमूटपणे घेतलं. तेव्हा मग तुम्ही निर्मलचंही लुगडं माझ्याकडेच देऊ लागला. त्याला मात्र मी हात पुढे केला नाही.
तेव्हा नाइलाजाने तुम्ही ते शालाबरोबर निमेच्या खोलीकडे पाठवलं. पण तिने ते न घेताच, तिच्याचबरोबर परत पाठवून दिलं—लागलीच ! " नानींनाच होईल ते पुढेमागे ! " म्हणाली ती, असं शाला येऊन सांगू लागली.
तुमचा चेहरा किंचित पालटला, पण तुम्ही चिडला नाही. एक निःश्वास तेवढा टाकलात, नि गप्प आरामखुर्चीवर पडून राहिलात. मीही तिथून निमूट घरात निघून गेले.

*

या सर्वच प्रसंगांचा, त्या वेळी नि त्यानंतरही हजार वेळा, मला अगदी उबग येत राहिला आहे. एकेकदा वाटतं, हे जग भरलंय तरी कशाने ? कशाने कोणाला सुख

लाभतं ? वैभव म्हणजे असतं तरी काय ? ?

तीनचार दिवसांनी मी सासरी परतताना माझ्या भावना उसळून उसळून येत होत्या. मला भडभडून येत होतं. आमच्या आईची कधी नव्हती इतकी आठवण पुन्हा पुन्हा होत होती.

तिचे ते अखेरच्या दिवसातले शब्दही फिरफिरून कानांत दुमदुमत होते— "अग, तुमचे वडील आता मोठे होण्याच्या मार्गाला लागले आहेत. आता बघता बघता संपत्तीच्या राशी पडणार आहेत या घरात! सासूबाईंनी हाल सोसले—बापड्या गेल्या! मी आता त्याच मार्गाला लागलेय. म्हणूनच त्या येणाऱ्या राशींचीच मला भीती, भयंकर भीती वाटायला लागलीय. त्या भीतीनेच जीव कासावीस होऊन मी लौकर जाईन एखाद दिवशी फटकन! मला माहीत आहे, माझ्या बरोबरच तुम्हा साऱ्या पोरांच्या कपाळचं या घरातलं सुखही जाणार आहे! मी काय म्हणतेय ते लक्षात ठेव, पोरी! या घरात आता यापुढे एक एक भयंकर चमत्कार घडणार आहेत!

लक्ष्मीला–संपत्तीला कधी भावना नसतात. तिची मर्जी झाली की तिचा झपाटा पुढल्या दाराने घरात शिरतो. तसा तो शिरला की घरातल्या साध्यासुध्या निर्मल भावना, साधंसुधं सुख...जीवन...यांचा नुसता थरकाप होतो! नि ते सारं सारं...मागल्या दाराने जीव घेऊन पळतं! हे घर आता वैभवाने भरेल, हे खरंच! यांनी कष्ट केले, सासूबाईंनी, सदूभावजींनी...आम्ही साऱ्यांनीच एवढे कष्ट केले आजवर! ते फुकट जाणार आहेत थोडेच ? ? पण...म्हणूनच पोरी, तुमच्या–माझ्यासारख्या साध्यासुध्या माणसांच्या साध्यासुध्या सुखांना मात्र यापुढे या घरात थाराच उरणार नाही!! खरंच नाही! खरं खरं वाटतंय मला तेच बोलतेय मी —"

आईच्या अंगात त्या वेळी कसला दैवी संचार झाला होता की काय ? ती जणू ही आज प्रत्यक्ष दिसतेय ती, भविष्यवाणीच बोलली होती त्या वेळी! तिच्या त्या शब्दांमधला खरा अर्थ आज बघायला सापडतोय आम्हांला!

*

इतकं असूनही मत्सराने आम्हांलाच ग्रासलं असं तुम्हीच म्हणता, आना ? त्याबद्दल तुम्हांला काय म्हणावं तेच मला समजत नाही.

नानी नाहीत, आम्हीच मत्सरी क्षुद्र, हे क्षणभर कबूल करू. या पण त्याच कडवट, तीव्र, भयंकर भावना तुमच्या माला–शालांमध्ये पराकोटीला गेलेल्या आढळतात; त्या त्यांच्यात जन्मतःच आल्या म्हटलं, तर तो "गुण" त्यांना कुठून मिळाला ? आम्ही तीन भावंडं नि त्या...सारी तुमचीच तर मुलं !...मग त्या दोन्ही मत्सरग्रस्त भावनांच्या क्षुद्र जीवांचे जनक तुम्हीच! परिस्थिती नव्हे! म्हणजे आना, आम्हा सर्वांना लाभलेली ती तुमचीच देणगी समजायची का ? पण तुम्ही वाटेल ते म्हणा, आम्ही मी ते कधी कबूल करणं शक्य नाही. मी त्याला नानींच्या मनातील, नानींच्या राज्यातील तिथली

परिस्थितीच जबाबदार असते !
तुम्ही नानींचं हवं ते समर्थन करा : स्वतःची खुशाल जाणूनबुजून दिशाभूल करा. आम्ही तरी या साऱ्यांचं मूळ नानींच्या आगमनातच शोधणार. तुम्हीही बदलला असाल तर ते नानींच्याच सहवासात ! आमची आई असताना तिच्या सहवासात तुम्ही तिच्यासारखेच होता. तरी देखील तुम्हांला तिच्याशी, तिच्या भावनांशी कधीच एकरूप होता आलं नाही. तेव्हा तुम्ही तरुण, महत्त्वाकांक्षी, स्वमताग्रही होता. आता तुमच्या मूळ महत्त्वाकांक्षेत नानींच्या महत्त्वाकांक्षांची एक भर पडली आहे. घरात शिरलेल्या लक्ष्मीशी तुम्ही पूर्णपणे एकरूप झाला आहा. हा तुमचा जणू मानसिक कायाकल्पच झाला आहे !
हा साराच पालट आश्चर्यकारक आहे, तितकाच नाजूक आहे. त्यामुळेच आईची आठवण होते. जीव चुटपुटतो ती नाही या जाणिवेने. " आई " अशी तुम्हालाच विरंगुळ्यासाठी हाक मारावीशी एकेकदा वाटते, आना !

*

प्रौढत्वही ओलांडलेल्या स्त्रीला अशी आईला हाक मारण्याची इच्छा व्हावी, याची कदाचित तुम्ही थट्टा कराल, हे मला माहीत आहे. पण पन्नाशी-साठी उलटलेलं माणूसही आपल्या आईपुढे लहान मूलच असतं ! त्याच्या आईलाही त्या माणसाबद्दल तसंच वाटतं ! एक संसारी स्त्री व माता या नात्याच्या माझ्या प्रत्यक्ष अनुभवावरून मला तरी असंच वाटतं !!
तरी मला मात्र इथं आठवतंय, प्रथम विरोध केलात त्या सदानंदच्या लग्नाला तुम्ही संमती दिलीत, त्या वेळी तो तुम्हांला सहज म्हणाला, " तुम्हीच आमचे आईबाप, म्हणूनच मी मागे म्हणालो व आताही म्हणतोय की तुम्हांला दुखवून कसलंही व्यक्तिगत सुख मला नकोय—"
त्यावर तुम्ही काहीशा उपहासाने हसून, त्याला काय म्हणाला ? आठवतंय आना ? तुम्ही म्हणे म्हणाला, " अरे, एखाद्या लहान बालकाला आई लागते. मर्द माणूस स्वतःचा स्वतः मुखत्यार असतो. मला आई म्हणण्याइतका दुबळा, भावनाप्रधान रे का होतोस तू ? तुझं तू योग्य ते ठरव, कर ! माझ्या विरोधाचा तरी कशाला प्रश्न ? माझा विरोध नाही असं धरून चाल ! "
योग्य वेळी नाइलाजाने एकदाची संमती देतानाचे तुमचे हे असले शब्द ! तुमच्या मनाचा नको तो, दुबळाच पीळ दिसतो त्यात ! त्याच्या लग्नावेळचं तुमचं त्यापुढलं त्रयस्थ वागणंही तेच दाखवत होतं आम्हांला. तुमचा दुखावलेला अहंभाव हेच त्यातलं एकूण मुख्य कारण होतं. आईच्या नसेल पण सर्वसाधारण पित्याच्याही वत्सल भावना त्या वेळी तुमच्यामधे जागृत झालेल्या दिसल्या नाहीत.
क्षणभर तेही क्षम्य म्हणू : पण म्हणून " मर्दाला किंवा प्रौढ स्त्रीला आईची गरज

नसते. " असली आत्यंतिक विकृत कल्पना, तसले ते शब्द, आपल्यासारख्या सुशिक्षित, हुशार, अनुभवी, विचारी माणसाला कसे बरं शोभून दिसतील ? तुम्हांला इथं स्पष्टच सवाल विचारते मी आना ! आता तुमच्या छोट्या मुलींचीही लग्नं झाली. त्यांनाही मुलं झाली. मग त्यांना हो अजूनही त्यांच्या आईची प्रत्येक वेळी आठवण कशाला ? गरज कशाला ? आजार, प्रसूती, अशा वेळी एकट्या नानीच नव्हेत, तुम्हीसुद्धा कासावीस होता, हळव्या-दुबळ्या मनाने धावपळ, दगदग, खर्च करीत सुटता ! ते हो का ? त्यांच्याबाबत जे जे सहजतः तुमच्या हातून घडतं, ते त्यांच्या पूर्वीच्या तुमच्या मुलांबाबत कधी झालं होतं का ? त्यांच्यामुळेही तुम्हांला त्याच प्रकारची सुखदुःखं सामोरी आली नव्हती का ? त्या तुमच्या मोठ्या अपत्यांना आईबापांची जरूरी नव्हतीच का ? त्या वेळीच तुमचा तो निर्विकार ' धर्म ' का उभा राहिला ? का राहतो ?—माझी खात्री आहे, तुम्ही माझ्या या प्रश्नांच्या उत्तराऐवजी मौनच स्वीकारणं सोयीस्कर ठरवाल !

*

तुमच्या घरातून निर्मला एकदम उठून गेली, त्या वेळी तिने— तुम्हांला नाही, पण— मला एक पत्र पाठवलं होतं. ते मी मुद्दामच या पत्राअखेर आता जोडून तुमच्याकडे पाठवून देत आहे. त्यातून तुमच्या दुसऱ्या सुशिक्षित मुलीची बाजू व तिचं मनही तुम्हांला समजेल.

त्याच नानी-आनांच्या घरात, निर्मलपाठून आठदहा वर्षांत शाला वाढून मोठी झाली. निर्मलेवर रागारागी करण्यासाठी झालेल्या विपर्यस्त प्रसंगांच्याच आवृत्त्या त्या घरात तुमच्या समोर घडून आल्या. मुलींची तारुण्यसुलभ चवचाल थेरंही तुम्हांला स्वतः पाहावी लागली. पण त्या वेळी तुमची पित्याची दृष्टीही आईच्या अत्यंत हळव्या नजरेने व मऊ मनानेच वागली ! हे तुम्हांला मनात तरी निश्चितच पटेल.

तर मग, ते तसं का ? सदानंद-निर्मल या आई नसलेल्यांची आई होणं तुम्हांला हास्यास्पद वाटलं, होताच आलं नाही ! त्याच सुबुद्ध पित्याला, दुसऱ्या मुलींची आई असतानाही, स्वतः आईसारखं कसं वागावंसं वाटलं ? कसं वागता आलं ?

हे माझं कोडं मला सोडवता येतं, तुम्हांला मात्र ते कधीच सोडवता येणार नाही. सोडवून सांगणं शक्यही होणार नाही. नि ती माझी अपेक्षाही नाही !

मात्र आपल्या दुबळेपणाला तुम्ही असला खोटा साज चढवलेला नि आपल्याच मनःस्थितीवर कधीकधी चिडून त्याचा राग आमच्यावर काढलेला आम्हांला आता सहन होणार नाही. तसलं तुमचं बोलणं-रागावणं धादांत असत्यामधेच मी तरी खासच जमा करीन. स्वतः तुम्ही सुखी नाही, अस्वस्थ आहा, हे जाणून आमच्या मनाला सहानुभूती वाटेल, पण तुमच्या खोट्या समाधानासाठी तुमचे वाटेल ते शेरे मी सहन करणार नाही !

*

आता अखेर, केवळ संसारी स्त्रीच्या नात्याने तुमच्या नेहमीच्या एका वारंवार उल्लेखिलेल्या कल्पनेबद्दलही मला काय म्हणायचंय ते सांगून, मी इथं मोकळी होणार आहे.

आमच्या आईपश्चात नानी व नानींबरोबर त्यापाठोपाठच तुम्हांला वैभवप्राप्ती झाली. हा अद्भुत योगायोग तर खराच. तरी पण, तसं त्यात तरी अद्भुत असं काय आहे? तुमच्या साऱ्या धोरणी योजना, आमची आई हयात असती तर काय हवेतच विरून गेल्या असत्या ?

आपल्या पत्नीबद्दल कोणालाही प्रेम असावं व तसं ते असणारच, पण त्याचं असं अवास्तव स्तोम, प्रदर्शन-समर्थन हवं कशाला ? "तुम्ही आजारातून बरे झाला तेही नानींमुळे." असलं काही ऐकलं, की एक संसारी स्त्री म्हणून मला नुसतं खो खो हसूच येतं! नि म्हणूनच मलाही माझा थोडा अनुभव तुम्हांला इथं सांगावासा वाटतोय—

एकनिष्ठा, नम्रता, सहकार्य, सारं, प्रत्येक जबाबदार पत्नीच्या ठायी असायलाच हवं ! इच्छेविरुद्ध अनेक बाबती करणं, आवश्यक ती पतिशुश्रूषा-सेवा करणं, हे तर तिचं कर्तव्यच असतं. स्त्रियांच्या याच, असल्याच वागणुकीवर, सहनशीलतेवर, सहिष्णू कर्तव्यदक्षतेवरच ना, आजवर सुसंस्कृत मानवी प्राण्याचा संसार-समाज चालत आला आहे ?

जवळजवळ एकाच सुमाराला मी माझा व नानींनी नानींचा संसार सुरू केला. स्वतः तुम्हीच तर मला माझे पती निवडून दिले. पण आना, तुम्ही जितके सुशिक्षित, कर्तबगार, समजूतदार, सौजन्यसंपन्न आहा, मिळते घेणारे आहा, तितकेही माझे पती वास्तविक पाहता नाहीत. त्याबद्दल अर्थातच आता मीही असंतुष्ट उरलेली नाही. सुखदुःख अशी दोन्ही बाजूंची विचारी बेरीज-वजाबाकी करूनच, मी मला लाभलंय त्यात पूर्ण समाधान मानीत आले आहे, मानीत आहे. असाच मी इतकी वर्षं संसार केला व अजूनही करीतच आहे. संसाराला स्वतःच्या अंताशिवाय अंतच नसतो !

*

पण मग, यासाठी माझ्या पतींनी माझा नको तसा गौरव करावा असं मला तरी वाटत नाही; केला तर तो मला रुचणारही नाही. कारण या गोष्टी कोणी कोणाला शब्दांत वर्णन करून सांगायच्या नसतात. आम्ही स्त्रियांनी तसं वागलंच पाहिजे. त्यात नवलाईचं असं काहीच नाही. सूर्य रोज उगवतो नि मावळतो, यात नवलाईचं किंवा कौतुकाचं काय असतं ? तसंच हेही आम्हा स्त्रियांचं कर्तव्यच असतं ! भयंकर तत्पर, संसारी, प्रेमळ, घर संभाळून वाढवणाऱ्या स्त्रियांचीही दुर्दैवी पांढरी कपाळं मी पाहिली आहेत. तेव्हा पत्नीच्या सेवाचाकरीचा, पायगुणाचा पतीच्या दीर्घायुष्याशी, वैभवसंपन्नतेशी संबंध कोणी जोडलेला पाहून मला तरी हसूच येतं.

प्रत्येक व्यक्तीचं सुखदुःख, आयुष्य, वैभव-दारिद्र्य, हे सारं काही झालं तरी अखेर ज्याचं त्याचंच असतं, हेच खरं नव्हे काय? पण हे मी उगीचच तुमच्यासारख्या विचारी माणसाला काय सांगत बसले आहे!

*

मनाला, डोक्याला एकदा एक चालना मिळाल्याबरोबर एखाद्या पिसाटासारखं मी हे सारं भराभरा भरकटत, लिहीत गेले आहे! क्षणभर, आपण कोणासमोर नि कोणाला उद्देशून हे सारं लिहीत आहो, हेच मी साफ विसरून गेले होते. तरी पण, ते एका अर्थी बरंच झालं! मनात आता कसली मळमळ तरी उरलेली नाही.

इतकं असूनही, क्षमा करा! आना, मला मोकळ्या मनाने क्षमा करा. संसाराच्या दैनंदिन धडपडीत भरकटत चाललेल्या माझ्यासारख्या सामान्य अर्धशिक्षित दुबळ्या स्त्रीची आपल्याला यांतला एक शब्दही लिहिण्याची खरी योग्यता नाही! तो माझा अधिकारच नाही.

भावना-विचारांच्या या एका अजस्र अशा झपाट्यामधे, माझ्या मनाने हे एक भयंकर दिव्यच उरकून टाकलं आहे. ते सारं लिहीत असताना माझी मी नेहमीची, साधी संसारी गंगा नव्हतेच मुळी. हा केवळ आपल्या पित्याकडे उलट धावणारा गंगाप्रवाह होता.

म्हणूनच आना, ओघात आलेल्या अनेक अधिक-उण्या शब्दांबद्दल मला तुम्ही मोकळ्या मनाने क्षमाच करायला हवी. सत्यप्रेमी माणसाकडूनच अनेकदा अनृत-असत्याची तरफदारी, समर्थन झाल्याचं दिसल्यावर, तसल्या अकारण सातत्यानेच आपला जीव कधी ना कधी पार होरपळून निघतो! त्याबरोबरच सत्य, सौजन्य, सहिष्णुता यांची शांत जपणूक करीत असलेल्या समंजस बाजूच्या माथी धादांत असत्य आरोपही लादले गेलेले दिसले, की केव्हा ना केव्हा मनाचे सारे लगाम तुटतात! आपण नेहमीचे उरत नाही! तसंच माझं झालं.

*

असो. या दोन तपांच्या संसारी आयुष्यामधे एखादी ओळही लिहायचं किंवा मान वर करून एखादा उलट शब्दही उच्चारायचं विसरून गेलेल्या माझ्यासारख्या दुबळ्या स्त्रीमधे देखील हे एवढं मोठं पत्र लिहून पुरं करायचं आश्चर्यकारक व असामान्य सामर्थ्य, बळ, नकळत आलं ते ह्यामुळेच!

हे अखेरचे शब्द लिहून पुरे करता करता मात्र माझा हात दमल्याभागल्यासारखा होत चालला आहे. माझं मन तर, अगदी एखाद्या मोठ्या आजारातून उठल्यावर वाटावं तसंच—शिणल्यागत, हलकं झालं आहे!

एवढ्याचसाठी, फिरून एकदा क्षमा मागून, पत्र संपवण्यापूर्वी माझ्या मनातल्या साऱ्या

साऱ्या शुभेच्छाही इथं लिहून घेते.
नानींचं, त्यांच्या मुलांचं, तुमच्या मनचं सारं सारं सुख अखंड अक्षय टिको— त्या सर्वांना, तुम्हांला उदंड आयुष्य लाभो.
त्याप्रमाणेच सदानंदाला, निर्मलेला, मला, माझ्या मुलां-माणसांना सुखसमाधान, आयुरारोग्य लाभो. आशीर्वाद असावा.
तुमची व तुमच्या धार्मिक, सोशिक, अबोल यशोदेचीच मुलगी

— गंगा

## निर्मल स्वातंत्र्य

२९ मार्च १९३०

प्रिय गंगाअक्का,
कदाचित सदाभय्याकडून आतापर्यंत तुला समजलं असेलच, नसेलही कदाचित— पण परवाच मी आपलं—म्हणजे आनांचं—घर सोडून गेले आहे.
खरं खरं सांगू, अक्का ? तसं त्यांना सोडून जाताना मनात अतिशय कालवून येत होतं. " नको, नको, " असं मी स्वतःला दहा वेळा समजावून पाहिलं, पण अखेर ते अशक्य वाटूनच मी घराबाहेर पडले. आता मात्र झालं ते झालं !— नि झालं ते बरंही झालं ! फक्त तुझा आणखी गैरसमज नको, म्हणून तुला तेवढं हे लिहितेय !
मी निघून आल्याबद्दल आनांनाही अतिशय दुःख झालं असेल हे खासच, पण त्याबरोबरच—त्यापेक्षा अधिकच—त्यांना आपला स्वतःचा भयंकर अपमान झाला, बेअब्रू झाली, असंच वाटलं असेल ! केवळ आपल्याच मनासारख्या सगळ्या गोष्टी होत असलेल्या पाहायची आनांना नेहमी सवयच झालेली आहे. किंवा, होत असलेल्या गोष्टी आपल्या मनासारख्याच आहेत, असंच मानायची तरी आता सवय झालेली आहे ! बरातून एकाएकी माझं हे निघून जाणं, ही त्यांच्या मनासारखी गोष्ट खासच नाही. नि माझं जाणं ही घटना घडली ती आपल्या मनासारखीच, असं मानायचीही त्यांच्या मनाची मुळीच ताकद नाही !
त्यामुळेच, आना आजकाल अतिशय व्यथित अंतःकरणाने घरी बसले असतील, त्यांना माझा राग आला असेल, नाही असं नाही. पण कधी नसेल एवढा मोठा झगडाही त्यांच्या मनात उभा राहिला असेल. पुन्हा, ते सारं गपचूप, एकट्या आपल्या मनातच ठेवणंही त्यांना प्राप्त झालं असेल. तरी पुन्हा, घरात ओघाने बोलताना, उलट माझ्याबद्दलचाच राग शब्दांत व्यक्त करून, मलाच ते दोष देत असतील ! एकूण काय ? दुर्दैव ! त्यांचं नि माझंही !

ते तसा दोष देवोत बापडे ! मला मात्र त्यांच्याबद्दल नि माझ्याबद्दल, दोघांबद्दलही सारखंच वाईट वाटत आहे. या क्षणी जे काही झालं ते त्यांच्या आटोक्यातून केव्हाच सुटलं होतं; माझ्याही हाती त्यातलं काही उरलं नव्हतं. त्यांच्याइतकीच मीही अगदी अगतिक होते ! म्हणूनच बाहेर पडले !

*

खरंच अक्का, सारं सारंच अगदी असह्य होऊन, माझा अखेर पूर्ण नाइलाज झाला. मला माहीत आहे, माझं ऐकण्यापूर्वी तू नक्कीच म्हणशील, की मी अधिक सहन करायला शिकलं पाहिजे होतं. जसे अनेक अपमान, अनेक प्रवाद सदाभय्या निमूटपणे गिळत राहतो, तसंच मीही जे काय झालं असेल, ते पार गिळूनच टाकायला हवं होतं. आनांसाठीच, त्यांच्या भावनांसाठीच, मी निदान घरातून असं निघून तरी जायला खासच नको होतं !

पण मग, गंगाअक्का, सदाभय्या हा एक पुरुष आहे; आनांच्या संसारापासून, त्या दैनंदिन वातावरणापासून तो केव्हाचाच दूर दूर आहे. उलट, आपल्या आईपश्चात अगदी वर्षानुवर्ष त्या घरात मी नानींबरोबरच वागत-वाढत आलेली आहे. सदाभय्या त्याच्या बऱ्यावाईट स्वर्गात होता, मी मात्र नानीनिर्मित एकमेव नरकातच सारखी होरपळत होते ! खितपत पडले होते !

नानींची कुत्सित वागणूक नि आनांची स्वयंनिष्ठ, आत्मसंतुष्ट, सहानुभूतिशून्य एकतर्फी समर्थनवृत्ती ! त्यामुळे लहानपणापासून आतापर्यंत माझ्या मनात वेळोवेळी हजारो आकांत उभे राहिले. तू या क्षणी म्हणशील, सुचवशील, त्याच एका सहिष्णू, क्षमाशील, संयमवृत्तीने मी आजवर ते गिळत आले. त्यामुळेच परवाच्या इतका प्रचंड आकांत त्यापूर्वीच्या कोठल्याही प्रसंगामधून निर्माण झाला नव्हता. वाइटात तेवढंच समाधान. पण मग, उंटाचीही पाठ शेवटच्या एका काडीने मोडतेच की !

परवा एका अगदी क्षुल्लक कारणपरंपरेतूनच तो उग्र झंझावात उसळला ! शब्दाने शब्द वाढले. दुखावलेल्या भावनांनी कठोर भावनात्मक हल्ले केले, त्यातच आनांच्या दुरभिमानानेही मधेच उसळी घेतली व माझ्या साध्या स्वाभिमानालाही त्यांनी एकाएकी भयंकर दुखावलं !

माझ्यातल्या जाग्या स्वाभिमानानेच मला भयंकर अस्वस्थ केलं. माझ्या प्रबळ भावविवशतेचा हात पकडून त्याने झेप टाकली, आपल्या भोवती आजवर बांधून राखून ठेवलेल्या आनांबद्दलच्या पवित्र आदराच्या अभेद्य भिंती खाडकन् ओलांडल्या. मला काही एक न समजताच, मी स्वतःच्या पायांनीच हद्दपार झाले. आजपर्यंत मानीत आलेल्या कुंपणापलीकडे मी उडी मारली.

नानींना हवं होतं, मला नको होतं, नि आनांनाही बहुधा नकोच होतं, तेच नेमकं माझ्या हातून असं घडून गेलंय ! त्यामुळेच क्षणभराने मनातल्या मनात माझी मीच,

स्वतः माझ्याकडेच आश्चर्याने थक होऊन पाहत राहिले होते.
थोडक्यात, नानींची कुशल कुटिलता, आनांचा स्वमतशून्य प्रवाहपतित दुबळेपणा, नि आजवर सहस्रशः दडपलेल्या-चेंगरलेल्या माझ्या नैसर्गिक भावभावनांचा झालेला एका अकस्मात उद्रेक — यातूनच हा प्रसंग घडून आला आहे !
असो. आता काय ? झालं ते झालं, बरंही झालं; पण ते तसं झालं नसतं, आना माझ्यामुळे दुखावले गेले नसते, तर मात्र अधिक बरं झालं असतं, एवढं मात्र मी या क्षणीही म्हणेन !

*

काय घडलं ते कसं सांगू तुला थोडक्यात, गंगाक्का ? पण बघते बापडी प्रयत्न करून.
एखाद्याच्या दैनंदिन आयुष्यातील लहानमोठ्या हालचालींच्या तपशिलांचं सूक्ष्म निरीक्षण बघताबघता करायचं नि त्यांना कौशल्याने विकृत स्वरूप देऊन, त्यांची अद्भुत गल्लत करायची, त्या सर्व गोष्टींना स्थानी-अस्थानी विसंगत स्वरूप द्यायचं नि तो एक थट्टेचा क्षुल्लक विषय करून, त्यातून दुसऱ्याला निरर्थ डिवचायचं, हसत हसत त्याचं मन हळूहळू मारायचं नि त्याचा नैसर्गिक उल्हास शोषून घेऊन त्याला पार विमनस्क करायचं, हे सारं सारं म्हणजे नानींच्या अगदी हातखंड्या गोष्टीच ! ते तुला मी इथं पुन्हा सांगत बसत नाही.
त्याऐवजी, गेल्या वर्षी मी मॅट्रिक झाले त्यानंतरच्या काही घटना तेवढ्या सांगते— तेव्हापासून तर नानींनी माझ्यावर एक नवाच प्रयोग सुरू केला. शाळेत मी पहिली आले. कॉलेजातही चौथी स्कॉलरशिप मिळाली मला. पण हेच जणू त्यांना पाहवलं नाही. त्यात पुन्हा माझ्या टेबलावरील पुस्तकांच्या चळतींवर मग पिंगपॉंग रॅकेट वारंवार दिसू लागली होती. मी चार गाड्या अगोदर घरून निघे, ती फास्ट असल्यामुळे जवळ जवळ पाऊण तास आधी पोचायची. कॉलेज गाठताच गेम्स कॉमन रूममधे मी भरपूर खेळायचे.
झालं ! आठवड्याभरात जेवण थोडं उशिरा तयार व्हायला लागलं. मी एकदोनदा नाइलाजाने खेळ बुडवला. तरी पण माझ्या फास्ट गाडीची वेळ झाली की मला चुटपुटही लागायची खूपखूप. अखेर मी नानींचं धोरण ओळखलं— कारण मला हे माहीत होतं की, जर एखादं काही नानींच्या मनात नसलं, तर त्या अशा सत्रा अपरिहार्य अडचणी गपचूप तयार करणारच. तेव्हा कसल्या वादविवादात न शिरता, तिसऱ्या दिवसापासून मी जेवल्याशिवायच घरून निघू लागले.

*

नानींनी त्यावर दुसराच एक साळसूद तोडगा काढला. चौथीतल्या मालेचा रोज सकाळी

मी अभ्यास घ्यावा अशा "प्रेमळ" सूचनेने त्या नव्या प्रकरणाला सुरवात झाली. पण मला जेव्हा वेळ असे, तेव्हा मात्र मालीला वेळ नसे. लौकर उठायची तिची वात नसे. मी बाहेर पडायची, घरून निघायची तयारी सुरू केली, की ती तत्परतेने पुस्तक घेऊन माझ्याजवळ येई.

एक दिवस सूचना देऊन, तिच्या तालाने घेतल्यावरही पुन्हा दोनदा तसंच घडल्यावर मी तिला त्याबद्दल रागावले. तत्काळ ती ढसाढसा रडली. मी अधिक काही न बोलता बाहेर पडले नि माझी गाडी गाठली. प्रकरण आनांच्या कानी जाणार हे मला ठाऊक होतं; पण आना मला काही न बोलता दुसऱ्या दिवसापासून मालाचा अभ्यास स्वतःच घेऊ लागले. मीही मुद्दाम तिकडे दुर्लक्ष केलं. आनांनीच ते तसं मनात ठेवल्यावर, मी तरी आणखी खाजवून खरूज कशाला काढायची ?

पुढे पुढे खेळ, डिबेटिंग, वाचन यांसाठी मी कॉलेजात खूपच रंगले. तिथं माझ्या खूपच मैत्रिणी नि मित्र. त्यांतील सोफी म्हणून माझी एक पारशी मैत्रीण—माझं सकाळचं जेवण तिच्याबरोबरच कॉलेजमधे होई. मी शाकाहारी म्हणून मुद्दाम निराळे पदार्थ माझ्यासाठी करून डब्यातून ती आणी. तिच्याबरोबर तासभर अभ्यास करावा लागे. मोठी समजूतदार, आस्थेवाईक पोर ! त्यातच इंग्रजी-मराठी नाटकांतली कामं, व्याख्यानं, टेनिस-बॅडमिंटन-पिंगपाँग टूर्नामेंट्स करता करता माझा वेळ कसा पळून जाई, ते समजतही नसे. सकाळी मी लौकर तर निघेच, पण कधी कधी घरी पोचेपर्यंत काळोख सुद्धा पडे. तरी सहामाहीत माझा दुसरा नंबर आल्यामुळे मला काही बोलायला नानींना—आनांना जागा उरली नव्हती.

*

पण किंचित अंधुक संधी नानींना सापडण्याचा योग आलाच शेवटी.

आपला सदाभय्या हल्ली लेक्चरर झाला असला, तरी तो आमच्या कॉलेजात नाही. पण तो व प्रभाकर हे दोघे आमच्याच कॉलेजचे माजी विद्यार्थी. प्रभाकर आम्हांला लेक्चरर म्हणून आले, तेव्हाच माझा-त्यांचा पहिला परिचय झाला. सदाभय्याच्या मुंबईतल्या ब्रह्मचारी खोलीवरही त्याला कधी मी भेटायला जायचे, त्या वेळी तीनचारदा तिथे प्रभाकरांची-माझी ऐसपैस भेट झाली. कॉलेजमधल्या डिबेटिंग, ड्रामा वगैरेमधे ते भाग घेत असत, म्हणूनही त्यांची माझी ओळख वाढत गेली. आम्ही तिथे कधी गप्पा मारत बसू, कधी एकदोनदा आम्ही सिनेमालाही बरोबर गेलो होतो.

तुला खरं सांगायचं म्हणजे प्रभाकरांबद्दल मला थोडं आकर्षण वाटू लागलं होतं हे खरंच, पण म्हणजे, आम्ही दोघंही आपापल्या मर्यादा संभाळून होतो. शब्दानेही आम्ही आमची मनं एकमेकांकडे कधी व्यक्त केली नव्हती. सदाभय्यासारखा "सोवळा" माणूसही आम्हा दोघांवर खूष होता.

प्रभाकर असहकाराच्या चळवळीबद्दल कधी कधी वर्गातही प्रत्यक्षाप्रत्यक्ष बोलत, त्या

वेळी त्यांना आवेश येई. सगळा वर्ग त्या वेळी कान टवकारून ते ऐके. चळवळ वाढत चालली होती. हरताळ पडू लागले होते. आमचंही कॉलेजला जाणंयेणं अनेकदा अनिश्चित होऊ लागलं होतं. माझ्या मनात मात्र आता हुरहूर लागू लागली होती. वाटे, "आता प्रभाकर आपल्याला केव्हा तरी एकदम सोडून निघून जाणार!" त्यामुळे जीव हुरहुरेही.

त्या दिवशी तर मी संध्याकाळी जरा गोंधळल्या मनःस्थितीतच घरी परतले होते. कारण प्रभाकरांनी त्याच दिवशी कॉलेज सोडून दांडीमार्चमधे सामील होण्याचं ठरवलं होतं. आपल्या वर्गात अखेरचा निरोप घेताना, आम्हा सर्वांची मनं हादरवून—हलवून सोडणारं एक भाषण केलं होतं.

घरी परततानाच्या माझ्या भावना संमिश्र नि दुहेरी होत्या. चळवळीची उत्सुकता होतीच, पण त्यात एक अंधुकशी व्यक्तिगत हुरहुरही मिसळलेली माझी मलाच पुनःपुन्हा आढळून येत होती. अशा वेळी मन अधिकाधिकच गोंधळतं. विनयाने आपण स्त्रिया अधिकच टांगल्या जातो. म्हणूनच, मी व्याख्यान संपताच, प्रभाकर मला शोधत होते, तरी गर्दीत मिसळून केव्हाच सटकले होते व स्टेशनही गाठले होते. अशा वेळी मन भिरभिरतं, जड जड होतं. मन मोकळं करायला सहानुभूतीचं कोणी जवळ नसलं म्हणजे तर जीव कसा अगदी गुदमरल्यागत होतो! नाही का?

*

चांगला काळोख पडता पडताच मी घरी पोचले होते. सगळी मंडळी घरीच होती. नेहमीप्रमाणे मी माझ्या खोलीत शिरले. आपल्याच तंद्रीत पुस्तकं टेबलावर ठेवली व पातळ बदलायला लागले.

तेव्हा मला स्वप्नातसुद्धा कल्पना आली नसती, की तासाभरातच काही तरी निराळंच, भयंकर घडणार आहे म्हणून.

मी घरात वळताच नानींनी माझं हसत हसत न्यारंच स्वागत केलं—"आलीस बाई एकदाची घरात? आता कुठं आमचा जीव भांड्यात पडला! आम्हांला आपलं वाटलं होतं—तू परस्परच गेलीस!"

केवढ्याने चमकले मी, अक्का? नानींच्या त्या हसण्याचा नि कुत्सित पद्धतीने उच्चारलेल्या त्या उद्गारांचा मला संतापच आला होता. कोड्यात कसलं हे बोलणं? अर्थच समजेना नीट. तरी मी संथपणेच उलट विचारलं, "परस्पर? कुठं जाणार होते मी?? कोण काय म्हणालं?"

"तसे तुझे मित्र पुष्कळ आहेत ग," नानी परत हसत हळूच म्हणाल्या, "पण मघा आमचा माधव आला ना शाळेतून? तो म्हणाला, की संध्याकाळच्या वर्तमानपत्रात आलंय —"

बोलता बोलता मधेच त्या थांबल्यामुळे मी गोंधळून म्हणाले, "काय? मी कुठे गेले

म्हणून छापून आलंय ?"

"तू नव्हे ग — आज प्रभाकरांनीच कॉलेज सोडलं म्हणे—" हळूच पुन्हा हसत नि मुद्दाम शब्दागणिक आंदोलनं घेत नानी म्हणाल्या, "ते तुझे 'गुरुजी' हल्लीचे! तेव्हा म्हटलं, त्यांच्या पाठोपाठ त्यांची पट्टशिष्या! तूही गेली असशील दांडीमार्चला असं—"

त्यापुढेही त्या काही बोलल्या असत्या. पण मला त्यांची ती सारी पद्धत नि त्यातली जाणूनबुजूनची कुत्सितता असह्यच झाली. मला एकदम तिरमिरीच आली नि मी मोठ्यानेच म्हणाले, "असलं काही वाटेल ते ऐकून घेणार नाही हं मी तुमचं, नानी! सांगून ठेवते! मला वाटलं, पटलं तर जाईन सुद्धा. पण... हे हो काय? प्रभाकरांच्या पाठोपाठ मी जाणार, गेले, म्हणजे काय? त्यांचं माझं लग्न लागलंय वाटतं?"

जशा काही सहजगत्याच हसत नानी त्यापुढे म्हणाल्या, "आता उरलंय काय आणखी? तेही लागेल लौकरच! गप्पागोष्टी तर करता. फिरायला तर जाता, सिनेमालाही जाता— सदाभय्याच्या खोलीवरही भेटता म्हणे! मग आता त्यांच्या पाठोपाठ जायला—"

भयंकर संतापाने तिरमिरून मी ओरडले, "नानी! चूप बसा— नाही ते बोलायला— तुम्ही काय—"

*

अगदी त्याच वेळी आना उठून घरात आले. माझं लक्ष गेलं. शब्द मी आवरले. ते तर माझ्याकडे टवकारून पाहतच राहिले. मी संकोचाने गप्प झाले, बेचैनही झाले.

पण तेवढ्यात आनाच एकदम रागारागाने मला म्हणाले, "निमा! केवढ्याने ओरडलीस आता तू त्यांच्यावर? हल्लीचं तुझं हे सारं लक्षण काही ठीक दिसत नाही मला! तुझ्या डोक्यावर आम्ही कोणीच नाही आहो का? पाहतोय ऐकतोय मी सारं— एकेक चमत्कारिक थेरं चालली आहेत तुझी! रोज ऐकावं ते आपलं नवीनच— नि पुन्हा वर ही रागारागी?"

आनांच्या तसल्या एकांगी बोलण्याचा मला रागच येत होता. तरी शक्य तितक्या संथपणे आनांकडे पाहतच मी विचारलं, "काय काय ऐकलंत आतापर्यंत, आना?"

तेवढ्यात, साळसूदपणाचा भरपूर आव आणून नानीच मधेच बोलल्या, "ही डिबेटिंगची सेक्रेटरी, वाङ्मय मंडळाची सेक्रेटरी, सगळ्या कॉलेज चळवळींत पुढाकार असतो हिचा! आजही उशीर झाला, म्हणून सहज आपलं विचारलं मी हिला की आज कॉलेजात कसली सभा होती का? दांडी मार्चसाठी कोणी म्हणे कॉलेज सोडलं ते खरं का? ते प्रभाकर म्हणे कॉलेजमधली नोकरी सोडून जाताहेत... त्यांच्या पाठोपाठ कॉलेजमधून कोण—"

"हं... मी खूप खूप ऐकतोय त्या प्रभाकरचं!" नानींचं बोलणं मधेच तोडून, जरा

रागात, आवाजच चढवीत, आना मला म्हणाले, "खरं का सगळं हली ऐकू येतंय ते? आहेस कोणाची मुलगी तू? काही शुद्धबुद्ध!"
माझ्याबद्दल आनांना नानींनी वाटेल ते आधीच काही तरी खूप सांगितलं असणार, याची आता मात्र मला तत्काळ कल्पना आली त्यांच्या शब्दावरून. राग उसळला होता तरी मी थंडपणे आनांना विचारलं,
"असं काय मी केलंय तरी? काय ऐकलंत, आना?"
"काय ते तुझ्या मनाला माहीत!" पुन्हा रागाने माझ्यावर ओरडून आना मोघमच म्हणाले, "तुझ्या बहिणीला घरातल्या घरात शिकवायला तुला वेळ मिळत नसतो, नि बाहेर लोकांबरोबर असं भटकायला दिवस पुरत नाही काय? जरा कुठं स्कॉलरशिप मिळाली, व्याख्यान देता आलं म्हणून असं शेफारायला नको! हे प्रतिष्ठित गृहस्थाश्रमी माणसाचं घर आहे! रात्रीपुरतीची धर्मशाळा नाही, समजलीस?"
इतका संताप संताप झाला माझ्या मनाचा! आनांचं ते सारं एकूण एक एकतर्फी अधिकारपूर्ण शब्दांचं बोलणं मला सहनच होईना. तरी मी पराकाष्ठेचा प्रयत्न करून, शांत राहून म्हणाले,
"पण आना— असं एकदम काय बोलता? माझं जरा ऐकून—"
"काही ऐकून घ्यायचं नाही आहे तुझं मला." आना त्याच रागाच्या झपाट्यात म्हणाले, "इतके दिवस तुझं ऐकलं म्हणूनच एवढ्या घराला गोष्टी आल्याहेत! आता तुला मी सांगतो तेच ऐक—तुझ्याच हिताचं! या घरात राहायचं तर या घराचे नियम पाळले पाहिजेत! आम्हाला धाब्यावर बसवून चालणार नाही!"

*

मघा मला चुरुचुरु, अद्वातद्वा बोलणाऱ्या नानी आता अशा ऐनवेळी गप्प गप्प राहाणं साहजिकच होतं. त्यांना ती मौज हवीच होती. किंबहुना, हे व्हावं म्हणूनच त्यांनी मी घरात येताच ते सारं केलं होतं!
पण मग, माझ्यावर झालेली व चाललेली ती एकतर्फी सरबत्ती ऐकून माझा मात्र संताप आता अनावरच झाला होता. मी काहीतरी बोललेही असते, पण...
तेवढ्यात, आनांना दुखवायचं नाही हे मनात ठेवूनही मी रागात म्हणाले, "पण आना— वेळीअवेळी, सकारण-अकारण माझ्या डोक्यावर नानी बसू लागल्या तर ते मलाही खपणार नाही!"
"तुला ते मी विचारलं हे सगळं माझंच चुकलं बाई!" संभावित, संथ शब्दांत नानी म्हणाल्या, "कशी झाले तरी मी तुझी आई थोडीच आहे जन्मदात्री? माझी साखरसुद्धा तुला कडूच लागणार! बरं बाई... तू नि तुझे वडील."
त्यावर मी काही बोलण्यापूर्वी आनाच एकदम संतापाने मला म्हणाले, "पण हा वादविवाद मला नकोच आहे मुळी! तुमचा नको नि हिचाही नको! आहे हे सगळं

असं आहे! ज्याला पटत नसेल त्याने आपापला विचार करावा! पण या घरात मात्र मी कोणाचं असलंतसलं थेर चालू देणार नाही! या घराची अपेक्षा धरू नये... नि मग खुशाल मनःपूतं समाचरेत्!"
पुढे काही कोणाचं ऐकायलाही न थांबता आना रागारागाने बाहेर निघून गेले.
माझ्याकडे पाहून नानी विषमय हसल्या नि हळूच पुटपुटल्या, "ऐकलंस बाई? तुझ्याच वडिलांचे शब्द? झाला ना निर्णय?"
मी अधिकच संतापले होते. मला खूप खूप बोलावंसंही वाटत होतं. नानींना, आनांना सुनवावंसं वाटत होतं. पण मी अखेर काहीच बोलले नाही.
मी झटकन माझ्या खोलीकडे वळले. मला एकदम एक हुंदका आला. आईची, तुझी, सदाभय्याची—सार्‍यांचीच आठवण झाली. सद्रूकाकांकडे तसंच निघून जावंसं वाटलं. पण... तसा अर्धवट विचार न करता मी माझ्या खोलीत शिरले.

*

एकदोन निरोप आले तरी मी घरात गेले नाही, की जेवले नाही. तशीच बिछान्यात पडून राहिले. माझ्या मनाला सहस्र शल्यं टोचत होती. नानींची कुटिल नीती, आनांचा अर्धवट नि एकांगी विचार... त्यातून झालेला त्यांचा बेताल त्रागा, गैरसमज! खूप खूप विचार, भावना... अश्रू येत होते, जात होते.
मनाच्या एकच एक झालेल्या तापल्या भट्टीचे भयंकर चटके रात्रभर मी सोसत होते. सारं सारं आयुष्य आठवून मी चौफेर विचार करीत होते.
पहाटे चाराचे ठोके कानी पडताच मी एका निश्चयानेच उठले. नेसूची दोन पातळं, काही पुस्तकं बॅगेत भरली. पर्समधे चारपाच रुपये होते.
टेबलाजवळ गेले. एका कागदावर मी लिहिलं :
"प्रिय आना— रात्री तुम्ही दिलात त्या संदेशालाच जागायचं, त्याप्रमाणेच वागायचं, जगायचं, असं मी आता नक्की ठरवलं आहे. या घरात तुम्हाला 'धाब्यावर बसवायची' माझी स्वप्नातही इच्छा नव्हती व नाही. नानींचे नियम तुम्हांला मान्य—शिरसामान्य असतीलही. पण मला ते मुळीच मान्य नाहीत. तेव्हा—अर्थातच, जाते. तरी पण, माझी मुळीच काळजी नसावी. शोधाशोध नको. मी मोठी झाले आहे नि मी तुमचीच मुलगी आहे. मला घर समजतं नि जगही समजतं.— निर्मला."

*

तेथून आता सोफीकडे आले आहे. कोणी उगीच चौकशीला आलं तर गोंधळ नको म्हणून तिच्या एका बहिणीकडे मलबार हिलवर राहिले आहे. तेथूनच हे पत्र टाकीत आहे.
प्रभाकर रात्रीच अहमदाबादला गेल्याचं कळलं. सदाभय्याला भेटणार नाही. कारण

स्वारी आहे फार शांततावादी, फार विचारी! तोही पुन्हा माझी रवानगी "माहेरी" करायचा! तो धोका नको!
आज-उद्या अहमदाबादलाच जाणार आहे. प्रभाकरांना भेटून मगच पुढलं काय ते सारं ठरणार आहे.
काय काय होतं ते पाहू या!
माझं असं हे नवं स्वतंत्र आयुष्य सुरू झालं, गंगाक्का. पण तुलाही काळजी नको बरं का. मी समर्थ आहे. मी निर्मला आहे. अग अक्का, काही झालं तरी मी आपल्या आईची नि आनांचीच मुलगी आहे. माझ्या हातून जे जे काही होईल, ते आपल्याला साऱ्यांनाच अगदी शोभण्यासारखंच होईल. खात्री बाळग.
तुझा आशीर्वाद दे.

या क्षणीची तुझी
आझाद निर्मला

## निर्मल गंगेचा सदानंद

७ डिसेंबर १९४०

प्रिय आना,
परागच्या मृत्यूनंतर आलेल्या तुमच्या सांत्वनपत्रातून झालेल्या माझ्या मनाच्या भावनोद्रेकामुळेच मी गेल्या सातआठ दिवसांत, कधी नव्हतो इतक्या मुक्त मनाने तुम्हांला ही पत्रं लिहिली, तुम्हांला द्यायला म्हणून माझ्या हाती चारपाच वर्षांपूर्वी येऊन पडलेलं गंगाअक्काचं आयुष्यातलं एकमेव विस्तृत पत्र, नि त्यालाच जोडलेलं निर्मला घराबाहेर झाली त्या वेळी तिने गंगाअक्काला पाठवलेलं पत्र मी तुमच्याकडे सुपूर्त करण्याचा निर्णय घेतला.
अक्का, निर्मला, मी, आम्ही भावंडं एकाच आईची मुलं...तुमचीच मुलं. आपापल्या स्वभावांप्रमाणे, आपापल्या निरनिराळ्या वातावरणांत जगलो आहो, जगत आहोत. पण आम्हा तिघांच्या या सर्व प्रामाणिकच भावना आहेत. आमच्या असल्या स्पष्ट वक्तव्याचा तुम्ही काय अर्थ लावायचा तो खुशाल लावा. तो एकमेव तुमचा हक्क-अधिकार आहे.

*

तुम्ही आम्हाला चिकटवलेल्या क्षुद्र भावना आमच्या नव्हत. किंबहुना, तसल्या क्षुद्र भावनांशीच अत्यंत मुग्ध सोशिकपणे आम्ही सर्व आमच्या आईच्या पश्चात्

वर्षानुवर्षं झगडत आलो आहो, एवढंच मला स्पष्ट तुमच्यापर्यंत न्यायचं आहे. त्याचप्रमाणे, व्यक्तिशः तुम्ही, ' पानी तेरा रंग कैसा ' या पद्धतीने अगतिक होऊन स्वतःभोवतालच्या वातावरणात एकरूप झाल्यामुळेच, तुमचे तसले गैरसमज होऊन तुमची आमच्या बरोबरची तसली एकांगी कठोर वर्तणूक झाली हाच माझा प्रामाणिक निर्णय आहे. पण त्याबद्दल मी तुम्हाला दोष देण्याऐवजी, त्या सर्व गोष्टींना भयंकर निष्ठुर नियती, दैव-दुर्विलास, एवढंच एक नाव देऊन स्वस्थ बसायला तयार आहे. कारण जगातल्या सर्वच झगड्यांमधे कोणीतरी एकाने शांतता व शहाणपणा स्वीकारून नमतं घ्यायचं असतं, हेच माझ्या दृष्टीला हितावह वाटतं. नैसर्गिक प्रेमळपणा, उदारमनस्कता, सामाजिक विकासाची ध्येयं नि व्यापक सर्वसुखकारक स्वार्थ या गोष्टी एका बाजूस नि अमानुष मत्सर, संकुचित अप्पलपोटी कुजकी वृत्ती, केवळ जडवैभव-सुखासक्तीची पृष्ठस्पर्शी दृष्टी दुसऱ्या बाजूस ! असा हा आमच्या आयुष्यातील भावनात्मक प्रखर झगडा होता व आहे. त्यामुळेच आजवर आमच्या मनाची व आयुष्याची अकारण माती होण्याचे प्रसंग आले. त्यात एक मात्र चांगलंच झालं — मनाने आम्ही सारी मात्र अधिकाधिक मोठी, विस्तारलेल्या दृष्टिकोणाची, खंबीर होत गेलो. त्याबद्दल आम्ही त्या सर्वांचे व तुमच्या तटस्थतेचे फार फार आभारीच आहो.

*

त्या अनुषंगाने, मानवी स्वभाव व त्याच्या हालचाली यांची मात्र मनाला एक खिन्न गंमत वाटते. विचार येतो—काहीसं कोडंही पडतं—" एकच व्यक्ती, आपल्या एकाच आयुष्यात इतकी अगदी दोन परस्परभिन्न आयुष्य निर्मू तरी कशी शकते ? तसं जगू तरी कशी शकते ? "

तुमच्याबद्दलच नव्हे, स्वतः माझ्याबद्दल, आम्हा तिघांही भावंडांबद्दल, मला तेच कोडं पडतं ! मी स्तिमित होऊन जातो.

पण एक मात्र त्रयस्थ दृष्टीलाही निश्चित वाटेल, की वैभवसंपन्नांच्या असल्या अद्‌भुत आयुष्यात नि त्यातल्या आश्चर्यकारक वैविध्याच्या आविष्कारात देखील,(लहरींना विशिष्ट पक्षपाती वृत्तीच्या आग्रहीपणाचं स्थान असलं तरी ) अन्यायाला न्यायाचा वरवरचा बुरखा घालणं तरी असू नये. तो दंभ मात्र सर्वात भयंकर वाईट ! न्याय-तराजूची काठी काटकोणात आडवी धरण्याचं वरवरचं पोषाखी आवरण तरी खास नसावं !

एवढ्याचसाठी, आना, हे सर्व आता तुमच्याकडे एकत्र स्वरूपात सुपूर्त करताना मागे एकदा लिहिलं होतं तसंच लिहून मी मोकळा होतो, की तुमच्याकडून कसल्या वैभवाचा, न्यायाचा, प्रेमाचा आयुष्यभर पुरून उरणारा गड्डा अपेक्षिण्याऐवजी, तुमच्या केवळ वत्सल आशीर्वादाच्या शुभफळाचीच मनापासून मागणी करीत आहे.

सर्वांचंच सदैव शुभ चिंतिणारा

तुमचा – सदानंद

# दोन कोळशांमधले हिरे

२५ डिसेंबर १९४०

प्रिय आना,

माझ्या काही " अखेरच्या " पत्रांची मालिका व अक्का-निर्मल यांची पत्रं मी तुमच्याकडे पाठवली होती. त्यांना उद्देशूनचं तुमचं प्रदीर्घ पत्र मला दोन दिवसांपूर्वी पोहोचलं. ते समग्र वाचून झाल्यावर मला जे वाटलं-सुचलं, ते तुमच्याकडे रुजू करून यापुढे याबाबत कायमचं मौनच स्वीकारण्याचं मी ठरवलं आहे. हे लिहितानाही स्वतःला सर्व प्रकारच्या मर्यादा घालूनच मी बसलो आहे.

*

प्रथम असं, की समर्थनात्मक उत्तरासाठी केवळ पानं वाढल्याने कोणाही बाजूची सत्यता कधीच प्रस्थापित होत नसते. तरीदेखील, तुमच्या त्या पत्रावरून, माझ्या विचारभावनांबद्दल तुम्हाला काय वाटलं, याची मला एक निश्चित जाणीव मात्र झाली. निदान तुमच्या दृष्टीने तरी, थोडक्यात ते सर्व यापुढे लिहीत आहे, असंच ना?—
" आम्हा तिघांची ती पत्रं अखेरपर्यंत वाचल्यावर, तुम्हांला एकूण आमची अतिशय कीवच आली. आमच्या काबीळ झालेल्या कलुषित मनाचं एक हिडीस प्रतिबिंब त्यात तुम्हांला दिसलं. विशेषतः माझ्याकडून, तुमच्या आयुष्याच्या अखेरच्या कालखंडामधे देखील, तुम्हांला ' समजूत, सहकार्य, सहानुभूती ' मिळण्याची तुमची उरलीसुरली आशाही खुंटल्यासारखी झाली ! तुम्हांला चिडवावं, नामोहरम करावं, तुमचा पाडाव करावा, स्वतः विजय मिळवण्याची तुमच्याकडे घमेंड मारावी, हाच केवळ माझा या पत्रांमधे हेतू होता. जगाकडे पाहाण्याची तुमची दृष्टी एकूण व्यापक नि आध्यात्मिक बैठकीची आहे, तर उलट आमची सर्वांची दृष्टी केवळ जड सुखांसाठी हपापलेली, मोहांना आसुसलेली, जड, भौतिक आहे ! अर्थात ते आमचं सारंच हास्यास्पद व हिणकस आहे. म्हणूनच, ती सारी पत्रं आत्यंतिक कलुषितपणानेच केवळ बरबटलेली आहेत. निरर्थक आहेत, त्याज्य आहेत. आमच्या या वृत्तीमुळेच, आम्हांला तुमचं आलेलं हे उत्तरदेखील, आम्हांला कोळसाच वाटणार नक्की, असं तुमचं भाकीत आहे. अर्थात हे दोन्ही ' कोळसे ' उगाळून त्यांतून पांढरा रंग कधीच निर्माण होणं शक्य नाही, असाही तुम्ही अखेर तुमचा निर्णय मला कळविला आहे. "

*

आमच्या पत्रांबाबत तुमच्या मनात झालेली ही एकूण प्रतिक्रिया ध्यानी घेऊन, त्यावर मी शांत विचार केला. त्यावर मी तुम्हांला, अगदी थोडक्यात, आता एवढंच कळवू इच्छितो—

वैभवसंपन्न पित्याचा कोणत्याच अर्थानं पाडाव करणं, वास्तविक, अकिंचन मुलाला अशक्य असतं. पित्याच्या अखेरच्या काळात, मुलाच्या हातून तसं काही उच्छृंखलपणे घडणं म्हणजे अखेर त्या मुलाचाच शंभर टक्के पाडाव होय, हेही निश्चित. पण त्याबद्दल मी तुमच्याकडून कसलंच अभयही मागू इच्छित नाही. झालं ते झालं! निर्लेप मन, सहानुभूती यांच्या अभावीच केवळ, आमच्या सत्याधिष्ठित, तर्कशुद्ध विचार-भावना म्हणजे तुम्हांला आमची केवळ व्यर्थ ' बडबड ' वाटली, ते सारं ' हिणकस ', ' किळसवाणं ' वाटलं.

ते लिहिताना माझी मानसिक बैठक भौवतालच्या भौतिक वातावरणामुळे भौतिकतेने भरावी, क्षुद्र भावनांबाबत स्पष्ट बोलताना क्षुद्र भावनात्मकतेनेच ती झाकळून जावी, यांत आश्चर्य कोणतं होतं ? माझ्या सहवास-परिवारातील माणसांकडे पाहताना, माझ्या व त्यांच्या जिवंतपणी—निदान माझ्या तरुणपणी तरी—माझी मनोभूमिका, माझी बैठक, भौतिक, पार्थिव, सापेक्ष, भावविवश अशी असणारच! त्यात कमीपणा तो कसला ? लाज तरी कसली ? आत्यंतिक, उच्छृंखल, तर्कशून्य, स्वार्थांध, अशी भावविवशता वा क्षुद्रता तेवढी तिथे आढळली नाही म्हणजे झालं!

माणसाच्या शरीराप्रमाणेच त्याच्या मनालाही एक स्वतःचा असा कणखर सांगाडा असतो. त्या जोरावरच, तो सापेक्ष क्षुद्रामधून टप्प्याने श्रेष्ठ गोष्टीकडे तर्काची काठी टेकीतच आयुष्यभर जात असतो. तेव्हा, माझ्या त्या निरोगी भौतिकतेला, ध्येयपूर्ण नि विचारशील भावनात्मकतेला, खाली मान घालण्यासारखं काही आहे, असावं, असं निदान मला तरी मुळीच वाटत नाही. माझ्या नित्य जीवनात, त्याच्या कोनाकोपऱ्यात, सांदीफटीत, जी सहजतेने भरू शकणार नाही, दिसू शकणार नाही, अशी केवळ अभिनिवेशी, " शाब्दिक आध्यात्मिकता " मला तरी जीवनात खासच नको आहे. कोणाच्याच हाती नसलेल्या अध्यात्माच्या पुष्पाला व्यर्थ हात घालण्याचं निदान आज तरी मला धाडस होणार नाही. तरुणपणी किंवा कधीही, तसला आव अंगी आणण्याची मला तरी मुळीच इच्छा नाही.

*

जे जे मी लिहून कळवलं ते ते मी आजपर्यंत सारखंच माझ्या मनात खदखदत ठेवलं असतं, बरवरच तेवढं मी प्रेमादराने वागण्याचं, सहानुभूति-सहकार्याचं नाटक करीत राहिलो असतो, तर आपल्या दृष्टीचं सारं सारं श्रेय मला विनासायास सहजासहजी मिळालं असतं, असाच याचा अर्थ दिसतो. पण तो दंभ-देखावाही मला तरी खासच नको होता, नको आहे. तुम्ही दर्शवता ती माझी भौतिकता तितकी क्षुद्र खासच नाही. ती तितकी जडसुखांनी बरबटलेली, अंध झालेलीही खासच नाही. त्या भौतिकतेचाही पाया श्रेष्ठ ध्येयाधिष्ठितच आहे. दूरधोरणाने पाहता, माझ्या तरी मते, तीच खरीखुरी आध्यात्मिकता आहे. त्या वर्तनाला द्यायच्या कोणत्या नावाबद्दल माझा कसलाच आग्रह

नाही. शब्दापाठी असणाऱ्या भावना प्रामाणिक व रसरशीत असल्या की झाले. मानवी मनाच्या संस्कारक्षमतेवर माझा तरी विश्वास अजूनही आहे. स्वतःच्या जीवनविषयक बैठकीच्या निर्लेप सत्यतेबद्दलही मला एक खात्री आहे. त्यामुळेच आम्ही—मी—तो मोकळा भावनाविष्कार तुमच्या पुढे केला होता. मनाविरुद्ध होणारी क्रिया प्रथमतः रागाचीच प्रतिक्रिया निर्माण करणार, पण त्यापाठोपाठ विचारही स्फुरेल, भावी काळात कधी ना कधी बदललेला आचारही दिसेल, एवढीच माझी एक अपेक्षा होती. त्यातूनच कदाचित प्रत्यक्ष आपल्या परस्परआयुष्यात, जीवनात, सहानुभूति–समजूत–सहकार्य अवतरेल, अशी मला फार फार आशा होती.

*

पण त्या सगळयालाच ‘ कोळसा ’ असं उल्लेखून तुम्ही मोकळे झालात. दिव्यदृष्टीच्या परिसानेच त्या कोळशाचा हिरा ठरणं शक्य होतं. ते तुम्हांला–आम्हांला जमलं नाही हे दुर्दैव! तरीही ते मी समजू शकतो. पण त्याच ओघात स्वतःच्या उत्तरालाही तुम्ही आगाऊच ‘ कोळसा ’ ठरवलं जाण्याची शक्यता पूर्वग्रहदूषितपणे गृहीत धरलीत, हा आम्हाला—व एक प्रकारे स्वतः तुम्हालाही—तुम्ही फार मोठा अन्याय केला आहे. पुन्हा असं, की “ दोन कोळसे उगाळून पांढरा रंग होत नाही ! ” हे तरी खरं कसं ? हृदयपालटाची मूलगामी रासायनिक क्रियाच त्यांच्यावर नको का व्हायला ? त्या प्रक्रियेनेच त्यातल्या हिरकण्या नाही का दिसू शकणार ? मग कोळसा फक्त उगाळण्याची वरवरची भौतिक दृष्टी तेवढीच, या वेळी, तुमच्याही आध्यात्मिक डोळ्यांत नि मनात का बरं डोकावली ?

पण मग मी मात्र तुमच्या उत्तरातील भावविचारांना सरसकटपणे व उतावीळपणे ‘ कोळसा ’ म्हणायला मुळीच तयार नाही, हे तुम्हांला मला स्वच्छ कळवणं भाग वाटतं. ठिकठिकाणी त्यात आपल्या जीवनाच्या तेजस्वी हिरकण्याच मला सापडल्या आहेत. त्यात सहस्र ‘ अमृतबिंदू ’ही आढळले आहेत. मला वाटत होतं, असल्या या संघर्षाने, दोन्ही बाजूंमधील निश्चित अमृतबिंदूंच्या मिलाफाने, साक्षात क्षीरसागरच पुन्हा आपल्या उर्वरित आयुष्यात अवनीवर अवतरेल. तसं काही तुमच्या बाबत घडलं नसेल, तर माझा इलाज नाही. पण ते मनातलं सारं विष बाहेर पडून गेल्यावर, आता शांत झालेल्या माझ्या हृदयात तरी, तो तसा खासच अवतरला आहे, असं मला खात्रीपूर्वक वाटू लागलं आहे.

*

आयुष्यातील आपल्याबरोबरचे माझे हे सारे झगडे मुख्यतः भावनामूलक, भावनाधिष्ठित, भावनात्मकच होते ! त्यांत कधी जड गोष्टींची, स्वार्थी वा पक्षपाती वैभवप्रेरित अपेक्षाच नव्हती व नाही. माझा स्वार्थी हा शब्द स्वतः व्यक्तिशः

तुमच्यासाठीही नव्हे. व्यक्तिगत बाबतींत तुम्ही पूर्णपणे निःस्वार्थीच आहा, हे मी पूर्णपणे जाणतो. नि तरीदेखील परस्परांत झालेले हे आयुष्यातील संघर्ष! दारुण नियती!

ते संघर्षही परस्परस्वार्थाचे नव्हते : तो केवळ परस्पर-भावना-भावनांचा, ध्येय-कल्पना-कल्पनांचा, परस्पर-जीवन-दृष्टिकोणांचा, 'खऱ्या अर्थाचा' अव्याहत झगडा होता! आपल्याला कोळसा वाटणारं मनोगत व्यक्त करणारा मी स्वतःही छिणकस, क्षुद्र मनोवृत्तीचा असलो पाहिजे, हे तुमचं मत तुमच्या अभिप्रायावरून मी गृहीत धरून चालतो. पण मग तुमच्या उत्तरातील मनोगताच्या ओघात, तुम्ही अत्यंत श्रद्धापूर्ण मनाने स्पष्ट शब्दांत म्हटलं आहे, की तुमच्या धार्मिक मताच्या पत्नीला व स्वतः तुम्हांला – विशेषतः आमच्या आईच्या भाबड्या श्रद्धेला— सदानंदस्वामींकडून गौरवपूर्ण मिळालेली एक अद्‌भुत देणगी म्हणजेच सदानंद! तर मग, तुम्हा उभयतांच्या हाती आलेली, येऊन वाढलेली ती स्वामींचीच देणगी, पुढे अशी कशी झाली? असा मी आपल्या परिवारातल्या सर्व मंडळींच्या केवळ दुःखालाच कारण ठरावा, यापरतं दुसरं दुर्दैव ते कोणतं? मी जन्मताच, मोठ्या हौसेने तुम्ही मला 'सदानंद' म्हणालात, नि मी मात्र आयुष्यभर तुमच्या दुःखाचाच झरा ठरलो! अगम्यच ही परिस्थिती, नियती!

अखेर मला तरी आता एवढंच वाटतं, की दोन व्यक्तींची मनोभूमिका निसर्गतःच प्रामाणिक असूनही नुसतं चालत नाही. जीवनातला झगडा हा कधीच थांबत नसतो. व्यवहारांमधेही तो कधी थांबण्याचा संभव नाही.

तथापि एक मात्र निश्चित, की वणवे पेटवणारे हिटलर-नेपोलिअन तेवढे मात्र, जगामधे ते असतात त्याहून उगीचच मोठे नरराक्षस ठरतात; उलट, तात्पुरती सावली करणारी चेम्बरलेनची 'म्यूनिच छत्री' किंवा हॅलिफॅक्सची "खिश्चानिटीची सोज्वळ लढाई" ह्या गोष्टीच तेवढ्या जगाला तात्कालिक बऱ्या वाटतात! तेवढ्याच पेलता येतात. तेव्हा, तत्त्वांच्या खपुष्पांना हात घालण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा माणसाने रोजचे व्यवहारच मेल्या मनाने मागील अंकावरून पुढे चालू ठेवावेत, तरच आपल्याभोवती सदैव दांभिक शांततेचं वातावरण वरवर तरी स्थिर राहिल्याचं त्याला दिसेल. थोडक्यात, तसलं, तेवढंच एक समाधान जगात सुलभपणे देणं-घेणं प्रत्येकाला शक्य आहे! हे तरी किती दुर्दैवी नि दुःखद!

*

माझ्या लेखनाच्या या पूर्णविरामापूर्वी येथे आणखी एकच लिहावंसं मला वाटतंय— पाचसहा वर्षांपूर्वीच्या माझ्या आजारात, निर्मला व सदूकाका यांच्या शुश्रूषेने मी बरा होत होतो. तेव्हा माझ्या करमणुकीसाठी, अंथरुणावर पडल्या पडल्या, आबा-आजोबां-वेळपासूनच्या नि आमच्या लहानपणीच्या अनेक गोष्टी सदूकाकांनी आम्हांला

सांगितल्या आहेत. केवळ गंमत म्हणून निर्मलेने मग ते लिहूनही ठेवलं आहे. आणि आता तुम्ही पाठवलेल्या उत्तराबरोबरच, तुम्ही, आमच्या आईच्या मृत्यूपर्यंतच्या गोष्टी स्वतः लिहून ठेवलेल्या जुन्या चोपड्या पाठवल्या आहेत. पूर्वायुष्यातील त्या अनेक घटनांचं तुम्ही सहजगत्या केलेलं ते चित्रण मी अत्यंत भावभरित अंतःकरणाने पुनःपुन्हा दोनतीनदा वाचून काढलं. माझ्या डोळ्यांतून अनेकदा अश्रूंचे ओघळ घळघळले. तुमच्याबद्दलच्या साऱ्या रसरशीत भावना मनात उचंबळून येऊन आदर द्विगुणित, शतगुणित झाला. नि मग वाटलं, अगदी अभिमानाने हृदय गदगदून मला वाटलं, अशा आजोबांच्या नि अशा पित्याच्या घरी, त्यांच्या पोटी मी जन्माला आलो, हे तरी माझं केवढं भाग्य ! माझे निकराचे भावनात्मक झगडे आतापर्यंत अनेकदा झाले ते अशाच व्यक्तीबरोबर !—त्या वेळच्या त्या माझ्या मनातील प्रचंड भावना सुखपूर्ण होत्या नि दुःखपूर्णही होत्या.

*

त्यामुळेच, आता माझ्या मनात अखेर एकच एक भावना भरून-भारून उरली आहे, ती म्हणजे नितांत आदराचीच ! तेव्हा त्याच आदरभावनेला साक्ष ठेवून, पूर्णपणे विनम्र होऊन, झाल्या सर्व प्रत्यक्षाप्रत्यक्ष आगळिकींबद्दल मी तुमची क्षमा मागतो, नि हृदयाच्या गाभ्यामधलंच एक इथं तुम्हाला अखेर कळवून ठेवतो की, मला वाटतं — अत्यंत पवित्र नि आदर्श वाटणाऱ्या जगातल्या साऱ्या साऱ्या गोष्टी माझ्या आयुष्यात, माझ्या घरात, माझ्या घराच्या पूर्वेतिहासातच मला सापडलेल्या आहेत. आणि माझ्या आबा-आनांबद्दल मला जितक्या वाटतात, तितक्या आदराच्या, नैसर्गिक प्रेमाच्या, खऱ्या कृतज्ञतेच्या भावना, मला जगातल्या दुसऱ्या कोणाही व्यक्तीबद्दल वाटल्या नाहीत, वाटत नाहीत.

कदाचित म्हणूनच असेल—माझे फक्त माझ्या पित्याशीच असले ध्येयशील प्रखर झगडे होऊ शकले. हा वास्तविक दारुण दुर्दैवी दैवयोगच ! तरी देखील, तेही सर्वच, सापेक्ष उच्च सुखानेच केवळ भरलेलं आहे...

त्यामुळेच, असल्या या तीव्र सुखदुःखातून देखील एकप्रकारचा अतीव आनंदच भोगत आलेला, तुमचा लाडका मुलगा...

— सदानंद

# मुखवट्यांचं राजकारण

१५ ऑगस्ट १९४२

प्रियतम मंगल–

कित्येक वर्षांनी तुला एखादं पत्र लिहिण्याचा आज असा हा योग येत आहे. मधल्या या चारपाच वर्षांत, नाही तर, घरातल्या घरातच का आपण एकमेकांना पत्र लिहिणार होतो ? एकमेकांना सोडून आपण क्षणभरही कोठे दूर झालोच नाही !

काही म्हण, पण मंगल, पुष्पाच्या जन्मासाठी म्हणून या वेळी तू अमरावतीला गेलीस तेव्हापासूनच—तुझ्या वियोगामुळेच— तुझ्याबद्दल मला अधिकच जिव्हाळा-प्रेम वाटायला लागलं आहे. केव्हा एकदा तू परत येतेस नि केव्हा तुझ्या निकट बसून, तुझ्याशी खूप खूप साठलेल्या गप्पागोष्टी सारख्या बोलत राहीन, असं झालंय मला !

मला तर वाटतं, अगदी मनापासून वाटतं, आपलं परस्परप्रेम वाढावं, ते अधिक निस्सीम व्हावं, म्हणून साऱ्याच पतिपत्नींनी मधून मधून असले हे वियोगाचे, एकमेकांपासून दूर दूर असण्याचे कालखंड मुद्दामच घडवून आणावेत. त्यामुळे इतर वेळचा त्यांच्या निकटचा दैनंदिन सहवास त्यांना अधिकाधिक सुखद होईल.

एवढ्याचसाठी, तू समक्ष परत येईपर्यंत मी तुला पत्रही लिहिणार नव्हतो. त्यामुळे आपला हा परस्परविरह आपल्याला खराखुरा वाटत राहिला असता, त्याची चुटपुट, हुरहूर पूर्णांशाने अनुभवता आली असती...

*

पण मग, तू गेल्यावर इकडे कित्येक अशा काही गोष्टी घडल्या आहेत नि त्यामुळे माझ्या मनात भावनांचा इतका कल्लोळ माजून राहिला आहे, की आजच्या आजच ते सारं तुझ्यापर्यंत पत्ररूपाने सविस्तर पोचवल्यावाचून माझ्या मनाला अगदी काही केल्या राहवेचना !

सांगायची विशेष गोष्ट म्हणजे आनांचा थोडासा आजार, नि त्यामुळे त्यांनी आम्हांला भेटीसाठी मुद्दाम पाठवलेलं आमंत्रण.

मला तो निरोप कळताच मी चटकन उठून तिकडे गेलो. गंगाअक्का येणं अशक्यच होतं. पण निर्मला येईल अशीही खात्री नव्हती. कारण गेले तीन महिने ती व प्रभाकर दोघंही चळवळीमधे भूमिगत झाली आहेत. लपूनछपून हालचाली करीत आहेत.

एका गुप्त संदेश–शृंखलेमार्फत मी पाठवलेला निरोप प्रथम निर्मलेपर्यंत वेळेवर पोचला पाहिजे होता. मधे अवधी सारा पंधरावीस तासांचा होता. पुन्हा तिच्या जोखमी दैनंदिन कार्यक्रमांमधून तिलाही थोडी उसंत असायला हवी होती. नि मग, ती कुठे असेल तिथून पोलिसांना चकवून आतापर्यंत सुरक्षितपणे येऊ शकली पाहिजे होती. त्यात पुन्हा त्या हटवादी पोरीची येणं– न येणं ही इच्छा–लहर होतीच मधे. तरी मी आपली माझ्या

बाजूने तरी झटपट खटपट केली होती.

एवढ्या गडबडीतूनही अखेर मला ते समाधान मिळालं. मी केलेल्या व्यवस्थेतून, माझा निरोप निर्मलेला वेळेवर पोचला. तेवढ्या वेळासाठी तरी तिने आपला देशकार्याचा व्यापक कार्यक्रम बाजूला सारला : नि आनांच्या इच्छेप्रमाणे — जवळ जवळ बारातेरा वर्षांनी — त्यांना भेटायला ती समक्ष येऊ शकली, आनांशी बोलू शकली : आणि, तिच्या स्वभावाप्रमाणे, परतण्यापूर्वी आनांशी थोडंसं भांडूही शकली !

त्या साऱ्याच घटना इतक्या हृद्य आहेत, त्यामुळेच माझेही भावकल्लोळ इतके उफाळून आले आहेत, की तू परत इतके येईपर्यंत ते सारं मनातल्या मनात ठेवून राहाणं म्हणजे मला अशक्य, अगदी अशक्यच झालं.

*

आना हल्ली बरेचसे बिछान्यावर पडूनच असतात.

मी घरी गेलो त्या वेळी सदूकाका त्यांच्याजवळ बसले होते, श्रीधर होता, माला–शाला आल्या होत्या, नानीही आनांसाठी उंबरठ्याजवळ बसली होती.

आनांच्या पायाजवळ, त्यांच्या बिछान्यावर मी जाऊन बसलो. त्या वेळी ते काही विशेष बोलले नाहीत. मधूनमधून बाहेरच्या दाराकडे मात्र पाहत होते.

मग थोड्या वेळाने ते हळूच मला म्हणाले, " अरे, निमाला निरोप कळवला होतास का, मी तुला कळवल्याप्रमाणे ? "

मी मानेनेच " हो " म्हणालो. मनातल्या मनात आना निमाची अगदी आतुरतेने, अस्वस्थपणे वाट पाहत असावेत, हे मला त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्टच दिसत होतं. आना मोसंब्याचा रस घेत होते, इतक्यातच एक वृद्ध बाई आत शिरली

सर्वच प्रथम चपापले. पण ती सूक्ष्म स्मित करीत म्हणाली, " मी आलेय ! काय काम आहे ? "

मी समजलो ! निर्मलाच ती ! पण तिचा चेहरा खूपच वयस्क दिसत होता. नेहमीच्या तिच्या गोल पातळाऐवजी ती एक नऊवारी जाडंभरडं थेट बाटणीसारखं नेसली होती. हातांत पाच पाच डाळिंबी बांगड्या होत्या. लांब बाह्यांची एक विटकी चोळी तिच्या अंगात होती. तिने डोक्यावरून मराठमोळा पदरही घेतला होता नि पदरातून तिचे पांढुरके केस बाहेर पडलेले दिसत होते. तिच्या कपाळाला रुपयाएवढा मोठाथोरला कुंकवाचा टिळा होता. तिने गळ्यात काळ्या पोतीचं भलं जाडजूड मंगळसूत्र घातलं होतं.

आपल्या हातातली हेल्पाटी तिने दाराजवळच कोपऱ्यात टाकली नि ती पुढे झाली. दहापंधरा दिवसांपूर्वीच, तसल्याच पोषाखात ती मला भेटली होती, म्हणूनच केवळ मी तिला ओळखली. पण बाकी सारी " ही कोण घाटीण पाटीवाली घरात शिरली " अशा आश्चर्यानेच गोंधळून तिच्याकडे पाहू लागली होती.

तितक्यात, अर्धीअधिक आनांजवळ चालत जात निमा मोठ्याने म्हणाली, " मुद्दाम तुमच्या निरोपाप्रमाणे तुम्हांला भेटायला आलेय मी, आना! वेळ मात्र फारच थोडा आहे."

निमाच्या परिचित आवाजाने सदूकाका वगैरे सगळीच चमकली. आनाही किंचित चमकून तिच्याकडे पाहत होते. त्यांच्या चेहऱ्यावरही मग हलूच मंद स्मित झळकलं नि त्यांनी एक प्रदीर्घ निःश्वासही टाकला, पण मग पुन्हा ते स्मितही विरत जाऊन त्यांचा चेहरा पुन्हा पूर्वीसारखाच गंभीर झाला.

*

निमाला बसायला मी गपगपच जवळचं स्टूल दिलं. इतरही सारी शांत होती. तेवढ्यात सर्वांकडे चौफेर दृष्टी फिरवीत, बसते होऊन आना म्हणाले, " सगळे सगळे आलात, हे फार बरं झालं! तुम्हांला मी मुद्दामच बोलावलं होतं. हल्ली माझी प्रकृती नीट नसते, आता जीवाची शाश्वती वाटत नाही, तेव्हा थोडं ठीक असेपर्यंतच तुम्हा साऱ्यांचा आज निरोप घ्यायची इच्छा आहे माझी— "

प्रत्येकाचं हृदय किंचित उचंबळून येत होतं. तेवढ्यात आना पुढे म्हणाले, " आबांच्या पश्चात सदाशिव नि मी—आम्ही आपल्या धंद्यात खूप धडपडलो. मग आमचं कर्ज गेलं. आता मात्र एकत्रात असं काही उरलेलं नाही. सदाशिवचं त्याला—माझं मला! अर्थात माझ्या पश्चात माझं माझ्या मुला-माणसांना! पण हे काही त्याने किंवा मी, कोणाला नव्यानं सांगायला हवंय असं नाही! खरं ना, सदाशिव?"

साऱ्या गतस्मृतींत गुंगलेल्या आपल्या मनाला भानावर आणून सदूकाकांनी आपले ओले डोळे पुसले व मुग्धपणेच होकारार्थी मान हलवली.

किंचित उसंत घेऊन आना मग सर्वांनाच उद्देशून म्हणाले, " माझं असं जे आहे, त्याबद्दल मला जे काही करायचं होतं, तेही सारं पूर्वीच ठरवून-लिहून मी आता मोकळा झालो आहे. त्याबद्दलही आज कोणाला मी काही सांगणार-विचारणार आहे असं नाही. मलाही कोणी त्याबाबत उलट विचारू नये. लेखात मी जे दिलं असेल, जे जे त्याला मिळालं असेल, त्यातच ज्याने त्याने समाधानाने असावं. आपलं वैभव, आपलं भवितव्य, आपल्या पद्धतीने, आपल्या धोरण-पराक्रमाने खुशाल हवं तसं वाढवावं. त्यात प्रत्येकालाच माझा मनापासून आशीर्वाद आहे— "

*

आना संथपणे बोलत होते, आम्ही सारे शांतपणे ऐकत होतो.

खाकरून, घसा साफ करून क्षणभराने आना म्हणाले, " पण मग, माझ्या टिपणा-लेखांमधे ज्या गोष्टींचा मुळीच उल्लेख नाही अशा काही किरकोळ वस्तू आहेत माझ्या. त्याच आज कोणाकोणाला भेटीदाखल म्हणून मला देऊन टाकायच्या आहेत.

नि विशेषतः तेवढ्याचसाठी तुम्हा सर्वांना मी आज इथे जमायला निरोप पाठविले."
असं म्हणत आनांनी आपल्या गळ्यात हात घातला. त्यांचा गळाही बोलता बोलता दाटून आला होता. कित्येक वर्षं मी पाहत आलो होतो तो दुपदरी सोन्याचा गोफ त्यांनी काढून हाती घेतला. ते तक्क्याला मागे रेलून बसले नि म्हणाले, " कधी वेळप्रसंगी, अडीअडचणीला उपयोगी पडेल म्हणून मी श्रीधरच्या आईला हा देत आहे— "
गपचूप नानींनी आपला हात पुढे केला.
मग उजव्या हाताच्या करंगळीमधली आपली हिऱ्याची अंगठी काढून आनांनी श्रीधरला हाक मारली व त्याला देत ते म्हणाले, " हं, ही घे रे तुला...पूर्वीपासून फार आवडते नाही का तुला ती ? "
करंगळीजवळच्या बोटातली कळसाची अंगठी काढून ती मालाला देत त्यांनी म्हटलं, " ही तुला आठवणीसाठी. "
मधल्या बोटातला चार वळशांचा सल्ला काढून तो शालाला देत ते मग म्हणाले, " हा तुझ्यासाठी, शाला. "
मग, डाव्या हाताच्या अनामिकेतली बदामी आकराची अंगठी चारदोन वेळा चाळा करीत, आना सदूकाकांकडे पाहून म्हणाले, " सदाशिव, एकमेकांच्या खांद्याला खांदा भिडवून आपण पुष्कळ वर्षं कामधंदा केला, घराण्याचे व्यवहार वाढवले. मधे आपल्यात क्वचितच थोडी अभ्रं आली असतीलही; त्यानंतर आपण व आपले व्यवहार काहीसे दूरदूरही झाले असतील. तरी पण माझी चांगली अशी आठवणही तुला नक्कीच राहिली असणार असा मला तरी विश्वास आहे. माझ्या पहिल्या लग्नात माझ्या सासऱ्याने मला घातलेली ही अंगठी—घे, तीच माझी नि तुझ्या यशोदावहिनीची आठवण म्हणून मी तुला आशीर्वादासह देत आहे. घे, आताच घाल तुझ्या हातात—हं— "
बघता बघता सदूकाकांचा चेहरा अगदी गोरामोरा झाला. त्यांच्या डोळ्यांत पाणी टचकन भरून आलं. आनांच्या हातून ती घेताना त्यांचा हात थरथरत होता. काहीतरी बोलण्याचा ते प्रयत्न करीत होते, पण त्यांच्या दाटल्या कंठातून शब्दच बाहेर पडत नव्हता.
त्या दृश्याने साऱ्यांचं हृदय कालवून आलं होतं. आनाही किंचित्काळ गप्प होते. अखेर ते म्हणाले, " हं—झालं ! मला द्यायचं होतं ते सगळं सगळं आता देऊन झालं. देव तुमचं सर्वांचंच कल्याण करो— "
क्षणभराने आना गहिवरल्या अंतःकरणाने म्हणाले, " बरं ! आता जा तुम्ही— घरात चहा-फराळाचं घ्या ! मी थोडा वेळ एकटाच स्वस्थ पडेन म्हणतो— "

*

हाताने स्वतःच उशी झटकन आना जेव्हा गादीवर लवंडले, तेव्हा सगळेच हळूहळू उठले. मीही उठलो व बाहेर गॅलरीकडे वळलो. नानी, श्रीधर, माला–शाला, सगळी

घरात निघून गेली. आपल्या घरी परततायला म्हणून सदूकाका जिना उतरून खाली गेले. भागाआत्याही निघून तोपर्यंत दिसेनाशी झाली. निमा दिसेल–भेटेल–बोलेल म्हणून तिचं क्षणभर घुटमळणं चाललं होतं. पण तिला तो धीर होत नव्हता.
मग स्टूलावरून निर्मलाही उठली. क्षणभरच आनांच्या उशापाशी थबकली; नि काही न बोलताच, जायला म्हणून पाठमोरी वळली.
आनांच्या–तिच्या त्या त्यापूर्वीच्या भेटीला—तिने घर सोडल्याला—एका तपाहून अधिक काळ लोटला होता. आज झटपट परतून आपल्या अज्ञातवासाच्या बुरख्यामधे तिला पुन्हा शिरायचं होतं हे खरं, पण यापुढे आनांची भेट पुन्हा केव्हा होईल, की होणारही नाही, ते कोणालाच सांगता येण्यासारखं नव्हतं. तर मग, आल्यासारखं चार कुशल विचारण्याइतकं तरी निमाने आनांशी बोलावं, असं मला मनात वाटल्यावाचून राहिलं नाही.
कदाचित म्हणूनच, ती मंद पावलं टाकत मनातच "काय करावं" म्हणत तशी घुटमळत असावी. वास्तविक आनांनी तरी आपल्या निरोपाप्रमाणे आस्थेने भेटायला आलेल्या निर्मलेला जवळ बसवून चार प्रश्न विचारायला नको होते का? असंही मग मला वाटत होतं.
पण त्या दोघांच्याही विशिष्ट स्वभावछटा ठाऊक असल्यामुळे, आपण मधेच काही न बोलता, काय होईल ते पाहण्यावाचून मला त्या क्षणी दुसरं गत्यंतरच नव्हतं!

*

क्षणभरच माझ्या मनात एक विचार चमकला— "आजसुद्धा आना प्रथमपासूनच किती प्रतीकात्मक वागत आहेत!"
नानींना त्यांनी आपल्या छातीवर रुळवलं होतं, श्रीधर–शाला–माला यांना त्यांनी आपला उजवा हात अर्पण केला होता. सदूकाकांसाठीची ती आठवण!—काकांच्या यशोदावहिनीची—माझ्या आईची—तिच्या लग्नातली अंगठी! ती त्यांनी आपल्या डाव्या हातातून काढली होती. आजपर्यंत आनांच्या यशोदेला त्या अंगठीच्या रूपाने त्यांच्या डाव्या हातावर तरी स्थान होतं!
आनांचं हृदय, आनांची उरलीसुरली लक्ष्मी, ती आनांच्या आयुष्यात आलेल्या लक्ष्मीकडे–नानींकडे गेली होती!
आणि मी? निर्मला? आम्हीही हजर होतो की दोघं! त्यांचीच ना मुलं आम्हीही? आमच्या वाट्याला आनांचं काय आलं? हे एक प्रकारे जाणूनबुजून आम्हांला दोघांना हिणवणंच तर नाही ना त्यांनी चालवलेलं?
मात्र त्यांच्या जवळच तिथं दोन मिनिटं उभी असताना निमाच्या वाट्याला आनांचा एखादा प्रेमळ शब्द देखील येऊ नये, याचं तीव्र दुःख माझ्या मनाच्या खोल खोल गाभ्यातच खुपल्यावाचून राहिलं नाही!

पुन्हा मग वाटलं, "आनांना मी पुरता ओळखतो. ते कठोर असले तरी लबाड नाहीत, ते कदाचित पक्षपाती असले तरी दुष्ट नाहीत, ते स्वमताग्रही—स्वयंनिष्ठ असले तरी त्यांचं साचं सौजन्य तरी वेळेवर त्यांना खासच सोडून जाणार नाही! ते पडल्या पडल्या काही तरी विचार करीत असतील!"

स्वतःला काहीसं धोक्यात घातलेलं, आनांच्या खास भेटीला निरोपाप्रमाणे इतक्या वर्षांनी अगदी स्वतःच्या पायाने निमा आलेली... त्यांच्या समोरच ती तशी एकदा येऊन उभी राहिल्यावर मागलं सारं विसरून आना तिच्याबरोबर ती परतण्यापूर्वी काही तरी बोलल्यावाचून खासच राहणार नाहीत!

*

तेवढ्यात आनांचेच शब्द माझ्या कानी पडले, "सदानंद! सदानंद! अरे सदानंद गेला का रे निघून?"

मी पटकन पुढे झालो नि म्हणालो, "काय, आना?"

तत्काळ त्यांच्या डोळ्यांत समाधान चमकलं. ते मला म्हणाले, "हे बघ सदा— तिजोरीच्या खोलीत जा, नि तिजोरीवर जुन्या वर्तमानपत्रांचा एक जुडगा आहे. त्याच्या खाली माझी एक जुनीशी लाकडी पेटी आहे. ती तशीच अलगद उचलून इकडे घेऊन ये, जा—"

"बस, निमा!" असं उभ्या असलेल्या निमाला म्हणणाऱ्या आनांकडे व निमाकडे गपचूप एक धावता दृष्टिक्षेप टाकून, समाधानी मनाने मी आत निघून गेलो.

मी ती पेटी आणताच, केवढ्या उत्साहाने आनांनी ती आपल्या हाती घेतली. ते चटकन बसते झाले, आपल्या जानव्यातून त्यांनी एक किल्ली काढून ती पेटी उघडली नि त्यातलं एक कापडी पुडकं काढून त्याच्या गाठी ते सोडू लागले.

*

त्यात बऱ्याच कागदपत्रांच्या घड्या होत्या. एक चांदीची फोटोफ्रेम होती. त्यात आबा आजोबा-आनांचा एकत्र फोटो होता. चांदीची साखळी लोंबणारं खिशातलं 'वेस्टेन्ड' घड्याळ वरच होतं.

तो फोटो व ते घड्याळ हाती घेऊन अडखळत्या स्वरात आना मला म्हणाले, "हं, सदा— हा घे—माझा नि आबांचा फोटो—त्यांच्याकडून मला मिळालेली ती अखेरची देणगी! नि हे घड्याळ! तुझ्या जन्माच्या सुमारासच मी ते विकत घेतलेलं आहे. फार चांगलं, वक्तशीर काम देत असे ते. कित्येक वर्षं मी ते रोजच्या रोज वापरलं आहे. पण मग, कुठं पडलं नाही, झडलं नाही तरी ते सात-आठ वर्षांपूर्वी एकदमच बंद पडलंय! चौकशी केली तर दुरुस्तीला फार चार्ज पडत होता. म्हणून राहिलंय शेवटी या पेटीतच पडून. घे तुला, बघ नीट झालं तर. त्या चेनमधे तो ताईत आहे ना, तो नेहमी

तुझ्या आईच्या गळ्यात असे. तिच्या बापाने तिला लहानपणी दिला होता तो!—नि ही पत्रं वगैरे काही कागद आहेत...तुझीच आहेत ती. माझ्यापाठी आता ती तुझ्यापाशीच परत जाणं रास्त. ठेव, फाड, तुला वाटेल ते कर...इथं मात्र नकोत राहायला आता ती."
ते सारं बोलताना, गहिवरल्या दृष्टीने व शोधक मनाने आना माझ्याकडे सारखे पाहत होते. मलाही अगदी विरघळल्यासारखं वाटत होतं.
काही एक न बोलताच, त्यांनी दिलेलं ते सर्व मी माझ्या हाती घेतलं व शेजारच्या टीपॉयवर ठेवलं.

*

तेवढ्यात आना निमाकडे वळून तिला म्हणाले, "निमा, माझा हा निरोप पोचताच तुझी महत्त्वाची इतर चालू कामं बाजूस सारून, आपला जीव धोक्यात टाकून, तू अशी आज ठरल्यावेळी मला भेटायला आलीस...तुझे आभारच मानले पाहिजेत त्याबद्दल. मागे मी रागावलो, तू तडकाफडकी घरातून निघून गेलीस, हे सारं खरं. पण मग मी काही केलं, काहीही बोललो, तरी...एका ठाम निष्ठेने चाललेल्या तुझ्या...तुमच्या कामांमध्ये ईश्वर सदैव यशच देईल! आता इथं आलीच आहेस, तेव्हा जाण्यापूर्वीच एकदोन वस्तू तुला मी देतोय, त्या घेऊन जा तू."
बोलता बोलता, पेटीचे सारे कोपरे शोधून आनांनी एक चांदीचा काळसर दागिना काढला, नि आपल्या डाव्या हातातली करंगळीमधली एक चपटी काळसर अंगठी काढली. क्षणभर थांबून ते निमाला म्हणाले, "ही आहे काशाची अंगठी! आमच्या आबांच्या हातांत ते लहान होते तेव्हापासूनच असायची ती. नि या आहेत माझ्या आईच्या पायांतल्या चांदीच्या मासोळ्या! या दोन्ही वस्तू तू घेऊन जा...त्यांतल्या त्या मासोळ्या जमेल तेव्हा केव्हातरी गंगीला दे—"
आना थांबले, तेव्हा टीपॉयवरलं मला त्यांनी दिलेल्या वस्तूंचं ते पुडकं मी उचलू लागलो—
पण—पण—निर्मलने आना देत असलेल्या वस्तू घेण्यासाठी आपला हात काही पुढे केला नाही.
मी चमकून तिच्याकडे पाहत आहे, तेवढ्यात उलट ती मलाच म्हणाली, "थांब रे, सदाभय्या! ठेव आधी ते सारं खाली! नाही तरी आज मी इथं आलेच आहे, तर मला एकदा इथून जाण्यापूर्वी आनांना सर्व काही साफ सांगून टाकलंच पाहिजे!"

*

तिच्या त्या शब्दांनी नि भरभर पालटत गेलेल्या चेहऱ्याने मी पार चपापलो. पण त्यापेक्षाही अधिक आनाच चपापले, गोंधळले होते. वस्तू देण्यासाठी निमापुढे झालेला

त्यांचा हात यंत्रासारखा एकदम खाली झाला...
तेवढ्यात आनांकडे वळून निमा बोलू लागली, " आपला सदाभय्या नेहमी कमी बोलतो. मी जास्त बोलते, स्पष्ट बोलते, अप्रिय बोलते !— पण म्हणून रागावू मात्र नका बरं, आना ! या क्षणी जे मला वाटतंय ते स्पष्ट बोलल्याशिवाय मी गेले तरच अधिक अपराधी ठरेन मी ! "
काहीशा अगतिकपणे आना तिच्याकडे पाहत होते. मीही भांबावलो होतो. तेवढ्यात निमा भराभर बोलू लागली, " मघा इथं आल्यापासून, अगदी संथपणेच, सारं काही मी निमूटपणे पाहते आहे. मघापासून तुम्ही आज हे काय चालवलंय तरी काय, आना ? तुम्ही जी वाटणी चालवली आहे तिचा हा उरलासुरला भागच ना ? तर मग तो तुम्ही आता अशा प्रकारे गपचूप वाटत असताना मी का म्हणून निमूट राहीन ? तुम्हीच ना मघा म्हणाला, ' वाटणी संपली ' ? मग ? सारी इथून गेल्यावर, हळूच सदाभय्याला फोटो, तुमचं मोडकं घड्याळ नि आमच्या आईचा ताईत देता ! आजोबांच्या हातांतली काशाची अंगठी मला देता नि तुमच्या आईच्या पायातल्या मासोळ्या गंगाअक्काला द्यायला माझ्याकडे सुपूर्त करता ! का ? का ?? — तुम्हांला वाटत असेल, आपला हा लपंडाव आपण आपल्या आयुष्याच्या अगदी अंतापर्यंन्तही आपल्याच अधिकारात चालू ठेवू ! कोणाची ताकद आहे आपल्याला खरं काय वाटतंय ते ओळखून काढायची ? पण लक्षात ठेवा, आना ! मी तुमचीच मुलगी आहे ! त्या तुमच्या यशोदेचीच मी मुलगी आहे !— त्या साऱ्यांना ते ते सारं देण्यात नि आम्हा तिघांना मागून हळूच आता हे हे जे देत आहा ते देण्यात— त्यांची, तुमची नि आमचीच किंमत करीत आहा तुम्ही ! "

*

निर्मलेचा तो त्या वेळचा एकंदर आवेश नि त्या क्षणी आनांचा तो काहीसा अगतिक झालेला, गोंधळला-भांबावलेला चेहरा—दोन्ही एकाच वेळी पाहून, मला तर हृदयात अगदी कालवल्यासारखंच होत होतं.
" तुम्ही अगदी वर्षानुवर्षं घेतलेला तो बुरखा ! तुमचा तो प्रिय मुखवटा ! आज, या क्षणी तरी साफ— पार फाटला आहे, आना ! " तेवढ्यातच निर्मला पुन्हा आवेशाने पुढे बोलू लागली, " एखाद्या देवळातला सोन्याचा मूल्यवान् देवही चोरायला माणसं हल्ली तयार होतात— सहज सापडतात ! मग तुमच्या इस्टेटीच्या नि त्या दागिन्यांच्या वाटणीला इतका वेळ तो कशाला लागायला हवा होता ? पण वेळ लागला त्याला कारण होतं ! मला ठाऊक आहे ते ! त्याला कारण, माणसांच्या हळुवार भावनाच ! भावनांचं तसं नसतं, आना ! हे तुम्हीही जाणता, मीही जाणते ! तसल्या भावना प्रचंड प्रखर असतात, तरी पण क्षुल्लक-जड वस्तूंचाच आश्रय घेऊन त्या नेहमी राहत असतात ! म्हणूनच त्या क्षुल्लक जड वस्तू... त्यांच्या मागल्या सुप्त प्रभावी भावनांमुळेच

लाख मोलाच्या बनलेल्या असतात! तथापि, त्या भावना अहोरात्र मनात प्रकट–अप्रकटपणे वागवणाऱ्या व्यक्तींच्या पश्चात्‌ ?? त्या लाख मोलाच्या वस्तूंची मातब्बरी ती काय उरली ? जगात त्यांना अर्थात कवडी–किंमतही नाही! म्हणूनच बाऱ्या जीवांच्या दृष्टीने लाख मोलाच्या ठरणाऱ्या त्या वस्तू, त्यांच्या पश्चात्‌ केराच्या एखाद्या ढिगाऱ्याप्रमाणेच जाऊन पडायच्या. अखेर त्या पोरक्या वस्तूंचा जगातला तोच एकमेव आसरा! तुम्हांला आना—आज—या क्षणी, अगदी तसलीच—एक अगम्य, अननुभूत भीती वाटत आहे! तुमचं मन क्षणोक्षण दुभंगतंय! खरंय ना हे ? सांगा, सांगा ना—"

*

आनांचे डोळे हळूहळू पाण्याने भरून येताना नि त्यांचा चेहरा क्षणोक्षण विचलित, विस्फारित, अगतिक होत असताना पाहून मी मधेच निमाला म्हणालो, "ऐक, ऐक ग निमा!— काही वेळाकाळाचं भान ठेव थोडं!"

"तूच गप्प रे, सदाभय्या! मला सांगायचंय ते असं आनांना सांगितल्याशिवाय आज तरी मी मुळीच राहणार नाही, इथून जाणारच नाही, हे नक्की! उद्या कोण कोणाला कसं भेटेल कोण जाणे!" आनांकडे वळत निर्मल पुन्हा पुढे बोलू लागली, "तुमचा जीव, तुमच्या खऱ्या प्रखर भावना, आजपर्यंत तुम्ही वाटून टाकलेल्या त्या तुमच्या वैभवात खासच नाहीत, आता! ते सारं, या—याच क्षुल्लक वस्तूंमधे खरंखुरं गुंतलेलं आहे आणि आपल्या पश्चात्‌ त्यांची हमखास आस्थेवाईक जपणूक कशी होईल, याच गोष्टीची तुम्हांला मोठी चिंता लागलीय! तीच अशा तऱ्हेने तुम्ही निवारू पाहता आहा! होय, आना, होय! तुमच्या पवित्र भावना, तुमचे ध्यास–भास, तुमची ध्येयं—सारं सारं शिरसामान्य करायला, ही आम्ही तीन भावंडंच तुम्ही अखेर शोधून काढलीत! मला तरी यात मुळीच संशय नाही! नि सदाभय्याचा, माझा, अक्काचा याच्या इतका गौरव दुसरा कोणता जगात आणखी असेल, असं मला तरी वाटत नाही! पण मग तेच सारं करताना देखील, आम्हा दोघांना, आम्हा भावंडांना, तुमच्या अहंपणाच्या पटावरल्या प्याद्यांसारखं वापरू पाहत आहा तुम्ही! ते मात्र मी मुळीच शक्य होऊ देणार नाही कधीही!"

आवेशाने बोलता बोलता, निर्मला स्वतःच अखेर अश्रू ढाळू लागली. तिचा गळा वारंवार दाटून येऊ लागला. तरी ती अडखळत, गद्‌गदत पुढे म्हणालीच, "आना, आना! मनापासून, अगदी प्रामाणिकपणे मी सांगते, तुमच्याकडून आमच्या हाती एवढ्या विश्वासाने येणाऱ्या या वस्तू— आम्हांलाही अगदी पृथ्वीमोलाच्याच आहेत! इतर वैभवात मला, सदाभय्याला किंवा अक्काला कसलं स्थानच नसलं, कितीही लहान स्थान असलं, तरी त्याची मला तरी मुळीच तमा–पर्वा नाही. आमची किंमत तुम्ही त्या वैभवात मोजली नाहीत, केली नाहीत, आना! आयुष्यभर, वरवर आमच्याशी

कठोर वागूनही अखेर तुमच्या खऱ्याखुऱ्या कोमल हळुवार प्रचंड भावनांचे वारस तर तुम्ही फक्त आम्हांलाच केलंत ! याहून मोठं, यापरतं दुसरं कोणतं मोठं दान तुमच्याकडून आम्हांला मिळणार होतं ? कोणतं मिळायला हवं होतं ? ”

नि तसं बोलता बोलता निर्मला एकदम थांबली— पटकन् बिछान्यावर आनांच्याच शेजारी पडलेल्या आजीच्या त्या मासोळ्या नि आबाआजोबांची ती काशाची अंगठी तिने वर उचलली. अत्यंत नम्रपणे ती खाली वाकली. आनांच्या पायावर तिने आपलं डोकं टेकलं नि अश्रू तसेच खाली ओघळू देत ती म्हणाली, “ म्हणूनच–म्हणूनच, आना– तुम्ही देत आहा ते— तुमच्याबद्दलच्या अत्यंत आदरानेच, भक्तिभावानेच, मोठ्या कृतज्ञतेनेच मी—आम्ही दोघं ग्रहण करतो ! ”

*

आनांच्या डोळ्यांतून ओघळलेली टिपं निमाच्या केसावर पडलेली मी पाहिली. त्यांचा थरथरता हातही तिच्या कपाळावर मुकाट्यानेच पडला होता. त्यांच्या तोंडूनही शब्द बाहेर पडत नव्हता. ओठ तेवढे थरथरत होते. काही तरी बोलायचा प्रयत्न करीत होते.

तेवढ्यात निमा पटकन उठली. लगबगीने दारापाशी गेली. कोपऱ्यातली पाटी तिने खांद्याला लावली – नि घाईघाईने दाराबाहेर पडत ती म्हणाली, “ गेलंच पाहिजे मला आता— पोलीस माझ्या मागे असतील. थोडं जरी चुकलं तरी पार घोटाळा होईल. जाते ! येते आना !— बरे व्हा... बरे व्हा... कधी तरी येऊन भेटेन पुन्हा ! ” तसं बोलतच निर्मला भरभर जिना उतरून खाली रस्त्यावर पळाली होती. ती रस्त्याने झपझप पावलं टाकीत काळोखात शिरल्याचं मला गॅलरीतून दिसलं—

मागून आनांच्या बिछान्याकडून त्यांचे अडखळते शब्द येत होते, “ निमा— निर्मल— थांब पोरी, थांब ! जरा मला बोलू दे— ”

पण ते बोलता बोलता तसेच अडखळत थांबले— तोपर्यंत जशी काळोखाच्या बुरख्यातून मघा ती आली होती तशीच निर्मल पुन्हा काळोखामधेच विलीनही झाली होती.

*

मंगल, त्या प्रसंगानंतर मी दोन दिवस तर इतका बेचैन झालो होतो, की घरात एकटं एकटं राहून मला काहीच करायला सुचत नव्हतं. अंतःकरण हजारो हळुवार भावनांनी सारखं भरून येत होतं— निमा पोर थोर— तसेच आनाही थोर !

तुझाच

सदानंदभय्या

प्रियतम मंगल—
तुला वीसपंचवीस दिवसांपूर्वी लिहिलं, तेव्हा पुन्हा इतक्या लौकर नि असं काही भयंकर कळवण्यासाठी मला लिहावं लागेल, याची कल्पनाही नव्हती.
परवाच आपले आना आपल्याला सोडून गेले.
त्या दिवशीच्या कुटुंबीय भेटीच्या प्रसंगानंतर दोनतीन दिवसांनीच आनांची प्रकृती बदलली. त्यांना खचल्यासारखं होऊन ते अधिकाधिक बिछाना धरून राहू लागले. अशक्तता येऊन, नाइलाजानेच ते थोडेथोडे परावलंबी होत गेले.
ती बातमी समजताच, आपल्या बिऱ्हाडाला कुलूप लावून मी ' श्रीधर 'मधेच राहायला गेलो. मनातली सारी जुनाट अभ्रपटलं–जळमटं अशा वेळी भरभर विरघळतात. अकारण हुरहूर वाटून आपल्या माणसाकडली ओढ लागते. मला नकळतच माझे पाय तिकडे वळले होते. माझ्या तेथे जाऊन राहण्याने आनांनाही बरं वाटलेलं दिसलं.
परिवारातली सारी येत–जात होती. आना पडल्यापडल्या त्यांच्याशी मनमोकळं बोलत, सौम्य हसत; पण त्यांची क्षीणता मात्र दिनानुदिन कमालीची वाढत होती. पाचसहा दिवसांतच त्यांना हलायला–जेवायलाही मदत लागू लागली होती.
मी जवळ आल्यावर गप्पागोष्टींनी त्यांचं मन रंजायचं. अशा वेळी आमचं दोघांचं आयुष्य नि आपलं दोघांचं आयुष्य, एवढ्या दोन विषयांना वर्ज्य करून साऱ्या विषयांवर आम्ही दिलखुलास बोलत असू.
आपलं वाढत चाललेलं दोघांचं परावलंबित्व मात्र आनांच्या मनाला सारखं खुपत असे. मोठ्या नाइलाजानेच माझी मदत ते स्वीकारत. इतरांकडून सेवा करून घ्यायला त्यांचं मानी मन तयार नसे. त्यामुळे त्यांना हवं-नको त्याची आपणच कल्पना करून लक्ष ठेवून सारं करावं लागे.
माला–शाला आल्या होत्या. घरी श्रीधर–नानी होतीच. कामा-व्यवहारांच्या व्यापात किंवा क्वचित चालढकलीत आनांची कामं रेंगाळली–मागासली, की आनांचा संताप होई, ते तिरमिरत. तसा आरडाओरडा नाही, जास्त बोलणं नाही, पण त्यांच्या हालचाली, एखादा तुटक शब्द, चेहऱ्यावरील पालट, यांतूनच सारं काही पटकन समजून येई.
प्रकृती, भोवतालची परिस्थिती वगैरे बाबतींतली एकप्रकारची बेफिकिरी, निरीच्छता त्यांच्या बोलण्या–वागण्यात वाढत गेली होती. कोणावर रागावण्याऐवजी वेळी ते स्वतःचीच थट्टा करीत, पण त्यातही स्वतःच्या अगतिकतेबद्दलचा त्यांचा सौम्य राग दिसून येई.
दोनतीन तासांनी श्रीधर येऊन विचारी, " कशी काय प्रकृती, आना ? "
ते हसून म्हणत, " बरी आहे...भरभर बरी होतेय— "

" दिवसभर मी त्या कामात गुंतलो होतो— " असं तो आल्यावर म्हणाला, तर ते म्हणत—

" अरे दिवस एकदा आला की तो भरतोच, निघून जातोच ! पण कामं मागे राहून कसं चालेल ? "

" मी जरा बाहेर जाऊन येते हं— " असं म्हणून, कामानिमित्त नानी बाहेर जायला निघाल्या, की आना म्हणायचे—

" जा, जा हो तुम्ही ! मीही पडल्या पडल्या बाहेरचं सारं विसरून आता आत जातो. आपल्याच मनात शिरून, आपलेच संथ विचार करीत असलं माणूस, की मग आपल्या कशाचंच भान उरत नाही ! आपण आपल्याच आनंदात असतो. भोवतालचं सारं जग, आपलं दुःख, सारं सारं विरघळतं, तीच खरी विश्रांती ! खरं म्हणजे पूर्ण विश्रांतीचीच जरुरी आहे आता मला ! "

*

" जास्त बोलायला देऊ नका " म्हणून डॉक्टरांनी सांगताच, टेबलावरची घंटा श्रीधरने आनांजवळ आणून ठेवली होती. लागलं काही तर ती वाजवायला त्यांना सांगितलं होतं.

एकदा मी स्नानाला गेलो असता आनांनी ती घंटा खूप वेळा वाजवली, पण जवळ कोणी आलं नव्हतं. मग दुपारी ते जेवत असताना श्रीधर, नानी, मी, आम्ही सारी जवळच बसलो होतो. तेव्हा आना हसून म्हणाले, " अरे श्रीधर, तू ही चुकीची घंटा माझ्यापाशी आणून ठेवलीस ! अरे पडल्या पडल्या वाजवायला देवळातली नाहीतर शाळेची घंटाच इथं अधिक बरी पडेल ! खरं ना ? "

माला कशावरूनसं त्यांना एकदा म्हणाली, " आईचा श्रीधर फार लाडका. फार आवडतो तिला ! आम्ही काय, पोरी आपल्या ! "

आना हळूच हसले नि तिला म्हणाले, " तुमच्या आईचे दोन श्रीधर आहेत ! विचार तिला—अधिक कुठला आवडता तिचा त्यांतला ? "

असं वरवर हसत बोलत ते वेळ घालवीत खरे, पण त्यातूनही त्यांच्या मनात कोंदाटलेल्या एका अगम्य झगड्याचंच मला प्रतिक्षण प्रतिबिंब पडलेलं दिसे.

*

दिवस असा कसा ना कसा खेळीमेळीत, गप्पागोष्टींत पार पडे : पण रात्री सारी सामसूम झाली, की आनांचा नाइलाज होई. त्यांना नकळतच त्यांच्या हालचाली होत नि क्षीणता आलेली असल्यामुळे, क्षुल्लक हालचालीनेही त्यांना असह्य दुखू लागे. एका कुशीवरून दुसरीवर व्हायलाही त्यांना मदतीची जरुरी असायची.

पण सारीच जण—श्रीधर, माला, शाला—आपापल्या गादीवर असायची. कधीमधी

जवळच्या कापडी आरामखुर्चीवर नानी पडून असत. पण त्यांचाही डोळा लागल्यावर अगदी हलकी हाक त्यांना ऐकू येत नसे. तसं झालं की जे हवं ते मनात दडपून आना गप्प राहत.

त्यांच्याच खोलीत, दुसऱ्या टोकाला मी माझी सतरंजी टाकी. अशा वेळी कधी उठून गेलं, त्यांच्या अंगावर पांघरूण घालू लागलं, तर ते हळूच म्हणत, " कोण ? सदा ? तू रे का उठलास ? अरे, प्रत्येकाची हकाची रात्र—आपली आपली आपल्यापुरती असते ती ! जा, झोप तू. सारी झोपली आहेत ना ? मीही झोपतो. प्रयत्न तर करून पाहावं... जा—जा ! इथं रेंगाळू नकोस ! झोप जा. "

मला तर त्यांच्या त्या तसल्या संथ, थंड बोलण्यात एक प्रकारचा भकास भ्रमनिरासच आढळायचा. वाईटही वाटायचं...पण मग मी काही करीत राहिलेलंही त्यांना खपत नसे. अखेर नाइलाजाने मला परत माझ्या बिछान्यावर येऊन पडून राहावं लागे.

*

त्यानंतर दुसऱ्याच दिवशी, अगदी भल्या पहाटे, पडल्या पडल्या आना मोठ्याने काकडआरती म्हणू लागले.

त्यांचा आवाज आत आत ओढला जात होता. तो रुद्ध झाला होता. मधून मधून घोगरा—बसका येत होता. तरीही ते हळूहळू " घनश्याम सुंदरा " म्हणाले, " उठी गोपाळजी " म्हणाले. " सखा कृपावंत " आळवू लागले.

अखेर ते मोठमोठ्याने घोळवून घोळवून म्हणू लागले— " आनंद रस हा प्याला । भवताप शांतचि झाला । नाही जोंवरीं मेली माय—तोंवरि दृढ धरिं सद्गुरुपाय । "

त्याच वेळी श्रीधर उठून बाहेर आला. त्यांना म्हणाला, " आना, त्रास होईल हं ! बोलू नका—अगदी शांत पडून राहा ! "

नानीही ते ऐकून आरामखुर्चीतून उठल्या व म्हणाल्या, " खरंच—बोलण्यापेक्षा शांत विश्रांती घ्यावी. डॉक्टरांनी सांगितलंय हो— "

श्रीधर-नानींनी चालवलेल्या त्या डॉक्टरच्या अवडंबर—सासुरवासाचा मला थोडा रागच आला. मी हळूच म्हणालो, " नानी, श्रीधर...असं काय बरं ? बोलू द्या की आनांना. डॉक्टर काय सांगतो, कपाळ ? आपला आवाज आपल्या आपणच ऐकून, या क्षणी आनंद वाटतोय त्यांना—होऊ द्या त्यांच्या मनासारखं. "

म्हणता म्हणता, मधेच थांबलेले आना मग मंद हसून म्हणाले, " तुमचं दोघांचं जितकं खरं आहे, तेवढंच सदा म्हणतोय तेही खरं आहे ! अरे, मी उद्या थोडाच माझा हा आवाज वापरणार आहे ? मग मला थोडाच डॉक्टर येऊन रागावणार आहे ? नि रागावला तर मला थोडंच ते ऐकू येणार आहे ? अरे बाबांनो, ज्ञानेश्वर—एकनाथ—नामदेव—तुकाराम पूर्वी मी यशोदेबरोबर मनापासून वाचले आहेत एकदा. मी खूप खूप स्वस्थ पडून पाहतो—तुम्ही सांगता, डॉक्टर सांगतात, तसं ! पण ते पुण्यात्मे

आता मला तसं स्वस्थ पडून देत नाही. आतूनच अगदी गद्‌गदून सोडतात मला—हृदयात प्रेमाचा उमाळाच आणतात—म्हणतात, ' घटका गेली, पळे गेली, तास वाजे ठणाणा—आयुष्याचा नाश होतो—राम का रे म्हणा ना ?' का रे म्हणा ना ?"

*

क्षणकाळ आनांनी उसंत घेतली नि मग पुन्हा ते बोलू लागले, " आता श्री शंकराचार्यांचे हे उद्‌गार जरा पाहा—पण तुम्हाला कसे बरं ' उचलता ' येणार ते ? त्यांना बंद करून कसे बरं बंद होणार ते ? त्यावर डॉक्टरकडे खासच काही औषध नाही तुमच्या ! हॅं हॅं—ते काय म्हणतात, आहे ठाऊक ? अरे—फार फार अनुभवाने फार खोल विचार करूनच म्हणतात बरं—

दिनमपि रजनी, सायं प्रातः, शिशिरवसंतो पुनरायातः ।
कालः क्रीडति गच्छत्यायुः, तदपिन मुञ्चत्याशावायुः ।
अंगं गलितं पलितं मुंडं, दशनविहीनं जातं तुण्डम् ।
वृद्धो याति गृहीत्वा दण्डं, तदपिन मुञ्चत्याशापिण्डम् ॥

आणि त्यामुळेच तर—सारं मग चालूच राहतं हो, हे रहाटगाडगं ! ते आपलं अखंड, अनंत गरगरतच असतं ! आणि मग ?

पुनरपि जननं पुनरपि मरणं, पुनरपि जननी जठरे शयनम् ।
इह संसारे भवदुस्तारे, कृपया पारे, पाहि मुरारे ।

मनात सारखे सारखे विचार येतच असतात—अखंड, अखंड

कस्त्वं को हं कुत आयातः, का मे जननी, को मे तातः ।
इति परिभावय सर्वमसारं, विश्वं त्यक्त्वा स्वप्नविचारम् ।

हॅं हॅं—खरंच, अगदी खरंच आहे की ते सारं सारं—

यावज्जीवो निवसति देहे, कुशलं तावत् पृच्छति गेहे ।
गतदपि वायौ देहापाये, भार्या बिभ्यति तस्मिन् काये ।

हॅं हॅं—खरंच नव्हे का ते ? भार्या बिभ्यति तस्मिन् काये ! एवढ्याचसाठी तर आचार्य स्पष्ट शब्दांत सांगताहेत—

भज गोविंदं, भज गोपालं, भज विश्वेशं, मूढमते ।
इह संसारे भवदुस्तारे—कृपया पारे पाहि मुरारे ।

पाहि मुरारे । पाहि मुरारे । पाहि मुरारे—"

*

पूर्वी मी चर्पटपञ्जरिका वाचली होती. आजपर्यंत त्या पदलालित्यासाठी अनेकदा गंमतीने म्हणालोही होतो.

पण त्या परिस्थितीत, त्या मनःस्थितीत, स्वतः आनांच्या तोंडूनच त्यांतले बाहेर पडणारे ते अर्थपूर्ण तुकडे ऐकताना मला ते अधिकच अर्थपूर्ण वाटत होते. त्यातून ज्या नव्याच, अगम्य, अर्थपूर्ण, अपूर्व, अद्‌भुत अनुभवाची मला एक जी मनोमनच प्रतीती होत होती, त्यामुळे माझेही डोळे पाणावले होते. कंठ गद्‌गदित झाला होता. हृदय धडधडू लागलं होतं. अंगावर शहारे उभे राहत होते!

अजूनही डोळे मिटल्यामिटल्या, आना हळूहळू, स्वतःशीच पुटपुटत होते...

"गतवति वायौ देहापाये।...आयुष्यभर लक्षातच नाही घेत आपण हं हे! भार्या बिभ्यति तस्मिन् काये। हं—पाहि माम्। पाहि मुरारे। सदानंद! सदानंद—"

अर्धवट माझ्या विचारातून भानावर येऊन, पुढे होत मी म्हणालो, "काय, आना? हाक मारलीत?"

आनांनी डोळे उघडून एकदा माझ्याकडे पाहिले, मग एक क्षीण हास्य करून ते म्हणाले, "तुला नव्हे रे! माझ्या स्वामीराजांना हाक मारली मी!—पण मग, आता ही पण गंमत पाहिलीस का तू सदा, मायेत गुरफटलेल्या गुंतलेल्या प्राण्याची? त्यातूनच फिरून संसारजालात ओढलं जाण्याची, त्यात फिरून गुरफटण्याची—माणसाने अशी व्यवस्थाच करून ठेवलेली असते जणू! गंमतच आहे, नाही? हं—असो, असो...सच्चिदानंद—सदानंद!"

*

आनांचा आवाज आता बराच क्षीण झाला होता. ते निमूट पडून राहिले होते. दिवसभर मधूनमधून डोळे उघडून ते माझ्याकडे टक्कारून टक लावून पाहत, अस्वस्थ हालचाली करीत. मला वाटू लागलं, अखेर 'तो क्षण' आता जवळ येत चालला!

तेवढ्यात आनांच्या ओठांची अस्पष्ट हालचाल झाली, डोळ्यांमधून दोन अश्रू ठिबकून गालांवर ओघळले—

मी पुढे मान करून हळूच विचारलं, "काय आना?"

अगदी मंद, क्षीण स्वरात आना हळूहळू म्हणाले, "छे—काही नाही—शरीराची तळमळ तेवढी होते...हं—सदानंद! सच्चिदानंद—"

आणि त्यानंतर, डोळ्यांमधून ते माझ्याकडे नि सभोवार कितीतरी वेळ पाहत होते, तरी आनांचा आवाज मला फिरून कशासाठीही त्यानंतर ऐकू आला नाही. तास-दीड तास आणखी त्यांचा श्वास मंदमंद चालू होता...पण शरीर हळूहळू निष्प्राण, निष्प्रभ होत गेलं होतं.

मधूनच कधी ते डोळे उघडत, टक्कारून माझ्याकडे पाहत. पण मग ते बोलके डोळेही

हँळूहँळू चकाकायचे थांबले. बघता बघता तेही काचेरी मण्यांसारखे झाले.
अखेर श्वास हलका हलका आत जात राहिला. नि मोठा सुस्कारा टाकावा तसा तो सोडून देऊन, त्याबरोबरच आपलं शरीर, जमलेल्या आम्हा साऱ्यांच्या ताब्यात आनांनी बेफिकिरीने सोडलं व ते दूर दूर कोठे ते निघून गेले !
असा त्यांनी आमचा, आपल्या वैभवाचा, आपल्या भोवतालच्या साऱ्याच जगाचा, अखेरचा निरोप घेतला !

*

सुन्न मनस्कतेतून मी भानावर आलो तेव्हा भोवती रडारड चालली होती.
त्या क्षणी आमचे आना समोर दिसत होते. पण ते आमचे आना नव्हतेही — त्या क्षणी ते होतेही व नव्हतेही ! त्यांना ठेवायचं होतं नि सोडूनही द्यायचं होतं : आदराने मनात ठेवायचं होतं — कर्तव्य म्हणून पंचमहाभूतांमध्ये त्यांना सोडूनही द्यायचं होतं !
या क्षणी, आता अधिक काय लिहू ?

तुझा
सदानंदभय्या

## डोलारेच डोलारे

१८ ऑक्टोबर १९४२

प्रियतम मंगल —
तान्ही पुष्पा आजारी असल्याचं नि स्वतः तुझी प्रकृतीही नरमगरम असल्याचं समजलं. इकडे येण्याची मुळीच घाई करू नका. इकडच्या या घटना नि तू तिकडेच राहणं बरं नाही, असला तुझा गेल्या दोनतीन पत्रांमधला सूर मला तरी अस्थानी वाटतो. प्रकृतिस्वास्थ्य आधी. लौकिक बरंवाईट दिसण्याच्या ‘ दांभिक ’ भीतीने आपल्याला जरूर नि योग्य ते करण्यात कधीच कमी करू नये. माझ्या ‘ खानावळी ’ची नि घराच्या ‘ धर्मशाळेची ’ तिथे बसून तू मुळीच चिंता करू नकोस. नाही तरी आता तुझी नोकरीही उरलेली नाही. तेव्हा माझं हे निश्चित फर्मान तुझ्यासाठी निघून आहे ते असं, की आणखी महिना-दीड महिना तू माहेरीच पूर्ण विश्रांती घे. कित्येक बिचाऱ्यांना जायला-बोलवायला माहेरंच नसतात, हे तुला ठाऊक आहे ना ? पुढे हवं तर इतक्या लांब पाच वर्षं जाऊ नकोस...

*

दरम्यान इकडे अनेक आणखी घटना घडल्या आहेत. मुख्य म्हणजे, गेल्या आठवड्यात श्रीधरबरोबर आलेल्या नानींच्या निरोपाप्रमाणे सदूकाकांबरोबर मी घरी गेलो होतो, तिथे " सारी व्यवस्था मृत्युपत्राप्रमाणे करून टाकावी " असं म्हणून नानींनी कपाटातून सारे कागदपत्र सदूकाकांच्या व माझ्यासमोर आणून ठेवले. ते सारंच तुला तपशीलवार कळवण्यासारखं महत्त्वाचं नि मनोरंजकही आहे.

" हे ' हिशेब-टिपणाचे ' सारे कागद. शिवाय शेदीडशेंची रोकड होती. सगळ्या गडबडीत ती खर्च झाली. अलीकडे स्वतःचं निराळं, स्वतंत्र खातं ठेवलं नव्हतं त्यांनी. आमच्या जोडखात्यात आता फार तर सहासातशे आहेत...पण अजून डॉक्टर वगैरेंची बिलं द्यायची उरलीयत—"

" आणखी कोणती खाती आहेत का बँकेत, वैनी ? "

" हो...एक श्रीधरचं-माझं जोड सेव्हिंग खातं. पण मला माझ्या भावंडांबरोबरच रावजीअण्णांकडून ज्या रकमा व जे उत्पन्न मिळालंय, त्या पैशांचंच ते आहे. सदानंद-श्रीधर वगैरे भावंडांच्या या व्यवहाराशी त्या खात्याचा काही संबंध नाही. आणखी प्रत्येकाच्या नावाची यांनी उघडलेली पोस्टल सेव्हिंग बुकं आहेत. प्रत्येकाच्या नावाने एन्डॉर्स केलेल्या हजारा-हजाराच्या प्रॉमिसरी नोटा आहेत, त्या एकूण ब्यैंशी-चौऱ्यांशी असतील. विमे, बोनसबिनस मिळून चोवीसएक हजाराचे दोघा भावांच्या नावे असाईन केलेले आहेत. मग हा ' श्रीधर ' बंगला, ती जुनी वाडी... श्रीधरच्या बायकोच्या दागिन्यांचा डबा नि माझ्या दागिन्यांचा डबा ! दाखवू का आणून ते ? "

सदूकाका माझ्याकडे पाहायला लागले. तेव्हा मीच पटकन् म्हणालो, " छे छे, नानी—तुमचा, सरस्वतीवहिनींचा हा खाजगी प्रश्न. श्रीधरलाही ते डबे पाहण्याचा अधिकार नाही. "

नानी ते सारं बोलताना गंभीर होत्या. तरी एक सूक्ष्म छटा त्यांच्या चेहऱ्यावर चमकून जात त्या म्हणाल्या, " माझ्या श्रीधरलाही तुझ्याकडून पुष्कळच शिकण्यासारखं आहे, सदानंद ! "

*

मग सदूकाकांनी सोडलेल्या पुडक्यात ते सारे कागद वर्गवारीने लावलेले यादीसह सापडले. एक सीलबंद मोठा लखोटा होता. तो हाती घेऊन व वरचा मजकूर वाचून काका म्हणाले, " म्हणजे आता स्थावराबाबतचीच व्यवस्था मुख्यतः या लखोट्यातल्या टिपणांच्या आधारे करायची उरलीय म्हणायचं—"

" हो—तसंच ! नाही का ? " घरात जाता जाता नानी त्यांना व मला म्हणाल्या, " आले हं इतक्यातच...चालू द्या तुमचं वाचन—"

नानींना कसली उत्सुकता असणार ? सारे तपशील त्यांना आगाऊ ठाऊक असावेत

यात काही नवल नव्हतं. तरी पण, काय असेल ते असो. त्यांच्या त्या व्यावहारिक सफाईचं, एकूण परिस्थितीच्या आमच्या समोरील मांडणीतील कौशल्याचं, मला तरी अतिशय कौतुकच वाटलं त्या क्षणी. कारण त्यात गांभीर्य, सहकार्य, विश्वास, मोकळेपणा वगैरे सर्व संमिश्र गोष्टींचा दिसून येणारा तो दृश्य संगम अगदी डोळ्यांतच भरत होता. व्यवहारकुशल रावजीअण्णांची ती मुलगी खरंच शोभत होती. त्यात वरवर तरी कुठे कसलं लपंछपं, बारकावे, राजकारण दिसत नव्हतं!

त्या सफाईदार मेमालुमपणामागे कसला नानी-श्रीधरांचा स्वार्थ दडलाच असला, तर आनांच्या किल्ल्या नि व्यवहार, अखेरच्या दोनतीन वर्षांत, अहोरात्र जागरूकपणे स्वतःच संभाळत आलेल्या आनांच्या लक्ष्मीचं ते हक्काचं पारितोषिकच, असं म्हणायला माझं तरी मन तयार होतं. व्यवहार समजून घेऊन पुढली आपापली पावलं टाकायचा मार्ग ठरवायला आम्ही जमलो होतो, कसली गुप्त पोलिसी करायला नि भांडायला नव्हे, ह्याची मला त्या क्षणी पुरती जाणीव होती.

*

लखोटा उघडून सदूकाका आतलं वाचत असताना मला सहस्र स्मृती नि भावना भंडावून सोडीत होत्या--

आमच्या भावनात्मक झगड्यात मी भले नुसता शुभाशीर्वादच मागितला होता, तरी कमीजास्त मला द्यायचं जे आपल्या मनात होतं ते आनांनी दिलंच होतं. "घ्या अथवा सोडा" या धर्तीच्या (मी त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांना सुचवलेल्या) वाटणीच्या पर्यायांचंही तसंच झालं होतं. त्याप्रमाणे कित्येक बदल झालेले वरवर दिसत असले, तरी त्या पर्यायांमधल्या माझ्या फायद्याच्या तपशिलांना आनांनी स्वतःच्या कल्पनेप्रमाणे स्वतःला हवी तसली मुरड घातलीच होती. त्यातलं ते व्यक्तिनिरपेक्ष समानतेचं, 'इक्विटी'चं माझं तत्त्व त्यांनी हवं तसं धुडकावून टाकलं होतं. पण त्या बाबतीत आता काही बोलणारा मी कोण? नि बोलणार होतो कोणाकडे?

माझ्या सूचनेप्रमाणे, नव्या व्यवस्थेत 'श्रीधर' बंगला एकट्या श्रीधरचाच झाला होता. हिशेबासाठी मामुली किंमत तीस हजार धरून त्यातील माझ्या एक-तृतीयांश भरपाईचे दहा हजार ठरतात, असा आनांचा निर्णय होता. त्यांनीच वेळोवेळी मला पाठवलेल्या आठ-दहा वर्षांतल्या सात हजारांचा तपशील खर्चाच्या उजव्या बाजूस सव्याज मांडून, ती भरपाई रक्कम मला आधीच पोचल्याचाही त्यांनी तिथे निर्वाळा देऊन टाकला होता. आणि त्यात व्यक्त होणाऱ्या व्यावहारिक दृष्टीला नाव ठेवण्यासारखं काय होतं? नि एवढ्या काळात तिऱ्हाइताकडून घेतलेल्या सात हजारांचे सव्याज मला दहा हजारांवरच भरावे लागले असते, यातही संशय नव्हता. तेव्हा, "काटेकोर", "हिशेबी", "तिऱ्हाईत" असं म्हटलं, तरी आनांचा तो व्यवहार चोखच होय, असंच म्हणणं मला प्राप्त व रास्त ठरत होतं.

मध्य रेषा करून, जुन्या वाडीची आग्रहा दोघा भावांत समान व सलग वाटणी करण्याचा मी आनांना सुचवलेल्या पर्याय-योजनांचंही असंच काहीसं तिसरंच त्रांगडं झालं होतं. त्यांतलाच एक पर्याय स्वीकारून, त्यांच्या तपशिलात मात्र आनांना हवे ते फरक त्यांनी करून ठेवले होते. एक नवी व दोन जुन्या अशा तीन चाळीच श्रीधरच्या नावे करून, उरलेली एक चाळ, आबाआजोबांचं जुनं घर व सारी मोकळी जागा त्यांनी माझ्या नावे केली होती. दोन विभागांत माझा जरा कमी मोलाचा हे मान्य करून, त्या विभागणीतला तोल संभाळण्यासाठी मी पर्यायांत सुचवलेली बारा हजारांची तफावत रकम मात्र सहा हजारच गृहीतमान्य म्हणून आनांनी धरली होती. अर्थात "सहा निम्मे तीन हजार प्रॉ. नोटांच्या रूपाने भय्याला द्यावेत" असा आनांनी श्रीधरला आदेश दिला होता.

या योजनेत मात्र आनांचा 'हम करेसो कायदा'च मला दिसत होता. पण एवढं करूनही, त्या स्थावर मिळकतीमधल्या मोकळ्या जागेतला एक पाच-साडेपाचशे वारांचा तुकडा त्यांनी श्रीधरला बागबगीच्यासाठी म्हणून तोडून दिला होता. मध्य रेषेने होणाऱ्या संपूर्ण सलगतेच्या व स्वतंत्रतेच्या माझ्या आग्रही विनंतीला आनांनी तसा उघड उघड बाध आणला होता. त्यामुळे झालेल्या तसल्या दुहेरी नुकसानीचं न्याय्य स्पष्टीकरण मात्र, खुद्द आनांच्या ठिकाणी स्वतःला कल्पूनही, मला करून घेता येत नव्हतं. ते मिळणारे केवळ तीन हजार नि ती माझ्या बाजूमधे, सलग जमिनीच्या तुकड्यांत घुसणारी, आनांकडून श्रीधरला मिळालेली चिरोटी म्हणूनच मला खूप खूप अस्वस्थ करीत होती.

*

त्यानंतर सदूकाकांनी भरभर रकमा वाचल्या. लहानापासून मोठ्यांपर्यंत त्या टिपणाची मांडणी होती...

सदूकाकांच्या लग्न झालेल्या चार मुलींना प्रत्येकी एक प्रमाणे चार, भागीआत्याला दोन, मालाला सहा, घरातून निघून गेली तरी ("निर्मलचं लग्न ही आपलीच जबाबदारी" या विचाराने,) तिला सहा, गंगाअक्काला तीन, सदूकाका व श्रीधर यांच्या सल्ल्याविचाराने मी ठरवायच्या धर्मादाय योजनेसाठी बारा, नि अखेर श्रीधर, नानी व मी यांच्यात प्रत्येकी समान वाटलेल्या एकूण पंचेचाळीस, अशा प्रकारे आनांनी ती एकूण हजारा हजाराच्या चौऱ्यांशी प्रॉ. नोटांची वासलात लावली होती.

उरली विम्याची व्यवस्था. नानी सुरुवातीला म्हणाल्या होत्या तशीच ती होती. पोस्ट बुकं होती. त्यांतल्या निर्मलेच्या व माझ्या सेव्हिंग बुकांत तीनशेचारशेच्या शिल्लक रकमा होत्या, तर माला-शाला-श्रीधर-नानी यांच्या बुकांमध्ये प्रत्येकी आठशेपासून बाराशेपर्यंतच्या शिल्लक रकमा होत्या. भागाआत्या, गंगाअक्का यांच्या नावे पोस्ट बुकंच नव्हती.

" घराचा कॉन्ट्रॅक्टरचा चालू धंदा — त्याच्या बारा-पंधरा हजाराच्या साधनांसह व असलेल्या शिल्लक माल गुडविल-येण्यांसह-श्रीधरच्या एकट्याच्याच मालकीचा राहील. सदानंदला मूळपासूनच त्यात गम्य नाही. आवड नाही मलाही तसली कोणती नवी गुंतागुंत त्या बाबतीत नको आहे. " असा आपला स्पष्ट अभिप्राय व्यक्त करून आनांनी तो विषय दोनतीन वाक्यांतच निकालात काढला होता.

केलेल्या नोंदीप्रमाणे ज्याचं त्याला जे ते सुपूर्त केल्यावर त्यांच्या पावत्या घेऊन, स्वतः आनांनी तयार करून ठेवलेल्या सर्व पावत्यांवर मी सह्या करून त्याला सदूकाकांनी साक्ष-सह्या करावयाच्या व ते सारे कागदपत्र नानी-श्रीधरांकडे द्यायचे, की वाटणीचं काम संपलं, अशी आनांनी व्यवस्था केली होती. अखेरीस, सर्वांचं मनापासून शुभ चिंतिलं होतं.

*

सर्व वाचन, चहा इ. झाल्यावर सदूकाका व मी बाहेर पडलो. वाटेत सदूकाका आठवून आठवून खूप बोलत होते. मी गप्प राहून ऐकत होतो.

" बापू फार हुशार नि व्यवहारी माणूस. पाहिलीस त्याची एकूण काटेकोर व्यवस्था ? अरे, आपण अहोरात्र श्रम करून पैसा कमवायचा, तो काय कोर्टात नि वकिलाच्या पाकिटांमधे का जाऊ द्यायचा ?

" पण लक्ष्मीवहिनी तर त्याच्याहीपेक्षा कंकणभर अधिक हुशार ! गांगरली का कुठं कशात ? माझा तरी आज कित्येक वर्षांचा अनुभव आहे, कधीही आनाबापूच्या तिजोरीत दीडदोनशे हजार रोख असायचेच !— मग याच वेळी, एवढा त्याचा आजारबिजार चालू असताना, फक्त शे-दोनशेच असतात नि ते खर्च होतात, हे कुणी रे पाहिलं, सदा ? त्यांच्या जोडखात्याचं पासबुक रे का नाही दाखवलंन तिने ? नि श्रीधर-नानीच्या जोडखात्यात किती रकम आहे ? ती सारीच तिला रावजीअण्णांकडून मिळालेल्या हिशेबातलीच आहे, हे तरी कशावरून रे सिद्ध होतं ? पण मग झाली का ताकद तुला-मला त्याबाबत काही विचारायची ? अरे सदा ! तशी आपली ताकद नाही, हे तीच आपल्यापेक्षा जास्त खात्रीने जाणते ! पण मग, आनाबापूनेच यातल्या कशाचा टिपणात कुठे कसला ओझरताही उल्लेख केलेला नाही ! तर तू-मी तरी— "

मी काहीच बोल्लो नाही. मला वाटत होतं, " काका उगीच आपल्या डोक्याला नसता शीण देताहेत. आनांनी जेवढं सांगूनसवरून आपल्याला दिलंय तेवढंच आपलं. तोच आपल्याला आपल्या इच्छेप्रमाणे मिळालेला त्यांचा आशीर्वाद— " तेवढ्यात सदूकाकांना नवंच काही आठवून ते मला म्हणाले, " तुझ्या आईचे — यशोदावहिनीचे नव्हतेच का रे कसले कधी दागिने ? ते गंगी-निर्मळांना— निदान तुझ्या बायकोला तरी नको होते का मिळायला ? हे हे काय ? ते आमच्या यशोदावहिनीचं सगळं स्त्रीधन—

सगळं सोनं कुठे रे गडप झालं ? आनाबापू-लक्ष्मीच्या कारकिर्दीतच नि आनाच्या संमतीनेच ते सारं त्या दोघी सासुसुनांच्या दागिन्यांमधे शिरलं, असं मी म्हटलं तर काय चुकणार आहे ! हा—हा काय न्याय म्हणायचा ?

" तसा आनाबापू आमचा हाडाचा अगदी प्रेमळ ! एका फटक्यात, हासभास नसताना मागे आमच्या आईसमक्ष मोठ्या दिलदार मनाने त्याने मला ' सदा-शिव ' बांधून दिलान् ! आता पुन्हा कल्पनाही नसताना त्याने माझ्या चार पोरींना आपुलकीने हजार हजार ठेवलेन ! आमची भागी बापडी फुटक्या कपाळाची—आमच्या-त्याच्या घरात, सगळ्यांची बाळंतपणं नि सकाळसंध्याकाळची जेवणं, उष्टीखरकटी काढता काढता, तिची सारी हयात गेली ! फार दिलंन नसलं तरी तिचीही आनाबापूला झाली ना आठवण ! "

*

बोलता बोलता आम्ही दोघं ' सदाशिव 'मधे पोचलो होतो.

तिथे जेवणे तयार होण्याची वाट पहात आम्ही बसलो असताना सदूकाका आपल्याशीच पुटपुटत, आपणहूनच एका कागदावर निरनिराळे आकडे स्मरणातून मांडत राहिले. आनांच्या-माझ्या साऱ्या आयुष्यांतल्या हजारो स्मृती माझ्या मनात कोंदाटून येत होत्या. काहीशा विषण्ण, विचलित अंतःकरणाने मी शेजारच्या आरामखुर्चीवर आपल्याच तंद्रीत बसलो होतो.

तेवढ्यात एकदम मोठ्याने हाका मारीत सदूकाका म्हणाले, " अरे ए...सदानंद ! हे पाहिलंस ? सगळ्यात कमी गंगीला मिळालं, तुझ्या अडीचतीन पटीने नानी-श्रीधरना मिळालं, शिवाय नानींचं स्वतःचं खातं, दागिने, काय आहे ते सारं निराळंच ! आपली निमा गोड नि तडफेची पोर ! ती घरात राहिली असती, तर तिने एकेकीच्या झिंज्याच धरल्या असत्या बघ ! सळो की पळो करून सोडलं असतंन ! पण ती घरातून गेली म्हणून त्या लायक पोरीला मात्र कमी; तिच्या अडीचतीन पटीने त्या माला-शालांना मिळतं ! जग हे असं आहे ! "

" जाऊ द्या ना, काका. " मी थंडपणे त्यांना म्हणालो, " उगाच कसल्या नसल्या आकडेमोडी या तुमच्या ? आता सारं झाल्यावर, आपल्याला हव्यात कशाला या नाही त्या तुलना ? त्यातून का आनांच्या प्रेमाची नि माणसांची किंमत करायचीय ? ? "

" वा रे वा ! मोठा साधुपुरुष लागून राहिलास की नाही ! " थोडं खिन्न हसत सदूकाका म्हणाले, " अलबत ! पैशानेच नि पैशावरच हे सगळं ठरतं जगात, सदानंद ! तू, निमा, गंगी...तुम्ही पोरं ही अशीच रे अशीच ! अगदी आपल्या आईच्या वळणावर गेला ! तिला कुठं होती कधी पैशाची नि वैभवाची किंमत ? हं ! असो—चला ! देव तुमचंही भलं करील, बाबांनो ! तुम्हांलाही तुमचं स्वतःचं असं कुठे ना कुठे यश देईल खास ! "

“ आणि श्रीधरचं, त्याच्या बहिणीचं नि नानींचंही बरं का, सदूकाका ! ” मी स्मित करून म्हणालो, “ त्यांनाही देव यश देईल ! ”
“ अलबत ! देईलच ! का नाही ? आपल्या आनाबापूंची ती मुलं, तशीच आमच्या रावजीअण्णांची नातवंडं आहेत ती ! रावजी खरंच मोठा उमदा, लाख माणूस ! ”
सदूकाका काय, मी काय, आम्ही सारी एकच प्रकारची माणसं ! त्यांच्या त्या बोलण्याची, त्यामागल्या त्यांच्या भावनांची मला मोठी गंमत वाटली होती. कोणत्याही सोज्वळ, सत्प्रवृत्त माणसाच्या मनाची असल्या परिस्थितीत तसलीच उलटसुलट हालचाल झाली असती. एकीकडे कित्येक ठिकाणी अन्याय वाटतोय, सहानुभूती एकाच बाजूला झुकलेली दिसतेय, पण पुन्हा इकडे सर्वांचंच निरामय कल्याण व्हावंसं वाटतंय ! मोठी गोड कुतरओढ असते ती तसली मनाची...

*

रावजींच्या नावावरून मला तेवढ्यात एकदम एक आठवण झाली, नि सदूकाकांना मी एकदम चमकून विचारलं — “ खरंच, पण...रावजींच्या मुलांचं, नानींच्या भावांचं काय हो आता, सदूकाका ? टिपणांमधे तर कुठे कसला उल्लेख नाही त्या बाबीचा तो...? ”
“ रावजींच्या दहा हजारांच्या देण्याचंच म्हणतोयस ना ?...आहे खरंच. ”
“ माधव सज्ञान झाल्यावर ट्रस्टीने इस्टेट ताब्यात दिली, पण ती रकम त्या वेळी त्यांना मिळाली नाही, ‘ ती येणं आहे ’ असंच त्या भावांचं म्हणणं आहे. ”
“ पण मग...तो आनाचा प्रश्न होता, तुझा-माझा नव्हे. ”
“ पण काका, मलाही एकदा माधव तसं म्हणाला, तेव्हा मी काही वर्षांपूर्वी आनांना विचारलं होतं त्याबद्दल— ”
“ होय ? काय म्हणाला होता तेव्हा आना ? ”
“ ते रागाने मलाच उलट म्हणाले, ‘ तुझ्याकडे रे का करतात असल्या नसल्या पंचायती ते ? समक्ष मलाच विचारायला तोंड नाही त्यांना ? ’ पण काका, त्या दोघातिघा धाकट्या भावांना त्याआधी त्यांच्या बहिणीनेच—नानींनीच म्हणे सांगितलं होतं— ‘ तुमचं दिडकी देणं लागत नाही आम्ही, जा ! आम्हांलाच देऊन टाकले आहेत अण्णांनी ते ! ’ ते खरं, पण आता आनांपश्चात त्यांनी पुन्हा तेच आम्हांला विचारलं तर हो काका ? मोठं त्रांगडंच झालंय आता हे ! ”
“ त्यात त्रांगडं रे कसलं आलंय ? त्यांच्या प्रत्यक्ष बहिणीला, नानीला काही वाटतंय का ? नाही ना ? झालं तर ! असं बघ सदा ! मानलं तर ते त्रांगडं, नाही तर काही नाही ! कायद्याच्या दृष्टीने म्हणशील तर ना पुरावा, ना मुदत, ना काही ! माधव सज्ञान झाल्यालाच एक तप होऊन गेलं ! आता त्या ऐतखाऊ भावांचे अलीकडे व्यवहार गडबडले, म्हणूनच या कागदी नोटा तयार करताहेत ते, आपल्या बापाच्या जुन्या

टाकसाळीतल्या, बसल्या बसल्या! दुसरं काय!"
"असं कसं काका! घेतले असतील तर द्यायला हवेत! खरं म्हणजे...आनांनीच ते देऊन का टाकले नाहीत, हेच मुळी आश्चर्य!"
"तुला बघ सदानंद, कुबेराची सगळी संपत्ती जरी दिली ना, तरी ती तुझ्या हातनं दोन दिवसांत संपेल! तू नेहमी असलेच विचारांचे नि भावनांचे नुसते गोंधळ करीत राहणार आहेस बघ आयुष्यभर! सांभाळ हो...!"
माझी एकदम मुळापासूनच थट्टा उडवीत सदूकाका मोठ्याने हसू लागले.

*

मग जेवून झाल्यावर बसल्या बसल्या सदूकाकांनी मला ते सारं प्रकरण तपशीलवार सांगितलं.
"अगदी अथपासून इतिपर्यंत आहे ठाऊक मला ते सारं, सदा. अरे आनाबापूला रावजीकडून रकम नक्की मिळाली, त्याने ती रावजींना परत केलेली नव्हती, हेही खरं; पण त्यात आनाने कसली लबाडी केलीय, हे मात्र मुळीच खरं नाही! जे द्यायची जरूर नाही असं आपल्याला प्रामाणिकपणे वाटतं, ते दुसरं कोणी आपलं म्हणतंय म्हणून देऊन टाकायला आना काही मूर्ख-व्यवहारी नव्हता, की कोणी एखादा महात्माही लागून राहिला नव्हता!
"असं बघ, ही दहा हजाराची रकम आनाने शेअरच्या धंद्यात मिळवलेल्या फायद्यापैकी. दोस्तीतून जणू हातउसन्या घेतलेल्या रावजींकडल्या रकमेवरच त्याने तिच्या दुप्पट फायदा मिळवला होता. म्हणून, त्यातलेच त्या वेळी रावजीला ते काढून देत होता आना...
"ते दोघेही मोठे दिलदार दोस्त! एक म्हणे 'घे', दुसरा म्हणे 'मुद्दल मिळालं, आता फायदा माझा नाही, नाही घेणार.' अखेर 'हवी तेव्हा परत मागायची बिनव्याजी ठेव' म्हणूनच जणू, आनाने आपल्याकडे ती रकम ठेवून घ्यायचं त्यांचं ठरलं. रावजी आणखीच मिस्कील, चावट. त्याने मृत्युपत्रात ती 'येण्या'च्या यादीतही मांडून ठेवली.
"पण म्हणजे रावजी लबाड, स्वार्थी, असंही नव्हे हो! त्याने तर आपली सारी इस्टेट आनाला ट्रस्टी नेमून, त्याच्या एकट्याच्या मुखत्यारीत टाकली होती. अज्ञान मुलांच्या वतीने आनाने शेअर धंदा केल्यास व कधी वेळ वाकडी पडल्यास, दहा-पंधरा हजार गमवायला देखील रावजीने त्याला अधिकार देऊन ठेवला होता. कोणत्याही लहानमोठ्या व्यवहाराच्या बाबतीत, आपल्या सदसद्विवेकबुद्धीला जागून वाटेल तो खर्च नि निर्णय घ्यायला, रावजींनी आनाला आपल्या टिपणातच मुभा देऊन ठेवली होती.
"म्हणजे आता तूच बघ हो सदा, काय धाष्ट्यं होतं ते रावजीचं! त्या

इसापनीतीतल्या मांजरांच्या गोष्टीत, दोघांत वाटायला समोर आलेल्या खव्याचा त्या माकडाने जसा स्वतःच खाऊन चट्टामट्टा केला, मांजरांना काहीच मिळालं नाही, तसाच रावजींच्या इस्टेटीचा तो खवा स्वतःच खाऊन फस्त करायला व रावजींच्या त्या सान्या पोरांसाठी नरोट्या तेवढ्या मागे ठेवायला काही एक हरकत नव्हती अनाबापूला! खरं ना?

" पण मला पक्कं ठाऊक आहे, आनाने त्या पोरांच्या आपल्या हाती आलेल्या पैशाचा अगदी पै-पैनं चोख हिशेब ठेवला. रावजीकडून धंद्यात गमवायची मुभा असलेले दहा-पंधरा हजार तर गमावले नाहीतच, ते सोडाच, पण उलट मुलांसाठी दहा-पंधरा हजारांच्या आणखी प्रॉ. नोटा नि एक नवं घर— त्यांचा रोजचा सारा घरखर्च चालवून नव्या शिलकेतूनच उभं केलं! आपल्या पंधरा-सोळा वर्षांच्या ट्रस्टी-कामाबद्दल त्याने एका कपर्दिकेचाही स्वतः मेहनताना-मोबदला घेतला नाही.

" तर मग आता मला असं सांग सदा, खोट्या पावत्या, हिशेब—सत्रा भानगडी करून आनाला हवं तेवढं, निदान ही दहा हजाराची रक्कम तरी गडप नसती का करून टाकता आली साळसूदपणे, इतक्या वर्षांत? पण ते त्याने केलं नाही. नि त्यात कसलं आश्चर्यही नाही. त्याचा पिंडच तसा होता. तीच त्याची खरी योग्यता! नि तीच तर रावजींनी अचूक हेरून, आनाला तसं एकमेव मुखत्यार विश्वस्त नेमून टाकलं होतं आपल्या मुला-माणसांचं! असल्या आमच्या आनाबापूने, त्यांचं सारं सत्यबुद्धीने, प्रामाणिकपणे, नेकीने वर्षानुवर्षं केल्यावर, रावजीच्या कुटुंबाचा सर्वांगीण असा फायदा केल्यावर, त्याच त्याच्या सदसद्‌विवेकबुद्धीला ( रावजींकडून त्याला मिळालेल्या व्यापक अधिकारांच्या आदेशानुसार ) स्वतःचा एक अर्थ काढायलाही अधिकारच नव्हता का प्राप्त झालेला? बोलणाऱ्यांना तोंड आहे का तोबरा? बत्तिशीच पडेल गळून.

" अरे, त्याने सारं करायचं ते केल्यावर, अखेर रावजींचा आत्माच आपल्या त्या वाक्याचा अर्थ आनाला जणू काय समजावून सांगू लागला—' माफ करा, आनाबापू, मी आपली ती सहज थट्टा केली. मागे तुम्ही समक्ष देत होता तेव्हा मी घेतले नाहीत. तुम्ही बळेच देऊ लागला म्हणूनच मी तुमच्याकडून ' हवं तेव्हा मागून घेईन ' म्हणालो. आयुष्यात तसं मागितलं नाही, पण केवळ गंमत म्हणून टिपणात मात्र लिहून ठेवलं. आता तुम्ही माझ्या मुलाबाळांसाठी नि मुलाबाळांचं इतकी वर्षं, इतकं सारं केल्यावर, मी केवळ थट्टेने, मिस्कीलपणे त्या वेळी टिपणांत मांडली एवढ्याच कायदेबाज़ कारणासाठी, ती तुमच्यामाझ्यामधली खाजगी ' काल्पनिक रक्कम ' खरोखरच देऊन टाकू नका. छे छे! असं मला मेलेल्याला आता आणखी मारू नका! नुसते माझे परममित्रच नव्हेत तर आता पश्चात् तुम्ही माझे जावईही झाला आहा, योगायोगाने! तेव्हा आता अगदी हात जोडून सांगतो—माफ करा मला माझी ती मिस्कील थट्टा! नि कोणतंही, काहीही करायला तुम्हांला तुमच्या सदसद्विवेकबुद्धीचा आधार-अधिकार मी दिलाय त्याचा जरा अधिक आपुलकीने, अधिक व्यवहारनिरपेक्ष अर्थ काढा नि

त्या रकमेतली एकही पै देऊ नका. ती तुम्ही तुमच्या स्नेह्याला देणं लागत नव्हताच. पण त्याच्या मुलांना तर ती घेण्याचा आता अधिकारच नाही मुळी !
" असं होतं बरं ते सारं सदानंद, मला तरी वाटतं ! आमचा आना स्वतःची सदसद्विवेकबुद्धी जाणत होता : आपला प्यारा दोस्त रावजी नि त्याचं खरं खरं मनोगतही पुरेपूर जाणत होता तो ! म्हणूनच रावजीने टिपणात लिहिलेले ते दहा हजार, त्या पोरांना जाणूनबुजूनच आनाने दिले नाहीत : त्यांचं कोणाचं तो ते देणं लागतच नव्हता मुळी ! अगदी खास ! समजलं आता ? "

*

काकांच्या त्या वृत्तांताने मी तर अगदी आश्चर्यचकितच झालो. मी हळूच म्हणालो, " मग आता आम्ही काय करायचं ? निदान विचारलं कुळकर्णी मंडळींनी तर मी काय करायचं, काका ? "
सदूकाका त्यावर पुन्हा हसले नि म्हणाले, " अरे, आनाही मोठा चाणाक्ष ! रावजीसारखंच त्यानेही आपल्या टिपणांत तसं काही लिहून ठेवलेलं. अर्थात ते सारं आता तुमच्यावर...मागे उरलेल्या सर्वांच्यावर—अवलंबून ! त्या रावजीअण्णांच्या मुलांच्या नि रावजीच्या मुलीच्या नि आनाच्या दोघा मुलांच्या—सर्वांच्याच सदसद्विवेकबुद्धीवर आता ते सारं अवलंबून ! आता कुळकर्ण्यांच्या काही मिळकतीही त्यांच्या परिस्थितीने गहाण पडलेल्या आहेत, तेव्हा त्या रावजींच्या मुलांना ती आपल्या बापाच्या हातची दहा हजारांच्या येण्याची जुनाट नोंद म्हणजेही बुडत्याला काडीच्या आधारासारखीच ! खरं म्हणशील तर त्यांनी ती रक्कम तुमच्याकडे मागणं हे कृतघ्नपणाचंच—पण तरी आपलं मला वाटतं, ते नक्की मागतील ! तुम्ही कोणी— नानी, श्रीधर, तू—कायद्याने त्यांचं मुळीच देणं लागत नाही, देणं जरूरही नाही, पण मग तरीसुद्धा ते सारं आता तुमच्या तिघांना मनाच्या झेपीवरच अवलंबून ठेवलंय आनाबापूने असंच म्हण ना घटकाभर— "
काकांचा तो अखेरचा अभिप्राय ऐकून मी पुन्हा अधिकच गोंधळात पडलो. कारण आनांच्या पश्चात्, पाचसहा दिवसांपूर्वीच माधव नानींकडे गेला असल्याचं माझ्या कानी आलं होतं. त्याने ती दहा हजारांची पुन्हा मागणी करताच नानी एकदम चिडल्या होत्या. प्रथम तिढी तिढी उत्तरं देऊन अखेर भावाबहिणींमधे शब्दाने शब्द वाढला होता. शेवटी खूपच चिडाचीड होऊन नानी माधवला ओरडून म्हणाल्या होत्या, " चालता हो आधी माझ्या घरातून ! म्हणे देणं आहो आम्ही ! "
माधवही तावातावाने पाय आपटत जिना उतरताना, नानींवर ओरडून त्वेषाने बेभान होत म्हणाला होता, " हा चाललोच आता ! आनाबापूंच्या वैभवाने खूप शेफारली आहेस तू ! रक्त विसरलीस, नीती विसरलीस ! रावजीअण्णांच्या एका पोराला आनाबापूंच्या घरातून तू बाहेर काढायला सिद्ध होतेस काय ? आता यापुढे तू आमची

रक्ताची बहीण नाहीस! आमची बहीण आम्हांला आज या घटकेला मेली! लक्षात ठेव, या तुझ्या साऱ्या चढेलपणाच्या उत्तराला माझं प्रत्युत्तर मात्र फार फार भयंकर मिळणार आहे तुला! लक्षात ठेव! तू असं हसत असतानाच तुझं नाक पुरं ठेचलं नाही मी, तर तुझ्या आईचा मुलगाच नव्हे मी!"

त्यामुळे श्रीधरही चिडला होता. मामा–भाच्यांचीही तोंडातोंडी झाली होती. नि अखेर त्या दिवशी माधव रस्त्यावरून ओरडत ओरडतच 'रावजी व्हिला 'कडे निघून गेला होता. कुणाच्या अध्यात नाही, मध्यात नाही असा बापडा साधासुधा माणूस—गोपूमामा—हे सारं काही मला सांगून हळहळला होता, अक्षरशः रडला होता.

मी सदूकाकांना ते सांगताच त्यांनीही अस्वस्थ होऊन एक मोठा सुस्कारा सोडला व म्हटलं, " जगात वैभव खरोखरच फार फार वाईट असतं! नाही रे सदा?"

त्यांच्या त्या उद्गारांचं मात्र मला हसू आलं. कारण थोड्याच वेळापूर्वी स्वतः तेच मला म्हणाले होते, " पैशानेच नि पैशावरच सारं ठरतं जगात, सदानंद!"

*

त्या दिवशी रात्रभर मी सारखा विचार करीत होतो. जुन्या वाडीच्या आनांनी केलेल्या व्यवस्थेचा मी जसजसा अधिक विचार करू लागलो, तसतसं मला अधिकच खिन्न वाटत होतं. विभाग–समानतेबाबतच्या अपेक्षित भरपाई-रकमेत आनांनी केलेल्या कपातीमुळे मला सहा हजार कमी हाती आल्याचं तितकंसं दुःख वाटलं नाही. पण माझ्या नावे झालेल्या मोकळ्या जागेमध्ये आनांच्याच इच्छेने शिरलेली, श्रीधरला मिळालेली ती चिंचोळी पट्टी मात्र मला सारखी अस्वस्थ करीत होती.

तो सगळाच प्लॉट ज्या रस्त्याला लागून सुरू झाला आहे तिथं पी. डब्ल्यू. डी. चा एक नवा मोठा ॲस्फाल्ट रोड बांधला जाणार आहे. त्या योजना पक्क्या झाल्या असून त्याच्या काही भागाचं कॉन्ट्रॅक्ट काम सदूकाकांकडेच आलेलं आहे, असं मी ऐकलं होतं. म्हणूनच मी तसा अधिकच बेचैन झालो होतो.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर, बसल्या बसल्या त्या योजनेचे सदूकाकांकडे असलेले सारे नकाशे पाहता पाहता माझ्या लक्षात आलं, की जो नवा हमरस्ता वर्षभरात पुरा होईल तो आपल्या प्लॉटच्या दुसऱ्या बाजूच्या मर्यादेला अगदी लागूनच जाईल. म्हणजे, दोन्ही बाजूंनी मोठा प्लॉट त्या नव्या वाढत्या वस्तीच्या बाजूला अगदी मध्यवर्तीच होईल. एवढी मोठी खुली मध्यवर्ती जागा आता त्या बाजूच्या साऱ्या टापूत सापडण्यासारखीच नाही. नवा रस्ता झाल्यावर चौफेर गजबजलेल्या त्या भागात आपल्या या विस्तीर्ण प्लॉटला एक अगदी निराळंच महत्त्व येण्यासारखं आहे. एखादी संधी साधता आली तर त्यातून खूपच फायदा मिळण्यासारखा आहे.

आणि त्या विचारांच्या पार्श्वभूमीवर तर, आपल्या प्लॉटमध्ये शिरणारी श्रीधरची ती चिरोटी मला अगदी अर्थशून्य, घातूक वाटू लागली. ती माझ्या दूर व्यवहारदृष्टीमधे सारखी सारखी खुपू लागली. मी मनातल्या मनात भयंकरच हुरहुरलो.

अलग-अलगपणाबद्दल इतकं आनांना सांगून- पटवूनही त्यांनी हे असं का केलं ?? पण मग मनाला वाटलं, आना पक्के धोरणी हेच खरं! ही त्यांनी आम्हा दोघा भावांमधे परस्परसंबंधाची एक शेपटी जाणूनबुजूनच ठेवली आहे. परस्पर सल्ला-मसलत व्हावी; कधी माझा फायदा झाला तर श्रीधरचाही अप्रत्यक्षपणे थोडा तरी व्हावा, हीच बात त्यांची ध्यानबाची मेख दिसते! असलीच त्यांची लबाडी तर ती वत्सल बापाचीच आहे!

*

पण त्यामुळे तर मी अधिकच अस्वस्थ झालो.
आनांचा हेतू एक असेल; त्यांच्या वत्सल दृष्टीने मला थोडा मारक तरी एकूण दोघा मुलांना तो फायद्याचाच होणार असेलही; पण त्यालाच नानींच्या कारकिर्दीत पुढेमागे विकृत स्वरूप प्राप्त झालं तर! त्यातूनच कसली अडवणूक निर्माण झाली तर! त्याऐवजी, प्रत्यक्ष फायद्याचा कसला हासभास नसतानाच, आजच त्याचा आपण फैसला करून टाकावा, हे बरं! जे आनांनी स्वतःच खरोखरी करायचं ते त्यांनी केलं नाही म्हणून आता दोघा भावांना एकत्र बसून परस्पर-विचाराने एकाच बैठकीत ठरवून टाकणं काही अशक्य नाही. नाहीतरी आनांच्या आदेशाप्रमाणे आपल्याला श्रीधरने तीन हजार द्यायचे आहेत, त्यातलेच त्याला दीड हजार परत द्यावेत, किंबहुना, आनांच्याच डोक्यातून टरून आलेली ती तीन हजारांची सारीच्या सारी रक्कम त्याला द्यावी, समान विभागाबाबतची भरपाई आपल्याला मिळालीच नाही असं समजावं, पण आपला तो प्लॉट तरी स्वतंत्रपणे स्वतःचाच आजच्या आज करून टाकावा. हाती येणारे तीन हजार बाहेरच्या बाहेरच जात होते. पण सहा हजार, नऊ हजार, तसे सारेच्या सारे बारा हजारच गेले अशी मनाची समजूत करून घेण्याइतकी ती माझ्या प्लॉटची स्वतंत्रता मला महत्त्वाची वाटू लागली. माझ्या या न्याय्य योजनेबद्दल माझं मला समाधानच वाटलं.
म्हणून अखेर सदूकाकांना हाक मारून, मी त्यांच्याच नकाशांच्या साह्याने त्यांना ते समजवून त्यांचा त्यात सल्ला विचारला. त्यांना तर ते इतकं पटलं की ते घाईघाईने म्हणाले, " माझ्या धोपटमार्गी मनाला या गोष्टीचा स्पर्शच नव्हता झाला, सदानंद. तुझं हे अगदी योग्य धोरण आहे. चालू भावाने भाऊभावांत फार तर हजार-बाराशे देऊन टाकावेत तू श्रीधरला, त्या जमिनीच्या पट्ट्याचे!"
काकांनी लागलीच त्याच क्षणी श्रीधरला बोलावणं पाठवलं, तो येताच त्याला व्यक्तिशः निरुपयोगी अशा त्या निरुंद पट्टीबद्दलची योजना त्यांनीच समजावून सांगितली.
तो काहीशा निर्विकारपणे म्हणाला, " घरी आईला विचारून येतो हवं तर."
मग तासाभराने तो सायकलवरून परत आला नि सदूकाकांना म्हणाला, " आई म्हणतेय, ' एवढी घाई कशाला हवीय सदाभय्याला ?' पण मग व्यवहार करायचाच

म्हटला, तर त्या तुकड्याचे चार हजार तरी द्यायला हवेत भय्याने, म्हणते आई— ”
“ छेः छेः ! हे काहीतरीच बोलणं लक्ष्मीवहिनींचं ! ” काकाच एकदम नाराजीने बोलले व माझ्याकडे पाहू लागले.
तोपर्यंत माझी मात्र तिडीक त्या एकाच क्षणात एकदम मस्तकाला जाऊन भिडली होती. माझ्या मनात येत होतं, आनांनीच आधी जाणूनबुजून ती एक गौण स्वरूपाची व्यवस्था केली. त्या बाबतीतला तो गौणपणा आता आम्ही आपसात विचार करून काढून टाकताना, माझ्याकडून श्रीधरला काही रास्त फायदा मिळावा हे योग्यच ! पण मग केवळ एक-दीड महिन्याच्या आत, आनांपश्चातच्या त्या परिस्थितीचा तसा गैरफायदा घेऊन, नानींना असा माझा भावशून्य लिलाव केल्यासारखं मोल मागावंसं तरी कसं वाटतं ? कसं वाटलं ??
त्याच मनोमन संतापाने अगदी थरथरत मी ओरडलो, “ नानींना काय वाटतं रे श्रीधर ? जगात व्यवहार सगळा काही एकट्या आपल्यालाच कळतो ? जा ! त्यांना जाऊन सांग — म्हणावं, श्रीधरला एवढी रकम डोळे मिटून द्यायला सदानंद म्हणजे कोणी कुठून पळून आलेला एखादा निर्वासित सिंधी नव्हे ! तुमच्या नवऱ्याचा नि श्रीधरच्या बापाचाच मुलगा आहे तोही ! ”
माझ्या त्या एकदम बाहेर पडलेल्या शब्दांनी श्रीधर चपापला !
मीही दुसऱ्याच क्षणाला भानावर आलो होतो. माझा संतापाचा फणफणाट खाली उतरला होता. बोललो तसं बोलायला नको होतं, असा काहीसा पश्चात्ताप होऊन मी पुन्हा श्रीधरला हळूच म्हणालो, “ माफ कर, श्रीधर ! रागावू नकोस ! तुला नाही बोललो ते मी. पण मघा सहनच झालं नाही मला. क्षमा कर ! नानींना हे सांग, नको सांगूस, मला आता तरी तो व्यवहार करायचा नाही हे खरं ! दे सोडून हे सारं इथंच आपण बोललो ते. ”
ते सारं पाहून–ऐकून सदूकाकाही अस्वस्थ झाले होते. पण मग तेच थट्टेने म्हणाले, “ हे सारं साफ साफ चुकतंय् त्यांचं ! अरे ती चिरोटी पुढं एखाद्या वेळी पाचसातशेलाच नि तुलाच देऊन मोकळं व्हावं लागेल वैनींना ! दुसरा रे कोण हरीचा लाल घेणार ती अपुरी लंगोटी ? पाचशे नाही देणार कोणी तिचे ! ”
सदूकाका तसं म्हणाले खरं, पण मग नानी निश्चित मोठ्या हुशार आहेत, धोरणी आहेत. त्यांनाही माझ्यासारखंच दूरचं, पुढलं पाहता येत असणारच ! त्या येन केन प्रकारेण श्रीधरचा आलेल्या संधीत फायदा करण्याचा आटोकाट प्रयत्न करणारच ! असो तेव्हा आनांच्या पश्चात् आता हे आहे असं आहे ! काय काय होतं पुढे, पाहू. बाकी विशेष नाही. घडलं तर कळवीन.
पद्मा–पुष्पांना गोड पापे.

तुझा
सदानंदभय्या

# एक धरणीकंप

फेब्रुवारी १९४५

चि. सदानंद यास अनेक आशीर्वाद विशेष.

गेलं वर्ष-सव्वा वर्ष आपण सारखी विनंती करून मागे लागलो होतो, ते तुझे जुन्या घरातले भाडोत्री त्यांच्या नव्या जागी राहायला गेल्याचं तुला मी दोनअडीच महिन्यांपूर्वीच कळवलं. त्यानंतर एकदाच इकडे उडत उडत येऊन गेलास. वास्तविक त्या वेळी आपलं ठरल्याप्रमाणे तू गेल्या महिन्यातच इकडे राहायला आला पाहिजे होतास. पण राहायला तर नाहीसच, पण नुसता भेटायला–सांगायलाही आला नाहीस. हे काय गौडबंगाल ? कशात इतका गुंतला आहेस ?

मधे वर्तमानपत्रांत जे काही आलं, तेव्हा मला वाटलं, ते वाचून तरी तू धावत माझ्याकडे येशील. पण आला नाहीसच. मला कल्पना आहे तू का आला नाहीस ते ! तुला तो सारा प्रकार समजल्यावर वाईट खासच वाटलं असेल. पण आपण इकडे आलो तर अलीकडे आपण फारसं जात नाही ते ' श्रीधर 'मधे जावं लागणार, नि गेलं की काही बोलावंसं वाटणार, नि वेळप्रसंगी काही कमीअधिक शब्द रागात जाऊन गैरसमजालाच तेवढी जागा होणार या विचाराने, ते सारं टाळायलाच तू इकडे आला नसावास. एका दृष्टीने तो तुझा योग्यच विचार होता.

पण मी इथंच होतो. मला मात्र जावं लागलं. त्या सगळ्या प्रकरणात नाइलाजाने प्रत्यक्ष पडावं लागलं. काय कमी का त्रास–मनस्ताप झाला मला ?

तू आला नाहीस तरी सारं काय काय नि कसं कसं घडलं ते तुला सविस्तर कळवल्याशिवाय मला चैन पडणार नाही. म्हणूनच हे लिहायला घेतलं आहे.

*

नवनवीन योजनांमधे भरपूर लक्ष घालण्यातला लक्ष्मीवहिनीचा उत्साह अफाट नि दांडगा आहे. श्रीधरची ती आई, तेव्हा त्याच्या व्यावहारिक फायद्याच्या साऱ्या योजनांत तिने त्याचं पाठीराखं असावं यात आश्चर्य मुळीच नव्हे.

' यशोदा कॉलनी 'मधले दहा बारा मोक्याचे प्लॉट्स अजून उरले होते हे तुला ठाऊक आहेच. राहायच्या जागेची सगळीकडे टंचाई पाहून, नानीकडलं नाणं चुळबुळू लागलं. आनाची पूर्वीची ' ओनरशिप ब्लॉक 'ची कल्पना–योजना तिने लागलीच उचलून धरली. तशी लक्ष्मीवहिनी मोठी हुशार आहे. तिने ती स्कीम बघता बघता चांगलीच यशस्वी केली.

प्रशस्त स्वतंत्र तीन रूम ब्लॉकचे मालकी हक्काचे साडेसात हजार नि मुईभाडं–म्युनिसिपालिटी वगैरेंचे चोवीस रुपये इतकाच खर्च असं सारं योजल्यामुळे, पहिल्या बंगल्यापाठोपाठ दुसरेही दोन बंगले श्रीधरने बांधायला घेतले, त्यातही जागा

पैटकवण्यासाठी गरजू लोकांच्या उड्या पडायला लागल्या. आपल्या-तुझ्या वाट्याला आलेल्या जुन्या घरामधले तुझे भाडोत्री त्यातल्याच एका मालकीहक्काच्या ब्लॉकमधे राहायला गेले आहेत. त्यांनीच जेव्हा मला हिणवायला " ठरल्या योजनेतल्या रकमेपेक्षा पाचशे जास्त द्यावे लागले, तेव्हाच कुठं डोक्यावर छप्पर झालं आमच्या, काकासाहेब !" असं तोंडातल्या तोंडात शब्द चावत माझ्याकडे आडून तक्रार केली, तेव्हाच मी काय ते समजायचं समजून गेलो.

तिथला तो जमानाच आता बदललाय. मला केव्हापासूनच लक्ष्मीवहिनीच्या व्यवहारांची चिंता वाटू लागली होती. कुठं आनाबापूचा व्यवहार नि कुठे हा !

शेवटली शेवटली पाचसहा वर्षे आना तरी कुठे दैनंदिन व्यवहारात स्वतः लक्ष घालीत होता ? तेव्हापासून मुख्यतः श्रीधर-नानी दोघंच व्यवहार पाहत आली आहेत. तशी आना होता तोपर्यंत त्याची थोडी तरी त्यांना चोख व्यवहाराबाबत दहशत वाटत होती. तरी देखील त्या वेळीही लोखंडाच्या सळया, पत्रे, सिमेंट शीट, सिमेंट पोती इत्यादी बाबींचं लक्ष्मीवहिनीने मुकादमाकरवी ब्लॅकमार्केट सुरू केलं होतं. त्यातलं काही आनाच्या कानावरही अधूनमधून जाई, नि " हे आपलं काम नव्हे " असं आपल्या बायकोला तो थोड्या रागाने सुचवीही.

पण ते तसं एकूण उपड्या घागरीवर पाणीच होतं. आनाच्या अखेरच्या काळात त्याच्या एका ओळखीच्या माणसाला ' मालकी ब्लॉक ' दिला, त्या वेळी लक्ष्मी वहिनीने तो नवखा माणूस समजून त्याच्याकडून जादा दीड हजाराच्या रकमेची मागणी केली होती. ती गपचूप देऊन टाकून त्याने तडक आनाला भेटून ते कळवलं होतं. ते समजताच आनाबापू खूप खूप संतापला होता. " असं काही कराल तर मी आयुष्यभर केलंय ते सारं फुकट घालवाल !" असं बायकोमुलांना सांगून त्याने त्या माणसाचे ते जादा दीड हजार तत्काळ स्वतः परतवले होते नि त्याची क्षमा मागितली होती. त्या वेळी ते प्रकरण तसं मिटलं होतं.

*

पण आता आनाबापूच्या पश्चात, त्या सर्व गोष्टींना पुन्हा एक निराळाच ऊत येऊ लागला होता. मुकादमांकरवीच मालाचं ' ब्लॅक मार्केट ' इतकं जोरात व राजरोस सुरू झालं होतं, की काही लोक सरळ सरळ डोळे मिचकावून मलाच त्यातलं विचारू लागले होते. त्या वेळी मला अगदी संताप येई. नशीब, मी वेळीच स्वतःचा व्यवहार आनाच्या कारकिर्दीतच आपला निराळा करून टाकला होता.

दीड महिन्यापूर्वी मात्र या गोष्टींचा कळस झाला. लक्ष्मीवहिनीच्या ' ओनरशिप ब्लॉक ' स्कीमसाठी मागणी-अर्ज तर खूप येत. त्यांत नंबर लागत होते नि कित्येकांना तर जागेची फारच तत्काळ नडनिकड असे. त्यावरूनच एक कल्पना सुचून, लक्ष्मीवहिनीने ' क्लेम मनी ' म्हणून एक छुपी कल्पना काढली नि तिच्या गिऱ्हाइकांकडून खाजगी

पाचशेचा भरणा मागायला सुरुवात केली. मागणी वाढत गेल्यामुळे हीच रक्कम अखेर हजारापर्यंत वाढली. चौथ्या स्कीमच्या बंगल्यावेळी तर तिने प्रत्येक ब्लॉकसाठी दीड हजाराची जादा मागणी करायला सुरुवात केली. त्या आंधळ्या लोभातून अखेर व्हायचं तेच घडलं नि तो प्रसंग निर्माण झाला.
एका डॉक्टरला मॅटर्निटी हॉस्पिटल काढायचं होतं. त्याचे मध्यस्थ, तयार होत असलेला तो सगळाच नवा बंगला मागत होते. छापील योजनेप्रमाणे बाकी सर्व देवाण-घेवाण, फॉर्म-कागदपत्रं करायला लावून, अखेर चार ब्लॉकांसाठी चार दिडे सहा हजार रुपये जादा लक्ष्मीवहिनीने दलालामार्फत मागितले.
मध्यस्थ लक्ष्मीवहिनी-श्रीधरांच्या अगदी नेहमीच्या परिचय-बैठकीमधलाच एक तरुण व्यापारी होता. त्याने सारे पैसे घरी आणून देण्याचं कबूल केलं. त्याप्रमाणे तो आला. चहा-फराळ झाला. त्याने पैसे मोजून लक्ष्मीवहिनींकडे दिले. तिने ते कपाटात टाकले व ती पुन्हा त्याच्याशी गप्पा मारायला खुर्चीवर जाऊन बसली.
पण त्या वेळी पोलिस इन्स्पेक्टरने दरवाजा ठोठावला. पार्टीने घराला गराडा घातला होता. भयंकर धावाधाव झाली. झडत्या झाल्या. पंचनामे झाले.

*

एकाएकी मला श्रीधरचं बोलावणं आलं. मी तर पार स्तंभितच झालो. पण सायकलवरून तसाच तिकडे गेलो. वहिनीला, श्रीधरला जामीन राहिलो. मला त्या वेळी मनात खूप खूप लाज वाटली. मेल्याहून मेलं झालं. संताप संताप झाला. पण काही न बोलताच मी घरी परत फिरलो.
जणू जिवावर उदार होऊनच मग मी सर्वांना नाक मुठीत धरून भेटलो; शक्य ती जिरवाजिरवी करण्याचा आपल्यापरी खूप प्रयत्न करून पाहिला. त्या प्रकरणाचा गावात तर खूपच गवगवा झाला. विरुद्ध बाजू तर वज्रासारखी ठाम होती. त्यांना सारं धसासच लावायचं होतं. तेव्हा ती केस चालली. दोन दिवस वर्तमानपत्रं भरली, वकिलांसाठी दोन-अडीच हजारांची चटणी उडाली. पण अखेर निकाल लागायचा तोच लागला. लक्ष्मीवहिनी-श्रीधरला कोर्ट उठेपर्यंत साधी कैद व दोन दोन हजार रुपये दंड ठोठावला गेला. जप्त झालेली रक्कम डॉक्टरला परत मिळाली.
त्या दिवशी त्या दोघांबरोबर मी काय बोलणार होतो ! तसाच घरी गेलो. जेवणावरची देखील माझी वासना उडाली होती. मला नकळत मी चिडखोर झालो होतो. घरात हिलाच रागारागाने खूप बोललो.
पण खरं म्हणजे मला काही केल्या स्वतःचंच नाक कापल्यासारखं वाटायचं थांबत नव्हतं. वाटत होतं, " लक्ष्मीवहिनीने आंधळ्या लोभिष्टपणाने, कुचकामी पैशासाठी आमच्या आबा-आनांचं इतक्या वर्षांच्या चोख व्यवहाराचं नाव घालवलं. आमच्या कुळाला कलंक फासला. माझ्यावरही सुक्याबरोबर ओलं म्हणतात तसे शिंतोडे

उडण्याचा प्रसंग आणला! आबांची–आमची हयात–अब्रू मोफत घालवली. रावजीअण्णालाही खाली मान घालायला लावलं!"

*

असं सारं घडलं ते सदा!

आजच हे लिहून कळवायचं कारण, कालच रात्री रावजींचा माधव रस्त्याने 'श्री–घर' बंगल्यावरून मोठमोठ्याने खदखदा हसत गेला म्हणे. तो तोंडाने मोठमोठ्याने ओरडत होता, "सांगितल्याप्रमाणे ठेचलं की नाही हसता हसता नानीचं नाक? हा माधव आहे, म्हणावं! अजूनही नीट डोळे उघड. म्हणावं...नि आमच्या टिपणाप्रमाणे व्यवहार पुरा कर!"

आता उघडच दिसत आहे, की ही सारी वैभवासाठी सूडबुद्धीने केलेली लक्ष्मीच्या भावाची —माधवचीच— कारवाई होती. म्हणूनच ती चतुर बाई त्या सापळ्यात पडली! कसं का असेना, झालं ते सारं फार फार वाईट झालं एवढं खरं. असो.

तू निदान या आठवड्यात तरी आपल्या घरी राहायला येशील अशी आशाअपेक्षा बाळगतो. तुझ्या येथे येण्यानंतरच अधिकोत्तर. कळावे, आशीर्वाद.

तुझा

सदूकाका

# सहा

## नवी भाऊबीज

भाऊबीजेच्या दिवशी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमाराला ' सदानंद ' थिएटर्सच्या आवारात शंभुनंदनांच्या मोटारचं नेहमीचं परिचित हॉर्न वाजलं. तेव्हा सदानंदसकट सगळीच मंडळी गॅलरीत धावली. शंभुनंदन फ्रन्टसीटवरून खाली उतरले. हसत हसत वर पाहत त्यांनी सदानंदला हात हलवला. इतक्यात त्यांच्या शोफरने मागील दरवाजा उघडला नि कावऱ्याबावऱ्या चेहऱ्याने स्मित करीत गंगाअक्का खाली उतरली.

" अक्का आली... अक्का आली...! " म्हणत दबदबा धावत निर्मला व तिच्या मागून पद्मा–पुष्पा खाली पोचल्या. त्यांच्याच मागून सदानंद-मंगलाही लगबगीने पुढे झाली.

कठड्याला रेलून सदूकाका गॅलरीतून पाहत होते. त्यांच्या शेजारीच अतिशय वृद्ध झालेली भागीआत्या होती. ती खाली पाहत भावाला पुटपुटली, " आली ना रे गंगी ? " नि तिने डोळ्यांना पदर लावला.

एका बाजूला सदानंद, दुसऱ्या बाजूला गळयात हात घातलेली निर्मला, पुढे सदानंदच्या लुडबुडणाऱ्या चिमुरड्या, मागे मंगल, अशी आपल्या माणसांनी गराडलेली गंगाअक्का जिन्याकडे चालत येत होती व येताना भागाआत्या-सदूकाकांकडे भरल्या डोळ्यांनीच गुपचूप गुपचूप पाहत होती. डोळे अगदीच पाण्याने तुडुंबले, तेव्हा तिने हळूच ते पदराने पुसले.

*

तेवढ्यात सदानंदला एकदम वरमल्यासारखंच झालं. तो थबकला. सर्कन परत फिरला नि मोटारजवळ अजून एकटेच उभे असलेल्या शंभुनंदनांजवळ झपझप पावलं टाकून जात, त्यांना हसून आग्रही स्वरात म्हणाला, " वाः वाः! तुम्ही पण चला ना वर... दिवाळी फराळ—"

आपल्या मनात आयत्या वेळी एक सहजासहजी स्फुरलेली स्वैर कल्पना...अखेर तीच इतक्या सफाईदारपणे अगदी बिनचूक समूर्त करण्याची सारी खटपट शंभुनंदनांनी

मोठ्या आपुलकीने केली होती. इतक्या वर्षांनी प्रत्यक्ष गंगाअक्काला भाऊबीजेसाठी आपल्यासमोर केवळ छत्तीस-अठ्ठेचाळीस तासांत उमजून साक्षात उभी केली होती. पण शेवटी त्याच शंभुनंदनांना आपण आपल्या आनंदाच्या तंद्रीत क्षणभर साफच विसरून गेलो होतो, त्यांचे साधे आभारही मानले नाहीत, याची सदानंदला मनात लाजच वाटली.

तो सारा घरगुती नि प्रेमभरला देखावा प्रत्यक्ष पाहून, त्या चाणाक्ष माणसाने मात्र उलट हसत हसतच सदानंदला उत्तर दिलं, " ओह...डोन्ट वरी, सदानंद, चालू द्या आपलं तुमचं...भगिनी आल्या आहेत तुमच्या, आज भाऊबीज आहे...मला पण आता आधी मुंबईला तासाभरात गेलंच पाहिजे. "

नि मग शोफरने उघडून दिलेल्या मागल्या दरवाजाने ते आत शिरले, स्प्रिंगच्या सीटवर बसल्या बसल्या थरथरत, त्यांनी हसून सदानंदला खुणेने जवळ बोलावलं.

गुपित सांगण्याच्या कुजबुजल्या स्वरात ते त्याला म्हणाले, " हे पाहा सदानंद, फार फार आवडली, अपीलच झाली बुवा आपल्याला ही कल्पना अगदी ! याच क्लायमॅक्स सीन–सीक्वेन्सभोवती नेटवर्क करून, एक छानदार पिक्चर तयार करता येईल पुढल्या वर्षाच्या दिवाळीत रिलीज करायला...शक्क ! खरोखरच ' थीम ' तयार करा, एक स्क्रिप्ट टाका. फारच दिलखेचक होईल बघा. रोजच्या त्रिकोणी प्रेमाचं लोकांना आता फार अजीर्ण झालं आहे. हा छानच चवपालट होईल. जरूर विचार करू या आपण त्याचा. तो मात्र—खरा फराळ होईल. तोच फराळ द्या आम्हांला, सदानंद...अं ? "

असं म्हणून सदानंदकडे पाहत शंभूनंदन हळूच हसले. मोटर स्टार्ट झाली. नि हसता हसता ते पुन्हा म्हणाले, " सो ? वी मीट आफ्टर द दिवाळी, फार द न्यू ' फराळ ', अं ? अच्छा कायम्हणायचं ?— भेटेन पुन्हा ! "

मोटार भुरकन् फाटकाबाहेर पडली. ती दिसेनाशी होता होता सदानंदही स्वतःशीच हसला. शंभुनंदनांच्या त्या आपुलकीचं, आस्थेचं, रसिकतेचं, योजकतेचं त्याला मोठं कौतुकच वाटत होतं. क्षणभर त्यामुळेच मंत्रमुग्ध झाल्यासारखा होऊन तो मघा जागच्या जागी खिळून होता.

पण तेवढ्यात पुन्हा गंगाअक्का येऊन वर गेली असल्याची आठवण होताच तो लगबगीने जिना चढू लागला.

*

भागीआत्‌ कॉटवर बसली होती. तिच्या एका बाजूस निमा, दुसऱ्या बाजूला गंगाअक्का. तिघीही काही बोलत नव्हत्या. तिघींचेही डोळे पाण्याने डबडबले होते. मंगलाही त्या तिघींच्या समोर दाराला ओठंगून उभी होती. त्यांच्या संसर्गाने तिचेही डोळे ओलावले होते...

साक्षात भेटीत मानवी रसरसल्या भावनांना शब्दच फुटत नसतात, फक्त पाझरच फुटतात— ते दृश्य पाहता पाहता स्वतः सदानंदालाही सहस्र भावनांनी अगदी गदगदून

आलं होतं. तिथं नांदणाऱ्या त्या क्षणभराच्या शांततेत त्यांच्या घरगुती इतिहासाची पानंच्या पानं त्यांच्याशी बोलून जात होती.

शेवटी ती भावभरित निःशब्दता मोडण्यासाठी सदानंदच हसून म्हणाला, "शेवटी आलीस हं एकदाची तू आक्का... एखाद्या साहेबासारखी अगदी वेळेवर!"

"पुरे पुरे–" गंगाअक्का लटक्या रागाने त्याच्याकडे पाहत म्हणाली, "का रे मी येणार नाही, सदा? बहिणीला एवढी थेट दारात मोटर पाठवलीस तर?..."

"तसं नव्हे ग. तुला काय, सत्रा कामं! तुझी मुलं आता रडत नाहीत, तर मुलांची मुलं रडायला लागायची आता!" मोठमोठ्याने हसत सदानंद म्हणाला नि गात गातच पुढे गंगाअक्काला म्हणाला, "आक्का चालली पंढरपुरा... वेशीपासून आली घरा... परीसे गे सूनबाई। नको वेचूं दूध–दही। माझ्या हातचा कळवढू, नको माझ्यावाचून फोडू।... उखळ, मुसळ, जाते, माझे मन गुंतले तेथे।— भिक्षूक आल्या घरा..."

"सांग गेली भावाघरा...!" निर्मलाने त्याच सुरात हसत हसत त्याला पुष्टी जोडून ते पुरं केलं.

"पुरे, पुरे!" निमाच्या गालावर चापट मारून हसत गंगाअक्का सदानंदला म्हणाली, "बरं का तुकारामबुवा!— पत्र पाठवलं होतंस, त्यातही हेच लिहिलेलं होतंस की! बाकी थोडंसं खरंच आहे ते म्हणा... गेली तीन वर्षे येईन येईन म्हणतेय रोज मी तुझ्याकडे... हा पल्ला लांब पडतो ना, जमतच नाही..."

"तेच, तेच ना!— तुकारामबुवांनी म्हटलं ते काय उगीचच?" सदानंद हसला. "फारच चावट होते ग ते... आमच्या अक्काची त्याच वेळी कल्पना करून त्यांनी तो अभंग रचला. अक्काचे वालीच की तुकारामबुवा!"

सगळी मनापासून हसली.

"खरंच, पण मग काय तारांबळ झाली माझी म्हणतेस, आत्या?" गंगाअक्का ते आठवून आत्याकडे वळत सांगू लागली, "काल आपले दुपारीच दत्त म्हणून उभे राहिले येऊन याचे ते डायरेक्टर!... बरं का सदा, 'अगदी एका तासात निघायचं,' म्हणाले. प्रथम मला वाटलं, कोणी तरी पत्ता चुकून आलं असेल आपल्याकडे. पण भय्याच्या हातचं पत्रच प्रत्यक्ष पाहिलं, वाचलं, निमा, तेव्हा खात्री झाली मनाची एकदाची. मग मात्र कोणाच्या कसल्याच सबबी ऐकल्या नाहीत. म्हटलं, 'निघायचं म्हणजे निघायचं!' आतूला नि काकांना केव्हा एकदा डोळ्यांनी पाहीनसं झालं होतं मला.'

"आता तुला लहानपणीसारखं चॉकलेट देणार आहेत सदूकाका! हो ना हो?" सदानंद हसत म्हणाला.

"पण वरली चांदी मला द्यायला विसरायचं नाही हं अक्का?...नाहीतर रडेन बघ मी!...आत्याला नाव सांगेन बघ!" निर्मला अक्काच्या गळ्यात हात टाकून म्हणाली.

सारीच एकदम हसली.

*

" यशोदा गेल्यावर ही सगळीच जाऊन राहायची ना तुझ्याकडे, सदूभाऊ ? ते आठ-वतंय हो त्या पोरांना आज." हळूच हसत, थरथरत्या भावनेने सदूकाकांकडे पाहत भागीआत्या म्हणाली.

" हं, खरं आहे. चाललंय..." एक निःश्वास टाकून सदूकाका सर्वांकडे पाहत, गदगद् स्वरात म्हणाले, " पण मग मला वाटतं, कित्येक वर्षांनी — म्हणजे जवळजवळ वीस वर्षांनी — आज अशी एकत्र जमता-भेटताहो सगळी, नाही ग गंगा ? तुमच्यातली यमुना तेवढी नाहीय आज...हं..."

तिच्या लहानपणच्या आठवणीने सारीच क्षणकाळ गप्प राहिली.

" पण तसं म्हणाल, काका, तर या जागेत तरी आम्ही सगळी एकत्र जमतो आहो आज माझ्या लग्नानंतरच." गंगाआक्का आठवत म्हणाली, " कधीमधी दोनतीनदा मी माहेरी आनांकडे आले, पण ती तिकडे ' श्रीधर ' बंगल्यामधे. त्या वेळी मुद्दाम येणार तरी कोण होतं आपल्या या वाडीत ?"

" पलीकडलं आपलं ते जुनं घर पाहिलं नाहीस अक्का तू अजून. ते सगळं आता सदाभय्याच्या छापखान्यानेच व्यापलंय पुरतं." निर्मलने माहिती पुरवली.

" खरंच !" जागचं उठून उत्सुकतेने गॅलरीकडे जात, तिथून गंगाअक्काने आपली भिरभिरी दृष्टी चौफेर फिरवली नि भावविवशतेने म्हणाली, " काय सगळी बदलून गेलीय रे ही आपली वाडी ! एकटीच चौकशी करीत आले असते, तर ओळखलं पण नसतं मी ठिकाण हे."

" तुलाही कुणी ओळखलं नसतं इथं, गंगाक्का ! सिनेमासाठीच आलीय कसं समजून कोणी तरी खालच्या खालीच सांगितलं असतं, ' बाई आज जा घरी परत — हाऊसफुल्ल आहे–' " निर्मलने नाटकी हावभाव करून म्हटलं.

सारीचं खो खो हसू लागली.

*

क्षणभराने सारं पाहून गॅलरीतून आत शिरत गंगाअक्का सदानंदकडे कौतुकाने पाहत म्हणाली, " बन्या रे काढतोस एकेक कल्पना, सदा !"

" अग...नुसत्या कल्पना काय चुलीत घालायच्या असतात, अक्का !" सदानंद स्मित करीत म्हणाला, " पण कधी नव्हत्या ग काढल्या आम्ही बऱ्या कल्पना ! तरी देखील, अगदी चार वर्षांपूर्वी काय चाललं होतं माझं ? त्या मंगललाच विचार. त्या वेळची तिची बापडीची एकूण कुतरओढ. एका अकिंचन कल्पनाबहाद्दूराशी लग्न करण्याचा अतिशहाणपणा केला होतान ना तिने ? अग अक्का, त्या सदूकाकांनाच विचार — नानी तर चार रुपये वाराने विकून देत होत्या मला ही आपली सारी जागा, हं... चाललंय. आजही आपण इथंच आहोत नि हे सारं पाहतो आहोत ! योगायोग हे सारे...दुसरं काय ! शंभुनंदन चुकून भेटले, दारात चालूनच आले, मला बघले...

आता मात्र मी मोठा कर्तृत्ववान झालोय—"

"कोण रे? मघाचा मोटरवाला ना?" गंगाअक्का चमकून आठवत म्हणाली, "मोठा आदबशीर, आस्थेवाईक, सभ्य माणूस आहे हो तो. पुण्यापर्यंत त्याची बायकोही होती की आमच्याबरोबर. ती भाऊबीजेसाठी भावाकडे पुण्याला राहिली, तिथेच मुक्काम होता आमचा काल. तुझा डायरेक्टर जाणार होता वहिणीकडे मुंबईला...मी उतरले माझ्या भावाकडे...वाटभर स्तुती करीत होती तुझी ती दोघंही. मराठी छान बोलतात रे ती दोघंही."

"अक्का...बोलू नको अधिक–मला भीती वाटते—" सदानंद हसून म्हणाला, "अग या सगळ्या गोष्टी अशा काही झपाट्याने नि चमत्कारिक योगायोगाने चांगल्या घडून आल्या आहेत, की फट् म्हणता एकदम ब्रह्महत्याही होईल. तुझी दृष्ट लागायची एखाद-वेळ आपली मला!"

"चल रे...चावट! काहीतरीच काय?" गंगाअक्का हसत पण थोड्या रागात म्हणाली, "मांजरीचे दात काही तिच्या पोरांना खुपत नाहीत हो... तुझं आता यापुढे असंच छान चालणार आहे बघ सदानंद!"

*

तोपर्यंत माजघरात रांगोळी घालून मंगलने तीन पाट सजवले होते. एक सदानंदला, एक सदूकाकांना नि एक चार महिन्यांच्या अनंतला.

बोलता बोलता सगळी तिकडे गेली.

पद्मा–पुष्पा नवे कपडे करून इकडून तिकडे ठुमकत–बागडत होत्या.

सदानंद तो समोरचा देखावा पाहून गंगाअक्काला नि साऱ्यांनाच उद्देशून, अतिशय भावपूर्ण गद्गद् शब्दांत म्हणाला, "मला आज खरंच...अगदी आनंद, खूपच आनंद वाटतोय, अक्का...कुठून नि कसं...पण आपण सगळे पुन्हा एकत्र भेटलो..."

मग सदूकाका बसले. त्याच्या शेजारी अनंताचा पाट, पण तो कसा बसणार?

ती अडचण दिसताच, गंगाअक्काने एकदम अधिकारवाणीने म्हटलं, "चल ग, तू बस इथं मंगल सदानंदच्या शेजारी अनंताला घेऊन. बघू द्या तरी आम्हांला जोडा एकत्र जवळ जवळ बसल्यावर कसा दिसतो तो! लग्नात नाही नीट जमलं."

अगदी नव्या सासुरवाशिणीसारखी लाजत लाजतच मंगल तिथे जाऊन बसली. तिच्या मांडीवर नटवलेला, काजळ गालाला फरफटलेला अनंत तिने उभा बसवून घेतला होता.

भागीआत्या, गंगाअक्का, निर्मल, पद्मा–पुष्पा, साऱ्या भावांच्या वहिणी समोर उभ्या होत्या.

तीन वातींची समई तेवत होती. निरांजन लुकलुकत होते. क्षणभर सारं सारं शांत होतं.

भागीआत्याचे डोळे पाण्याने तुडुंब भरले होते.

गंगाअक्काचा गळा दाटून आला होता. पद्मा–पुष्पांकडे पाहत निर्मल गप्प गप्प उभी होती.

*

तेवढ्यात गंगाअक्का गद्‌गद् स्वरात म्हणाली, " हे पाहा, आज कोणाच्या ओवाळणीत पैसे मुळीच टाकायचे नाहीत, बरं का रे सदाभय्या ? "

" तुला आठवतेय तर ती मागली भाऊबीज, पोरी ? " डोळे पुसत भागीआत्या एकदम म्हणाली.

" का नाही ग आठवणार ते, आतू ? " गंगाअक्काही पाणावलेल्या डोळ्यांनी म्हणाली, " अग हे पुरुषच सगळं पटकन विसरतात. आपल्या सगळं सगळं इत्थंभूत राहतं हो लक्षात, अखेरपर्यंत. "

त्यांच्या त्या संवादाने सदानंदजवळ अनंतास घेऊन बसलेल्या मंगलेचे डोळे ओले झाले होते. तिने हळूच एकदा सदानंदकडे वळून पाहिलं. तो तिच्याकडे पाहत होता.

तेवढ्यात गंगाअक्का म्हणाली, " या पोरींना आणखी आता एव्हापासून पैशाच्या मोहाचं नि अपेक्षेचं शिक्षण नको मिळायला...खरं ना ग आत्या ? "

" खरं ग खरं, पोरी. " भागीआत्याही हसून मान डोलवीत म्हणाली.

साऱ्या पुरुषांच्या कपाळाला कुंकुमतिलक–अक्षता लागल्या होत्या. ताम्हनातील निरांजनाजवळ लाडू-करंज्याच पडल्या होत्या.

ओवाळणी होताच मंगल पाटावरून उठली होती. सदूकाका–सदानंद जेवू , फराळ करू लागले होते.

मंगलने आणखी चार पाट जवळच दोन्ही बाजूंस ठेवल्यावर सदानंद म्हणाला, " आतू , तू इथं माझ्यापाशी बस आज फराळाला. "

सदूकाकांच्या बाजूला गंगाअक्का, निर्मल, नि आत्याच्या बाजूला पद्मा-पुष्पा अशा साऱ्या जणी बसल्यावर मंगलेने वाढून ठेवलेली पानं त्यांच्यापुढे आणून ठेवली. सगळी जेवू लागली. मंगल येऊन येऊन हवं-नको ते वाढत होती.

जवळच चटईवर खेळत पडलेल्या अनंताकडे पाहत, अधूनमधून त्याचं कौतुक करीत नि स्वतःच्याच मनात डोकावून चूर राहून थोडा वेळ सारी खात होती.

*

तेवढ्यात जेवता जेवता भागीआत्या आपल्या दंतविहीन तोंडातून हळूच फुसफुस करून एकदम हसली.

सगळीच तिच्याकडे वळून पाहू लागली.

तोच आत्या म्हणाली, " अरे, आमची आई ना...मला लहानपणी रागारागाने

एकदा म्हणाली होती, ही मेली पांढऱ्या पायाची आहे! मी तर अशी काळीढूस, मी पांढऱ्या पायाची कशी असणार ?...खरं म्हणजे मी पांढऱ्या कपाळाची मात्र होते! या तुमच्याच खोतांच्या घरात जन्मले, तुमच्या घरात वाढले, तुमच्या घरात आता लौकरच मरणार आहे मी !—पण कोणाची ताकद आहे का आता पुन्हा मला पांढऱ्या पायाची म्हणायची ? काय बिशाद आहे ? बघा...बघा...हे माझं हो...माझं वैभव बघा! हा माझा भाऊ, हा माझा भाचा, त्या माझ्या भाच्या, त्या माझ्या नाती...तो माझा नातू... हे माझंच वैभव ना ? हो, माझंच! ते वाढतंय! हे...हेच...इतकी वर्षं मला हवं होतं हो!...तुमच्या आईला...यशोदेला...माझ्या जीवाभावाच्या मैत्रीण वहिनीला, पोरींनो, हेच वैभव हवं होतं बरं!...हेच...असलंच वैभव हवं हवं म्हणत ती मेली बिचारी."

सदूकाकांचे, सदानंदचे डोळे भरून आले होते. गंगाअक्काला एकदम हुंदका आला. मंगल, निर्मल हळूच पदर पुसत होत्या.

इतक्यात भागीआत्या हसण्याचा प्रयत्न करीत, पुन्हा आपले मंद डोळे सर्वांकडे फिरवत म्हणाली, "ऐक! कष्ट करून नको घेऊस जिवाला, गंगे!...हा माझ्या तुमच्या आयुष्यातला आनंदाचा क्षण आहे. मोठ्या आनंदाने सांगतेय मी हे सगळं तुम्हांला. आज मला जीवनातलं माझं सगळं सगळं सुख, वैभव मिळालं! मी माझी पावती! आता केव्हाही सुखानेच डोळे मिटेन मी!"

## निर्मल संसार

जमलेल्या सर्वांची ती संध्याकाळ-रात्र मोठ्या आनंदाने वाडीभर फिरण्यात, थिएटर पाहण्यात, छापखाना पाहण्यात, साचलेल्या सगळ्या गप्पागोष्टी करण्यात गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळीच निर्मला आपल्या घरी जायला निघाली. गंगाअक्काने तिला राहायचा आग्रह केला, पण निर्मलचं 'पार्टी'चं महत्त्वाचं काम होतं. प्रभाकर एका सभेत तिची वाट पाहणार होता.

अखेर, गंगाअक्काने मंगलेसह निर्मलेकडे जाऊन राहायचं, रात्री-दुपारी तिच्या घरी गप्पा मारायच्या, व मग तिघींनी परत सदानंदकडे परतायचं, असा सदानंदने बेत ठरवला.

तेव्हा पद्मा-पुष्पांसह भागीआत्या 'सदा-शिव'मधे काकांबरोबर गेली नि अनंताला घेऊन मंगल, अक्का-निर्मलांबरोबर मुंबईस निर्मलेकडे जायला गेली.

आपल्या सदानंदचे ते सारे नवे व्याप, ते नवं वैभव पाहून गंगाक्का फारच समाधान पावली होती. पण ते सारं घडून आलं कसं, हे काही तिला अजून नीट समजून आलं नव्हतं.

*

आपल्या घरी पोचल्यावर निर्मलेने अक्का व मंगल दोघींना अगदी निःसंकोच आपुलकीने आपली गॅसची चूल दाखवली. आपण आंघोळ करून बाहेर जाण्याचा पोषाख भरभर अंगावर चढवला नि आपल्या बहिणीला, वहिनीला ती म्हणाली, "वेळ मिळेल त्याप्रमाणे जेवीन कुठं तरी मी बाहेरच. संध्याकाळी आपण फिरायला जाऊ. रात्री मी घरी जेवण करीन...प्रभाकरही असतोच...जाते हं मी ! रागावू नका—"

निर्मलचा तो निराळाच अपरिचित संसारी जमाना पाहून गंकाअक्काला मनात थोडं चुकल्यामुकल्यासारखंच वाटत होतं. निर्मल काही वाईट करते आहे, तिचं चुकलं आहे, असं गंगाक्काला म्हणायचं नव्हतं. पण स्वतः तिचं सारं आयुष्य ज्या प्रकारे गेलं होतं, जात होतं, त्याहून हे निर्मलचं काही तरी निराळं आहे, असं मात्र तिला वाटल्यावाचून राहिलं नाही. त्यामुळेच ती मनात काही वेळ काहीशी अस्वस्थ, बैचेन झाली.

बाहेर पडता पडता हातरुमालासाठी निर्मलेने आपलं गोदरेज कपाट उघडलं... तेवढ्यात एक कप्पा उघडत ती म्हणाली, "हो, बरी आठवण झाली गंगाक्का—" त्या खणातली तीन पाकिटं बाहेर काढून ती अक्काच्या हाती देत ती म्हणाली, "अग, गेल्या वर्षी आनांच्या श्राद्धदिनापूर्वी सदाभय्याने मला पाठविलेली पत्रं आहेत ही. बघ, वे. तुला पडल्या पडल्या वाचायला होतील ती दुपारी. गाडीत विचारीत होतीस ना मघा मला ? त्याचं उत्तर सदाभय्यानेच स्वतः सांगितलंय यांत सारं. पण चला बाई आता. आता मात्र खूपच उशीर झालाय हो मला. अशीच बोलत राहिले तुझ्याशी तर फास्ट गाडी चुकायची...नि पुढल्या साऱ्या अपॉइंटमेंट्स ओमफस् व्हायच्या...अच्छा ! जाते. संध्याकाळी भेटू सहा वाजता—"

## बुद्धिबळाचे डाव

प्रिय निमाताई—

गिरगावातल्या तुझ्या-माझ्या ओझरत्या भेटीत पंधरवड्यापूर्वी मी केलेलं माझं भाकीत अखेर कल्पनातीत खरं ठरलं आहे. सौदा ठरला आहे नि तो कल्पनेबाहेर यशस्वी झाल आहे.

आपल्या जुन्या घरामागल्या सात हजार वारांच्या प्लॉटचे एकवीस हजार रुपये देऊ करणाऱ्या एका श्री. ढेकण्याबद्दल त्या वेळी तुला मी म्हणालो होतो. जवळ जवळ तीन आठवड्यांनी, चारपाच दिवसांपूर्वी, तो आपणहूनच संध्याकाळचा मला येऊन भेटला. प्रथम चार इकडल्यातिकडल्या गप्पा मारून अखेर तो मला या वेळी म्हणाला, "अगदी आनंददायक बातमी घेऊन आलोय आज मी. दोन्ही रस्त्यांना भिडणाऱ्या तुमच्या सलग जागेचा विस्तार लक्षात घेऊन, फेरविचारांती आमची कंपनी तुम्हांला

आता एकरकमी सरसकट पंचवीस हजार द्यायला तयार आहे. मात्र ही केवळ तुमच्याच फायद्याची आमची अखेरची ऑफर समजा."

ढेकण्याच्या त्या चिकाटीची नि त्याच्या बोलण्याच्या कौशल्याची मला मोठी गंमतच वाटली. गेल्या दोन खेपांत त्याने जवळ जवळ सातआठ हजार चढवत आणले होते. प्रत्येक वेळी त्याची ती शेवटची ऑफर होती. शब्दबंबाळ थापाथापी नि हवं तेव्हा सोनेरी नि हवं तेव्हा काळंकुट्ट कल्पनाचित्र काढणं यात त्याचा अगदी हातखंडा होता. त्याच्याबरोबर अव्यवहारी मी, वाद तो काय घालणार? त्याला कसला पुरे पडणार? मी त्याच्याबरोबर, नको इतक्या विनयाने-प्रेमाने येथवर बोललो असल्यामुळे, तो तरी ते गृहीतच धरून चालला असावा. त्याचाच परिणाम म्हणजे त्याने आणलेली ती पंचवीस हजारांची नवी 'फायनल ऑफर'! हे मी मनात तत्काळ समजलो.

माझ्या राहत्या घरातल्या वस्तूंचा तो फापटपसारा, साधीसुधी राहणी,... त्या साऱ्यामुळेच, या मूळच्या किंमतीतल्या सातआठ हजारांच्या उडीने हा भटमामा आता पुरा गटलाच असं तो मनात समजत असला तर त्यात त्याचा दोष नव्हता. कसलं आश्चर्यही नव्हतं.

*

पण मग, बिघडलेल्या रेकॉर्डप्रमाणे आजही त्याने त्याच त्याच युक्तिवादाचं फिरून चर्वितचर्वण सुरू केलं, तेव्हा मात्र अखेर मला संताप आला. तरी न रागावताच, थोड्या संथपणेच मी त्याला म्हणालो, "मिस्टर ढेकणे, तुमची ही चिकाटी मोठी कौतुकास्पद आहे. 'अल्ट्रा मॉडर्न कॉलनी डेव्हलपमेन्ट्स' हीच ना तुमची लिमिटेड कंपनी? तुमची कल्पनेची, व्यवहाराची धाव फार मर्यादित, लिमिटेड दिसते ... पण मग साहजिकच आहे ते! पुन्हा पुन्हा किंमतीचा इतका रंग बदलणाऱ्या सरड्याची धाव फक्त आमच्या वईपर्यंतच जायची...तुमच्या कंपनीला आमच्या कंपाउंडात प्रवेश नाही मिळायचा!...माफ करा हं!...विषय बदला नि दुसरं काही बोला."

त्या माझ्या उद्गारांनी मात्र तो चपापला–दचकला. त्याची कल्पना होती, की त्याने केलेल्या नव्या किंमतीने मी एकदम दिपून जाऊन क्षणार्धात, जणू नाचत नाचतच, हो म्हणणार! पण प्रत्यक्ष अनुभव निराळाच आलेला, काहीसा हेटाळणीचाच दिसताच तो गडबडला होता.

साश्चर्य माझ्याकडे पाहून तो म्हणाला, "म्हणजे!!"

मी पण आजच्या माझ्या नव्या पवित्र्याची चिकाटी सोडली नाही. अगदी बेफिकीरपणेच हसत हसत त्याला म्हणालो, "अहो...भरजरी शालू फाडून त्याची गोधडी शिवण्याची कल्पना करणाऱ्या तुमच्या त्या अल्ट्रा मॉडर्न योजकतेची मला तर आता कीवच करावीशी वाटू लागलीय! तशी कोणती एखादी निर्बुद्ध कंपनी असेलसंही मला आता वाटेनासं झालंय...पण मग तशी ती असलीच, तर तुमच्या डायरेक्टरांना माझा निरोप जाऊन सांगा जरा. म्हणावं, दरम्यानच्या या पंधरवड्यात आमच्या या जागेबद्दलचा व्यवहारही

पुरा होत आलाय. एक प्रशस्त योजनाही ठरत आलीय. तेव्हा तुम्ही हा नाद सोडून दुसरीकडे कुठे तरी अल्ट्रा मॉडर्न कॉलनी डेव्हलप करा. या सदानंदला तुमच्या या फायनल ऑफरमध्ये काही एक इन्टरेस्ट नाही, मिस्टर ढेकणे. थँक्स फॉर द ऑफर !... येऊ निरोप ? ”

*

माझ्या तसल्या निरोपाने नि मी बोलता बोलता उठल्यामुळे या वेळी मात्र तो फार दचकला. तो घाईघाईनेच मला आग्रही स्वरात म्हणाला, “ वाः वाः... म्हणजे काय !... अहो थांबा सदानंदराव...नीट सांगाल तर खरं !...काय म्हणता काय ? व्यवहार पुरा होत आला ? कुणाबरोबर ? ? कधी ? नि ही योजना म्हणताहा ती कसली ! नीट काही थांगपत्ता तर लागू द्याल की नाही !...आमच्या बरोबर असं वागताय याचं आश्चर्यच वाटतंय मला बुवा... ”

तरी संथपणे हसत हसत, मी उभ्या उभ्याच त्याला पुढे म्हणालो, “ अहो, पण खरं आश्चर्य आहे ते पुढंच. ”

“ म्हणजे !... जरा बसा नि नीट सांगा मला— ” तो अजीजीने म्हणाला.

खाली बसून, पण माझा तो अभिनिवेश तसाच चालू ठेवून मी म्हणालो, “ पण तुम्हांला ते सांगण्यात हशील काय !... या रेंगाळणाऱ्या भाजीखरेदीचा मला बुवा कंटाळा आलाय... आता मला असले मधले अलबते-गलबते दलालच नको आहेत मुळी. एक घाव— दोन तुकडे. तुमचे कोण ते मुख्य सूत्रधार येऊ द्यात पुढे; त्यांनाच हवं असेल तर सांगेन सर्व !... बरं, मिस्टर ढेकणे ! ”

“ पण तुमच्या अपेक्षा नि कल्पना तर मला सांगाल थोडक्यात ! मी आमच्या डायरेक्टर साहेबांना सांगतो की सगळं; तेही नीट विचार करतील. अशी काय अगदी डोक्यात राख घालता हो !... लोक तेवढे व्यवहार करतात; नि मग आम्ही इतकं महिनाभर बोलतो आहो ते काय !... आमच्याकडून तुम्ही काय चिंचोके तर नाही ना घेणार ! ”

“ अस्सं ! ठीक तर, हे पाहा मिस्टर ढेकणे, ” माझा बेफिकिरीचा आव कायम ठेवून मी संथपणे त्याला म्हणालो, “ तुम्ही आतापर्यंत भातुकलीसारखं जेवणावळीबद्दल बोलताहा... जरा व्यवहार बोला, व्यवहार करा... माझ्या या जागेत एक मोठं थिएटर होतंय, त्या पार्टीचं, वाराला सोळा रुपये भावाचं बोलणं मी ऐकून घेतलंय. त्यात मला तसा व्यवहार दिसतोय; पण मी त्यांना उलट सुचवलं आहे. हिशेबात भाव हवा तर वाराला एक रुपया कमी धरा. होणारी रक्कम मला निम्मीच रोख द्या. उरलेली निम्मी मी जागेत होणाऱ्या भावी धंद्यात अडकवतो. लिमिटेड कंपनी उभारायची. थिएटर फायनान्सरने कंपनीचा मॅनेजिंग डायरेक्टर व्हावं. माझ्याकडे फक्त थिएटरची मॅनेजमेन्ट तेवढी द्यायची. कॉन्ट्रॅक्टचा धंदा आमचा घरचाच चालू असल्यामुळे थिएटर बांधणीचं

काम आमच्याकडेच आलं पाहिजे. बांधकामाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या व्हावचर्सवर साडेबारा टक्के मेहनताना फक्त आम्ही आकारायचा. समजली कल्पना ? तेव्हा, या दृष्टीनेच पुढले प्लान्स वगैरे नि बोलणं आमचं सध्या चालू आहे. त्याच कामात मी सध्या गुंतलेला आहे. गडबडीत आता तुम्ही असे येऊन मला सांगताय एकवीसचे पंचवीस हजार फायनल ऑफर म्हणून केले आहेत म्हणून !... यावर तुम्ही तरी माझ्या ठिकाणी असता तर काय बोलला असता दुसरं, सांगा ? त्याचं असं आहे ढेकणेसाहेब, अजून तरी मी भाजीपाल्याचा धंदा काढलेला नाही. "

" पण मग... " माझ्या त्या अफाट सरबत्तीने पार पार दडपलं जाऊन, ढेकण्याने आता साफ नांगी टाकली नि गडबडून–चाचरून तो म्हणाला, " थिएटरबद्दल म्हणत असाल तर... "

" हे बघा मिस्टर ढेकणे, " मी त्याला मधेच दबकवून म्हणालो, " आता आणखी कसला नवा शुष्क वादविवाद घालीत बसण्याची माझी तयारी नाही. या आता. तुम्हांला मी सांगितलेल्या योजनापद्धतीवरच मला व्यवहार करायचा आहे. त्यात कोणत्या अधिक फायदेशीर टर्म्स देणं तुमच्या अल्ट्रा मॉडर्न कंपनीला किंवा तुमच्या त्या कोणत्या सूत्रधारांना जर व्यावहारिक वाटत असेल, तर येत्या चार-पाच दिवसांत त्यांनी अजूनही मला भेटावं. पण तसं नसलं तर, माफ करा. हजार दोन हजार आणखी वाढवून असली फायनल ऑफर द्यायला कृपा करून येण्याची तसदी घेऊ नका तुम्ही, ढेकणेसाहेब. बरं... येऊ आता रजा ? "

*

वास्तविक मी बोलत होतो त्यातलं प्रत्यक्षात खरं काही एक नव्हतं, निमा. पण ढेकणे महाशयांच्या आजपर्यंतच्या चारपाच भेटींतला नूरझोक एकूण पाहून, मी त्यांच्या जिव्हारीच तो अखेरचा बाण नेम धरून सोडला होता. गेल्या दोन खेपांतल्या बोलण्यावरून नि रकमांच्या चढउतारावरून माझी तरी खात्रीच झाली होती, की माझ्याशी दर खेपेला बोलतो तो ढेकणे स्वतः खास नव्हे— त्याचा बोलविता धनी कोणीतरी निराळाच, बडा धोरणी माणूस असावा.

म्हणूनच तर तो एक मोठा झोका मी पत्करला होता.

" असं करा सदानंदराव, फक्त दोनच दिवस थांबा— " विचलित अंतःकरणाने, चुळबुळ करीत, जागचं उठून ढेकणे मला म्हणाला, " आमच्या डायरेक्टर साहेबांना गाठून सारं कळवतो मी तुमचं हे. "

" ठीक तर. दरम्यान मी सांगितलेला तो दुसरा व्यवहार ठरला नाही, प्रत्यक्षात त्यांचा कोणी झटपट आला नाही, तर मीही जरूर थांबेन. " मी हसून संथपणे म्हणालो, " येऊ आता निरोप !... मात्र एक लक्षात घ्या हं. आता यापुढे या बाबतीत मध्यस्थ कोणीएक नको आहे. प्रत्यक्ष पैसे गुंतविणाऱ्या त्या व्यक्तीशीच मी यापुढलं काय ते

बोलणं अखेरचं म्हणून हवं तर हवं ते करीन... तुमचा–आमचा बोलण्याचा विषय आज आता इथंच संपला आहे."

ढेकणे विस्मित चेहऱ्याने माझ्याकडे पाहत निघून गेला. तो दिसेनासा झाला तेव्हा माझं मलाच माझ्या एकूण नाटकाचं हसू येत होतं.

शून्यातून सहस्रापर्यंत चढत गेलेलं ते नाटक तर ठीक झालं होतं. पण त्यात मला खरा राम मुळीच वाटत नव्हता. आणि खरं म्हणजे, आपल्या जागेबद्दल मला झटपट असं काहीच ठरवायचं नव्हतं. वाटत होतं, "काय अडलंय ? चाललंय तसंच चालेल रडूपडू आणखी थोडा काळ..."

तरी उलट, पुनःपुन्हा माझ्याकडे येऊन ढेकणे ती सारखी जिकीर करीत होता. म्हणूनच केवळ त्याला बंद करायला मी ते सारं सारं बोललो होतो. त्यात व्यवहार होता, पण तो कल्पनेच्या वाफेनेच खूप फुगवलेला फुगा होता; तात्पुरता तो फुटला असता तर मला आश्चर्यही नव्हतं नि वाईट वाटण्यासारखीही काही नव्हतं.

*

पण उलट आश्चर्य असं, निमा, की परवा सकाळीच उजाडायच्या सुमारास ढेकणे महाशय पुन्हा माझ्या दाराशी अवतीर्ण झाले. त्यांनी येताक्षणीच मला म्हटलं, "चला सदानंदराव, कपडे घाला. आमचे डायरेक्टर साहेब तुम्हाला आठ–आडेआठला मुंबईला त्यांच्या ऑफिसमध्ये भेटू इच्छितात. म्हणत असाल तर आताच फोन करू या जवळपासनं; मोटर पाठवतील ते आपल्याला न्यायला."

"आज तरी माझ्याकडे एखादी मोटर नाही, मिस्टर ढेकणे, पण मी माझ्या आयुष्यात मोटारी भरपूर पाहिल्या आहेत; वडलांच्या मोटारीत बसलोही आहे." प्रथम थोडा रागाचा आव आणून, मी त्यांना अखेर थंड आवाजातच म्हणालो, "तितकी हौसही नाही मला आज मोटारीत बसायची, मिस्टर ढेकणे. नि आता तर मला कुठं यायला वेळच नाही या क्षणी. तासाभराने एकदोघे इथं येणार आहेत; त्यांची वाट पाहिली पाहिजे. तुम्हांला नक्की सांगायला या चारदोन दिवसांतला तरी वेळ मला ठरवता येणार नाही. तरीपण... प्लान वगैरे करीत मीही बहुतेक इथं घरीच आहे. केव्हाही घरीच असेन मी, एवढं नक्की."

माझ्या त्या वरवर उद्धट दिसणाऱ्या उत्तराने तर ढेकणे फारच चमकले. तरी पण सामोपचार-समजावणीच्या स्वरात स्वारी अखेर मला म्हणाली, "हे काय चालवलंय काय तुम्ही, सदानंदराव ? तुम्हांला तुमच्या जागेचा सौदा करायचा आहे की नाही ? मग ? तुम्ही आमच्या साहेबांकडे जायला नको ?... हे काय बोलणं ?"

"पण माझी जागा खरेदी करून धंदा करायचा आहे ना तुमच्या साहेबांना देखील ?" मी तितक्याच संथपणे त्यांना प्रतिप्रश्न केला, "तर मग तुमच्या साहेबांनीही माझ्याकडे नको यायला ?... त्यांना सौदा करायचा आहे की नाही ?... काय मीच एकटा गरजू,

आहे आहे असं समजू नका, मिस्टर ढेकणे. धावत-पळत तिकडे येऊन सौदा करण्याची तरी मला अजून गरज नाही..."

"बरं बरं." थोड्या घुश्शातच पाय टाकीत ढेकणे महाशय तिथून झटपट अंतर्धान पावले.

मनात क्षणभर येऊन गेलं, "आता हा सौदा बहुधा मोडला... पण जमला तर शंभर टक्के जमलाच म्हणून समजायचं!"

*

त्याच दिवशी संध्याकाळी एक लांबलचक डीसोटो मोटर माझ्या दारात उभी राहिली व हॉर्न वाजला.

मी संथपणे खिडकीशी गेलो व डोकावून खाली पाहिलं— ड्रायव्हरजवळच्या खिडकीमधून ढेकणे महाशय वाकून वर बघत होते. मला पाहताच दार उघडून ते झटपट खाली उतरले.

गंजीफ्रॉकवर सदरा चढवून मी पुन्हा खिडकीमधे गेलो. तो ढेकण्याच्या पाठोपाठ मागल्या उघड्या दरवाज्यामधून एक उंच मनुष्य रस्त्यावर पाय टाकून मोटारीतून उतरत होता. देखणा, रुबाबदार, शेरवानी डगला घातलेला मध्यम वयाचा तो मनुष्य रस्त्यावर मोटारला टेकून उभा होता व त्याच्याशी काही हळूच बोलून ढेकणे आमच्या घराच्या दाराकडे पटापट पावलं टाकत येत होता.

मी पण झटकन जिना उतरून खाली गेलो. मला दारापाशी पाहताच ढेकणे म्हणाले, "आले आहेत बरं का."

तेवढ्यात तो नवीन गृहस्थही मोटारीजवळून चालत पुढे आला.

"या...या ना —" मी म्हणालो.

"सदानंदराव, हे सुप्रसिद्ध सिने डायरेक्टर के. शंभुनंदन—" आम्ही दाराशी एकत्र येताच ढेकण्यांनी मला सांगितलं — नि त्यांच्याकडे वळत म्हटलं, "डायरेक्टर साहेब, हे मी म्हणत होतो ते मिस्टर सदानंदराव खोत—"

"ग्लॅड टु मीट यू—" आम्ही दोघे एकमेकांकडे हसून पाहत म्हणालो. आम्ही हस्तांदोलन केलं. ते नाव ऐकून मी मनात तरी चमकलो होतो. कोल्ह्याच्या शिकारीला निघावं नि वाघ समोर येऊन उभा राहावा तसं मला वाटत होतं.

तरी पण मी हळूच मिस्किलपणे ढेकण्यांना उद्देशून म्हणालो, "अल्ट्रा मॉडर्न कॉलनी डेव्हलपमेन्ट्स कंपनी यांचीच का, मिस्टर ढेकणे?"

"नाही नाही. ती या ढेकण्यांचीच दलाली कंपनी आहे." के. शंभुनंदन पटकन म्हणाले, "माझा काही एक संबंध नाही अल्ट्रा मॉडर्नशी. ढेकण्यांनी या व्यवहाराची खात्री दाखवली, म्हणूनच आजपर्यंत त्यांच्यामार्फतीने बोलणं केलं मी...एवढंच."

त्या वेळी ढेकण्यांचा चेहरा अगदी प्रेक्षणीय झाला होता.

" एव्हरीथिंग, मिस्टर ढेकणे...मला अल्ट्रा मॉडर्न कॉलनी डेव्हलपमेन्ट काही करायची नाही आहे, हे मी परवाच तुम्हांला सांगितलं आहे. मला बोलायचंय थिएटरबद्दल... तेव्हा, आपण ढेकणेसाहेब इथंच बसा...आम्ही वर जाऊन बसतो. चला डायरेक्टर साहेब."

त्यावर के. शंभुनंदन काहीच बोलले नाहीत. माझ्यामागून जिना चढू लागले.

ढेकणेही नाइलाजाने जवळच्या एका खुर्चीवर बसकण घेत म्हणाले, " ॲज यू प्लीज. पण मला अगदी साफ विसरू नका मात्र...इथं बसलोय मी—"

*

के. शंभुनंदनांना आरामखुर्चीवर बसवून, त्यांच्या शेजारी मी एक " सुंदर " खुर्ची टाकली व बसत म्हणालो, " माझं घर आपलं सार्वसुधंच आहे. आडपडद्याने आतापर्यंत ही बोलणी झाली नसती, तर — आपल्या सोफासेटवर बसून आपल्या पंख्याचा वारा खात बोलायला मी केव्हाच तयार झालो असतो. इथं आपल्याला येण्याचीही तसदी पडली नसती— "

" फार धूर्त आहा हं तुम्ही, सदानंद ! " के. शंभुनंदन हसून म्हणाले, " पण ढेकणेच मला म्हणाला, तीसबत्तीस हजारात सगळा सौदा जमवून देतो. तेव्हा मग माझाही नाइलाज झाला. "

" छे छे...डायरेक्टरसाहेब, ती आपली चूक नाही, ढेकण्यांचीही नाही...चूक आहे सारी माझ्या सिधेपणाची, साधेपणाची...पण मग अखेर आज तरी आपण गरिबाच्या घरी अशी समक्ष पायधूळ झाडलीत, फार आनंद झाला ! "

शंभुनंदन दिलखुलास मोठ्याने हसले. " वाः वाः, हे काय बोलणं ? अहो, काही काही माणसांचं दिसतं तसं तसतं. घरात दिसायचं हे असं, पण बँकेत असायचं..."

" पण त्यांतला मी नाही...लेट मी फर्स्ट पुट ऑल माय कार्ड्स ऑन द टेबल, मिस्टर शंभुनंदन...माझ्या बँकेत देखील म्हणण्यासारखं काही नाही. म्हणजे बघा, पाचशेंचा तुम्हांला मी चेक दिला तरी परत येईल ! "

शंभुनंदन किंचित चमकले. माझ्याकडे टवकारून पाहत म्हणाले, " पण मग तुमची ती थिएटरची कल्पना ?... आमच्या या थिएटरच्या धंद्यात तर सुरवातीला पैशाशिवाय अगदी पानही हलत नाही. "

" माफ करा...डायरेक्टर साहेब, याबाबत मात्र थोडा मतभेद आहे माझा...कल्पना असामान्य असली तर लौकर, उशिरा—पैसा कुठून तरी उभा राहतोच, अशा एका विश्वासाचा माणूस आहे मी. माझ्या आजोबांकडून हे धोरण—नि आपण जिचा विचार करीत आहो ती माझी जागा—मला प्राप्त झाली आहे. माझी जागा नि माझा आत्मविश्वास...वाट पाहायला सारा भविष्यकाळ आहे माझ्यासमोर ! "

शंभुनंदनांचा चेहरा बघता बघता किंचित पालटला. आपली बोलण्याची पहिली ताठर

पद्धती त्यांनी सोडली व हसत हसत ते मला म्हणाले, " ऑल राइट... लेट अस बोथ बी फ्रँक ॲन्ड कॉम्प्रमायझिंग. तुमची एकंदर भूमिका आता पुरी जाणली आहे मी. थोडक्यात, असं म्हणा ना... की, तुमच्या जागेचे तुम्ही जागरूक मालक आहा. तिच्यामधे सोनं लपलं आहे हे माझ्याइतकंच तुम्हीही धोरणाने आगाऊ जाणता आहा. असंच ना ?"

" होय, डायरेक्टर साहेब. आणि ते सगळंच, आजच्या आजच खणून घेण्याची माझी तरी इच्छा नाही. सोन्याचं रोज एक अंडं देऊ शकणारी ही माझी हंसी आहे... केवळ कागदी नोटांच्या भावात ती विकायला किंवा तिचं पोट चिरून पाहायला मी मुळीच तयार नाही. तेवढा मी गरजू नाही... तेवढा मी मूर्खही नाही... हा तर माझा कसला गुन्हा नाही ना ठरत, डायरेक्टरसाहेब ?"

माझ्या त्या बोलण्याने के. शंभुनंदन एकदम खुलले व मोठमोठ्याने हसले. क्षणभराने माझ्या खांद्यावर एक दोस्तीची थाप मारुन ते मला म्हणाले, " वेल वेल, यंग मॅन्... सारं काही लक्षात आलंय आता माझ्या. मूळ मुद्दा मला मान्य आहे. नाऊ कम ऑन् — आऊट विथ युवर होल प्लॅन... व्यवहाराला जमेल ते दोघांच्याही फायद्याचं सारं काही करायला मी कबूल होईन. केवळ पैशालाच किंमत नाही हेही कबूल. पण एक मात्र — आपला घोडा लगाम हातात ठेवून चालवा !"

*

आणि त्यानंतर आमचं बरंच दिलखुलास बोलणं झालं; आकडेमोड झाली; वादविवाद झाला नि त्या बैठकीत आता एक आमचा परस्परअटींचा कागद झाला आहे. ठरलं आहे त्याचा तपशील थोडक्यात असा :

बाकडेतिकडे विस्तार जमेस न धरता, जमीन हिशेबी सहा हजार वार धरली आहे. दर वाराला पंधरा रुपये ठरून, निम्मे पंचेचाळीस हजार कराराबरोबर रोख मिळायचे; उरलेली रक्कम, नवीन उभ्या होत असलेल्या कंपनीच्या शेअर्समधे मी गुंतवायची. कंपनी रजिस्टर होऊन काम करू लागेपर्यंत शंभुनंदनांकडून दरमहा सहा आणेप्रमाणे व्याज मला मिळायचं.

लिमिटेड कंपनी एकूण चार लाखांची; त्यातली तीन लाख प्रथम विक्री. पैकी माझे पंचेचाळीस हजार व शंभुनंदन यांचे (नव्वद हजार आणखी रोख धरून) एक लाख पस्तीस हजाराचे शेअर्स. दोघांमधलं हे प्राथमिक भांडवल एक लाख ऐंशी हजारांचं होऊन त्यात माझं-त्यांचं प्रमाण एकास चार असेल. उरलेले एक लाख वीस हजारांचे शेअर्स आम्ही दोघांनी समप्रमाणात आपल्या निवडीच्या माणसांमधे विकायचे असं ठरलं आहे.

थिएटर-प्लॅन आम्ही दोघांनी ठरवायचा, पण तज्ज्ञ या दृष्टीने निर्णायक अधिकार शंभुनंदन यांच्याकडे.

थिएटर व इतर बांधकाम कॉन्ट्रॅक्ट (प्लॅन एस्टिमेटप्रमाणे) व्यवस्था माझ्याकडे असून प्रत्यक्ष व्हावचर्सवर मला रुपयाला दोन आणे व्यवस्थापन चार्ज बांधकाम पूर्ण झाल्यावर मिळायचा. एस्टिमेट रकमेचा ३/४ भाग काम सुरू होण्यापूर्वी आम्हा दोघांच्या जोड-खात्यात बँकेत ठेवायचा. जरूर तर कंपनीसाठी बँक-कर्ज उभं करायचं.

थिएटरच्या दैनंदिन मॅनेजमेंटसाठी, पहिल्या किमान सहा वर्षांसाठी माझी नेमणूक झाली आहे. स्थूल मासिक उलाढालीवर नोकर इत्यादी व इतर खर्चासाठी मी २०% आकारावयाचे असून त्यातूनच सारा खर्च करायचा आहे. मात्र वार्षिक छत्तीस हजाराच्या धंद्याची मी हमी-गॅरंटी घेऊन, जेवढे कमी पडतील त्यावर ४०% भरपाई मला मिळणाऱ्या व्यवस्थापन रकमेतून द्यावयाची आहे. उलट, उत्पन्न हमीवर गेलं तर, सर्व उत्पन्नावर मला २५% व्यवस्थापन-आकार मिळायचा आहे. फिल्म भाड्याचा खर्च या व्यवस्था-आकाराबाहेरील आहे.

याच योजनेत, थिएटर मॅनेजरसाठी कंपनीतर्फे एक सहा खोल्यांचा बंगला बांधला जाणार असून तो विनामूल्य त्याच्या ताब्यात वास्तव्यास राहणार आहे.

*

हा लेखी पक्का करार कालच पुरा झाला. आमच्या दोघांच्या सह्या होताच, माझी प्रत व तीस हजारांचा एक चेक माझ्याकडे देऊन शंभुनंदन माझ्या खांद्यावर थोपटून हसत हसत म्हणाले, " उरलेले पंधरा हजार लागतील तसे पुढल्या दोन महिन्यांमधे मागून घेत चला. नाउ बक् अप् यंग मॅन्...गो अहेड! माझी खात्री आहे, मला आता एक अष्टपैलू सुशिक्षित सहकारी या व्यवहारातून योगायोगाने लाभला आहे. तुमच्या मदतीचा हजार तऱ्हेने नक्की उपयोग करून घेईन मी. ज्या पद्धतीने, समजुतीने, दूरधोरणाने हा व्यवहार तुम्ही पुरा केला, त्यातला तुमचा असामान्य आत्मविश्वास कधी विसरणार नाही मी. मला तरी वाटतं, आपल्या या नवीन संबंधाचं नि व्यवहार-व्यापाचं भवितव्य खासच उज्ज्वल आहे. ईश्वर आपला पाठीराखा आहे, सदानंद. काय कमी पडणार आहे आपल्याला ? "

खरंच निमा. शंभुनंदनांचे ते उत्साहाचे, उत्तेजनाचे शब्द ऐकताना मला एकदम अस्मानातच उडत असल्यासारखं वाटत होतं.

त्यांचा तो चेक आजच वटून माझ्या बँकखाती रकम जमा झाली आहे. निमा, दोन दिवसांतच मी श्रीमंत झालो आहे!

हे सारंच मला एक प्रकारे स्वप्नवत् वाटत आहे. एका न्याऱ्याच आनंदात, नव्याच जगात मी वावरू लागलोय. म्हणूनच न राहवून तुला मी हे लिहायला घेतलं लागलीच. अधिक खूप खूप लिहावंसं वाटतंय. पण पुढल्या दोन दिवसांत खूप कामं उरकायची आहेत. आधी मला नानी–श्रीधरांकडे जायला हवं. त्या आपल्या जागेत शिरलेल्या त्यांच्या पाचशे वाराच्या चिरोटीसाठी नानींनी पूर्वी एकदा सांगितले होते तेवढे पैसे

प्रथम देऊन टाकायचं मी ठरवलं आहे. नाही तर, त्यातूनच नाहक एखादा नवा गोंधळ निर्माण व्हायला नको.
दुसरं म्हणजे, रावजी अण्णांच्या मुलांना-- विशेषतः माधव- नारायण यांना—त्यांच्या दहा हजारांच्या कित्येक वर्षांच्या मागणीचाही फैसला करून टाकला पाहिजे.
बघू काय काय, कसं कसं जमतं ते.
उद्यापरवा तुला पुन्हा पत्र लिहीनच.

तुझा आनंदात असलेला
सदानंद

## चिरोट्याचं राजकारण

१४ सप्टेंबर १९४९

प्रिय निमाताई—
नुकताच मी नानी-श्रीधरना व माधव, नारायण वगैरे मंडळींना भेटून घरी आलो आहे.
कै. शंभुनंदनांबरोबर तो संपूर्ण व्यवहार तसा एकदा निश्चित केल्यावर, बाहेर कसला गवगवा होण्यापूर्वीच नानी-श्रीधरना भेटून ती चिरोटी खरेदी करून टाकणं मला निकडीचं नि भागच होतं.
तुला आठवत असेलच, मागे मी दीड हजार आनंदाने देऊ करताच, त्यावर नानींनी चार हजार सुचवले होते... केवळ त्यामुळेच ते त्या वेळी मी सोडून दिलं होतं. आता या वेळी माझा एकूण व्यवहार फायदेशीर होत असता श्रीधरचा तसा अप्रत्यक्ष फायदा झाल्यास माझी त्यांना आडकाठी नव्हती. मात्र तसली व्यवहाराची एक घाव दोन तुकडे सोडवणूक तत्काळ मात्र व्हायला हवी होती. शिवाय जमल्यास माधवच्या बाचाबाचीचा अपमानास्पद गोंधळही मला मात्र उरायला मुळीच नको होता.
तेव्हा त्या तुकड्याच्या किंमतीसाठी उगीच कसली नवी घासाघीस करायचीच नाही असं मी ठरवलं; नानींच्या पूर्वीच्या अपेक्षेप्रमाणे चार हजारांचा एक चेक श्रीधरच्या नावे निघण्यापूर्वी घरीच लिहून घेतला. नि काल सकाळी ‘ श्रीधर ’च्या पुष्कळ दिवसांनी पायऱ्या चढलो.

*

हॉलमधे मी शिरलो त्या वेळी नानी आत होत्या. मला पाहताच श्रीधर पुढे झाला नि आत पाहत म्हणाला, “ आई, अग सदाभय्या आलाय ग— ”

बऱ्याच दिवसांनी एकाएकी मला घरी आलेला पाहताच नानी चकितच झाल्या. तरी अगदी सहजगत्या बोलावं तसं मला म्हणाल्या,

" बस रे सदानंद...ही मी आलेच हं आतून एका मिनिटात— "

येताना त्या चहाचा ट्रेच बरोबर घेऊन आल्या. बऱ्याच दिवसांनी आम्ही तिघांनी एकत्र बसून चहा घेतला; त्या वेळी मला अनेक छोटे मोठे जुने प्रसंग आठवत होते. आना बसत तो कोपरा, झोपत ती खोली— साऱ्या साऱ्या परिचित स्थळांवरुन माझी मुग्ध दृष्टी भिरभिरत होती.

नानींची प्रश्नार्थक दृष्टी अधून-मधून हळूच माझ्यावर रोखली जात होती, याचीच मला जाणीव होत होती. मी अगदी गप्प गप्पच चहा संपवून कप खाली ठेवला. रुमालाने तोंड पुसलं.

शेवटी काही न बोलताच आतल्या खिशातला लिहून आणलेला श्रीधरचा चेक काढला. हात पुढे करून तो नानींकडे केला नि म्हणालो,

" नानी, माझ्या जागेत आलेल्या श्रीधरच्या मालकीच्या जमिनीच्या निरुंद पट्टीचे तुम्ही मागे चार हजार रुपये मागितले होते ना ? ते आणले आहेत आज...घ्या. मला तसा उल्लेख करून पावती द्या. मग चारदोन दिवसांत जाऊन कागद रजिस्टर करून टाकू आम्ही दोघे भाऊ. "

त्या माझ्या अकस्मात— अनपेक्षित चेकने नि एकदम केलेल्या व्यावहारिक बोलण्याने श्रीधर व नानी दोघेही अतिशय स्तंभितच झाली.

नानींचे डोळे सर्रकन चमकले. क्षणकाळ त्या गप्प राहिल्या. पण मी पुढे केलेला चेक मात्र त्यांनी अजून हाती घेतला नव्हता. त्यांनी ती एकप्रकारे धोरणी अळंटळंच चालवली होती हे माझ्या ध्यानी आले नि चेक धरलेला हात तसाच मी माझ्या मांडीवर टेकला. तेवढ्यात हसत हसत मला नानी म्हणाल्या, " अरे दोन वर्षांपूर्वीची ती गोष्ट, नाही सदानंद !...आता जागांच्या किंमती किती भरमसाठ वाढल्या आहेत रे !...सारख्या चढतच आहेत...हे काय तुला ठाऊक नाही ! काही कोणी परका आहेस तू !... श्रीधरचाच जाणता मोठा भाऊ. तर मग बाजारभावाच्या मानाने तुझ्या धाकट्या भावाचा अधिक फायदा होणार असला, तर तूच नको का ते सारं पाहायला–करायला ! "

नानींचे ते एकतर्फी लबाड लाघवी शब्द. त्यांत एक प्रकारचा अदृश्य गळही होता. शिवाय, " काहीतरी कुठेतरी बदललं आहे; त्याचा आपण वेळीच फायदा उठवला पाहिजे, " असला अंधुक अस्पष्ट कल्पनेचाही त्यांना चटकन धूर्त वास आला असल्याचं त्यात ओतप्रोत भरलेलं दिसत होतं.

क्षणार्धात त्याची जाणीव होऊन मला प्रथमच त्यांचा रागच आला; पण तरीही मनावर फिरून ताबा मिळवून मी त्यांना थंड शब्दांत म्हणालो, " तेही मी कमीजास्त कबूल करीन की नानी, पण आधी हा तुमच्याच तोंडून ठरलेल्या रकमेचा चेक देत आहे, तो तरी स्वीकाराल की नाही ? एवढं देण्यात तर माझं काही चुकलेलं नाही ना ? "

असं म्हणत मी तो चेक श्रीधरकडे केला. त्याने तो हाती घेतला व तो आपल्या आईकडे पाहू लागला, तेव्हा नानी माझ्याकडे पाहून हसल्या नि मग त्यांनी तो चेक हातात घेतला.

रबर जास्तीत जास्त ताणता आलं तर पाहायचं, पण तो तुटू तर द्यायचा नाही, हे जाणण्याइतक्या नानी धूर्त, व्यवहारी तर खासच आहेत.

*

मग क्षणभर थांबून मी म्हणालो, " नऊदहा महिन्यांपूर्वीची गोष्ट...चाराच्या भावाने सगळ्या जमिनीचा सौदा करून टाक; एक गिऱ्हाईक विचारतंय; असा तुम्हीच ना मला निरोप पाठवला होता नानी, श्रीधरबरोबर ? "

नानी गप्प राहिलेल्या पाहून मी पुढे मुद्दामच धोरणी, मोघम प्रश्न विचारीत म्हणालो, " हा तर जवळजवळ साडेसातचा भाव मिळतोय तुमच्या साडेपाचशे वारांना तुम्हांला. याहून आणखी किती भाव धरायला हवा होता भावाभावांत, तुमच्या मते ?...सांगा ना ? आणखी किती फायदा करायला हवाय धाकट्या भावाचा मोठ्या भावाने ? "

खरं म्हणजे नानी आता पार वरमल्या होत्या. क्षणभर त्या गप्प राहिल्या नि मग पुन्हा अवसान आणून म्हणाल्या, " अरे निदान साडे आठ–नऊ तरी भावाने...जमीन जाईल ती माझ्या अंदाजाप्रमाणे आज— "

मी उपहासाचं स्मित करून विचारलं, " असंऽ ? म्हणजे तेवढा तो मधलाच वाकडा तिकडा साडेपाचशे वारांचा श्रीधरचा तुकडा ?— कोणता हरीचा लाल घेईल तो त्या भावाने, म्हणता तुम्ही, नानी ? काढला आहोत शोधून ? ? "

" म्हणजे तेवढा तुकडाच नाही रे म्हणत मी—" नानींची ती चिकाटी दांडगी होती; आपलं घोडं पुढे दामटवीत निर्लज्ज स्मित करीत त्या म्हणाल्या, " तरी पण, ती सगळी जमीन तर जाईल त्या भावाने ? "

" आश्चर्य आहे ! तुम्हांला तर जास्तीत जास्त चारचा भाव देणारंच गिऱ्हाईक मिळालं होतं साऱ्या जमिनीला ! " मी मुद्दाम त्यांना ती आठवण दिली, " पण मग जाईल तेव्हा जाईल सगळी ती --भावाभावांत भाव करायचाय तो आज नि त्या तुम्हांला निरुपयोगी चिंचोळ्या तुकड्याचा. "

*

वास्तविक नानी त्यांच्याच उलटसुलट शब्दांनी आता हतबुद्ध झाल्या होत्या.

त्यांच्या त्या घासाघिशीचा मलाही मनात भयंकर संताप आला होता. पण मला नसतं विघ्नही नको होतं ठरलेल्या पुढल्या बेतांना, तेव्हा क्षणभर वाट पाहून मी म्हणालो, " बरं तर मग —जशी तुमची इच्छा, नानी ! जरा जास्त होत असला भाव, तरी तो आनांच्या एका मुलाकडून त्यांच्या दुसऱ्या मुलाचा फायदा ! एवढंच ना ? भावाभावांत

तरी बाजारी भाव आणायचा नाही!— प्रेमभावच ठेवायचा! श्रीधरचा फायदा होऊन जाऊ दे—माझा भाऊच आहे तो—"
असं म्हणून मी उठलो. विजारीच्या खिशातून शंभराच्या पाच नोटा काढल्या नि श्रीधरच्या हाती देत म्हणालो, "चल...घे, श्रीधर...हा माझा प्रेमभाव...आता होईल ना आपल्या नानींचं पूर्ण समाधान?...व्यवहार झाला, प्रेमही झालं..."
श्रीधरचा चेहरा आनंदला—कावराबावरा झाला, त्याच्या डोळ्यांत प्रेमभाव तरंगताना मला दिसल्यावाचून राहिला नाही. ते प्रथमपासून शेवटपर्यंत सारंच त्याला अनपेक्षित, अकल्पित वाटत होतं.
"हं...आता हे बरीक ठीक झालं." नानी तेवढ्यात म्हणाल्या.
त्या संधीचा उपयोग करून मी त्यांना म्हणालो, "आता मला लागलीच एक साडेचार हजारांची पुरी पोच झाल्याची पक्की पावती करून द्या. क्षेत्रफळ, सर्व्हेनंबर, माझा चेक व रोख सगळ्याच तपशील असलेला बरा त्यात, नाही का? पुढेमागे, माझ्या पुढल्या व्यवहारात उपयोगी पडेल ती."
"देते हं." असं म्हणून नानी उठल्या. त्यांनी कागदावर स्टँपपावती केली. श्रीधरची सही घेतली व ती माझ्या हाती दिली.
तो कागद खिशात घालताना माझ्या जिवाला अगदी हायसं वाटत होतं.

*

क्षणभर तसाच गप्प गप्प गेला. पण मग माझ्याकडे हसत हसत पाहून नानींनीच मला विचारलं, "पण मग, आज सकाळीच उठून गडबड कसली रे ही सदानंद?...आजच काय नडलं होतं या व्यवहाराचं? विचार का काही आहे तुझा?"
त्यांचा व्यवहार झाला होता. आता माझ्या व्यवहाराबद्दलचं अफाट कुतूहल नानींच्या डोळ्यांत तरंगत असलेलं मला दिसत होतं. मलाही त्या प्रकाराची मनातल्या मनात मोठी गंमत वाटल्यावाचून राहिली नाही.
"हो रे, सदाभय्या? विकायचा विचार आहे तुझा ती जमीन?" श्रीधरनेही मला गप्प बसलेलं पाहून विचारलं.
"ती सारी जागा विकूनही टाकलीय मी, नानी. काल व्यवहार ठरला—झाला." जसे काहीच झालंच नाही अशा सहजगत्या शब्दांत मी त्यांना ती बातमी दिली.
"काय?" छप्पर डोक्यावर कोसळल्यासारखाच त्या वेळचा नानींचा चेहरा झाला होता.
"आता तिथं एक थिएटर बांधणार आहो आम्ही." त्याच स्वरात मी पुढेही म्हणाल्यामुळे नानींच्या मनाला उसंतही मिळेना...
"थिएटर?" श्रीधरने आश्चर्याने पृच्छा केली.
"नि तुम्ही म्हणजे रे कोण सदानंद?" कसंबसं स्वतःला सावरून चाचरल्या शब्दांत

नानींनी मला प्रश्न केला.
" आम्ही...म्हणजे मी नि सुप्रसिद्ध हिंदी चित्रपट डायरेक्टर के. शंभुनंदन." माझ्या व्यवहाराच्या कमळाची एक एक पाकळी आता हळूहळू नानींपुढे उघडली जात होती—
" पंधरा रुपये वार ठरला. थिएटर बांधणीचं कॉन्ट्रॅक्ट माझ्याकडेच आलंय. पहिली सहा वर्षं थिएटर मॅनेजमेंटही माझ्याकडे सोपवलीय त्यांनी. आणि आपलं फणसाचं झाड आहे ना, श्रीधर, तिथं मॅनेजरसाठी सहा खोल्यांचा एक टुमदार बंगलाही कंपनीतर्फे बांधायचं नक्की झालंय आमचं. छान झाला एकूण व्यवहार, नाही नानी ?"

*

ते सारं मी अगदी संथपणेच सांगत गेलो होतो तेही त्यांची उत्सुकता संतुष्ट करण्यासाठीच. त्यात वास्तविक माझी तशी कसली घमेंड, चढेलपणा, हिणवणं—काही एक नव्हतं. मी केवळ त्रयस्थ बातमीदाराचंच काम करीत होतो.
तरीपण निमा, माझ्या त्या प्रत्येक वाक्यामध्ये, नानींच्या मनातील सुप्त भावनांना आकाशापर्यंत वर उडवू शकणारा एकेक सुरुंग भरला होता. त्यांचा चेहरा भरभर पालटत गेलेला मला प्रत्यक्षच दिसत होता. अखेर, नुकताच माझ्याशी झालेला तो साडेचार हजारांचा अमाप फायद्याचा सौदाही आधीच ठरून गेल्याची प्रचंड हळहळही आता त्यात प्रतिबिंबित झालेली स्पष्ट दिसत होती. क्षणभरच, नानींची सर्व बाजूने दातखिळी बसवण्यागतच ते सारं झालं होतं.
मीही बोलता बोलता गप्प होऊन त्यांच्याकडे पाहत बसलो होतो. तेव्हा अखेर गप्प राहणं चमत्कारिक दिसेल म्हणून, मनातला गोंधळ आतल्या आत दडपून, नानीच सहास्यमुद्रा करण्याचा प्रयत्न करीत मला म्हणाल्या, " वाः, छान ! छान छानच झालं... हे म्हणत असत तसा नुसताच अव्यवहारी, स्वप्नाळू नाही आहेस तू, सदानंद...कधी बयाणा कागद झाला म्हणालास ? काल ? आम्हांला इकडे पत्ताच नाही कशाचा."
" तसं अजून कुणाला माहीत आहे !...सदूकाकांनासुद्धा नाही." मी हसत म्हणालो,
" आता प्रत्यक्ष कामालाही पुढच्या आठवड्यात मुहूर्त धरलाय शंभुनंदनांनी."
ते ऐकताना नानींचा चेहरा अकारणच, आणखीच पार पडला होता.

*

" पण मग, सकाळीच उठून, आज आणखी दुसऱ्याही एका महत्त्वाच्या कामासाठी आलो होतो तुमच्याकडे मी नानी." ती अस्वस्थता उत्पन्न करणारी शांतता मोडून मी म्हणालो.
" ते आणखी कसलं बाई ?" आज माझ्याकडून होणाऱ्या त्या नवनव्या धक्क्यांच्या वर्षावांनी नानी आता जणू आगाऊच घाबरलेल्या उत्सुकतेने पाहत होत्या.
" परवा श्रीधरचा माधवमामा मला रस्त्यात भेटला होता." मी त्यांना गंभीर शब्दात

म्हणालो, “ प्रश्न विचारून मला तो नेहमीच सतावत असतो. तेव्हा आता काय करायचं ? अखेर ठरवलंय काय तुम्ही नानी ?...रावजीअण्णांच्या त्या मृत्युपत्रातल्या दहा हजारांचं ? माधवला काय सांगायचं आपण ? ”

“ त्या मेल्याचं नावसुद्धा काढू नकोस माझ्यासमोर ! ” एकदम भयंकर चवताळून ओरडत नानी मला म्हणाल्या, “ अरे आपल्या बहिणीच्या नि भाच्याच्या जिवावर, अब्रूवर उठणारा तो मांग...तो माझा भाऊ रे कसला ?...नि श्रीधरचा मामा तरी कसला ? ”

माधवच्याच प्रतापाने नानी–श्रीधर दोघेही त्या चमत्कारिक प्रकरणात सव्वा वर्षापूर्वी गोवली गेली होती. त्याने ते करायला नको होतं. पण नानींनीही करायला नको तेच काही त्याआधी केलं होतं; म्हणूनच तो प्रसंग त्यांच्यावर येऊ शकला होता. माधवने त्यांची अब्रू घालवली होती. पण नानींनी काय आमची अब्रू कमी घालवली होती ? तरी पण, आपल्यापुरतं पाहून नानी आता माधववर मात्र अशा भयंकर चिडाव्यात, यातही आश्चर्य नव्हतं.

“ ते सारं खरं असेल—” मी म्हणालो, “ तो तुमच्या–त्याच्या संबंधाचा प्रश्न...पण तेवढंच म्हणून, आताच्या वेळेपासूनची आपली नैतिक जबाबदारी नाही ना संपत, नानी ?...माधव वगैरेंनी करायची ठरवलीच तर निदान पुन्हा नाचक्की तरी थांबत नाही ? असं आहे नानी, इच्छा असो नसो, धीर करून, थोडाफार खर्च झाला तर तो सोसून, ते खरकटं आपल्यालाच काढून टाकलं पाहिजे एकदा, नाही श्रीधर ? ”

श्रीधर गप्पगप्पच होता. नानीही काही वेळ चकार शब्द बोलेनात.

*

मीच मग मिनिटभराने पुन्हा बोलू लागलो, “ तुमचा आपला काय विचार असेल तो असो, नानी...पण आता मी मात्र त्या बाबतीत ठरवलं आहे ते असं, पाच भावंडांना दहा हजार...पैकी स्वतः तुमचा एकपंचमांश...ते दोन हजार काढून टाका. उरलेले आठ हजार देणं. आताच्या वाटणीतून मला समविषम कसंही मिळालं असलं, त्यातही तीन भाग कल्पिले असले, तरी देणं दोघा भावांनीच द्यावं. आताच मी तुम्हांला चार हजाराचा चेक दिलाय, तो एन्डॉर्स करून द्या माझ्याकडे...माझ्या वाटचे चार हजार त्यात घालतो नि त्या रावजींच्या चार मुलांच्या सह्यांची पावती घेऊन येतो आजच्या आज. पाचवी तुमची सही तुम्ही मग करा...”

बाहेरच्या बाहेर आलेले पैसे जाऊन, आता वर अप्रत्यक्ष उडणारा शिंतोडा कायमचा नाहीसा करण्याच्या या कल्पनेला तरी नानी कबूल होतील असं क्षणभर मला वाटलं होतं...

पण त्यामुळे त्या अधिकच चिडून ओरडल्या, “ काही एक सांगू नकोस मला. आमच्या विरुद्ध कारस्थानं करणारे ते मांग—त्यांना एक कपर्दिकही दे असं मी श्रीधरला

सांगणार नाही ! ट्रस्टी म्हणून भरपूर सेवा केली आहे त्यांची तुझ्या वडलांनी. एक कवडीही देणं लागत नाही त्यांची आम्ही."

"अगदी शंभर टक्के सत्य असेल ते नानी, पण तसा त्यांना सांगण्याचा अधिकार आनांचा होता; श्रीधरचा–माझा नव्हे. त्या भावांनीच मग कृतज्ञपणे आपल्याला तसं सांगायला हवं होतं. आम्ही त्यांना नाही सांगायचं तसं. विशेषतः वारंवार ते तशी त्या रकमेची वाच्यता करीत असताना, आपण उलट तसं त्यांना सांगणं व्यवहारबुद्धीला, नैतिक बैठकीला शोभणार नाही, आनांना शोभणार नाही. आपण आपली नैतिक कर्तव्यबुद्धी..."

"पुरे पुरे. असल्या काल्पनिक नैतिकतेचा तुला एवढा पुळका असेल नि बाऊ वाटत असेल, तर तुला काय वाटेल ते, तुझं तू एकटा कर खुशाल...मला काही श्रीधरला सांगायला सांगू नकोस !"

*

आता मात्र मला नानींचा संतापच आला होता. क्षणभरच मी स्वतःशी विचार केला, नि अखेर नानींना मी म्हणालो, "ठीक तर, नानी. ही सारी एक काल्पनिक नैतिक जबाबदारी, असं म्हटलंत नाही का ? तेव्हा रावजींची मुलगी या नात्याने, तुमच्या वाट्याला येणाऱ्या दोन हजारांमधल्या एक हजाराची, आनांचा मुलगा या नात्याने मला आता कसलीच फिकीर करायला नको. तुमचा तो हक्कच नाही. मात्र श्रीधरतर्फे त्या रावजींच्या चौघा मुलांना उरलेले आठ हजार चेक देऊन चुकते करतो आजच नि पावत्या घेऊन टाकतो. यापुढे त्यांना कोणाला, आनांना किंवा त्यांच्या माणसांना हिणवण्याची– सतावण्याची ताकद होणार नाही असा बंदोबस्त करून टाकतो. श्रीधरने मला निम्मे चार हजार द्यावेत न द्यावेत. येतो मी, नानी."

अशा वेळी नानींनी आपल्या वाट्याच्या दोन हजारांचीही मागणी करायला कमी केलं नसतं. पण इतकं सर्व झाल्यावर, त्यांना आता तसं माझ्याकडे मागायला तोंडच उरलं नव्हतं.

मायलेक दोघंही त्यावर काही बोलत नाहीत असं पाहून, मी दाराकडे वळलो व श्रीधरला म्हणालो, "आपल्या झालेल्या सौद्याचे स्टॅंप कागदावर विक्रीखत मात्र आजच्या आजच करून घे, श्रीधर. उद्यापरवा जरा ये माझ्याकडे. तसेच आपण रजिस्ट्रारकडे जाऊन नोंदवून टाकू."

"हं." नानी तोंडातल्या तोंडात म्हणाल्या.

श्रीधरनेही होकारार्थी मान हलवली.

मी जिना उतरून खाली येईपर्यंत ती दोघंही माझ्या मागोच उतरली. बाहेरच्या दाराकडे मी वळलो तेव्हा मात्र नानी मला हळूच म्हणाल्या, "अरे...तुमच्या त्या थिएटरच्या बांधकामाच्या कॉन्ट्रॅक्टचं काय ठरवलं आहेस तू सदानंद ? एकटाच करणार आहेस तो

सारा व्याप ! ”
इतकं सारं झाल्यावर देखील त्यांचे ते तसले स्वार्थी, धोरणी शब्द माझ्या कानी पडले तेव्हा मात्र माझ्या संतापाची तिडीक मस्तकाला गेल्यावाचून राहिली नाही.
तरीही मन खूप प्रयासाने आवरून, पण काहीशा कठोरपणेच मी नानींना उत्तर दिलं, “ माझी नैतिक भूमिका नि सदसद्विवेकबुद्धी त्या बाबतीत मला जसं सांगेल, तसंच सारं करायचं आता ठरवलंय मी, नानी. अगदी आज, या क्षणीच त्या सगळ्या गोष्टींचा विचार करण्याचं, निर्णय घेण्याचं, मला तरी कारण दिसत नाही काही. ”

*

माझ्या त्या उत्तराने नानी खूपच चपापल्या, वरमल्या. त्यांचा चेहरा खर्रकन उतरला. पण त्यांना काही उलट बोलून सावरून घ्यायला जागाच उरली नव्हती.
मला तरी वाटलं, नानींच्या साऱ्या आयुष्यात आज अगदी प्रथमच पराजयांची निष्ठुर परंपरा त्यांच्या नशिबी आली होती. जणू आजच्या आमच्या त्या भेटीत, मुलाखतीत पदोपदी, क्षणोक्षणी नानींचंच नाक खाली झालं होतं.
ज्या माझ्या नैतिकतेची क्षणापूर्वीच नानींनी रेवडी उडवली होती तिचंही पारडं जड होऊन खाली गेलं होतं. त्यामुळेच, आपल्या साऱ्या वैभवासकट आपण हवेत लोंबकळत टांगल्या गेलो आहो, असंच नानींना त्या वेळी वाटलं असेल, यात काय संशय ?
त्यामुळे मनात त्या खूप खूप संतापल्या देखील असतील. पण तो संतापही व्यक्त करण्याची त्यांची त्या क्षणी मुळीच ताकद उरली नव्हती. तेही तोंड त्यांना नव्हतं.
म्हणूनच असेल, साऱ्या आयुष्यात कधी नव्हत्या अशा स्निग्धतेच्या, आपुलकीच्या, एक प्रकारच्या हकाच्या मृदू स्वरात नानी हळूच पुटपुटल्या, “ बाबा, तुला रे आम्ही काय सांगायचं ? तूच त्या घरातला मोठा माणूस. करायचं ते... नि योग्य ते तू काय केल्याशिवाय राहशील ? श्रीधरचा फायदा तुला काय नको का असणार ? ”
जाता जाता मनात मला नानींच्या त्या उद्गारांचं प्रथम हसू आलं, मग स्वतःबद्दल समाधान वाटलं, नि अखेर नानींबद्दलच्या रागापेक्षा त्यांची मला कीव आल्याशिवाय देखील राहिली नाही.
निमा, आनांच्या घरी मी आज आनांच्या खऱ्या मोठ्या मुलासारख्या वागलो, याचं मला आज हृदयात न मावणारं समाधान वाटतंय या क्षणी.

तुझा समाधानी भाऊ
सदानंद

## प्रेमाने जिंकलं

१४ सप्टेंबर १९४९

प्रिय निमाताई—

आताच्या ' श्रीधर 'मधून उतरताना आज माझी मान ताठ होती. वाटत होतं, आपण आज काहीतरी, आपल्या आनांबापूंना आबाआजोबांना शोभण्यासारखंच केलं खास... तो आनंद, ते न्यारं समाधान माझ्या मनात अगदी ओतप्रोत होतं; म्हणूनच तासाभरापूर्वी नानींनी दाखवलेल्या आपल्या हिणकस मनोवृत्तीबद्दल मला आलेला संतापही, माझ्या नकळत कुठल्या कुठं विरघळून गेला होता. एक प्रकारच्या भव्य-उदात्त भावनांच्या प्रचंड झोतामुळे, त्या साऱ्या क्षुद्र भावना नि क्षुद्र घटना केव्हाच माझ्या मनाच्या पार्श्वभूमीला पार फेकल्या गेल्या होत्या.

आणि तसल्याच नव्या उत्साहामध्ये माझे पाय ' रावजी व्हीला 'कडे वळले. मी आपल्याच तंद्रीत जिना चढून वर केव्हा पोचलो तेही माझं मला समजलं नाही.

*

गोपूमामा, केशव, नारायण, माधव—सारे भाऊ घरीच होते.

मला आलेला पाहताच त्यांची आई हॉलमध्ये घाईघाईने आली नि म्हणाली, " ये, ये सदानंद ! फार फार दिवसांनी फिरकलास हो आमच्या घराकडे...बस ना ! "

रावजीअण्णांची बायको हल्ली बरीच वृद्ध दिसते. खिन्नत्वामुळे तर तिचा चेहरा अधिकच भकास झाला आहे. नवऱ्याच्या कारकिर्दीत एवढं वैभव भोगलेली ती त्या घराची मालकीण...आपल्या साऱ्या मुलांच्या चालू काळातल्या एकूण निष्क्रियतेमुळे व त्यातूनच घरात चालून आलेल्या उतरत्या काळामुळे नि अवकळेमुळे, आपापसातील त्यांच्या सदैव चाललेल्या शब्दाशब्दीमुळे, ती पार बापुडवाणी झाली आहे. केशव-माधव यांच्या उतावळ्या संतापी करणीमधून, आपल्याच एकुलत्या एका मुलीशी— नानींशी— आलेल्या तेढी-वाकडेपणामुळे तर त्यात आणखी भरच पडली होती. ती पार रंजीस नि कावल्यासारखी दिसू लागावी, यात आश्चर्य ते कसलं !

" घरी...श्रीधरकडे कधी गेला होतास बाबा ? " मोठ्या आस्थेने तिने मला विचारलं, " ठीक आहेत ना सगळी ? तुझ्याकडचं क्षेम ? "

" हो...आताच तर उतरलो नानींकडून. " मी सस्मित म्हणालो, " म्हटलं, तुम्हांलाही साऱ्यांना आजच भेटावं..."

आमचं बोलणं ऐकून सारे भाऊ उत्सुकतेने माझ्या शेजारी एकेक येऊन बसले. तोच, त्यांच्या आईशी बोलता बोलता, मी थांबलो होतो. आणि सारी शांतता झाली होती. प्रत्येकजण माझ्याकडे चमकल्या नजरेने, उत्सुकतेने पाहत होता. जणू त्यांना विचारायचं होतं, " काही विशेष ? "

*

मग मीच थंड मनाने, संथ शब्दांत सुरवात केली, " आज बघा, तुम्हा सर्वांकडे मी मुद्दामच आलोय. मी तरी माझ्या मनाशी ठरवलंय...एकदा मागल्या सर्व गोष्टींचा काय तो फैसला करून टाकायचा. तेवढ्यासाठीच नानींनाही आधी भेटलो...नानींनीही याबाबत माझ्याशी एकमताने काही केलं असतं, तर फार बरं झालं असतं; पण..."

गोपूमामा नेहमीच्या आपल्या संकोची स्वभावानुसार हळूच माझी नजर चुकवून अधूनमधून माझ्याकडे पाहत होता. नारायण उठून येरझारा घालीत होता. आपल्या मुलाला मांडीवर घेऊन, टिचक्या वाजवीत, केशव च्यकांव...च्यकांव करीत होता. तेवढ्यात माधवने हळूच बसल्या जागेवरून मला विचारलं, " कशाबद्दल रे म्हणतो आहेस तू हे सदाभय्या ? हे बघ, नानी तुझी आई असेल, माझी सहोदर बहीण असेल; पण आता जन्मात तिचं तोंड पाहायचं नाही असं मी ठरवलंय. मी काही साधासुधा बावळट गोपूदादा नाही. तसं तुझ्याशी माझं काही एक वाईट नाही. दुसरं काही तू म्हणशील, तर एकदा नव्हे हजारदा तुझं मी ऐकेन. पण आता एकदा आमच्या जिव्हाळ्याच्या नात्याचं ते काचेचं भांडं फुटलं ते फुटलं—ते आता तू किंवा दुसरं कोणी म्हणाल तरी साधणं शक्य नाही. हे बघ सदाभय्या, तुला राग नको यायला, पण वैभवाचा एकेका माणसाला माज चढतो माज ! ' दरिद्री नाही तिथचे...आले—आले भीक मागायला...कारण काढून !...एक कपर्दिकही देणं लागत नाही आम्ही तुझं ! काय करायचं असेल ते करून घे...पायरी उतर आधी...जा, चालता हो ! ' असं म्हणाली ती मला दोन वर्षांपूर्वी. मग आता तिला मी माझी बहीण तरी का म्हणेन, सदाभय्या ? तूच सांग."

" हे बघ माधव, ही बाब तुमची-तुमची आहे..." मी त्याच्या त्या संतापाला थोडा वाव देऊन अखेर थंड शब्दांतच म्हणालो, " पण आज मी आपलं तुमच्याकडे आलो आहे, तो फक्त आताच तू म्हणालास त्यातल्या त्या कपर्दिकेबाबतीतच बोलायला. आनांनी रावजींचं देणं...मागे बोलला होतास ना तू माझ्याकडे सुद्धा ? देणं जरूर होतं की नव्हतं हा प्रश्न बाजूला ठेवू आपण...एकदा तो प्रश्न काढल्यावर मी मात्र खूप विचार केलाय आजपर्यंत त्यावर. मला आज शक्य होताच, त्याच बाबतीत तुमच्याशी बोलायला नि ठरवायला आलोय हा मी इथं."

*

प्रथम माधव नि त्याच्या पाठोपाठ ते सारेच भाऊ माझ्याकडे एकदम विस्मयाने पाहू लागले.

आतापर्यंत गपचूप बसलेल्या त्यांच्या आईलाच उद्देशून मी पुढे म्हणालो, " असं आहे त्याचं, माधवच्या आई, आनांकडून रावजीअण्णांना मिळायच्या दहा हजारातले, नानींचे वजा करून, या चौघा भावांना आठच हजार मिळायचे, हो की नाही ?

आनांच्या हयातीतच तो फैसला झाला असता तर यांना कोणाला काहीच बोलता आलं नसतं. तेव्हा आता मी असं ठरवलंय की, प्रत्येकाच्या वाट्याला येणाऱ्या त्या दोन दोन हजारांपैकी एकेक हजार काढून, ते चार हजार रावजीअण्णांच्या बायकोला — म्हणजे, माधवच्या आई, तुम्हांला — द्यायचे. नि उरलेले एकेक हजार प्रत्येकाच्या हाती देऊन टाकायचे. तुम्ही तुमच्या रकमेची तुम्हांला हवी तशी वासलात लावावी, यांनी प्रत्येकाने आपापल्या हजाराचं काय हवं ते करावं...एक मात्र, पोचलेल्या साऱ्या दहा हजारांची, आम्हा दोघा भावांच्या नावाने, यांनी सर्वांनी मला आजच्या आज एक पावती लिहून द्यावी. नि झालं गेलं यापुढं सारं विसरून जावं. मग तर आमचे आनाबापू नाही ना रावजीअण्णांच्या नि त्यांच्या मुलांच्या कर्जात राहत ?...कसं म्हणता ? ?"

" नानी काय म्हणाली ? " नारायणने येरझारा घालता घालता थबकून प्रश्न केला.

" त्यांचा काय रे संबंध या मी देतोय त्यामधे ? " मी संदिग्धपणे म्हणालो, " कवडीही देणार नाही म्हणाल्या त्या. "

" म्हणजे ?...ही सारी रकम आता तू स्वतःच देणार आहेस एकटा ? " केशव आश्चर्याने ओरडला.

" हो. आजपर्यंत माझ्यापाशी प्रत्यक्ष बोलण्यासारखं-देण्यासारखं नव्हतं, पण आजच आना-आबांच्या कृपेने एका व्यवहारातून माझ्या हाती काही रकम आली आहे; तेव्हा हेच निश्चित ठरवून मी प्रथम नानींकडे गेलो. त्या नाही असं म्हणाल्या. तेव्हा मग तिथूनच इथे आलोय. पण आनांकडली रावजींची रकम तुम्हाला मिळाली की झाली ना ? "

*

रावजींची बायको इतका वेळ गप्प बसली होती. तिच्या डोळ्यांतून एकाएकी अश्रूंचे पूर ओघळू लागले.

तेवढ्यात अत्यंत गद्गदित होऊन गोपूमामा मला म्हणाला, " सदाभय्या, सदाभय्या... छे छे...तू आधी माझं ऐक...तू रे काय या माधवच्या नि केशवच्या नादी लागतोस ? अरे बाबा, कसली रकम नि कसलं काय ? मी स्वतः आनाबापूंच्याबरोबर, अण्णांनंतर, प्रथमपासून होतो. आनांचा तो कारभार रोजच्या रोज पाहिलेला यांच्यातलाच एक भाऊ— मोठा भाऊ आहे मी. अरे, तुझ्या आनांनी आम्हा साऱ्या भावंडांवर जे उपकार केले आहेत, तेवढेच या जन्मी फिटणं शक्य नाही आम्हांला. मग त्यांनी आम्हांला कसली देणी रकम काढणं म्हणजे तर तो कृतघ्नपणाच. पण मग, माझं इथं ऐकतंय कोण बाबा सदाभय्या ! मी बावळट, नालायक, बुद्दू..."

तेवढ्यात कावऱ्याबावऱ्या चेहऱ्याने नारायण मधेच म्हणाला, " गोपूदादा नि आई काय म्हणतील तसंच करावं..."

" मी मागे म्हणालो होतो खरं, सदाभय्या— " केशव अडखळत्या जड स्वरात म्हणाला,

" पण आता या वेळी तुझ्याकडे काय बोलावं तेच मुळी मला समजत नाही बघ. "
पण मग रकमेबद्दलची ज्याची आग्रहाची मुख्य मागणी होती, तो माधव तर इतका वेळ काहीच बोलत नव्हता. बराच वेळ तो गपचूप बसून माझ्याकडे व इतर सर्वांकडे आळीपाळीने, भांबावल्यासारखा पाहत होता.

*

अखेर माधवचाही चेहरा बघताबघता पालटत गेला. त्याचा नेहमीचा हडेलहप्पी अरेरावी कठोरपणा कुठच्या कुठे पळून भर्कन् त्याचेही डोळे पाण्याने भरून आले. आणि मग, एकदम मोठ्याने आलेला हुंदका दडपीत तो जागचा उठला. जोरजोराने ओक्साबोक्शी रडतच तो माझ्याजवळ धावत आला. त्याने माझे दोन्ही हात घट्ट पकडले नि ते गदागदा हलवीत तो मोठमोठ्याने अडखळतच ओरडू लागला,
" सदाभय्या... सदाभय्या... अरे काय रे हे ? प्रेमाने, समजूतदारपणे, नेकीने देखील, एखाद्या माणसाला पार ठार करता येतं रे ! हे—हे मी आयुष्यात आज प्रथमच अनुभवतोय ! या क्षणी तूच मला ते दाखवून देतो आहेस ! कुठे आमची सख्खी बहीण नानी, नि कुठे कोणाचा कोण असा तू ! छे छे, नकोत... मुळीच नकोत मला तुमचे—तुझे ते पैसे ! प्रतिकूल परिस्थितीने माणूस अगदी वेडा होतो; कोत्या मनाचा होतो; हळुवार भावना विसरतो... दुसऱ्याचे खरेखुरे उपकारही विसरतो; स्वार्थी, कृतघ्न, बदमाश होतो; तस्सा... तस्सा मी आहे ! अरे सदाभय्या, आमच्या अण्णांनी लिहून ठेवलं असेल टिपणात; पण आता बापूंकडे, तुझ्याकडे...आता तसली ती मागणी करायची आमची— निदान माझी तरी मुळीच लायकी नाही. मी स्वतःला फार फार शहाणा समजत होतो, पण... पण... तू तर आज मला अगदी ठारच केलंस तुझ्या या प्रेमाने ! या क्षणी तुझ्या बापजाद्यांना तू जितकं वर चढवलंस, तितकंच मी माझ्या उमद्या मनाच्या अण्णांना खाली... खाली नरकात पाडलंय रे ! छे छे... सदाभय्या, नकोत नकोत रे मला ते पैसे... खरंच नकोत. ते माझे नाहीत. ते विष आहे ! हलाहल आहे ! जा, घेऊन जा परत. देत नाही म्हणून म्हण. घेऊन जा परत ! खरं खरं म्हणतोय तुला हे मी ! उपकार होतील माझ्यावर... आमच्यावर... "
माधव ते सारं एकीकडे बोलत होता नि एकीकडे मोठमोठ्याने हुंदके देत होता. गोपूमामा डोळे पुसत होता. इतर भाऊ कावरेबावरे झाले होते. त्यांची आई तर केव्हापासूनच आपल्या डोळ्यांना पदर लावून बसली होती. ती अखेर धीर आणून, खाकरून मला म्हणाली,
" होय सदानंद... पैसा येतो नि पैसा जातो. मी यांच्याच नाही का साऱ्या उलाढाल्या आयुष्यभर पाहिल्या ? पण त्या पैशानेच तर आपले डोळे फिरतात; नीती फिरते; संबंध फिरतात. छे, आम्हांला कोणालाच तुझे ते पैसे घेता येणार नाहीत... यांच्यातलं कोणी

तसं म्हणालं पुन्हा तर मी म्हातारी आता अन्नत्याग करून जीव सोडीन!"
गोपूमामाने डोळे पुसले; नारायण–केशव तसेच कावरेबावरे गप्प राहिले. मी बराच वेळ गप्पगप्पच थोपटल्यावर, मन आवरून डोळे पुसत माधव पुन्हा भानावर येत होता.
सारेच पुटपुटत होते .. छे छे... नाही... आम्हांला नकोतच ते पैसे...
मग चौफेर क्षणकाळ शांतता नांदू लागली.
भयंकर वादळ होऊन गेल्यानंतरची संमिश्र टवटवी त्यात दिसत होती.

*

शेवटी ती स्तब्धता मीच पुन्हा मोडली नि म्हणालो, "आता जरा सगळे शांत मनाने ऐका. एकदा एखाद्या व्यवहाराला असं कठोर तोंड फुटलं, की मग पुन्हा सारी अशी नुसत्या क्षणिक भावनेच्या आहारी जाऊ नका. तुम्ही म्हणता त्यात सत्य असलं, तथ्य असलं, तरी जगातला व्यवहार फार कठोर असतो. तो तरी मी आता बदलवू शकणार नाही. जरा माझ्याही बाजूने आता पाहा... इतकं सगळं झाल्यावर तुम्हांला द्यायला काढलेली ती रक्कम मी आता परत खिशात घालू? छे... ते काही शक्य नाही आता. तुमचा सर्वांना विश्वास आहे ना माझ्यावर? तर मग आता मी सांगतो ते ऐका."
सगळे स्नेहाने माझ्याकडे वळून पाहू लागले. त्यांच्या त्या दृष्टीत खरं खरं प्रेम होतं; कुतूहल होतं; माझ्याबद्दलची आस्था होती; याचा मला प्रत्यक्ष प्रत्यय येत होता.
तेव्हा मग मी त्यांना म्हणालो, "तुमच्या रावजींनी ही रक्कम ज्या भावनेने आमच्या आनांच्या हाती... त्यांच्या तरुणपणी दिली होती, त्याच भावनेने मी आज पुन्हा ती तुम्हा सर्वांच्या हाती संयुक्तपणे देत आहे. ती तुम्ही केव्हा तुम्हाला हवी तेव्हा, जमेल तेव्हा मला परत द्या, नाहीतर देऊ नका. मात्र अट माझी एकच आहे, माधव. तिचा उपयोग कसा करायचा ते माझ्यावर विश्वास ठेवूनच तुम्ही ठरवायचं. आतापर्यंत तुम्ही तुमचे मार्ग चोखाळून पाहिले; त्यांत अयशस्वी झाला; रावजी–अण्णांचं बरंचसं वैभव गमावून बसलात. आता हे माझं... आनाबापूंचं थोडं वैभव तुमच्याकडे येतंय. ते संभाळा... आता काही काळ, माझ्या कल्पनेने योजनेची काठी धरून तुम्ही चाललं पाहिजे. आमचे आना तुमच्या रावजींचा हात धरून असेच पुढे गेले बरं, माधव. रावजींचीच तुम्ही मुलं आहा ना? त्यांचे ते दहा आज ना उद्या तुम्हांलाही नक्कीच... भेटेल पुन्हा... खात्री आहे मला."
त्या वेळी सर्वांच्याच चेहऱ्यावर एका नव्याच उत्साहाचं, आशेचं तेज झळकलेलं मला दिसत होतं. तिथं स्मितं फुलली होती. नि साऱ्यांनी आपले डोळे पुसले होते.
मलाही खूप गदगदल्यासारखं झालं होतं. आवंढा गिळून क्षणभराने मी म्हणालो, "तेव्हा आता हे नक्की ठरलं आपलं. ही रक्कम तुमची म्हणा, माझी म्हणा, तुम्हा चौघा भावांनी आजपासून ती एकोप्याने वापरायची. कुटुंबाला कायम उत्पन्नाचा एक

नवा झरा तयार करायचा. त्यासाठी कामाचा व श्रमाचा अहोरात्र पूर वाहवायचा."

"सदानंद, सदानंद...अरे, आज तुझ्यात कसला तरी दैवी संचारच झाला आहे का रे ! देव तुला सदा सुखी करो...!" अतिशय गद्‌गद् स्वरात व अश्रुपूर्ण नेत्रांनी माझ्याकडे पाहत, भाबडा गोपूमामा खांद्यापाशी बिलगत म्हणाला, "तुझ्या नावाप्रमाणे देव तुला सदा आनंदात ठेवील बघ!"

*

निमा, त्या सर्व घटनांनंतर मला खरोखरच अगदी हलकं वाटत होतं. आतून आतूनच अगदी आनंदाचं भरतं येत होतं. प्रत्यक्ष त्या भावा-बहिणींमधे आलेल्या एवढ्या तेढीनंतरही रावजीअण्णांचं ते सारं कुटुंब माझ्या प्रेमाने मी फिरून एकदा पूर्णपणे जिंकलं होतं. त्यांच्यातल्या प्रत्येकात नवा उत्साह ओतला होता नि स्वतःही तो मिळवला होता.

त्याच रकमेतून मी आता आनच्या थिएटर कंपनीचे ते चौघे नवे शेअरहोल्डर करून करून घेतले आहेत. त्यांच्या कामात त्यांना गोवून टाकायचं मी ठरवलं आहे. कारण माधवसारखा चलाख, तडफदार माणूस, गोपूमामांसारखा प्रामाणिक कामसू माणूस, ते इतर दोघे बंधू—साऱ्यांनाच माझ्या नि शंभुनंदनांच्या नव्या व्यापात उपयुक्त स्थान आहे. रावजी फॅमिली नि आबा फॅमिली एक होऊन काम करू लागली, तर पूर्वीचे दिवस अगदी बघता बघता सहजासहजी येतील दारात, भेटायला पुन्हा.

"आपापसातल्या क्षुद्र भावना आपण आपल्यापुरत्या सोडून दिल्या की त्या आपोआप जगातून नाहीशा होतात. आपण सारी मंडळी एकत्र आलो की नानी नि तिच्या बरोबरच श्रीधरही आपसूक आपल्याच पायाने चालत येऊन सामील होईल आपल्याला—"

असं माधवला मी सांगतोय, तो रावजींच्या बायकोचे डोळे पाण्याने एकदम भारून आले. ती म्हणाली, "सुदैवी मी ! आजचा हा प्रसंग पाहायला मी अजून जिवंत राहिले आहे. खरंच... मला धन्य धन्य वाटतंय रे, सदानंद!"

शेवटी परत यायला मी उठलो तेव्हा सारे दारापाशी माझ्या भोवती जमले. माधवच्या आईने माझ्या डोक्यावरून आपला थरथरता हात फिरवला. मीही गद्‌गदित स्वरात सर्वांना म्हणालो, "तेव्हा अशी आहेत हो आपल्या समोरची ही क्षितिजं... असा आहे तो नव्या जमान्यातला प्रवास. पण आधी आपला एकोपा हवा, श्रम पाहिजेत... प्रेम पाहिजे, श्रेष्ठ ध्येय हवं."

खरंच निमा—मला आज ती सगळी नवी क्षितिजं समोर जणू हस्तगतच दिसत आहेत. तसंच मनात वाटत होतं... पटत होतं... त्यामुळेच, जिथं जिथं जात होतो तिथं तिथं — लोकांची इच्छा असो नसो— सदिच्छा, नैतिक विजय, प्रेम, एकोपा, आर्थिक नियोजन, साऱ्या साऱ्या गोष्टींना मी समूर्त करीतच जणू फिरत होतो.

तसल्या त्या जाणिवेनेच मला अननुभूत आनंद वाटत होता, जन्माचं सार्थक वाटत होतं.

तू समक्षच भेटायला हवी होतीस, म्हणजे मला आणली काय काय वाटतंय ते सांगितलं असतं. असो. भेटीची वाट पाहतो.

सात्त्विक सुखात रमलेला
तुझा सदानंद

## नवं नि जुनं

निर्मलेच्या घरी, एकत्र बसल्या बसल्या, दुपारी मंगलेने गंगाअक्काला सदानंदची ती तिन्ही पत्रं वाचून दाखवली.

अक्काला मोठी मौजच वाटली त्या साऱ्या घटनांची !

एक समाधानी स्मित करीत ती मंगलेला म्हणाली, "तरीच बरं का तो गोपूमामा नि माधव सदानंदाला इतके मानतात. किती सारखं काम करीत असतात आस्थेने, आपुलकीने. खरंच, नानींनी जेवढं त्या साऱ्यांना आपल्या रक्ताचं असून तोडलं, तेवढंच आमच्या सदानंदाने त्यांना जोडलं. फटकळ असला, तरी लहानपणापासूनच आहे तसा तो. दंभ नाही, देखावे नाहीत; मनाचा नेहमीच मोठा."

मग बोलण्यावरून बोलणी निघाली. नि मंगलेने आक्काला गतवर्षीच्या, आनांच्या श्राद्धदिनी घडलेल्या साऱ्या घटना सांगितल्या. त्या घटना प्रत्यक्ष घडत असताना, नि त्यानंतरही सदानंद, निर्मल, मंगल यांच्या अंतरंगात अगदी अफाट फरक पडत गेल्यासारखं झालं होतं; आज त्याच्या तोंडून प्रथमच ते सारं ऐकताना गंगाअक्काही अतिशय चकित झाली होती. प्रत्यक्ष जीवनात असल्या अतिशय अद्‌भुत गोष्टी घडतात, घडतील, यावर तिचा विश्वासच बसला नसता; आपल्याच निकटच्या माणसांनी आपल्यालाच ते सांगितलेलं सारं, म्हणूनच केवळ तिला विश्वास वाटून तिच्या अंगावर शहारे उभे राहून गेले होते.

*

त्या भावंडांची यंदाची ती सारीच दिवाळी कित्येक वर्षांनंतर मोठ्या आनंदात गेली होती. दिवस कसे भुरूभुरू उडून गेले ते कोणालाच समजलं नव्हतं.

सदानंदाच्या नव्या घरकुलात, त्याला साऱ्या प्रिय व्यक्ती प्रत्यक्ष या आठवणींच्या रूपाने हजर राहिल्या होत्या. साऱ्या जीवनात कधीच नव्हता असला संमिश्र गंभीर आनंद नि हळुवार भावनासाम्राज्य त्या सर्वांभोवती पसरलं होतं, असंच अखेर सासरी

परत जायला गंगाअक्का निघाली तेव्हा तिला नि साऱ्यांना मनापासून वाटलं होतं.

*

सदानंदने फर्स्ट क्लासची तिकिटं काढून दिली होती. सारी जणं स्टेशनावर निरोपासाठी आली होती. परत न्यायला आलेल्या आपल्या मोठ्या मुलाबरोबर गंगाअक्का गाडीत बसली. सर्वांनी हात हलवून तिचा निरोप घेता घेता गाडी स्टेशन सोडून बाहेर पडली.

गाडी धावू लागली तेव्हा अक्काच्या मनात राहून राहून वाटत होतं, " किती सत्य, किती करुणगंभीर...पण सारंच किती अद्‌भुत!... केव्हा केव्हा सत्य हे कल्पनेपेक्षाही अद्‌भुत, त्यापलीकडलं असतं म्हणतात, तेच खरं...आता आता..."

फर्स्ट क्लासच्या डब्यात ती पडली होती. शेजारच्या बाकावर तिचा मुलगा गाढ झोपी गेला होता. निळसर दिवा मंद धूसर प्रकाश पाडीत होता. ते वातावरणही काहीसं गंभीर अद्‌भुतच होतं. गाडीच्या एकसारख्या तालबद्ध आवाजाशिवाय सारं शांत होतं.

ती झोपण्याचा प्रयत्न करीत होती. पण तिचे डोळे मिटत नव्हते. त्या मंद निळसर प्रकाशात, ते सारेच न्यारे प्रसंग घडले तसेच पुन्हा एकदा तिच्या डोळ्यांपुढे थरथरत उभे राहिले व एखाद्या धावत्या चित्रपटाप्रमाणे तरळत पुढे सरकले.

## स्वप्नांची दुनिया

" आत्या आली...आत्या आली..." मुली आनंदाने ओरडल्या : थांबत असलेल्या टांग्याच्या घुंगुर-टापांचा आवाज सदानंदच्या कानी पडला.

थांबलेल्या टांग्यातून निर्मला एक छोटीशी बॅग हातात घेऊन खाली उतरली. हसत हसत ती पुढे येत होती. सदानंद जिना उतरत पुढे होऊन म्हणाला, " म्हणजे ? अशी एकाएकीशी ग, निमा ?...चार ओळींचं कार्ड तरी— "

" का ? वाटलं यावंसं—" सदानंदकडे बॅग देत, चालता चालता, निर्मलेने जवळ आलेल्या पद्मा-पुष्पांना दोन्ही हातांनी विळखा घातले. पोरींनी लाडानं दोन्ही बाजूंनी आपल्या कमरेला मिठ्या मारल्यामुळे, थोडं अडखळत अडखळत चालत येऊन ती सदानंदमागून वरच्या हॉलमधे शिरली.

स्वयंपाकघराकडे शिरता शिरता ती हळूच म्हणाली, " आणखीही तसंच एक कारण झालंय, सदा...पण मग सांगते. "

मंगल पुढे झाल्यावर दोघी चुलीपाशी गेल्या. निमाचा चहा होईपर्यंत सदानंद पाटावर बसून मामुली चौकशी करीत होता. मग भाऊ-बहीण दोघं गॅलरीत जाऊन शेजारी उभी राहिली.

*

शांतता मोडून निर्मल हळूच कुजबुजली, "मला ना, सदाभय्या, आपले आनाबापू भेटले रे आज पहाटे —"

एकदम दचकून, सदानंदाने आश्चर्याने तिच्याकडे पाहत विचारलं, "काय! आना!...आपले आना!! अग म्हणतेस काय निमा?"

"होय...तेच मला दिसले. अगदी माझ्याजवळ आले. माझ्या कपाळावरून त्यांनी हळुवार थरथरता हात फिरवला. नि मला म्हणाले, 'ऊठ...निमा, ऊठ...तुला सदानंदाने सकाळी बोलावलंय त्याच्याकडे... वाट पाहतोय तुझी. मग!...उठतेस ना? जातेस ना?' मला जाग आल्यावर पुन्हा झोपच येईना. चैनच पडेना जिवाला. थोड्या वेळाने उठले. सारं लौकर लौकर आवरलं. प्रभाकरांना ते सांगितलं नि म्हणाले, तुम्ही पण चला येता तर. पण आज सबंध दिवसभर त्यांच्या पार्टीचं काम आहे त्यांना. तेव्हा मग मी आपली चटकन माझी बॅग भरली, बसने स्टेशन गाठलं नि गाडीने ही आता इथं अशी पोचतेय."

अगदी साभिप्राय नजर लावून ती सदानंदकडे पाहत होती. ते सारं ऐकून सदानंदही क्षणभर खिळल्यासारखाच झाला होता.

मग थोड्या गांभीर्याने सदानंद तिला म्हणाला, "होय निमा, रात्री तुझी खूप खूप आठवण काढली होती खरी मी नि मंगलने. तुला गेल्याच तीनचार दिवसांत तीन पत्रं लिहिली. रात्री झोपताना वाटत होतं, आणखीही एक चौथं पत्र पाठवून मनातली सारी मळमळ काढावी. पण असा काही दमलो होतो म्हणतेस!...तसाच जाऊन झोपलो झालं. अग 'मेन्टल टेलिपथी'— मानस संदेश म्हणतात नाही का! त्यातलंच सारं दिसतंय हे...तुझ्या मनाने मधे एक ते तसं आनांचं सोयीस्कर दृश्य चित्र रंगवलं एवढंच...माझ्या प्रबळ इच्छेचा तो संदेशच तुला, तू होतीस तिथं मिळाला हो एकूण. पण मग, आलीस उठून इकडे तडकाफडकी, ते खरोखर छानच झालं. असं काही अद्भुत घडलं नसतं, तर मुद्दाम हातातली कामं टाकून कशाला येणार होतीस आज अशी मधेच उठून? मला, निमा तुझ्याशी खूप खूप बोलायचं आहे..."

*

मग निर्मल-सदानंद दोघं स्वयंपाकखोलीतच गप्पा मारीत बसली होती. आदल्या दिवशी पोस्टात टाकलेलं आपलं तिसरं पत्र तिला मिळालं नसणार हे लक्षात येऊन, 'रावजी व्हीला'मधला तो सारा प्रसंग सदानंद निर्मलला इत्थंभूत सांगत होता.

मंगल हाताने इकडे स्वयंपाकाचं काम करीत होती, इकडे कानाने त्या भावाबहिणीचं दिलखुलास हितगुज ऐकत होती.

निर्मल आली म्हणून तिने दूध आटवलं होतं. दोन भाज्या, भात, सारं खाली उतरलं होतं नि ती पुऱ्या लाटायला बसली होती.

लागलीच निर्मला तिच्या मदतीला पुढे झाली. ती पुऱ्या लाटू लागली. मंगल कढईत

सोडत होती. तोंडाने त्या तिघांच्या गप्पा चालूच होत्या. सदानंदची बडबड अखंड चालूच होती.

बाहेर गॅलरीत पोरी भातुकलीचा खेळ मांडून बसल्या होत्या. निमाआत्याने त्यांना नुकत्याच दोन फुगलेल्या पुऱ्या दिल्या होत्या. आत्यावर नि आपल्या रंगलेल्या खेळावर अगदी खूष होऊन त्या दोघी आपापसात पुटूपुटू बडबड करीत होत्या.

तेवढ्यात तिकडून, गॅलरीकडून त्या दोघींच्या एकदम मंजूळ ललकाऱ्या आल्या—

"ओ! अग बघ...आज्योबा आले, आज्योबा आले! अग निमाआत्या, बघ बघ! इकडे ये आधी!"

*

त्यांच्या त्या ललकाऱ्यांनी निर्मला एकदम केवढ्याने तरी दचकून सदानंदकडे पाहू लागली. सदानंद पटकन उठून बाहेर आला. सगळीच स्वयंपाकघरातून लगबगीने गॅलरी-कडे आली.

तेवढ्यात त्या पोरी टाळ्या वाजवीत ओरडू लागल्या, "ओ, मोठी आजी पण आली!"

खरोखरच दारात टांगा उभा राहिला होता. सदूकाका खाली उतरले होते नि हळू जपून पाय टाकत, वृद्ध भागाआत्या रस्त्यावर उतरत होती.

झपझप सदानंद पुढे झाला. त्याने आत्याला हाताने धरलं. ती तिघंही हळूहळू जिना चढून वर आली.

निर्मलकडे पाहून धाप टाकीत आत्या हसून म्हणाली, "तूही आहेस का इथं! छान छान..."

मंगलकडे पाहून सदानंद हळूच साश्चर्य पुटपुटला, "अग हे आज आहे काय हे! आपल्याकडे निमा आली... आता सदूकाका .. भागाआत्याही आलीय..."

हसत हसत, आत्याला हाताने धरून, मंगल तिच्यासह स्वयंपाकघरात गेली.

दिलेल्या पाटावर बसल्या बसल्या भागाआत्याने चुलीपाशी चौफेर पाहिलं. चुलीच्या पाट्यावर नि ओट्यावर भाज्या, आमटी, भात, चटणी-कोशिंबीर यांची, झाकण्या टाकलेली लहानमोठी पातेली नि बकमं रांगेने ठेवलेली दिसत होती. परातीत पुऱ्यांचा ढीग, पेटत्या स्टोव्हवर अधूनमधून धूर येणारी कढई नि चुलीवर, दणकावलेल्या विस्तवावर, मोठ्या पातेल्यामधे, आत चिनी मातीची चकती टाकल्यामुळे रटमटत असलेलं केशरी दूध आटताना दिसत होतं.

पाहता पाहता आत्यांच्या वृद्ध चेहऱ्यावर एकदम अनेक स्मितरेषा चमकून गेल्या. मोठ्या समाधानाने ती म्हणाली, "ठीक ठीक... म्हणजे तुम्ही नवीन मंडळींनीही अगदीच ताळतंत्र नाही सोडलेलं अजून... आठवण ठेवलीयत तर या आजच्या दिवसाची..."

*

तेवढ्यात कोट–कपडे काढून, पाय धुऊन सदूकाका स्वयंपाकघरात शिरले. त्यांना टॉवेल पुढे करीत असलेल्या सदानंदला व सर्वांनाच उद्देशून ते म्हणाले,

" अरे...इकडं यायला निघावं, निघू नये, असं सारखं घुटमळणं चाललं होतं बरं का भागाचं सकाळपासनं ..चारदा म्हणाली मला की आपल्याला आज उठल्यापासनं सारखी यशोदावहिनीची आठवण होतेय; निमा–सदानंदची आठवण होतेय; सदानंदकडे जाईनसं वाटतंय...शेवटी मीच टांगा आणवला नि सरळ भागाला म्हणालो, ' चल बघू झटपट. मनात आलंच आहे तुझ्या, तर असेच निघू या. आता जेवायची वेळ झालेली असेल खरी...पण सदानंदचं घर म्हणजे काय, आपलंच. होईल सारं. थोडा आणखी वेळ होईल...नि आज तर न बोलावताही तिथं जायला हरकत नाही, जायलाच पाहिजे— "

आपल्याबद्दल तसल्या सदूकाकांच्या आपुलकीच्या शब्दांनी, भावनांनी सदानंदला मनातल्या मनात मूठभर मांस चाढल्यासारखं झालं. पण शेवटच्या उल्लेखाने तो किंचित गोंधळलाही होता --

" इथं आले...नि निमाही आधीच आलेली पाहून मनाला कसं बरं वाटलं..." भागाआत्या हसून जवळ बसलेल्या निमाच्या मानेवर हात टाकून तिला जवळ ओढीत म्हणाली.

## च म त्का रां ची कि म या

निर्मलेलाही खूप आनंद वाटत होता. तिने सदाकडे पाहिलं, पण मग आत्यानं मघा बोलता बोलता काय म्हटलं ते नीट न समजून सदानंदच अखेर म्हणाला,

" पण... कसली ग आजच्या दिवसाची आठवण म्हणालीस तू आतू, मघा ? "

" अरे...मग हे दूध, या पुऱ्या, भाज्या, सार, सारी सारी पक्वान्नं चालली आहेत. ती कसली इथं बाबा ? " भागाआत्या मंद हसून म्हणाली, " असं आहे सदा, पुरुषांचं मन सदा बाहेर भटकत असतं.. तरी नशीब आम्ही बायका असतो घरात. त्याच असल्या परंपरा आठवण ठेवून संभाळतात, म्हणून बरं. माझी सुनबाई ढीगभर शिकली तरी आहेच तशी गुणाची— "

आपल्या सासूबाईंच्या त्या अनाहूत गौरवशब्दांनी मंगल मनात थोडी आनंदली; पण एकदम चपापलीही. खरं काय ते सांगून टाकावं म्हणून ती लागलीच म्हणाली,

" पण...खरं झालंय ते असं की, गेले चारपाच दिवस हे कधी जेवायलाही धड घरी नसत; यांचं ते थिएटरचं काही जमत होतं ना ! कामामागून कामं आपली निघतच होती नि यांची बाहेरची पायपीट आपली चाललीच होती. नक्षत्रच जणू पडलं होतं

पायावर यांच्या. ते सगळं झालंय आता. सकाळीच म्हणाले, 'आज एकदम ऐसपैस आराम...कुठे जाणार नाही आहे मी.' तेव्हा म्हटलं, आज घरीच आहेत अनायासे; जरा बरंसं चमचमीत जेवण करू या. म्हणून सैपाकाला सुरवात केली. तेवढ्यात कसला हासभास नसता सकाळीच निमावन्संही आल्या. मग इथं पुऱ्या करायचं ठरवलं...आणि आता...अशी तुम्ही दोघं—"

"पण तू कसली आजची आठवण म्हणत होतीस आत्या? ते राहिलंच—" तिला बिलगून निर्मलने पुन्हा विचारलं.

आता मात्र उलट भागाआत्याच गोंधळली होती. सदानंद, मंगल, निर्मल—साऱ्यांचा तो एकच प्रश्न होता. तिला समजलं, आपले आडाखे सगळे चुकले आहेत. जेवणाच्या त्या गोड जय्यत तयारीत केवळ योगायोगच आहे. मात्र तरीही, त्यातूनही, सर्वांचं तसं एकत्र येण्यातनं अनपेक्षित गोड औचित्य निर्माण झालं होतं... त्याचीच म्हातारीला गंमत वाटली.

सगळ्यांवरून आपली मंद दृष्टी फिरवीत, किंचित घुटमळत, अखेर भागाआत्या म्हणाली, "अरे, तुम्ही सारीच हे विसरलात कशी रे? पण मग, तरीही अनायसेच असा साजरा होतोय हा दिवस, हे तरी काय कमी आहे? अग निमा...अरे सदा... आज म्हणजे वार्षिक श्राद्धदिन नाही का आपल्या आनाबापूंचा??"

*

ते ऐकून निर्मल, सदानंद, मंगल—सारीच एकदम दचकली. तिघांनीही एकमेकां-कडे साश्चर्य अर्थपूर्ण दृष्टिक्षेप टाकले.

क्षणभरात भागाआत्याने चटकन केरसुणी हाती घेतली. डावा हात कमरेवर उताणा टाकून, थोडं पुढे वाकून ती स्वयंपाकखोलीचा केर काढू लागली. निर्मलने पाट मांडायला घेतले. मंगल स्टेनलेसची ताटं–वाट्या पुसत होती.

गंजिफ्रॉक वगैरे काढून सदानंद व सदूकाका स्वयंपाकखोलीच्या बाहेरल्या दारापाशी उंबरठ्यावर, ऐसपैस हातपाय पसरून गप्पा मारीत बसले होते. जवळच साऱ्यांना मदत करण्याचा आव आणून पद्मा–पुष्पा लुडबुडत होत्या.

इतक्यात हळूच एकदा टक् टक् असा दारावर आवाज झाला.

"इतक्यात कोण तरी दारावर आलंय वाटतं...बघा जरा उठून—" मंगलने नवऱ्याला सूचना दिली.

तोच पुन्हा तसंच टक् टक् वाजलं. एकामागून एक दोनतीनदा वाजलं. सदानंद झटकन उठला नि त्याने "आलो हं" म्हणत पुढल्या दाराची कडी काढली व दरवाजा उघडला.

कोणी तरी एक अगदीच अपरिचित मनुष्य दारात उभा होता.

*

तो साठीपुढचा वयस्क अनोळखी माणूस दारात उभा राहून, भांबावल्या-गोंधळलेल्या नजरेने पण हसऱ्या चेहऱ्याने आतल्या साऱ्यांकडे पाहत होता. घरातली सगळी काही बावरल्या दृष्टीने त्यांच्याकडे पाहत होती.

चुरगळलेला जुनासाच लांब कोट, त्यावर जुन्या रेशीमकाठी उपरण्याची चार बोटी पट्टी फेरून डाव्या खांद्यावरून टाकलेली, गुडघ्याखालपर्यंत थोडंसं वर चढून नेसलेलं जुनं धोतर, पायात जाड जाड कोल्हापुरी वाहणा, डोक्यावर जरा जास्त फुगवून बांधलेला जुना पांढरा कोशा, वरल्या ओठावरून दोन्ही गालांवर दोन बाजूंना पसरत गेलेल्या पांढऱ्या पांढऱ्या शुभ्र मिश्या, कपाळाला तांबड्या गंधाचा पैशाएवढा टिळा, कानशिला-वर पांढऱ्या गंधाचे ठिबके, कानाच्या पाळ्यांवरही केसांचे झुबके, गळ्यात रुद्राक्ष-तुळशीमाळा...

दार उघडलं जाताच एक पाऊल पुढे टाकून, एक मंद स्मित करीत, आपले गंभीर पण वृद्ध बोलके डोळे त्याने सदानंदकडे लावले.

आपल्याच माणसांत आपण तसे ऐसपैस नि घरगुती पद्धतीने वावरत असताना, कोणीतरी अगदी अनोळखी मनुष्य जरा अवेळीच आल्यावर, आपल्याला जसं अगदी अवघडल्या-गोंधळल्यासारखं होतं, पण मग आलेल्याचा अपमान न करता, त्याला शक्य तितक्या लवकर बाजूस करण्यासाठी, आपण थोड्या औपचारिक रुक्ष आस्थेने जसे चारदोन प्रश्नही नाइलाजाने विचारतोच, तसल्याच काहीशा गडबडल्या विचलित स्वरात, सदानंदने आश्चर्य व्यक्त करीत त्याला विचारलं,

"कोण आपण ?... या... या बसा तरी... काय हवंय आपल्याला ?"

तो वृद्धही थोडा घुटमळलाच. काय नि कसं विचारावं, हेच त्याला समजत नसावंसं दिसत होतं. त्यामुळेच त्याच्या चेहऱ्यावर ओशाळं बावळट स्मित तेवढं दिसत होतं. सदानंदला क्षणभरच वाटलं, काही तरी याचना करायला, मदत-वर्गणी मागायला तर आलेला नसेल ना हा ?"

तेवढ्यातच, तोवर दारातच ओशाळ्या घुटमळत असलेला तो वृद्ध पटकन घरात पाऊल टाकून सदानंदला म्हणाला, "मी का ? मी... धोंडुबुवा वाठारकर- तुम्ही नाही ओळखणार कोणी मला... पण सदानंदरावच ना तुम्ही ?"

*

सदानंद अतिशय चमकला--किंचित वरमलाही होता. तोपर्यंत पुढे होऊन धोंडुबुवा अगदी आपुलकीने एका खुर्चीवर बसलेही होते.

तेव्हा त्यांच्या जवळ जाऊन, अडखळल्या शब्दांत सदानंद त्यांना आस्थेने म्हणाला, "हो, मीच सदानंद. मला कसं ओळखता आपण ? नि मी कसं ओळखत नाही बुवा आपल्याला ? माझं काही विस्मरण का होत आहे ? माफ करा हं... माझी काही चूक होत असेल तर..."

धोंडुबुवांच्या तसल्या त्या एकतर्फी ओळखीने सदानंद तर अधिकच बुचकळ्यात पडला होता. तेवढ्यात धोंडुबुवाच पुढे म्हणाले,

" सदानंद स्वामींच्या शिष्यांपैकीच मी एक आहे. आता मात्र ना आगा ना पीछा; तेव्हा फिरत असतो नेहमी असाच कुठून तरी कुठं तरी. आठवड्यापूर्वी सहजच मुंबई-कडे झुकलो होतो. तो आज सकाळीच अकस्मात एक कामगिरी माझ्या अंगावर येऊन पडली. तेव्हा मग ठाकुरद्वारच्या एका ओळखीच्या माणसाला भेटलो. तिथं पटकन तुमचा पत्ताही नीट मिळाला. मग आलो तसाच गाडीत बसून इकडे. हुडकत हुडकत खूप भटकलो. आता नुकतं कुठे घर सापडलं हे अखेर. आणि... आणि... अखेर ही आपली समक्ष भेट होऊन, आपण हे असे या क्षणी बोलत आहो — आहे की नाही गंमत ? बरं झालं... चला, त्या निमित्ताने ही भेट झाली ! "

सदानंद अधिकच बुचकळ्यात पडला. तोंडातल्या तोंडात तो पुटपुटला, " मी कसा नाही ओळखत तुम्हाला ? "

" छे छे... अलीकडे तर कधीच पाहिलं नसेल तुम्ही मला... " आपलं सुरकुतलेलं तोंड नि पांढऱ्याशुभ्र मिश्यांचे झुबके-कल्ले उपरण्याने ऐसपैस पुसत धोंडुबुवा म्हणाले, " तसं मीही तुम्हांला तुमच्या अगदी लहानपणी पाहिलं आहे एकदोनदा... एकदा तुम्ही चारसहा महिन्यांचे असताना स्वामींनी तुम्हांला आपल्या हातात घेतलं होतं, त्यांनी सांगितलं म्हणून मीही तुम्हांला माझ्या हातांच्या पाळण्यात अलगद धरून तुमच्या मातोश्रींकडे नेऊन दिलं होतं... नक्की आठवतंय मला. "

त्या इतक्या वर्षांपूर्वीच्या त्यांच्या तपशिलाने सदानंद चमकला, तरी हसत हसत म्हणाला, " असेल, असेल. आज का एवढी धावाधाव... तसदी ? "

" धावाधाव तर खरीच... जुनं हाड म्हणून टिकलंय... तरी आता जमत नाही हो पूर्वीसारखं...हं ! " धोंडुबुवा हसत हसत पुन्हा मिश्या गोंजारून म्हणाले, " पण करता काय ? धावलंच पाहिजे... मित्रकार्य पडलं ना ? येणं पडलं... "

" मित्रकार्य ?... नि कामगिरी कसली म्हणता ? " उत्सुकता कुतूहलाने दडपलेल्या अंतःकरणाने सदानंद म्हणाला.

" हं... हं... तसे घाबरू नका बरं, सदानंद... " धोंडुबुवा किंचित मिस्किल हसत म्हणाले, " समोर दिसतोय एक अनोळखी म्हातारडा—तुम्ही म्हणाल आपलं— याला काही मागायचंय आपल्याकडे — आला लोकांना सतवायला... पण तसलं नाहीय बरं आमचं... मला उलट काही द्यायचंय तुम्हाला इथून जाण्यापूर्वी... "

" मला द्यायचंय ?... ते काय ? ?... " सदानंदच्या कोड्याची आता अगदीच परमावधी झाली होती.

सस्मित चेहऱ्याने, संथपणे धोंडुबुवा म्हणाले, " मला द्यायचाय तुम्हांला एक निरोप. "

" निरोप ? कोणाचा ? कशाबद्दल ? "

" हो— निरोप आहे तुम्हांला अनंतरावांचा...आज पहाटेच भेटले मला ते—"

सदानंदला आता तर भयंकर चपापल्यासारखं वाटलं. त्याने गोंधळल्या शब्दांत धोंडुबुवांना विचारलं, " अनंतराव ? कोण अनंतराव ?"

" हो, अनंतरावच... तुमचे वडील... आपले आनाबापू हो... " जसं काही साहजिक गोष्टीबद्दल बोलावं तसंच थंडपणे धोंडुबुवा म्हणाले.

*

" काऽय, म्हणता काय ?...आमचे आनाबापू भेटले तुम्हांला ? आज पहाटे ?" अगदी सर्द होऊन, विस्फारलेल्या डोळ्यांनी धोंडुबुवांकडे पाहत, सदानंद जवळ जवळ ओरडलाच मोठ्याने, नि मग आत पाहून तो निर्मलाला म्हणाला, " ऐकलंस निमा ? यांनाही आज पहाटे आना भेटले होते, म्हणताहेत हे—"

" खरं ?" आश्चर्याने उद्गारत, निर्मल त्या दोघांच्या जवळ लगबगीने जाऊन उभी राहिली.

क्षणभराने धोंडुबुवा सगळ्यांकडे पाहत संथपणे सांगू लागले,

" त्याचं असं झालं पाहा, बऱ्याच म्हणजे अगदी बऱ्याच वर्षांनी ते मला आज भेटले. कसला हासभास नाही, मनात आठवण डोकावलेली नाही— चालत चालत माझ्या अगदी समोरच येऊन उभे राहिले. काचा मारलेला, पायांत स्लिपर, त्यांचा तो नेहमीचा करडा डगला अंगात घातलेला, जरीचा तांबडा रुमाल त्यांच्या पद्धतीप्रमाणे चापून-चोपून डोक्याला बांधलेला...माझ्याजवळ हसत हसतच आले—"

तेवढ्यात निर्मलने एकदम कुतूहलाने भांबावल्या स्वरात त्यांना मधेच विचारलं, " आनांच्या हातात ती करव्याकरव्याची काठी होती का हो ?"

मनाला एकदम पटल्यासारख्या स्वरात ऐसपैस मान हलवून धोंडुबुवा चटकन् म्हणाले, " काठी ?— बरोबर... अगदी बरोबर...करव्याकरव्याची नि मूठ वाघाच्या तोंडाची, खालच्या टोकाला पितळी पट्टी बसवली होती...हो ना...ती काठी टेकत टेकतच माझ्याजवळ आले अनंतराव—"

" अय्या, खरंच ?" डोळे विस्फारून निर्मल आश्चर्याने म्हणाली, " मला असेच दिसले—"

" माझ्या जवळ आले नि मला म्हणाले, ' अहो धोंडुबुवा, जरा सवड काढून, मुद्दाम तसदी घेऊन आमच्या सदानंदकडे जा बरं आधी, नि त्याला माझा निरोप सांगा : ' छान केलंस. मला आवडलं...फार फार बरं वाटलं मनाला.' मी त्यांना काही विचारणार, तेवढ्यात—मी त्यांच्याकडे पाहत असतानाच—ते आले तसेच चालूही लागले; पाठमोरे होऊन, चार पावले पुढे जाऊन मागे वळत पुन्हा म्हणाले, ' समजेल त्याला सर्व—एवढंच सांगा, म्हणजे झालं.' "

*

केवढ्याने दचकला सदानंद! नकळतच त्याने मंगलेकडे पाहिलं. तीही त्याच्याकडे चपापून भावपूर्ण चेहऱ्याने पाहत होती. तिला सदानंदची रात्रीची ती भावविवश बडबड सारी आठवत होती.

"मलाही असेच दिसले ते...असेच आले नि असेच गेले. तुम्ही म्हणता तोच पोषाख सगळा... सव्वाचारची गोष्ट असेल पहाटेची ही—" निर्मला त्या साऱ्या प्रकाराच्या अद्‌भुततेने गोंधळून पटपट म्हणाली.

"हो ना?...बरोबर..." धोंडुबुवा आपल्या खिशातले रास्कोप घड्याळ काढीत म्हणाले, "नक्की असेल... या माझ्या घड्याळात मी जागा झालो तेव्हा...अं... साडेचार झाले होते...नक्की."

सगळीच अचंब्याने त्या दोघांकडे आलटून-पालटून पाहत होती. सदानंदचं मन तर सुन्नच झालं होतं.

तेवढ्यात धोंडुबुवा पुन्हा पुढे म्हणाले, "पण मग—बरं का, जाण्यापूर्वी त्यांच्या तोंडून आणखी एक कसलासा शब्द मोठ्याने उचारलेला माझ्या कानी पडला होता. जागं झाल्यावरही मी तो लक्षात ठेवला होता. अं.. अं...अगदी आतापर्यंत घोकत होतो हो मी तो, लक्षात राहावा म्हणून...अं... हा एवढ्यातच विसरलो बघा— काय बरं म्हणले ते?...अं...थांबा, सांगतो हं..."

बेचैनीने आपली मान आपल्याशीच हलवत धोंडुबुवा बोलता बोलता गप्प झाले होते खरे, पण त्यामुळे सर्वांच्याच हृदयात एक अद्‌भुत धडधड सुरू झाली होती. सगळी अगदी गप्प राहिल्यामुळे तिथे कमालीची शांतता पसरली होती. सर्वांचे डोळे मोठ्या कुतूहलाने, उत्सुकतेने त्या अपरिचित म्हातारबुवांकडे लागले होते.

तोच एकदम आठवून धोंडुबुवा मोठ्याने म्हणाले, "हं हं...आता आठवलं...प... फ...ट...ठ...फ . ट...प...ठ...बस्स...बस्स. नक्की आता. बापू म्हणाले, 'फोटो-पाठी'...आता आठवलं बघा पक्कं–हो...'फोटोपाठी' असेच काहीसे शब्द होते ते—म्हणजे काय! बघा बुवा तुमचं तुम्हीच... काय तुमचं असेल ते...'फोटोपाठी' हे शब्द मात्र निश्चित—"

त्या शब्दांनी पुन्हा भयंकर चमकून, सदानंद जागचा उठला नि आपल्या खोलीतल्या टेबलावरील फोटोकडे जायला निघाला.

*

तोच धोंडुबुवाही खुर्चीवरून पटकन् उठले नि सर्वांकडे स्नेहाळ स्मित करून प्रेमळ चेहऱ्याने म्हणाले, "बरं आहे मंडळी, माझं काम झालं. घेतो मी सर्वांचा निरोप आता...तसदी माफ करा हं..."

ते तसे चालू लागणारही, इतक्यात सदानंद थबकला. त्यांना काही सरबत, चहा विचारावं असा त्याचा विचार चालला आहे, एवढ्यात थोडं पुढे होऊन भागाआल्याने

त्याला सूचना केली, " अरे सदानंद, वेड्या, बुवांना आता जेवायलाच राहवून घे की. त्यांना म्हणावं, आज श्राद्धदिन आहे आनाबापूंचा. तेव्हा पंगतीचे सत्पात्र अतिथी व्हा आमच्याकडे. "

दाराजवळून धोंडुबुवांनी स्वतः ते शब्द ऐकले नि परत फिरत आपणहूनच ते म्हणाले, " काय म्हणता काय?... आनाबापूंचं श्राद्ध आहे आज!... तर मग जरूर राहिलंच पाहिजे जेवायला. त्यांच्या घरचे चार घास त्यांच्या आठवणीने खाऊन मगच जाईन मी कुठं तो. "

आणि अगदी एखाद्या घरच्या माणसाप्रमाणेच धोंडुबुवांनी आपला डगला काढला नि डोक्याचा कोशा सोडायला सुरुवात केली.

पानं वाढलीच होती. हातपाय धुऊन धोंडुबुवा, सदूकाका, सदानंद, निर्मला, पद्मा, पुष्पा—सारी एका पंगतीत जेवायला बसली. मंगल नि भागाआत्या वाढत होत्या.

संथपणे जेवणं झाली. आचवल्यावर म्हातारबुवांनी मोठाथोरला ढेकर देऊन, हळूहळू एक एक करीत आपले सगळे कपडे अंगावर चढवले.

आणि मग आनाबापूंचा सदानंदसाठीचा तो न्यारा निरोप देऊन, तसे एकाएकी अचानकपणे घरात शिरलेले धोंडुबुवा वाठारकर सर्वांची रजा घेत, जसे कुठूनसे आले होते तसेच कुठेसे निघूनही गेले.

## अद्‌भुत पुनर्भेट

केवळ नाइलाजानेच, इतका वेळ मनातल्या मनात दडपून ठेवलेली उत्सुकता सदानंदला आता मात्र मुळीच चैन पडू देईना. " फोटोपाठी " म्हणून निरोप सांगणारे ते धोंडुबुवा जिना उतरून जाताक्षणीच, तो फोटोपाठीच धावायला आपल्या खोलीत झपझप पावलं टाकीत शिरला.

टेबलावरच तो आबा-आनांचा एकत्र फोटो होता. आनांनी त्या दिवशी, निर्मलेबरोबरच्या त्या अखेर भेटीवेळी, त्याच्याकडे तो दिल्यापासूनच त्याने तो आपल्या टेबलावर ठेवला होता. यापूर्वी त्याने तो हजारदा उचलून आपल्या हाती घेतला होता. पण तोच फोटो आज तिथून उचलताना, त्या क्षणार्धात इतक्या तीव्र भावनांचा अद्‌भुत, अभूतपूर्व कल्लोळ सदानंदच्या मनात होत होता, की त्याचं जवळ जवळ भानच हरपलं होतं.

तो हाती धरताच " फोटोपाठी " हे शब्द पुन्हा त्याच्या कानात दुमदुमून तो अस्वस्थ झाला. " म्हणजे याच फोटोपाठी? " या कुतूहलाने त्याने ती फ्रेम उलट फिरवून पाहिली.

पण तिथं तर खूप धूळ साचली होती नुसती, दुसरं काही एक नव्हतं. पाठीला चिकटलेला ब्राऊन पेपर मधून मधून झुरळांनी–कसरींनी कुरतडला होता. धूळ झाडल्यावर देखील तो सगळीकडे पार काळवंडलेला दिसत होता. त्याला ठिकठिकाणी पापुद्रे सुटले होते.

तो गोंधळला. क्षणकाळ त्याला काही एक बोधच होईना. तो पार निराश झाला.

तेवढ्यात त्याचं लक्ष त्या ब्राऊन पेपराखालच्या फ्रेममागल्या जुनाट देवदारी फळीकडे गेलं. कित्येक वर्षांपूर्वी ती चार बारीक स्क्रूंनी मागे घट्ट बसवली होती. ते स्क्रू तर साफ गंजले होते. एकदा ते तिथं जाऊन बसल्यावर, त्यांचा बापड्यांचा कोणाशीही कधीच कसला संबंध आला नव्हता. कोणाचा हस्तस्पर्शही कधी झाला नव्हता.

एकदम एक कल्पना डोक्यात चमकून, सदानंदने स्क्रू-ड्रायव्हर हातात घेतला. हळूहळू एकेक स्क्रू जागचा अलगद काढला. ते चारी निघाले, नि त्यांच्या पाठोपाठ इतकी वर्षे त्या ठिकाणावर निश्चल असून असलेली ती देवदारी फळीही स्थानभ्रष्ट होऊन, निखळून त्या चौकटीमधून बाजूला सरकली. पुढली काच, मधला फोटो नि मागली फळी अशा तीन बाजू टेबलावर निरनिराळ्या झाल्या.

फोटोवर साचलेली व काचेतूनही आत शिरलेली धूळ चारी बाजूंनी टिचक्या मारून साफ करता करता, सदानंदचं लक्ष एकदम त्या फोटोच्या पाठीवर "सेल्टोना" कागदाच्या मागल्या कोऱ्या बाजूवर गेलं—नि तिथं पाहता पाहता तो केवढ्याने एकदम दचकला...

त्या जुन्या फोटो प्रिंटमागल्या कोऱ्या पाठीवर, सदानंदला चिरपरिचित असं, आनांबापूंचं सुवाच्य हस्ताक्षर एकदम दिसलं.

*

मोठ्या उत्सुकतेने, धडधडत्या छातीने, त्याने फोटो उचलून जवळ घेतला.

फोटोपाठी मध्यभागी चौकटीत लिहिलेला तिथला तो मजकूर सदानंदने आपल्या साऱ्या आयुष्यात त्या क्षणीच, अगदी पहिल्या प्रथमच पाहिला होता.

प्रथमच वाचायला मिळत असलेला तो मजकूर त्याने अधाश्यासारखा भरभर वाचायला सुरवात केली.

अगदी स्वतःच्या अक्षरात, बहुतेक ती फ्रेम करायला देण्यापूर्वीच आनांनी तो मजकूर लिहिलेला असावा हे त्याने सहजच ताडलं.

सदानंदने तो मजकूर एकदा भरभर वाचला नि मग एकदा, दोनदा, तीनदा... अनेकदा फिरून तो तेच वाचत राहिला. प्रत्येक वेळी त्याचं आश्चर्य वाढतच होतं.

चौकटीत लिहिलेला तो मजकूर होता :

*

आबा—आना

**आबांचा आनाला अखेरचा आदेश**

" ईश्वराचं हे जग अगदी अफाट आहे. त्यात विष आहे, तसंच अमृत आहे. प्रकाश आहे, तसाच अंधार आहे.

" आपल्या वाट्याला दोन्ही येत असतात. पण दुःख मात्र कोणालाच नको असतं. तथापि, सगळंच आपल्या मनासारखं कुठून व्हायला ? भोग हे भोगावेच लागतात.

" तरी पण मनाचा तोल कधीच सोडू नये. सन्मार्ग हाच आपला मार्ग... मग... चांगल्या माणसांना चांगल्यांच्या भेटी केव्हा ना केव्हा होतातच. पुन्हापुन्हा त्या होतातच...

" हा आबाजीमास्तर तुम्हांला सांगतोय... लक्षात ठेवा... विश्वास ठेवा... मी जातो. माझा चेहरा आता तुम्हांला दिसणार नाही. पण... पण... चेहरे बदलले,... तरी पण, तुम्हांला पुन्हा पुन्हा हजारदा ओळख पटेल— चेहरे बदलतील, पण तरीही, मी... भेटेन पुन्हा निश्चित... अगदी निश्चित भेटेन पुन्हा— "

| | |
|---|---|
| — आबांचा जन्म | — आबांचा मृत्यू |
| / १८५५ | / १८९७ |

*

आबांचे ते शब्द— आनांनीच तिथं स्वतः लिहिले होते. हे एकट्या आनांनाच माहीत. दुसऱ्या कोणालाच, अगदी सदानंदलाही माहीत नव्हतं घरात.

आता आज घोंडुबुवांसारखे एक अगदी परके गृहस्थ एकदम घरात येतात काय, जातात काय, नि प्रत्यक्ष त्यांना स्वतःलाच अर्थ न समजणारे हे शब्द निघून जाण्यापूर्वी उच्चारतात काय !

आपल्या मनातले गेल्या चारपाच दिवसांतले ते सहस्र उलटेसुलटे विचार... त्यांना जणू उत्तरासारखाच शोभेल असा हा लेख प्रत्यक्ष आनांच्याच हस्ताक्षरात लिहिलेला असलेला तो अद्भुत लेख—केवढं हे भयंकर आश्चर्य ! माझं कोडं सुटलं.

तो लेख वाचून सदानंदला एक प्रकारचं गंभीर समाधानच लाभलं होतं.

तरी पण... त्या साऱ्यांच अद्भुत अनुभवाने रोमहर्षित झालेलं पण काहीसं सुन्नही झालेलं त्याचं मन, काही केल्या अजून पूर्ण शांतही झालेलं नव्हतं.

*

तसल्याच पुलकित अंतःकरणाने, तो फोटो नि त्यामागील आनांच्या हस्ताक्षरातला तो

नव्यानेच आढळलेला लेख सदानंदने जेव्हा बाहेर सर्वांनाच नेऊन दाखवला, तेव्हा निर्मलेचंही अंग एकदम शहारून आलं. मंगलही रात्रीची सदानंदाची प्रश्नमालिका आठवून विस्मित झाली. काही न बोलताच, अगदी कुंठित मनाने, सदूकाका व भागीआत्या दोघं सर्वांकडे पाहू लागली. जणू आबांसह आनाबापूच आपल्याला भेटायला आज आला आहे असं त्यांना वाटलं.

सगळी किती तरी वेळ तशीच एकमेकांच्या शेजारी गपचूप गपचूपच बसून राहिली होती. त्या निश्चलतेत, त्या शांततेत देखील त्यांना एक अगम्य सुख लाभत होतं.

## भेटेन पुन्हा

इतक्यात आपल्याला झालेल्या एका नव्याच स्मृतीने सदानंद दचकून उठला नि शेजारीच इतरांमधे बसलेल्या मंगलला गडबडीने म्हणाला, " मंगल, जा बघू—ऊठ लौकर ते आनांचं वेस्टेन्ड घड्याळ कुठं ठेवलं असशील ते आधी शोधून काढ... इकडे घेऊन ये. या फोटोबरोबरच आनांनी तेही दिलं होतं मला. जा— आजच्या आज आपण ते नीट करायला देऊन टाकू या..."

मग सर्वांनी मिळूनच, मंगलेचे तिन्हीचारी ट्रंक उघडून, खालपर्यंत उपसून त्या नादुरुस्त घड्याळाचा कसून शोध सुरू केला.

शेवटी चौथ्या ट्रंकेत, मंगलेच्या ठेवणीतल्या लुगड्या-खणांच्या घड्यांखाली, रेमिंग्टन टाइपरायटरच्या टेपच्या चौकोनी डबीमध्ये, केशरावरच, एका मखमलीच्या तुकड्यात, ते सुरक्षित व्यवस्थित गुंडाळून ठेवलेलं सापडलं.

केवढा आनंद झाला सदानंदला! मंगलेने ते अलगद उचलून त्याच्या हाती दिलं.

निर्मला जवळच उभी होती. तिने कुतूहलाने हात पुढे करताच, त्याने तिच्या तळहातावर ते नीट ठेवलं.

आपल्या पाची बोटांत वर्तुळाकार धरून, निर्मलने ते गोल गोल हलवलं. हळूच कानाला लावून पाहिलं—दोन चारदा टिक् टिक् होऊन ते बंद पडलं. ती आपल्याशी हळूच पुटपुटली, " पडलं बंद— "

" अग, बंदच पडलंय केव्हाच ते– " खुर्चीवर जाऊन बसत सदानंद म्हणाला, " आनांनी ते तसंच टाकून ठेवलं होतं केव्हाच. म्हणाले नव्हते का ते तसं, आपल्याला हे देताना— "

*

केवळ निरर्थ चाळा म्हणून मग, निर्मलेने ते आपल्या डाव्या हाताच्या अंगठ्या-

बोटांच्या पकडीत धरून, उजव्या हाताच्या अंगठ्या-बोटाने त्याची चावी फिरवली. दोन-तीन वळसेही दिले.

तिला कसली कल्पनाही नव्हती. पण तशी चावी देता देता तिच्या उजव्या हाताच्या अंगठ्या–तर्जनीला, नेहमी घड्याळाच्या स्प्रिंगचा उलट्या बाजूला जाणवतो तसला एक सूक्ष्म दाब जाणवला. तेव्हा जरा संभाळून तिने चावीचे आणखी पाचसहा वळसे दिले. ती अखेर पुरी होऊन घट्टही होत आली.

दुसऱ्या कोणाचंच त्या वेळी तिच्याकडे लक्ष नव्हतं. भागाआत्या आपल्या नातीं-बरोबर लाडीक लाडीक गप्पा मारीत होती. त्यांच्या त्या गोड गोड संवादामध्ये, सात्त्विक समाधानी चेहऱ्याने तिकडे पाहत मंगल गुंग होती. सदूकाका बाहेर गॅलरीत उभे राहून लवंग्या विडीचे झुरके घेत होते. आपल्याच विचारांत व्यग्र होऊन, सदानंद आराम-खुर्चीवर पडला होता नि आढ्याकडे पाहत होता.

सारी चावी अपेक्षितपणे देता आल्यामुळे निर्मलेने ते घड्याळ हळूच एकदा वर्तुळाकार हलवून धडधडत्या छातीने आपल्या कानाला लावलं. तिच्या कानांवर मघा-सारखाच आवाज पडला. “ टिक् टिक् टिक् टिक्… ”

पण… पण… तसेच क्षणामागून क्षण गेले नि तरीही ती जोरकस टिक् टिक् मघा-सारखी चालूच राहिली. किती अद्‌भुत होता तो अनुभव—सारखीच चालू राहिलेली ती कानांवर पडणारी “ टिक् टिक् ”…

ती नवी जाणीव होताच, अखेर अगदी न राहवून, निर्मला आवेगाने एकदम ओरडलीच, “ सदा— सदाभय्या— अरे हे… हे… हे बघ काय ? अरे हे बघ तरी– हे तुझं घड्याळ बघ चालतंय चांगलं— ”

“ काय ! चल्, काही तरीच— ” सदानंद ओरडून म्हणाला नि उठून तिच्याजवळ धावला.

*

दोघांच्या त्या आश्चर्याच्या चीत्कारांनी इतरही सर्वांचं लक्ष तिकडे वेधून, ती निर्मल-भोवती एकदम गोळा झाली.

आनांचं ते ‘ वेस्टेन्ड ’ कानाला लावूनच, अत्यंत विस्मित चेहऱ्यानं निमा तशीच निश्चल उभी होती. तिचे डोळे अश्रूंनी ओतप्रोत भरले होते. मोठमोठे थेंब तिच्या गालांवरून खाली टपटपत होते.

नकळत येणारे हुंदके ती आतल्या आत दडपत होती, नि रडण्यापेक्षा अधिक हसऱ्या अडखळत्या शब्दांतच, जड घोगऱ्या आवाजातच ती मोठ्याने म्हणत होती, “ सदाभय्या… सदाभय्या, माझ्या देखतच मोठ्या प्रेमाने आनांनी तुला दिलेलं हे घड्याळ— बघ… हाती घे… टिक्– टिक्… टिक् टिक्… पुन्हा पुन्हा जोराने, नव्या दमाने ते चालू झालंय ! ”

चमकत्या दृष्टीने व गडबडल्या धडधडत्या हृदयाने सदानंदाने हात पुढे केला.

पण स्वतःच त्याच्या कानाला ते लावीत निर्मला भराभरा पुढे म्हणाली, " खरंच... खरंच, मला वाटतंय—आता पुरं पटतंय रे सदाभय्या—आयुष्यभर आपण त्यांच्याशी झगडलो–भांडलो, त्यांना दुःख दिलं, तरी पण अगदी संतुष्ट होऊन, तुला नि मला प्रेमाचा खराखुरा आशीर्वाद द्यायला आपले आनाच हे असे आज आले आहेत! अगदी सांगून–सवरून भेटायला, बोलायला, हालचाल करायला, धोंडुबुवांच्या तोंडाने जेवून ढेकर द्यायला. आपल्याच घरामधे, आपल्या सर्वांमधे, आपल्या मनामधेही ते शिरले आहेत! आना ..आना, खरंच तुम्ही आम्हाला पुन्हा भेटलात! आमचं तसं चुकलं नव्हतं, आम्ही निष्पापच होतो, हे केव्हातरी अखेर अखेर तुम्हांला कळलं. हे आता आम्हांलाही कळलं...होय, म्हणून तुम्ही आलात...आला होता, येऊन गेलात..."

*

एकाएकी चालू झालेलं ते आनांचं घड्याळ मग साऱ्यांनीच आळीपाळीने आपापल्या कानाला ते लावून पाहिलं. त्याच्या सुरू झालेल्या त्या टिकटिकीच्या अद्भुत अनुभवाने क्षणभर ती सारीच स्तंभित झाली.

अखेर, टिकटिकणाऱ्या व वर्तुळाकार हलणाऱ्या छोट्या सेकंदकाट्याकडे अत्यंत विस्मयाने टक लावून पाहत सदानंद म्हणाला, " खरंच निमा...आनांच्या हातचं हे घड्याळ म्हणजे क्षणभर मला माझ्याच आयुष्याचं प्रतीक वाटतंय. या क्षणी...मधे कित्येक वर्षं, काही एक कारण नसताना, तेही असंच अगदी असून नसल्यासारखं बंद पडून होतं.. आना आले... आता त्यांनीच ते फिरून चालू केलंय...माझं आता नवजीवन सुरू झालंय..."

सदानंदच्या त्या नव्या उत्साहाचा मंगलला देखील नकळतच संसर्ग झाला. मोठ्या प्रेमाने ती त्याच्याकडे पाहत, प्रशांत हसली.

निर्मलने तिच्या व सदानंदच्या खांद्यांवर डावे-उजवे हात टेकले व अश्रुभरित नेत्रांनी त्या दोघांनाही अगदी आपल्या निकट ओढलं व आलिंगन दिलं.

तेव्हा भागाआत्या गंभीरपणे म्हणाली, " सदा, निमा, मंगल—पोरांनो, येईल बरं, पुन्हा येईल, पुन्हा भेटेल तुम्हांला आना! सदानंदच्या गेलेल्या परागची जागा भरून काढायला प्रत्यक्षच येईल बघा तो... या त्याच्याच घरात राहायला...अगदी वर्षाच्या आत. बरं का सूनबाई, तसा तो पुन्हा भेटेल त्या वेळी, त्याला ' अनंत ' अशीच सर्वांनी हाक मारायची ठरवून टाकलंय हं मी, आजच..."

आत्याच्या त्या उद्गारांनी सर्वांनाच एक प्रकारचं प्रसन्न वाटत होतं. आयुष्यातलं एक न्यारंच समाधान मिळत होतं.

*

पण सदानंदाच्या हृदयात तर त्या क्षणी निर्मळ-निष्पाप अशा मुलाचा हिमालयच उभारला गेला होता...त्याच्या कानाजवळ, त्या पुन्हा नव्याने आपोआप चालू झालेल्या घड्याळाची टिक् टिक् तशीच जोरकस आवाजात चालू होती.

नि कोणीतरी त्याच्या कानांत साद घालून, त्याच ठेक्यांच्या लयीत सारखं म्हणत असल्यासारखा त्याला एकच एक भास होत होता— ते एकच एक शब्द कानावर पडत होते— " भेटेन पुन्हा...आबा-आना..." " आबा-आना...भेटेन पुन्हा!"